म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. 2200

REFBK-0018436

म. ग्रं. सं. ठाणें
ग्र निबंध
क्र. ३२८८

जीवन भाष्ये

भाग दुसरा

Commentaries on Living-Second Series

जे. कृष्णमूर्ती

भाषांतर : सौ. विमलाबाई देशपांडे

१८४३५
१८४३५
निबंध-
७९६६०
संदर्भ-
2.92.02
2200

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

- 3 SEP 1975
23 MAY 1976
1 AUG 1982
31 OCT 1982

[कृ. मा. प.]

जीवन भाष्ये

भाग दुसरा

(Commentaries on Living-Second Series)

जे. कृष्णमूर्ती

भाषांतर

सौ. विमलाबाई देशपांडे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७९६६० वि: निबंध
क्रमांक २२०० नों: दि: २/१२/७२

REFBK-0018436

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१८०३६

ओरिएंट लॉंगमन लिमिटेड
मुंबई, कलकत्ता, मद्रास, नवी दिल्ली

किंमत रु. १२-५०

मुद्रक

सुजित पटवर्धन,
संगम प्रेस लिमिटेड,
१७ ब, कोथरूड, पुणें २९.

प्रकाशक

सी. एम्. सालिस,
ओरिएंट लाँगमन लिमिटेड,
निकोल रोड, वॅलार्ड इस्टेट,
मुंबई १.

अनुक्रम

		पृष्ठ
१. सर्जनशील सौख्य	...	१
२. संस्कारबद्धता	...	५
३. आंतरिक एकाकिता	...	१०
४. द्वेषाची प्रक्रिया	...	१६
५. प्रगती आणि क्रांती	...	२१
६. कंटाळा	...	२८
७. अनुशासन	...	३४
८. संघर्ष–विमुक्तता–संबद्धता	...	४०
९. प्रयत्न	...	४८
१०. भक्ती आणि पूजन	...	५६
११. आवड	...	६१
१२. शिक्षण आणि एकात्मकता	...	६७
१३. विशुद्धशीलत्व	...	७६
१४. मृत्यूची भीती	...	८४
१५. विचारक आणि विचार यांची एकरूपता	...	९२
१६. सत्तेचा पाठलाग	...	९९
१७. कोणती गोष्ट तुम्हांला सवेदनशून्य बनवीत आहे ?	...	१०६
१८. कर्म	...	११४
१९. व्यक्ती आणि ध्येय	...	११९
२०. आघाताभिमुखता म्हणजेच जीवन, परावृत्तता म्हणजेच मरण	...	१२६
२१. निराशा आणि आशा	...	१३४
२२. चित्त आणि ज्ञान	...	१४१
२३. समाजानुवर्तिता आणि विमुक्तता	...	१४८
२४. काल आणि सातत्य	...	१५५
२५. कुटुंब आणि सुरक्षणाची अभिलाषा	...	१६१
२६. अहं	...	१६७
२७. अभिलाषेचे स्वरूप	...	१७४
२८. जीवनाचा हेतू	...	१८०

पृष्ठ

२९. अनुभवाचे मूल्यमापन ... १८६
३०. प्रीतीची समस्या ... १९५
३१. शिक्षकाचा खरा धर्म कोणता ? ... २००
३२. तुमची मुले व त्यांचे यश ... २०४
३३. प्राप्तव्याचा शोध ... २१०
३४. श्रवण ... २१४
३५. असंतोषाग्नी ... २१७
३६. परमानंदाचा अनुभव ... २२१
३७. जनहितैषी राजकारणी पुरुष ... २२७
३८. स्मर्थात्मक जीवनरीत ... २३२
३९. ध्यान–प्रयत्न–जाणीव ... २३८
४०. मनोविश्लेषण आणि मानवी समस्या ... २४३
४१. गतानुभवापासून मुक्ती ... २४९
४२. सत्ता आणि सहकार ... २५६
४३. सामान्यपणा ... २६०
४४. प्रवृत्तिशील आणि निवृत्तिशील शिक्षण ... २६६
४५. साह्य ... २७५
४६. मनाची निःशब्दता ... २८१
४७. समाधान ... २८८
४८. नट ... २९३
४९. ज्ञानाची रीत ... २९८
५०. ठाम मते––स्वप्ने ... ३०३
५१. मृत्यू ... ३०९
५२. मूल्यमापन ... ३१६
५३. असूया आणि एकाकीपणा ... ३२३
५४. मनातील तुफान ... ३३१
५५. विचारांचे नियंत्रण ... ३३७
५६. अगाध विचार संभवनीय आहे का ? ... ३४६
५७. अमितता ... ३४९

सर्जनशील सौख्य

त्या महान वैभवशाली नदीच्या तीरावर एक नगर वसलेले आहे. नदीतीरावरील घाटांच्या लांवरुंद प्रशस्त पायऱ्या थेट प्रवाहापर्यंत पोचलेल्या आहेत. या प्रशस्त पायऱ्यांवर जणु काही साऱ्या विश्वाचा व्यवहार चालला आहे असे वाटते. अगदी पहाटेपासून तो अंधार पडल्यानंतरही या पायऱ्या लोकांनी गजवजलेल्या असतात. नदीप्रवाहापाशी पोचलेल्या पायऱ्यांवर अनेक लोक ध्यानस्थ बसलेले दिसतात. कुणी आपल्या इष्ट दैवतांचे चिंतन करीत असतात; कुणी आपापल्या आशा-आकांक्षांच्या विचारात मग्न असतात; तर कुणी मंत्र व जप करण्यात गढून गेलेले असतात. आसपासच्या देवळातून घंटानाद होत असतो. मशिदीतून प्रार्थनेसाठी तारस्वरात आवाहन केले जात असते. कोणऱ्यावर कुणीतरी भजन म्हणत असते. आणि त्याच्या-भोवती जमलेला विशाल लोकसमुदाय मोठ्या आस्थेने ते श्रवण करीत असतो.

नगराच्या या भागापलीकडे नदीच्या वरच्या बाजूला एक वेगळ्याच प्रकारची वस्ती आहे. ही वस्ती नदीकिनारा सोडून काही मैल आत पसरलेली आहे. येथील प्रशस्त रस्त्यांच्या दुतर्फा प्रच्छाय वृक्षांच्या रांगा आहेत. पण विद्यानगरीच्या या विस्तीर्ण क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी नदीकिनाऱ्यालगतच्या एका घाणेरड्या, अरुंद बोळामधून जावे लागते. येथे देशाच्या नाना विभागातून आलेले विद्यार्थी आहेत. त्यांच्यात चळवळेपणा, कोलाहलप्रियता आहे व उत्सुकताही आहे. येथील प्राध्या-पकात मात्र शिष्टपणाच प्रामुख्याने आढळतो. अधिक पगार व वरची जागा ही मिळ-विण्यासाठी अनेक कारस्थाने करण्यात ते अहर्निश गुंतलेले असतात. विद्यालयात आलेले विद्यार्थी एकदा शिक्षण पुरे करून निघून गेले की, पुढे त्यांचे काय होते, याची कुणालाच फारशी फिकीर असल्याचे दिसत नाही. हे प्राध्यापक विद्यार्थ्यांना विशिष्ट माहिती व ज्ञान आणि त्या त्या विषयाचे विशिष्ट तंत्र अवगत करून देतात. आणि हुषार विद्यार्थी हे सारे चटकन् ग्रहणही करतात. आपण शिकवीत असलेल्या विद्यार्थ्यांना एकदा पदवी प्राप्त झाली की, प्राध्यापकांचे काम संपले. कारण त्यांना स्वतःला नोकरीची सुरक्षितता लाभलेली असते, स्वतःचे कुटुंब असते. पण विद्यार्थी मात्र एकदा पदरात पदवी पडून बाहेर पडले की, त्यांना जीवनातील असुरक्षिततेला व नाना प्रकारच्या अडचणींना तोंड द्यावे लागते !

अशा प्रकारच्या शैक्षणिक संस्था, अशा प्रकारचे शिक्षक आणि असे विद्यार्थी हे देशभर सगळीकडेच पसरलेले असतात. या विद्यार्थ्यांपैकी काहीजणांना कीर्ती व मानमान्यता प्राप्त होते. बाकी सारे मात्र कसावसा संसार व कशीबशी नोकरी करीत जीवनाशी झगडत एक दिवस मरून जातात. वस्तुतः प्रत्येक देशाला कुशल

यंत्रतंत्रज्ञ व उत्तम शासन करू शकणारे कार्यक्षम शासक हवेच असतात. त्याचप्रमाणे सैन्यात, धर्मसंस्थात व उद्योगधंद्यात योग्य व कार्यक्षम माणसांची गरज असतेच. जगात सगळीकडेच हे आढळून येते.

आपले जे वरचे संबोध मन असते, ते नाना प्रकारच्या माहितीने व ज्ञानाने गच्च भरून टाकण्याची ही जी प्रकिया शिक्षणसंस्थांमधून चाललेली असते, तिच्यामागे केवळ एकच हेतू असतो. एखादे तंत्र शिकून घ्यावे व त्याच्या साह्याने नोकरी किंवा उद्योगधंदा मिळवावा एवढाच येथे हेतू असतो. आजच्या आधुनिक जगात चांगली नोकरी किंवा व्यवसाय मिळविणे हे चांगल्या तंत्रविशारदाला सुलभ असते हे उघडच आहे. पण एवढ्यानेच काम भागते का? जीवनात येणाऱ्या नाना गुंतागंतीच्या समस्यांना तोंड देण्याचे सामर्थ्य तंत्रज्ञ नसलेल्या माणसापेक्षा तंत्रविशारदामध्ये अधिक असते असे थोडेच आहे? वस्तुतः नोकरी किंवा व्यवसाय हा जीवनाचा केवळ एक अंश असतो. जीवनाचे इतर अंश हे सूक्ष्म, गुप्त व रहस्यमय असे असतात. जीवनाच्या एकाच अंशावर जोर देण्याने व इतर अंशांकडे दुर्लक्ष करण्याने माणसाच्या कृती या विकृत स्वरूपाच्या व विघटनात्मक होणे अपरिहार्यच आहे. पण आजच्या जगात सगळीकडे नेमके हेच घडून येत आहे. आणि याचमुळे विरोध, संभ्रम व दुःख ही सगळीकडे अधिकाधिक वाढत चालली आहेत. अर्थात काही थोडीशी अपवादभूत माणसेही या जगात वास करीत आहेत. ही माणसे मनोनिर्मित, मनोविकल्पित गोष्टींवर अवलंबून नसतात. जे मानवकृत नाही अशा काहीतरी अज्ञात वस्तूचा त्यांना स्पर्श झालेला असतो; ती सर्जनशील असतात; ती आनंदमय असतात.

असा आनंद, अशी सर्जनशीलता प्राप्त करून घेण्याची क्षमता, कालपाशांच्या पलीकडे असणाऱ्या त्या अज्ञाताचा स्पर्श प्राप्त करून घेण्याची क्षमता, ही वस्तुतः आपणांपैकी प्रत्येकात निसर्गतःच वसत असते. सर्जनशील सौख्य ही काही थोड्या भाग्यवंतांसाठी राखून ठेवलेली दैवी देणगी नव्हे. पण अशी वस्तुस्थिती असताही बहुतेक लोकांना अशा सौख्याची कल्पनाही नसते. असे का व्हावे हे कळत नाही. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली, जीवनात कितीही अपघात वाटचास आले, केवढीही संकटे उभी ठाकली, तरी काही थोड्या लोकांचा त्या अथांगाशी, त्या गहनगंभीराशी असणारा स्पर्श सुटत नाही. आणि इतर बहुतेक लोकांना मात्र हेच अपघात व हीच संकटे जमीनदोस्त करून टाकतात. असे का व्हावे हे कळत नाही. अपघात सहजपणे झेलण्याची मृदू, लवचिक वृत्ती काही थोड्या लोकांमध्येच का वरे असते? आणि आघाताशी टक्कर घेणारी, न नमणारी, न लवणारी आणि अखेर आपला सर्वनाश ओढवून घेणारी वृत्तीच इतर सर्वांमध्ये का वरे दिसून येते? कुणीही मनुष्य वा कोणताही ग्रंथ जी वस्तू देऊ शकत नाही, त्या वस्तूसाठी काही

माणसे स्वतः ज्ञानवान असूनही आपल्या मनाचे दार मोकळे राहू देतात. आणि इतर माणसे मात्र शब्दप्रामाण्य व तंत्रज्ञान यांच्या अवजड ओझ्याखाली गुदमरून जातात. असे का वरे होत असते ? जीवनातील अधिक विशाल व अधिक गहन असणाऱ्या गोष्टींकडे दुर्लक्ष करून कुठल्यातरी प्रकारच्या कार्यामध्ये स्वतःला अडकवून टाकावयासच मानवी मनाला हवे असते असे वाटते. कारण असे करीत राहण्याने आपण निश्चित, सुरक्षित भूमिकेवर उभे आहोत, असे या मनाला वाटत असते. म्हणून याच निश्चित, सुरक्षित स्तरावरच्या शिक्षणाला, अभ्यासाला किंवा कार्याला सगळीकडे उत्तेजन दिले जात असते. आणि याच प्रकारच्या गोष्टींची कटाक्षाने जपणूक केली जात असते. आणि या निश्चित, सुरक्षित स्तरापलीकडे जाण्याची गोष्ट निघताच नाना प्रकारच्या सबबी पुढे केल्या जात असतात.

अशा प्रकारच्या तथाकथित शिक्षणाच्या संसर्गाने दूषित होण्यापूर्वी बालकांना त्या अज्ञाताचा स्पर्श झालेला असतो. बालकांच्या कितीतरी लहान लहान गोष्टींमधून ही गोष्ट स्पष्ट दिसून येत असते. पण हळूहळू बाह्य परिस्थिती त्यांच्याभोवती आपले पाश आवळू लागते. आणि एका विशिष्ट वयानंतर, कुठल्याही पुस्तकात किंवा शाळेत प्राप्त न होणारे ते सौंदर्य, ते आगळे तेज, ती ज्योत लोपून जाते. असे का वरे व्हावे ? 'वाढत्या वयाबरोबर मुलांवर जीवनाचा भार पडत जातो; कठोर वस्तुस्थितीला त्यांना तोंड द्यावे लागते; त्यांची हीच कर्मगती आहे; ते त्यांच्या वाडवडिलांचे पाप आहे,' असे म्हणून बालकांमधील या सौंदर्याभिमुखतेच्या लोपाचे समर्थन करण्यात येत असते. पण असे समर्थन करणे हे अगदी निर्बुद्धपणाचे आहे. सर्जनशील सौख्य प्राप्त होणे हे सर्वांनाच शक्य असते. केवळ काही थोड्यांनीच ती मिरासदारी नव्हे. या सौख्याची अभिव्यक्ती एकजण एका तऱ्हेने करील, तर दुसरा दुसऱ्या प्रकारे करील एवढेच काय ते. पण हे सौख्य प्रत्येकाच्या आवाक्यात येणारे आहे. मात्र या सर्जनशील सौख्याला जगाच्या बाजारात कसलेही मूल्य नाही. अधिकांत अधिक किंमत मोजणाऱ्याला विकता येण्यासारखी अशीही ती वस्तू नाही. पण ती एकच वस्तू अशी आहे, की जी सर्वांना प्राप्त होऊ शकते.

या सर्जनशील सौख्याचा साक्षात्कार माणसाला होणे शक्य आहे काय ? सर्व सौख्याचा हा जो मूलस्रोत आहे, त्याचा मनाला स्पर्श होत राहणे हे शक्य आहे काय ? ज्ञानाने, तंत्राने व शिक्षणाने जीवन गजबजून गेले असले, तरीही हा स्पर्श, ही सदाविमुक्त संवेदनशीलता कायम राहू शकेल काय ? या सर्व प्रश्नांचे उत्तर हे आहे की, हा स्पर्श अवश्य कायम राहू शकेल. पण या सत्याची जाणीव शिक्षकाला जर झाली असेल; सर्जनशील सौख्याच्या मूलस्रोताचा स्पर्श जर शिक्षण देणाऱ्याला स्वतःलाच झाला असेल, तरच हे संभवनीय होईल; तेव्हा आपल्यापुढील समस्य

ही वस्तुतः मुलांची किंवा विद्यार्थ्यांची समस्या नाही, तर शिक्षकांची व माता-पित्यांची समस्या आहे. या परम सौख्याचे महत्त्व व त्याची आत्यंतिक आवश्यकता, इतर सगळचा गोष्टींपेक्षा अधिक आहे, याची जोवर आपणांस जाणीव होणार नाही, तोवर शिक्षण हे एक दुष्टचक्र राहील यात शंका नाही. सर्व सौख्याच्या या मूलस्रोताच्या स्पर्शासाठी सदैव अभिमुख, सदैव तत्पर असणे, हाच सर्वश्रेष्ठ धर्म आहे. पण या परम सौख्याचा साक्षात्कार होण्यासाठी, आपण आपल्या अर्थार्जनाच्या व्यवसायाकडे देतो, तसे योग्य ते लक्ष त्याच्याकडे दिले पाहिजे. शिक्षकाचा व्यवसाय हा काही इतर दैनंदिन स्वरूपाच्या कंटाळवाण्या व्यवसायासारखा नाही. हा व्यवसाय हा सौंदर्याचा व आनंदाचा आविष्कार आहे. त्यातून मिळणाऱ्या प्राप्तव्याने किंवा यशस्वितेच्या मापाने मोजता येण्यासारखी काही ती वस्तू नव्हे.

अहंचा आविष्कार असणारे असे जे मन, ते जेव्हा जीवनाची सूत्रे वळकावून वसते तेव्हा सत्याचा प्रकाश व सत्याचा परमानंद ही नाहीशी होतात. म्हणून या अहंचे ज्ञान करून घेणे, निजज्ञान करून घेणे हाच प्रज्ञेचा प्रारंभ होय. असे हे निजज्ञान नसले की, शिक्षण हे मनुष्याला अज्ञानाकडे, कलहाकडे व दुःखाकडे ओढून नेणारेच ठरते.



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२२००
दा. क्र. ७९६६०
१७५
२/१२/७२
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

मराठी ग्रंथ ... मनुक्रम ...१९६९० ... नोंदी
नाम ...२२०० ... मा. दि. २/१

संस्कारबद्धता

भेटण्यास आलेल्या गृहस्थाला लोकोपयोगी कार्ये करण्याची व एकूण लोकांना मदत करण्याची विशेष तळमळ असलेली दिसत होती. अनेक समाजकल्याणकारी संस्थांतर्फे त्याचे कार्य चालू होते. पदवी घेऊन कॉलेजातून बाहेर पडल्यापासून आजपर्यंत, मानवांची सुधारणा घडवून आणण्यासाठी आपण अव्याहत झटत आलो आहोत आणि या कामातून आपण एकदाही मोठी सुटी घेतलेली नाही, असे तो सांगत होता. या कामासाठी तो पैसाही घेत नव्हता. आपले कार्य त्याला अतिशय महत्त्वाचे वाटत होते, त्याची आपल्या कार्यावर आसक्तीच जडल्यासारखी झाली होती. आज तो प्रथम श्रेणीचा कार्यकर्ता बनलेला होता. — त्याने नुकतेच एक प्रवचन ऐकले होते. मन ज्या वेगवेगळ्या पळवाटा शोधीत असते व ज्यांच्याद्वारा स्वतःला संस्कारबद्ध करून घेत राहते, त्यांच्याबद्दलचे विवरण त्या प्रवचनात त्याच्या कानी पडले होते. म्हणून या बाबतीत अधिक काही समजून घेण्यासाठी तो आलेला होता.

"समाजकार्यकर्ता होणे हा संस्कारबद्धतेचा प्रकार आहे, असे का आपले म्हणणे आहे? अशा कार्यामुळे संघर्षच काय तो अधिकाधिक वाढत जातो का?" त्याने प्रश्न केला.

हे पाहा, संस्कारबद्धता म्हणजे काय हे आपण प्रथम शोधून पाहू या. आपण संस्कारबद्ध आहोत, या गोष्टीची जाणीव आपल्याला कधी तरी होते का? आणि समजा झालीच, तर केव्हा बरे होते? आपण संस्कारबद्ध आहोत, या गोष्टीची जाणीव तुम्हाला स्वतःला होते का? की, आपल्या जीवनाच्या वेगवेगळ्या स्तरांवर माजत असलेला कलह व संघर्ष तेवढाच तुमच्या लक्षात येतो? वस्तुतः माणसांना आपल्या संस्कारबद्धतेची मुळीच जाणीव नसते; तर आपल्या सुखदुःखांची व आपल्या मनामध्ये चाललेल्या विविध संघर्षांचीच काय ती जाणीव असते.

"संघर्ष या शब्दाने आपण काय ध्वनित करीत आहात?"

या शब्दाने मला सर्वच प्रकारचे संघर्ष अभिप्रेत आहेत. राष्ट्राराष्ट्रांतील संघर्ष, वेगवेगळ्या समूहांतील संघर्ष, व्यक्तीव्यक्तीतील संघर्ष आणि स्वतःच्या मनामध्ये चालू राहणारा संघर्ष हे सर्व प्रकार संघर्ष या शब्दाने ध्वनित होतात. जोपर्यंत कृती करणारा व त्याची कृती यांच्यामध्ये, तसेच जीवनाचे आव्हान व त्याला दिले जाणारे उत्तर यांच्यामध्ये एकात्मता उत्पन्न होणार नाही, तोवर संघर्ष उत्पन्न होत राहणे हे अपरिहार्यच आहे; होय की नाही? अशी वस्तुस्थिती असल्यामुळे, संघर्ष का घडून येतो, ही आपल्यापुढील समस्या आहे. या ठिकाणी कोणताही विशिष्ट प्रकारचा संघर्ष अभिप्रेत नाही, तर एकूण संघर्ष हाच अभिप्रेत आहे: वेगवेगळ्या विचारां-

मधील, निष्ठांमधील, विचारप्रणालींमधील आणि कोणत्याही दोन विरुद्धांमधील संघर्ष. अशा प्रकारचा संघर्ष जर नसता, तर कुठलीही समस्या उत्पन्नच झाली नसती.

" म्हणजे, आपण सर्वांनी जगापासून पूर्ण अलिप्त राहून ध्यानचिंतनातच जीवन घालवावे असे का आपल्याला सुचवायचे आहे ? "

हे पाहा, ध्यान ही समजण्यास अतिशय अवघड अशी गोष्ट आहे. आणि अलिप्तता ही गोष्ट तर अशी आहे की, आपल्यापैकी प्रत्येकजण जाणता वा अजाणता हिच्याच पाठीमागे लागलेला असला, तरी त्यामुळे आपले कुणाचेही प्रश्न कधीच सुटत नाहीत. उलट यामुळे ते अधिकाधिक वाढतच जातात. म्हणून मनुष्याला अधिकाधिक दुःखात लोटण्यास कारणीभूत होणाऱ्या या संस्कारबद्धतेचे घटक कोणते आहेत, हेच आपल्याला मुख्यतः समजावून घ्यायचे आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, आपल्याला फक्त आपल्या सुखदुःखांची व आपल्या संघर्षांचीच तेवढी जाणीव असते. आपण संस्कारबद्ध आहोत, या गोष्टीची मुळीच जाणीव नसते. मनुष्य जो संस्कारबद्ध होतो, तो कशामुळे होतो बरे ?

" मला वाटते की, भोवतालच्या सामाजिक व इतर प्रकारच्या प्रभावांमुळे मनुष्य संस्कारबद्ध होत असतो. ज्या समाजात आपण जन्मतो, ज्या संस्कारात आपण वाढतो, जी जी आर्थिक वा राजनैतिक दडपणे आपल्यावर येत असतात, त्यांच्यामुळे मनुष्य संस्कारबद्ध होत राहतो. "

तुम्ही सांगता ते ठीक आहे, पण तेवढ्याने संस्कारबद्धतेचे सर्व घटक संपतात का ? आपल्यावर पडणारे हे सारे प्रभाव आपणच आपल्या मनाने निर्माण केलेले नसतात का ? मनुष्यामनुष्यामधील संबंधांवरच समाजाची उभारणी होत असते ही गोष्ट उघडच आहे. हे सर्व संबंध कशावर आधारलेले असतात ? परस्परांचा उपयोग करून घेणे, परस्परांच्या गरजा भागविणे, परस्परांनी एकमेकांकडून सुखसोयी व समाधान प्राप्त करून घेणे, इत्यादिकांवर हे संबंध आधारलेले असतात. आणि यांच्यामधूनच वेगवेगळे प्रभाव व दडपणे आणि वेगवेगळी मूल्ये उत्पन्न होत असतात. आणि ही सर्व आपल्याला बांधून टाकीत असतात. असे हे बांधले जाणे म्हणजेच संस्कारबद्ध होऊन वसणे होय. वस्तुतः आपल्याच विचारांनी व कृतींनी आपण बद्ध होत असतो. पण आपण असे बद्ध होऊन वसलो आहोत, या गोष्टीची जाणीव मात्र आपल्याला नसते. आपली सुखे व आपली दुःखे यांच्यामध्ये चालत राहणाऱ्या संघर्षांचीच तेवढी आपल्याला जाणीव असते. याच्यापलीकडे आपण कधीच जात नाही. आणि यदाकदाचित गेलोच तर अधिकाधिक संघर्षातच जाऊन पडतो. आपल्या संस्कारबद्धतेची आपल्याला किंचितही जाणीव नसते. अशी जाणीव जोवर आपल्याला होणार नाही, तोवर अधिकाधिक संघर्ष व कलह उत्पन्न करण्या-वाचून आपण दुसरे काहीही करू शकणार नाही.

"पण आपल्या संस्कारबद्धतेची जाणीव माणसाला कशी वरे करून घेता येईल ?"

आपल्या जीवनातील दुसरी एक प्रक्रिया जर आपण समजून घेतली, तरच आपल्याला आपल्या संस्कारबद्धतेची जाणीव होऊ शकेल. ही दुसरी प्रक्रिया म्हणजे कशावर तरी आसक्त होऊन वसण्याची प्रक्रिया होय. आपल्याला एखाद्या गोष्टीबद्दल आसक्ती का वाटते हे जर आपण समजून घेतले, तर आपल्या संस्कारबद्धतेची जाणीव आपल्याला होईल.

"एका सरळ प्रश्नाकडे जाण्याचा हा भलताच दूरचा मार्ग नव्हे का ?"

खरेच का हा दूरचा मार्ग आहे ? तुम्ही आपल्या संस्कारबद्धतेची जाणीव करून घेण्याचा प्रयत्न तर करून पाहा, म्हणजे तुम्हाला कळेल. ही जाणीव अप्रत्यक्ष रीतीने, दुसऱ्या गोष्टींच्या संबंधांमधूनच करून घेणे शक्य असते. आपली संस्कारबद्धता ही एक कल्पना मानून तिचे आकलन करून घेता येणे हे शक्य नसते. कारण मग ते केवळ शाब्दिक आकलनच राहील, त्याला काहीही अर्थ उरणार नाही. वस्तुस्थिती अशी असते की माणसाला आपल्या संघर्षाचीच तेवढी जाणीव असते. वरे, हा संघर्ष कशामुळे उत्पन्न होत असतो ? जीवनाकडून येणारे आव्हान व त्याला आपल्याकडून मिळणारे उत्तर यांच्यामध्ये जेव्हा एकात्मता नसते, तेव्हाच संघर्ष उत्पन्न होत असतो. हा संघर्ष म्हणजे आपल्या संस्कारबद्धतेचाच परिणाम असतो. संस्कारबद्धता म्हणजे आसक्तता, आपल्या कार्याविषयीची आसक्ती, आपल्या परंपरेविषयी, आपल्या मालमत्तेविषयी, लोकांविषयी किंवा आपल्या कल्पना-तत्त्वे-विचारप्रणाली यांच्याविषयी आपल्याला वाटणारी आसक्ती. अशी ही आसक्तता जर माणसात नसेल, तर मनुष्य संस्कारबद्ध तरी होईल का ? अर्थातच होणार नाही. तेव्हा आपल्याला कशाविषयीही आसक्ती का वाटते हा आपल्यापुढील खरा प्रश्न आहे. एखाद्याची आपल्या देशाच्या ठायी आसक्ती असते. कारण देशाशी सारूप्य पावण्याने त्याला स्वतःला विशिष्ट प्रकारचे महत्त्व प्राप्त होत असते. एखादा मनुष्य आपल्या कार्याशी सारूप्य पावतो व यामुळे त्याचे कार्य हे त्याच्या दृष्टीने विशेष महत्त्वाचे होऊन बसते. आपल्या कुटुंबाशी किंवा मालमत्तेशी एखादा मनुष्य जेव्हा सारूप्य पावतो, तेव्हा आपण म्हणजेच आपले कुटुंब, आपण म्हणजेच आपली मालमत्ता, असे त्याच्या बाबतीत होऊन बसते.

वस्तुतः आपण स्वतः रिते वा पोकळ असतो. आणि आपल्या आसक्तिविषयांच्याद्वारा स्वतःपासून दूर दूर पळून जाण्याचे साधन आपण मिळवीत असतो. आसक्ती ही पळवाट असते. अशा पळवाटांमुळेच संस्कारबद्धताही अधिकाधिक दृढ होत जाते. समजा, तुम्हाला एखाद्या व्यक्तीविषयी आसक्ती वाटत आहे. याचा अर्थ हा की तुम्हांला स्वतःपासून दूर पळण्याचे एक साधन त्या व्यक्तीच्या रूपात सापडले आहे. आणि म्हणून ती व्यक्ती तुमच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची होऊन बसली आहे.

मग ती व्यक्ती सर्वस्वी तुमची असावी, तिला पक्के धरून ठेवावे, असे तुम्हाला वाटू लागते. आणि मग तुम्हाला संस्कारबद्ध करणारा एक घटक असे स्वरूप त्या व्यक्तीला प्राप्त होते. आणि त्या व्यक्तीच्या रूपाने तुम्हाला मिळालेली हीच पळवाट तुमच्या संस्कारबद्धतेचे कारण होऊन बसते. आपण अशा किती पळवाटांचा आश्रय करीत असतो, याची जर आपल्याला जाणीव झाली, तरच संस्कारबद्धतेचे घटक व त्यांचे विविध प्रभाव यांचे आपणांस दर्शन घडू शकेल.

" मग मीही या समाजकार्याच्याद्वारा स्वतःपासून दूर पळण्याचाच प्रयत्न करीत आहे का ?"

या कार्याबद्दल तुम्हाला आसक्ती वाटते का ? तुम्ही त्याला बांधले गेला आहात का ? तुम्ही जर हे समाजकार्य करीत राहिला नाहीत, तर तुम्हाला रिकामे-रिकामे, कंटाळवाणे असे वाटेल का ? सारे काही नाहीसे झाल्यासारखे वाटेल का ?

" हो, हो. मला नक्कीच असे वाटेल. "

असे असेल, तर तुमच्या कार्याविषयीची तुमची ही आसक्ती ही तुमची पळवाटच आहे. आपल्या जीवनाच्या प्रत्येक स्तरावरच अशा पळवाटा असतात. तुम्ही या कार्याच्या रूपात पळवाट शोधू पाहता. कुणी दारूच्याद्वारा, कुणी धार्मिक पूजा-विधींच्याद्वारा, कुणी ज्ञानसंपादनाच्याद्वारा, कुणी ईश्वरभक्तीच्याद्वारा तर कुणी करमणुकींच्याद्वारा पळवाटांचा आश्रय करीत असतात. या सगळ्या पळवाटा सारख्याच श्रेणीच्या असतात. कुठलीही पळवाट ही उच्च नव्हे व कुठलीही खालच्या श्रेणीची नव्हे. ईश्वरभक्ती किंवा मद्यसेवन या दोन्ही सारख्याच दर्जाच्या पळवाटा असतात. कारण स्वतःपासून दूर पळण्याचे एक साधन असेच त्यांचे स्वरूप असते. म्हणून जेव्हा आपल्याला आपल्या पळवाटांची जाणीव होईल, तेव्हाच आपली संस्कारबद्धता म्हणजे काय हेही कळून येईल.

" या समाजकार्याच्याद्वारा पळवाटा शोधणे मीच सोडून दिले, तर दुसरे तरी मी काय करणार ? जी पळवाट असणार नाही, असे कोणते कार्य मला करता येईल ? माझी प्रत्येक कृती हा स्वतःच्या खऱ्या स्वरूपापासून दूर पळण्याचाच प्रकार असणार नाही का ?"

तुमचा हा प्रश्न नुसत्या शाब्दिक स्तरावरचा आहे की तुम्ही सध्या जे अनुभवीत आहात ती प्रत्यक्ष वस्तुस्थिती तुमच्या प्रश्नातून व्यक्त होत आहे ? हे पाहा, पळवाटेचा आधार घेण्याचे तुम्ही सोडून दिले, तर काय होईल बरे ? तुम्ही असे साहस पूर्वी कधी करून पाहिले आहे का ?

" मला तर वाटते की आपण ज काही सांगता ते सारे अकरणात्मक स्वरूपाचेच आहे. माझ्या सध्याच्या कार्याच्या ऐवजी दुसरे काही करण्यास आपण मुळीच सुचवीत नाही असे मला वाटते. "

हे पाहा, की एकाच्या जागी दुसऱ्याची प्रतिष्ठापना करणे हा पळवाटेचाच एक प्रकार नाही का ? जेव्हा एखादे विशिष्ट कार्य माणसाला असमाधानकारक वाटू लागते, किंवा ते त्याच्या संघर्षालाच कारणीभूत होत राहते, तेव्हा मनुष्य दुसऱ्या प्रकारच्या कार्याला बिलगू पाहतो. पळवाटेचे स्वरूप जाणून न घेता एखाद्या कार्याच्या जागी दुसऱ्या कार्याची प्रतिष्ठापना करणे हे पूर्णतः अर्थशून्यच नसते का ? विविध प्रकारच्या पळवाटा व आपल्याला त्यांच्याबद्दल वाटणारी आसक्ती–याच तर माणसाला संस्कारबद्ध करीत असतात. या संस्कारबद्धतेमुळेच समस्या व संघर्ष उत्पन्न होत राहतात. या संस्कारबद्धतेमुळेच आपल्याला जीवनाकडून येत राहणाऱ्या आव्हानांचे आकलन होऊ शकत नाही. आपण असे संस्कारबद्ध असतो, म्हणूनच जीवनाच्या आव्हानाला जे उत्तर देतो, त्यातून संघर्ष उत्पन्न होत राहणे अटळ होऊन बसते.

" मग संस्कारबद्धतेपासून मनुष्य मुक्त कसा होऊ शकेल ?"

केवळ तिचे साक्षात् आकलन करून घेण्यानेच. आपल्या सर्व पळवाटांची पूर्ण जाणीव करून घेण्याने. आपल्याला एखाद्या विशिष्ट व्यक्तीविषयी, कार्याविषयी किंवा वैचारिकतेविषयी जी आसक्ती वाटते, तीच आपल्याला संस्कारबद्ध करीत असते. आकलन करून घेण्याची जर कोणती गोष्ट असेल, तर ती हीच आहे. अधिक चांगली किंवा अधिक सुबुद्ध पळवाट शोधणे हा आकलनाचा मार्ग नव्हे. साऱ्याच पळवाटा या निर्बुद्ध असतात. यांच्यामुळे संघर्ष उत्पन्न होत राहणे हे अटळच असते. अनासक्त होण्याचा प्रयत्न करणे हाही पळवाटेचा किंवा वास्तवताविन्मुख होऊन बसण्याचाच एक वेगळा प्रकार असतो. कारण ती अनासक्तीनामक ध्येयाबद्दलची किंवा अमूर्त तत्त्वाबद्दलची आसक्तीच असते. हे ध्येय अहंनिर्मित काल्पनिक ध्येय असते आणि या ध्येयाप्रत पोचणे हाही, जे वास्तव आहे, त्याच्यापासून दूर नेणाऱ्या पळवाटेचाच एक प्रकार असतो. मन जेव्हा कुठल्याही पळवाटेचा आश्रय घेण्याचे पूर्णपणे सोडून देते, तेव्हाच जे वास्तव आहे, त्याचे आकलन होते आणि वास्तवाच्या संबंधात जी यथार्थ कृती असते, ती घडून येते. जे वास्तव आहे त्याचा विचार करीत बसणे हीही वास्तवापासून दूर जाण्याची पळवाटच आहे. आपल्या समस्येबद्दल विचार करीत राहणे म्हणजे समस्येपासून दूर पळणेच होय. कारण विचार करीत राहणे हीच तर नेमकी समस्या असते. आपले जे वास्तव स्वरूप असते, ते मनाला नको असते. त्याची मनाला भीती वाटत असते. म्हणूनच मन नाना पळवाटा शोधीत असते. आणि विचार करीत बसणे म्हणजेच पळवाटांचा आश्रय करणे होय. जोवर विचार चालू राहील, तोवर पळवाटाही चालूच राहतील, आसक्ती चालूच राहील, आणि त्यामुळे संस्कारबद्धता ही जास्त जास्तच दृढ होत जाईल.

विचारांपासून, विकल्पनांपासून मन जेव्हा मुक्त होते, तेव्हाच संस्कारबद्धतेपासून ही मुक्तता होते. मन जेव्हा संपूर्णपणे शांत, निःस्तब्ध बनते, तेव्हाच सत्याचा उदय होण्यास विमुक्त अवकाश प्राप्त होतो.

आंतरिक एकाकिता

प्रति दिवशी, घटकेघटकेला, क्षणाक्षणाला जे जे गतकालात गडप होत असते ते कायमचेच मृत होऊन जात असते. पण या गोष्टीची जागती जाणीव ठेवून जीवन जगणे हे किती महत्त्वाचे आहे, हे क्वचितच ओळखले जाते. जुन्याचा मृत्यू घडून आल्याशिवाय नवनिर्मिती शक्य नसते, मृत्यूवाचून नवसर्जन अशक्य. गतकालाच्या प्रचंड भारामुळे गताचेच सातत्य चालू राहते आणि कालच्या चिंता आजच्या चिंतांना सतत पुष्ट करीत राहतात. कालचा दिवसच आजला सातत्य मिळवून देत असतो आणि उद्या हेदेखील कालच्या दिवसाचेच सातत्य असते. अशा या अविरत सातत्यातून मृत्यूवाचून सुटका होणे शक्य नसते. गताच्या या मरणात आनंद असतो. आजची ही निर्मल, सतेज प्रभात कालच्या प्रकाशापासून व काळोखापासून सर्वस्वी विमुक्त आहे. त्या पक्ष्याचे मधुर गीत आज प्रथमच कानी पडत आहे आणि मुलांच्या या कोलाहलात गत दिवसाचा मागमूसही उरलेला नाही. पण आपण सर्वजण मात्र कालची स्मृती मनात वाळगीत असतो. आणि तीच आपले जीवन काळवंडून टाकीत असते. जोवर आपले मन हे स्मृतींचे जड यंत्र बनलेले राहील, तोवर त्याला कधीच विश्रांती मिळणार नाही; निःशब्दता व शांतता लाभणार नाही; आणि ते सतत झिजतच राहील. जे शांत, निःशब्द असते ते नव्याने जन्म घेऊ शकते. पण जे जे अविरत कर्मात बुडलेले असते ते सारखे झिजत जाते व अखेरीस निरुपयोगी होऊन बसते. सातत्याचा अंत झाल्याशिवाय नवसर्जनाचा झरा उसळून येणे अशक्य असते. वस्तुतः मरण हे जीवनाइतकेच आपल्या निकट असते.

भेटण्यास आलेली स्त्री सांगत होती, 'एका प्रथितयश मानसशास्त्रज्ञापाशी आपण अनेक वर्षे अध्ययन करीत होतो. आणि त्याच्याकडून आपण आपले मनोविश्लेषणही दीर्घ कालपर्यंत करून घेत होतो.'—त्या स्त्रीचा जन्म व तिचे लालनपालन ख्रिश्चन धर्माच्या वातावरणात जरी झाले होते आणि हिंदुधर्माचा व भारतीय दर्शनकारांच्या तत्त्वज्ञानाचा जरी तिने अभ्यास केलेला होता, तरी कुठल्याही धर्माचा वा तत्त्वप्रणालीचा तिने स्वीकार केलेला नव्हता. तिला कशाच्याहीद्वारा समाधान प्राप्त झालेले नव्हते; मनोविश्लेषणशास्त्रही तिने वाजूस सारले होते आणि सध्या कुठल्याशा समाजकल्याण कार्यात तिने स्वतःला गंतवून घेतले होते. तिचा विवाह झालेला असून कौटुंबिक जीवनात वाटचास येणाऱ्या सर्व प्रकारच्या सुखदुःखांचा अनुभव तिने घेतला होता. मानसिक समाधानासाठी तिने वेगवेगळ्या गोष्टींचा आधार घेऊन पाहिलेला होता. कधी सामाजिक मानमान्यतेचा तर कधी एखाद्या विशिष्ट कार्याचा किंवा अर्थसंचय करीत राहण्याचा तिने आधार घेतलेला

होता. आणि कधी या नीलसागराजवळच्या प्रदेशातील उदार हवेच्या सुखास्वादात तिने स्वतःला बुडवून टाकले होते. पण दिवसानुदिवस तिची दुःखे व यातना वाढतच चालल्या होत्या. त्या तिच्या सहनशक्तीच्या आवाक्यातील असल्या, तरी एका ठराविक मर्यादेपलीकडील सखोलता तिला जीवनाच्या कुठल्याही बाबतीत कधीही गाठता आली नव्हती. आणि ही ठराविक मर्यादाही बरीच संकुचित, बरीच उथळ स्वरूपाची होती.

जीवनातील सारे काही सामान्यतः उथळच असते. आणि हे उथळ लवकरच संपुष्टात येत असते. आणि जे नवे येते, ते तर अधिकच उथळ ठरते. मनाच्या कोणत्याही व्यापाराच्याद्वारा ते अक्षय, ते अनंत कधीच गवसत नसते.

ती स्त्री सांगू लागली,

"एका प्रकारच्या कार्याकडून दुसऱ्या प्रकारच्या कार्याकडे, एका तऱ्हेच्या दुर्दैवी घटनेकडून दुसऱ्या तऱ्हेच्या दुर्दैवी घटनेकडे, अशी मी सारखी ढकलत गेले आहे आणि नेहमीच मी कशाच्या तरी मागे लागत आले आहे. पण सध्या मी एका कार्यप्रवृत्तीचा शेवट गाठला आहे. आणि दुसऱ्या कार्यामध्ये गुंतून आणखी काही वर्षे अशीच व्यर्थ घालविण्यापूर्वीच्या या मध्यंतरात एका उत्कट प्रेरणेनुसार आपल्याकडे आले आहे. माझे आजवरचे जीवन समृद्ध होते आणि सुखीही होते. अनेक गोष्टी मी मोठ्या आवडीने करीत आले आहे. आणि काही विषयांचा मी बराच सखोल अभ्यासही केलेला आहे. पण आज इतकी वर्षे अशा प्रकारे जीवन जगल्यानंतरही मी अजून जीवनाच्या कडेकडेलाच, काठाकाठालाच घोटाळत राहिले आहे. एका ठराविक मर्यादेच्या पलीकडे आपल्याला मुळीच जाता येत नाही, असे मला तीव्रतेने वाटू लागले आहे. अधिकाधिक खोलात शिरण्याची मला अतिशय इच्छा आहे. पण अजून तरी हे मला शक्य झालेले नाही. वस्तुतः आजवर मी जे जे करीत आले आहे, त्या प्रत्येक गोष्टीत मला कुशलता व कार्यक्षमता लाभलेली आहे, असे मला सांगण्यात आले आहे. पण माझी ही कुशलता व कार्यक्षमताच मला बंधनकारक ठरत आली आहे. माझे आजवरचे संस्कार हे कल्याणकारी स्वरूपाचेच आहेत. रंजल्यागांजल्यांना मदत करणे, सर्वांशी चांगल्या तऱ्हेने वागणे, उदारहस्त असणे—अशा प्रकारच्या शिकवणीत व संस्कारात मी वाढले आहे. पण इतर कुठल्याही संस्कारांप्रमाणेच हेही संस्कार माणसाला बद्ध करून टाकीत असतात. म्हणून या प्रकारच्या संस्कारातूनच नव्हे, तर सर्व प्रकारच्या संस्कारबद्धतेतून मुक्त होऊन पलीकडे कसे जाता येईल, ही आज माझ्यापुढील समस्या आहे. आपली प्रवचने ऐकल्याभुळेच नव्हे, तर माझ्या स्वतःच्या निरीक्षणातून व अनुभवातून ही आता माझ्या जीवनाची आत्यंतिक गरज होऊन बसली आहे.

माझे समाजकल्याणाचे कार्य मी सध्यापुरते तरी दूर सारले आहे, पुढे मी ते चालू ठेवीन की नाही, हे यानंतरच ठरेल."

आपण जी वेगवेगळी कार्ये करीत होतो, ती का करीत होतो, असा प्रश्न तुम्ही आजवर स्वतःला का बरे विचारला नाही ?

"या समाजकार्यात आपण का गुंतलो आहोत, असा प्रश्न स्वतःला करण्याचे आजवर कधी माझ्या मनातही आले नाही. इतरांना मदत करावी, कुणाचेही भले करावे, असे मला नेहमीच वाटत आले आहे. माझी ही प्रवृत्ती ही पोकळ भाव-विवशता मात्र कधीच नव्हती. वस्तुतः ज्या लोकांमध्ये मी राहते, ती खरीखुरी माणसे नसून ती सारी मुखवटे चढविलेली माणसे आहेत. आणि ज्या लोकांना इतरांच्या मदतीची गरज आहे, तीच तेवढी खरीखुरी माणसे आहेत, असे मला आढळून आले आहे. माझ्या भोवतालच्या या मुखवटचांच्या सान्निध्यात राहणे हे निर्बुद्धपणाचे, मूर्खपणाचे आहे आणि त्या इतरांमध्ये राहणे हे कष्टाचे व दुःखाचे आहे, असा माझा अनुभव आहे.

समाजकल्याणाच्या किंवा इतर कुठल्याही प्रकारच्या कार्यात तुम्ही स्वतःला का बरे गुंतवून घेता ?

"मला वाटते की, काहीतरी करायला हवे म्हणूनच मी हे काम करीत आले आहे. प्रत्येक माणसाला जगत राहणे व काहीतरी करीत राहणे हे अवश्यच नसते का ? आणि जगायचे तर शक्य तितक्या चांगल्या तऱ्हेने जगावे, असे माझ्यावरचे संस्कार आहेत. मी या साऱ्या गोष्टी का करीत होते, हे मी स्वतःला कधीच विचारले नव्हते. पण आता मात्र मला ते शोधून पाहिले पाहिजे. बाकी पुढे जाण्यापूर्वी एक गोष्ट मला सांगून टाकावीशी वाटते. —मी अगदी एकाकी आहे. अनेक जणांना मी भेटत असले, तरी त्यामुळे माझ्या एकाकीपणाला काहीही बाध. येत नाही. हा एकाकीपणा मला आवडतोही. एकाकी असण्यात एक प्रकारचा आल्हादकारक मस्तपणा आहे."

अर्थाच्या श्रेष्ठतेच्या दृष्टीने पाहिले तर एकाकी असणे हे आवश्यकच आहे. पण लोकांपासून स्वतःला तोडून, दूरदूर असणाऱ्या एकाकीपणात मात्र एक प्रकारचा सामर्थ्याचा व दुर्भेद्यतेचा भाव असतो. अशा प्रकारची एकाकिता ही एक प्रकारची पळवाटच असते. तिच्यात पृथकत्व असते, तुटून दूर होणे असते, तो एक तऱ्हेचा आसरा असतो. पण हे सर्व बाजूला ठेवून, आजवर तुम्ही जी तथाकथित समाजोपयोगी कार्ये करीत आलात, ती करण्याचे कारण काय हा प्रश्न तुम्ही स्वतःला का विचारला नाहीत, हे समजून घेणेच अधिक महत्त्वाचे आहे, नाही का ? याचाच शोध तुम्ही प्रथम घ्यायला नको का ?

"हो, हो. आता अगोदर तेच करू या. मला वाटते की, आंतरिक एकाकितेच्या

भीतीमुळेच मी ही विविध कार्ये आजवर करीत आले आहे."

पण आंतरिक एकाकितेच्या संबंधात तुम्ही 'भीती' हा शब्द का वरे वापरता? बाह्यतः एकाकी असण्याचे तुम्हाला विशेष काहीच वाटत नाही. आणि आंतरिक एकाकितेपासून मात्र तुम्ही दूर पळता, असे का वरे असावे? भीती ही काही एखादी अमूर्त कल्पना नसते. भीती ही कोणत्यातरी गोष्टीच्या संबंधातच जाणवत असते. भीती ही नुसती भीती कधीच नसते. तो केवळ एक शब्दच असतो. भीती जी जाणवते ती कुठल्यातरी गोष्टीच्या संबंधातच जाणवते. तुम्हाला कशाची वरे भीती वाटत आहे?

"आंतरिक एक.."

पण आंतरिक एकाकितेची भीती ही कुठल्यातरी विशिष्ट गोष्टीच्या संबंधातच जाणवत असते. तुम्हाला आंतरिक एकाकितेची भीती वाटणे शक्यच नाही. कारण तुम्ही तिचे दर्शन कधी घेतलेलेच नाही. तुम्हाला जे अगोदरच ज्ञात झालेले आहे, त्याच्या मापाने तुम्ही आपली आंतरिक एकाकिता मोजीत आहात. हे पाहा, आता आपण या प्रश्नाची वेगळ्या तऱ्हेने मांडणी करू या. समाजकार्यकर्ती या नात्याने, माता या नात्याने, एक समर्थ, कार्यक्षम व्यक्ती या नात्याने तुम्हांला स्वतःच्या योग्यतेची पूर्ण जाणीव आहे. आपल्या बाह्य एकाकीपणाचे मूल्यही तुम्ही जाणता. आणि या सर्व गोष्टींच्या संदर्भातच तुम्ही आंतरिक एकाकितेचे मापन करू पाहता. जे जे घडून गेलेले आहे, ते ते सारे तुम्हाला माहीत आहे. पण जे वर्तमानात वास्तव आहे, ते मात्र तुम्हाला माहीत नाही. ज्ञाताच्या दृष्टीने जेव्हा अज्ञाताकडे पाहिले जाते, तेव्हा भीतीच समोर उभी ठाकते. ज्ञानाची या प्रकारची क्रियाच भीती उत्पन्न करण्यास कारणीभूत होते.

"आपले म्हणणे पूर्णपणे खरे आहे. ज्या ज्या गोष्टी मला स्वानुभवाच्या द्वारा ज्ञात झाल्या आहेत, त्यांच्याशी मी आंतरिक एकाकितेची तुलना करीत आहे हे खरे आहे. जे मी खरोखरच अनुभविलेले नाही, त्याच्याबद्दलची भीती माझ्या याच अनुभवातून उत्पन्न होत आहे."

म्हणजे, तुमची भीती ही आंतरिक एकाकितेची काही भीती नव्हे. जे तुम्ही अनुभविले नाही, जे तुम्हाला ज्ञात नाही, त्याची तुमच्या गतानुभूतीला भीती वाटत आहे. वस्तुस्थिती अशी असते की, जे जे नवे ते ते गतानुभवाला आत्मसात करावेसे वाटत असते; त्या नव्या गोष्टीचा एक पक्का अनुभव बनवून टाकावासा वाटत असतो. पण या गतानुभवाला—म्हणजे वस्तुतः तुम्हालाच—ते जे नवे, जे जे अज्ञात ते अनुभविणे शक्य तरी आहे का? जे ज्ञात आहे त्याला, स्वतःशी जे अविभाज्यपणे संलग्न झालेले असते, त्याचाच अनुभव घेता येत असतो. जे नित्य नवे, जे अज्ञात, त्याचा अनुभव घेता येणे हे या गतानुभवाला सर्वस्वी अशक्य असते. या अज्ञाताला

एक नाव देण्यानेच, त्याला आंतरिक एकाकिता या शब्दांनी संबोधण्याने तुम्हाला त्याची केवळ शाब्दिक ओळखच पटत असते. आणि मग हा शब्दच अनुभवण्याची जागा बळकावून वसतो. हा शब्द म्हणजेच तुमचा भीतीरूपी पडदा होय. जे प्रत्यक्ष आहे, जे वास्तव आहे, ते तुम्ही आंतरिक एकाकिता या शब्दाने झाकून टाकीत असता. म्हणून हा शब्दच तुमच्या मनात भीती उत्पन्न करीत राहतो.

"का कोण जाणे, पण मला त्याच्याकडे, त्या वास्तवाकडे पाहता येईलसे वाटत नाही."

हे पहा, वास्तवाकडे आपल्याला का पाहता येत नाही आणि अक्रियतेने त्याचे निरीक्षण करण्याआड काय येत आहे, हे आपण प्रथम समजून घेऊ या. या क्षणाला, इतक्यातच त्याच्याकडे पाहण्याचा मुळीच प्रयत्न करू नका. तर जे सांगितले जात आहे, ते शांतपणे श्रवण करीत चला.

आंतरिक एकाकिता या शब्दांनी जे संबोधिले जात आहे, ते आत्मसात करण्याचा प्रयत्न, हा जो तुमचा गतानुभव आहे, हे जे ज्ञात आहे, ते करीत आहे. पण त्याला काही याचा अनुभव घेणे शक्य होत नाही. कारण ते काय आहे, हे याला माहीतच नाही. त्याला तो शब्द तेवढा ठाऊक आहे. पण त्या शब्दाच्या मागे काय आहे, हे त्याला माहीत नाही. कारण अज्ञाताचा अनुभव घेणे हे अशक्यच असते. तुम्हाला त्या अज्ञातासंबंधी विचार करता येईल, त्याच्यासंबंधी नाना तर्कवितर्क करता येतील, त्याच्याबद्दल भीती बाळगता येईल. पण विचाराला त्या अज्ञाताचे आकलन होणे हे सर्वस्वी अशक्य आहे. कारण विचार ही ज्ञाताची, अनुभवाची निष्पत्ती असते. विचाराला अज्ञाताचे आकलन होणे शक्य नसल्यामुळेच त्याची भीती वाटत असते. विचाराला किंवा मनाला जोवर त्या अज्ञाताचा अनुभव घेण्याची, त्याचे आकलन करून घेण्याची अभिलाषा राहील, तोवर भीती ही कायमच राहील.

"मग काय.....?"

हे पाहा, नुसते श्रवण करीत चला. तुम्ही जर अवधानपूर्वक श्रवण करीत राहाल, तर त्यातील सत्याचे तुम्हांला दर्शन घडेल. आणि मग हे सत्यदर्शन हीच तुमची कृती होईल. आंतरिक एकाकितेबद्दल विचाराच्या साह्याने जे जे केले जाईल ती ती पळवाटच ठरेल. ते वास्तवाला टाळणेच ठरेल. वास्तवाला टाळण्यासाठीच विचार आपल्याभोवती संस्कारवलय उत्पन्न करीत असतो. आणि हे संस्कारवलयच ते नूतन, ते अज्ञात अनुभविण्याच्या आड येत राहते. विचाराच्या द्वारा अज्ञाताला जे जे उत्तर दिले जाते, ते ते केवळ भीतीरूप उत्तर असते. या उत्तराला विचार निरनिराळी नावे खुशाल देवो. पण वस्तुतः हे उत्तर केवळ भीतीरूपच असते. तेव्हा आंतरिक एकाकिता या शब्दाच्या पडद्याआड जे वास्तव आहे, त्याच्याबाबत विचार काहीही करण्यास समर्थ नाही, हे आधी लक्षात घ्या. असे हे लक्षात घेतले गेले,

तरच ते जे वास्तव आहे, ते आपले दर्शन आपोआपच घडवील. हे वस्तुदर्शन म्हणजेच ते अक्षय, ते अनंत !

तेव्हा आता तुम्हाला असे सुचवावेसे वाटते की, हे आता असेच राहू द्या. तुम्ही आता जे श्रवण केले आहे, त्याला आपले कार्य करू द्या. जमीन नांगरून तिच्यात बी पेरल्यानंतर स्वस्थ बसून राहिले, तरच तिच्यात नवांकुर निर्माण होतात, नवसर्जन घडून येते.

द्वेषाची प्रक्रिया

भेटण्यास आलेली स्त्री शिक्षिका होती. दयाळू व प्रेमळ होती. अंत:करणाचा हा प्रेमळपणा तिच्या अंगवळणी पडून गेला होता. आज सतत पंचवीस वर्षे तिने शिक्षिकेचे काम केलेले होते. आणि या कामात तिला आनंदही वाटत आलेला होता. अखेरच्या काही वर्षांत सर्व काही सोडून द्यावेसे तिला वाटू लागले होते. तरीहि ती आपल्या कामाला चिकटूनच राहिली होती. तिच्या स्वभावात जे काही वर्षानुवर्षे खोल खोल दडून बसलेले होते, त्याची तिला नुकतीच जाणीव होऊ लागली होती. एका चर्चासभेला आलेली असताना तिला अचानक या गोष्टीचा शोध लागला होता. आणि त्यामुळे ती नुसती चकितच झाली नव्हती, तर तिला बराच धक्काही बसला होता. केवळ आत्मनिंदेच्या भरात तिला या गोष्टीचा शोध लागलेला नव्हता, तर वर्षानुवर्षे ही गोष्ट आपल्या मनात खोल खोल दडून बसली होती हे तिला स्पष्ट दिसून आले होते. ही सुप्त गोष्ट म्हणजे तिच्या हृदयात सतत वसत असलेली द्वेषभावना. तिचा द्वेष कुठल्याही विशिष्ट व्यक्तीविषयीचा नव्हता. तर एक प्रकारचा सार्वत्रिक स्वरूपाचा द्वेष होता. सगळ्या माणसांविषयी व सर्वच गोष्टींविषयी वाटणारी, पण आत खोल खोल दडून बसलेली अशी ती द्वेषभावना होती. जेव्हा तिला या भावनेच्या अस्तित्वाची प्रथम चाहूल लागली, तेव्हा ही केवळ वरवरचीच भावना आहे व आपल्याला ती सहज टाकून देता येईल, अशी तिची कल्पना होती. पण जसजसे दिवस लोटू लागले, तसतसे तिला आढळून येऊ लागले की, ही द्वेषभावना नुसती वरवरच्या पातळीवरील नव्हे, तर जन्मभर आपल्या हृदयात खोलवर घर करून बसलेली भावना आहे. तिला यामुळे जोराचा धक्का बसण्याचे कारण असे होते की, आपण प्रेमळ व दयाळू अंत:करणाच्या आहोत अशी जी स्वत:विषयीची तिची दृढ समजूत होती, ती या नव्या जाणिवेमुळे पार हादरून गेली होती.

प्रीती ही एक विलक्षण वस्तू आहे. विचार जोवर तिच्यात गुंफला जात असतो, तोवर ती खरी प्रीती मुळीच नसते. आपण जेव्हा आपल्या प्रिय व्यक्तीविषयी विचार करीत असतो, तेव्हा ती व्यक्ती हे आपल्या सुखद संवेदनांचे, स्मृतींचे व प्रतिमांचे प्रतीक बनत असते. पण ही खरी प्रीती नव्हे, कारण विचार ही संवेदना आहे आणि संवेदना म्हणजे प्रीती नव्हे. जेथे विचारप्रक्रिया चालू असते, तेथे प्रीतीला अस्तित्वच नसते.

प्रीती ही धूम्ररहित अशी ज्योत आहे. विचार, मत्सर, शत्रुत्व, उपयोगिता या ज्या मनोनिर्मित गोष्टी त्यांच्या धुराचा जिला स्पर्श नाही, अशी ती धूम्ररहित

ज्योत आहे. जोवर हृदय या मनोनिर्मित गोष्टींनी भारावलेले राहील, या घुराने भरलेले राहील, तोवर त्या हृदयात द्वेष हा राहणारच. कारण मन हेच सर्व प्रकारच्या द्वेषांचे, वैरभावांचे, विरोधांचे व संघर्षांचे स्थान आहे. विचार ही नेहमी कशाची तरी प्रतिक्रिया असते. आणि जेथे जेथे प्रतिक्रिया असते, तेथे तेथे कोणत्या ना कोणत्या प्रकारची वैरभावना रुजून वसण्यास अनुकूल अशी भूमी प्राप्त होत राहणारच. विचार म्हणजे विरोध, विचार म्हणजे द्वेष. कुठल्याही स्पर्धेमध्ये विचार हाच नेहमी असतो. विचार हा नेहमी कोणत्या तरी यशःप्राप्तीच्या किंवा कुठल्या-तरी साध्याच्या मागे लागलेला असतो. म्हणून विचाराला जे जे हवे असते, त्यात त्याला सफलता प्राप्त झाली की, ही सफलता सुखाचे रूप धारण करते आणि विचाराला जे हवे असते, त्यात विफलता त्याच्या पदरी आली की, ती द्वेषाचे रूप धारण करते. परस्परविरुद्धांचा संघर्ष हेच नेहमी विचाराचे स्वरूप असते. आणि या परस्पर-विरुद्धांचा समन्वय केला गेला, तरी तो समन्वय हेही द्वेषाचेच एक भिन्न रूप असते.

" मुलांवर माझे फार प्रेम आहे असे मला नेहमी वाटे. मुले मोठी झाल्यावरही जेव्हा जेव्हा दुःखी असत, तेव्हा माझ्याकडेच सांत्वनासाठी येत. म्हणून माझे या सर्व मुलांवर, विशेषतः वर्गाबाहेर जी मुले माझी विशेष आवडती होती, त्यांच्यावर माझे फार प्रेम आहे, हे मी गृहीत धरूनच चालले होते. पण या सर्व काळामध्ये माझ्या मनात द्वेषाची व वैराची भावनाच खोलखोल रुजलेली होती, हे आता मला दिसून येत आहे. हा शोध लागल्यानंतर आता मी करावे तरी काय, हे मला कळेनासे झाले आहे. हा शोध लागल्यामुळे मला केवढा धक्का बसला आहे, याची आपल्याला कल्पना येणार नाही. स्वतःच्या भावनांचा धिक्कार करू नये असे आपण नेहमी सांगता खरे. पण माझ्यातील या अनिष्ट भावनेचे जे दर्शन मला नव्याने घडले आहे, त्याचे मला तर स्वागतच करावेसे वाटते. "

पण तुम्हांला या द्वेषभावनेच्या प्रक्रियेचाही शोध लागला आहे का ? आपण द्वेष का करतो हे कळणे किंवा द्वेषाचे कारण समजणे हे सामान्यतः सोपे असते पण द्वेषाचे विविध प्रकार किंवा द्वेषाच्या नाना तऱ्हा कोणत्या प्रक्रियेने आकारास येत राहतात, हे तुमच्या लक्षात आले आहे का ? एखाद्या अगदी अपरिचित अशा नव्या प्राण्याचे ज्याप्रमाणे आपण अवलोकन करतो, त्याप्रमाणेच या नव्या भावनेचे तुम्ही अवलोकन करीत आहात का ?

" हे सारे मला इतके काही नवे आहे ! म्हणूनच या द्वेषभावनेच्या प्रक्रियेकडे लक्ष देण्यास मला अवसरच मिळाला नाही."

मग आता आपण त्याचे निरीक्षण करू या आणि काय होते ते पाहू या. या द्वेषभावनेकडे आपण अक्रिय वृत्तीने पाहात राहू. म्हणजे ती आपली प्रक्रिया कशी उलगडून दाखवते, ते आपल्याला दिसून येईल. पण असे करीत असता मनाला

धक्का मात्र बसू देऊ नका. या द्वेषभावनेचा धिक्कारही करू नका किंवा तिचे समर्थन करण्यासाठी काही सबबीही पुढे करू नका. नुसते अक्रियतेने अवलोकन करीत चला. द्वेषभावना हा विफलतेचाच एक आविष्कार असतो; होय की नाही ? सफलता व विफलता या नेहमी जोडीजोडीनेच चालत राहतात.

तुम्हांला आवड कशाची आहे हे आता सांगा बरे. तुमच्या व्यवसायाच्या दृष्टीने नव्हे तर अंतःकरणात खोलखोल असे तुम्हांला काय आवडते ते सांगा.

" मला चित्रकलेचे फार आकर्षण वाटत होते. "

मग तुम्ही तेच का बरे करीत राहिला नाहीत ?

" त्याचे असे आहे की, ज्याच्या द्वारा पैसा मिळणार नाही असे काहीही मी करता कामा नये, यावद्दल माझ्या वडिलांचा विशेष कटाक्ष होता. माझ्या वडिलांची एकूण वृत्ती अतिशय आक्रमक स्वरूपाची होती. त्यांना पैशाशिवाय कुठल्याही गोष्टीचे महत्त्व वाटत नव्हते. ज्यात पैसा नाही असे कोणतेही काम कधीही ते हाती घेत नसत. किंवा ज्याच्यातून अधिक मानमान्यता अथवा सत्ता मिळणार नाही, असेही काही ते कधी करीत नसत. 'अधिकाधिकाचा हव्यास' हेच त्यांचे इष्टदैवत होते. आणि आम्ही तर त्यांचीच मुले होतो. माझा जरी अनेक बाबतींत माझ्या वडिलांशी विरोध होता, तरी ते मला आवडत असत. त्यामुळेच पैशाला विशेष महत्त्व आहे, ही गोष्ट माझ्या मनावर पक्की ठसली आणि मी शिक्षिकेचे जे काम पत्करले, ते सत्ता गाजवायची संधी त्यामुळे मिळेल म्हणूनच बहुधा पत्करले असावे. सुटीचे दिवस मी चित्रे काढण्यात घालवीत असे. पण त्यामुळे मला समाधान मुळीच लाभत नसे. खरे विचाराल तर चित्रकलेला जीवन समर्पित करण्याची माझी इच्छा होती. आणि प्रत्यक्ष जीवनात मात्र माझ्या या आवडत्या गोष्टीसाठी वर्षाकाठी दोन महिनेच काय ते मी देऊ शके. अखेर मी चित्रकलेला रामराम ठोकला पण आत आत ही अतृप्त इच्छा मला सतत जाळीत राहिली. या दडपून टाकलेल्या इच्छेमुळेच माझ्यात द्वेषाची व वैराची भावना कशी रुजत गेली, हे आताच माझ्या ध्यानात येत आहे."

तुमचा विवाह झाला होता का ? तुम्हांला स्वतःची मुलेबाळे आहेत का ?

"एका विवाहित गृहस्थावर माझे प्रेम जडले होते. काही काळ आम्ही चोरून एकत्र राहतही होतो. पण मला त्याच्या पत्नीचा व मुलांचा अतिशय मत्सर वाटे आणि स्वतःला मूल व्हावे अशी अतिशय इच्छा असताही, मूल होण्याची मात्र मला भीती वाटत असे. वैवाहिक जीवनात पतिपत्नींना परस्परांचा जो सहवास लाभतो त्याच्यापासून व वैवाहिक जीवनातील साऱ्या नैसर्गिक गोष्टींपासूनच मी पूर्णपणे वंचितच राहिले आहे. आणि यामुळे मत्सरभावना मला अहर्निश जाळीत आली आहे. – त्या गृहस्थाला काही काळाने कामाच्या निमित्ताने दुसऱ्या गावी राहण्यास जावे लागले. आणि मग तर माझी मत्सरभावना अधिकच वाढत गेली. मला ती

जेव्हा असह्य होऊ लागली, तेव्हा तिचा विसर पाडण्यासाठी मी शिकविण्यात अधिक उत्कटतेने लक्ष घालू लागले. वाकी माझी ही मत्सरभावना अजूनही तशीच कायम आहे, हे आता माझ्या ध्यानात येत आहे. – पण आता त्या गृहस्थाच्या संबंधाने मला जो मत्सर वाटत असे तो नाहीसा झाला आहे. कारण तो मरण पावला आहे. आता मला जो मत्सर वाटतो, तो सुखी लोकांबद्दल, विवाहित जोडप्यांबद्दल, यशस्वी लोकांबद्दल किंवा एकूण कुणाबद्दलही वाटत राहतो–आम्ही दोघे जर एकत्र राहू शकलो असतो, तर मला जे जे प्राप्त झाले असते त्या साऱ्या साऱ्या गोष्टींना मी मुकले आहे."

हे पाहा, मत्सर म्हणजे वस्तुतः द्वेषच असतो, नाही का ? आपली जर कुणावर खरी प्रीती असेल, तर दुसऱ्या कोणत्याही भावनेला तेथे वाव राहणार नाही. पण वस्तुतः आपली कुणावरच खरी प्रीती नसते. इतर भावनांच्या धुराने आपले हृदय गुदमरून गेले असते आणि आपली प्रीतीची ज्योत विझून जात असते.

" आता कुठे माझ्या हे ध्यानात येत आहे की, शाळेतील इतर विवाहित शिक्षिकांविषयी व एकंदर सर्वांच्याच विषयी माझ्या मनात विरोध व वैरभाव अव्याहतपणे घुमसत आलेला आहे. हा विरोध व वैरभाव तेव्हा आतआत झाकला गेला होता, एवढेच काय ते. त्या वेळी मी आदर्श शिक्षिका वनू पाहत होते. ते माझे साध्य होते. आणि या दृष्टीने मला मान्यताही मिळाली होती. "

माणसाचे साध्य किंवा ध्येय हे जितके उत्कट असते, तितक्या प्रमाणात त्याचे नैसर्गिक जीवन दडपले जात असते आणि तितक्या प्रमाणात संघर्ष व वैरभाव त्याच्या मनात खोल खोल घर करीत राहतो.

" आपण सांगता ते सारे मला आता स्पष्ट दिसू लागले आहे. आणि आश्चर्य हे आहे की, या साऱ्या गोष्टींकडे पाहत असताही, माझे जे खरे स्वरूप आहे, त्याबद्दल मला मुळीही खंत वाटत नाही. "

तुम्हाला त्याची खंत वाटत नाही. कारण तुम्हाला आपल्या वास्तव स्वरूपाची निर्दयपणे का होईना, पण नव्याने ओळख पटत आहे. स्व-स्वरूपाची अशी ही ओळख एक प्रकारचे सुख मिळवून देत असते. ती एक प्रकारची ओजस्विता प्राप्त करून देत असते. स्वतःचे ज्ञान प्राप्त झाल्याचा एक नवा आत्मविश्वास माणसाच्या ठायी निर्माण करीत असते आणि ज्ञानामुळे येणारे सामर्थ्य मिळवून देत असते. पूर्वी तुमची मत्सरभावना तुम्हांला सुखवीत होती. आणि आता आपल्या गतजीवनाचे स्पष्ट दर्शन घडल्याने स्वतःवर स्वामित्व मिळविण्याची जी जाणीव तुमच्यात निर्माण झाली आहे तीही तुम्हाला सुखदायकच वाटत आहे. आता तुम्हाला मत्सर, विफलता व वंचितता या जुन्या शब्दांच्या जागी एक नवी परिभाषा गवसली आहे. द्वेष व द्वेषाविषयीचे ज्ञान ही ती नवी परिभाषा होय. ज्ञान होण्यामध्ये एक

प्रकारचा आत्मगौरव असतो आणि हाही वैरभावाचाच एक प्रकार असतो. अशा प्रकारे आपण एका गोष्टीच्या जागी दुसरीची प्रतिष्ठापना करीत राहतो. पण या प्रकारे प्रतिष्ठापित केलेल्या गोष्टी दिसण्यात विसदृश दिसल्या, तरी वस्तुतः त्या सगळ्या एकाच जातीच्या असतात. तेव्हा आताही तुम्ही आपल्या विचारांच्याच जाळ्यात अडकला आहात, हे तुमच्या ध्यानात आले का ?

" तसे आहे खरे. पण मी दुसरे तरी काय करणार ?"

हे पाहा, असा प्रश्न विचारू नका, तर तुम्ही स्वतःच्या विचारप्रक्रियेचेच निरीक्षण करीत राहा. आपले विचार हे किती फसवे असतात ! आपल्या समस्येपासून आपली मुक्तता करण्याची आशा विचार एकीकडे दाखवतो खरा. पण असे करीत असताच तो दुसरी समस्या व दुसरा विरोध तयार करून ठेवीतच असतो म्हणून विचाराच्या या संपूर्ण प्रक्रियेचे नुसते अक्रियपणे निरीक्षण करीत राहा. आणि त्यामागील सत्याला प्रकट होण्यास वाव द्या.

" मग या मत्सरापासून, या द्वेषापासून आणि या सतत दडपून टाकलेल्या संघर्षापासून मी मुक्त होईन का ?"

हे पाहा, एखादी विशिष्ट गोष्ट घडून यावी अशी आशा जेव्हा तुम्ही बाळगता– मग ही आशा विधायक स्वरूपाची असो की, निषेधात्मक असो–तेव्हा तुम्ही आपल्या अभिलाषेचाच प्रश्नेच आपल्यासमोर उभा करीत असता. तुमची ही अभिलाषा पूर्णही होईल. पण मग जुन्या गोष्टींच्या जागी नव्यांची प्रतिष्ठापना होणे असेच त्याचे स्वरूप राहील. आणि त्यामुळे पूर्वीचाच संघर्ष पुढे चालत राहील. काहीतरी साधण्याची किंवा काहीतरी टाळण्याची तुमची ही अभिलाषा परस्परविरोधाच्या क्षेत्रातच घुटमळणारी असते, होय की नाही ? म्हणून तुम्ही प्रथम असत्यातील असत्य जाणून घ्या. म्हणजे सत्य हे आपोआप प्रकट होईल. सत्याचा शोध कुणालाही करता येत नसतो. तुम्ही ज्याचा शोध कराल ते तुम्हांला गवसेलही. पण ते सत्य मात्र असणार नाही. एखाद्या संशयी माणसाला ज्याप्रमाणे वस्तुस्थिती तशी नसताही आपला संशय खराच आहे असे शोधाअंती आढळते, तसेच येथेही असते. असे करणे हे अगदी सोपे असते. पण तितकेच ते मूर्खपणाचेही असते. म्हणून आपल्या या संपूर्ण विचारप्रक्रियेचे आणि तिच्यातून मुक्त होण्याच्या आपल्या अभिलाषेचे तुम्ही नुसते अक्रियपणे निरीक्षण करीत राहा.

" हा सगळाच मला एक विलक्षण शोध लागला आहे, असे वाटत आहे. आणि आपण जे सांगत आहात, त्यातील सत्य मला आता आकळू लागले आहे. माझ्या सध्याच्या संघर्षातून मुक्त होण्यासाठी फार काळ लागणार नाही अशी आशा मला वाटू लागली आहे.–अरे, पण पुन्हा मी आपली आशा करीत सुटले आहे की ! – मी आता अगदी शांतपणे नुसते निरीक्षण करीत राहीन व काय घडून येते ते पाहत राहीन. "

प्रगती आणि क्रांती

मंदिरात मंत्रपाठ चालला होता. पुरातन पाषाणशिल्पाचे ते अतिशय भव्य असे मंदिर होते. मंत्रपाठ करणाऱ्या पुरोहितांची संख्या तिसांहून अधिक होती. मंत्रपाठींना मंत्रातील संस्कृत शब्दांचा अर्थ अवगत होता. आणि त्यांचे उच्चारणही अतिशय स्पष्ट, शुद्ध व खणखणीत होते. मंत्रघोषाच्या त्या गहनगंभीर नादझंकारामुळे मंदिराच्या भिंतीन् भिंती आणि खांवन् खांव निनादून हादरत होते. मंत्र श्रवणासाठी वसलेले लोकही साहजिकच शांत, निःशब्द वनले. सृष्टिसर्जनाविषयीचा आणि हे सर्जन मानवामध्ये कसे परिणत झाले, याविषयीच्या सूक्ताचा तो मंत्रपाठ होता. जमलेल्या श्रोत्यांनी आपले नेत्र मिटून घेतले होते. त्या मंत्रघोषामुळे त्यांच्या हृदयांत एक प्रकारचा सुखद क्षोभ निर्माण होत होता. त्यांच्या मनश्चक्षूंपुढे आपापल्या शैशवातील स्मृती तरंगत होत्या. वालपणापासून आजवर आपल्या जीवनात कसकशी प्रगती होत गेली याचे चित्र त्यांच्यासमोर उभे राहत होते. संस्कृत शब्दांच्या घना गंभीर घोषामुळे मन विलक्षण रीतीने प्रभावित होत होते. आणि मंत्रघोषाच्या पुनःश्रवणाने हृदयात आनंदलहरी उसळत होत्या. काहीजण हलक्या स्वरांत ते मंत्र गुणगुणू लागले होते. कारण त्यांचे ओठ हालताना दिसत होते. अत्युत्कट भावनावेगाने सारे वातावरण ओसंडत होते. पुरोहितांचा मंत्रघोष अव्याहत चालूच होता आणि मंदिरातील देवमूर्ती शांत, निःशब्द होत्या.

प्रगतीच्या कल्पनेला आपण सारेजण किती विलगून वसलेले असतो ! आपले राष्ट्र आपल्याला अधिक चांगले वनविता येईल; आपण स्वतः अधिक दयाशील, अधिक शांत वृत्तीचे व अधिक सद्गुणशाली वनू शकू असे कल्पनारंजन करणे आपल्याला फार आवडत असते. प्रगतीच्या या आभासाला विलगून वसणे आपल्याला अतिशय प्रिय असते. पण भविष्यात आपण विशेष काही होऊ ही कल्पना हे केवळ ढोंग असते, हा केवळ एक सुखकर भ्रम असतो, याची सखोल जाणीव फारच थोड्यांना असते. आपण कधीतरी चांगले होऊ अशी कल्पना करीत राहणे हे मात्र आपल्याला पसंत असते. आणि तोपर्यंत मात्र आपण आहे तेच जीवन चालू ठेवीत असतो. प्रगती हा शब्द इतका सुखदायक आहे, इतका विलक्षण आश्वासनपर आहे ! या शब्दाच्या जादूने आपण आपले मन मोहनिद्रावत गुंगवून टाकीत असतो. वस्तुतः जे प्रत्यक्ष असते ते वदलणे शक्य नसते. लोभाचे निर्लोभीपणात किंवा हिंसेचे अहिंसेत रूपांतर करणे हे कधीच शक्य नसते. अशुद्ध लोखंड हे रासायनिक प्रक्रियेने शुद्ध करून त्यातून उत्कृष्ट पोलादी यंत्र वनविता येते खरे. पण मानवाची प्रगती अशा रासायनिक पद्धतीने घडून येईल असे मानणे हा निव्वळ भ्रम आहे. भविष्यात आपण

थोर व कीर्तिशाली बनू ही कल्पना म्हणजे केवळ आत्मवंचना होय. मोठे होण्याच्या आपल्या तीव्र लालसेमुळेच आपण अशी आत्मवंचना करून घेत असतो. आपल्या राष्ट्राला भविष्यात मिळणाऱ्या यशाचे किंवा आपल्या विचारप्रणालीला प्राप्त होणाऱ्या सफलतेचे किंवा आपल्याला स्वतःला लाभणाऱ्या यशाचे वा कीर्तीचे आपण सर्वजण मनोमन सतत पूजन करीत असतो. आणि ही सर्व प्रगती-प्रक्रिया आहे असा गोड आभास निर्माण करून स्वतःला सारख फसवीत असतो. विचारांची प्रगती कदाचित होतही राहील. विचार अधिक पुढेपुढे जातही राहील. तो अधिकाधिक निर्दोष होत जाईल किंवा स्वतःला शांत, निःशब्द बनवूनही टाकील. पण विचाराचा व्यापार हा जोवर काहीतरी प्राप्त करण्याच्या दिशेने किंवा कशाचा तरी त्याग करण्याच्या दिशेनेच होत राहील, तोवर विचार हा निव्वळ प्रतिक्रियारूपच राहणार आणि प्रतिक्रिया म्हटली की, तिच्याविरुद्ध दुसरी प्रतिक्रिया निर्माण होणारच आणि अशा रीतीने ती सदैव संघर्ष उत्पन्न करीत राहणारच. अशा या संघर्षामध्ये होणारी प्रगती ही अधिकाधिक गोंधळाचीच असणार आणि ती अधिकाधिक द्वेष व वैरभाव उत्पन्न करणारीच ठरणार.

भेटीस आलेला गृहस्थ सांगत होता की, आपण क्रांतिकारी आहोत आणि आपल्या विचारप्रणालीसाठी, आपल्या या ध्येयासाठी मारण्यास किंवा मरण्यासही तयार आहोत. अधिक चांगले जग आकारास आणण्यासाठी आपण इतरांची हत्या करण्यासही कचरणार नाही. सध्याची समाजव्यवस्था उलथून पाडल्याने अधिक गोंधळ व अधिक अनवस्था उत्पन्न होईल याची आपल्याला पूर्ण कल्पना आहे. पण या गोंधळाचाच फायदा घेऊन नवी वर्गरहित समाजव्यवस्था अस्तित्वात आणता येईल अशी आपली पूर्ण खात्री आहे. आदर्श समाजव्यवस्था निर्माण करण्याच्या या प्रक्रियेत काही जणांची किंवा अनेकांची हत्या करावी लागली, तरी त्याला काहीही हरकत नाही. कारण, आजचा मानव हा महत्त्वाचा नसून, उद्याचा मानव हाच सर्वश्रेष्ठ महत्त्वाचा आहे, असे त्याचे ठाम मत होते. जे नवे जग ते लोक निर्माण करणार होते, त्या जगात त्याच्या मताप्रमाणे विषमता उरणार नव्हती. सर्वांना काम मिळणार होते आणि सर्वांना सुख लाभणार होते.

पण भविष्यात हे असेच नक्की घडून येईल याची तुम्हाला इतकी खात्री कशी वरे वाटते ? कशाच्या आधारावर तुम्ही इतकी निश्चयात्मक विधाने करीत आहात ? हे पाहा, वस्तुस्थिती अशी आहे की, धार्मिक लोक हे देखील माणसांना स्वर्ग मिळण्याचे आश्वासन आजवर देतच आले आहेत. आणि तुम्ही लोक त्यांना भविष्यात अधिक चांगले जग मिळण्याचे आश्वासन देता एवढाच काय तो तुमच्यामधील फरक. तुम्हाला जसा तुमचा पवित्र धर्मग्रंथ व तुमचे पुरोहित आहेत, तसेच धार्मिक लोकांनाही आहेत. तेव्हा तुम्हा उभयतांमध्ये तसा फारसा काहीच फरक नाही. पण हे सांगा की, भविष्या-

बद्दल सारे काही आपणांस स्पष्ट माहीत आहे, असे तुम्ही कशाच्या आधारावर म्हणता ?

"असे पाहा की, आपण जर एखाद्या विशिष्ट मार्गाने जात राहिलो, तर त्या मार्गाचा शेवट आपण केव्हा ना केव्हा तरी नक्की गाठणार, ही गोष्ट न्यायसिद्ध व तर्कसिद्ध अशीच नाही का ? दुसरे असे की, आमची जी विचारप्रणाली आहे, ती इतिहासाच्या भरभक्कम पुराव्यावरच आधारलेली आहे."

वस्तुस्थिती अशी आहे की, गत इतिहासाचा जो अर्थ लावण्यात येतो, तो आपण आपल्या विशिष्ट संस्कारबद्धतेनुसारच लावीत असतो. आणि आपल्या पूर्वग्रहांच्या चष्म्यातूनच त्याचे दर्शन घेत असतो. भविष्यकालासंबंधीचे आम्हा सर्वांचे जेवढे अज्ञान आहे, तेवढेच वस्तुतः तुम्हा लोकांचेही आहे. आणि वस्तुस्थिती अशी आहे याबद्दल देवाचे आभारच मानायला हवेत. पण आधी हे सांगा की, एका काल्पनिक आभासमय भविष्यकल्पनेसाठी वर्तमानाचे बलिदान करणे हे उघड उघड न्यायाला व तर्काला सोडूनच नाही का ?

"पण आजच्या परिस्थितीत परिवर्तन होणे अतिशय आवश्यक आहे असे आपल्यालाही नाही का वाटत ? की भांडवलशाही समाजाचे आपण एक बाहुले बनले आहात ?"

हे पाहा, सद्यःस्थितीत परिवर्तन करणे म्हणजे त्या स्थितीच्या सातत्यात केवळ थोडासा फरक करणेच होय. याला तुम्ही क्रांती हे नाव खुशाल द्या. पण वस्तुतः मूलभूत क्रांतीची प्रक्रिया ही याच्याहून सर्वस्वी वेगळी असते. तिचा तर्काशी किंवा ऐतिहासिक पुराव्याशी काहीही संबंध नसतो. कृती म्हणजे काय व ती कशी घडून येते यासंबंधीच्या संपूर्ण प्रक्रियेचे आकलन करून घेण्यातच मूलभूत स्वरूपाची क्रांती वसत असते. जीवनाच्या नुसत्या आर्थिक किंवा वैचारिक स्तरांवरील प्रक्रियेचे आकलन करून घेण्यात क्रांती मुळीच नसते. कृती ही काय वस्तू आहे याचे समग्र दर्शन करून घेण्यातच खऱ्या क्रांतीचे रहस्य साठलेले असते. अशी समग्र व एकात्मक कृती ही केव्हाही प्रतिक्रियारूप नसते. पण तुम्हा लोकांना तर केवळ प्रतिक्रियाच परिचित असते. सद्यःस्थितीचा जो स्थितिविरोध तुम्ही मानता, ती निव्वळ प्रतिक्रिया असते. इतिहासाच्या अभ्यासावर आधारलेला शाब्दिक निर्णय किंवा बौद्धिक समन्वय म्हणजे एकात्मता वा समग्रता मुळीच नव्हे. कोणत्याही गोष्टीबाबत प्रतिक्रिया कशी व का होते, याचे आकलन करून घेण्यानेच एकात्मता उदयास येत असते.

मानवी मन ही केवळ प्रतिक्रियांची श्रेणीच असते. म्हणून अशा मनाने कल्पिलेली म्हणजेच प्रतिक्रियांवर किंवा कल्पनांवर आधारलेली क्रांती ही खरी क्रांतीच नव्हे. अशी तथाकथित क्रांती हे सद्यःस्थितीच्या सातत्याचेच थोडेसे बदललेले स्वरूप असते एवढेच. तुम्ही त्याला क्रांती हे नाव खुशाल द्या. पण वस्तुतः ती क्रांती मुळीच नसते.

"मग आपल्या मते खरी क्रांती म्हणजे तरी कोणती?"

एखाद्या कल्पनेवर आधारलेले परिवर्तन म्हणजे क्रांती मुळीच नव्हे. कारण कल्पना हे परिस्थितीच्या जिवंत आव्हानाला गत स्मृतीने दिलेले उत्तर असते. आणि स्मृती ही तर निव्वळ प्रतिक्रियारूपच असते. सर्व प्रकारच्या कल्पना जेव्हा पूर्णपणे महत्त्व-शून्य होऊन जातात व त्यामुळे विलोपून जातात, तेव्हाच मूलभूत स्वरूपाची क्रांती उदयास येऊ शकते. कशाच्या तरी विरोधातून उत्पन्न झालेल्या क्रांतीचे क्रांतिकारकत्व हे मुळातच नष्ट झाले असते. अशी क्रांती हा केवळ विरोध असतो आणि विरोध हा तर कधीही सर्जनशील असूच शकत नाही.

"आपण ज्या स्वरूपाच्या क्रांतीबद्दल सांगत आहात, ती केवळ एक अमूर्त कल्पना आहे. आधुनिक जगामध्ये ती प्रत्यक्षात उतरविता येणे शक्यच नाही. आपण एक अव्यवहारी असे ध्येयवादीच दिसता."

वस्तुस्थिती तुम्ही म्हणता त्याच्या अगदी उलट आहे. ध्येयवादी मनुष्य हाच कल्पनेला विलगून वसलेला असतो. त्यामुळे तो क्रांतिकारी असूच शकत नाही. कल्पना हीच माणसामाणसांमध्ये भेद उत्पन्न करीत असते. असा भेद केला जाणे, मानवांचे असे विच्छेदन होणे म्हणजेच तर त्याचे विघटन घडून येणे होय, त्यांचा ऱ्हास होणे होय. अशा विघटनाला क्रांती कधीच म्हणता येणार नाही. विचारप्रणालीत अडकून पडलेल्या कुठल्याही माणसाचा संबंध केवळ विचारांशी, कल्पनांशी व शब्दांशीच असतो, प्रत्यक्ष कृतीशी मुळीच नसतो. प्रत्यक्ष कृती तो नेहमी टाळीतच राहतो. विचार-प्रणाली ही प्रत्यक्ष कृतीला नेहमी प्रतिबंधकच ठरत असते.

"पण क्रांतीच्या द्वारा माणसामाणसांत समानता निर्माण करता येईल, असे नाही का आपल्याला वाटत?"

हे पाहा, ऐतिहासिक पुरावा व तर्कशास्त्र यांच्याशी कल्पना कितीही सुसंगत असली, तरी अशा प्रकारच्या कल्पनेवर आधारलेल्या क्रांतीमुळे समता कधीही उत्पन्न होणे शक्य नाही. माणसामाणसांत सतत भेद उत्पन्न करीत राहणे, हेच तर मुळी कल्पनेचे कार्य असते. कल्पना किंवा निष्ठा ही राजनैतिक असो की धार्मिक असो, ती मानवा-मानवांमध्ये नेहमी कलहच निर्माण करीत असते. आजवर तथाकथित धर्मांनी मनुष्यांमनुष्यांमध्ये भांडण लावण्याचे काम तर अव्याहतपणे केले आहे. आणि आजही ते हेच करीत आहेत. विशिष्ट निष्ठांचे जे संघटित स्वरूप धर्म या नावाने ओळखले जात असते, तेही इतर कोणत्याही विचारप्रणालीप्रमाणेच केवळ मनोविकल्पित असेच असते. त्यामुळे ते भेदच उत्पन्न करीत राहते. तुम्हीही तुमच्या विशिष्ट विचार-प्रणालीनुसार हेच करीत आहात, हे तुम्हाला नाकारता येईल का? तुम्हीदेखील आपल्या मध्यवर्ती कल्पनेच्याभोवती एक गट, एक समूह तयार करीत आहात. एखाद्या अत्यंत निष्ठावंत धार्मिक मनुष्याप्रमाणेच आपल्या या गटात प्रत्येकानेच

सामील व्हावे, असे तुम्हालाही वाटत असते. बुडत असणाऱ्या जगाला तारण्याची जशी धार्मिक लोकांची धडपड असते, तशीच तुमचीही धडपड आहे. अधिक चांगल्या जगाची निर्मिती करण्याच्या नावाखाली तुम्ही एकमेकांची हत्या करीत राहता आणि वाटेल तेवढ्या माणसांचा खुशाल निःपात करून टाकता. वस्तुस्थिती अशी आहे की धार्मिक माणसाला काय किंवा तुम्हाला काय, अधिक चांगले जग निर्माण करण्याचे महत्त्व मुळीच वाटत नसते; तर आपापल्या विशिष्ट कल्पनेनुसार सगळ्या जगाला वळविण्याचेच तुम्हांला महत्त्व वाटते. पण कल्पनेने समानता कधीतरी निर्माण करता येणे शक्य आहे का ?

"पण आमच्या या विशिष्ट कल्पनेच्या परिघात तरी आम्ही सगळे समानच आहोत की ! मग आमची कामे कितीही वेगवेगळी असोत. आमच्या विशिष्ट विचार-प्रणालीचे प्रतिनिधित्व करणारे या नात्याने आम्ही सर्वजण समानच आहोत. प्रत्येकावर सोपविलेल्या कार्यामध्ये उच्चनीच श्रेणी आहेत, हे खरे आहे. पण विशिष्ट विचारप्रणालीचे प्रतिनिधी या नात्याने आम्हा सर्वांमध्ये समानताच आहे."

हे पाहा, संघटित स्वरूपाच्या सगळ्याच निष्ठा नेमकी अशीच घोषणा करीत असतात. ईश्वराच्या दृष्टीने आम्ही सर्व समान आहोत; पण प्रत्येकाच्या कार्य-क्षमतेत मात्र फरक आहे; जीवन हे एकरसात्मकच आहे, पण सामाजिक भेद असणे हे अपरिहार्यच आहे, असेच प्रत्येकाचे म्हणणे असते. तुम्ही काय करीत आहात, तर एका विचारप्रणालीच्या जागी दुसरीची प्रतिष्ठापना करीत आहात एवढेच काय ते. पण असे करण्याने व्यक्तीव्यक्तींत किंवा समूहासमूहांत भेद पाडणे व एकाने दुसऱ्याला कमी प्रतीचे लेखणे, ही जी पूर्वापार चालत आलेली परंपरा आहे, तिच्यात तुम्हीही काही बदल करू शकला नाहीत. वस्तुतः जीवनाच्या सगळ्याच स्तरांमध्ये विषमता वसत असते. एखाद्यामध्ये विशेष कार्यक्षमता असते, तर दुसऱ्यात मुळीच नसते; एकजण नेतृत्व करीत असतो, तर दुसरा केवळ अनुयायित्व पत्करीत असतो; एखादा निर्बुद्ध व संवेदनशून्य असतो, तर दुसरा जीवनाभिमुख व तरल संवेदनशील असतो. एखादा लेखक किंवा चित्रकार असतो, तर दुसरा केवळ कामकरी असतो. एखादा वैज्ञानिक असतो, तर दुसरा मेहतर असतो. विषमता ही वस्तुस्थिती आहे. आणि कोणत्याही क्रांतीला ती नष्ट करून टाकता येणार नाही. तुमची ही तथाकथित क्रांती काय करीत असते, तर एका वर्गाच्या ऐवजी दुसऱ्या वर्गाची प्रतिष्ठापना करीत असते. मग हा नवा वर्ग सर्व राजकीय व आर्थिक सत्ता बळकावून वसत असतो. मग तो नवा उच्चवर्ग बनून जातो. स्वतःला अधिकाधिक सबलती घेऊन तो आपली सत्ता पक्की करून टाकीत असतो. ज्या वर्गाला उलथून लावून तो सत्तास्थानी येऊन पोचला असतो, त्या वर्गाचे सगळे डावपेच त्याला पुरेपूर माहीत असतात. तेव्हा हा असा वर्ग विषमता मुळीच नष्ट करीत नसतो, हीच वस्तुस्थिती नाही का ?

"हे पाहा, हा वर्ग हळूहळू ही विषमता नष्ट करून टाकील. जेव्हा संपूर्ण जग हे आमच्या विचारांचेच बनून जाईल, तेव्हा वैचारिक समानता नक्की अस्तित्वात येईल."

पण वैचारिक समानता म्हणजे वास्तविक समानता मुळीच नव्हे. ती तुमची केवळ कल्पना आहे, केवळ एक विचार आहे. आगामी जगाबद्दलचे ते एक निव्वळ स्वप्नरंजन आहे. धार्मिक निष्ठावंतांचीही अशीच कल्पना असते, असेच स्वप्नरंजन असते. खरोखर तुम्ही दोघे एकमेकांच्या किती अगदी जवळ आहात! वस्तुतः सगळ्या कल्पना या नेहमी भेद उत्पन्न करणाऱ्या, परस्परांचा विरोध करणाऱ्या आणि सदैव संघर्ष निर्माण करणाऱ्याच असतात. वस्तुस्थिती तर अशी आहे की, कल्पनेला आपल्या स्वतःच्या साम्राज्यातही समानता निर्माण करणे अशक्य आहे. आपल्या सर्वांची जर एकाच वेळी, एकाच स्तरावर, एकाच गोष्टीवर निष्ठा असली, तर अशा स्थितीत एक प्रकारची समानता आकारास आली असे म्हणता येईल. पण ही तर केवळ अशक्य कोटीतीलच गोष्ट आहे. तो एक कल्पनेने केलेला केवळ अंदाज आहे. म्हणून त्याच्यामुळे केवळ अधिक भ्रमच तेवढे उत्पन्न होत राहतील.

"मग आपण समानतेची कोणतीही कल्पना शक्य कोटीतील मानीतच नाही का? सर्वांना समान संधी मिळावी यासाठी करावयाच्या सगळ्या प्रयत्नांचा आपण निषेधच करीत आहात का? आपण या सर्व गोष्टींकडे अश्रद्ध वृत्तीनेच पाहत आहात का?"

हे पाहा, मी हे अश्रद्ध वृत्तीने मुळीच सांगत नाही. प्रत्यक्ष वस्तुस्थिती काय आहे, तेवढीच मी समोर मांडीत आहे. सर्वांना समान संधी मिळावी या गोष्टीला तर माझा मुळीच विरोध नाही. विषमतेची ही जी विकट समस्या आहे, तिच्या पलीकडे जाऊन ती सोडविण्याचा परिणामकारक उपाय शोधता येणे शक्य आहे, ही गोष्ट निश्चित. पण वास्तव काय आहे, याचे जेव्हा आपल्याला आकलन होईल, तेव्हाच हा शोध लावता येणे शक्य होईल. जे वास्तव आहे, त्याच्याकडे एखाद्या कल्पनेच्या, एखाद्या निर्णयाच्या किंवा एखाद्या स्वप्नाच्या चष्म्यातून पाहणे, म्हणजे त्याचे आकलन करून घेणे मुळीच नव्हे. पूर्वग्रहदूषित दृष्टीने अवलोकन करणे, हे मुळी अवलोकन करणेच नव्हे. वस्तुस्थिती ही आहे की आपल्या जीवनाच्या व आपल्या जाणिवेच्या सर्वच स्तरांमध्ये विषमता आहे. आपण काय वाटेल ते केले, तरी ही वस्तुस्थिती आपल्याला पालटता येणार नाही.

म्हणून अधिक भेद किंवा अधिक विरोध उत्पन्न न करता, विषमतेच्या या वास्तव घटनेकडे पाहता येईल का हे आता आपण पाहू या. क्रांतिकल्पनेच्या पुरस्कर्त्यांनी आजवर मनुष्याचा केवळ एक साधन म्हणूनच उपयोग करून घेतलेला आहे. त्यांच्या दृष्टीने एवढेच काय ते महत्त्वाचे आहे. पण मनुष्य मात्र महत्त्वाचा नाही.

मानवाला महत्त्व आहे, ही गोष्ट धर्मांनी निदान शाब्दिक स्वरूपात तरी मान्य केलेली आहे. पण धर्मनिष्ठा व सिद्धवाक्ये यांच्या प्रतिष्ठापनेसाठी धार्मिकांनीही मनुष्याचा नुसता साधन म्हणून उपयोग करून घेतलेला आहे. एखाद्या विशिष्ट हेतुसिद्धीसाठी जेव्हा माणसाचा उपयोग करण्यात येतो, तेव्हा यातून उच्चनीचत्वाची भावना, जवळिकेची व दूरत्वाची भावना, तसेच जाणता व न जाणता ही भावना उत्पन्न झाल्यावाचून राहणे शक्यच नसते. असा जो भेद केला जात असतो, त्यामध्येच मानसिक विषमता वसत असते. आणि तेच समाजाचे विघटन घडवून आणणारे एक महत्त्वाचे कारण होऊन वसते. आजचे मानवामानवांतील संबंध हे केवळ परस्परांचा उपयोग करून घेण्यावरच आधारले गेले आहेत. एकीकडे समाज आपल्या फायद्यासाठी व्यक्तीचा उपयोग करून घेत असतो व दुसरीकडे व्यक्ती याही परस्परांचा उपयोग करून घेत असतात. स्वतःच्या फायद्यासाठी हा जो परस्परांचा उपयोग करून घेतला जात असतो, तोच माणसामाणसांमध्ये मानसिक भेद व विरोध उत्पन्न करण्यास कारणीभूत होत असतो.

माणसामाणसांमधील संबंधांचे स्वरूप जेव्हा कुठल्याही कल्पनेवर आधारलेले राहणार नाही, तेव्हाच माणसे परस्परांचा स्वतःसाठी उपयोग करण्याचे सोडून देतील. मानवी संबंध जेव्हा, कल्पनेवर आधारले जातात, तेव्हाच पिळणूक करणे, शोषण करणे हे प्रकार सुरू होतात. आणि अशी पिळणूक एकदा सुरू झाली की, तिच्यामुळे विरोध व वैरभाव जन्माला येत राहतात.

"पण समजा, कल्पना किंवा पूर्वग्रह हे संपुष्टात आले, तर काय घडून येईल?"

मग प्रीती उदयास येईल. मूलभूत स्वरूपाची क्रांती घडवून आणण्यास प्रीती ही एकच वस्तू कारणीभूत होत असते. प्रीती हीच खरी क्रांती. पण प्रीती ही एखादी कल्पना मात्र मुळीच नव्हे. विचार, कल्पना या जेव्हा मुळीच नसतात, तेव्हाच प्रीती संभवते. पण प्रीती हे काही प्रचाराचे साधन होऊ शकत नाही. ती जोपासना करून वाढविली जाणारी वस्तू नव्हे. घराच्या छपरांवरून मोठमोठ्याने ओरडून ऐकविण्याची ती घोषणा नव्हे. जेव्हा ध्वज, निष्ठा, नेता या सर्व गोष्टी नाहीशा होतात, योजनापूर्वक करावयाच्या कृतीमागील कल्पना किंवा विचार जेव्हा गळून पडतो, तेव्हाच प्रीतीचा उदय संभवतो अशी प्रीती हीच अखंड सर्जनशील अशी क्रांती होय.

"पण प्रीतीने यंत्रे काही चालविता येणार नाहीत. येतील का?"

कंटाळा

पाऊस नुकताच थांबला होता. लता-वृक्षांवरील धूळ पार धुवून निघाली होती. आणि रस्तेही स्वच्छ झाले होते. सारी वसुंधरा प्रफुल्ल, प्रसन्न दिसत होती. तळचातील मोठचा बेडकांचा आवाज जोराने गर्जत होता. हर्षभराने त्यांचे कंठ जणू फुलून गेले होते. वेगाच्या जलवर्षावामुळे धरणीवरील सारे काही तृप्तसंपृक्त झाले होते. जलकणांमुळे गवताची पाती लसलसत होती. गाईम्हशी ओल्यांचिव झाल्या होत्या. कारण पाऊस बरसत असताना त्या कशाच्याही आडोशाला उभ्या राहिल्या नव्हत्या. आता तर त्या स्वस्थपणे चरत होत्या. रस्त्याच्या कडेला साचलेल्या लहानशा तळचात लहान मुले खेळत होती. त्यांची ती चमकणारी नागडी उघडी शरीरे आणि त्यांचे ते तजेलदार डोळे पाहून अतिशय संतोष वाटत होता. त्यांचा खेळ मनसोक्त चालू होता. किती मजेत, आनंदात होती ती मुले ! पूर्ण विमुक्त-संपूर्ण निश्चित. त्यांच्याशी काही बोलू लागलो, तेव्हा त्यांना ते जरी मुळीच कळले नाही, तरी ती हर्षाने नुसती हसतच राहिली. सूर्य नुकताच ढगांतून बाहेर पडत होता, आणि वृक्षांखाली लांबलांब सावल्या पडू लागल्या होत्या.

मन पूर्णपणे निर्विचार होऊन जाणे, मनातील सर्व विचार समूळ नष्ट होऊन जाणे हे खरोखर किती आवश्यक आहे ! पण मन मुद्दाम विचारशून्य बनविता मात्र उपयोगी नाही. ते सहजपणेच विचारशून्य झाले पाहिजे. मनातील सर्व विचार नाहीसा होऊन जाणे, कालच्या सगळचा स्मृती व उद्याच्या सर्व अपेक्षा पार नष्ट होऊन जाणे ही गोष्ट किती आवश्यक आहे? वस्तुतः जे जे गत ते ते मृतच असते, हे समजून घेणे हे किती सोपे व सहज असते. आणि काल-आज-उद्या यांच्या सातत्यात जगत राहणे हेच खरोखर किती कठीण असते. कारण अशा या सातत्यमय जीवनात काहीतरी विशेष होण्याची किंवा कशापासून तरी परावृत्त होण्याची धडपड अव्याहत चालू असते. ही धडपड म्हणजेच इच्छा वा अभिलाषा. आणि ही अभिलाषा नाहीशी होणे हे, काहीतरी संपादन करीत राहण्याची मनाची ऊर्मी नाहीशी होण्यावरच अवलंबून असते. वस्तुतः, नुसते साधे, सहज जीवन जगणे हे किती सरळ, सोपे आहे ! असे जीवन म्हणजे कुंठित किंवा प्रवाहपतित जीवन मुळीच नव्हे. ज्या जीवनात कसलीही हाव नसते, कुणीतरी विशेष होण्याची अभिलाषा नसते, कुठल्याही विशिष्ट काल्पनिक स्थानी पोचावयाचे नसते, त्या जीवनात केवढा विलक्षण आनंद ओसंडत असतो ! मन जेव्हा आपला सर्व प्रकारचा विचार संपूर्णपणे टाकून देते, तेव्हाच नवसर्जनाची प्रगाढ प्रशांतता तेथे नांदू लागते. कुठल्यातरी विशिष्ट काल्पनिक स्थळी पोचण्याच्या इच्छेने मन जोपर्यंत प्रवास करीत राहते, तोपर्यंत ते शांत, निःशब्द असूच शकत नाही.

इच्छित, काल्पनिक स्थळी पोचणे म्हणजेच मनाच्या दृष्टीने यशस्वी होणे. ही यशस्विता कुणाला प्रारंभीच प्राप्त झालेली असो, की प्रयत्नांती प्राप्त झालेली असो, या दोहोत कसलाही फरक नसतो. कारण यशस्वितेचे स्वरूप हे सदैव एकसारखेच राहत असते. स्वतः कुणीतरी विशिष्ट वनण्याचे कल्पनाचित्र मन जोवर रंगवीत राहील, तोवर ते स्वच्छ, शुद्ध, निर्मल होणे कधीच शक्य नाही.

भेटण्यास आलेली स्त्री सांगत होती की, ती जन्मभर कुठल्या ना कुठल्या कामात सदैव गुंतलेली असे; कधी आपल्या मुलांमध्ये, कधी कुठल्या तरी समाजकार्यात किंवा कधी कुठल्यातरी खेळात. पण काहीही करीत असताना एक प्रकारच्या कंटाळवाणेपणाने तिला सारखे घेरून टाकलेले असे. केवळ दैनंदिन जीवनाचाच तिला कंटाळा वाटत नसून कुठल्याही सुखाचा, कोणत्याही दुःखाचा, कुणाच्याही स्तुतीचा किंवा एकूण सगळ्याच गोष्टींचा तिला अतिशय कंटाळा वाटत असे. तिला आठवत होते तेव्हापासूनच हा कंटाळा एखाद्या दाट मेघाप्रमाणे तिचे जीवन व्यापून वसला होता. या कंटाळवाणेपणापासून दूर जाण्यासाठी तिने पुष्कळ प्रयत्न करून पाहिले होते. पण जी जी नवी गोष्ट ती हाती घेई, तिचा तिला लवकरच कंटाळा येई आणि अशा प्रकारे ती अगदी जेरीस आल्यागत होई. तिने वरेचसे वाचन केलेले होते. कौटुंबिक जीवनात येणाऱ्या सर्वसामान्य आपत्तींचाही अनुभव घेतलेला होता. पण या सगळ्या गोष्टींची परिणती अखेरीस त्या विदारक कंटाळवाणेपणातच होई. या कंटाळ्याचा तिच्या शारीरिक स्वास्थ्याशी काही संबंध नव्हता. कारण शरीराने ती पूर्ण निकोप होती.

आपल्याला सगळ्या गोष्टींचा कंटाळा येतो, असे तुम्हांला का वरे वाटते? जीवनात कुठलीतरी विफलता पदरी आल्यामुळे किंवा एखादी सखोल अभिलाषा अतृप्त राहिल्यामुळेच तुमचा हा कंटाळा उत्पन्न झाला आहे का?

"तसे विशेष काहीच घडले नाही. माझ्या जीवनात काही वरवरच्या अडचणी आल्या खऱ्या. पण मला त्याचे कधीच विशेष महत्त्व वाटले नाही. आणि ज्या ज्या अडचणींचा मला त्रास झाला, त्यांच्यामधून मी आपला मार्ग कुशलतेने काढीत गेले. कुठल्याही अडचणीने मी आजवर पराभूत झाले नाही. माझी ही कंटाळ्याची समस्या कसल्यातरी विफलतेमधून उत्पन्न झाली आहे असे मला मुळीच वाटत नाही. कारण मला जे जे हवेसे वाटले, ते ते मला नेहमी मिळतच गेले. मी कधीही अशक्य गोष्टींचा हट्ट धरला नाही. माझ्या अपेक्षा व मागण्या या नेहमी समजूतदारपणाच्याच असत. आणि असे असूनही माझ्या कौटुंबिक गोष्टींबद्दल, माझ्या कामाबद्दल, एकूण सगळ्याच गोष्टींबद्दल मला सदैव कंटाळाच वाटत आला आहे."

कंटाळा या शब्दाने तुम्हाला नेमके काय ध्वनित करावयाचे आहे? असंतोष हा का तुमचा अर्थ आहे? आजवर कोणत्याही गोष्टीने तुम्हाला संपूर्ण समाधान

मिळवून दिले नाही, असे का तुम्हाला म्हणायचे आहे ?

" नाही, असेच केवळ नाही माझे म्हणणे. सर्वसामान्य माणसाला जेवढा असंतोष वाटत असतो, तेवढाच मलाही वाटत आहे. आणि ज्या बाबतींमधील असंतोष टाळता येण्यासारखा नाही, त्या गोष्टींबाबत मी आपले मन तयार केले आहे. "

पण तुम्हांला मनापासून कशाची आवड आहे, हे प्रथम सांगा. तुम्हांला अगदी आतून अशी एखाद्या गोष्टीची आवड आहे का ?

" नाही. तशी कशाची खास अशी आवड मला नाही. मला जर अशी काही खास आवड असती, तर मला असा सगळ्याच गोष्टींचा कंटाळा कधीच येत राहिला नसता. तशी मी वृत्तीने अतिशय उत्साही आहे. तेव्हा मला जर कशाची तरी मनापासून आवड असती तर मी ती गोष्ट सहजासहजी कधीच सोडून दिली नसती. मला मधून मधून काही गोष्टींविषयी आवड वाटत असे. पण त्या सर्वांचा शेवट अखेर कंटाळवाणेपणातच झाला आहे. "

आवड या शब्दाने तुम्हाला नेमके काय ध्वनित करायचे आहे ? तुमच्या आवडीचे असे कंटाळवाणेपणातच का बरे रूपांतर होत असते ? आवड या शब्दाचा खरोखर काय अर्थ आहे ? माणसाला आवड कशाची वाटते, तर ज्यामुळे त्याला सुख वाटते संतोष होतो, त्याचीच आवड वाटते. होय की नाही ? म्हणजे आवड ही काहीतरी प्राप्त करून घेण्याचीच प्रक्रिया आहे, नाही का ? एखाद्या गोष्टीतून तुम्हाला काही मिळणार नसले, तर तिच्याविषयी तुम्हाला आवडही वाटणार नाही, असेच आहे ना ? जोवर एखाद्या गोष्टीमधून तुम्हाला काहीतरी प्राप्त होत राहते, तोवर तुमची आवड कायम राहते. म्हणजे संपादन करणे व आवड असणे या दोन्ही गोष्टी एकच असतात; होय की नाही ? आजवर जी जी गोष्ट तुमच्या हाती आली, तिच्यामधून संतोष मिळविण्याचाच प्रयत्न तुम्ही करीत आला आहात. आणि एकदा त्या गोष्टीतून तुम्ही संतोष मिळवून घेतलात व त्या गोष्टीचा पुरेपूर फायदा करून घेतलात की त्या गोष्टीचा तुम्हाला कंटाळा येत गेला. काहीही सतत प्राप्त करून घेत राहणे म्हणजे अखेरीस त्याचा कंटाळा येऊ देणे, त्याने जीव उबून जाऊ देणे होय. आपल्याला नेहमी नित्य नवी खेळणी हवी असतात. एका खेळण्यात मौज वाटेनाशी झाली की आपण दुसऱ्या खेळण्याकडे धाव घेतो. आणि आपल्याला नित्य नवे खेळणे मिळतही राहते. काहीतरी मिळण्यासाठीच आपण कशातही मन गुंतवीत असतो. सुखामधून, ज्ञानामधून, कीर्तीमधून, सत्तेमधून, कार्यक्षमतेमधून, आपल्या कुटुंबामधून, सर्व गोष्टींमधून आपण काहीतरी प्राप्त करून घेत राहतो. जेव्हा एखाद्या धर्माकडून किंवा एखाद्या साधुसत्पुरुषाकडून काहीही मिळविण्याचे बाकी उरत नाही, तेव्हा आपल्याला त्याचा कंटाळा येतो आणि मग आपण आपले लक्ष दुसरीकडे वळवतो. काही माणसे एखाद्या संघटनेमध्ये स्वत:ला गुंतवून टाकून झोपी जातात आणि पुन्हा

कधीही जागी होत नाहीत. इतर काहीजण केव्हा तरी जागे होतात. पण मग त्या संघटनेऐवजी दुसऱ्या कुठल्या संघटनेत स्वत:ला अडकवून घेऊन पुन्हा झोपी जातात. आणि अधिकाधिक प्राप्तव्यांच्या मागे लागणाऱ्या या अव्याहत व्यापारालाच विचार, विस्तार किंवा प्रगती हे गोंडस नाव दिले जात असते.

"मग आवड ही नेहमी कुठल्यातरी प्राप्तव्यासाठीच का असते?"

ज्याच्यातून काहीही प्राप्त होत नाही, अशा गोष्टीची तुम्हांला कधीतरी आवड वाटते का? मग ही गोष्ट म्हणजे एखादे नाटक असो, एखादा खेळ असो, एखादे संभाषण, एखादे पुस्तक किंवा एखादी व्यक्ती असो. एखादे चित्र तुमच्यासमोर असले, तरी त्यातून तुम्हाला जर काहीही प्राप्त झाले नाही, तर त्याच्याकडे तुम्ही पाठ फिरविता. एखाद्या व्यक्तीकडून तुम्हांला जर उत्तेजन मिळाले नाहीं किंवा त्या व्यक्तीने निदान तुम्हाला अस्वस्थ केले नाही, तर तुम्ही त्या व्यक्तीकडे दुर्लक्ष करता. एखाद्या विशिष्ट नात्यामधून सुख मिळणार नसले किंवा दु:खही उत्पन्न होणार नसले, तर त्या नात्यामधून तुम्ही आपले मन काढून घेता. तुम्हाला त्याचा कंटाळा येतो. असेच तुमच्या जीवनात आजवर घडत आले आहे, हे तुमच्या लक्षात नाही का आले?

"आले होते खरे. पण त्याच्याकडे या दृष्टीने मी कधीच पाहिले नव्हते."

तुम्हांला काहीही प्राप्त करून घ्यावयाचे नसते, तर तुम्ही इथे कधी आलाच नसता. तुम्हांला आपल्या या कंटाळ्यापासून मुक्तता हवी आहे. पण मी काही ही मुक्तता तुम्हांला देऊ शकणार नाही. तेव्हा पुन्हा तुम्हाला सगळ्या गोष्टींचा कंटाळा येऊ लागेल. पण आपण दोघांनी मिळून जर एकूण सर्व गोष्टींची प्रक्रिया समजून घेतली; प्राप्तव्याची इच्छा कशी उत्पन्न होते आणि कंटाळा का येत राहतो, हे सर्व जर आपण समजून घेतले, तर मात्र या कंटाळ्यापासून तुमची मुक्तता घडून येण्याचा संभव आहे. मुक्तता ही प्रयत्नाने प्राप्त करून घेता येण्यासारखी वस्तू नव्हे. तुम्ही जर ती प्रयत्नाने प्राप्त करून घेतलीत, तर पुन्हा तुम्हाला तिचा कंटाळा येईल. कोणतीही गोष्ट माणसाला एकदा प्राप्त झाली, की ती त्याचे मन संवेदनशून्य बनवून टाकीत नसते का? प्राप्त झालेली वस्तू ही विधायक स्वरूपाची असो, की निषेधात्मक स्वरूपाची असो, ती माणसाला भारभूतच होऊन बसत असते. कारण एकदा वस्तू प्राप्त झाली की, तिच्याबद्दलची आवड नाहीशी होऊन जात असते. ती प्राप्त करून घेण्याच्या प्रयत्नात असताना मनुष्य अतिशय जागरूक असतो; त्याचे संपूर्ण लक्ष त्यात गुंतलेले असते. पण ती प्राप्त झाली की एकाएकी त्याला तिचा कंटाळा येऊ लागतो. असे असल्यामुळे, तुम्हाला अधिक काही प्राप्त करून घेण्याची अभिलाषा अजूनही असली, तरी अधिकाचा पाठलाग करण्याची प्रक्रिया ही अखेर कंटाळवाणेपणाकडेच नेणारी प्रक्रिया असते, ही गोष्ट स्पष्टपणे लक्षात घ्या. आजवर तुम्ही अनेक प्राप्तव्यांच्या मागे लागत आला आहात. प्राप्त करून घेण्याचा तुमचा प्रयत्न

जोवर चालू असे, तोवर तुमचे मन त्यात गुंतून राहत असे. पण प्रत्येक प्राप्तव्याचा अखेर शेवट होत असतो. आणि शेवट आला की, तेथे लागलाच कंटाळाही उत्पन्न होत असतो. तुमच्या जीवनात नेहमी हेच नाही का घडत आलेले ?

" मला वाटते असेच घडत आले असावे. पण या सर्व गोष्टींचा पूर्ण आशय अजून माझ्या ध्यानात आला नाही. तोही लवकरच येईल."

प्राप्त होऊन गेलेल्या गोष्टी आपल्या मनाला थकवा आणीत असतात. प्राप्त झालेली वस्तू हे ज्ञान असो, संपत्ती असो, सद्‌गुण असो की दुसरे काही असो, ते माणसाला संवेदनशून्यच वनवीत असते. काहीतरी सारखे मिळवीत राहणे, आत्मसात करीत राहणे, हाच मानवी मनाचा धर्म असतो. होय की नाही ? किंवा वेगळ्या प्रकारे सांगायचे तर, मानवी मनाने स्वतःसाठी जो साचा निर्माण केलेला असतो, तो नेहमी काहीतरी संपादन करीत राहण्याचाच असतो. पण या व्यापारात मन आपल्या थकव्याची, आपल्या कंटाळ्याचीही वीजे पेरून ठेवीत असते. एखाद्या गोष्टीविषयी कुतूहल उत्पन्न होणे, आवड निर्माण होणे ही प्राप्तव्याची प्रारंभिक अवस्था असते. आणि लवकरच तिचे कंटाळ्यात रूपांतर होत असते. आणि या कंटाळ्यातून मुक्त होण्याची तीव्र इच्छा हाही काहीतरी मिळविण्याचाच एक आविष्कार असतो. अशा रीतीने मन हे आवडीकडून कंटाळ्याकडे व कंटाळ्याकडून आवडीकडे असे सारखे हिंडत राहते. आणि अखेर दमूनथकून, जेरीस येऊन जाते. आवड व थकवा यांच्या एकामागून एक येत राहणाऱ्या लाटा म्हणजेच मानवी जीवन होय असे मानण्यात येते.

" मग ज्या मुक्ततेत कसलेही प्राप्तव्य उरणार नाही अशी मुक्तता माणसाला कशी प्राप्त होऊ शकेल ?"

प्राप्तव्याच्या या समग्र प्रक्रियेमागे जे सत्य आहे, जी वास्तवता आहे, तिचा प्रत्यक्ष अनुभव येऊ देण्यानेच ही मुक्तता प्राप्त होऊ शकेल; स्वतःला प्राप्तव्यशून्य किंवा अलिप्त वनविण्याने नव्हे. स्वतःला प्राप्तव्यशून्य वनविणे हाही प्राप्तव्याचाच एक प्रकार असतो. आणि तोही लवकरच कंटाळवाणा वाटू लागतो. यात कठीण जर काही असेल, तर आता जे सांगितले जात आहे त्याचे शाब्दिक आकलन होणे हे नव्हे, तर असत्य हे असत्य आहे ही गोष्ट साक्षात अनुभविणे हे कठीण आहे. असत्यामागे जे सत्य दडून वसलेले असते, त्याची जाणीव होणे, हाच सुजाणपणाचा आरंभ होय. येथे अडचण असते, ती मन शांत होण्याची असते. कारण मन हे सदैव नाना चिंतांनी व्याकुळ झालेले असते; कशाच्या तरी सारखे पाठीमागे लागलेले असते. काहीतरी अव्याहत मिळवीत असते किंवा कशाचा तरी सतत निषेध करीत असते, किंवा काहीतरी सदैव शोधीत असते. मन कधीही निःशब्द, निःस्तब्ध नसते. त्याचा व्यापार अव्याहत चालूच असतो. गतकाल वर्तमानावर आपली दाट सावली सदैव पाडीत असतो. आणि

भविष्यकाळालाही हा गतकाल वळण देत राहतो. हा सगळा काळाच्या कक्षेत चालणारा व्यापार असतो. मनातल्या कुठल्याही दोन विचारांमध्ये निःशब्दतेचा थोडासाही अवधी मिळत नाही. विचार हे क्षणार्धाचीही उसंत न घेता सारखे एका पाठोपाठ चालू राहतात. मन अशा रीतीने स्वतःला अधिकाधिक तीक्ष्ण वा कुशाग्र बनवीत राहते. आणि त्यामुळे थकून झिजून जाते. एखादी पेन्सिल जर सारखी छिलत राहिले, तर तिचा अवशेषही मागे उरणार नाही. पेन्सिलीप्रमाणेच मन हे स्वतःला सारखे छिलत राहते आणि त्यामुळे अतिशय दमून थकून जाते. कोणत्याही गोष्टीचा अंत करून टाकण्याची मनाला फार भीती वाटत असते. पण खरे जीवन जगणे म्हणजे प्रत्येक दिवसाच्या शेवटी सगळ्याच गोष्टींचा अंत घडून येत राहणे होय; प्राप्त केलेल्या सगळ्या गोष्टी, सगळ्या स्मृती, सगळे अनुभव आणि सगळा गतकाल यांची संपूर्ण समाप्ती घडून येणे होय. असे पाहा की, गतानुभवांचे जाडजूड ओझे जर माणसाच्या डोक्यावर असेल, तर त्याला खरेखुरे जीवन जगता तरी कसे येईल? प्रत्येक गतानुभव म्हणजे ज्ञान व स्मृती. अशी स्मृती ही साक्षात अनुभविण्याची अवस्था कधीतरी होऊ शकेल का? साक्षात अनुभविण्याच्या अवस्थेत अनुभविता हा शिल्लक तरी असतो का? अनुभविता अहं हे स्मृतीचेच स्वरूप असते. अशी स्मृती ही साक्षात अनुभविण्याच्या अवस्थेत कधीतरी असू शकते का? वस्तुतः खरे जगणे म्हणजे मन संपूर्णपणे रिते होऊन जाणे होय. असे जीवन हेच सर्जनशील जीवन होय. सौंदर्य हे साक्षात अनुभविण्यातच वसत असते; गतानुभवात नसते. अनुभव हा नेहमी गताचाच असतो. जे जे गत, जे जे अनुभूत, ते साक्षात अनुभविणे कधीच नसते; ते वर्तमानातील खरे जगणे नसते. साक्षात अनुभविण्यासाठी मन संपूर्णपणे रिते असले पाहिजे. मनाचा संपूर्ण रितेपणा म्हणजेच हृदयाची प्रशांतता, निःशब्दता!

अनुशासन

आमची मोटर अतिशय गर्दीच्या रस्त्यातून चालली होती. थोडयाच वेळात मोठा रस्ता सोडून एका वाजूच्या गल्लीत ती वळली. मोटर तेथेच सोडून आम्ही पायी निघालो. आमची पायवाट ताडामाडांच्या राईतून आणि हिरव्याचार भातशेतांजवळून जात होती. ताडामाडांच्या उंचउंच वृक्षांनी वेढलेले ते लांबच लांब वळणदार भातशेत किती मोहक दिसत होते ! संध्याकाळ झाली होती आणि शीतल वायुलहरी वृक्षांच्या घनदाट शाखांना हालवीत, डोलवीत होत्या. एक वळण घेऊन आम्ही जरा पुढे गेलो, त्यावरोवर अचानक एक सरोवर दृष्टिपथात आले. ते लांबीला वरेच मोठे, पण रुंदीत अगदी कमी होते. त्याच्या तीरावरचे ताडामाडांचे वृक्ष इतके जवळजवळ होते की, त्यांची जणू एक अभेद्य भिंत वनलेली होती. मंदमंद वायुलहरींचा जलाशयाच्या पाण्याशी नाजुक खेळ चालला होता. तीरावर आपटणाऱ्या लाटांचा मंदध्वनी हलकेच कानी पडत होता.

जलाशयाच्या काठावर काही मुले निःसंकोचपणे नग्न होऊन आंघोळी करताना दिसत होती. त्यांचे वांधेसूद, चपल व कमनीय देह डौलदार दिसत होते आणि सूर्य प्रकाशात चमकत होते. ती मुले सरोवराच्या मध्यापर्यंत पोहून जात, तेथून परतत आणि पुन्हा उड्या मारून पोहू लागत.

आम्ही जेव्हा परतलो तेव्हा चंद्र वर आला होता. त्याच्या सौम्य प्रकाशात झाडांच्या सावल्या दाट दिसत होत्या. आता त्या जलाशयाच्या काठावर मुले दिसत नव्हती. जलप्रवाह चांदण्यात चमचमत होता. वृक्षांच्या घनदाट सावल्यांमध्ये ताडामाडांचे सरळ रेखीव वुंधे पांढऱ्या शुभ्र स्तंभासारखे शोभत होते.

भेटीस आलेला गृहस्थ वराच दुरून आलेला होता. मनावर ताबा कसा मिळवावा हे जाणून घेण्यास तो अतिशय उत्सुक असलेला दिसत होता. तो सांगत होता की, आपण स्वतःला समाजापासून मुद्दामच तोडून टाकले आहे. आणि आता एका नातेवाइकाजवळ राहून, अतिशय साधे जीवन व्यतीत करीत, मनावर पूर्ण स्वामित्व मिळविण्याच्या साधनेतच सर्व वेळ घालवीत आहोत. या गृहस्थाने अनेक वर्षे एका विशिष्ट प्रकारच्या साधनेत घालविली होती. पण अद्यापही त्याला आपल्या मनावर स्वामित्व मिळविता आले नव्हते. साखळीने घट्ट वांधून टाकलेल्या एखाद्या जनावराप्रमाणे त्याचे मन मोकाटपणे उधळण्यासाठी सतत उतावीळ होत होते. त्याने उपासतापासही करून पाहिले होते, पण त्यांचा काहीही उपयोग झाला नव्हता. आहाराच्या वावतीत त्याने काही प्रयोग करून पाहिले होते. आणि त्यांच्यामुळे त्याला थोडावहुत फायदाही झाला होता. पण तरीही त्याच्या मनाला शांती काही लाभली नव्हती.

त्याच्या मनाचे व्यापार अव्याहत चालूच होते. जुन्याजुन्या प्रसंगांच्या, दृश्यांच्या किंवा संवेदनांच्या प्रतिमा त्याच्या मनापुढे सारख्या उभ्या राहत किंवा उद्या आपण किती शांत होणार याच्यासंबंधीचे गोड कल्पनाचित्र त्याच्यापुढे उभे राही. पण हा उद्या कधी उगवलाच नाही. त्यामुळे हा सगळा मनोव्यापार एखाद्या भयानक स्वप्नाप्रमाणे त्याला भेडसावीत राहिला होता. अगदी क्वचित प्रसंगी त्याचे मन निःस्तब्ध होई. पण लवकरच या निःस्तब्धतेची केवळ स्मृतीच त्याच्या मनात रेंगाळत राही.

जी गोष्ट एकदा जिंकली जाते, ती पुन्हापुन्हा सारखी जिंकतच राहावी लागत नाही का? विचाराचे वा प्रवृत्तीचे जबरीने निरोधन करणे हा त्यांना जिंकण्याचा किंवा त्यांच्यावर स्वामित्व मिळविण्याचाच एक प्रकार नाही का? आणि विचार-प्रवृत्तींचे उदात्तीकरण करणे किंवा त्यांच्या जागी दुसऱ्या गोष्टीची प्रतिष्ठापना करणे हादेखील स्वामित्व मिळविण्याचाच तर प्रकार आहे. काहीही जिंकण्याची अभिलाषा धरणे म्हणजे अधिकाधिक संघर्षालाच जन्म देणे होय. पण तुम्हांला मनावर स्वामित्व का बरे मिळवावेसे वाटते? मन निःस्तब्ध का बनवावेसे वाटते?

"धार्मिक गोष्टींबद्दल मला नेहमीच आवड वाटत आलेली आहे. मी अनेक धर्मविचारांचा अभ्यास केलेला आहे. ईश्वराचे ज्ञान करून घेण्यासाठी मन निःस्तब्ध असलेच पाहिजे, असेच प्रत्येक धर्म आजवर सांगत आला आहे. मला आठवते तेव्हापासूनच, आपणांस ईश्वरप्राप्ती व्हावी, असे मला उत्कटतेने वाटत आले आहे. विश्वाच्या सर्वव्यापी सौंदर्याचे ज्ञान आपल्याला व्हावे, भातशेतांचे सौंदर्य व घाणेरडे खेडे यांचेही ज्ञान व्हावे, असे मला वाटत आले आहे. माझे एकूण शैक्षणिक जीवन उच्च प्रतीचे होते. मी परदेशप्रवासही करून आलो आहे. पण एक दिवस या सर्व गोष्टींचा त्याग करून मी त्या शांतीचा, त्या निःस्तब्धतेचा शोध करावयाला बाहेर पडलो. या निःस्तब्धतेबद्दल आपण आपल्या प्रवचनात जे नुकतेच सांगितले, ते मी ऐकले. म्हणूनच आज मी येथे आलो."

ईश्वरप्राप्तीसाठी तुम्ही मनावर स्वामित्व मिळवू पाहता खरे. पण प्रयत्नाने साधली गेलेली मनःशांती हा ईश्वरप्राप्तीकडे नेणारा मार्ग असू शकतो का? स्वर्गाची दारे उघडण्यासाठी द्यावी लागणारी किंमत, असे का मनःशांतीचे स्वरूप आहे? ईश्वराकडे जाण्याचा मार्ग म्हणा किंवा सत्याप्रत पोचण्याचा मार्ग म्हणा, काहीतरी किंमत देऊन तुम्हांला तो विकत घ्यायला हवा आहे असे दिसते. पण सद्‌गुणाची किंमत देऊन किंवा सर्वसंगपरित्यागाची अथवा घोर साधनेची किंमत देऊन ते सनातन सत्य कुणालाही विकत घेता येणे शक्य तरी आहे का? आपली सामान्यतः अशी कल्पना असते की, आपण सदाचरण करीत राहिलो, ब्रह्मचर्य पाळीत राहिलो, जगापासून निवृत्त झालो, तर अशी किंमत देऊन ते अमेय, अपरिमित, ते अनंत आपल्याला ज्ञाताच्या वा परिमिताच्या कक्षेत आणता येईल. म्हणजे हा सारा एक प्रकारचा

सौदाच ठरत नाही का ? तुमचा ' सद्‌गुण ' हे अशा प्रकारे त्या अखेरच्या साध्याचे केवळ साधनच होऊन वसते.

" पण मनावर ताबा मिळविण्यासाठी कोणते तरी अनुशासन हे आवश्यकच नसते का ? ते नसले तर मन शांत होणे शक्यच नाही. माझे मन शांत होत नाही, याचे कारण म्हणजे मी माझ्या मनाला पुरेशी शिस्त लावली नाही हेच होय. तेव्हा हा दोष माझा आहे, हा अनुशासनाचा नव्हे. "

हे पाहा, अनुशासन हे केवळ विशिष्ट साध्य गाठण्यासाठी असणारे साधन असते. पण आपले साध्य हे तर संपूर्णपणे अज्ञात असेच आहे. सत्य म्हणजेच हे अज्ञात होय. कारण सत्य हे ज्ञाताच्या कक्षेत कधीही येत नसते. ते ज्ञाताच्या कक्षेत आले, तर ते सत्य असणारच नाही. त्या अमेयाचे, त्या अनंताचे तुम्ही जर मापन करू शकलात, तर ते अमेय असणारच नाही. शब्द हा नेहमी आपला परिचित मानदंड असतो. पण सत्य हा शब्द म्हणजे सत्य ही वस्तू नव्हे. अनुशासन हे तुमचे सत्याप्रत पोचण्याचे साधन होऊन वसले आहे. पण साध्य व साधन ही केव्हाही भिन्न नसतात, विसदृश नसतात; असतात का कधी ? साध्य व साधन ही अभिन्न असतात, एकात्मक असतात हे अगदी स्पष्ट आहे. साधनातच साध्य अनुस्यूत असते. म्हणून साधन हेच साध्य होऊन वसते. साधनाहून वेगळे असे कोणतेही साध्य कधीही असत नाही. शांततेच्या साध्यासाठी हिंसेचे साधन वापरण्याने केवळ हिंसाच वाढत जाते. वस्तुतः साधन हेच काय ते महत्त्वाचे असते, साध्य नव्हे. साधन हेच साध्याचे स्वरूप घडवीत असते. साधनाहून वेगळे असे कोणतेच साध्य कधीही असत नाही.

" आपण जे सांगत आहात, ते मी केवळ श्रवण करीत राहीन. त्याचे आकलन करून घेण्याचा प्रयत्न करीत राहीन. आणि मला काही समजले नाही, तरच मी विचारीन. "

मनःशांती मिळविण्यासाठी तुम्ही अनुशासनाचा किंवा संयमनाचा उपयोग करीत आहात; होय ना ? विशिष्ट स्वरूपाच्या साध्याच्या अनुरोधाने आचरण करणे ही गोष्ट अनुशासन या शब्दात अभिप्रेत असते. अमुक एक साध्य गाठण्यासाठीच तुम्ही संयमन करीत असता. म्हणजे संयमन किंवा अनुशासन हे मुळातच हिंसात्मक असत नाही का ? स्वतःचे अनुशासन करण्यात किंवा संयमन करण्यात तुम्हांला कदाचित एक प्रकारचे सुख लाभतही असेल. पण असे सुख वाटत राहणे हेही प्रतिकाराचेच एक स्वरूप नाही का ? आणि अशा या प्रतिकारातून अधिकाधिक संघर्षच वाढत राहत नाही का ? विशिष्ट अनुशासन स्वीकारणे म्हणजे स्वरक्षणासाठी तटबंदी उभारीत राहणेच नाही का ? पण ज्याचे रक्षण केले जाते, त्याच्यावर सदैव आक्रमण होतच राहते. एखादे आवडते साध्य गाठण्यासाठी, जे आज विद्यमान आहे, त्याचा निरोध करणे, असाच अनुशासनाचा अर्थ नाही का ? असे पाहा की,

कशाचाही निरोध करण्याने, कशाचेही उदात्तीकरण करण्याने किंवा एकाऐवजी दुसऱ्या कशाची प्रतिष्ठापना करण्याने केवळ अधिकाधिक प्रयत्न व अधिक धडपड हीच वाढत राहत नाहीत का ? आणि यामुळे संघर्षाचीच वाढ होत नाही का ? एखादी व्याधी दडपून टाकण्यात तुम्हांला यश मिळेल खरे. पण ही व्याधी जोवर मुळातच नाहीशी केली जाणार नाही, तोवर ती वेगवेगळ्या स्वरूपात आपले डोके वर काढीत राहणारच. अनुशासनाचेही असेच होत असते. अनुशासन करणे म्हणजे जे विद्यमान आहे, ते दडपून टाकणे, त्याच्यावर मात करून ते जिंकणे. अनुशासन हे अशा प्रकारे हिंसेचेच एक स्वरूप असते. अनुशासन करण्याने आपण 'अयोग्य' साधनाच्या साह्याने योग्य असे साध्य गाठू इच्छितो. पण विद्यमानाचा असा प्रतिकार करीत राहण्याने किंवा ते दडपून टाकीत जाण्याने, ते विमुक्त, ते सत्य कसे उदयास येऊ शकेल ? विमुक्तता ही प्रारंभीच असावी लागते, शेवटी नव्हे. वस्तुतः साध्य हेच पहिले पाऊल असते आणि साधन हाच शेवट असतो. पहिले पाऊल जे उचलावयाचे तेच विमुक्तिरूप असले पाहिजे, शेवटचे नव्हे. पण कोणत्याही अनुशासनात जबरदस्ती किंवा दडपण हेच अभिप्रेत असते; मग ते दडपण सूक्ष्म असो की स्थूल असो; ते बाहेरून लादलेले असो की स्वतःच स्वीकारलेले असो. जेथे जेथे जबरदस्ती असते, तेथे तेथे भीती ही असणारच. अनुशासनामध्ये विशिष्ट साध्य गाठण्यासाठी जबरदस्तीचा किंवा भीतीचा साधन म्हणून उपयोग केला जात असतो. आणि इकडे साध्य तर प्रीतिरूप असते. पण भीतीमधून प्रीती उदयास येणे हे कधीतरी संभवनीय होईल का ? जेव्हा भीती ही कोणत्याही स्तरावर उरतच नाही, तेव्हाच प्रीती उदय पावत असते.

"पण कसले तरी दडपण आणल्याशिवाय किंवा कुठल्यातरी विशिष्ट रीतीनुसार आचरण केल्याशिवाय मनाचे अपेक्षित कार्य चालू तरी कसे राहील ?"

मनाचे सतत चालत राहणारे व्यापार, हीच तर त्याच्या आकलनाच्या आड येणारी मोठी धोंड आहे. विचारांच्या स्वरूपात मनाचे व्यापार जेव्हा चालू नसतात, तेव्हाच त्याचे यथार्थ आकलन होत असते, ही गोष्ट आजवर तुमच्या ध्यानात आली नाही का ? विचार-प्रक्रिया जेव्हा थांवते, तेव्हाच आकलन होत असते. दोन विचारांमधील मध्यंतरातच आकलन होत असते. मन निःस्तब्ध, शांत झाले पाहिजे असे तुम्ही एकीकडे म्हणता आणि उलट, मनाचे कार्य चालू राहिले पाहिजे अशीही इच्छा वाळगता. आपण जर सहजपणे मनाचे निरीक्षण करीत राहिलो, तर आपल्याला वास्तवाचे आकलन होईल. पण आपण मात्र हा सहजपणा टाकून देऊन आपला दृष्टिकोण इतका गुंतागुंतीचा बनवून टाकतो की, त्यामुळे कशाचेही आकलन होणे अशक्य होऊन वसते. आपल्याला वस्तुतः कशाशी बरे कर्तव्य आहे ? अनुशासन, संयमन, दडपण किंवा प्रतिकार या गोष्टींशी आपल्याला काहीही कर्तव्य नाही;

तर विचार-प्रक्रिया कशी चालते याचे निरीक्षण करणे व विचार मुळातच कसा थांबतो हे पाहणे, याच गोष्टीशी आपल्याला कर्तव्य आहे. होय की नाही ? मन सारखे भटकत राहते असे विधान जेव्हा आपण करतो, तेव्हा आपल्याला काय ध्वनित करायचे असते ? आपल्याला एवढेच ध्वनित करायचे असते की, विचार अव्याहतपणे एका आकर्षक गोष्टीकडून दुसरीकडे जात राहतो, संलग्न झालेल्या एका स्मृतीकडून दुसरीकडे भटकत असतो. आणि अशा रीतीने सदैव अस्वस्थ, प्रक्षुब्ध होत राहतो. असा हा विचार शांत, स्तब्ध होणे शक्य आहे का, हा आपल्यापुढील प्रश्न आहे. होय ना ?

" माझाही नेमका हाच प्रश्न आहे. मला विचाराचा अंत घडवून आणावयाचा आहे. आता मला अनुशासनाची व्यर्थता ध्यानात येऊ लागली आहे. त्यातील खोटेपणा व मूर्खपणा आता खरोखरच मला कळू लागला आहे. तेव्हा आता त्या मार्गाने मी कधीही जाणार नाही. पण विचाराचा अंत मला कसा घडवून आणता येईल ?"

हे पाहा, आता तुम्ही नुसते श्रवण करीत चला. तुमचे स्वत:चे पूर्वग्रह किंवा तुमचे वा दुसऱ्या कुणाचे या बाबतीतील निर्णय मध्ये आणू नका. खरेखुरे आकलन करून घेण्यासाठीच श्रवण करीत राहा. जे सांगितले जात आहे, त्याचा स्वीकार करण्यासाठी किंवा ते खोडून काढण्यासाठी श्रवण करू नका. विचाराचा अंत कसा घडविता येईल हा तुमचा प्रश्न आहे. आता हे पाहा की, विचारक या नात्याने आपल्या विचारांपासून तुम्ही वेगळे का आहात ? तुमच्या विचारांपासून तुम्ही पूर्ण वेगळे, पूर्ण विसदृश असे आहात का ? तुमचे विचार म्हणजेच वस्तुत: तुम्ही नाही का ? विचार हाच मुळी विचारकाला एका वेगळ्या, उच्च स्तरावर नेऊन ठेवीत असतो. त्याला वेगळे नाव देत असतो. आणि तो स्वत:पासून अगदी भिन्न आहे असे कल्पीत असतो. वस्तुस्थिती मात्र अशी आहे की, विचारक हा आपल्या विचार-प्रक्रियेच्या कक्षेतच वावरत असतो; होय की नाही ? वस्तुत: विचारालाच काय ते अस्तित्व असते. आणि हा विचारच विचारकाची निर्मिती करीत असतो. विचार हाच विचारकाला स्वतंत्र, शाश्वत असे स्वरूप प्रदान करीत असतो. आपण स्वत: अशाश्वत आहोत, आपण विविध व्यापारांच्या भोवऱ्यात अखंड गिरगिरत आहोत, हे विचाराला स्पष्ट दिसत असते. आणि म्हणूनच स्वत:हून सर्वस्वी विभिन्न, विभक्त व विसदृश अशा विचारकनामक वस्तूची तो निर्मिती करीत असतो. मग हा निर्माण केलेला विचारक विचाराचा समाचार घेऊ लागतो. 'मला विचाराचा अंत घडवून आणलाच पाहिजे' असेही मग तो म्हणू लागतो. पण वस्तुत: विचार-प्रक्रियेलाच काय ते अस्तित्व असते. विचाराहून वेगळ्या अशा विचारकाला अस्तित्वच नसते. हे सत्य म्हणजे शब्दांची नुसती पुनरुक्ती नव्हे, हे लक्षात ठेवा. म्हणजे हे सत्य साक्षात अनुभविणे हेच सर्वश्रेष्ठ महत्त्वाचे आहे, हे तुम्हांला कळून येईल. विचारांनाच केवळ अस्तित्व असते, विचार करणाऱ्या विचारकाला मुळीच अस्तित्व नसते.

"पण मग मुळात विचार तरी कसा निर्माण झाला?"

वस्तूचे अवलोकन करणे, तिचा संस्पर्श होणे, त्यातून संवेदन उत्पन्न होणे, त्यातून अभिलाषा निर्माण होणे आणि अभिलाषेच्या द्वारा त्या वस्तूशी सारूप्य पावणे अशा प्रक्रियेने विचार उत्पन्न होत असतो. "मला पाहिजे," "मला नको" अशा स्वरूपाची विचारांची प्रक्रिया असते. ही प्रक्रिया अगदी उघड व स्पष्ट आहे, नाही का? पण आपल्यापुढील प्रश्न हा आहे की, हा विचार थांवणार कसा? मात्र यासाठी जाणता वा अजाणता केली जाणारी जवरदस्ती ही सर्वस्वी निरुपयोगी ठरते. कारण अशी जवरदस्ती करावयाची तर ती करणारा अनुशासक गृहीत धरावा लागतो. पण अशा या अनुशासकाला तर मुळातच अस्तित्व नसते. अनुशासन करण्याच्या प्रक्रियेत धिक्कार करणे, तुलना करणे वा समर्थन करणे या गोष्टी अंतर्भूत असतात. पण विचार करणारी, अनुशासन करणारी अशी विचारक या नावाची वेगळी वस्तूच अस्तित्वात नसते, ही गोष्ट जेव्हा स्पष्टपणे दिसून येते, तेव्हा केवळ विचार व विचार-प्रक्रिया यांनाच काय ते अस्तित्व आहे, हेही आपोआपच ध्यानात येते. विचार हे जीवनाच्या वर्तमान आव्हानाला स्मृतीने वा गत अनुभूतीने दिलेले उत्तर असते. पण याही गोष्टीचे नुसते शाब्दिक आकलन होऊन उपयोगी नाही. तर तिचे साक्षात अनुभविणे घडून आले पाहिजे. असे झाले की नुसती अक्रिय सावधानताच काय ती शिल्लक राहते. या सावधानतेत विचारक असत नाही. विचाराचाही संपूर्ण अभाव घडून येतो. आपले मन, आपले समग्र अनुभवसाकल्य, गतकालातच रुतून वसलेली आपली समग्र जाणीव, ही जेव्हा कसलाही प्रक्षेप करीत राहणार नाही, तेव्हाच ती निःस्तब्ध होऊन जाईल. कुठलाही प्रक्षेप करणे म्हणजे काहीतरी विशेष होण्याची अभिलाषाच असते.

जेव्हा विचाराचा अभाव घडून येतो, तेव्हाच मन रिते होते. येत राहणाऱ्या प्रत्येक विचाराचे अक्रिय सावधानतेने अवलोकन करीत राहिले तरच विचाराचा अंत घडून येतो. अशा या सावधान अवस्थेत निरीक्षक नसतो, गुणदोषनिर्णायकही नसतो. या अवस्थेत तो गुणदोष-निर्णायकही उरलेला नसल्यामुळे तेथे केवळ साक्षात अनुभवणेच उरते. या साक्षात अनुभविण्यात अनुभविताही नसतो व अनुभूतीही नसते. जे अनुभूत असते, तोच तर विचार असतो आणि तोच विचारकाची निर्मिती करीत असतो. म्हणून मन जेव्हा केवळ साक्षात अनुभविण्याच्या अवस्थेत असते, तेव्हाच तेथे निःशब्दता, निःस्तब्धता नांदत असते. ही निःशब्दता प्रयत्नाने मुद्दाम घडवून आणलेली नसते. अशा या निःशब्दतेत, या प्रशांततेत ते सत्य प्रवेश करते. ते कालातीत असते, ते अमेय, अनंत असते.

संघर्ष–विमुक्तता–संबद्धता

भेटीस आलेला गृहस्थ आपली भूमिका स्पष्ट करीत होता; "हे पाहा, स्थिती व स्थितिविरोध यांच्यामध्ये असणारा विरोध किंवा संघर्ष हा अपरिहार्य असाच आहे. त्यांच्या परस्परविरोधातूनच समन्वय निर्माण होत असतो. मग हा समन्वय हीच स्थिती बनते आणि तिच्या विरोधात स्थितिविरोध खडा होतो. मग पुन्हा त्यांचा समन्वय होतो. आणि अशा तऱ्हेने, स्थिती-स्थितिविरोध-समन्वय हे चक्र अव्याहत चालू राहते. स्थिती व स्थितिविरोध यांच्यामधील संघर्षाचा अंत कधीच घडून येत नसतो. अशा या अविरत संघर्षामधूनच विकास होत राहतो, प्रगती होत राहते."

पण संघर्षामधून आपल्या समस्यांचे यथार्थ आकलन आपल्याला कधीतरी होते का? संघर्ष हा समाजाला व जगाला खरोखरच विकासाप्रत वा प्रगतीप्रत नेत असतो का? संघर्षामुळे काही दुय्यम दर्जाच्या सुधारणा होतही असतील. पण समाजाचे किंवा व्यक्तीचे विघटन घडविणारे एक कारण, असेच वस्तुतः संघर्षाचे खरेखुरे स्वरूप नाही का? संघर्ष हा जीवनाला आवश्यकच आहे असे तुम्ही इतक्या आग्रहाने का बरे प्रतिपादन करीत आहात?

"आपल्या जीवनाच्या प्रत्येक स्तरावर संघर्ष हा सदैव चालू असतो, हे तर आपल्याला माहीतच आहे. मग या उघड वस्तुस्थितीकडे डोळेझाक करण्यात किंवा ती नाकारण्यात काय अर्थ आहे?"

आपल्या जीवनात अविरतपणे अंतर्बाह्य संघर्ष चालू असतो, या गोष्टीकडे आपल्याला मुळीच डोळेझाक करायची नाही. पण संघर्ष हा जीवनाला आवश्यकच आहे, असे एवढ्या आग्रहाने तुम्ही का म्हणता, हे मात्र तुम्हाला विचारावेसे वाटते."

"हे पाहा, संघर्ष आहे, ही गोष्ट नाकारून चालणारच नाही. संघर्ष हे जीवन-रचनेचे एक अविभाज्य अंग आहे. विशिष्ट साध्य गाठण्याचे एक साधन या दृष्टीनेच आम्ही या संघर्षाचा उपयोग करून घेत असतो. प्रत्येक व्यक्तीला योग्य ती परिस्थिती व योग्य ते वातावरण प्राप्त करून देणे हे आमचे साध्य आहे. हे साध्य प्राप्त करून घेण्यासाठी आमचा प्रयत्न अविरत चालू आहे. आणि त्यासाठीच आम्ही सर्व प्रकारच्या सूक्तासूक्त साधनांचा उपयोग करीत आहोत. संघर्ष, महत्त्वाकांक्षा हे मानवी जीवनाचे अंगभूत घटक आहेत. या घटकांचा उपयोग मनुष्याला अनुकूल होईल अशा प्रकारे किंवा त्याला प्रतिकूल होईल अशाही प्रकारे करता येतो. पण आम्ही मात्र या संघर्षाचा उपयोग मानवाला अधिकाधिक उदात्त व श्रेष्ठ गोष्टींकडे नेण्यासाठीच करीत आहोत."

संघर्ष या शब्दाचा आपण काय अर्थ करीत असतो? तुमच्या दृष्टीने संघर्ष हा

कोणत्या दोन गोष्टींमध्ये चालू असतो ?

"जे होऊन गेले आहे आणि जे होणार आहे, यांच्यामधील संघर्ष आम्हाला अभिप्रेत आहे."

पण 'जे होणार आहे' ते वस्तुतः 'जे होऊन गेले आहे' त्याचे आणि 'जे वर्तमानात आहे' त्याचेच पुढे चालू राहणारे प्रत्युत्तर असते, पर्यवसान असते. दोन परस्पर-विरोधी कल्पनांमध्ये चालणारा कलह म्हणजे संघर्ष, असाच संघर्षाचा अर्थ आपण करीत असतो. पण कोणत्याही स्वरूपाच्या परस्परविरोधांमुळे, समस्येचे खरे आकलन कधी तरी होऊ शकते का ? कुठल्याही समस्येचे आकलन हे केव्हा बरे होत असते ?

"हे पाहा, संघर्षाचे प्रकार वेगवेगळाले असतात. वर्गसंघर्ष, राष्ट्रसंघर्ष किंवा विचारसंघर्ष अशा स्वरूपाचे हे प्रकार असतात. मूलभूत स्वरूपाच्या ऐतिहासिक घटनांविषयी जे अज्ञान असते त्याच्यामुळेच संघर्ष किंवा विरोध किंवा प्रतिकार उत्पन्न होत असतो. या विरोधातूनच विकास होत राहतो, प्रगती होत राहते. आणि या रीतीने जीवनाची समग्र प्रक्रिया चालू राहते."

जीवनाच्या वेगवेगळ्या स्तरांवर संघर्ष अव्याहत चालू असतो, हे आपणा सर्वांना पूर्ण माहीत आहे. तेव्हा हा संघर्ष नाकारणे हे मूर्खपणाचेच ठरेल. पण हा संघर्ष होत राहणे हे आवश्यकच आहे का ? जीवनात संघर्ष हा अटळ व आवश्यकच आहे, असे आपण आजवर गृहीत धरून चाललो आहोत किंवा निदान चतुर युक्तिवादाने त्याचे समर्थन करीत आलो आहोत. निसर्गाच्या वा सृष्टीच्या एकंदर व्यापारात विरोधाचा अर्थ काही वेगळाच असावा. पण आपण मात्र संघर्षाचा जो अर्थ करीत असतो, त्या अर्थाने प्राण्यांमध्ये संघर्ष मुळीच नसावा. आपणा मानवांच्या जीवनात मात्र संघर्षाला प्रचंड महत्त्व प्राप्त होऊन बसले आहे. आपल्या जीवनात त्याला एवढे अवास्तव महत्त्व का बरे प्राप्त झाले आहे ? महत्त्वाकांक्षा, स्पर्धा, कुणीतरी विशेष होण्याची धडपड आणि काहीतरी साध्य करण्याची अभिलाषा ही सर्व संघर्षाचीच अंगे आहेत ही गोष्ट स्पष्ट आहे. पण संघर्ष हा जीवनाला आवश्यकच आहे, असे आपण का बरे मानीत असतो ? बाकी हा प्रश्न विचारला, तरी आळशीपणाला आपण मान्यता द्यावी, असा मात्र या प्रश्नाचा मुळीच अर्थ नाही. हा सगळा आंतरिक व बाह्य संघर्ष आपण का बरे चालू देतो ? कोणत्याही समस्येची सोडवणूक होण्यासाठी किंवा कोणत्याही गोष्टीचे आकलन होण्यासाठी संघर्ष आवश्यकच असतो का ? पण संघर्ष आवश्यक आहे की नाही, यावद्दल अनुकूल किंवा प्रतिकूल निर्णय एकदम देण्याऐवजी, या गोष्टीचा आपण शोध नको का करावयाला ? यासंबंधीची आपली मते व आपले निर्णय यांचा आग्रह धरण्याऐवजी, यासंबंधीचे सत्य शोधून पाहण्याचाच प्रयत्न आपण नको का करावयाला ?

"पण एका प्रकारच्या समाजव्यवस्थेचे दुसऱ्या प्रकारच्या समाजव्यवस्थेत

परिवर्तन करावयाचे असले, तर संघर्षाचा आश्रय केल्यावाचून ते शक्य होईल का ? धनिक किंवा जमीनदार हे आपखुषीने आपल्या संपत्तीचे विसर्जन थोडेच करणार आहेत ? त्यांना ते जबरदस्तीनेच करवावे लागेल. आणि या संघर्षामधूनच नवी समाजव्यवस्था, नवी जीवनरीत आकारास येईल. पण हे सर्व समजूतदारपणाने व शांततेने खासच घडवून आणता येणार नाही. हिंसेचा अवलंब न करण्याची आमची कितीही इच्छा असली, तरी प्रत्यक्ष वस्तुस्थिती जोखून तिचा सामना करणे आम्हाला भागच आहे."

नवी समाजव्यवस्था कशी असावी हे तुम्हाला पूर्ण माहीत आहे, आणि इतरांना मात्र ते माहीत नाही, असे तुम्ही गृहीत धरून चालला आहात. हे अलौकिक ज्ञान केवळ आपल्यालाच आहे, अशी तुमची समजूत आहे. आणि या समजुतीच्या आधारावर, आपल्या कार्याच्या आड येणाऱ्या माणसांचा निःपात करून टाकण्यास तुम्ही एका पायावर तयार आहात. पण समाजपरिवर्तन घडवून आणण्यासाठी जी रीत तुम्हाला अत्यावश्यक वाटत आहे, तिच्यामुळे तुम्ही विरोध व द्वेष हेच निर्माण करीत नसता का ? वस्तुतः तुमचे हे जे तथाकथित ज्ञान आहे, तो केवळ पूर्वग्रहांचाच एक प्रकार आहे; पूर्वसंस्कारबद्धतेचेच ते एक वेगळे स्वरूप आहे. तुम्ही किंवा तुमच्या पुढाऱ्यांनी जो ऐतिहासिक पुरावा गोळा केला आहे, त्याचा अर्थ तुमच्याकडून पूर्वसंस्कारबद्धतेच्या एका विशिष्ट पार्श्वभूमीवरूनच लावला जात आहे आणि या विशिष्ट पार्श्वभूमीवरूनच तुम्ही काढलेल्या निष्कर्षांचे स्वरूप निश्चित होत आहे. तुम्ही काढलेल्या या विशिष्ट निष्कर्षाला, किंवा प्रत्युत्तराला च नवी विचारप्रणाली किंवा नवा दृष्टिकोन हे नाव तुम्ही देत आहात. वस्तुतः जीवनाच्या आव्हानाना विचारांच्या साह्याने जे जे उत्तर दिले जाते, ते ते पूर्वसंस्कारबद्ध असेच असते. आणि विचाराच्या किंवा कल्पनेच्या अशा प्रकारच्या आधाराने क्रांती घडवून आणू पाहणे म्हणजे चालू समाजरचनेत थोडासा बदल घडवून आणणेच होय. हे पाहा, तुम्ही वस्तुतः नुसते सुधारकच आहात, खरे क्रांतिकारक मुळीच नाहीत. एखाद्या कल्पनेवर आधारलेली क्रांती काय किंवा सुधारणा काय, दोन्हीही समाजक्रांतीविरोधी किंवा समाजप्रगतीविरोधी अशाच असतात.

स्थिती व स्थितिविरोध यांच्यामधील संघर्ष हा अपरिहार्यच आहे आणि या परस्परविरुद्धांच्या संघर्षामधूनच समन्वय निर्माण होत असतो, असे तुम्ही मघाशी म्हटले होते, होय ना ?

"होय. चालू समाजरचना व तिच्या विरोधात उत्पन्न होणाऱ्या घटनांच्या दडपणामुळे आकारास येणारा संघटित विरोध या उभयतांमध्ये होणाऱ्या संघर्षातूनच कालांतराने नवी समाजरचना निश्चितपणे अस्तित्वात येईल."

पण हे सांगा की, आजची जी स्थिती असते, तिच्या विरोधी असणारी स्थिती

किंवा स्थितिविरोध हा त्या स्थितीपेक्षा वेगळा किंवा विसदृश असतो का? हा विरोध निर्माण तरी कसा होतो? जी स्थिती आहे तिचे थोडेसे सुधारलेले असे वैचारिक प्रक्षेपात्मक स्वरूप म्हणजेच हा विरोध नसतो का? स्थितिविरोधामध्ये ज्या स्थितीचा तो विरोध असतो, त्या स्थितीचेच घटक नसतात का? स्थिती व स्थितीविरोध हे परस्परांहून पूर्ण भिन्न असे कधीतरी असतात का? परस्परांशी पूर्ण विसदृश असे कधीतरी असतात का? आणि या दोहोंचा जो समन्वय असतो तेही स्थितीचेच थोडे सुधारलेले स्वरूप नसते का? जी मूळ स्थिती असते, तिच्यावर मधून मधून वेगवेगळे रंग चढवले, तिच्यात फेरफार केले, सुधारणा घडवून आणल्या, परिस्थितीनुसार व विविध दडपणांमुळे तिचे स्वरूप बदलले, तरी जी मूळ स्थिती असते, ती नेहमी तशीच राहत असते. म्हणूनच स्थिती व स्थितिविरोध यांच्यामध्ये होणारा संघर्ष हा सर्वस्वी निरर्थक, व्यर्थ व मूर्खपणाचाच असतो. शब्दांनी व बौद्धिक युक्तिवादांनी तुम्ही काय वाटेल ते सिद्ध करू शकाल किंवा काहीही असिद्ध करू शकाल. पण असे करण्याने तुम्ही प्रत्यक्ष वस्तुस्थिती काही बदलू शकणार नाही. सध्याची समाजव्यवस्था ही व्यक्तिगत स्वार्थावर व लोभावर आधारलेली आहे. या समाजव्यवस्थेचा जो विरोध आणि या विरोधातून उत्पन्न होणारा जो समन्वय त्याला तुम्ही नवी समाजव्यवस्था हे नाव देता. तुमच्या या नव्या समाजव्यवस्थेत वैयक्तिक स्वार्थाचा विरोध शासनसंस्थेच्या स्वार्थाने केला जात असतो. आणि ही शासनसंस्था म्हणजे वस्तुतः शासन करणारे अधिकारीच असतात. या तुमच्या नव्या व्यवस्थेत शासनसंस्था ही सर्वश्रेष्ठ महत्त्वाची होऊन वसते, व्यक्ती नव्हे. या स्थिति-विरोधातून कालांतराने समन्वय उदयास येईल व या समन्वयात सर्व व्यक्तींना समान महत्त्व प्राप्त होईल, अशी तुमची कल्पना आहे. पण भावी कालातील तुमच्या व्यवस्थेचे हे स्वरूप सर्वस्वी काल्पनिक व केवळ ध्येयात्मकच आहे. तो केवळ तुमच्या विचारांचा प्रक्षेप आहे. पण हे विचार हे तर स्मृतीने किंवा पूर्वसंस्कारबद्धतेने परिस्थितीला दिलेले उत्तर असते. एकंदरीत हे सर्व केवळ एक दुष्ट चक्र आहे आणि या चक्रातून बाहेर पडण्याचा मार्गही नाही. तुमचा हा संघर्ष, विचाराच्या पिंजऱ्यातील तुमची ही धडपड हिलाच तुम्ही प्रगती हे नाव देत आहात.

"तर मग, सध्याच्या समाजव्यवस्थेत पिळवणुकीचे व भ्रष्टाचाराचे जे भयानक थैमान चालू आहे, त्यातच आम्ही सध्याप्रमाणे नेहमी खितपत पडावे, असे का आपले म्हणणे आहे?"

मुळीच नाही. पण तुमची ही जी क्रांती आहे, ती मात्र क्रांती मुळीच नव्हे, एवढे स्पष्ट आहे. तुमची ही क्रांती म्हणजे एका गटाच्या हातची सत्ता दुसऱ्या गटाच्या हाती जाणे. एका वर्गाऐवजी दुसऱ्या वर्गाची सत्ता प्रस्थापित होणे. तुमची ही क्रांती म्हणजे त्याच जुन्या आकृतिबंधामध्ये, त्याच जुन्या घटकांमधून एक वेगळी इमारत

उभी करणे होय. खरीखुरी मूलभूत स्वरूपाची अशीही क्रांती वस्तुतः असू शकते. पण या क्रांतीत संघर्ष नसतो, मनोनिर्मित प्रक्षेप, ध्येये, सिद्धवाक्ये व ठराविक आदर्श यांच्या कल्पनांवर ही क्रांती कधीही आधारलेली नसते. पण जेव्हा तुम्ही एका स्थितीत परिवर्तन घडवून आणण्याच्या दृष्टीने किंवा काहीतरी अधिक मोठे किंवा अधिक लहान वनविण्याच्या दृष्टीने किंवा एखादा विशिष्ट हेतू साध्य करण्याच्या दृष्टीने क्रांतीचा विचार करू लागता, तेव्हा मात्र मूलभूत स्वरूपाची क्रांती घडून येणे हे सर्वस्वी अशक्य होऊन वसते.

"पण आपण वर्णन करता तशा प्रकारची क्रांती ही तर एक अशक्यच गोष्ट आहे. आपण खरोखरच का अशा क्रांतीचा पुरस्कार करता?"

होय. तीच वस्तुतः खरीखुरी क्रांती असते. तेच मूलभूत परिवर्तन असते.

"पण अशी क्रांती आपण घडवून कशी आणणार?"

असत्यामधील असत्यत्व ध्यानात घेण्याने व असत्यातील सत्याचे दर्शन करून घेण्यानेच ती क्रांती घडवून आणता येईल. मूलभूत क्रांती जर कुठे घडून यावयास हवी असेल, तर ती मानवामानवांमधील परस्पर संबंधांतच. ही मूलभूत क्रांती घडून आलीच पाहिजे. मानवांची सध्याची जी अवस्था आहे, ती जर तशीच चालू राहिली, तर अधिकाधिक दुःखात व घोरतम विपत्तीत ती जगाला लोटल्यावाचून राहणार नाही, याची आपल्या सर्वांनाच पुरेपूर जाणीव होऊन चुकली आहे. पण सगळ्या तथाकथित क्रांतिकारकांसमोर काय, किंवा सुधारकांसमोर काय, एक विशिष्ट साध्य असते, एक ठराविक ध्येय त्यांना गाठावयाचे असते. आणि आपले हे साध्य किंवा ध्येय गाठण्यासाठी हे दोघेही मनुष्यांचा उपयोग केवळ एक साधन याच दृष्टीने करीत असतात. वस्तुतः विशिष्ट साध्य गाठणे हे मुळीच महत्त्वाचे नसते, तर एखादे साध्य गाठण्यासाठी मनुष्याचा साधन म्हणून उपयोग करावा काय हाच मुद्दा महत्त्वाचा असतो. साधन हे साध्यापासून वेगळे काढताच येत नसते. कारण साध्य-साधनप्रक्रिया ही अविभाज्य अशी एकरसात्मक प्रक्रिया असते. साधन हेच वस्तुतः साध्य असते. वर्गसंघर्षाचे साधन वापरून वर्गरहित समाजव्यवस्था आकारास येईल अशी अपेक्षा करणे हे सर्वस्वी अशक्य आहे. तथाकथित योग्य अशा साध्यासाठी अयोग्य साधन वापरण्याचा काय परिणाम होतो, हे अगदी उघड आहे. युद्धाच्या साधनाने किंवा युद्धाची तयारी करीत राहण्याने शांतता प्रस्थापित होणे कधीच शक्य नसते. सर्व परस्परविरोधी गोष्टी या नेहमी अहं- प्रक्षेपितच असतात. कोणतेही ध्येय ही वस्तु-स्थितीविरुद्ध होणारी प्रतिक्रियाच असते. आणि हे ध्येय गाठण्यासाठी केला जाणारा संघर्ष म्हणजे विचाराच्या पक्क्या पिंजऱ्यात केली जाणारी निष्फळ व काल्पनिक धडपडच असते. अशा संघर्षाच्या द्वारा मनुष्याला मुक्तता किंवा स्वातंत्र्य प्राप्त होणे सर्वस्वी अशक्य असते. वस्तुतः विमुक्ततेवाचून मानवाला सौख्य प्राप्त होणे शक्यच

नसते. पण विमुक्तता हे काही एखादे ध्येय नाही. विमुक्तता प्राप्त होण्यासाठी विमुक्तता हेच केवळ साधन असते. माणसाच्या मनाचा किंवा त्याच्या शरीराचा, जोपर्यंत केवळ एक साधन म्हणूनच उपयोग केला जात राहील–मग तो उपयोग देवाधर्माच्या नावाने केला जावो की शासनसंस्थेच्या नावाने केला जावो–तोपर्यंत जी जी समाजव्यवस्था आकारास आणली जाईल, ती ती हिंसेवरच आधारलेली राहील. आपल्या विशिष्ट साध्यासाठी मनुष्याचा साधन म्हणून उपयोग करण्याची युक्ती राजकारणी पुरुष व धर्माचे पुरोहित हे नेहमीच करीत आले आहेत. माणसाचा साधन म्हणून उपयोग करीत राहण्यान माणसामाणसांमध्ये खरेखुरे व अर्थपूर्ण नाते उदयास येणे अशक्य होऊन बसते.

"आपल्या म्हणण्याचा आशय काय आहे हे माझ्या ध्यानात आले नाही."

हे पाहा, ज्या वेळी आपण परस्परांच्या इच्छापूर्तीसाठी परस्परांचा साधन म्हणून उपयोग करून घेत असतो, त्या वेळी आपणामध्ये खरेखुरे नाते उत्पन्न होणे शक्य तरी असते का? जेव्हा आपल्या सुखासाठी आपण एखाद्या टेबलखुर्चीसारखा माणसाचा उपयोग करीत असतो, तेव्हा त्या माणसाशी आपले कसले तरी नाते असू शकते का? टेबलखुर्चीशी आपले काही नाते असते का? ही टेबलखुर्ची माझी आहे, एवढे फार तर तुम्ही म्हणू शकाल. पण तुमचे त्या वस्तूशी कसलेही नाते असू शकणार नाही. याचप्रमाणे जेव्हा आपल्या मानसिक फायद्यासाठी किंवा शारीरिक सुखासाठी दुसऱ्या व्यक्तीचा साधन म्हणून आपण उपयोग करतो, तेव्हा ती व्यक्ती आपली आहे असे तुम्ही म्हणता. त्या व्यक्तीवर आपली मालकी आहे, आपला हक्क आहे, असे तुम्ही मानता. पण एखाद्या व्यक्तीवर आपली मालकी असणे म्हणजे त्या व्यक्तीशी आपले खरे नाते असणे आहे का? शासनव्यवस्था ही नेहमी व्यक्तीचा उपयोग करून घेत असते. आणि व्यक्तीला मग ती नागरिक हे नाव बहाल करते. पण वस्तुतः शासन-व्यवस्थेचे व्यक्तीशी कसलेही नाते नसते. ती केवळ साधन म्हणून व्यक्तीचा उपयोग करून घेत असते एवढेच. साधन किंवा उपकरण ही नेहमी मृत किंवा जड वस्तू असते. आणि जड किंवा मृत वस्तूशी कुणाचेही नाते जडणे शक्य नसते. आपण जेव्हा मनुष्याचा उपयोग एक विशिष्ट साध्य गाठण्यासाठी करीत असतो–मग ते साध्य केवढेही उदात्त असो–तेव्हा केवळ साधन म्हणून, एक जड वस्तू म्हणून आपल्याला त्याचा उपयोग करून घ्यायला हवा असतो. जिवंत व्यक्तीचा साधन म्हणून उपयोग करून घेणे शक्य नसते. म्हणून जिवंत व्यक्तीमधील चैतन्य दडपून टाकून, तिला मृतवत बनवून तिचा आम्हाला उपयोग करून घ्यावयास हवा असतो. एकंदरीत जड वस्तूंचा उपयोग करून घेण्यावरच आपली समाजव्यवस्था आधारलेली आहे. आपण जेव्हा एखाद्या माणसाचा उपयोग साधन म्हणून करू लागतो तेव्हा आपल्या उद्दिष्टपूर्तीचे एक मृत, जड साधन असेच स्वरूप त्या माणसाला प्राप्त होते. तेथे कसलेही नाते असणे

शक्य नसते. कारण नाते हे जिवंतपणात, चैतन्यमयतेतच नांदू शकते. कुणाचाही उपयोग करीत राहणे, ही चिन्मयतेपासून दूर जाण्याची, विभक्त होण्याची प्रक्रिया असते. अशा या प्रक्रियेमुळेच माणसामाणसांत संघर्ष व वैरभाव उत्पन्न होत राहतो.

"आपण नात्यांवर, माणसातील परस्परसंबंधांवर एवढा जोर का बरे देत आहात ?"

हे पाहा, जिवंत असणे म्हणजेच तर संबंधित असणे होय. समाज म्हणजेच परस्पर-संबंध. पण परस्परांचा केवळ उपयोग करून घेण्यावरच आपली सध्याची समाज-व्यवस्था आधारलेली असल्यामुळे ती संबंधशून्य बनून गेली आहे. आणि हिंसा, विनाश व विपत्ती यांचीच ती निर्मिती करीत आहे. परस्परांचा उपयोग करीत राहण्याचा हा जो प्रघात आजवर चालू आहे, त्याच्यामध्ये, तुमच्या या तथाकथित क्रांतिकारी शासनसंस्थेने जर मूलभूत परिवर्तन घडवून आणले नाही, तर त्याही समाजव्यवस्थेचे पर्यवसान हे, वेगळ्या पातळीवर का होईना, पण अधिकाधिक संघर्ष, वैरभाव व संभ्रम यांच्यामध्येच होईल. जोवर माणसांना परस्परांची मानसिकदृष्ट्या गरज वाटत राहील व जोवर ती परस्परांचा या गरजेसाठी उपयोग करून घेत राहतील, तोवर त्यांच्यामध्ये खरेखुरे जिवंत नाते असूच शकणार नाही. परस्परांमधील सहज सुसंवाद म्हणजेच परस्परातील नाते. पण एकजण जर दुसऱ्याचा केवळ उपयोग करून घेत राहील, स्वतःसाठी त्याची पिळवणूक करीत राहील, तर त्या उभयतांमध्ये सुसंवाद कसा निर्माण होईल ? मनुष्य दुसऱ्यांची जी पिळवणूक करीत असतो, तिच्यामागे दुसऱ्याविषयीचे भय दडलेले असते आणि या भयाची परिणती अपरिहार्यपणेच नाना प्रकारच्या आभासात व दुःखात होत राहते. एकं दुसऱ्याची पिळणूक करू लागला म्हणजेच संघर्ष उत्पन्न होतो, परस्परांमधील सुसंवादी नात्यामुळे नव्हे. मनुष्य जेव्हा स्वतःच्या सुखासाठी वा उद्दिष्टपूर्तीसाठी दुसऱ्याचा साधन म्हणून उपयोग करतो, तेव्हा उभयतांमध्ये विरोध, संघर्ष व वैरभाव उत्पन्न होतो. अशा संघर्षाचा उपयोग एखाद्या स्व-प्रक्षेपित उद्दिष्टासाठी साधन म्हणून केला गेला, तर त्यामुळे तो संघर्ष केव्हाही नाहीसा केला जाणार नाही, ही गोष्ट अगदी स्पष्ट आहे. आणि सर्व प्रकारची ध्येये व आदर्श समाजरचना हे सारे अखेर मनाचे प्रक्षेपच असतात. या गोष्टीची स्पष्ट जाणीव करून घेणे हे अतिशय महत्त्वाचे आहे. कारण अशी यथार्थ जाणीव झाली, तरच सत्याचे प्रत्यक्ष दर्शन घडेल. हे सत्य म्हणजे, कोणत्याही प्रकारच्या संघर्षामुळे परस्परातील जिवंत नात्याचा व त्याच्या यथार्थ आकलनाचा पूर्ण विनाश घडून येतो, हे होय. या गोष्टीचे दर्शन घडणे म्हणजेच सत्याचे दर्शन घडणे होय. मन जेव्हा शांत, निःस्तब्ध होते तेव्हाच यथार्थाचे आकलन होत असते. पण मन जोवर एखाद्या विचारप्रणालीत, एखाद्या सिद्धवचनात किंवा एखाद्या निष्ठेत अडकून बसलेले असते, किंवा जोवर ते स्वतःच्याच स्मृतींच्या किंवा अनुभवांच्या साच्यात जखडले

गेले असते, तोवर ते शांत निःस्तब्ध होणे शक्य नसते. मन हे जोवर कुणीतरी विशेष होण्यामागे किंवा काहीतरी संपादन करण्यामागे लागलेले असते तोवर ते शांत, स्तब्ध नसते. कारण संपादन करीत राहणे म्हणजेच संघर्षात गुरफटून पडणे होय. आणि कुणीतरी विशेष होत राहणे म्हणजे स्वतःला जीवनापासून तोडून टाकणे होय. मन जोवर विशिष्ट शिस्तीने वद्ध केले गेलेले असते, संयमित वनविले गेले असते, अवरुद्ध वनविले गेले असते, तोवर ते शांत, स्तब्ध असे कधीही असत नाही. असे अवरुद्ध मन हे मृत मन असते. वेगवेगळ्या प्रकारच्या प्रतिकाराच्या साधनांनी ते स्वतःला जीवनापासून तोडून टाकीत असते, विभक्त वनवीत असते. आणि याचमुळे ते स्वतःला दुःखी वनवून टाकीत असते आणि दुसऱ्यांनाही दुःखी वनवीत असते.

मन जेव्हा स्वतःच्याच व्यापारांच्या जाळ्यात, म्हणजे स्वतःच्या विचारात अडकलेले नसते, तेव्हाच ते शांत होते. ते जेव्हा अशा रीतीने शांत होते, जवरीने शांत केले जात नाही, तेव्हाच खरेखुरे नवे असे काही उदित होते; प्रीती उदयास येते.

प्रयत्न

पावसाला सुरुवात अगदी हलकेच झाली. पण एकाएकी एवढ्या विलक्षण जोरदार सरी बरसू लागल्या! आकाशाने जणू काय सहस्रधारांनी वरसून धरणीवर जलमय प्रलयच करून टाकला. रस्त्यांवरून गुडघागुडघा पाणी साचले आणि वाजूच्या पदपथांवरही बरेचसे जमले. झाडांच्या पानात आता किंचितही हालचाल होत नव्हती. जणू काही तीही या अचानक जलवर्षावाने विस्मयचकित होऊन निःस्तब्ध बनून गेली होती. बाजूने येणारी एक मोटर एंजिनात पाणी शिरल्यामुळे एकदम जागच्याजागी थवकली. रस्त्यातील सर्व लोक चिंब भिजत पाण्यातून चालले होते. पण या अचानक झालेल्या जोरदार जलवर्षावाने सगळे आनंदित झाल्यासारखे दिसत होते. बागेतील फुलांचे ताटवे पावसाने धुवून निघत होते. आणि राखीव हिरवळीवर तर वीतवीत पाणी साचले होते. दाट निळ्या रंगाचा एक पक्षी झाडाच्या पानांचा आश्रय घेऊ पाहत होता. पण त्याचे भुरकट निळे पंख ओल्याचिंब पानांमुळे अधिकच ओले होऊ लागले. त्यामुळे तो ते सारखे फडफडून झाडून टाकू लागला. पावसाचा हा जोराचा वर्षाव जसा अचानक सुरू झाला, तसाच अचानक तो थांबूनही गेला. पण त्याच्यामुळे अखिल वस्तुजात स्वच्छ धुवून निघाली.

निरागस, निष्पाप असणे हे वस्तुतः किती साधे, किती सहज असते! निरागसता अंगी असल्यावाचून माणसाला सुखी होणे अशक्य आहे. पण हे निरागसतेमुळे निर्माण होणारे सौख्य म्हणजे संवेदनांच्या द्वारा प्राप्त होणारा संतोष मुळीच नव्हे. गतानुभवांच्या ओझ्यातून पूर्ण विमुक्त होऊन जाणे, म्हणजेच निरागस असणे होय.क्षणाक्षणाला काही ना काही साक्षात अनुभवीत राहणे, हे माणसाला कधीच भ्रष्ट करीत नसते, तर गतानुभूतींची स्मृती हीच त्याला भ्रष्ट करण्यास व त्याची निरागसता नष्ट करून टाकण्यास कारणीभूत होत असते. ज्ञानाचा किंवा गतानुभूतींचा भार वाहत राहणे म्हणजेच भ्रष्ट होऊन जाणे होय. काहीतरी संपादन करीत राहण्यासाठी खर्ची पडणाऱ्या शक्तीमुळे व कुणीतरी विशेष होण्यासाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांमुळे माणसाचे निरागसत्व नष्ट होऊन जात असते. पण अशा या निरागसतेवाचून सुजाणपण उदयास तरी कसे येईल? जे लोक केवळ कुतूहलाने प्रेरित झालेले असतात, त्यांच्यात सुजाणपण येणे अशक्य असते. अशा लोकांना ज्याच्याविषयी कुतूहल असते, ती वस्तू त्यांना प्राप्त होईलही. पण ही प्राप्त झालेली वस्तू हे सत्य कधीच असणार नाही. संशयग्रस्त लोकांना सौख्य कधीच प्राप्त होऊ शकणार नाही. कारण स्वतःविषयींच्या चिंतेमुळेच त्यांची वृत्ती संशयी बनत असते. स्वतःविषयीची ही चिंता किंवा भीतीच माणसाला भ्रष्ट बनवून टाकीत असते. पण भीतिरहितता असणे म्हणजे धैर्य किंवा

शौर्य असणे मुळीच नव्हे. काहीही संपादन करण्याच्या इच्छेपासून पूर्ण विमुक्त असणे म्हणजेच भीतीरहित असणे होय.

भेटीस आलेला गृहस्थ सांगत होता, "जगात पुढे पुढे जाण्यासाठी जेवढे म्हणून प्रयत्न करणे शक्य आहे, तेवढे सारे मी आजवर केले. आणि मी आता चांगलाच धनवंत वनलो आहे. धन मिळवण्यासाठी मी जे जे प्रयत्न केले, त्या सर्वांचे पुरेपूर फळ माझ्या पदरात पडले आहे. माझे कौटुंबिक जीवनही सुखी वनविण्याचा मी खूप प्रयत्न केला. पण यातून काय हाती पडते हे आपण जाणताच. कौटुंबिक जीवनात सफलता प्राप्त करून घेणे हे धन मिळविण्यात सफल होण्यासारखे किंवा एखादा कारखाना चालवून दाखविण्यासारखे काही नसते. तसेच पाहिले, तर व्यवसाय-धंद्यातही माणसांशीच संबंध येत असतो. पण तो संबंध अगदी वेगळ्या स्तरावरचा संबंध असतो. कौटुंबिक जीवनातील संबंध असे नसतात. आज माझ्या कौटुंबिक जीवनात विशेष काही कारण न घडताही वराच संघर्ष माजला आहे. आणि या बाबतीत मी जे जे प्रयत्न करतो, त्यांच्यामुळे तो अधिकच वाढत चालला आहे, असे मला दिसून येत आहे. अर्थात या बाबतीत कसलीही तक्रार करण्याचा काही माझा उद्देश नाही. कारण तो माझा स्वभाव नाही. पण विवाहसंस्थेत एकूण कुठेतरी चुकले आहे असे मात्र मला निश्चित वाटते. परस्परांची काही विशेष माहिती नसताही केवळ लैंगिक भूक भागविण्यासाठीच विवाह केले जातात आणि पतिपत्नी हे एकाच घरात राहत असले व कधीकधी जाणून सवरून प्रजोत्पत्तीही करीत असले तरी ते परस्परांना पूर्ण अपरिचित असेच राहतात. त्यांच्या संबंधामध्ये जो एक प्रकारचा तणाव सारखा चालू असतो, तो केवळ तेच जाणोत. पती या नात्याने माझे जे कर्तव्य आहे, ते मी आजवर करीत आलो आहे. पण त्यातून फलनिष्पत्ती अशी काहीच झालेली नाही असे मला आढळून आले आहे. आम्हा दोघाही पतिपत्नींची वृत्ती आक्रमक स्वरूपाची व प्रभुत्व गाजविणारी अशी आहे. त्यामुळेच काम कठीण होऊन बसले आहे. परस्परांशी सहकार्य करण्याचे आम्ही कितीही प्रयत्न केले, तरी त्याच्यातून उभयतांमध्ये सखोल स्नेहाची भावना मात्र निर्माण झाली नाही. मानसशास्त्राचा मला थोडावहुत परिचय आहे व मानसिक समस्या जाणून घेण्याची कल्पना मला आवडली आहे. पण याचा मला स्वतःच्या वाबतीत विशेष काहीही फायदा झालेला नाही. म्हणून या समस्येच्या गाभ्यात शिरून शोध घेण्याची माझी इच्छा आहे."

सूर्य ढगांमधून नुकताच वाहेर डोकावत होता. पक्ष्यांचे परस्परांना आवाहन चालू होते. वादळ निवळल्यानंतरचे आकाश आता निरभ्र व नितळ निळे वनले होते.

प्रयत्न या शब्दाने तुम्हाला काय ध्वनित करावयाचे आहे?

"कशासाठी तरी झटत राहणे हा प्रयत्न या शब्दाचा माझा अर्थ आहे. पैशासाठी व प्रतिष्ठेसाठी मी आजवर झटत आलो आहे. आणि ही दोन्हीही मी प्राप्त करून

घेतली आहेत. कौटुंबिक जीवन सुखी वनविण्यासाठीही मी झटत आलो आहे. पण येथे मात्र मला फारशी सफलता लाभलेली नाही. म्हणून आता मी अधिक गहन असे काही प्राप्त करून घेण्यासाठी झटत आहे."

आपण सर्वचजण एखादे उद्दिष्ट गाठण्यासाठी सदैव झटत असतो. काहीतरी प्राप्त करून घेण्यासाठीच आपण यत्न करीत असतो. सांसारिक किंवा परिव्राजिक दृष्टीने कुणीतरी विशेष होण्यासाठी आपण भावात्मक वा अभावात्मक असे प्रयत्न सतत करीत असतो. कुठल्यातरी गोष्टीत स्वतःला सुरक्षित वनविण्यासाठी, काही तरी गाठण्यासाठी किंवा कशापासून तरी परावृत्त होण्यासाठी आपला अखंड प्रयत्न चाललेला असतो. प्रयत्न म्हणजे काहीतरी प्राप्त करून घेण्यासाठी चाललेला अविरत संग्राम; होय की नाही?

"पण काहीतरी प्राप्त करून घेणे हे चुकीचे आहे का?"

त्याचा आपण जरा वेळाने विचार करू. पण प्रथम हे ध्यानात घ्या की, ज्याला आपण प्रयत्न हे नाव देतो, ते दुसरे तिसरे काही नसून, कुठले तरी उद्दिष्ट गाठण्यासाठी व कृतार्थ होण्यासाठी वेगवेगळ्या दिशांनी चाललेली ती धडपडच असते. एक गोष्ट प्राप्त झाली की, आपल्याला तिचा कंटाळा येतो. आणि मग आपण दुसरीच्या मागे लागतो. तीही प्राप्त झाली की, तिसरीच्या मागे धावतो. प्रयत्न म्हणजे अधिकाधिक मिळवीत राहण्याची प्रक्रिया; मग ते प्राप्तव्य म्हणजे ज्ञान असो, अनुभूती असो, किंवा कार्यक्षमता असो; किंवा सद्गुण, मालमत्ता अगर सत्ता इत्यादी गोष्टी असोत. या अधिक मिळविण्याच्या, वाढविण्याच्या किंवा उत्पन्न करण्याच्या प्रक्रियेला अंतच नसतो. विशिष्ट उद्दिष्टाच्या दिशेने असा प्रयत्न करीत राहण्यामुळे संघर्षावाचून दुसरे काहीही निष्पन्न होणे शक्य नसते; मग हे उद्दिष्ट योग्य प्रकारचे असो की, अयोग्य प्रकारचे असो. अशा प्रयत्नातून उत्पन्न होत राहणारा संघर्ष म्हणजेच विरोध, प्रतिकार किंवा वैरभाव. पण या सर्व गोष्टींची खरोखर काही गरज आहे का?

"कशासाठी गरज?"

तेच आता आपण शोधून पाहू या. भौतिक पातळीवरचा प्रयत्न हा आवश्यक असेल. एखादा पूल बांधण्यासाठी, किंवा कोळसा, पेट्रोल इत्यादी खनिजे भूमीतून खणून काढण्यासाठी करावा लागणारा प्रयत्न हा कल्याणकारी असेलही. पण हे काम कशा रीतीने केले जात आहे, वस्तू कशा तऱ्हेने उत्पन्न करण्यात येत आहेत, त्यांचे वितरण कशा प्रकारे होत आहे, त्यातून मिळणारा नफा कशा प्रमाणात वाटला जात आहे या सगळ्या गोष्टी अगदी वेगळ्या पातळीवरच्या आहेत. शारीरिक व भौतिक पातळीवर मनुष्याचा उपयोग एखाद्या उद्दिष्टासाठी किंवा ध्येयासाठी केला गेला– मग तो शासनसंस्थेकडून केला जावो की खासगी उद्योगपतींकडून केला जावो–तर अशा प्रयत्नांमुळे अधिक गोंधळ व अधिक दुःखदैन्यच वाढत राहते. काहीही

मराठी ग्रंथ ... ठाणे. स्थलांक
प्रकाश ... दिः ...
२२०० ... दिः २/१२/०२

मिळविण्याचा प्रयत्न–मग तो व्यक्तीसाठी केला जावो की शासनसंस्थेसाठी वा धार्मिक संस्थेसाठी–हा केवळ विरोध वाढविण्यासच कारणीभूत होत असतो. प्राप्तव्यासाठी धडपडत राहणारे मानवी मन ही काय वस्तू आहे, याचे जोवर यथार्थ आकलन केले जात नाही, तोवर भौतिक पातळीवर केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचाही एकूण समाजावर भयानक परिणाम झाल्यावाचून राहणार नाही.

हा जो मानसिक पातळीवरील प्रयत्न आहे, कुणीतरी विशेष होण्यासाठी, काहीतरी संपादन करण्यासाठी, किंवा कशात तरी यशस्वी होण्यासाठी हा जो सतत प्रयत्न केला जात असतो, तो खरोखर आवश्यक आहे का? आणि तो मानवी जीवनाला कल्याणप्रद ठरणारा आहे का?

"पण आपण जर असा प्रयत्न करीत राहिलो नाही तर आपण निष्क्रिय व अवरुद्ध अवस्थेतच कुजत सडत राहणार नाही का? आपल्या जीवनाचा यामुळे ऱ्हासच होत जाणार नाही का?"

खरोखरच का आपला ऱ्हास होईल? आजवर माणसांनी मानसिक पातळीवर जो अव्याहत प्रयत्न चालविला आहे, त्यांचा आज काय परिणाम झाला आहे, सांगा बरे?

"विशेष परिणाम झाला नाही हे मला मान्य आहे. पण आजवर हा सारा प्रयत्न चुकीच्याच दिशेने होत आलेला आहे. प्रयत्नाची दिशा ही महत्त्वाची असते. योग्य दिशेने केला जाणारा प्रयत्न हा सार्थ प्रयत्न असतो. आजवर प्रयत्न योग्य दिशेने केला गेला नाही, म्हणूनच तर आपण आज या दुरवस्थेप्रत आलो आहोत."

तेव्हा प्रयत्न हा योग्य किंवा अयोग्य प्रकारचा असतो, असे तुमचे म्हणणे दिसते. पण शब्दांचा व्यर्थ काथ्याकूट करण्याचे आपण सोडून देऊ या. योग्य व अयोग्य स्वरूपाचा प्रयत्न यांच्यात तुम्ही काय भेद करता? कोणत्या निकषाच्या आधाराने तुम्ही याचा निर्णय करता, याबाबत मानदंड कोणता आहे? आजवरची परंपरा हा मानदंड आहे की, भविष्यातील आदर्श हा आहे?

"इष्ट फलनिष्पत्ती हाच माझा मानदंड आहे. इष्ट परिणाम घडवून आणणे हेच खरोखर महत्त्वाचे आहे. आणि असा परिणाम घडवून आणण्यासाठी विशिष्ट साध्याचे प्रलोभन समोर ठेवल्याशिवाय मनुष्य प्रयत्नशील होणारच नाही."

इष्ट परिणाम घडवून आणणे हाच जर तुमचा मानदंड असेल, तर त्याच्यासाठी साधने कोणती वापरायची याबद्दल तुमचा कसलाही आग्रह नसावा. सांगा बरे, आग्रह आहे का ते?

"हे पाहा, उद्दिष्ट जसे असेल, तशा प्रकारची साधने मी वापरीन. सौख्य हे जर माझे उद्दिष्ट असेल तर सुखद स्वरूपाची साधने मला शोधलीच पाहिजेत."

पण सुखद स्वरूपाची साधने म्हणजे सौख्यसिद्धी नव्हे का? साध्य हे तर साध-

नातच निहित असते; होय की नाही? तेव्हा अखेर साधने हीच काय ती महत्त्वाची ठरतात. साधन हेच वस्तुतः साध्य असते; तोच इष्ट परिणाम किंवा शेवट असतो.

"आजवर मी या गोष्टीकडे या दृष्टीने कधीच पाहिले नव्हते. पण आपण सांगता तेच खरे आहे, असे मला आता दिसून येत आहे."

हे पाहा, सुखमय साधने कोणती, याचा आता आपण शोध घेऊ पाहत आहोत. आपल्या सगळ्या प्रयत्नांतून जर संघर्षच निर्माण होत असेल, आत व बाहेर विरोधच माजत असेल, तर अशा प्रयत्नांमुळे सौख्य कधीतरी गाठता येणे शक्य आहे का? साध्य किंवा शेवट हा जर साधनातच निहित आहे, तर संघर्ष व विरोध निर्माण करणाऱ्या साधनातून सौख्य कसे बरे निर्माण होऊ शकेल? प्रयत्न करण्याने अधिक समस्या व अधिक संघर्ष हेच जर वाढत राहणार असतील, तर प्रयत्न हे विनाशक व विघटक असेच असतात, ही गोष्ट स्पष्टच नाही का होत? पण आपण प्रयत्न तरी का बरे करीत असतो? अधिक लाभासाठी, अधिक अभ्युदयासाठी किंवा स्वतःचे महत्त्व अधिक वाढविण्यासाठीच आपण प्रयत्न करीत नसतो का? एका दिशेने अधिक काही मिळविण्यासाठी व दुसऱ्या दिशेने अधिक काही घटविण्यासाठीच माणसाकडून प्रयत्न होत असतो. स्वतःसाठी किंवा स्वकीय समूहासाठी काहीतरी विशेष प्राप्त करून घेणे हीच अभिलाषा प्रयत्न करण्यामागे असते; होय की नाही?

"असे आहे खरे. स्वतःसाठी काही प्राप्त करून घेण्याची व्यक्तीची जी अभिलाषा असते, तिचेच वेगळ्या पातळीवरचे स्वरूप म्हणजे शासनसंस्थेसाठी किंवा धर्मसंस्थेसाठी काही प्राप्त करून घेण्याची अभिलाषा."

प्रयत्न करणे म्हणजे काहीतरी सतत संपादन करीत राहणेच होय; मग हे संपादन भावात्मक असो वा अभावात्मक असो. आपण सर्वजण कशासाठी बरे हे संपादन करीत असतो? एकीकडे, एका पातळीवर भौतिक गरजेच्या गोष्टी प्राप्त करून घेणे चाललेले असते. आणि याच गोष्टींचा उपयोग करून दुसऱ्या पातळीवर आपण आपला स्वार्थविस्तार करीत असतो. किंवा थोड्याशाच भौतिक सुखसोयींवर संतुष्ट राहून आपण सत्ता, प्रतिष्ठा वा कीर्ती यांचा लाभ करून घेत असतो. शासनसंस्थेचे जे प्रतिनिधी वा शासक असतात, त्यांची राहणी वास्तवतः साधी असेल आणि त्यांच्यापाशी वस्तूही फारच थोड्या असतील, पण त्यांच्या हाती सत्ता आलेली असते. त्यामुळे ते आपल्या सर्व विरोधकांचा प्रतिकार करीत राहतात आणि सर्वांवर प्रभुत्व गाजवीत राहतात.

"मग सर्वच प्रकारचे संपादन हे विनाशक आहे, असे का आपले म्हणणे आहे?"

ते आता आपण पाहू या. आवश्यक त्या भौतिक गरजा पुरविण्यास लागणारी निश्चिततेची शिदोरी ही गोष्ट सर्वस्वी वेगळी. आणि लोभीपणा ही गोष्ट सर्वस्वी वेगळी. आज वंशाच्या, देशाच्या, ईश्वराच्या किंवा व्यक्तीच्या नावावर जो

लोभीपणा, जो हावरेपणा सगळीकडे धुमाकूळ माजवीत आहे, त्याच्यामुळेच सर्व मानवांच्या स्वास्थ्यासाठी अवश्य असणाऱ्या भौतिक गरजेच्या गोष्टी पुरविणाऱ्या कार्यक्षम व सुजाण संघटना धुळीस मिळविल्या जात आहेत. प्रत्येक मनुष्याला योग्य ते अन्न, वस्त्र व निवारा मिळाला पाहिजे, ही गोष्ट अगदी स्पष्टच आहे. पण या आवश्यक गोष्टींशिवाय आपण काहीतरी अधिक मिळविण्यामागे लागत असतो.

सत्ता प्राप्त करून घेण्याचे साधन या दृष्टीने मनुष्य पैसा मिळवीत राहतो. आणि पैसा हे सामाजिक व मानसिक संतोष मिळविण्याचेही साधन असते. तसेच वाटेल ते करण्याचे स्वातंत्र्य मिळविण्याचेही ते साधन असते. पैसा व प्रतिष्ठा मिळविण्यासाठी माणूस सारखा धडपड करीत असतो. कारण, त्यांच्या साह्याने त्याला नाना तऱ्हांनी इतरांवर प्रभुत्व गाजविता येत असते. अशा रीतीने वाह्य गोष्टींच्या बाबतीत एकदा सफलता प्राप्त झाली की, मग माणसाला तुम्ही आरंभी उल्लेखिलेल्या आंतरिक गोष्टींमध्येही सफलता मिळवावीशी वाटते.

आता आपण सत्ता वा प्रभुत्व या शब्दाने काय ध्वनित होते ते पाहू या. सत्ताधारी असणे म्हणजे दुस यावर प्रभुत्व गाजविता येणे, त्यांना जिंकता येणे, दडपून टाकता येणे, स्वतःला श्रेष्ठ समजणे, स्वतःला विशेष कार्यक्षम गणणे इत्यादी. मनुष्य लौकिक जगात वावरणारा असो की तापसी वा संन्यासी असो त्याला जाणता वा अजाणता सत्तेचे हे आकर्षण वाटू लागते व ती मिळविण्यासाठी तो प्रयत्न करू लागतो. सत्ता हे मनुष्याच्या आत्माविष्काराचे संपूर्ण असे स्वरूप असते; मग ती सत्ता ज्ञानामुळे मिळो, आत्मसंयमनामुळे प्राप्त होवो, लौकिक स्वरूपाची असो किंवा कशाच्या तरी परित्यागामुळे मिळालेली असो. आपल्या हाती सत्ता आहे, आपण इतरांवर प्रभुत्व गाजवू शकतो, या भावनेमुळे माणसाला एक विलक्षण अशी इच्छापूर्ती लाभत असते. माणसे आपली इच्छापूर्ती नाना प्रकारांनी करून घेत असतात. कुणी सत्तेच्या द्वारा ही पूर्ती मिळवील, तर कुणी मदिरासेवनाने मिळवील. कुणी ईश्वराच्या भजन-पूजनाने मिळवील, तर कुणी ज्ञानसंपादनाने मिळवील. यांच्यापैकी प्रत्येक प्रकारच्या संपादनाचा सामाजिक किंवा मानसिक परिणाम वेगवेगळा असू शकेल; पण अखेर सर्व प्रकारचे संपादन म्हणजे इच्छापूर्ती करून घेणेच होय. इच्छापूर्ती कोणत्याही पातळीवरील असली, तरी अखेर ती सुखद संवेदनपूर्तीच असते; होय की नाही? अधिकाधिक सूक्ष्म स्वरूपाचे सुखद संवेदन प्राप्त करून घेण्यासाठीच वस्तुतः आपण सर्वजण झटत असतो. एखाद्या वेळी या संवेदनपूर्तीला आपण अनुभव हे नाव देतो, तर कधी तिला ज्ञानसंपादन म्हणतो; कधी तिला प्रीती हे नाव देतो, तर कधी सत्याचा शोध किंवा ईश्वराचा शोध हे उदात्त नाव वहाल करतो. या संवेदनपूर्तीची आणखीही विविध रूपे असतात. नीतिपरायण असणे किंवा एखाद्या विचारप्रणालीचा कर्तृत्वशाली प्रतिनिधी असणे हेही संवेदनपूर्तीचेच रूप आहे. माणसाचा प्रयत्न

हा नेहमी इच्छापूर्तीसाठीच असतो. आणि इच्छापूर्ती म्हणजे संवेदनपूर्तीच होय. तुमच्या बाबतीत सांगायचे तर, एका पातळीवर तुम्हांला इच्छापूर्ती लाभल्यामुळे आता दुसऱ्या पातळीवरही तुम्ही ती मिळवू पाहत आहात. याही पातळीवर जर तुम्हांला इच्छापूर्ती लाभली, तर आणखी तिसऱ्या पातळीवर ती मिळविण्यासाठी तुम्ही धडपड कराल. आणि अशा रीतीने ही इच्छातृप्तीची श्रेणी अव्याहत चालूच राहील; इच्छापूर्तीची ही अखंड अभिलाषा, अधिकाधिक सूक्ष्म स्वरूपाच्या संवेदनपूर्तीची ही लालसा, प्रगती या नावाने ओळखली जात असते. पण वस्तुतः तो अविरत चालू राहणारा संघर्षच असतो. इच्छापूर्तीसाठी चालणाऱ्या या वाढत्या प्रमाणावरील शोधाला कधीही अंत नसतो. म्हणूनच या शोधामुळे उत्पन्न होत राहणाऱ्या संघर्षाला व वैरभावालाही अंत नसतो. आणि म्हणूनच येथे सौख्य नांदणे अशक्य असते.

"आपल्या सांगण्यातील मुद्दा माझ्या ध्यानात आला आहे. इच्छापूर्तीसाठी केला जाणारा कोणत्याही प्रकारचा शोध, हा वस्तुतः दुःखाचाच शोध आहे, असे आपण सांगत आहात. तसेच इच्छापूर्तीसाठी होणारा प्रयत्न म्हणजे दुःखाला शाश्वतता मिळवून देणाराच प्रयत्न होय, असा आपल्या म्हणण्याचा आशय दिसतो. पण मग माणसाने करावे तरी काय? इच्छापूर्तीसाठी प्रयत्न करणे सोडून देऊन, निष्क्रिय बनून कुजत सडत पडावे काय?"

माणसाने जर इच्छापूर्तीच्या मागे लागणे सोडून दिले, तर तो निष्क्रिय बनून कुजतच पडणार, ही गोष्ट अपरिहार्य अशीच आहे का? क्रोधशून्य अवस्था ही निर्जीव किंवा चेतनाशून्य अवस्था असते का? कोणत्याही पातळीवरील इच्छापूर्ती म्हणजे सुखद संवेदनपूर्तीच असते, हे उघडच नाही का? आणि संवेदनाची सूक्ष्मता किंवा संस्कारिता म्हणजे केवळ शाब्दिक विकल्पनच नव्हे का? आपल्या जीवनात शब्दाला, नावाला, प्रतीकाला किंवा प्रतिमेला विलक्षण माहात्म्य प्राप्त झाले आहे, होय की नाही? माणूस शारीरिक दृष्टीने स्पर्शतृप्तीचा त्याग करीलही. पण मग त्याला शब्द व प्रतिमा यांच अतिशय महत्त्वाच्या वाटू लागतील. एकीकडे, एका पातळीवर आपण अगदी स्थूल स्वरूपाच्या साधनातून इच्छापूर्ती करून घेत असतो. आणि दुसरीकडे, दुसऱ्या पातळीवर अधिक सूक्ष्म व अधिक संस्कारित स्वरूपाच्या साधनातूनच इच्छापूर्ती करून घेऊ इच्छितो. पण वस्तुस्थिती अशी आहे की, ज्या हेतूने आपण वस्तूंचा संग्रह करीत असतो, त्याच हेतूने आपण शब्दांचाही संग्रह करीत असतो; असेच आहे की नाही? पण आपण असा हा संग्रह का बरे करीत राहतो?

"भला वाटते की, आपण इतके असंतुष्ट असतो, आपल्याला स्वतःचाच इतका कंटाळा येत असतो, की स्वतःच्या या कंटाळवाण्या, उथळ स्वरूपापासून दूरदूर पळण्यासाठी आपण काय वाटेल ते करीत राहतो. ही खरीच वस्तुस्थिती आहे आणि

मी स्वत:ही याच अवस्थेत आहे, ही गोष्ट आताच माझ्या लक्षात आली आहे. किती विलक्षण आहे हे सारे!"

आपले सर्वच प्रकारचे संपादन हे वस्तुत: स्वत:चा रितेपणा झाकून टाकण्याचेच साधन असते. आपली मने आतून पोकळ असणाऱ्या ढोलक्यासारखी असतात कुणाच्याही हाताची त्याच्यावर थाप पडली, की हे ढोलके मोठ्याने वाजू लागते. आपल्या रितेपणापासून दूर जाण्यासाठी आपण ज्या विविध पळवाटा शोधतो, त्या आपल्याला कधीही संतोष मिळवून देत नसतात. आणि त्यांच्यामध्ये चालणाऱ्या संघर्षामुळे तर आपले दु:खच सारखे वाढत राहते. हेच आपल्या जीवनाचे स्वरूप असते. खऱ्या अर्थाने आपण कधीच एकाकी नसतो, ही गोष्ट खरोखर आश्चर्यकारक नाही का? आपल्याला नेहमी कशाची तरी संगत वा सहवास हवा असतो. आपल्याला एखाद्या समस्येची तरी संगत हवी असते, एखाद्या पुस्तकाची तरी हवी असते किंवा एखाद्या माणसाची तरी. वरे, आपण एकटे असलोच, तरी आपले विचार हे आपली संगत करीत असतात. वस्तुत: एकाकी राहणे, संपूर्णपणे नग्न असणे, अंतर्बाह्य आवरणशून्य असणे हे अत्यावश्यक असते. आपल्या साऱ्या पळवाटा नाहीशा झाल्या पाहिजेत. आपले सर्व प्रकारचे संपादन, कशाकडे तरी प्रवृत्त होण्याचे किंवा कशापासून निवृत्त होण्याचे सर्व प्रकारचे प्रयत्न थांबले पाहिजेत. अशा अवस्थेतच तो संपूर्ण एकाकीपणा अस्तित्वात येतो. आणि या एकाकीपणातच ते अभेय, ते अनंत ते एकलेएक प्रवेश करते.

"पण मनुष्य ज्या पळवाटा शोधीत राहतो, त्या त्याला बंद कशा करता येतील?'

सत्य काय आहे हे आकळून घेण्याने. सर्व प्रकारच्या पळवाटा या माणसाला दु:खाकडे व संभ्रमाकडेच खेचीत राहतात, हे सत्य आकळून घेण्याने. सत्यदर्शन हेच माणसाला मुक्तता मिळवून देत असते. यासाठी त्याला दुसरे-तिसरे काहीही करावे लागत नाही. तुम्ही पळवाटा जर मुद्दाम बंद कराल, तर हे मुद्दाम बंद करणे, हीच तुमची पळवाट होऊन बसेल. अक्रियतेची सर्वोच्च अवस्था म्हणजेच सत्यदर्शनाने घडून येणारी कृती.

भक्ती आणि पूजन

वाटेने जात असता एक आई मुलाला वडवीत असलेली दिसली. मुलाच्या हृदय पिळवटणाऱ्या किंकाळ्या ऐकू येत होत्या. आई मुलावर अतिशय संतापलेली दिसत होती व त्या भरात एकीकडे त्याला हाताने मारीत असता, दुसरीकडे शब्दांनीही ती त्याला वडवीत होती. थोड्या वेळाने आम्ही जेव्हा परत आलो, तेव्हा तीच आई मुलाला कुरवाळीत असलेली दिसली. त्याला ती प्रेमाने इतकी घट्ट आवळून धरीत होती की त्याचा जीव गुदमरेल की काय असे वाटत होते. तिचे डोळे आसवांनी डबडबलेले होते. आणि मूल विचारे वावरून गेले होते. पण तरीही ते आईकडे पाहून हसत होते.

प्रीती ही खरोखर एक विलक्षण वस्तू आहे! पण प्रीतीची ज्योत आपण किती लवकर मालवून टाकीत असतो. ज्योत मालवली जाते आणि धूर मात्र शिल्लक राहतो. हा धूरच मग आपले मन व हृदयही भरून टाकीत असतो. आणि नंतर आसवांच्या पुरात व कटू स्मृतींच्या भारात आपले दिवस रेंगाळत राहतात. प्रीतीचे गीत विस्मृतीत विरून जाते आणि प्रीतीचे शब्द अर्थशून्य बनून जातात. प्रीतीचा सुगंध हरपून जातो आणि रितेपणाच आपल्या हाती उरतो. ज्योतीचे धुरापासून कसे रक्षण करायचे हे आपल्याला कधीच कळत नाही. त्यामुळे धूर ज्योतीला सतत गुदमरून टाकीत राहतो. वस्तुतः प्रीती ही मनाची वा मनोनिर्मित वस्तू नसते. विचारांच्या जाळ्यात ती अडकत नसते. तसेच प्रयत्नाने ती प्राप्त करून घेता येत नसते. तिचे संवर्धन करता येत नसते व ती जतनही करता येत नसते. मन जेव्हा शांत, निःस्तब्ध असते आणि हृदयातून जेव्हा सर्व मनोनिर्मित गोष्टी नाहीशा होऊन गेलेल्या असतात, तेव्हाच प्रीती तेथे अवतरते.

खिडकीमधून नदीचे विशाल पात्र सूर्यप्रकाशात चमकताना दिसत होते.

भेटीस आलेला गृहस्थ काही वेडाबावळा नव्हता. पण त्याचे हृदय भावनाभरानें दाटून आलेले दिसत होते. आपल्या अशा प्रकारच्या भावनाविवशतेच्या अभिव्यक्तीत त्याला नेहमीच विशेष आनंद वाटत असावा. कारण, आजच्या या भावनाविष्कारात त्याला अतीव सुख लाभत असलेले स्पष्ट दिसत होते. बोलणे सुरू करण्यास तो अतिशय आतुर झालेला दिसत होता. पण जेव्हा त्याचे लक्ष एका सुंदर हरित-सोनेरी पंखांच्या पक्ष्याकडे वेधले गेले, तेव्हा त्या पक्ष्यावर तो आपल्या भावनेचा वर्षाव करू लागला. नंतर तो नदीच्या सौंदर्याचे वर्णन करू लागला. बोलता बोलता वर्णनपर गीतही गाऊ लागला. त्याचा आवाज गोड होता. पण आम्ही वसलो होतो ती खोली अतिशय लहान असल्यामुळे तिच्यात तो सामावण्यासारखा नव्हता. हरित

सोनेरी पक्ष्याचा जोडीदार आता त्याला येऊन मिळाला होता व आता दोघेही डौलाने शेजारी वसून आपले पंख साफसूफ करीत होते.

त्याने बोलण्यास आरंभ केला, "भक्ती हा ईश्वाप्रत पोचण्याचाच मार्ग नाही का? सर्वसमर्पणात्मक भक्तियज्ञाने हृदयाचे शुद्धीकरणच होत नसते का? भक्ती हे आपल्या जीवनाचे एक आवश्यक अंगच नाही का?"

भक्ती या शब्दाचा तुम्ही काय अर्थ करता?

"भक्ती म्हणजे त्या सर्वश्रेष्ठाची प्रीती; भक्ती म्हणजे देवमूर्तीला–ईश्वराच्या प्रतीकाला–पुष्पांचे अर्घ्यसमर्पण; भक्ती म्हणजे संपूर्ण तन्मयता, भक्ती म्हणजे शारीरिक प्रीतीपेक्षा अतिशय श्रेष्ठ असणारी अशी प्रीती. ईश्वरप्रीतीमध्ये मी कितीदा-तरी तासन्तास स्वतःचे भान हरवून वसतो. या अवस्थेत मी शून्यवत असतो. मला कशाचेही भान नसते. या अवस्थेत संपूर्ण जीवन हे एकात्मक असते. राजा व रंक हे एकरूपच असतात. ती विलक्षण अद्भुत अशी अवस्था असते. आपल्याला तर या अवस्थेचा परिचय खासच असेल?"

पण भक्ती म्हणजे प्रीती असते का? आपल्या दैनंदिन जीवनाहून वेगळी अशी का ती वस्तू आहे? भक्ती म्हणजे एखाद्या वस्तूसाठी, ज्ञानासाठी, सेवेसाठी किंवा विशिष्ट कर्मासाठी करण्यात येणारी त्यागात्मक कृती–असा आहे का भक्तीचा अर्थ? जेव्हा तुम्ही भक्तीमध्ये तल्लीन होऊन जाता, तेव्हा ते तुमचे सर्वसमर्पणात्मक आत्म-विसर्जन असते का? तुम्ही जेव्हा आपल्या भक्तिविषयाशी संपूर्णपणे सारूप्य पावता; तेव्हा ते तुमचे आत्मविसर्जन असते का? एखाद्या धार्मिक ग्रंथात, एखाद्या मंत्रोच्चारात किंवा एखाद्या कल्पनेत पूर्णपणे बुडून जाणे म्हणजे अहंशून्य होऊन वसणे होय, असे होते का? एखाद्या प्रतिमेची, एखाद्या व्यक्तीची किंवा एखाद्या प्रतीकाची पूजा करणे, म्हणजे भक्ती असते का? सत्याचे कोणते तरी प्रतीक असू शकते का? कोणतेही प्रतीक सत्याचे प्रतिनिधित्व कधीतरी करू शकेल का? प्रतीक हे केव्हाही स्थिति-शीलच नसते का? आणि स्थितिशील वस्तू ही चिन्मयतेचे प्रतिनिधित्व कधीतरी करू शकेल का? तुमचे चित्र म्हणजे तुम्ही, असे कधीतरी होऊ शकेल का? भक्ती या शब्दाने आपण काय ध्वनित करीत असतो, हे आता आपण पाहू या. ज्याला तुम्ही ईश्वराचे चिंतन किंवा ईश्वराची प्रीती म्हणता त्या अवस्थेत तुम्ही दिवसाचे तासन् तास घालवता. पण याला भक्ती म्हणता येईल का? जो मनुष्य समाज-कल्याणाच्या कार्याला आपले जीवन वाहून घेत असतो, त्याचीही आपल्या कार्यावर भक्ती असते; त्याचप्रमाणे विनाशाच्या योजना करणे, हेच ज्याचे कार्य आहे, त्या सेनापतीचीही आपल्या कार्यावर भक्ती असते. पण हिला खरी भक्ती म्हणता येईल का? मला तर वाटते की ईश्वराची कल्पना किंवा प्रतिमा यांच्या चिंतनाने तुम्हांला जी नशा चढते, त्या नशेतच तुम्ही आपला काळ घालविता.

इतरही माणसे वेगवेगळ्या प्रकारांनी अशाच तऱ्हेच्या नशेत काळ घालवीत असतात. या दोन्हीही प्रकारांत खरोखर काही मूलभूत भेद आहे का? जी सविषय असते, ती कधीतरी खरी भक्ती असू शकेल का?

"पण माझे तर सारे जीवन या ईश्वरभक्तीने व्यापून टाकले आहे. ईश्वरावाचून दुसऱ्या कशाचेही आता मला भान उरलेले नाही. त्याने माझे हृदय काठोकाठ भरून टाकले आहे."

पण तुम्ही हे लक्षात घ्या की, जो मनुष्य आपल्या कार्याची, आपल्या नेत्याची किंवा आपल्या विचारप्रणालीची पूजा करीत असतो, तोही आपल्या भक्तिविषयाने तुमच्यासारखाच संपूर्णपणे व्यापलेला असतो. तुम्ही ईश्वर या शब्दाने आपले हृदय भरून टाकीत आहात आणि दुसरा मनुष्य विशिष्ट कार्याने आपले हृदय भरून टाकीत असतो. पण ही खरीच भक्ती असते का? तुम्हांला आपल्या ईश्वराच्या प्रतिमेत वा प्रतीकात परमसौख्य प्राप्त होते; इतर कुणाला आपल्या ग्रंथात किंवा आपल्या संगीतात परमसौख्य लाभत असते. पण ही भक्ती असते का? स्वतःला कुठल्यातरी गोष्टीत पूर्ण विसर्जित करून टाकणे ही भक्ती असते का? एखाद्या माणसाला आपल्या पत्नीवद्दल भक्ती किंवा आसक्ती वाटत असते. कारण तिच्याद्वारा त्याची वेगवेगळ्या प्रकारची इच्छापूर्ती होत असते. पण ही इच्छापूर्ती म्हणजे भक्ती आहे का? आपल्या राष्ट्राशी सारूप्य पावणे, हे अतिशय विमोहकारी, उन्मादकारी असते. पण असे सारूप्य पावणे म्हणजे भक्ती आहे का?

"पण मी ईश्वराला सर्वस्व समर्पण केल्याने कुणाचेही काही अहित होत नाही, उलट यामुळे कुणालाही इजा करण्यापासून मी स्वतःला दूरच ठेवीत असतो."

एवढा भाग तरी ठीक आहे. पण तुम्ही कुणालाही बाह्यतः इजा करीत नसलात, तरी तुमचा हा भ्रम तुमचे स्वतःचे व एकूण समाजाचेही, एका सखोल स्तरावर अहित करण्यासच कारणीभूत होत नाही का?

"मला समाजाचे काही सोयरसुतक नाही. माझ्या वैयक्तिक गरजा अगदी थोड्या आहेत. मी आपल्या सर्व वासनांवर पूर्ण तावा मिळविला आहे. आणि ईश्वराच्या कृपाछायेत मी आपले जीवन कंठीत आहे."

पण या कृपाछायेला काही अर्थ आहे की नाही याचा शोध करणे हे महत्त्वाचे नाही का? वस्तुतः भ्रमाचे पूजन किंवा भ्रमाची भक्ती करीत राहणे, म्हणजे स्वतःच्या इच्छापूर्तीला विलगून वसणेच होय. आपल्या इच्छा किंवा तृष्णा या कोणत्याही स्तरांवरच्या असल्या, तरी त्यांच्या आहारी जाणे म्हणजे वस्तुतः कामासक्त होणे आहे.

"आपल्या बोलण्याने आपण मला अतिशय अस्वस्थ करून टाकीत आहात. त्यामुळे हे संभाषण पुढे चालू ठेवावे की नाही, याबद्दल मला शंका वाटू लागली आहे.

वस्तुतः मी जो येथे आलो तो, आपण ज्या ईश्वराचे पूजन करता, त्याचेच पूजन करण्यासाठी आलो. पण आपली आराधना किंवा पूजा ही अगदीच वेगळ्या प्रकारची आहे, असे मला दिसून येत आहे. आपण जे काय सांगत आहात, ते माझ्या आकलन-शक्तीच्या पलीकडचे आहे. पण आपल्या आराधनेमधील, पूजनामधील सौंदर्य आकळून घेण्याची मात्र मला अतिशय इच्छा आहे. आपल्यापाशी कुठल्याही प्रतिमा नाहीत, कसलेही विधी नाहीत खरे. पण आपण आराधना तर करीत असालच. आपल्या या आराधनेचे स्वरूप जाणून घेण्याची माझी इच्छा आहे."

हे पाहा, पूजन करणारा हाच स्वतःचा पूजाविषय असतो. दुसऱ्या कशाची पूजा करणे म्हणजे वस्तुतः स्वतःचीच पूजा करणे होय. प्रतिमा किंवा प्रतीक हा वस्तुतः आपल्या अहंचाच विक्षेप असतो. तुमची मूर्ती, तुमचा ग्रंथ किंवा तुमची प्रार्थना, ही सगळी तुमच्या संस्कारबद्ध पार्श्वभूमीचीच प्रतिबिंबे असतात. मूर्ती-प्रतीक-प्रार्थना यांची निर्मिती दुसऱ्याने केलेली असली, तरी वस्तुतःतुमच्या अहंचीच तीनिर्मिती असते. कारण, तुम्ही स्वतःच्या इच्छापूर्तीच्या दृष्टीनेच पूजाविषयाची निवड करीत असता तुमची ही निवड तुमच्या पूर्वग्रहानेच केलेली असते. तुमची देवमूर्ती ही तुमच्या आवडीनेच निर्माण केलेली नशा असते. तुमच्या स्मृतींमधूनच ही आवड शिल्पित केली जात असते. स्वतःच्या विचारांनी निर्माण केलेल्या या प्रतिमेच्या द्वारा तुम्ही वस्तुतः स्वतःचीच पूजा करीत असता. तुमची भक्ती म्हणजे तुमच्या मनाच्या मंत्रोच्चाराने झाकून टाकलेले आत्मपूजनच असते. तुमच्या पुढची देवप्रतिमा म्हणजे वस्तुतः तुम्हीच; तुमच्या मनाचेच ते प्रतिबिंब. अशी भक्ती हा आत्मवंचनेचाच एक प्रकार आहे. हा प्रकार माणसाला दुःखात, विभक्तपणात लोटीत असतो. याचेच नाव मृत्यू.

शोध करणे म्हणजे भक्ती करणे का असते? वस्तुतः कशाच्या तरी मागे लागणे म्हणजे शोध करणे नव्हेच. सत्य शोधू पाहणे म्हणजे सत्यापासून सदैव वंचित होऊन वसणेच होय. शोध करण्याच्या मिषाने आपण स्वतःपासून दूरदूर पळू पाहत असतो. असा शोध हा भ्रमाचाच पाठलाग असतो. आपले जे वास्तव स्वरूप असते, त्याच्या-पासून दूर कुठेतरी पळून जाण्यासाठी आपण नाना प्रकारांनी सारखा प्रयत्न करीत असतो. स्वतः आपण अतिशय क्षुद्र असतो, पोकळ पोकळ असतो. त्यामुळे आपणा-हून थोर वाटणाऱ्या गोष्टीची आपण जी पूजा करीत राहतो, ती पूजाही आपल्या-प्रमाणेच क्षुद्र व निर्बुद्ध अशी असते. थोर गोष्टीशी सारूप्य पावण्याची ही जी प्रक्रिया असते, ते त्या क्षुद्र, क्षुल्लक गोष्टीचेच विक्षेपित रूप असते. आपला अधिकाधिकाचा हव्यास हा वस्तुतः त्या अल्पतेचा, त्या क्षुद्रतेचाच विस्तार असतो. क्षुद्र किंवा अल्प हे जेव्हा थोराचा वा मोठ्याचा शोध करू लागते तेव्हा त्याच्या अल्प शक्तीच्या आवाक्यात येणारे असेच काहीतरी त्याला सापडते. स्वतःपासून दूरदूर पळण्यासाठी मनुष्य ज्या पळवाटा शोधीत राहतो, त्या विविध प्रकारच्या असतात खऱ्या. पण अशा

प्रकारे पळून जात राहणारे त्याचे मन हे मात्र सदैव भीतिग्रस्तच राहत असते; ते संकुचित व निर्बुद्ध असेच राहते.

आपले मन ज्या पळवाटा शोधीत राहते, त्यांचे यथार्थ आकलन करून घेणे, म्हणजेच जे ज्या वेळी जसे असेल, त्याच्यापासून मुक्त होऊन जाणे होय. आपल्या समस्येचे उत्तर शोधण्याचे जेव्हा आपण सोडून देतो, तेव्हाच आपल्या वास्तव स्वरूपाचे आपणांस यथार्थ आकलन होऊ शकते. आपल्यापुढील समस्येचे उत्तर शोधीत राहणे, ही स्वतःच्या वास्तव स्वरूपापासून दूरदूर जाण्यासाठी शोधलेली पळवाट असते. शोध करीत राहण्याचा हा प्रकार विविध नावांनी ओळखला जात असतो. भक्ती हे यापैकीच एक नाव आहे. पण वास्तव काय आहे, याचे जर यथार्थ आकलन करून घ्यायचे असेल, तर त्यासाठी मन शांत, निःस्तब्ध झाले पाहिजे.

"'जे जसे आहे' अथवा 'वास्तव' या शब्दांनी आपल्याला नेमके काय ध्वनित करावयाचे आहे?"

जे क्षणाक्षणाला असते तेच जे आहे याचे स्वरूप. ज्याला तुम्ही ईश्वर हे नाव देता, त्याच्याविषयी तुम्हाला वाटणाऱ्या भक्तीची व उपासनेची संपूर्ण प्रक्रिया आकळून घेणे, म्हणजेच जे आहे, ते अवधानात घेणे होय. पण जे आहे त्याचे आकलन करून घेण्याची इच्छा तुम्हाला दिसत नाही. कारण जे आहे त्याच्यापासून दूर पळण्यासाठी तुम्ही ही जी भक्तीची पळवाट स्वीकारली आहे, ती तुम्हांला अधिक सुखदायक वाटत आहे. म्हणून हा भ्रम, हा आभास सत्यापेक्षा तुम्हांला अधिक अर्थपूर्ण वाटतो. जे आहे त्याचे आकलन होणे हे विचारांवर मुळीच अवलंबून नसते. कारण विचार हीच तर मुळी एक पळवाट असते. एखाद्या समस्येचा विचार करणे म्हणजे तिचे आकलन करून घेणे नव्हे. मन जेव्हा शांत, निःस्तब्ध असते, तेव्हाच जे आहे त्याच्या गर्भातील सत्य आपोआपच प्रकट होते.

"पण मी मात्र स्वतःला जे मिळाले आहे, त्यातच पूर्ण संतुष्ट आहे. माझा ईश्वर, माझे भजन, माझी भक्ती, यांच्यातच मला पूर्ण आनंद आहे. ईश्वरभक्ती हे माझे हृत्संगीत आहे. या संगीतातच माझा परमानंद साठला आहे. आपले संगीत हे अधिक स्पष्ट व अधिक प्रांजल असेलही. पण मी जेव्हा माझे भक्तिगीत गातो, तेव्हा माझे हृदय काठोकाठ भरून जाते. तृप्त, परिपूर्ण हृदयावाचून माणसाला दुसरे काय हवे असते? माझ्या या गीताच्या अंतर्यामात आपण उभयता सहोदरच आहोत. म्हणून मी आपल्या गीताने अस्वस्थ होत नाही."

हे गीत जेव्हा वास्तवगीत असते, तेव्हा त्यात मी-तू हा भाव उरतच नाही, तर तेथे त्या शाश्वताची निःशब्दताच काय ती नांदत असते. हे गीत ध्वनिलहरींचे गीत नसते. ते निःशब्द गीत असते. म्हणून आपल्या गीताच्या ध्वनिलहरींनी आपले हृदय भरू देऊ नका.

आवड

भेटीस आलेला गृहस्थ एका शाळेचा मुख्याध्यापक होता. त्याच्या नावापुढे बऱ्याच पदव्या होत्या. शिक्षण कार्याविषयीची त्याची आवड उत्कट स्वरूपाची होती. त्याचप्रमाणे अनेक प्रकारचे समाजसुधारणेचे कार्य त्याने अनेक वर्षे केले होते. पण आता मात्र, आपण तरुण असूनही आपल्या जीवनप्रेरणेचा झरा आटून गेला आहे, असे तो खेदाने सांगत होता. आता आपली दैनंदिन कार्ये तो यांत्रिकतेने पार पाडीत होता आणि आपल्या ठराविक कामाचा त्याला कंटाळा वाटू लागला होता; त्यात त्याला रस वाटेनासा झाला होता. त्याची पूर्वीची कार्यामधील तडफ आता पूर्ण नष्ट होऊन गेली होती. तो धार्मिक प्रवृत्तीचा मनुष्य होता. आणि आपल्या धर्मामध्ये काही सुधारणा घडवून आणण्याचा त्याने प्रयत्न केला होता. पण आता त्याची ती धार्मिक तळमळही आटून गेली होती. कोणत्याही कार्याला कसलेच मूल्य नाही, असे त्याला वाटू लागले होते.

असे का वरे झाले ?

" आताशा माझ्या प्रत्येक कार्याचा शेवट संभ्रमात–गोंधळात–होऊ लागला आहे. नित्य नव्या समस्यांचीच त्यामुळे उत्पत्ती होऊ लागली आहे. सुबुद्धपणाने वागण्याचा मी सतत प्रयत्न करीत आलो आहे. पण त्यातून अधिकाधिक अनर्थच उत्पन्न होत आहेत असे मला वाटू लागले आहे. आजवर ज्या ज्या विविध कार्यांत मी भाग घेत आलो आहे, त्यांच्यामुळे माझ्या मनात निराशा, चिंता व थकवा यांचेच प्रमाण माजले आहे. कुठल्याही कार्याचा कसलाही चांगला परिणाम होत नाही, असेच मला दिसून येत आहे. म्हणून कुठल्याही कामाला हात लावण्याचीच मला भीती वाटू लागली आहे. कुठलेही कार्य हाती घेण्याने चांगल्यापेक्षा वाईटच अधिक होते, अशी भीती वाटू लागल्यामुळे अगदी कमीत कमी, आवश्यक तेवढे काम सोडून अधिक काही करणे मी पार सोडून दिले आहे. "

तुमच्या या भीतीचे काय वरे कारण असेल ? आपल्या हातून कुणाचे नुकसान होईल अशी भीती का तुम्हाला वाटते ? आपल्या कार्यामुळे आपण अधिक गोंधळच उत्पन्न करीत राहू, या भीतीमुळेच का तुम्ही जीवनापासून काढता पाय घेत आहात ? आपल्या कार्याने आपण जो गोंधळ उत्पन्न करू त्याची तुम्हाला भीती वाटत आहे की आपल्याच मनामधील गोंधळाची भीती वाटत आहे ? तुमच्या मनात जर दृष्टीची स्पष्टता व स्वच्छता असती आणि या स्पष्ट दर्शनामधूनच तुमच्या हातून कार्य होत राहिले असते, तर या कार्यामुळे वास्तवतः जो गोंधळ झाला असता, त्याची भीती तुम्हांला

कधीतरी वाटली असती का ? तुम्हांला खरोखर आपल्या मनातील गोंधळाची भीती वाटत आहे की, बाह्य गोंधळाची ?

" मी या दृष्टीने या गोष्टीकडे आजवर कधीच पाहिले नव्हते. त्यामुळे आपण काय म्हणत आहात याचा मला प्रथम विचार करून पाहिला पाहिजे. "

तुमच्या मनात जर दृष्टीची स्पष्टता व स्वच्छता असती, तर बाह्यतः अधिक प्रश्न उत्पन्न होत आहेत, या गोष्टीचे तुम्हाला विशेष काही वाटले असते का ? वस्तुस्थिती अशी असते की, माणसाला काय वाटेल ते करून आपल्या समस्यांपासून दूर दूर पळून जावयास हवे असते. याचमुळे मनुष्य आपल्या समस्या सतत वाढवीत राहतो, आपल्या समस्यांचे स्वरूप उजेडात आणणे, ही गोष्ट गोंधळ उत्पन्न करणारी आहे, असे कदाचित् कुणाला वाटेलही. पण आपल्या समस्यांकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोण ज्या प्रमाणात स्पष्ट व शुद्ध असेल, त्या प्रमाणात समस्यांचा सामना करण्याचे सामर्थ्य आपणामध्ये अधिक राहील. तुमच्या मनात जर स्पष्टता व शुद्धता असती, तर तुमच्या हातून घडणाऱ्या कृती गोंधळाच्या झाल्या असत्या का बरे ?

" माझ्या मनात स्पष्टता नाही हे अगदी खरे आहे. आपण काय केले पाहिजे हे माझे मलाच कळत नाही. कुठल्यातरी उजव्या किंवा डाव्या विचारप्रणालीचा वा वादाचा मला आश्रय घेता येईल खरा. पण त्यामुळे कृतीची स्पष्टता वा शुद्धता काही निर्माण होणार नाही. एखाद्या विशिष्ट वादामध्ये असणाऱ्या चमत्कारिक किंवा असंभाव्य गोष्टींकडे माणसाला एक वेळ डोळेझाकही करता येईल व त्या विचारानुसार कार्यही करता येईल. पण कोणत्याही वादाच्या विचारानुसार कार्य करीत राहण्याने भल्यापेक्षा बुरेच अधिक उत्पन्न होत राहते, ही वस्तुस्थिती मात्र डोळेझाड करता येणार नाही. माझ्या मनामध्ये जर खरोखरच स्पष्टता व शुद्धता आली, तर मला समोर येणाऱ्या समस्यांचा सामना खचित करता येईल. आणि त्या समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्नही करता येईल. पण माझ्या मनातच स्पष्टता नाही. अणि माझी कार्यप्रेरणा तर पूर्णपणे नष्ट होऊन गेली आहे. "

तुमची कार्यप्रेरणा का बरे नष्ट होऊन गेली आहे ? स्वतःच्या मर्यादित शक्तीचा तुम्ही वाजवीपेक्षा अधिक व्यय केला म्हणून का ती नष्ट होऊन गेली आहे ? की स्वतःला ज्या गोष्टींची मुळातून आवड नाही अशा गोष्टी करीत राहण्यामुळे तुम्ही स्वतःला दमवून थकवून नष्ट करून टाकले आहे ? की आपल्याला खरीखुरी कशाची आवड आहे, याचा तुम्हांला अद्याप शोधच लागला नाही, म्हणून तुमची कार्यप्रेरणा नष्ट होऊन गेली आहे ?

" त्याचे असे आहे की, कॉलेज शिक्षण संपवून बाहेर पडल्यावर समाजसुधारणा घडवून आणण्याची मला फार तळमळ लागली होती. या कामात मी उत्कटतेने काही वर्षे घालविलीही. पण या कामातील क्षुद्रपणा माझ्या लवकरच नजरेस आला. म्हणून

हे काम सोडून मी शिक्षणकार्य हाती घेतले. शिक्षणाचे कार्य मी अनेक वर्षे तळमळीने केले. दुसऱ्या कशाकडेही त्या काळात लक्ष दिले नाही. पण तेही मी अखेर सोडून दिले. कारण त्यातून अधिकाधिक गोंधळच उत्पन्न होत आहे, असे मला दिसून आले. माझी महत्त्वाकांक्षा स्वतःसाठी नव्हती तर हे कार्य सफल व्हावे अशी होती. पण ज्या सहकाऱ्यांवरोवर मी काम करीत होतो, त्यांची आपसात भांडणे सुरू झाली. असूया व मत्सर वाढू लागला आणि प्रत्येकाची व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा तीव्रतर होत चालली."

महत्त्वाकांक्षा ही खरोखर एक विचित्रच वस्तू आहे. 'माझी स्वतःची कसली महत्त्वाकांक्षा नव्हती, तर कार्याला सफलता प्राप्त व्हावी एवढीच महत्त्वाकांक्षा होती,' असे तुम्ही सांगत आहात. पण व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा व तथाकथित व्यक्तिनिरपेक्ष महत्त्वाकांक्षा यांच्यात खरोखर काही फरक तरी आहे का? तुम्ही जर एखाद्या विचार प्रणालीशी सारूप्य पावून तदनुसार कार्य करू लागलात व ते सफल व्हावे अशी महत्त्वाकांक्षा वाळगू लागलात, तर तुमची ही कृती व्यक्तिगत किंवा क्षुद्र स्वरूपाची आहे, असे तुम्हाला मुळीच वाटणार नाही. ही महत्त्वाकांक्षा अगदी योग्य स्वरूपाची आहे, असेच तुम्ही म्हणाल, होय की नाही? पण हे खरे आहे का? या महत्त्वाकांक्षेला 'व्यक्तिगत' न म्हणता 'व्यक्तिनिरपेक्ष' असे नाव दिले आहे एवढेच काय ते. वस्तुतः याही महत्त्वाकांक्षेमागील प्रेरणा व हेतू हे तेच असतात. तुम्ही ज्या कार्याशी सारूप्य पावला असता, त्या कार्याला सफलता प्राप्त व्हावी ही तुमची इच्छा असते. पण असे करताना 'मी किंवा अहं' याच्याऐवजी तुम्ही 'कार्य', 'व्यवस्था', 'राष्ट्र', किंवा 'ईश्वर' हे शब्द वापरता एवढेच काय ते. वाकी या सर्व प्रकारांत महत्त्व काय ते केवळ तुम्हालाच असते; तुमच्या अहंलाच असते. तुमच्याच महत्त्वाकांक्षेचे थैमान येथेही चालू असते. आणि ही महत्त्वाकांक्षादेखील निर्दयता, असूया व भीती यांच्या साह्यानेच कार्य करीत राहते. तुम्ही आपले कार्य जे सोडून दिले, ते त्यात सफलता मिळाली नाही म्हणून का सोडले? सफलता मिळाली असती तर तुम्ही ते चालू ठेवले असते का?

"हे कारण असावेसे मला वाटत नाही. ज्या कार्याला पुरेसा वेळ, शक्ती व बुद्धी दिली जाते, ते कार्य जितपत सफल होते, तेवढी सफलता माझ्या याही कार्याला प्राप्त झाली होती. पण मी जे ते कार्य सोडून दिले ते त्या कार्यातून काहीच निष्पन्न होताना दिसेना, म्हणून सोडून दिले. ह्या कार्याने थोडी तात्पुरती सुधारणा घडवून आणली खरी. पण शाश्वत व मूलभूत असे कोणतेच परिवर्तन घडवून आणले नाही."

तुम्ही जेव्हा हे कार्य करीत होता, तेव्हा तुमच्यामध्ये उत्साह व कार्यप्रेरणा भरपूर होती. मग आता ती कुठे गेली आहे? ती उत्कट प्रेरणा, ती ज्योत आता कुठे नाहीशी झाली आहे–?–ही आहे का तुमच्यापुढील समस्या?

"हो, हो. हीच आहे माझी समस्या. एकदा ही ज्योत माझ्या हृदयात तेवत होती,

पण आता ती विझून गेली आहे."

ती तुमच्यामध्ये अजून सुप्त स्वरूपात वसत आहे का? की तिचा गैरवापर केला गेल्यामुळे ती जळून खाक होऊन गेली आहे? व आता तिची राखच काय ती शिल्लक उरली आहे? कदाचित्, आपली खरीखुरी आवड कोणती याचा तुम्हांला अद्याप शोधच लागला नसेल. तुम्हांला अतिशय निराशा व अतिशय विफलता जाणवत आहे का? तुमचा विवाह झाला आहे का?

"छे, छे. मला निराश किंवा विफल झाल्यासारखे मुळीच वाटत नाही. तसेच मला कुटुंबाची किंवा एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या सहवासाचीही गरज वाटत नाही. आर्थिक दृष्टीने विचाराल तर मला थोडक्यात संतोष आहे. माझ्या मनःप्रवृत्तीचे स्वरूप सखोल अर्थाने धार्मिक वा आध्यात्मिक असेच आहे. या क्षेत्रात सफलता प्राप्त व्हावी, ही इच्छा माझ्या मनात सतत राहत असावी, असे मला वाटते."

पण तुम्हाला जर विफलता मुळीच जाणवत नसेल, तर केवळ सहज जगत राहण्यात तुम्हाला संतोष का बरे वाटत नाही?

"मी काही आता तरुण होणार नाही. तेव्हा यापुढे नुसते स्थितिशील जीवन जगण्याची किंवा सडत कुजत राहण्याची मला मुळीच इच्छा नाही."

हे पाहा, तुमच्या समस्येची आपण वेगळ्या तऱ्हेने मांडणी करूया. तुम्हाला खरोखर मनापासून कशाची आवड वाटते? तुम्हांला कशाची आवड असली पाहिजे हे नाही मी विचारीत, तर प्रत्यक्ष कशाची आवड आहे?

"खरे सांगायचे तर मला ते कळतच नाही."

पण ते शोधून काढावे असे नाही का तुम्हाला वाटत?

"पण मला ते कसे बरे शोधून काढता येईल?"

आपल्याला कशाची खरीखुरी आवड आहे, हे शोधून काढण्याची एखादी विशिष्ट पद्धत आहे, अशी का तुमची कल्पना आहे? आपल्या आवडीची दिशा कोणती आहे हे स्वतःच शोधून काढणे हेच खरोखर महत्त्वाचे असते. आजवर तुम्ही काही काही गोष्टी करून पाहिल्या. आपली शक्ती व बुद्धी या कामासाठी तुम्ही खर्च केली. पण त्यांच्यापैकी एकाही कार्याने तुम्हांला सखोल समाधान मिळवून दिले नाही. एकतर असे झाले असावे की, तुम्हांला मूलभूत महत्त्वाची न वाटणारी अशी कामे करण्यात तुम्ही आपली शक्ती खर्च करून टाकली असावी किंवा तुमची खरीखुरी आवड आत सुप्तावस्थेत असावी व जागृत होण्याची वाट पाहत असावी. तुमची आजची अवस्था ही या दोहोंपैकी कोणत्या पर्यायात वसणारी आहे?

"हे मला माहीत नाही, हेच पुन्हा सांगावे लागत आहे. पण हा शोध करण्यात आपण मदत कराल का?"

या बाबतीतील सत्य काय आहे हे तुम्हांला स्वतःच समजून घ्यावेसे वाटत नाही का?

तुमची शक्ती जर खरोखरच खलास होऊन गेली असेल, तर तुमच्या समस्येकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहावे लागेल. पण तुमची ज्योत जर केवळ सुप्तावस्थेतच असेल, तर ती जागविणे हेच महत्त्वाचे ठरेल. पण या दोहोंपैकी तुमची समस्या कोणती आहे? ती समस्या कोणती आहे हे माझ्याकडून समजून न घेता, स्वतःच ती शोधून काढावी, असे नाही का तुम्हांला वाटत? जे आहे त्याचे सत्य स्वरूप कळणे हीच त्यासंबंधीची योग्य कृती असते. तुमची शक्ती जर जळून खाक झाली असेल, तर जळल्याची जखम भरून येऊ देणे, शक्ती वाढू देणे आणि भावी निर्मितीसाठी जमीन ज्याप्रमाणे काही काळ पडित ठेवली जाते, त्याप्रमाणे अक्रिय अवस्थेत राहणे हीच कृती योग्य ठरेल. जमिनीची मशागत करून बी पेरल्यावर भावी अंकुरोद्भवासाठी ज्याप्रमाणे काही काळ स्वस्थ व अक्रिय राहावे लागते, तसेच याही अक्रियतेचे स्वरूप आहे. भविष्यातील सर्जनशील कृतीसाठीच आजची ही कृतिशून्य अवस्था आवश्यक असते. तुमच्या बाबतीत कदाचित असेही असू शकेल की तुमची खरीखुरी आवड अजून जागृतच झाली नसावी. म्हणून आता शांतपणे श्रवण करीत राहा. आणि शोधीत राहा. शोधून काढण्याची जर तुमची खरीच इच्छा असेल, तर तुम्हांला शोध खासच लागेल. पण हा शोध सतत अन्वेषण करीत राहण्याने लागणार नाही, तर आपल्या शोधाच्या हेतूचे स्वरूप स्वच्छ व उत्कट ठेवल्यानेच लागेल. असे झाले की, तुम्हांला हे आढळून येईल की आपल्या जागृतावस्थेमध्ये आपण सारखे तरल सावधानतेने अवलोकन करीत आहोत. आपली जी सुप्त आवड आहे, तिची चाहूल कुठे लागते की काय, हे आपण निरखीत आहोत आणि स्वप्नांमधूनही आपणांस तिची पदचिन्हे दिसत आहेत. थोडक्यात म्हणजे माणसाला शोध करण्याची इच्छा एकदा झाली की, शोधाची सर्व यंत्रणा आपोआप सुरू होत राहते.

"पण कोणती आवड माझी खरी आवड आहे, हे मला कसे कळेल? आजवर मला अनेक गोष्टींविषयी आवड वाटत आली होती. आणि हळूहळू ती नाहीशी होत होती. असे असल्यामुळे आता ज्या खऱ्या आवडीचा मला शोध लागेल तीही पूर्वीच्या आवडींप्रमाणे हळूहळू नाहीशी कशावरून होणार नाही?"

अर्थात या बाबतीत हमी अशी कोणीही देऊ शकणार नाही. पण आजवर आपल्या आवडी हळूहळू नाहीशा होत गेल्या आहेत, या गोष्टीची तुम्हांला जाणीव असल्यामुळे, आपली खरी आवड कोणती हे शोधून काढण्यासाठी तुमची सावधानता अधिक तरल व जागृत राहील, किंवा हीच गोष्ट वेगळ्या तऱ्हेने सांगता येईल. तुम्ही आपल्या खऱ्या आवडीचा मुद्दाम शोध करीत बसणार नाही; तर एका अक्रिय सावधान अवस्थेत तुम्ही राहाल आणि मग तुमची खरी आवड स्वतःच तुम्हांला आपले दर्शन घडवील. पण तुम्ही जर आपली खरी आवड शोधण्याचा मुद्दाम प्रयत्न करू लागाल, तर तुम्ही एक आवड टाकून दुसरी स्वीकाराल; विविध आवडी तोलू मापू लागाल,

त्यांचा अंदाज घेऊ लागाल; त्यांच्यावद्दल निर्णय घेऊ लागाल. आणि अशा प्रक्रियेमुळे सारखा प्रतिकारच उत्पन्न करीत राहाल. आपण आपल्या खऱ्या आवडीची केलेली ही निवड योग्य आहे की नाही याविषयी तर्कवितर्क करण्यातच तुम्ही आपली शक्ती खर्चाल. पण जेव्हा तुमची सावधानता ही अक्रिय स्वरूपाची राहील, शोधून काढण्याचा प्रयत्न वा निश्चय जेव्हा तेथे असणार नाही, तेव्हा त्या अक्रिय पण सावधान अवस्थेमध्येच खऱ्या आवडीचे आपोआप स्फुरण होईल. तुम्ही हा प्रयोग करून पाहा म्हणजे तुम्हांला स्वतःलाच कळून येईल.

"माझे सांगणे कदाचित उतावीळपणाचे होईल खरे. पण माझी खरीखुरी आवड कोणती याची जाणीव मला आता होऊ लागली आहे, असे वाटत आहे. माझ्या हृदयात एका नव्या चैतन्यमय प्रेरणेचा उदय होऊ लागला आहे."

शिक्षण आणि एकात्मकता

संध्याकाळ अतीव रमणीय होती. काळ्याकाळ्या प्रचंड ढगांमागे सूर्य अस्ताला चालला होता. ढगांच्या पार्श्वभूमीवर ताडामाडांची सरळसरळ उंच झाडे विशेष शोभून दिसत होती. मावळत्या सूर्याच्या उज्ज्वल प्रकाशामुळे नदी सोन्याची बनली होती आणि ते दूरदूरचे डोंगरही सोनेरी रंगात उजळून निघत होते. एकीकडे मेघांचा गडगडाट कानी पडत होता. पण तिकडे डोंगरांच्या वाजूचे आकाश मात्र निरभ्र निळेभोर दिसत होते. गुरेढोरे चरून घराकडे परतत होती. एक लहानसा गुराखी त्यांना हाकून नेत होता. त्याचे वय दहावारा वर्षांपेक्षा जास्त नव्हते. आणि दिवसभर जरी तो एकटाच हिंडत होता, तरी आताही तो मजेत गाणे म्हणत चालला होता. इकडेतिकडे भटकणाऱ्या किंवा लवकर पाय न उचलणाऱ्या गुरांना मधूनमधून काठी उगारून तो हाकीत नेत होता. आमच्याकडे पाहून हसल्यावरोवर त्याचा तो काळसर चेहरा उजळून निघाला. त्याला आमच्याविषयी काहीसे कुतूहल वाटले असावे. म्हणून किंचित् थांवून तो काहीतरी विचारू लागला. तो विचारा खेड्यातला मुलगा होता. त्यामुळे त्याला शिक्षणाची संधी मिळणे शक्य नव्हते. लिहिणे-वाचणे त्याच्या कधीच वाटयाला येणार नव्हते. पण एकटे राहून स्वतःमध्ये रमण्याची कला त्याला आतापासूनच अवगत झाली होती. आपण एकटेच आहोत याची त्याला जाणीवच नव्हती. एकटेपणाची त्याला कधीतरी जाणीव झाली असावी असे वाटत नव्हते. त्यामुळे एकटेपणामुळे त्याच्यात कधी निरुत्साह शिरला नाही. तो एकटा होता व या एकटेपणातही संतुष्ट होता एवढेच काय ते. एखाद्या विशिष्ट गोष्टीत त्याला संतोष वाटत होता असे नव्हे, तर तो नुसताच, सहजच संतुष्ट होता. विशिष्ट गोष्टी-मुळे संतुष्ट असणे म्हणजे वस्तुतः असंतुष्ट असणेच असते. कुठल्यातरी नात्यांच्या किंवा संबंधांच्या द्वारा संतोष मिळविणे म्हणजे भीतीच्या आहारी जाणे होय. विशिष्ट नात्यावर किंवा संबंधावर अवलंबून राहणारा संतोष ही केवळ इच्छापूर्ती असते. खऱ्या संतुष्टतेची अवस्था ही निरालंब असते. कुणावर किंवा कशावर तरी अवलंबून राहण्यामुळे अखेर संघर्ष व विरोध हेच उत्पन्न होत राहतात. निरालंब स्वरूपाच्या संतोषासाठी विमुक्तता आवश्यक असते. ही विमुक्तता, हे स्वातंत्र्य हा काही कशाचा तरी शेवट नव्हे. ते एखादे गाठावयाचे साध्यही नव्हे. स्वातंत्र्य वा विमुक्तता ही भविष्यात प्राप्त होणारी वस्तू नसते. भविष्यात येणारे स्वातंत्र्य हे खरे स्वातंत्र्यच नसते, ती केवळ एक कल्पना असते. जे प्रत्यक्ष वर्तमान असते तेच वास्तव असते. या वर्तमान वास्तवाचे अक्रिय व जागते अवधान असणे म्हणजेच खरा संतोष होय.

भेटण्यास आलेला प्राध्यापक सांगत होता की, कॉलेजशिक्षण पूर्ण करून बाहेर पडल्यापासूनच आपण हा शिकविण्याचा व्यवसाय आज अनेक वर्षे करीत आहोत. एका सरकारी शिक्षणसंस्थेत आपण काम करीत आलो आहोत. अनेक विद्यार्थी आपल्या हाताखाली आहेत. परीक्षा पास करण्यासाठी विद्यार्थ्यांना तयार करण्याचे काम आपण आजवर केले आहे. कारण सरकारला व पालकांना नेमके हेच हवे असते. या काळात काही असामान्य बुद्धीची मुले आपल्याला आढळली. त्यांना आपण विशेष सवलती व शिष्यवृत्त्याही देवविल्या. पण बाकी जी बहुसंख्य मुले होती ती मात्र आळशी, मंदबुद्धी व उदासीन अशीच होती आणि थोडीबहुत खोडकरही होती. काही मुले अशीही निघाली की, ज्या ज्या क्षेत्रात त्यांनी प्रवेश केला, त्या त्या क्षेत्रात त्यांनी नाव काढले. पण नवनिर्मितीची ज्योत हृदयात तेवत असणारे विद्यार्थी मात्र अतिशय विरळा आढळून आले. आपल्या या दीर्घकालीन शैक्षणिक व्यवसायात असामान्य बुद्धीची मुले अशी क्वचितच आढळली. एखाद्या दुसऱ्यात प्रतिभेची चमक दिसून येई. पण पुढील आयुष्यात परिस्थितीने त्याची ही चमक दडपून टाकल्याचेच दृष्टीस पडे. असामान्य बुद्धीच्या मुलांच्या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी एक शिक्षक या नात्याने आपण जगातील विविध देशांचा प्रवासही करून आलो. पण सगळीकडे आपणांस हीच परिस्थिती आढळली. आता या शिक्षणकार्यातून आपण निवृत्त होत आहोत कारण शिकविण्याचा जो काही अनुभव आजवर आला, त्यामुळे आपले मन काहीसे खिन्न बनले आहे. मुलांना कितीही चांगल्या प्रकारे शिक्षण दिले, तरी अखेर ती सगळी निर्बुद्ध बनून जातात असे आपणांस दिसून आले आहे. एकूण मुलांपैकी काही मुले बुद्धीने हुशार व वृत्तीने आग्रही अशी होती. त्यांना पुढे मोठमोठी पदे प्राप्त झाली. पण त्यांच्या या मोठ्या पदांच्या व सत्तेच्या पडद्याआड डोकावून पाहिले की ती इतरांप्रमाणेच क्षुद्र वृत्तीची आहेत व तशीच चिंताग्रस्त आहेत, असे दिसून आले.

तो प्राध्यापक पुढे सांगू लागला, "आधुनिक शिक्षण-पद्धती ही पूर्णपणे अयशस्वी ठरलेली आहे. कारण हिच्यातूनच दोन महायुद्धांचा जन्म झाला आणि सगळीकडे भयानक दुःख-दैन्य पसरले. लिहिण्यावाचण्यास शिकणे व विविध विज्ञानतंत्रे अवगत करून घेणे म्हणजे केवळ स्मृतीचे संवर्धन करणेच होय. म्हणून एवढ्याने काम भागणार नाही, हे उघडच आहे. आजवर या प्रकारच्या शिक्षणाने जगात भयंकर दुःख-विपत्तीं शिवाय फारसे काही उत्पन्न केले नाही. शिक्षणाचे उद्दिष्ट काय असावे, यावद्दल आपले काय मत आहे?"

पूर्ण व एकात्म अशी व्यक्ती निर्माण करणे हेच शिक्षणाचे उद्दिष्ट नाही का? शिक्षणाचे हे 'उद्दिष्ट' एकदा ध्यानात घेतले की, समाज हा व्यक्तीसाठी आहे की व्यक्ती ही समाजासाठी आहे, या गोष्टीचे प्रथम स्पष्ट आकलन करून घेतले पाहिजे.

स्वतःच्या गरजेसाठी व स्वतःच्या उद्दिष्टांसाठी समाज जर व्यक्तीचा उपयोग

करून घेऊ लागला, तर अशा समाजाला पूर्ण व एकात्म मानवाची निर्मिती करण्याचे महत्त्व मुळीच वाटणे शक्य नाही. अशा समाजाची व्यक्तीकडून एवढीच अपेक्षा असते की, व्यक्तीने एखाद्या कार्यक्षम यंत्राप्रमाणे काम करीत राहावे आणि समाज नियमांशी जुळवून घेऊन एक प्रतिष्ठित नागरिक म्हणून वावरावे. व्यक्ती या प्रकारची वनण्यासाठी वरवरच्या, उथळ थरावरील एकात्मता तिच्या ठायी आली की समाजाला तेवढे पुरेसे होते. व्यक्ती जोवर समाजाचे नियम पाळीत राहील आणि स्वतःला पूर्ण संस्कारबद्ध करून घेण्यास तयार असेल, तोवर अशी व्यक्ती समाजाला उपयुक्त वाटत राहील. आणि अशा व्यक्तींवर समाज भरपूर पैसा व वेळही खर्च करील.

पण याच्या उलट, व्यक्तींच्या विकासासाठीच जर समाज अस्तित्वात राहणार असेल, तर अशा समाजाने स्वतःच्या संस्कारबद्ध करणाऱ्या प्रभावांपासून व्यक्तीला विमुक्त करण्यासाठी मदतच केली पाहिजे. पूर्ण व एकात्म अशा मानवाची निर्मिती व्हावी यासाठीच व्यक्तीला अशा समाजाने अशाच प्रकारचे शिक्षण दिले पाहिजे.

"एकात्म व्यक्ती या शब्दाने आपण नेमके काय सुचवीत आहात?"

या प्रश्नाचे उत्तर मिळण्यासाठी, अभावात्मक दृष्टिकोनातून किंवा परोक्ष रीतीनेच या प्रश्नाकडे पाहिले पाहिजे. या प्रश्नाच्या भावात्मक आशयाचा विचार करता येणे शक्यच नाही.

"आपण काय म्हणता हे माझ्या ध्यानात आले नाही."

हे पाहा, पूर्ण व एकात्म मानव म्हणजे काय, या प्रश्नाचे भावात्मक दृष्टीने उत्तर देणे म्हणजे अशा मानवाचा एक विशिष्ट आकृतिबंध तयार करणे होय. किंवा त्याचा एक पक्का साचा व आदर्श बनविणे होय. अशा आदर्शाचे मग आपण अनुकरण करण्याचा प्रयत्न करतो. पण आदर्शाचे असे अनुकरण करीत राहणे, हे विघटनाचेच लक्षण नाही का? जेव्हा आपण एखाद्या आदर्शाची नक्कल करू पाहतो, तेव्हा एकात्मता निर्माण होणे शक्य तरी आहे का? नक्कल करणे, अनुकरण करणे ही विघटनांचीच प्रक्रिया नाही का? जगात सगळीकडे आज नेमके हेच घडत नाही का? आपल्या सर्वांच्या ग्रामोफोनच्या तवकड्याच वनून गेल्या आहेत. तथाकथित धर्मानी जी जी शिकवण आपणांस दिली आहे, किंवा कालपरवाचा राजकारणी, अर्थकारणी वा धर्मकारणी नेता जे जे बोलून गेला आहे, त्याचीच आपण सर्वजण पुनरावृत्ती करीत नसतो का? आपण एकतर कुठली तरी विचारसरणी स्वीकारलेली असते. किंवा मोठमोठ्या राजकीय सभांना आपण जात असतो अथवा निरनिराळ्या क्रीडांचा वा क्रीडास्पर्धांचा आस्वाद आपण विशाल जनसमूहावरोवर घेत असतो. भजनपूजनही आपण सामूहिक पद्धतीनेच करीत असतो. समूहानेच संमोहननिद्रेच्या आहारी जात असतो. हे सगळे व्यक्तीच्या एकात्मतेचे लक्षण आहे का? सामाजिक साच्याशी जुळती वृत्ती ठेवणे म्हणजे व्यक्तीची एकात्मता मुळीच नव्हे; होय की नाही?

"पण या सर्व गोष्टींमधून अनुशासनाचा मूलभूत प्रश्न उपस्थित होतो असे मला वाटते. आपण अनुशासनाच्या विरुद्ध आहात का?"

अनुशासन या शब्दाचा तुम्ही काय अर्थ करता?

"अनुशासनाचे विविध प्रकार असतात. शाळेमधील अनुशासन, नागरिक या नात्याने अनुशासन, पक्षाचे अनुशासन, सामाजिक व धार्मिक अनुशासन आणि व्यक्तीने स्वतःवर लादून घेतलेले अनुशासन. अनुशासन हे एकतर आतील सत्तेमुळे निर्माण झालेले असते किंवा वाह्य सत्तेमुळे आकारास आलेले असते."

एखाद्या विशिष्ट साच्याशी किंवा प्रबंधाशी जुळवून घेणे हा अनुशासनाचा खरा अर्थ आह, होय की नाही? अनुशासन म्हणजे एखाद्या आदर्शानुसार किंवा एखाद्या अधिकारी व्यक्तीच्या आदेशानुसार वर्तन करणे. पण असे करणे म्हणजे वस्तुतः प्रतिकार वाढवीत राहणेच होय. या प्रतिकारातून अपरिहार्यपणेच विरोध उत्पन्न होत राहतो. प्रतिकार म्हणजेच विरोध. अनुशासनाची प्रक्रिया ही पृथक होत जाण्याची प्रक्रिया असते. मग हे पृथकत्व, विशिष्ट गटासह दूर जाऊन इतरांपासून पृथक वनण्याच्या स्वरूपाचे असो की वैयक्तिक प्रतिकाराच्या स्वरूपाचे असो. अनुकरण करणे हाही प्रतिकाराचाच एक प्रकार असतो; होय की नाही?

"अनुशासनामुळे व्यक्तीची एकात्मता नष्ट होते असे का आपले म्हणणे आहे? पण शाळेमध्ये जर मुळीच अनुशासन नसले, तर काय अवस्था होईल वरे?"

हे पाहा, एखादे उदाहरण घेऊन कसले तरी निष्कर्ष घाईघाईने काढण्यापेक्षा, अनुशासनाचा खरा अर्थ काय हेच प्रथम जाणून घेणे आवश्यक नाही का? यासाठीच मानवी विघटनाला कारणीभूत होणारे घटक कोणते असतात हे, किंवा एकात्मतेच्या आड कोणकोणत्या गोष्टी येतात हे आपण प्रारंभीच पाहिले पाहिजे. आताच आपण हे पाहिले की, अनुशासन पाळणे म्हणजे कशाशी तरी जुळवून घेणे. म्हणजेच दुसऱ्या कशाचा तरी प्रतिकार वा विरोध करीत राहणे अथवा संघर्ष करीत राहणे. या अर्थाने अनुशासन हा विघटनाचाच एक घटक वनत नाही का? वरे, आपण विशिष्ट प्रबंधाशी जुळवून का घेत असतो? केवळ शारीरिक वा भौतिक सुरक्षिततेसाठीच आपण हे करीत नसतो, तर मानसिक सुरक्षिततेसाठी व आरामासाठीही आपण असे करीत असतो. असुरक्षितेच्या भीतीमुळेच आपण जाणता वा अजाणता कशाशी तरी आतून व वाहेरून जुळवून घेत राहतो. आपणा सर्वांनाच किमान अशी शारीरिक व भौतिक सुरक्षितता आवश्यक असते ही गोष्ट मान्यच आहे. पण मानसिक दृष्टचा आपण असुरक्षित राहू की काय या भीतीमुळेच, काही थोडे अपवाद वगळले, तर वाकीच्यास शारीरिक सुरक्षितताही प्राप्त होणे अशक्य होऊन वसते. ही असुरक्षिततेची भीती हाच कुठल्याही अनुशासनाचा आधार असतो. मग ही भीती म्हणजे, आपणांस सफलता प्राप्त होणार नाही या गोष्टीची असो

किंवा आपणास शिक्षा होईल या गोष्टीची असो अथवा एखादी गोष्ट आपणास मुळीच प्राप्त होणार नाही याची असो. वस्तुतः अनुशासन पाळणे म्हणजे अनुकरण करणे, दडपून टाकणे वा प्रतिकार करणे. हा सगळा एकूण भीतीचाच परिणाम असतो; मग ती भीती अबोध स्वरूपाची असो की सबोध स्वरूपाची असो. भीती हा मानवाचे विघटन घडवून आणणाराच घटक नाही का ?

" पण असे जर आहे, तर अनुशासनाच्या जागी आपण दुसरे काय सुचवता ? कारण अनुशासन नसेल, तर आज आहे त्यापेक्षा अधिक अव्यवस्था व गोंधळ निर्माण होईल. कृती करण्यासाठी कुठलेतरी अनुशासन आवश्यकच आहे, असे नाही का आपल्याला वाटात. "

हे पाहा, खऱ्या प्रज्ञेचा प्रारंभ कुठून होत असतो बरे ? असत्याचे असत्यत्व आकळून घेणे, असत्यातील सत्यांश अवधानात घेणे आणि सत्याचे सत्यत्व पूर्णपणे जाणून घेणे—येथूनच खऱ्या बुद्धिमत्तेचा किंवा प्रज्ञेचा प्रारंभ होत असतो. अनुशासनाच्या जागी दुसऱ्या कशाची तरी प्रतिष्ठापना करण्याचा हा प्रश्न नाही. भीतीच्या ऐवजी दुसऱ्या कशाची तरी प्रस्थापना करणे शक्य नसते. कारण असे केले, तरीही भीती ही आत कायमच राहते. आपली भीती झाकून टाकण्यात किंवा तिच्यापासून दूर पळण्यात तुम्हाला यश मिळेलही. पण आत आत भीती कायमच असते. भीतीच्या जागी दुसऱ्या कशाची तरी प्रस्थापना करण्याऐवजी, भीती पूर्णपणे नाहीशी कशी होईल हे जाणून घेणे हेच महत्त्वाचे आहे. अनुशासनाचा कुठलाही प्रकार घेतला, तरी त्यामुळे भयमुक्तता कधीही घडून येत नसते. या भयमुक्ततेसाठी भीतीचे निरीक्षण केले पाहिजे, तिचे संपूर्ण आकलन करून घेतले पाहिजे. भीती हे काही एखादे अमूर्त तत्त्व नव्हे किंवा ती एखादी अमूर्त भावनाही नव्हे. भीती ही कोणत्या तरी विशिष्ट गोष्टीच्या संबंधात उत्पन्न होत असते. म्हणून या विशिष्ट संबंधाचे स्वरूप आकळून घेतले पाहिजे. पण भीतीचे आकलन करून घेणे म्हणजे भीती दडपून टाकणे नव्हे किंवा तिचा विरोध करणेही नाही. आणि अनुशासनात तर दडपणे, विरोध करणे हेच काय ते असते. तेव्हा अनुशासनातील हा संपूर्ण व सखोल आशय ध्यानात घेतल्यावर, अनुशासन हा मानवाच्या विघटनाचा एक मोठाच घटक आहे, हीच गोष्ट नाही का स्पष्ट होत ? भीती व भीतीमुळे स्वीकारण्यात येणारे दडपण ही सगळी विघटन घडवून आणणारी शक्ती नाही का ?

" पण मग माणसाला भीतीपासून आपली मुक्तता कशी करून घेता येईल ? जेथे वर्गात अनेक विद्यार्थी असतात, तेथे जर कोणत्या तरी प्रकारचे अनुशासन किंवा आपल्या म्हणण्याप्रमाणे भीती ही नसेल, तर त्या वर्गात सुव्यवस्था कशी नांदेल ? "

यासाठीच वर्गात विद्यार्थी थोडे असले पाहिजेत, व त्यांना योग्य प्रकारचेच

शिक्षण दिले गेले पाहिजे. एवढे मात्र खरे की, जोवर सरकारला वहुसंख्येने व भरा-भर नागरिक तयार कण्याचेच महत्त्व वाटत राहील, तोवर हे घडून येणे शक्य नाही. शासनसंस्थेला सामूहिक शिक्षणच पसंत असते, व्यक्तिगत असंतोषाचे पोषण होणे हे तिलामुळीच नको असते. कारण अशा असंतोषामुळे शासकांची सत्तास्थाने लवकर डळमळीत होऊ लागतात. शासनसंस्था ही नेहमीच शिक्षणाचे नियंत्रण करू पाहत असते. आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी ती व्यक्तींवर विशिष्ट प्रकारचे संस्कार करीत असते. व्यक्तींना पक्केपणी संस्कारवद्ध करून टाकण्याचा सर्वांत सोपा उपाय म्हणजे अनुशासनाच्या द्वारा, शिक्षा व पारितोषिके यांच्या द्वारा व्यक्तिमनात भीती उत्पन्न करणे हा होय. भीतीपासून मुक्त होण्याचा प्रश्न हा सर्वस्वी वेगळा आहे. पण प्रथम भीतीचे स्वरूप समजून घेतले पाहिजे. ती दडपून टाकता उपयोगी नाही किंवा तिचा प्रतिकारही करता उपयोगी नाही. तिचे उदात्तीकरणही करून चालणार नाही.

माणसाच्या एकूण विघटनाचा प्रश्न हा इतर कुठल्याही मानवी प्रश्नाप्रमाणे, अतिशय गुंतागुंतीचा आहे. संघर्ष हा देखील विघटनाचाच एक घटक नाही का ?

" पण संघर्ष हा जीवनाला आवश्यकच नाही का ? जीवनात संघर्ष राहिला नाही तर आपण कुंठित, अवरुद्ध अवस्थेत कुजत राहणार नाही का ? माणूस जर सतत प्रयत्न करीत राहिला नाही, तर मानवाची प्रगती व त्याची संस्कृती या गोष्टी अशक्यप्रायच होऊन वसणार नाहीत का ? आपल्या जीवनात प्रयत्न व संघर्ष हे राहिले नाहीत, तर आपण पूर्वीच्या रानटी माणसांच्याच अवस्थेत कुजत राहु. "

पण कदाचित आजही आपण तशाच अवस्थेत असून काहीही नवे सुचवले की, असे उतावीळपणाचे निष्कर्ष आपण का वरे काढीत असतो ? किंवा नव्याचा असा प्रति-कार का वरे करीत असतो ? जेव्हा आपण कुठल्या ना कुठल्या कारणाने आपल्या देशासाठी किंवा आपल्या ध्येयासाठी हजारोलाखो माणसांची कत्तल करीत असतो तेव्हा आपण पूर्णपणे रानटीच नसतो का ? माणसाची हत्या करणे हा तर रानटी-पणाचा कळसच आहे. पण हे जरा बाजूला ठेवून, ज्याबद्दल आपण बोलत होतो, तेच पुढे चालवू या-- संघर्ष असणे हे विघटनाचेच लक्षण नसते का सांगा बरे ?

" संघर्ष या शब्दाने आपण काय ध्वनित करता ? "

सर्वच प्रकारचा संघर्ष, पतिपत्नीमधील संघर्ष, परस्पर विरुद्ध विचारांच्या दोन गटांमधील संघर्ष, जे वर्तमान वास्तव आहे ते व गत परंपरा यांच्यामधील संघर्ष, वर्तमान वास्तव व भविष्यातील काल्पनिक आदर्श यांच्यामधील संघर्ष--हे सर्व प्रकार संघर्ष या सदरात येतात. संघर्ष म्हणजे आंतरिक कलह व बाह्य कलह ! सध्या तर आपल्या जीवनाच्या सर्वच सबोध वा अबोध स्तरांवर संघर्ष माजला आहे. आपले जीवन ही संघर्ष-श्रेणी किंवा युद्धभूमी वनून गेली आहे. आणि हे सारे कशासाठी

चालले आहे ? कुठल्याही कलहाने वा संघर्षाने आपल्याला कशाचेही आकलन कधीतरी होऊ शकते का ? माझा जर तुमच्याशी संघर्ष चालू असेल, तर मला तुमच्या स्वरूपाचे आकलन होऊ शकेल का ? आकलन होण्यासाठी एक प्रकारची शांती आवश्यक नसते का ? नवसर्जन हे केव्हाही शांतिमय, आनंदमय अवस्थेतच होऊ शकते; कलहमय वा संघर्षमय अवस्थेत नव्हे.

आपला जो आंतर्बाह्य संघर्ष अव्याहत चालू असतो तो कशामध्ये चालू असतो ? तर जे वर्तमान आहे त्याच्यात आणि जे भविष्यात असावेसे वाटते त्याच्यात चालू असतो. किंवा स्थिती व स्थितिविरोध यांच्यामध्ये चालू असतो. हा संघर्ष चालणे हे अपरिहार्यच आहे अशी आम्ही आपली ठाम समजूत करून घेतलेली आहे. अशी संघर्षाची अपरिहार्यता हा आपल्या जाणिवेचा मानदंड होऊन बसला आहे. ते एक अटळ सत्य मानले जाऊ लागले आहे; मग ते वस्तुतः किती का असत्य असेना. असे पाहा की, आपल्या या संघर्षामुळे जे वर्तमान आहे त्याचे त्याच्या विरुद्धामध्ये कधीतरी परिवर्तन होऊ शकेल का ? मी आज हा असा आहे आणि पुढे तसा होण्यासाठी किंवा अशाच्या विरुद्ध होण्यासाठी धडपड करीत राहिल्याने, मी जो असा आहे त्यात किंचितही परिवर्तन होऊ शकेल का ? ते विरुद्ध किंवा तो स्थितिविरोध हा, जे आहे त्याचाच किंचित बदललेला असा प्रक्षेपच असत नाही का ? विरुद्धामध्ये, ज्याचा तो विरोधी असतो त्याचेच गुणधर्म नसतात का ? दुसऱ्या कशाशी तुलना केल्याने जे आहे त्याचे आकलन कधीतरी होऊ शकते का ? जे आहे त्याच्याबद्दल कोणतेही निष्कर्ष काढल्यामुळे जे आहे त्याच्या आकलनाला प्रतिबंधच होत नसतो का ? तुम्हाला एखाद्या गोष्टीचे जर खरोखर आकलन करून घ्यावयाचे असेल, तर त्या गोष्टीचे सूक्ष्म निरीक्षण व तिचा अभ्यास नको का करावयाला ? त्या गोष्टीला अनुकूल किंवा प्रतिकूल असे जर तुमचे पूर्वग्रह झालेले असतील, तर तिचा तुम्हाला मुक्तपणे अभ्यास करता येईल का ? तुम्हाला जर आपल्या मुलाचे आकलन करून घ्यावयाचे असेल, तर त्याच्याशी सारुप्य न पावता किंवा त्याला दूषण न देता, त्याचा नुसता अभ्यासच नको का करावयाला ? तुमच्या मुलात व तुमच्यात जर संघर्ष चालू असेल तर त्याचे तुम्हाला आकलन होऊच शकणार नाही, हे उघडच नाही का ? तेव्हा कशाचेही आकलन करून घेण्यासाठी संघर्ष हा आवश्यकच आहे, असे तुम्हाला अजूनही वाटते का ?

"पण याशिवाय आणखी एक प्रकारचा संघर्ष नसतो का ? काहीतरी शिकून घेण्यासाठी किंवा एखादे तंत्र अवगत करून घेण्यासाठी जी धडपड किंवा जो संघर्ष करावा लागतो, तोही संघर्षच नाही का ? तसेच आपल्याला एखाद्या गोष्टीचे आतून दर्शन घडते. पण ती गोष्ट नंतर प्रत्यक्षात उतरवावी लागते आणि हे करताना धडपड करावी लागते व बराच त्रास व बरेच कष्ट खर्ची पाडावे लागतात."

हो, काही प्रमाणात असा त्रास व कष्ट खर्ची पाडावे लागतात हे खरे आहे. पण यासाठी साधन म्हणजे नवसर्जन असेच असत नाही का ? साधन हे साध्यापासून वेगळे असे कधीच नसते. जसे साधन, तसेच साध्य. आंतरिक गोष्टीला अभिव्यक्ती जी प्राप्त होत असते, ती नवसर्जनानुसारच होत असते. जे तुम्हाला अभिव्यक्त करावयाचे असते, तदनुसार तुमची शैली निर्माण होत असते. तुम्हांला काही व्यक्त करावयाचे असले, की तेच आपली शैली साकार करते. पण जे केवळ यंत्रतंत्रज्ञ असतात त्यांच्यासमोर हा चिन्मय आविष्काराचा प्रश्न कधीच उभा राहत नाही.

कोणत्याही क्षेत्रातील संघर्ष हा त्या क्षेत्राचे आकलन करून देण्यास कधीतरी उपकारक होत असतो का ? प्रयत्न करणे, कुणीतरी विशिष्ट होण्याचा किंवा न होण्याचा संकल्प करणे हा प्रकार म्हणजे संघर्षाची शृंखला सतत चालू ठेवण्याचाच प्रकार नसतो का ? संघर्षाच्या कारणांचीच परिणती संघर्षरूपी कार्यात होत नसते का आणि हे कार्यच भावी संघर्षाचे कारण बनत नसते का ? म्हणून जे वर्तमान वास्तव असते, त्याचे यथार्थ आकलन जोवर होणार नाही, तोवर या संघर्ष-शृंखलेपासून माणसाची सुटका होणे शक्य नाही. जे वर्तमान वास्तव असते त्याचे कल्पनेच्या पडद्याआडून आकलन होणे अशक्यच असते. त्याच्याकडे संपूर्णपणे नव्या दृष्टिकोनातून पाहणेच अवश्य असते जे वर्तमान असते. ते कधीच स्थीतिशील नसते. म्हणून त्याच्याकडे पाहताना मन कुठल्याही ज्ञानाने, विचार प्रणालीने, निष्ठेने किंवा निष्कर्षाने बद्ध झालेले असता उपयोगी नाही.

संघर्ष हा कुठल्याही विरोधाप्रमाणे मूलतःच भेदकारक असतो. ही भेदकारकता, ही पृथकता हे सर्व मानवी विघटनाचेच घटक नाहीत का ? कोणत्याही स्वरूपाची सत्ता, मग ती व्यक्तिगत असो की शासन संस्थागत असो, कुठल्याही प्रकारचा प्रयत्न, मग तो कुणीतरी अधिक होण्यासाठी असो की काहीतरी कमी करण्यासाठी असो—ही सगळी विघटन घडवून आणणारीच प्रक्रिया आहे. सर्व प्रकारच्या कल्पना, सगळ्या निष्ठा आणि सर्व विचारप्रणाली या भेदकारकच असतात, पृथकत्वच उत्पन्न करीत राहतात. त्यांचा आधार घेऊन प्रयत्न करण्याने किंवा संघर्ष करीत राहण्याने आकलन होणे हे कधीही शक्य नसते. म्हणून प्रयत्न किंवा संघर्ष हा व्यक्तीच्या जीवनात काय किंवा समाजाच्या जीवनात काय अवनती घडवून आणणारा घटकच ठरत असतो.

"पण मग एकात्मता म्हणजे तरी काय ? विघटनाला कारणीभूत होणारे घटक कोणते, हे आता माझ्या थोडेबहुत ध्यानात आले आहे. पण हा सगळा अभावात्मक, नकारात्मक दृष्टीकोन झाला. अभावातून, निषेधातून एकात्मतेकडे कसे जाता येईल ? अयोग्य किंवा चुकीचे काय हे जरी मला कळले, तरी योग्य काय किंवा अचूक काय, याचे मला आकलन झाले, असे काही म्हणता येणार नाही."

हे पाहा, जेव्हा असत्य हे असत्य असल्याचे स्पष्ट, स्वच्छ आकलन होते, तेव्हा तेथेच सत्य असते. माणसाच्या विघटनाला कारणीभूत होणाऱ्या सर्व घटकांची जेव्हा पुरेपूर स्पष्ट जाणीव होते—केवळ वरवरची नव्हे, तर सखोल अर्थाने जाणीव होते—तेव्हाच एकत्मता उदयास येत नसते का ? एकात्मता ही एखादी स्थितीशील वस्तू थोडीच आहे ? एकादा प्राप्त करून घेतली की संपले काम, अशा स्वरूपाची का ती वस्तू आहे ? जेथे पोहचताच प्रवास संपुष्टात येतो अशी स्थाणुवत अवस्था म्हणजे एकात्मता मुळीच नव्हे. कायमचे पोहचणे हे मरणच होय. एकात्मता हे काही एखादे निश्चित स्वरूपाचे साध्य नव्हे की, एखादे पक्के अंतिम ध्येय नव्हे. ती एक अखंड चिन्मय व नित्य गतिशील अशी अवस्था असते. अशी चिन्मय तरल गतिशीलता हे कधीतरी स्थिर स्वरूपाचे साध्य होऊ शकेल का ? तो जीवनाचा पूर्व-निश्चित असा हेतू कधीतरी होऊ शकेल का ? एकात्म होण्याची अभिलाषा ही मात्र इतर कुठल्याही अभिलाषेहून वेगळी नसते. आणि अभिलाषा म्हटली की ती कसलीही असली तरी केवळ संघर्षालाच कारणीभूत होत असते. संघर्षाचा जेव्हा पूर्ण अंत होतो, संपूर्ण अभाव घडून येतो, तेव्हा त्या अभावातच एकात्मता वसत असते. एकात्मता ही सर्वावधानात्मक अशी अवस्था आहे. पण जोवर प्रयत्न, संघर्ष, प्रतिकार किंवा एकाग्रता या गोष्टी माजत राहतील, तोवर सर्वावधानता आकारास येणे अशक्य आहे. एकाग्रता म्हणजे अवरुद्धता. लक्ष एका ठिकाणी केंद्रीत करण्याची प्रक्रिया ही विभक्तपणाची, पृथकत्वाची प्रक्रिया होय. लक्ष किंवा अवधान या रीतीने वेगळे करून विशिष्ट ठिकाणी खिळवून ठेवले, तर सर्वावधानता अस्तित्वात येणे शक्यच कसे होईल ? पृथक करणे म्हणजे संकुचित करणे होय. या अशा संकुचिताला, विभक्ताला त्या पूर्णाचे अवधान राहणे कसे शक्य आहे ? जेथे जेथे धिक्कार असतो, जेथे जेथे समर्थन किंवा सारूप्य असते, तेथे मन हे नाना प्रकारच्या निष्कर्षांनी, विकल्पनांनी व उपपत्तींनी आच्छादित होऊन गेलेले असते. तेथे संपूर्णता, सर्वावधानता राहणे हे केवळ अशक्य असते. आपल्याला जेव्हा आपल्या आड येणाऱ्या सर्व प्रतिबंधांचे स्पष्ट आकलन होते, तेव्हाच स्वातंत्र्य आकारास येते. तुरुंगात बद्ध होऊन वसलेल्या माणसाच्या दृष्टीने स्वातंत्र्य किंवा विमुक्तता हे केवळ एक अमूर्त तत्त्व असते. पण अक्रिय सावधानतेमुळे आपणास सर्व प्रतिबंधांचे स्वच्छ दर्शन घडते आणि या प्रतिबंधांपासून पूर्ण विमुक्तता प्राप्त झाली की, एकात्मता सहजपणेच उदयास येते.

विशुद्धशीलत्व

भातशेते पिकू लागली होती. सायंकाळच्या सूर्यप्रकाशात त्यांची पिवळी पडत चाललेली कणसे अधिकच सोनेरी दिसत होती. शेताच्या वाजूने वाहणाऱ्या अरुंद पाटांमध्ये मावळत्या प्रकाशाचे प्रतिविंब पडले होते. शेते चारी वाजूंनी ताडामाडांच्या राईंनी वेढली गेली होती. आणि त्यांच्यामधून दूरवर लहानशा काळसर झोपड्या दिसत होत्या. भातशेतांमधून व ताडामाडांच्या रायांतून एक रुंदशी वाट वळणे घेत घेत जात होती. ती सर्वच वाट संगीतमय होती. त्या वाटेवरच भातशेतासमोर वसलेला एक मुलगा वासरी वाजवीत होता. त्याचा तो स्वच्छ, सुडौल, निरोगी देह नाजूक होता. कमरेभोवती त्याने शुभ्र वस्त्र गुंडाळले होते. मावळत्या प्रकाशात त्याचा चेहरा उजळून निघत होता. आणि त्याचे डोळे हसत होते. आपल्या वासरीवर तो स्वरसप्तकाची तालीम करीत होता. त्याला जेव्हा याचा कंटाळा येई, तेव्हा तो एखादे गीत वाजवू लागे. वासरीवादनात तो पूर्णपणे रंगून गेला होता आणि त्याचा तो संगीतानंद सभोवतालच्या वातावरणालाही संगीतमय वनवीत होता. मी जरी त्याच्यापासून थोड्याच अंतरावर वसलो होतो, तरी माझ्या अस्तित्वामुळे त्याच्या वादनात जरासाही खंड पडला नाही. मावळत्या सूर्याचा तो मोहक संध्या प्रकाश, हरित सोनेरी शेतांचा तो सभोवार पसरलेला सागर, सूर्य प्रकाशाने नटलेले ते तालवृक्ष आणि वासरीवादनात तल्लीन झालेला हा मुलगा—या साऱ्यांमुळे ती सायंकाळ अशा काही विलक्षण, मंत्रमुग्ध करणाऱ्या लावण्याने विनटली होती ! अशा सौंदर्याचा अनुभव क्वचितच येत असतो.

काही वेळाने मुलाने आपले वासरीवादन थांवविले व तो हलकेच माझ्याजवळ येऊन वसला. आम्ही परस्परांशी एक शब्दही वोललो नाही. पण तो मधुरपणे हसला. त्या हास्याने स्वर्गापर्यंतचे अखिल आसमंत भरून गेल्यासारखे वाटले. इतक्यात तालवृक्षांत दडलेल्या एका घरातून त्याच्या आईने त्याला हाक दिली. त्याने लागलीच प्रतिसाद दिली नाही. पण तिसऱ्या हाकेला मात्र तो उठला, किंचित हसला आणि चालू लागला. याच वाटेवर थोड्या अंतरावर एक मुलगी सतार वाजवीत गात होती. तिचा आवाज मधुर होता. शेताच्या पलीकडून कुणीतरी त्या गाण्याचे कडवे उचलून मुक्त कंठाने गाऊ लागले. त्यावरोवर त्या मुलीने आपले गाणे थांववले व त्या पुरुषाचे गाणे ती ऐकत राहिली. आता अंधार पडत चालला होता. शेतांच्या वर क्षितिजावर संध्यातारकांचा उदय झाला होता. वेडूक परस्परांना साद घालू लागले होते.

कशावर तरी मालकी मिळविण्याची आपल्याला केवढी विलक्षण हाव असते !

आपल्या अंगणातील फळझाडांवर मालकी असावी, आपल्या स्त्रीवर मालकी असावी, येथपासून तो स्वर्गही आपणास प्राप्त व्हावा येथपर्यंत आपली लालसा धावत असते. कशावर तरी केवळ आपले एकट्याचेच स्वामित्व असावे असे आपणास वाटत असते. आणि एकदा मालकी प्राप्त झाली की, त्या प्रमाणात त्या वस्तूचे मोलही आपल्याला विशेष वाटू लागते. एखादे चित्र 'माझे आहे' असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा ते चित्र आपल्याला अधिक सुंदर व अधिक सुकुमार दिसू लागते, व अधिक मौल्यवान व अधिक आशयपूर्ण वाटू लागते. स्वामित्वामध्ये हिंसेवाही एक चमत्कारिक भाव दडलेला असतो. एखादी वस्तू 'माझी आहे' असे आपण ज्या क्षणी म्हणतो, त्या क्षणीच ती जपण्याची व रक्षण करण्याची वस्तू बनून जाते. आपल्या वस्तूची जपणूक करण्याच्या या कृतीतच एक प्रकारचा प्रतिकार असतो आणि या प्रतिकारातूनच हिंसात्मकता उत्पन्न होत असते. हिंसात्मक वृत्ती ही सदैव विजयाकांक्षी असते, हिंसात्मकता म्हणजे अहंची परिपूर्ती पण विजयी होणे हे वस्तुतः पराभूत होणेच असते. इच्छित स्थानाप्रत पोहचून तेथेच स्थिरावणे हे मरणच असते. अखंड प्रवास करीत राहणे म्हणजेच चिरंतनत्व होय. या जगात विजयी होणे किंवा काहीतरी प्राप्त करून घेणे म्हणजे वस्तुतः जीवन हरवून बसणेच होय. आपण सर्वजण नेहमी कुठल्यातरी साध्याच्या पाठीमागे सदैव लागलेले असतो. पण साध्य हे सतत पुढेपुढेच जात राहते. आणि साध्याच्या पाठीमागे लागण्याची आपली जी संघर्षमय धडपड असते, तिचीही साध्यासारखीच गत होते. अडचणींवर विजय मिळवीत राहणे म्हणजे संघर्ष होय, कारण जे एकदा जिंकले जाते, ते पुन्हा पुन्हा जिंकितच राहावे लागते. विजयी मनुष्य नेहमी भीतीग्रस्तच राहात असतो. त्याच्या मालकीच्या वस्तू हाच त्याच्या जीवनातील अंधार होऊन बसतो. आणि पराभूत मनुष्य हा देखील विजयाची आकांक्षा धरू लागला की, अगोदर प्राप्त झालेलेही गमावून बसतो. आणि तोही विजयी माणसाप्रमाणेच भीतिग्रस्त बनून जातो. आपले पात्र सदैव रिते असू देणे म्हणजेच अमरत्वाचे जीवन जगणे होय.

भेटीस आलेल्या जोडप्याचे लग्न झाल्याला थोडाच काळ लोटला होता. पण त्यांना मूलबाळ झालेले नव्हते. पतिपत्नी दोघेही इतके तरुण होते, सर्वसामान्य जनरहाटीपासून इतके दूर होते आणि वृत्तीने इतके भीरू होते! त्यांना स्वस्थपणे वोलावयाला हवे होते. इतर लोक आपल्यासाठी वाहेर तिष्ठत उभे राहावे हे त्यांना नको होते आणि घाईघाईने बोलणे उरकून टाकणे हेही त्यांना नको होते. ते जोडपे मोठे सुरेख दिसत होते. पण त्यांच्या मनावर एक प्रकारचा ताण असावा हे त्यांच्या डोळ्यांतून स्पष्ट दिसून येत होते. त्यांच्या स्मितात सहजता होती. पण त्या स्मितामागे कसली तरी चिंता दडल्याचे स्पष्ट दिसून येत होते. त्या जोडप्यात एक प्रकारची शुचिता, एक प्रकारचा ताजेपणा आढळून येत होता. आणि तरीही

या सर्व गोष्टींमधून आतल्या संघर्षाची थोडीबहुत चाहूल लागत होती.

प्रीती ही एक विलक्षण वस्तू आहे. ती किती लवकर कोमेजून जात असते आणि तिची ज्योत किती चटकन घुराने वेढली जाते, गुदमरली जाते ! ही प्रीतिज्योत तुमचीही नसते व माझीही नसते. तुझे-माझेपणाचा स्पर्शही सहन न करणारी अशी ती निखळ ज्योतच असते. ती स्वच्छ निर्मल व स्वयंपूर्ण असते. ती व्यक्तिगतही नसते व व्यक्तिनिरपेक्षही नसते. ती गताचीही नसते व अनागताचीही नसते. दुःखाच्या तीव्र जखमा वऱ्या करणाऱ्या धन्वंतरीची किमया तिच्यात असते. तिचा परिमल हा कधीही सातत्यात्मक नसतो. या प्रीतिज्योतीवर कुणालाही स्वामित्व मिळविता येत नसते. कुणालाही ती आपल्या एकट्याच्या ताब्यात अडकवून ठेवता येत नसते. ती जर अग्नी हातात पकडून ठेवू गेले तर ती जाळू लागते, नाश करू लागते. मग आपले जीवन घुराने व्याप्त होऊन जाते आणि मग तेथे ज्योतीला जागाच उरत नाही.

तो आपली कथा सांगू लागला. त्यांचे लग्न झाल्याला दोन वर्षे झाली होती व मोठ्या शहरापासून फार दूर नसणाऱ्या एका जागी ते दोघे शांतपणे राहत होते. त्यांच्यापाशी पंचवीस-तीस एकर जमीन असून, तिच्यातून भात व फळे यांचे उत्पन्न ते काढीत होते. काही गुरेढोरेही त्यांच्यापाशी होती. गुरांची उत्तम निपज करण्याचे काम त्याच्या विशेष आवडीचे होते. आणि स्थानिक हॉस्पिटलमध्ये काम करण्याची तिला आवड होती. त्यांचे जीवन आपापल्या आवडीच्या कामात पूर्णपणे रंगून गेले होते. पण ही परिपूर्णता पळवाटीच्या स्वरूपाची मात्र नव्हती. कोणत्याही गोष्टीपासून दूर पळून जाण्याची धडपड त्यांनी कधीच केली नव्हती. केवळ नातेवाईकांपासून मात्र ते दूर पळत होते. हे नातेवाईक परंपराग्रस्त व कंटाळवाणे असेच सर्व होते. त्यांनी जे लग्न केले होते ते कौटुंबिक विरोधाला न जुमानता केले होते. त्यामुळे ते दोघे केवळ स्वतःवरच पूर्णपणे विसंबून होते. इतर कुणाचीही फारशी मदत त्यांना मिळत नव्हती. लग्न करण्यापूर्वी परस्परात चर्चा करून मुले होऊ द्यावयाची नाहीत असे त्यांनी ठरवून टाकले होते.

का बरे असे ठरवलेत ?

" जगाची सध्याची अवस्था किती भयंकर व गोंधळाची बनून गेली आहे, याची आम्हांला पुरी जाणीव होती. त्यामुळे सध्याच्या वाढत्या लोकसंख्येत भर टाकणे म्हणजे अपराध करणे होय असे आम्हांला वाटत होते. आपल्याला मुले झाली, तर ते एकतर सत्ता गाजविणारे अधिकारी तरी बनतील नाही तर या ना त्या धार्मिक वा आर्थिक विचारप्रणालीचे ते गुलाम तरी बनतील, अशी भीती आम्हांला वाटत होती. परिस्थिती त्यांना मूर्ख, निर्बुद्ध तरी बनवील, नाही तर हुपार, लबाड किंवा संदेहवादी तरी बनवील, हे आम्हांला उघडउघड दिसत होते. दुसरे असे की मुलांना

योग्य ते शिक्षण देण्याइतका पैसाही आमच्यापाशी नव्हता. "

योग्य शिक्षणाचा तुमच्या दृष्टीने काय अर्थ आहे ?

" मुलांना योग्य शिक्षण देण्यासाठी त्यांना इथल्या चांगल्या शाळेतच नव्हे, तर परदेशातील विश्वविद्यालयामध्येही आम्हांला पाठवावे लागले असते. तसेच आम्हांला त्यांच्या बुद्धीचा काळजीपूर्वक विकास करावा लागला असता. मूल्यांची व सौंदर्याची जाणीव त्यांच्यात निर्माण करावी लागली असती. त्यांच्या अंतःकरणात शांती नांदावी म्हणून जीवन समृद्धतेने व सुखाने जगण्यास त्यांना साह्य करावे लागले असते. आणि आत्म्याचा नाश न करता जीवन सुखाने जगता यावे यासाठी चरितार्थाचे एखादे तंत्र वा साधन त्यांना प्राप्त करून द्यावे लागले असते. दुसरे असे आहे की, आम्ही स्वतःच किती निर्बुद्ध आहोत याची आम्हांला पूर्ण जाणीव आहे. त्यामुळे आपले सर्व पूर्वसंस्कार व आपल्या सगळ्या प्रतिक्रिया यांचा वारसा आपल्या मुलांना आपण देऊ नये असे आम्हा दोघांनाही वाटले. स्वतःच्याच किंचित सुधारलेल्या प्रकृती निर्माण करण्यात काही अर्थ नाही, असे आम्हांला वाटत होते. "

म्हणजे या सर्व गोष्टींचा तुम्ही इतक्या तर्कशुद्ध रीतीने व इतक्या कठोर वृत्तीने विचार करून मगच लग्न केले, असे का तुमचे म्हणणे आहे ? एकूण तुम्ही चांगले पक्के करारमदार केले होते असे दिसते. पण जितक्या सहजपणे तुम्ही करार केले, तितक्या सुलभतेने ते तुम्हांला पाळता येतील का ? शाब्दिक करारांपेक्षा प्रत्यक्ष जीवन हे अधिक गुंतागुंतीचे, अधिक संकुल असते, होय ना ?

" आम्हांला याच गोष्टीचा अनुभव येत आहे. या गोष्टींबद्दल आम्ही लग्नापूर्वी काय किंवा नंतर काय, कुणाशीच कधी बोललो नव्हतो. कुणाशी बोलावे हेच समजत नव्हते. मोकळेपणाने बोलण्यासारखे असे कुणी आमच्या परिचयाचे नव्हते. कारण वडीलधाऱ्या मंडळीशी या बाबतीत बोलावयाला गेले की, एकतर ती मंडळी आमची पाठ कौतुकाने थोपटतील किंवा आपली नापसंती स्पष्ट शब्दात व्यक्त करतील, याची आम्हांला जाणीव होती. या दोन्ही प्रकारच्या—कौतुकाच्या किंवा नापसंतीच्या — प्रतिक्रियांमधून या मंडळींना एक तऱ्हेचे विजयाचे सुख अनुभवण्यास मिळते. आम्हांला ते मुळीच नको होते. याच दिवसात आम्ही आपले एक प्रवचन ऐकले. त्यावरोबर आपली भेट घेऊन या प्रश्नाची आपल्याजवळ मनमोकळी चर्चा करावी असे आम्हा दोघांनाही वाटू लागले. दुसरी सांगण्यासारखी गोष्ट ही की, लग्न होण्यापूर्वीच परस्परांशी लैंगिक संबंध ठेवावयाचा नाही, अशी आम्ही शपथ घेतली होती. "

असे तुम्ही का ठरवले. हे पुन्हा विचारावेसे वाटते.

" आम्ही दोघेही धार्मिक प्रवृत्तीचे आहोत. जीवन अध्यात्मिक स्वरूपाचे राहावे असे आम्हा दोघांनाही वाटत होते. मला अगदी लहानपणापासूनच संन्यासी जीव-

नाची ओढ होती. मी नेहमी धार्मिक ग्रंथांचे वाचन करीत असे. त्यामुळे माझी ही ओढ वळावतच चालली. एक वर्षभर तर मी संन्याशाची भगवी वस्त्रेही धारण केली होती."

तुमचीही प्रवृत्ती अशीच होती का ?

पत्नीने उत्तर दिले, " मी काही यांच्याइतकी बुद्धिमान किंवा विद्वान नाही. पण माझ्याही माहेरचे वातावरण धार्मिक स्वरूपाचेच होते. माझ्या आजोबांचा व्यवसाय चांगला चालत होता तरीही बायकोमुलांना टाकून ते संन्यासी होण्यासाठी घर सोडून गेले. माझ्या वडिलांनाही तसेच करावेसे वाटत आहे. आतापर्यंत माझ्या आईने त्यांना रोखून धरले आहे. पण एखाद्या दिवशी ते खरोखरच घर सोडून निघून जातील. माझीही प्रवृत्ती त्यांच्यासारखीच धार्मिक वळणाची आहे."

असे जर होते, तर तुम्ही लग्न तरी का केले ?

त्याने उत्तर दिले, " आम्हांला एकमेकांचा सहवास हवा होता म्हणून. आमचे परस्परांवर प्रेम होते व आमच्यामध्ये समान आवडीही बऱ्याच होत्या. लहानपणापासूनच आम्हांला या गोष्टीची जाणीव झाली होती म्हणून व्यवहार दृष्ट्या लग्न करून एकत्र राहण्यात आम्हांला कसलीही अडचण वाटली नाही. लग्न न करता व लैंगिक संबंध न ठेवता एकत्र राहण्याचा विचारही आमच्या मनात तरळून गेला. पण अशा व्यवस्थेमधून अनेक अनावश्यक अडचणी उद्भवल्या असत्या. आमचे लग्न झाल्यावर वर्षभर सर्व काही सुरळित चालले होते. पण पुढे मात्र आम्हांला आमची परस्परांविषयीची ओढ असह्य होऊ लागली. अखेर ही ओढ इतकी अनावर झाली की, मधूनमधून काही काळ मी दूर कुठेतरी निघून जात असे. मला आपले नित्याचे काम करणेही अशक्य होई. दुसऱ्या कशाकडे लक्ष देणेही कठिण होऊन जाई. रात्री मला चमत्कारिक स्वप्ने पडत. मी लहरी व चिडखोर बनून गेलो. बाकी आमच्यामध्ये रागाचा शब्दही कधी उच्चारला गेला नाही. आमचे परस्परांवर अतिशय प्रेम असल्यामुळे शब्दाने किंवा कृतीने आम्ही एकमेकांना दुखवणे हे अशक्यच होते. पण एकमेकांविषयीच्या अनावर ओढीने आम्ही आतल्याआत भडकलेल्या अग्नीप्रमाणे जळत राहिलो. अखेर आपली भेट घेऊन आपल्यापाशी सारे काही मोकळेपणाने बोलून टाकण्याचे आम्ही ठरवले. आम्ही उभयतांनी जी शपथ घेतली होती, ती पाळणे मला आता अगदी अशक्यच झाले आहे. ही अवस्था केवढी यातनामय झाली आहे, याची आपल्याला कल्पनाही येणार नाही"

बरे, या बाबतीत तुमचे काय म्हणणे आहे ? पत्नीला प्रश्न केला.

" ज्या माणसावर आपले प्रेम असते, त्याच्यापासून मूल व्हावे असे कोणत्या स्त्रीला वाटणार नाही ? या प्रकारचे अत्युत्कट स्वरूपाचे प्रेम आपल्याला वाटत असावे, या गोष्टीची पूर्वी मला मुळीच कल्पना नव्हती. त्यामुळे मलाही दिवसचे दिवस व

रात्रीच्या रात्री अत्यंत यातना काढाव्या लागल्या. माझे डोके हलके होऊन गेले. एवढचा तेवढचा कारणाने मला रडू येऊ लागले. आणि महिन्यातल्या काही दिवसात तर रात्र जणू आपल्याला खावयाला उठली आहे, असे मला वाटू लागले. काही तरी अनपेक्षीत घडून येईल, या आशेवर मी जगत राहिले. या बाबतीत आम्ही परस्परांशी बोलून पाहिले. पण कशाचा काहीही फायदा झाला नाही. इतक्यात आमच्या जवळपास एक नवे हॉस्पिटल उघडले गेले. तेथे काम करण्यास मला विनंती करण्यात आली. आतील असहय यातनांपासून काहीसे तरी दूर जाता येईल अशा कल्पनेने मी ते काम मोठ्या आनंदाने स्वीकारले. पण हाही उपाय निरर्थक ठरला. कारण दररोज यांच्या इतक्या निकट सान्निध्यात राहण्याने..." तिच्या डोळ्यातून अश्रू घळघळ वाहू लागले. तिचे हृदय रडत होते...." म्हणून आम्ही आपणाजवळ मनातले सारे काही मोकळे करून टाकावयाला आलो आहोत. काय सुचवता वरे आपण ? "

स्वतःला शिक्षा करीत राहणे म्हणजे धार्मिक जीवन जगणे होय, असा का धार्मिक जीवनाचा अर्थ आहे ? शरीराला किंवा मनाला व्यर्थ क्लेश देत राहणे, हे समंजसपणाचे लक्षण आहे का ? आत्मपीडन करणे हा सत्यदर्शनाचा मार्ग असणे शक्य आहे का ? शुद्धशीलत्व म्हणजे कशाचा तरी त्याग करणे, असे का आहे ? परित्याग करण्याने आपण धार्मिक जीवन जगण्यात पुष्कळ पुढे जाऊ शकू असे तुम्हाला खरोखरच वाटते का ? सध्याच्या तुमच्या या संघर्षातून भविष्यात केव्हातरी शांती लाभेल असे तुम्हाला खरेच वाटते का ? कोणत्याही साध्यापेक्षा साधन हेच वस्तुतः अधिक मोलाचे नसते का ? साध्य हे माणसाला गवसेल किंवा गवसणारही नाही पण साधन हे मात्र प्रतिक्षणी जीवनात विद्यमान असते. जे प्रत्यक्ष आहे, वर्तमान आहे, त्याचेच माणसाने यथार्थ आकलन करून घेतले पाहिजे. आदर्शांनी, निर्णयांनी किंवा चतुर युक्तिवादांनी प्रत्यक्ष हे दडपून टाकता उपयोगी नाही. दुःख किंवा आत्मपीडन हा काही सौख्याचा मार्ग असू शकणार नाही. आपली अत्युत्कट भावना ही आकलन करून घेण्याची वस्तू असते; दडपून टाकण्याची किंवा उन्नयन करण्याची वस्तू नव्हे. तिच्या ऐवजी तिची जागा घेईल अशी दुसरी वस्तूही शोधता उपयोगी नाही. तुम्ही काहीही केले, कितीही युक्त्या शोधून काढल्यात, तरी त्यांच्यामुळे ज्या गोष्टीवर, ज्या भावनेवर तुम्ही प्रेम केले नाही, जी जाणून घेतली नाहीत, ती गोष्ट, ती भावना अधिकाधिक बळावतच जाईल. ज्या उत्कट भावनेला कामवासना असे नाव दिले जाते, तिच्यावर प्रेम करणे, म्हणजेच तिचे आकलन करून घेणे होय. प्रेम करणे म्हणजे त्या वस्तूशी साक्षात सुसंवाद साधणे होय. म्हणून ज्या वस्तूवर, ज्या भावनेवर तुम्ही चिडता, संतापता, जिच्याविषयी कसल्यातरी कल्पना किंवा कसले तरी निर्णय तुम्ही घेऊन बसता, त्या वस्तूशी, त्या भावनेशी प्रेमाचा सुसंवाद साधणे

हे अशक्य होऊन बसते. कामवासनेविरुद्ध तुम्ही शपथ घेऊन टाकल्यामुळे, आता तुम्हाला तिच्याविषयी प्रेम कसे बरे वाटेल ? आणि तिचे आकलन तरी कसे होईल ? शपथ घेणे हा प्रतिकार करण्याचाच प्रकार असतो. पण ज्याचा तुम्ही प्रतिकार करता, ते अखेर तुमच्यावरच मात करीत असते. सत्य ही काही जिंकून हस्तगत करण्याची वस्तू नव्हे. सत्यावर हल्ला करून काही ते हस्तगत केले जाऊ शकत नाही. तुम्ही ते पकडण्याचा प्रयत्न कराल, तर ते तुमच्या हातून निसटून जाईल. सत्य हे तुम्हांला नकळत, अगदी निःशब्दपणे प्रवेश करीत असते. तुम्हांला जे ज्ञान झालेले असते, ते सत्य नसते. ते केवळ एक प्रतिक असते, ती केवळ एक कल्पना असते. वस्तूची छाया म्हणजे वस्तू नव्हे.

स्वतःचे योग्य आकलन करून घेणे हा आता आपल्या पुढील प्रश्न आहे. स्वतःचा नाश करून घेणे हा नव्हे. कशाचाही नाश करून टाकणे, हे सोपे असते. तुम्ही आपल्या जीवनाचा एक विशिष्ट नमुना बनवून टाकला आहे. आणि या नमुन्यावर-हुकूम वागल्याने आपल्याला सत्याप्रत पोहचता येईल, अशी आशा वाटत आहे. पण हे ध्यानात घ्या की, जीवनाचा नमुना हा आपणच बनविलेला असतो. आपापल्या पूर्वसंस्कारानुसारच तो घडविला जात असतो. आपले साध्य हेही आपापल्या पूर्वसंस्कारानुसारच निश्चित होत असते. तुम्ही काय करता तर जीवनाचा एक विशिष्ट नमुना, एक विशिष्ट आदर्श तयार करता आणि मग त्याच्या अनुरोधाने चालण्याची शपथ घेता. पण हा तर स्वतःपासून दूर पळण्याचाच अखरेचा मार्ग आहे. वस्तुस्थिती अशी आहे की तुमच्या अहंने विक्षेपित केलेला हा नमुना, हा आदर्श व त्याची सगळी प्रक्रिया हे सारे म्हणजे तुम्ही मुळीच नसता. तुमचे जे प्रत्यक्ष, वास्तव स्वरूप असते, तेच वस्तुतः तुम्ही असता. तुमची अभिलाषा, तुमची लालसा म्हणजेच तुम्ही असता. तुम्हाला जर या अभिलाषेच्या पलीकडे जाण्याची खरीच इच्छा असेल तर तुम्हाला तिचे पूर्ण आकलन करून घेतले पाहिजे. तिचा धिक्कार न करता वा तिचा स्वीकारही न करता तिचे केवळ आकलन करून घेतले पाहिजे. पण ही एक कला आहे. पूर्ण अक्रिय स्वरूपाचे सखोल अवधान जर माणसात जागते राहिले, तरच ही कला अंगी येते.

" मी आपली काही प्रवचने वाचली आहेत. त्यामुळे आपण काय सांगता त्याचा आशय माझ्या ध्यानात येऊ लागला आहे. पण आता आम्ही प्रत्यक्ष काय करावे ?"

हे पाहा, तुमचे जीवन, तुमची वेदना व तुमचे सौख्य ही सर्वस्वी तुमचीच आहेत. तेव्हा या बाबतीत तुम्ही काय करावे किंवा करू नये, हे दुसरा कोण सांगण्यास धजेल ? आजवर इतर लोक तुम्हांला याबाबत काय करावे ते सांगतच आले आहेत. हे इतर म्हणजे भूतकालाशी संबंध झालेले सारे काही. ह इतर म्हणजे संस्कार-बद्धता व पूर्वपरंपरा. तुम्हीही या गतानुगतिकाचेच अंश आहात. आजवर तुम्ही

इतरांचे ऐकले व स्वत:चेही ऐकले. आणि अखेर आजच्या या विलक्षण अवस्थेत येऊन पडलात. तरी अजूनही तुम्ही दुसऱ्यांचाच सल्ला घेणार का ? कारण दुसऱ्यांचा सल्ला हा तुमच्या पूर्व संस्कारांचाच सल्ला असणार. तुम्ही दुसऱ्यांचे ऐकून घ्याल खरे. पण अखेर तुम्हांला जे सुखद वाटेल तेच तुम्ही त्यातून स्वीकाराल. आणि जे दु:खद वाटेल ते टाकून द्याल. पण हे दोन्हीही पर्याय जीवनाला बंधनकारकच होत असतात. तुम्ही वासनेविरुद्ध जाण्याची जी शपथ घेतलीत, तिनेच तर तुमच्या दु:खाला प्रारंभ झाला. अर्थात वासनेच्या आहारी जाणे म्हणजेही दु:खच असते. खरे महत्त्वाचे जर काही असेल तर ते म्हणजे या संपूर्ण प्रक्रियेचे स्पष्ट आकलन करून घेणे, हेच होय. तुम्ही एक आदर्श समोर ठेवलात, त्याप्रमाणे एक शपथ घेतली, यासाठी जीवन एक विशिष्ट अनुशासनाने बांधून टाकलेत. आणि यातून अखेर दु:ख व दारूण यातना उत्पन्न झाली. तेव्हा ही सर्व प्रक्रिया तुम्ही नीट समजून घेतली पाहिजे. कारण तुमची ही पळवाट अतिशय खोल स्तरावरची होती. आपल्या आंतरिक दैन्यापासून, अपूर्णतेच्या वेदनेपासून, आपल्या एकटेपणापासून दूर पळण्याची पळवाट होती. वस्तुत: ही सगळी प्रक्रिया म्हणजेच तुम्ही आहात.

" पण मग मुलांच्या बाबतीत काय करावे ? "

या प्रश्नाचे उत्तर होय किंवा नाही अशा रूपात देता येणे शक्यच नाही. मनाच्या द्वारा दिले जाणारे उत्तर हे निरर्थक ठरत असते. वस्तुस्थिती अशी असते की, आपण आपल्या स्वत:च्या वृथाभिमानाच्या खेळात मोहरी म्हणून मुलांचा उपयोग करीत असतो. आणि अशा तऱ्हेने आपण आपल्या दु:खांची रास वाढवीत राहतो. स्वत:पासून दूर पळण्याची पळवाट या दृष्टीनेच आपण मुलांचाही उपयोग करून घेत असतो. पण मुलांना साधन म्हणून उपयोग करण्याचे जेव्हा आपण सोडून देतो, तेव्हा त्यांचे महत्त्व हे, आपण आपल्या समाजाने किंवा आपल्या राष्ट्राने त्यांना देऊ केलेल्या महत्त्वापेक्षा अगदीच वेगळे होते. शुद्धशीलत्व ही काही मनाच्या कक्षेतील वस्तू नव्हे. शुद्धशीलत्व हा प्रीतीचा धर्म आहे. प्रीतीच जर नसेल तर तुम्ही काय वाटेल ते केलेत तरी तेथे शुद्धशीलत्व असू शकणार नाही. प्रीती असेल, तर तुमच्या प्रश्नाचे खरे उत्तर तुम्हांला गवसेल.

यानंतर बराच वेळ ते खोलीत अगदी नि:शब्दपणे बसून राहिले. शब्द व अभिव्यक्ती ही आता संपुष्टात आली होती.

मृत्यूची भीती

घरासमोरच्या लालसर मातीवर फुलांचा सडा पडला होता. ती फिकट जांभळ्या रंगाची, रुंद पाकळ्यांची फुले होती. आणि त्यांची देठे लांब लांब निमुळती होती. वातावरण त्यांच्या मंदमधुर सुगंधाने दरवळून गेले होते. दिवस उगवताच सकाळच्या झाडझुडीत ही सारी जमिनीवरील फुले झाडून टाकली जाणार होती. पण या रात्रीच्या अंधारात मात्र ती सगळी लालसर जमीन त्यांनी पूर्ण आच्छादून टाकलेली दिसत होती. फुलांची वेल चांगली दणकट होती. तिची कातरी पाने सकाळच्या कोवळ्या किरणात चमकत असत. त्या वाटेने जाणारी मुले निष्काळजीपणाने ती फुले खुशाल पायदळी तुडवीत जात. जवळच घाईने मोटारीत चढणाऱ्या गृहस्थाने तर त्या फुलांकडे ढुंकूनही पाहिले नाही. रस्त्याने जाणाऱ्या एका माणसाने मात्र एक फूल उचलले, हुंगले व हातात ठेवून दिले. पण त्यानेही लवकरच ते कुठेतरी टाकून दिले असते. इतक्यात घरातून एक बाई बाहेर पडली. ती बहुधा मोलकरीण असावी. पण तिने मात्र एक फूल उचलून आपल्या केसात खोवले. किती मोहक, किती लोभस होती ती फुले ! पण वाढत्या उन्हाच्या चटक्यांमुळे ती किती झपाट्याने कोमेजून चालली होती !

भेटीला आलेला गृहस्थ आपली मनोव्यथा उलगडून सांगत होता, " कसल्या तरी अनामिक भीतीने जन्मभर मी घेरला गेलो आहे. लहान असतानाही मी भित्रा, लाजाळू व कोवळ्या अंतःकरणाचा होतो. आणि आता मला म्हातारपणाचे व मृत्यूचे भय त्रस्त करीत आहे. सर्वांनाच एक दिवस मरण येणार आहे हे मलाही माहीत आहे. पण असल्या कुठल्याही युक्तिवादामुळे माझे मृत्यूविषयीचे भय मुळीच कमी होत नाही. मानस-संशोधनसंस्थेचा मी काही काळ सदस्य होतो. मृतांचे संदेश ऐकविण्याच्या अनेक प्रसंगी मी हजर राहिलो होतो. तसेच थोरथोर धर्मगुरूंनी मृत्यूविषयी आजवर जे जे काही सांगितले आहे, ते ते सर्व मी पालथे घातले आहे. आणि तरीही माझ्या मनातील मृत्यूविषयीचे भय तसेच कायम राहिले आहे. स्वतःचे मनोविश्लेषण करून घेण्याचा प्रयोगही मी करून पाहिला आहे. पण त्याचा मला काहीही फायदा झालेला नाही. आणि आता तर मृत्यूविषयीची ही भीती म्हणजे माझ्यापुढील एक घोर समस्याच होऊन बसली आहे. रात्री मी कितीदा तरी भयंकर स्वप्नांमुळे झोपेतून दचकून जागा होत असतो. ही स्वप्ने कुठल्या ना कुठल्या रीतीने मृत्यूशीच निगडित झालेली असतात. मृत्यूबद्दल किंवा एकंदर सर्वच हिंसात्मक गोष्टींबद्दल मला वाटणारी ही भीती चमत्कारिक स्वरूपाचीच आहे. महायुद्ध चालू असताना तर प्रत्येक रात्रच मला महाभयंकर स्वप्नासारखी वाटा-

वयाची. आताही माझे मन सदैव क्षुब्ध व अस्वस्थ असे असते. माझ्या या अस्वस्थतेने अजून मानसिक रोगाचे रूप धारण केले नाही हे खरे. पण केव्हा ती ते रूप धारण करील कोण जाणे, अशी भीती मला सारखी वाटत आहे. ही भीती आटोक्यात ठेवण्यासाठी मला जे जे शक्य झाले, ते ते सारे मी केले आहे. भीतीपासून दूर दूर पळून जाण्याचा प्रयत्नही मी करून चुकलो आहे. पण या पळवाटेच्या टोकापर्यंत पोहचल्यानंतरही मला आपली भीती काही नाहीशी करता आली नाही. पुनर्जन्मावरची काही सामान्य प्रवचने मी ऐकली आहेत. व या विषयावद्दल हिंदू व बौद्ध वाङमयात जे जे आले आहे, त्याचा थोडासा अभ्यासही मी केला आहे. पण यापैकी कशानेही माझे समाधान झालेले नाही. मला वाटणारी मृत्यूची भीती ही काही वरवरची भीती नाही; तर ती माझ्या मनात खोलखोल घर करून वसली आहे."

प्रथम हे सांगा की, उद्याकडे किंवा भविष्याकडे अथवा मृत्यूकडे पाहण्याचा तुमचा दृष्टीकोन कोणता आहे ? तुमचा प्रयत्न हा या सर्वांमागील सत्य शोधून काढण्याचा आहे की, या बाबतीत काही तरी आश्वासनपर असे हाती पडावे, स्वतःच्या मरणोत्तर सातत्याची खात्री देणारे असे एखादे संतोषदायक प्रमाण हस्तगत व्हावे, अशासाठी तुमचा प्रयत्न आहे ? तुम्हाला या बाबतीतील सत्य हवे की एखादे संतोषदायक उत्तर हवे ?

" आपण जेव्हा या तऱ्हेने प्रश्नाची मांडणी करता, तेव्हा मला कशाची भीती वाटत आहे हे माझे मलाच कळेनासे होते. पण भीती वाटत आहे व ती अतिशय तीव्र स्वरूपाची आहे, हे मात्र निश्चित."

पण तुमची समस्या नेमकी कोणती आहे ? तुम्हाला या भीतीपासून मुक्तता हवी आहे की, मृत्यूसंबंधीचे सत्य जाणून घेण्याची तुम्हाला इच्छा आहे ?

" मृत्यूसंबंधीचे सत्य या शब्दांनी आपणांस काय सुचवावयाचे आहे ? "

मृत्यू ही अपरिहार्य अशी घटना आहे. मनुष्य जीवनभर काय वाटेल ते करो, पण अखेर मृत्यू आला की, तो मात्र कायमचाच असतो, तो वज्रलेप, अपरिवर्तनीय अशा स्वरूपाचा शेवट असतो. आणि यातच मृत्यूची वास्तवता वा सत्यता साठली असते. मृत्यूनंतर काय असते, यासंबंधीचे सत्य जाणून घेण्याची तुम्हाला इच्छा आहे का ?

" मी या प्रश्नाचा आजवर जो जो अभ्यास केलेला आहे आणि मृतात्म्यांकडून येणाऱ्या संदेशासंबंधीची जी जी प्रात्यक्षिके पाहिली आहेत, त्या सर्वांवरून मृत्यूनंतर कुठल्यातरी प्रकारचे सातत्य कायम राहते, असे मला स्पष्ट दिसून आले आहे. विचार हा कोणत्यातरी स्वरूपात मृत्यूनंतरही कायम राहतो, आपणही असेच सांगितले आहे. आकाशवाणीवरून ध्वनिक्षेपित होणारे शब्द व गाणी ही ऐकू येण्यासाठी, दुसऱ्या टोकाला ज्याप्रमाणे ते सर्व ग्रहण करणारा रेडिओ असावा लागतो,

त्याप्रमाणे मृत्यूनंतरही चालू राहणारा विचार अभिव्यक्त होण्यासाठी, दुसऱ्या टोकाला रेडिओसारखेच एखादे ग्रहणक्षम यंत्र आवश्यक असते. हे यंत्र म्हणजे एखादे मानवी माध्यम असू शकेल किंवा मरणोत्तर विचार हा आपली अभिव्यक्ती करण्यासाठी दुसराही कुठला मार्ग शोधील. येथपर्यंतचे सर्व काही मला स्पष्टपणे समजू शकते आणि याचा प्रयोगही करून पाहता येतो. या प्रश्नामध्ये खोल खोल शिरून मी सर्व काही जाणून घेतलेले असले, तरीही माझ्या मनात एक भीती सखोल घर करून वसलेलीच आहे. ही भीती मरणासंबंधीचीच आहे, असे मला निश्चित वाटते."

हे पाहा, मरण हे अपरिहार्य आहे, अटळ आहे. मानवी अस्तित्वाचे सातत्य हे मात्र मृत्यूनंतर नष्टही होऊ शकेल किंवा त्याची जपणूक करून ते पुढेही चालू ठेवता येईल. पण हे ध्यानात घ्या की, ज्याला ज्याला सातत्य असते, ते कधीच नूतन होऊ शकत नाही. त्याला त्या अज्ञाताचे कधीच आकलन होऊ शकणार नाही. कारण सातत्य म्हणजे काल. आणि जे अव्याहतपणे कालावधियुक्त असते, ते कालातीत कधीच नसते. कालामध्ये, कालक्रमामध्ये ते कालातीत वसणे कधीच शक्य नसते. नूतनाचा उदय होण्यासाठी कालाचा, गताचा अंतच घडून आला पाहिजे. ते नित्यनूतन विचाराच्या सातत्यामध्ये केव्हाही वसत नसते. विचार म्हणजे कालकक्षेमध्ये अव्याहत चालत राहणारा मनोव्यापार. अशा मनोव्यापाराला किंवा विचाराला कालातीत असणारी अवस्था ही आपल्यामध्ये कशी बरे सामावून घेता येईल ? विचार हा नेहमी गतावर, भूतावर आधारलेला असतो. तो पूर्णपणे कालक्रममय असतो. काल हा केवळ क्रमयुक्त असाच नसतो. तर काल हा भूतातून निघून, वर्तमानामधून भविष्याकडे चालत जाणारा विचाराचा व्यापार असतो. स्मृतीच्या रूपात, शब्दाच्या, प्रतीकाच्या किंवा चित्राच्या रूपात अथवा आलेखाच्या वा पुनरावृत्तीच्या रूपात चालत राहणारा विचाराचा व्यापार म्हणजेच काल. विचार वा स्मृती यांचे सातत्य शब्दाच्या वा पुनरावृत्तीच्या द्वारा अव्याहत चालू असते. अशा या अव्याहत चालणाऱ्या विचाराचा अंत म्हणजेच त्या नित्यनूतनाचा प्रारंभ, विचाराचे मरण म्हणजेच अमर जीवन. नित्यनूतनाचा उदय होण्यासाठी, गताचा वा भूताचा सदैव अस्त होत गेला पाहिजे. नित्यनूतन हे केव्हाही सातत्यात्मक नसते. ते कालाच्या कक्षेत कधीही सामावले जाऊ शकत नसते. क्षणाक्षणाच्या मरणातच ते नित्यनूतन वसत असते. त्या अज्ञाताचा, त्या नित्यनूतनाचा उदय होण्यासाठी दररोजच गताचे मरण घडून आले पाहिजे. अंतातच प्रारंभ असतो. पण हा अंत घडून येण्यास भीतीचाच अडथळा आड येत असतो.

"माझ्या मनात भीती आहे हे मला माहीत आहे. पण तिच्या पलीकडे काय आहे हे मात्र मला माहित नाही."

भीतीचा तुम्ही काय अर्थ करता ? भीती म्हणजे काय वरे असते ? भीती हे काही एकादे अमूर्त तत्त्व नव्हे. कोणत्याही विशिष्ट गोष्टीशी संबद्ध नसणारी भीती किंवा निरपेक्ष भीती अशी वस्तूच नसते. कुठल्यातरी विशिष्ट गोष्टीच्या संबंधानेच भीती अस्तित्वात येत असते. असा संबंध घडून येत असताच भीती मूर्तरूप धारण करीत असते. संबंधनिरपेक्ष अशी भीती असूच शकत नाही. तेव्हा तुम्हांला नेमकी कशाची भीती वाटत आहे हे आता सांगा वरे. आपल्याला मृत्यूची भीती वाटते असे तुम्ही म्हणत आहात. पण मृत्यूचा तुम्ही काय अर्थ करता ? मृत्यूसंबंधीच्या उपपत्ती कितीही असल्या, यासंबंधी केवढ्याही विकल्पित कल्पना असल्या, प्रत्यक्ष दिसून येणाऱ्या अशा या संबंधीच्या कितीही वास्तव घटना असल्या, तरी मृत्यू हा अजून मानवाला अज्ञात असाच राहिलेला आहे. मृत्यूसंबंधी आपल्याला कसलेही ज्ञान असले, तरी प्रत्यक्ष मृत्यू ही ज्ञाताच्या कक्षेत आणता येण्याजोगी वस्तूच नव्हे. मृत्यू हातात पकडण्यासाठी आपण हात पसरतो खरे. पण तो आपल्या हाती कधीच सापडत नाही. सर्व प्रकारची स्मृतिसंलग्नता ही नेहमी ज्ञाताच्या कक्षेतीलच वस्तू असते. पण ते अज्ञात मात्र या ज्ञाताच्या, या परिचिताच्या कक्षेत केव्हाही आणता येत नसते. सवयीच्या साह्याने किंवा पूर्वपरिचयाच्या आधाराने हे अज्ञात आपल्याला आपल्या कक्षेत आणता येणे अशक्य असते. म्हणूनच आपल्याला त्याची भीती वाटते.

आपल्या या मनाला, या ज्ञाताला त्या अज्ञाताचे कधीतरी आकलन होऊ शकेल का ? त्याला आपल्यामध्ये कधीतरी सामावून घेता येईल का ? पकडून ठेवण्यासाठी पुढे केलेल्या हाताला ज्ञेयच काय ते प्राप्त होऊ शकेल. ते अज्ञेय त्याला कधीही पकडून ठेवता येणार नाही. आपल्या यासंबंधीचा काही अनुभव यावा अशी अभिलाषा बाळगणे म्हणजे आपल्या विचाराला सातत्य प्राप्त करून देणे होय; गतालाच वळ प्राप्त करून देणे होय; ज्ञाताचा अधिकाधिक विस्तार चालू ठेवणे होय. तुम्हाला मृत्यूचा अनुभव घेण्याची इच्छा आहे, होय की नाही ? जीवन जगत असतानाच, मृत्यू म्हणजे काय हे समजून घेण्याची तुम्हांला इच्छा आहे. पण जीवन खरोखर जगणे म्हणजे काय, हे तरी तुम्हाला समजते का ? संघर्ष, संभ्रम, शत्रुत्व, क्षणिक सुख व क्षणिक दुःख या स्वरूपातच तुम्हांला जीवन जाणवते. पण हेच का जीवनाचे यथार्थ स्वरूप आहे ? सदैव धडपड व अव्याहत दुःख म्हणजेच का जीवन आहे ? धडपडीच्या व दुःखमयतेच्या या अवस्थेला आपण जीवन हे नाव देत असतो व हे असे जीवन जगत असतानाच आपल्या जाणिवेच्या कक्षेत न येऊ शकणारे असे जे, ते आपण अनुभवू इच्छितो. आपली ही व्यथा, ही धडपड, आनंदाच्या आवरणाखाली झाकला गेलेला आपला हा द्वेष–याला आपण जीवन हे नाव देत असतो. आणि ज्याला आपण जीवन म्हणतो, त्याच्या पूर्णपणे विरुद्ध असणारे

असे जे काही, ते अनुभविण्याची आपण अभिलाषा बाळगतो. वस्तूतः ते विरुद्ध, म्हणजे जे प्रत्यक्ष आहे, त्याचेच किंचित सुधारलेले असे सातत्यात्मक स्वरूप असते. पण मृत्यू हे काही ते विरुद्ध नव्हे. मृत्यू म्हणजे ते अज्ञात. आपल्या या जीवनाला, या ज्ञाताला त्या अज्ञाताचा, त्या मृत्यूचा अनुभव घेण्याची लालसा असते. पण या ज्ञाताने काय वाटेल ते केले, तरी त्या अज्ञाताचा त्याला अनुभव येणे सर्वस्वी अशक्य असते. आणि म्हणूनच या ज्ञाताला भीती धरून वसत असते – असेच आहे ना तुमच्या भीतीचे स्वरूप ?

" आपण सारे काही इतके स्पष्टपणे मांडून दाखविले आहे ! जीवन जगत असतानाच मला जर मृत्यूचा अनुभव येईल, किंवा त्याचे योग्य आकलन होईल तर माझी भीती खात्रीनेच नाहीशी होईल. "

तुम्हांला मृत्यूचा अनुभव जिवंतपणी घेता येत नाही म्हणून त्याची भीती वाटते. पण हे ध्यानात घ्या की, सवोध मनाच्याद्वारा जी अवस्था अस्तित्वात आणणे अशक्य असते, त्या अवस्थेचा अनुभव सवोध मनाला येणे शक्य तरी आहे का ? जे जे अनुभवले जाते, तो तो सवोध मनाचा, त्या ज्ञानाचाच विक्षेप असतो. ज्ञाताला केवळ ज्ञाताचाच अनुभव येणे हे शक्य असते. अनुभव हा नेहमी ज्ञाताच्या कक्षेतच वावरत असतो. ज्ञाताच्या कक्षेच्या बाहेर जे असते ते ज्ञाताला अनुभवण्यास मिळणे हे सर्वस्वी अशक्य असते. पण निखळ अनुभवणे ही अवस्था मात्र अनुभवाहून सर्वस्वी वेगळ्या स्वरूपाची अवस्था असते. निखळ अनुभविण्याची अवस्था ही अनुभवित्याच्या कक्षेत येणारी अवस्था नसते. जेव्हा निखळ, साक्षात अनुभविण्याची अवस्था ओसरू लागते, तेव्हाच अनुभविता व अनुभव हे तेथे अवतरतात आणि मग ते साक्षात अनुभविणे हे अनुभवाच्या, ज्ञाताच्या कक्षेत खेचून आणले जाते. मग त्या ज्ञात्याला, त्या अनुभवित्याला त्या निखळ अनुभविण्याच्या अवस्थेची त्या अज्ञाताची लालसा उत्पन्न होते. पण या ज्ञात्याला, या अनुभवित्याला निखळ अनुभविण्याच्या अवस्थेत प्रवेश करता येणे अशक्य असल्यामुळे तो भीतीग्रस्त होऊन जातो. वस्तुतः ही भीती म्हणजे तो स्वतःच असतो. तो त्या भीतीहून वेगळा नसतो. भीतीचा अनुभव घेणारा हा भीतीहून वेगळा नसतो. भीतीचा अनुभव घेणारा हा भीतीचे अवलोकन करणारा मुळीच नसतो. तो स्वतःच भीतीरूप असतो. त्या भीतीचे जो साधन, भाजन होऊन वसलेला असतो.

" भीती म्हणजे आपल्या दृष्टीने असते तरी काय ? मला मरणाची भीती वाटते, हे मला माहीत आहे. पण मी स्वतःच भीती आहे असे काही मला जाणवत नाही. कशाची तरी मला भीती वाटते, हे निश्चित. मला भीती वाटत आहे व मी भीतीपासून वेगळा आहे; जो अहं या भीतीचे अवलोकन करीत आहे, तिचे विश्लेषण करीत आहे, त्याच्याहून भीतीची भावना ही सर्वस्वी वेगळी आहे, अशी

माझी धारणा आहे. मी द्रष्टा आहे व भीती हे दृश्य आहे. द्रष्टा व दृश्य ही एकच कशी असू शकतील ? "

तुम्ही द्रष्टा आहात व भीती हे दृश्य आहे, असे तुमचे म्हणणे आहे. पण वस्तुस्थिती अशीच आहे का ? तुम्ही स्वतः, तुमचा अहं ही तुमच्या गुणधर्माहून वेगळी अशी वस्तू आहे का ? तुम्ही व तुमचे गुणधर्म हे एकरूपच नाहीत का ? तुम्ही स्वतः म्हणजेच तर तुमचे विचार, तुमच्या भावना इत्यादी असेच नाही का ? तुमचे विचार व तुमचे गुणधर्म यांच्याहून वस्तुतः तुम्ही वेगळे नाही. तुमचे विचार म्हणजेच तुम्ही स्वतः तुम्ही किंवा तुमचा अहं. या तथाकथित भिन्न वस्तूची निर्मिती विचार हाच करीत असतो. विचारावाचून या विचारकाला, या अहंला कसलेही वेगळे अस्तित्व नसते. विचाराला स्वतःचे अशाश्वतत्व, क्षणभंगुरत्व जाणवते. म्हणूनच तो त्या तथाकथित शाश्वत व सातत्यमय अशा विचारकाची निर्मिती करीत असतो. आणि मग हा विचारक त्या अशाश्वत विचाराहून वेगळा असा अनुभविता, द्रष्टा व विश्लेषक बनतो. आपणा सर्वांनाच कोणत्यातरी स्वरूपाच्या शाश्वततेची तीव्र लालसा असते. आणि सभोवताली सगळीकडे अशाश्वततेच दृष्टीस पडत असल्यामुळे या तथाकथित शाश्वत अशा विचारकाची निर्मिती विचार हाच करीत असतो. मग हा विचारक अधिक शाश्वत अशा उच्चतर अवस्थांची – आत्मा, परमात्मा, इत्यादिकांची – निर्मिती करीत राहतो. आणि या सगळ्या गगनचुंबी इमारतीचा पाया म्हणजे केवळ विचार हाच असतो. पण क्षणभर हे सारे बाजूला सारू या. आपल्याला सध्या भीतीच्या प्रश्नाशी कर्तव्य आहे. तेव्हा भीती म्हणजे काय हे आता पाहू या.

तुम्हांला मरणाची भीती वाटते, असे तुम्ही म्हणता. मरण तुम्हाला जीवंतपणी अनुभविता येत नाही, म्हणून तुम्हांला त्याची भीती वाटत आहे. मरण हे अज्ञात आहे आणि अज्ञाताचीच तुम्हाला भीती वाटत आहे; असेच आहे ना तुमचे म्हणणे ? पण हे पाहा की, तुम्हाला ज्याचे ज्ञान नाही, त्याची तुम्हाला कधीतरी भीती वाटू शकेल का ? तुम्हाला पूर्णपणे अज्ञात असे जर काही असेल, तर त्याची तुम्हाला भीती कशी वरे वाटेल ? वस्तुस्थिती अशी आहे की, तुम्हाला जी वाटत आहे ती अज्ञाताची भीती नव्हे, ती मरणाची भीती नव्हे; तर जे जे ज्ञात आहे, त्याचा मरणाने अंत होईल, ही तुमची भीती आहे. ज्ञाताचा अंत घडून आल्याने आपल्याला दुःख होईल, आपले सुख नाहीसे होऊन जाईल, आपली अभिलाषापूर्ती मध्येच थांबून जाईल – या विचाराने तुम्हाला खरी भीती वाटत आहे. जे ज्ञात असते, तेच भीति उत्पन्न करीत असते; अज्ञात हे कधीही भीती उत्पन्न करीत नसते. जे अज्ञात आहे ते भीती कशी वरे निर्माण करील ? जे अज्ञात असते, ते सुखदुःखांच्या मापाने कधीच मोजता येत नसते. कारण ते सर्वस्वी अज्ञात असेच असते.

भीती ही निरपेक्ष अशी कधीच नसते. कशाच्या तरी संबंधानेच ती उत्पन्न होत असते. अस्तुस्थिती अशी आहे की, जे तुम्हाला ज्ञात आहे, त्याचा मरणाशी जो संबंध आहे, त्याचीच तुम्हाला भीती वाटत आहे; होय की नाही ? तुम्ही आपल्या गतानुभवाला, त्या ज्ञाताला बिलगून बसलेले आहात; म्हणूनच भविष्यात काय होईल याची तुम्हाला भीती वाटत आहे. पण भविष्यात काय घडून येईल, यासंबंधीची तुमची नुसती कल्पनाच आहे. नुसती प्रतिक्रियाच आहे. जे प्रत्यक्ष आहे, जे वास्तव आहे, त्याच्या विरोधात उभा राहणारा तो केवळ एक अंदाज आहे. अशीच वस्तुस्थिती नाही का सांगा बरे ?

" होय. आपण म्हणता ते बरोबर आहे असे वाटते."

जे प्रत्यक्ष आहे. त्याचे तुम्हाला ज्ञान आहे का ? त्याचे तुम्हाला यथार्थ आकलन झाले आहे का ? आपले ज्ञाताचे कपाट उघडून त्यात तुम्ही कधी डोकावून पाहिले आहे का ? या कपाटात आपल्याला काय आढळून येईल कोण जाणे, याचीच तुम्हाला भीती वाटत नसते का ? जे तुम्हाला ज्ञात आहे, जे तुमच्यापाशी आहे, त्याचा तरी तुम्ही कधी खोल शिरून शोध घेतला आहे का ?

" नाही. असा शोध मी आजवर कधीच घेतलेला नाही. जे जे ज्ञात आहे ते ते सर्व मी नुसते गृहीत धरूनच चाललो आहे. सूर्यप्रकाश किंवा पाऊस या गोष्टी जशा आपण गृहीत धरून चालतो, त्याप्रमाणेच सर्व गतानुभव मी गृहीत धरून चाललो आहे, स्वीकृत करून चुकलो आहे. आजवर या गोष्टीचा मी कधी विचारच केलेला नाही. आपल्या पडछायेची जशी आपल्याला जाणीव नसते, त्याचप्रमाणे याही गोष्टीची मला कधी जाणीवच झाली नाही. पण आता आपण या गोष्टीचा उल्लेख केला आहे, तेव्हा या ज्ञाताच्या कपाटात काय काय आहे याचा शोध घेण्याची मला भीतीच वाटू लागली आहे. "

आपल्या स्वतःचे अवलोकन करण्याची आपणापैकी बहुतेकांनाच भीती वाटत असते. कारण जे वास्तव आहे, त्यात आपल्याला दुःखद वाटणाऱ्या अशा गोष्टीही आढळून येतील की काय, अशी शंका आपणास वाटत असते. म्हणूनच या कपाटात डोकावून न पाहता त्याविषयी अज्ञानात राहणे हेच आपणांस सोइस्कर वाटते. वस्तुस्थिती अशी आहे की, भविष्यात काय दडले आहे, याचीच आपणांस भीती वाटते असे नसून, वर्तमानात काय काय दडले असावे, याचीही आपल्याला भीती वाटत असते. आपण वस्तुतः जसे आहोत, तसेच आपले स्वरूप जाणून घेण्याची आपल्याला भीती वाटते. वास्तव स्वरूपाकडे पाहाण्याची आपण अशी टाळाटाळ करीत असतो, म्हणूनच भविष्यात काय होईल याची आपणांस भीती वाटत राहते. जे तथाकथित ज्ञात असते, त्यांच्याकडेही आपण भीतीच्या डोळ्यांनीच पाहत असतो आणि त्या अज्ञाताकडे, त्या मृत्यूकडेही आपण भीतीच्याच नेत्रांनी पाहत

असतो. जे प्रत्यक्ष आहे, त्याची टाळाटाळ करणे म्हणजे इच्छापूर्तीची अभिलाषा जोपाशीत राहणेच होय. आपण सर्वजण अहर्निश सुरक्षिततेच्याच मागे लागलेले असतो. जीवन विचलित करून टाकणारे असे काहीही होऊ नये, अशीच आपली सदैव मागणी असते. विचलित करणारे काहीही घडू नये, ही जी आपली अभिलाषा असते, तीच आपल्याला जे वास्तव आहे, त्याच्याकडे डोळेझाक करण्यास भाग पाडते. आणि तिच्यामुळेच भविष्यात काय घडून येईल यासंबंधीची भीती आपणांस ग्रासून टाकीत असते. प्रत्यक्षाचे अज्ञान म्हणजेच भीती. या अज्ञानामुळेच आपले संपूर्ण जीवन भीतिग्रस्त अवस्थेतच राहते.

" पण मग माणसाने भीतिमुक्त व्हावयाचे तरी कसे ? "

ज्याच्यापासून आपणांस मुक्त व्हावयास हवे असते, त्याचे आपण यथार्थ आकलन करून घेतले पाहिजे. वास्तवाचे दर्शन न घेण्याचीच केवळ इच्छा तुमच्या मनात आहे का ? की तुमच्या मनात केवळ भीतीच ठाण मांडून बसली आहे ? वस्तुत: वास्तवाचे दर्शन न घेण्याची इच्छाच भीतीला जन्म देत असते. आणि वास्तवाचे संपूर्ण आकलन करून घेण्याची जेव्हा आपल्याला इच्छा नसते, तेव्हा भीती हीच या आकलनाच्या आड येत राहते. वास्तवाकडे जाणूनबुजून डोळेझाक करीत राहण्याने तुम्हाला जीवनात इच्छातृप्ती लाभेल. बहुतेकजण नेमके हेच करीत असतात. पण अशांना सौख्य मात्र कधीच लाभत नसते. त्याचप्रमाणे जे वास्तव आहे त्याचा, वा प्रत्यक्षाचा जे वरवरचा अभ्यास करतात, त्यांनाही सौख्य लाभत नसते. पण प्रत्यक्षाचा शोध घेण्याची ज्यांना खरोखरीची तळमळ असते, त्यांनाच खऱ्या सौख्याची जाणीव होऊ शकते. अशांनाच भीतीपासून मुक्तता प्राप्त होऊ शकते.

" पण जे वास्तव आहे, त्याचे आकलन तरी कसे करून घ्यावयाचे ? "

वास्तवाचे दर्शन हे आपल्या विविध संबंधांच्या आरशात करून घ्यावयाचे असते. सर्वांपासून दूर जाऊन बसण्याने, पृथक होऊन जाण्याने वास्तवाचे आकलन होणे शक्य नसते. वास्तवाचा धिक्कार करणारा वा स्वीकार करणारा भाष्यकार असा जो आपला अहं हा जोवर अस्तित्वात असतो, तोवर वास्तवाचे आकलन होणे हे सर्वस्वी अशक्य असते. मन जेव्हा पूर्णपणे अक्रिय असते, वास्तवाच्या बाबतीत ते कोणतीही कृती करीत नसते, तेव्हाच वास्तवाचे आकलन होऊ शकते.

" पण अक्रियपणे वास्तवाचे अवधान ठेवणे हे अतिशय अवघड नाही का ? "

होय. जोवर विचार चालूच राहील, तोवर हे अवघड होऊन बसेल हे निश्चित.

विचारक आणि विचार यांची एकरूपता

ते तळे लहानसेच असले तरी मोहक होते आणि त्याच्या काठाकाठाने चहूबाजूंना हिरवळ पसरलेली होती. एका बाजूला पाण्यापर्यंत पोहचणाऱ्या पायऱ्या होत्या. आणि दुसऱ्या टोकाला एक लहानसेच पांढरेशुभ्र देऊळ होते. उंच उंच तालवृक्षांनी देवळाला चारी बाजूंनी वेढून टाकले होते. देवळाची बांधणी जशी नीटस होती तशीच त्याची देखरेखही उत्तम प्रकारे करण्यात येत होती. त्याची स्वच्छताही वाखाणण्यासारखी होती. तालवृक्षांच्या वरपर्यंत सूर्य आलेला असताही तेथे कुणी आलेले दिसत नव्हते. देवळाचा पुजारीही आला नव्हता. पण देवळाविषयी व आतील सर्व वस्तूंविषयी त्याला अतिशय आदर व श्रद्धा वाटत होती, हे सहज दिसून येत होते. काठावरील या शोभिवंत मंदिरामुळे, त्या तळ्यालाही एक प्रकारचे शांत सोज्वळ वातावरण प्राप्त झाले होते. तेथे विलक्षण शांती व नीरवता नांदत होती. तेथला पक्षिवृंदही शांत, निःशब्द होता. तालवृक्षांना किंचित आंदोलित करीत राहणारी वाऱ्याची झुळूकही आता शांत झाली होती. मावळत्या सूर्यप्रकाशाने रंगलेले विरळ विरळ मेघ आकाशात तरंगत होते. तळ्यातील कमलपत्रांमधून वाट काढीत काढीत एक साप इकडच्या काठाकडे पोहून येत होता. त्या स्वच्छ, निर्मल जलाशयात गुलाबी व जांभळ्या रंगांची कमलपुष्पे डोलत होती. त्यांचा मृदुमंद परिमल किनाऱ्याच्या हिरव्यागार परिसरातच दरवळत होता. वातावरणात आता कसलेही स्पंदन उरलेले नव्हते. त्या अतीव रमणीय स्थळाच्या मोहिनीने सारी वसुंधरा भारून गेल्यासारखी वाटत होती. त्या कमलपुष्पांचे सौंदर्यही किती विलक्षण मोहक होते ! ती सगळी शांत, निश्चल होती. एकदोन तर मिटूही लागली होती. रात्रीचा काळोख त्यांना जणू काही बाहेरच्या बाहेरच ढकलून द्यावयाचा होता. साप आता तळ्यातून पोहून काठावर आला होता. तो जवळून जाऊ लागला, तेव्हा त्याचे डोळे काळ्याकाळ्या चमकदार मण्यांसारखे दिसत होते. आणि त्याची ती दुभंगलेली जीभ त्याला पुढचा मार्ग दाखविण्यासाठी एखाद्या ज्वालेसारखी त्याच्यासमोर वळवळत होती.

कल्पना व विकल्पन हे सत्यदर्शनाच्या मार्गातील सर्वांत मोठे अडथळे होत. जे मन विकल्पनांतच गुरफटलेले राहते, त्याला जे प्रत्यक्ष आहे, त्याचे सौंदर्य आकळणे कधीच शक्य नसते. स्वतःच्या कल्पनेने निर्माण केलेल्या प्रतिमात व शब्दात ते अडकून गेलेले असते. पण उत्तुंग कल्पना-भरारीत ते कितीही दूरदूर वा उंचउंच जाऊ शकले, तरी आपल्या निर्मितीच्या संकुचित मर्यादेतच ते सदैव घोटाळत राहते. त्यामुळे आपल्या मर्यादेच्या पलिकडे जे असते, त्याचे दर्शन होणे हे त्याला सर्वस्वी

अशक्य असते. संवेदनशील मन हे मात्र कल्पनेत रमणारे मन नसते. प्रतिमा निर्माण करण्याची जी मनाची शक्ती असते, तिच्यामुळेच मनाला मर्यादा पडत असते. असे हे मर्यादित मन गताशी वा भूताशी वा स्मृतीशी जखडलेले असते. आणि त्यामुळेच ते संवेदनशून्य बनते. मनाने कुठल्याही प्रकारचे संपादन केले, तरी ते त्याला भारभूतच होऊन बसते. निःस्तब्ध मन हेच संवेदनक्षम मन असते. असे हे गताच्या ओझ्याखाली वाकलेले मन विमुक्त कसे बरे होऊ शकेल? विमुक्त मन हेच संवेदनक्षम असते. जे खुले, जे प्रांजल असते, तेच अचिंतनीय असते. तेच अंतर्निहित, तेच अज्ञात असते. अशा या विमुक्ताला, या संवेदनशीलाला कल्पना व विकल्पन हे सदैव प्रतिबंध करीत राहतात.

भेटीस आलेला गृहस्थ आपली कथा सांगत होता. सत्याचा शोधार्थ त्याने अनेक वर्षे घालविली होती. अनेक गुरूंकडे जाऊन पाहिले होते. आणि त्याची सत्यसंशोधनाची यात्रा अजूनही चालूच असल्यामुळे, या शोधासाठीच तो आता येथे आला होता. उन्हातान्हात हिंडत दूरदूर प्रवास करीत राहिल्यामुळे त्याची शरीरयष्टी काळवंडून कृश बनून गेली होती. स्वतःचा खूप दूरचा देश सोडून तो येथे आला व सर्वसंगपरित्याग करून तपस्व्याचे जीवन जगत होता. काही विशिष्ट कष्टप्रद साधनांचे अनुशासन त्याने अनेक वर्षे स्वीकारले होते. आणि त्यामुळे चित्ताची एकाग्रता करण्यास तो शिकला होता. आपल्या वासनांचे व अभिलाषांचेही त्याने दमन केले होते. तो विद्वान होता व नाना वचने व उद्धरणे त्याच्या जिव्हाग्रावर नाचत होती. चर्चा करण्यात जसा तो प्रवीण होता, तसा चटकन निर्णय घेण्यातही होता. त्याने संस्कृतचेही अध्ययन केले होते. संस्कृतातील नादगंभीर उद्धरणे त्याच्या भाषणाच्या ओघात सहज येत होती. या सर्व गोष्टींमुळे त्याच्या बुद्धीला एक प्रकारची विशेष तीक्ष्णता व कुशाग्रता प्राप्त झालेली होती.

पण असे हे तीक्ष्ण व कुशाग्र बनलेले मन मृदू, लवचिक व विमुक्त असे असत नाही. सत्याचा शोध करण्यासाठी, किंवा सत्य आकळून घेण्यासाठी मन हे प्रारंभीच विमुक्त व स्वतंत्र असे असावयास नको का? अनुशासनाने बद्ध व निरुद्ध केले गेलेले मन हे कधीतरी विमुक्त होऊ शकेल का? विमुक्तता हे अंतिम साध्य नसते, तर विमुक्तता ही प्रारंभीच असावी लागते; होय की नाही? अनुशासित किंवा नियंत्रित केले गेलेले मन हे आपल्या विशिष्ट साच्याच्या किंवा प्रबंधाच्या कक्षेतच मुक्त व स्वतंत्र असते. पण ही खरी मुक्तता नव्हे. विशिष्ट प्रबंधाशी जुळते घेणे, हेच अनुशासनाचे अंतिम लक्ष असते. अनुशासनाचा मार्ग हा ज्ञाताकडेच जाणारा मार्ग असतो. आणि जे जे ज्ञात, ते ते कधीच विमुक्त असू शकत नाही. वस्तुतः अनुशासन व त्या संबंधीची भीती हे दुसरे काही नसून काहीतरी संपादन करण्याचा तो केवळ लोभ असतो.

" सर्वच प्रकारच्या अनुशासनांमध्ये मूलभूत दृष्टीने काहीतरी चुकीचे आहे, या गोष्टीची मला आताशा जाणीव होऊ लागली होती. समोर ठेवलेल्या विशिष्ट प्रबंधानुसार आपल्या विचारांना वळण लावण्यात मी जरी अनेक वर्षे घालविली असली, तरी माझ्या हाती काही आले आहे, असे मात्र मला मुळीच वाटत नाही. "

हे ध्यानात घ्या की, साधन हे जर अनुकरणरूप असेल, तर साध्य हीही कशाची तरी नक्कलच राहणार. वस्तुतः साधन हेच साध्य घडवीत असते, होय की नाही ? प्रारंभापासूनच जर मनाला विशिष्ट वळण लावले जात असले, तर अखेरही मन त्या वळणातच, त्या पूर्व संस्कारातच बद्ध होऊन बसेल. असे हे पूर्व संस्कारबद्ध मन मग विमुक्त कसे बरे होऊ शकेल ? वस्तुतः साधन व साध्य या दोन भिन्नभिन्न प्रक्रिया नसतात. चुकीच्या साधनाच्या द्वारा आपल्याला सत्य हस्तगत करता येईल असे मानणे हा निव्वळ भ्रम आहे. निरोध किंवा नियंत्रण हे जेथे साधन असते, तेथे साध्य किंवा शेवट हाही निरोधनियंत्रणाचाच अथवा भीतीचाच प्रकार राहणार.

" मगळेच अनुशासन प्रकार हे सध्याच्या दृष्टीने अपूर्ण व अक्षम आहेत अशी अस्पष्टशी भावना साधना करीत असतानाही माझ्या मनात तरळत आली आहे. आजही ती भावना कायम आहे. पण आता मात्र साधना ही अबोध मनात दडून बसून माझी एक सवयच होऊन बसली आहे; एवढेच काय ते. कुठल्यातरी विशिष्ट साच्याशी जुळवून घेत राहण्याचे शिक्षण मला बाळपणापासूनच मिळत आले होते. त्यामुळे ही भगवी वस्त्रे धारण केल्यापासून अनुशासनाचे पालन करणे हा माझा जवळजवळ सहज-धर्मच होऊन बसला आहे. या संबंधीची जी जी पुस्तके मी वाचली व यासाठी ज्या ज्या गुरूंची मी भेट घेतली, ते सर्व कुठल्या ना कुठल्या स्वरूपात दमनाचा, निरोधाचाच आदेश देत आले आहेत. आजवर या अनुशासनांचे पालन मी केवढ्या कसोशीने करीत आलो आहे, याची आपल्याला कल्पनाही येणार नाही. आजवरची वस्तुस्थिती ही अशी असल्यामुळे आपण जे आता अनुशासनासंबंधी सांगितले ते सर्व अधार्मिक असे पाखंड आहे की काय, असे मला वाटू लागले आहे. माझ्या मनाला यामुळे खरोखरच फार मोठा धक्का बसला आहे. पण आपण सांगता ते सत्य आहे ही गोष्ट अगदी स्पष्ट आहे. मग माझी आजवरची सारी वर्षे अगदी व्यर्थच गेली का ? "

ती व्यर्थ गेली असती; तुमच्या आजवरच्या सर्व प्रखर साधनांमुळे सत्य ग्रहण करण्यास व त्याचे आकलन होण्यास जर आता प्रतिबंध निर्माण झाला असता, या साधनरूपी प्रतिबंधांचे तुम्ही सुबुद्धपणे अवलोकन करीत राहिला नसता, त्यांचे सखोल आकलन करून घेतले नसते, तर मात्र तुमची आजवरची सर्व वर्षे व्यर्थ गेली असती. आपल्या विकल्पित निष्ठांमध्ये आपण सर्वजण इतके खोल रुतून गेलेलो असतो की, डोळे उघडे ठेवून या विकल्पित निष्ठांकडे पाहण्याची किंवा त्यांच्या

पलीकडे दृष्टीक्षेप करण्याची बहुतेकांना हिमतच होत नाही. आकळून घेण्याची उत्कृष्ट प्रेरणा हाच तर विमुक्ततेचा वा स्वातंत्र्याचा प्रारंभ असतो. तर मग आता तुमची समस्या कोणती आहे ते सांगा बरे ?

" मी सत्याचा शोध करीत आहे आणि विविध अनुशासनाच्या द्वारा हे साध्य गाठण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. सत्याचा शोध करावा व ते प्राप्त करून घ्यावे हीच माझी सखोल अशी आंतरिक प्रेरणा आहे. दुसऱ्या कोणत्याही गोष्टीचे मला महत्त्व वाटत नाही."

हे पाहा, जे जवळ आहे, त्याच्यापासूनच प्रारंभ करू या व या रीतीनेच सहजपणे दूरपर्यंत पोहचू या. तुमच्या दृष्टीने शोध म्हणजे नेमके काय आहे सांगा बरे ? सत्य प्राप्त करून घेण्याचा का तुमचा हेतू आहे ? पण सत्य हे शोध करण्याने कधीतरी सापडत असते का ? सत्याचा शोध करणे म्हणजे सत्य हे काय आहे हे आधीच ठामपणे ठरवून टाकणे होय. ज्याचा आपणांस शोध करावयाचा असतो, त्याचे आपणास पूर्वज्ञान असते; त्यासंबंधीचा काहीतरी अनुभव आपणांस येऊन चुकलेला असतो; असाच अर्थ शोध या शब्दाने ध्वनित होत नाही का ? पण सत्य ही जाणून घेण्यासारखी, प्राप्त करून घेण्याजोगी किंवा धरून ठेवण्यासारखी अशी काही वस्तू आहे का ? सत्याचा माणसाला जो भास होत असतो, तो त्याच्या गतानुभवांचाच विक्षेप असतो. आणि म्हणूनच ती केवळ एक स्मृती असते, ते सत्य नसते. अशीच वस्तुस्थिती नाही का ? शोध या शब्दाने आंतरिकाकडे वा ब्रह्माकडे जाणारी प्रक्रिया असाच अर्थ सूचित होतो. पण वस्तुतः सत्यदर्शन होण्यासाठी मन संपूर्णपणे शांत व निःशब्द असणेच आवश्यक नाही का ? शोध म्हणजे काय बरे असते ? तर काहीतरी अधिक मिळविण्यासाठी किंवा काहीतरी कमी करण्यासाठी केला जाणारा प्रयत्न. शोध म्हणजे भावात्मक वा अभावात्मक असे प्राप्तव्य मिळविण्याची लालसा. मन हे जोवर अशा प्रकारच्या प्रयत्नांचे किंवा संघर्षांचे केंद्र बनून राहील, तोवर ते निःस्तब्ध होणे शक्य तरी आहे का ? प्रयत्नांच्या साह्याने मन हे खऱ्या अर्थाने कधीतरी स्तब्ध होऊ शकेल का ? ते जबरीने स्तब्ध केले जाऊ शकेल हे खरे आहे. पण जे जे जबरीने घडविले जाते, त्याचे विघटनही लवकर होऊ शकते.

" पण कोणत्या तरी प्रकारचा प्रयत्न हा आवश्यकच नसतो का ?"

तेच आता आपण पाहू या· शोध करण्याची जी वास्तव प्रक्रिया आहे, तिची आपण प्रथम चौकशी करून पाहू या. कशाचेही अन्वेषण करण्यासाठी, कशाचाही शोध करण्यासाठी ज्याचा शोध करावयाचा, त्या वस्तूपासून भिन्न असा अन्वेषक, शोध करणारा अस्तित्वात असावा लागतो. पण अशी अन्वेषक नामक भिन्न वस्तू खरोखरच अस्तित्वात असते का ? विचारक किंवा अनुभविता हा आपल्या विचारां-

पासून व अनुभवांपासून खरोखरच भिन्न व वेगळचा प्रकारचा असतो का ? या संपूर्ण प्रश्नाचे जर प्रथम अन्वेषण केले नाही, तर ध्यान अथवा योग हा अर्थशून्य होऊन जातो. म्हणून आपण प्रथम मन ही काय वस्तू आहे आणि आपल्या मनाच्या व्यापारांची एकूण प्रक्रिया कशी आहे, हे समजून घेतले पाहिजे. आपले हे जे मन असते, काही तरी संपादन करू पाहाणारे, निवड करणारे, भयभीत होणारे, समर्थन करणारे वा निषेध करणारे असे जे मन आहे, ती वस्तू आहे तरी काय, हे आपण प्रथम पाहू या. विचार म्हणजे तरी वस्तुतः काय असते, हेही पाहू या.

" या प्रश्नाकडे या दृष्टीने मी आजवर कधीच पाहिले नव्हते. त्यामुळे मी आता काहीसा गोंधळून गेलो आहे. पण आपण आपले सांगणे मात्र कृपा करून चालू ठेवावे. "

विचार हे वस्तुतः संवेदनच असते; होय की नाही ? वस्तूचे अवलोकन केल्याने किंवा वस्तूशी संपर्क झाल्यामुळे संवेदन उत्पन्न होत असते. संवेदनातून अभिलाषा उत्पन्न होते. ही अभिलाषा काही विशिष्ट गोष्टींवद्दलच उत्पन्न होत असते; इतरांवद्दल मुळीच नाही. वस्तूविषयी अशी अभिलाषा उत्पन्न होणे, हाच त्या वस्तूशी सारूप्य पावण्याचा प्रारंभ असतो. हे ' माझे ' व ते ' माझे नव्हे, ' असे या अभिलाषेचे व सारूप्याचे स्वरूप असते. शब्दांकित झालेले हे अभिलाषारूप संवेदन म्हणजेच विचार. स्मृती, शब्द, अनुभव व प्रतिमा यांच्या द्वारा जीवनाला दिले जाणारे उत्तर म्हणजेच विचार. पण हा विचार क्षणभंगुर, अशाश्वत व अस्थिर असा असतो आणि म्हणून तो सदैव शाश्वतेच्या पाठीमागे लागलेला असतो. शाश्वततेच्या पाठीमागे लागलेला हा अशाश्वत विचारच विचारकाची निर्मिती करीत असतो. मग या विचारकाला शाश्वतता प्रदान केली जाते. आणि मग गुणदोषनिर्णायक, मार्गदर्शक, नियंत्रक, विचार घडविणारा इत्यादी भूमिका या विचारकाकडे चालत येतात. पण ही तथाकथित शाश्वत मानली जाणारी विचारक नामक भ्रामक वस्तू, वस्तुतः त्या विचाराचीच, त्या अशाश्वताचीच निर्मिती असते. ही वस्तू, हा विचारक म्हणजे केवळ विचारच होय. विचारावाचून या विचारकाला दुसरे अस्तित्वच नसते. हा विचारक अनेक गुणांचा एक संघात असतो. पण त्याचे गुण हे वस्तुतः त्याच्यापासून, म्हणजे विचारापासून वेगळे केले जाऊ शकत नाहीत. नियंत्रित केले जाणारे व नियंत्रण करणारा हे वस्तुतः एकच असतात. पण हा विचारच स्वतःशी हा फसवाफसवीचा खेळ खेळत राहतो, म्हणून या संपूर्ण प्रकारात जे असत्य आहे, जी भ्रामकता आहे तिचे असत्यत्व व तिची भ्रामकता जोवर आकलनात येणार नाही, तोवर सत्याचा उदय होणे शक्य नाही.

" पण मग तो द्रष्टा, तो अनुभविता कोण असतो ? ' मला आकलन होते, ' असे म्हणणारी ती वस्तू म्हणजे काय असते ?"

आपल्या अनुभवांची स्मृती बाळगणारा अनुभविता हा जोवर अस्तित्वात असतो, तोवर सत्य तेथे वसत नसते. सत्य ही काही स्मरण करण्याची, संग्रह करून ठेवण्याची किंवा आलेखित करून ठेवण्याची व नंतर प्रकट करण्याची वस्तू नव्हे. जे जे संग्रहित केले जाते, ते केव्हाही सत्य नसते. अनुभव घेण्याची अभिलाषा हीच अनुभवित्याची निर्मिती करीत असते. मग हा अनुभविता अनुभवांचा संग्रह करीत राहतो व त्यांची स्मृती जोपाशीत राहतो. अभिलाषेमुळेच विचार व विचारक हे परस्परांपासून भिन्न केले जातात. कुणीतरी विशेष होण्याची, काहीतरी अनुभव घेण्याची, काही बाबतीत अधिक होण्याची व काहीमध्ये कमी करण्याची अभिलाषाच अनुभविता व अनुभव यांच्यामध्ये भिन्नता, पृथकत्व उत्पन्न करीत असते. अभिलाषेच्या या विविध व्यापारांचे अवधान राखणे म्हणजे निजज्ञान अथवा अहंज्ञान करून घेणे होय. असे निजज्ञान करून घेत राहणे हाच ध्यानाचा अथवा योगाचा प्रारंभ होय.

"पण विचारक व विचार यांची एकरूपता कशी घडून येईल?"

हे पाहा, इच्छाशक्तीच्या साहाय्याने, अनुशासनाने किंवा कुठल्याही प्रकारच्या प्रयत्नाने, नियंत्रणाने अथवा एकाग्रतेने ही एकरूपता साध्य होऊ शकणार नाही. या कार्यासाठी एखादे साधन उपयोगी पडेल असे मानणे, म्हणजे असा उपयोग करणारा–असा उपयोजक–– गृहीत धरणे होय; होय की नाही? जोवर हा उपयोजक, हा कर्ता, हा अहं अस्तित्वात राहील, तोवर कर्ता व कार्य हा भेद राहीलच. पण मुद्दाम प्रयत्न न करता, मन जेव्हा सहजपणे, संपूर्णपणे शांत व निःस्तब्ध होईल तेव्हाच विचार व विचारक, कार्य व कर्ता यांचे अभिन्नत्व घडून येईल. विचारकाच जेव्हा अंत घडून येतो, तेव्हा नव्हे, तर खुद्द विचाराचाच जेव्हा अंत होतो, तेव्हाच ही निःस्तब्धता अस्तित्वात येऊ शकते. ही निःस्तब्धता अस्तित्वात येण्यासाठी जीवनाच्या कोणत्याही समस्येला वा आव्हानाला पूर्वसंस्कारबद्धतेतून जे उत्तर दिले जात असते, त्याच्यापासून मुक्तता घडून आली पाहिजे. पूर्वसंस्कारबद्धतेतून उद्भवत राहणारे हे उत्तर म्हणजेच विचार. आपणांस जर एखादी समस्या सुटावयास हवी असेल, तर जिच्यात कोणतीही कल्पना नाही, कसलाही निर्णय नाही अशा प्रकारची अवस्था अस्तित्वात आली पाहिजे. कारण कल्पना, निर्णय, विचार हा सर्व त्या अस्थिर व प्रक्षुब्ध मनाचाच व्यापार असतो. पण मन हे असे अस्थिर व प्रक्षुब्ध असताना कशाचेही आकलन होणे, हे कधीतरी शक्य आहे का? असे आकलन होण्यासाठी आपल्या आंतरिक तळमळीच्या जोडीला तरल व सहज अशी स्वयंस्फूर्तताही असली पाहिजे.

आता तुम्हाला जे सांगितले गेले आहे, त्याचे तुम्ही जर नीट श्रवण केले असेल, तर तुम्हाला हे कळून येईल की, आपण ज्या वेळी अपेक्षा करीत नसतो, अशाच क्षणी

सत्य हे एकाएकी सळसळून येते. मला एवढेच तुम्हांला सांगावेसे वाटते की, आपले मन विमुक्त राहू द्या. संवेदनशील असू द्या. जे प्रत्यक्ष आहे, त्याचे क्षणाक्षणाला जागते अवधान असू द्या. खतःभोवती विचारांच्या अभेद्य भिती उभारू नका. मन हे जेव्हा स्वतःच्या व्यापारात व धडपडीत गुंतलेले नसते, तेव्हाच तेथे सत्याचा परमानंद अवतरत असतो.

सत्तेचा पाठलाग

प्रसववेदनांनी ती गाय अतिशय व्याकूळ झाली होती. तिची वार काढणारी तिला खाऊपिऊ घालणारी व तिचा गोठा साफ करणारी माणसे तिच्याजवळच उभी होती. तिचे त्यांच्याकडे सारखे लक्ष होते. त्यामुळे त्यांच्यापैकी एखादा काही कामासाठी जरा इकडे तिकडे गेला की, ती लगेच आपल्या हंबरण्याने त्याला बोलावून आणी. आपल्या या कष्टप्रद प्रसंगाच्या वेळी आपले सारे सोबती आपल्याजवळ असावे असे तिला वाटत होते. आता ते सर्व तिच्याभोवती जमल्याने तिला बरे वाटत होते. तिच्या प्रसूतिवेदना मात्र वाढतच चालल्या होत्या. लवकरच तिने एका गोंडस कालवडीला जन्म दिला. अंमळशाने गाय उठून उभी राहिली व आपल्या नवजात बालकाच्या अवतीभोवती हिंडू लागली. त्याला हलकेच प्रेमाने ढुसण्या देऊ लागली. तिला इतका काही आनंद झाला होता की, आपल्या बालकाजवळ ती आम्हापैकी कुणालाही येऊ देत नव्हती. बाळाचे हे कौतुक बराच वेळ चालले होते. अखेर ती दमून गेली. पिलाला आम्ही तिच्या स्तनापाशी नेले. पण ती आनंदाने बावरल्यासारखी झाली होती. थोडया वेळात ती शांत झाली. आणि मग मात्र ती आम्हाला आपल्याजवळून मुळीच हलू देईना. इतक्यात जवळच्या स्त्रियांपैकी एकजण तिच्याजवळच जमिनीवर बसली. त्याबरोबर त्या नवप्रसूत मातेने आपले डोके तिच्या मांडीवर टेकले. एकाएकी आपल्या नवजात बालकाविषयीचे तिचे कौतुक ओसरले. आणि आपली काळजी घेणाऱ्या मित्रांचेच तिला महत्त्व वाटू लागले. आतापर्यंत हवा अतिशय थंड होती. पण आता टेकड्यांमागून सूर्य वर येताना दिसत होता. आणि हवेत थोडीशी ऊब येऊ लागली होती.

भेटण्यास आलेला गृहस्थ मंत्रिमंडळांतील एक मंत्री होता. आपल्या महत्त्वाची त्याला पूर्ण जाणीव होती. व त्यामुळेच की काय त्याला किंचितसा संकोचही वाटत होता. जनतेसंबंधीच्या आपल्या ज्या जबाबदाऱ्या आहेत, त्यांच्याबद्दल तो बोलत होता. विरोधी पक्षांपेक्षा आपला सत्तारूढ पक्ष कसा श्रेष्ठ आहे, किती कार्यक्रम तो पार पाडीत आहे, भ्रष्टाचार व काळाबाजार नाहीसा करण्यासाठी त्याचे कसे कसे प्रयत्न चालू आहेत, पण स्वच्छ चारित्र्याचे व कार्यक्षम असे लोक मिळणे हे किती कठीण आहे इत्यादी गोष्टी तो सांगत होता. तसेच ज्या ज्या गोष्टी सरकारला करता आल्या नाहीत, त्यांच्याबद्दल सरकारला दोषी ठरविणे हे किती सोपे आहे हेही त्याने सांगून टाकले. मग तो स्वतःकडे वळला आणि आपल्या एवढे जास्त वय झाल्यानंतर माणसाने साऱ्या गोष्टी दमाने घ्याव्या, फारशी धावपळ करू नये, असे मत त्याने व्यक्त केले.

यानंतर तो सांगू लागला की, " बहुतेक माणसे सत्ता मिळविण्याच्याच मागे लागलेली असतात. कार्यक्षमता नसणारी माणसेही सत्ता मिळवू पाहत असतात आपल्या सर्वांच्याच मनात खोल खोल स्वार्थ दडलेला असतो व असंतोषही वसत असतो. धूर्त माणसे मात्र आपला असंतोष व आपली स्वार्थलालसा झाकून टाकीत असतात. सत्तेची ही लालसा आपणामध्ये का बरे असते ?" त्याने शेवटी प्रश्न विचारला.

सत्ता या शब्दाचा आपण काय अर्थ करीत असतो ? प्रत्येक व्यक्ती व प्रत्येक गट हा कुठल्याना कुठल्या सत्तासंपादनाच्या मागे लागलेला असतो. कुणाला स्वतःसाठी सत्ता हवी असते; कुणाला आपल्या पक्षासाठी किंवा आपल्या विशिष्ट विचारप्रणालीसाठी सत्ता हवी असते. वस्तुतः आपला पक्ष किंवा आपली विचार-प्रणाली हा केवळ आपल्या स्वतःचाच विस्तार असतो. तपस्वी जसा आपल्या सर्व-संगपरित्यागाच्या द्वारा सत्ता मिळवू पाहतो, तशी आई मुलाच्या द्वारा मिळवू पाहते. कार्यक्षम व कठोर माणसांपाशी जशी विशिष्ट सत्ता वसत असते, त्याच-प्रमाणे यंत्रांवर मालकी असणाऱ्या माणसांपाशी विशिष्ट सत्ता असते. एका व्यक्ती-वर दुसऱ्या व्यक्तीचे असणारे प्रभुत्व, निर्बुद्धांची हुषार माणसांकडून होणारी पिळणूक, पैशामुळे, नामामुळे व शब्दांमुळे प्राप्त होणारी सत्ता, जडावर चालणारी मनाची सत्ता असे सत्तेचे वेगवेगळे आविष्कार असतात. आपणा सर्वांनांच कसली ना कसली सत्ता वा वर्चस्व हवे असते. स्वतःवर तरी वर्चस्व गाजवायला हवे असते किंवा इतरांवर तरी. सत्तेची ही प्रचोदता आपणा सर्वांमध्ये वसत असते, ती आपणांस एक प्रकारचे सुख मिळवून देत असते; आपल्या इच्छांची पूर्ती करीत असते. हे सुख व ही इच्छापूर्ती अगदीच अल्पजीवी अशीही नसते. त्यामुळे प्राप्त होणारी सत्ता ही संपत्तीमुळे मिळणाऱ्या सत्तेसारखीच असते. इच्छापूर्तीची किंवा सुखाची लालसा, हीच आपणांस सत्ता मिळविण्यास वेगाने प्रवृत्त करीत असते. आणि आपले समाधानही किती चटकन घडून येत असते ! आपली इच्छापूर्ती चटकन घडून येत असल्यामुळेच ती आपल्याला आंधळी बनविते. कोणत्याही प्रकारची इच्छापूर्ती ही माणसाला आंधळी बनविणारीच असते. पण मग आपण सत्तेच्या मागे का बरे लागत असतो ?

" मला वाटते की मुख्य म्हणजे आपणांस सत्तेमुळे शारीरिक सुखसोयी प्राप्त होत असतात; समाजात प्रतिष्ठा व मानमान्यता लाभत असते आणि निरनिराळ्या लोकमान्य क्षेत्रात उच्च स्थान प्राप्त होत असते. म्हणूनच आपण सत्तेच्या मागे लागत असतो. "

पण आपली ही जी सत्तेची लालसा असते, ती केवळ शारीरिक वा भौतिक पातळीपुरतीच मर्यादित असते का ? बाह्य गोष्टींवर जशी आपणांस सत्ता हवी

ग्रंथ संग्रहालय, ... वि: क्रमांक १९६६० ... वि: क्रमांक २२०० ... वि: दि: २१२/५८

असते, तशीच आंतरिक गोष्टीवरही हवी असत नाही का ? का बरे ती हवी असते ? आपण विशिष्ट गोष्टींची सत्ता वा प्रामाण्य हे का बरे मान्य करीत असतो ? का त्याचे पूजन करीत असतो ? मग हे प्रामाण्य वा हा अधिकार एखाद्या पवित्र ग्रंथाचा असो, एखाद्या व्यक्तीचा असो, प्रस्थापित शासनसंस्थेचा असो किंवा एखाद्या निष्ठेचा असो. एखाद्या व्यक्तीला, एखाद्या तत्त्वाला किंवा एखाद्या कल्पनेला विलगून वसण्याची ही प्रवृत्ती आपणामध्ये का बरे उसळत असते ? आजवर धर्म-गुरूंच्या अधिकारापुढे आपण विनम्र होत होतो; आता त्या त्या विषयातील तज्ञांच्या अधिकारापुढे आपण विनम्र होऊ लागलो आहोत. एखाद्या मोठ्या पदवीधराशी, उच्चपदस्थाशी किंवा सत्ताधारी अधिकाऱ्याशी आपण किती आदराने वागत असतो, हे तुमच्या ध्यानात आलेच असेल. कुठल्या ना कुठल्या स्वरूपाची सत्ता ही आपल्या जीवनावर सदैव वर्चस्व गाजवीत असते. वस्तुस्थिती अशी आहे की, एक दुसऱ्यावर सत्ता गाजवीत असतो, दुसऱ्याचा उपयोग करून घेत असतो किंवा दोघेही परस्परांचा उपयोग करून घेत असतात.

"दुसऱ्याचा उपयोग करून घेणे, या शब्दांचा आपण काय बरे अर्थ करता ?"

मला तर वाटते की, हे समजणे अगदी सोपे आहे. आपण जो परस्परांचा उपयोग करून घेत राहतो, तो परस्परांच्या इच्छापूर्तीसाठीच करीत असतो. व्यक्तींच्या ज्या परस्पर संबंधावर सध्याची समाजरचना आधारलेली आहे, ते संबंध म्हणजे परस्परांची गरज व परस्परांचा त्यासाठी केला जाणारा उपयोग, हेच होत. आता हेच पाहा की, सत्तास्थाने काबीज करण्यासाठी तुम्हा राजकारणी लोकांना जनतेच्या मतांची गरज असते, या गरजेसाठी तुम्ही लोकांचा उपयोग करून घेत असता. आणि ज्या गोष्टींची तुम्ही त्यांना आश्वासने देता, त्या गोष्टींची गरज त्यांनाही जाणवत असते. म्हणून ते तुमचा उपयोग करीत असतात. पुरुषाला स्त्रीची गरज असते व स्त्रीला पुरुषाची. आपले सध्याचे जे माणसामाणसातील परस्पर संबंध आहेत, ते गरज व उपयोग यांच्यावरच आधारलेले आहेत. अशा प्रकारचे संबंध हे मूलतःच हिंसात्मक असतात. आणि हिंसात्मक संबंधांवर आधारलेल्या समाजाचा पाया हाही अर्थात हिंसात्मक असाच असतो. परस्परांची गरज भागविणे व परस्परांचा उपयोग करून घेत राहणे, या पायावरच जोवर आपली समाज-व्यवस्था आधारलेली राहील, तोवर ती हिंसात्मक व विध्वंसकारी अशीच निश्चित राहणार. जोपर्यंत एक व्यक्ती ही स्वतःच्या इच्छापूर्तीसाठी दुसऱ्याचा उपयोग करून घेत राहील किंवा ज्या विचारप्रणालीची आपण सारुप्य पावलो आहोत, त्या विचारप्रणालीची पूर्तता करण्यासाठी इतरांचा उपयोग करून घेत राहील, तोपर्यंत भीती, अविश्वास व विरोध यांचेच साम्राज्य चालू राहील. अशा समाजात व्यक्ती, व्यक्तीमधील संबंध हे स्वतःला इतरांपासून तोडून टाकणारे व एकूण विघटन घडवून आणणारे

१६०३५

असेच असतात. आजच्या व्यक्तिजीवनात काय किंवा जागतिक व्यवहारात काय, हीच दुःखद व विनाशकारी परिस्थिती असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.

" पण माणसांना जर परस्परांची गरज वाटली नाही, तर जीवन कंठणे अशक्यच नाही का होणार ?"

हे पाहा, आपल्याला पोस्टमनची गरज असते हे खरे पण आपली काही आंतरिक अभिलाषा पुरी करण्यासाठी जर आपण पोस्टमनचा उपयोग करून घेऊ लागलो, तर पोस्टमनची जी व्यावहारिक व सामाजिक गरज आहे, तिचे मानसिक गरजेत रूपांतर होईल. आणि पोस्टमन व आपण यांच्या संबंधात एक वेगळे परिवर्तन घडून येईल. माणसांना परस्परांची जी मानसिक गरज वाटते व त्यांच्याकडून परस्परांचा जो मानसिक दृष्ट्या उपयोग करून घेण्यात येतो, त्याच्यामुळेच हिंसा व दुःख ही निर्माण होत राहतात. माणसाला ही जी मानसिक स्वरूपाची गरज वाटत असते, तिच्यामुळेच तो सत्तेचा पाठलाग करू लागतो. आणि मग त्याच्याकडून या सत्तेचा उपयोग, आपल्या वेगवेगळ्या पातळींवरच्या अभिलाषा पूर्ण करून घेण्यासाठी केला जातो. ज्या ज्या माणसाला स्वतःसंबंधीची अथवा आपल्या पक्षासंबंधीची एखादी महत्त्वाकांक्षा असते किंवा ज्याला ज्याला एखादे विशिष्ट ध्येय साध्य करून घ्यावयाचे असते, तो तो माणूस अशा प्रकारे समाजाचे विघटन करणाराच ठरतो.

" पण माणसाला महत्त्वाकांक्षा असणे हे अपरिहार्यच नसते का ? "

हे पाहा की, व्यक्तिमनामध्ये जोवर मूलभूत स्वरूपाचे परिवर्तन घडून येत नाही, तोवर ते अपरिहार्य आहे हे निश्चित. पण ते केव्हाही अपरिहार्यच आहे, ही गोष्ट आपण का बरे मानून चालावे ? माणसांनी परस्परांशी दुष्टपणे, निर्दयपणे वागलेच पाहिजे, तसे वागणे हे अपरिहार्यच आहे, अशी का वस्तुस्थिती आहे ? या निर्दयपणाचा अंत घडून आला पाहिजे, असे नाही का तुम्हाला वाटत ? निर्दयपणा हा अपरिहार्यच आहे असे मानणे म्हणजे विचारहीनतेचा कळस गाठणेच नाही का ?

" पण आपण जर इतरांशी निर्दयपणे वागलो नाही, तर दुसरेच लोक आपल्याशी निर्दयपणे वागू लागतील. तेव्हा आपणच प्रथम वरचढ होऊन वसावयाला नको का ?"

पण हे लक्षात घ्या की,असे प्रथम वरचढ होऊन वसण्यासाठीच प्रत्येक व्यक्तीचा, गटाचा व विचारप्रणालीचा प्रयत्न सदैव चाललेला नसतो का ? आणि त्यामुळेच हिंसा व दुष्टपणा यांचेच धैमान सतत चालू राहत नाही का ? वस्तुतः नवनिर्मिती ही नेहमी शांतीतच उदय पावत असते. पण आपले हे परस्परांचा सरसि उपयोग करून घेणे असेच चालत राहिले, तर शांतता निर्माण होणे हे कधीतरी शक्य आहे का ? व्यक्तीचे एकाशी वा अनेकांशी असणारे संबंध हे जोवर परस्परांच्या मानसिक गरजेवर व या गरजेसाठी केल्या जाणाऱ्या परस्परांच्या उपयोगावर आधारलेले

राहतील, तोवर शांततेची भाषा बोलणे हेही पूर्णपणे निरर्थक ठरेल. परस्परांची मानसिक गरज वाटत राहणे व या गरजेसाठी परस्परांचा उपयोग करून घेत राहणे, हे माणसाला सत्तेकडे व वर्चस्व गाजविण्याकडेच अपरिहार्यपणे नेत राहील. एखाद्या विचाराचे सामर्थ्य व तलवारीचे सामर्थ्य ही दोन्ही विध्वंसकारकतेच्या दृष्टीने समानच असतात. तलवार किंवा शस्त्र हे जसे माणसाला माणसाविरुद्ध झगडण्यास प्रवृत्त करते, त्याचप्रमाणे विशिष्ट विचार, कल्पना किंवा निष्ठा हीही माणसांना परस्परांविरुद्ध झगडावयास लावतात. कल्पना व निष्ठा ही प्रीतीच्या अगदी विरुद्ध टोकाला असतात.

"पण असे जर आहे, तर आपण जाणता वा अजाणता सत्ताभिलाषेने असे सारखे घुमसत, जळत का वरे राहतो?"

वस्तुस्थिती अशी आहे की, सत्तेचा पाठलाग करीत राहणे, ही आपल्या स्वतःपासून दूर पळण्याची, जे वास्तव आहे, त्याच्यापासून दूर पळण्याची एक प्रतिष्ठित व लोकमान्य अशी पळवाट आहे; होय की नाही? प्रत्येकजणच स्वतःपासून दूरदूर पळण्याचा, स्वतःच्या अपूर्णतेपासून, आपल्या आंतरिक दैन्यापासून, एकटेपणापासून, विभक्तपणापासून दूरदूर पळण्याचा प्रयत्न करीत असतो; होय की नाही? जे आपले प्रत्यक्ष स्वरूप असते, ते फारसे सुखद नसते. पण त्याच्यापासून दूर पळण्यासाठी शोधलेली पळवाट मात्र अतिशय मोहक व आकर्षक अशी असते. घटकाभर असे समजा की, तुमची सर्व सत्ता, प्रतिष्ठा व तुम्ही मिळविलेली सर्व संपत्ती ही तुमच्यापासून हिरावली जाणार आहे. अशा वेळी तुम्ही काय वरे कराल? हिरावणाऱ्याचा जोराचा प्रतिकार कराल, होय ना? समाजकल्याणाच्या दृष्टीने आपण अतिशय महत्त्वाचे आहोत, अशी तुमची ठाम समजूत आहे, त्यामुळे सत्तास्थानापासून तुम्हाला च्युत करण्याच्या प्रयत्नाचा तुम्ही एकतर हिंसेने प्रतिकार कराल किंवा धूर्त व तर्कशुद्ध अशी कारणे पुढे करून प्रतिकार कराल. पण समजा की, संपादन केलेल्या सर्व गोष्टींचा तुम्ही जर स्वेच्छेने त्याग केलात, तर तुम्ही कुणीही नाही, काहीही नाही अशा स्वरूपाचे बनून जाल. होय की नाही?

"होय. असाच होऊन जाईन असे वाटते खरे, पण हे सारे मला अतिशय निराश बनवून टाकणारे आहे. आपण कुणीही नाही, अशा अवस्थेप्रत येण्याची माझी अर्थातच मुळीदेखील इच्छा नाही."

म्हणजे काय? तर तुमच्याजवळ सर्व प्रकारचा बाह्य देखावा आहे, पण आंतरिक सत्व वा सार मात्र नाही. ते आंतरिक अव्यभिचारी सत्वघन मात्र नाही. तुम्हाला आपला बाह्य देखावा कायम राहावयाला हवा आहे. पण दुसऱ्यांना देखील आपापला बाह्य देखावा कायम राहावयाला हवा आहे. परस्परांच्या बाह्य देखाव्यातील या संघर्षांमधूनच द्वेष व भीती ही उत्पन्न होत असतात. हिंसा व ऱ्हास हीदेखील

यामधूनच उद्‌भवत असतात. वस्तुस्थिती अशी आहे की, तुम्ही व तुमची विचार-प्रणाली ही जितकी अपूर्ण आहे, तितकीच तुमच्या विरोधी पक्षाचीही विचारप्रणाली-ही अपूर्ण आहे. असे असताना तुम्ही दोन्हीही पक्षाचे लोक शांततेच्या नावाने, सर्वांना काम देण्याच्या नावाने, देश स्वयंपूर्ण वसविण्याच्या नावाने किंवा ईश्वराच्या नावाने एकमेकांचा नाश करीत सुटला आहात. जवळजवळ प्रत्येकालाच इतरांपेक्षा वरचढ होण्याची हाव सुटलेली असते. त्यामुळे आपण जी समाजरचना केलेली असते, ती शत्रुत्वावर, संघर्षावर व हिंसेवर आधारलेली अशीच बनते.

" पण या सर्व अनिष्ट गोष्टीचे निर्मुलन कसे करावयाचे ?"

महत्त्वाकांक्षा सोडून देण्याने आणि सत्तेची, पदाची व नावाची लालसा सोडून देण्यानेच हे घडून येऊ शकेल. तुम्ही वस्तुतः जसे आहात तसे राहाण्यानेच, साधे व सामान्य असे राहण्यानेच हे घडून येऊ शकेल. अभावात्मक विचार हाच प्रज्ञेचा उच्चतम आविष्कार असतो.

" पण जगात सर्वत्र वोकाळलेली ही हिंसा व हा दुष्टपणा माझ्या एकट्याच्या व्यक्तिगत प्रयत्नामुळे काही थांबवता येणार नाही. आणि सगळ्या व्यक्तींमध्ये परिवर्तन घडून येण्यासाठी तर अनंत कालच वाट पाहावी लागेल, नाही का ! "

हे ध्यानात घ्या की, इतर व्यक्ती म्हणजे वस्तुतः तुम्हीच असता. तुम्ही हा जो प्रश्न विचारीत आहात, त्याच्या मागील हेतू काय आहे, हे माहीत आहे का तुम्हाला ? स्वतःचे तात्काळ मूलभूत परिवर्तन घडून येणे हे तुम्हाला टाळावयाचे आहे. ही टाळण्याची इच्छाच तुमच्या प्रश्नामागे दडलेली आहे. तुमच्या म्हणण्याचा अर्थ असा आहे की, ' जोवर प्रत्येकात परिवर्तन घडून येत नाही तोवर माझ्यात परिवर्तन होण्यापासून कसला फायदा होणार ? ' पण दूर जाण्यासाठी माणसाला जवळूनच प्रारंभ करावा लागतो. खरी गोष्ट अशी की, स्वतःमध्ये परिवर्तन व्हावे ही इच्छाच तुम्हाला नाही. सध्या चालू आहे, तसेच ते चालू राहावे असे प्रत्येकास वाटत असते. विशेषतः स्वतः आपण सत्तेच्या वा किर्तीच्या शिखरावर असले म्हणजेच असे वाटत असते. म्हणूनच व्यक्तिगत परिवर्तनाच्या द्वारा जगाचे परिवर्तन घडवून आणण्यासाठी अनंत काल लागेल, अशी सबब तुम्ही पुढ उभी करता. वस्तुतः जग म्हणजे तुम्हीच असता. जगाची समस्या म्हणजे तुमचीच समस्या. ती तुमच्याहून वेगळी समस्या नसते. जग हा तुमचाच प्रक्षेप असतो. तुमच्यामध्ये जोवर परिवर्तन घडून येत नाही तोवर जगातही परिवर्तन घडून येणार नाही. खरे सौख्य हे स्वतःचे मूलभूत परिवर्तन होण्यातच वसत असते, स्वतःसाठी काही मिळविण्यात नव्हे.

" पण मी तर सामान्यतः सुखीच आहे. अर्थात मला न आवडणाऱ्या अशा बऱ्याच गोष्टी माझ्यामध्ये आहेत, यात मुळीच शंका नाही. पण त्यांच्याकडे लक्ष देण्याची एक तर माझी इच्छा नाही व मला तेवढा वेळही नाही. "

पण नवी समाजरचना घडवून आणणे हे खऱ्या सुखी माणसालाच शक्य असते. जो मनुष्य एखाद्या विशिष्ठ निष्ठेशी किंवा विचारप्रणालीशी सारूप्य पावलेला असतो. अथवा जो एखाद्या सामाजिक वा व्यक्तिगत कार्यात स्वतःला पार विसरून गेलेला असतो तो मनुष्य खरा सुखी मुळीच नसतो. सौख्य हे काही एखादे साध्य किंवा ध्येय होऊ शकत नाही. जे वास्तव आहे, त्याचे यथार्थ आकलन करून घेण्यातच सौख्य वसत असते. स्वतःच्या विविध प्रक्षेपांपासून मन जेव्हा पूर्णपणे विमुक्त होते, तेव्हाच सौख्य अस्तित्वात येत असते. कसली तरी किंमत देऊन जे विकत घेतले जाते, ते सौख्य नसून ती निव्वळ इच्छापूर्ती असते. कार्याच्या किंवा सत्तेच्या द्वारा सौख्य मिळवू पाहणे म्हणजे केवळ इंद्रियसंवेदनपूर्ती करून घेणे होय. इंद्रियसंवेदन हे लवकरच ओसरून जात असल्यामुळे अधिकाधिक संवेदनाची लालसा सारखी वाढतच राहते. अशा अधिक साधनांच्या द्वारा मनुष्य जेव्हा सौख्य मिळवू पाहतो तेव्हा अखेरीस असंतोष, संघर्ष व दुःख हीच त्याच्या हाती लागत असतात. सौख्य ही काही स्मृती नव्हे. ती सत्यदर्शनाबरोबरच अस्तित्वात येणारी अवस्था असते. तिच्यात सातत्य नसते, तर नित्यनवीनता ओसंडत असते.

कोणती गोष्ट तुम्हाला संवेदनशून्य बनवीत आहे ?

भेटीला आलेल्या गृहस्थाची नोकरी खालच्या श्रेणीची होती व त्याला पगारही बराचसा कमी मिळत होता. तो आपल्या पत्नीला बरोबर घेऊन आला होता. कारण त्यांना उभयतांपुढे ठाकलेल्या समस्येबद्दल बोलावयाचे होते. पतिपत्नी तरुण होते व त्यांचे लग्न होऊन काही वर्षे झालेली असली, तरी त्यांना मूलबाळ झाले नव्हते. त्यांची समस्या मात्र यासंबंधीची नव्हती. सध्याच्या कठीण परिस्थितीत संसाराची जेमतेम तोंडमिळवणी करण्याइतपतच त्या गृहस्थाचा पगार होता. पण त्यांना मूलबाळ नसल्यामुळे तेवढचा पगारात त्यांचे जेमतेम भागत होते. भविष्यात काय वाढून ठेवले होते, हे अर्थात कुणालाही सांगणे शक्य नव्हते. पण वर्तमान स्थितीपेक्षाही भविष्यकाल अधिक कष्टदायक असेल असे त्यांना मुळीच वाटत नव्हते.

त्या गृहस्थाला बोलण्याची विशेषशी इच्छा नव्हती. पण त्याने बोललेच पाहिजे असा त्याच्या पत्नीचा आग्रह होता. तिने त्याला जवळजवळ ओढूनच आणले होते असे दिसत होते. कारण तो अनिच्छेने आला होता. पण तो आला, यामुळेच त्याच्या पत्नीला आनंद वाटत होता. त्याने बोलण्यास सुरुवात केली.

"आजवर मी आपल्या पत्नीशिवाय इतर कुणाशीही स्वत:संबंधी बोललो नाही. त्यामुळे आपल्यासमोर असे बोलणे मला काहीसे अवघड वाटत आहे. मला थोडेसे मित्र आहेत खरे. पण आजवर या मित्रांजवळही मी कधी मनमोकळेपणाने स्वत:-बद्दल बोललो नाही. कारण त्यांना माझा प्रश्न समजणारच नाही असे मला वाटले." तो गृहस्थ जसजसा बोलू लागला, तसतसा त्याचा पहिला संकोच ओसरू लागला. त्याची पत्नी त्याचे बोलणे काहीशा चिंतायुक्त वृत्तीने ऐकत होती. तो गृहस्थ पुढे सांगू लागला की, आपल्या नित्याच्या कामाबद्दलचा प्रश्न काही आपणासमोर उभा नाही; कारण आपल्या कामाची आपणास आवड आहे. व या कामामुळेच उदरनिर्वाहापुरता पैसाही आपणास मिळत आहे. ते पतिपत्नी वृत्तीने साधे सरळ होते. एकाच विश्वविद्यालयात त्या दोघांचे शिक्षण झाले होते.

अखेर त्यांच्यापुढील समस्येबद्दल बोलण्यास पत्नीनेच सुरुवात केली. एक दोन वर्षांपासून आपल्या पतीचे जीवनातील लक्ष उडाले आहे. तो ऑफिसात नियमाने जातो, आपले काम करतो व संध्याकाळी सरळ घरी परत येतो. त्याचे वरिष्ठ अधिकारी त्याच्या कामाबद्दल काही तक्रार करीत नाहीत. एवढेच त्याच्या नित्याच्या कामाबद्दल म्हणता येईल, असे तिने सांगितेले. त्यावर तो म्हणाला,

"माझे कचेरीतले काम हे ठराविक प्रकारचे आहे. त्यामुळे त्याच्याकडे विशेष लक्ष देण्याची गरज नसते. आपल्या कामाची तशी मला आवडही आहे. पण आता

का कोण जाणे, पण कामाचा मला ताण जाणवू लागला आहे. माझे कचेरीतील काम किंवा तेथील माणसे यांच्याबद्दल माझी कसलीच तक्रार नाही. अडचण किंवा समस्या जी आहे ती माझ्या स्वतःसंबंधीचीच आहे. माझ्या पत्नीने सांगितल्याप्रमाणे जीवनातील माझे सारे लक्ष उडून गेले आहे खरे. आपल्याला काय झाले आहे हेही मला कळेनासे झाले आहे. "

त्याची पत्नी यावर सांगू लागली, " पूर्वी हे उत्साही, प्रेमळ व अतिशय संवेदनशील होते. पण गेल्या वर्ष दोन वर्षांपासून मात्र हे सगळ्याच गोष्टींबावत उदासीन व संवेदनशून्य वनून गेले आहेत. पूर्वी ते माझ्याशी किती प्रेमळपणाने वागत. पण आता मात्र आम्हा उभयतांचे जीवन दुःखीकष्टी वनून गेले आहे. मी घरात आहे की नाही याची यांना जाणीवही असल्यासारखे दिसत नाही. त्यामुळे उभयतांनी एका घरात या अवस्थेत राहणे हे मला अतिशय कष्टप्रद वाटू लागले आहे. तसा त्यांच्या वागण्यात निष्ठुरपणा मुळीच नाही. पण ते अत्यंत उदासीन व अतिशय निरुत्साही वनून गेले आहेत हे खास. "

तुम्हाला मूलवाळ नाही म्हणून का असे झाले आहे ?

" छे. छे. तसे काही ही नाही. " त्याने उत्तर दिले.

" पतिपत्नी या नात्याने आमचे संबंध अगदी ठीक आहेत. अर्थात कोणतेही वैवाहिक जीवन हे पूर्ण सुखी असे कधीच नसते. त्यामुळे आमच्याही जीवनात काही चढउतार हे राहणारच. पण लौकिक-दृष्ट्या कसला तरी उणेपणा उत्पन्न झाल्यामुळे माझ्यात ही संवेदनशून्यता आली आहे, असे मला मुळीच वाटत नाही. एवढे खरे की, माझ्या या संवेदनशून्य, वधिर वृत्तीमुळे आताशा काही काळ पतिपत्नी या नात्याचे जीवन जगणे आम्ही सोडून दिले आहे. पण मूलबाळ न झाल्यामुळे माझी अशी वृत्ती झाली आहे, असे काही मला वाटत नाही. "

असे तुम्ही कशावरून म्हणता ?

" माझी अशी उदासीन व संवेदनशून्य वृत्ती होण्याच्या अगोदरच, आम्हाला मूल होणे शक्य नाही हे कळून चुकले होते. माझ्यावर या गोष्टीचा काहीच परिणाम झाला नाही. पण माझ्या पत्नीला मात्र त्यामुळे फार दुःख झाले. ती यासाठी वारंवार अश्रु ढाळीत असते. तिला मूल व्हावे अशी फार इच्छा आहे. पण आमच्यापैकी एकामध्ये जननक्षमतेचा अभाव असला पाहिजे असे वाटते. तिला मूल व्हावे यासाठी मी वेगवेगळे उपाय सुचवून पाहिले. पण ती त्याच्यापैकी एकही करून पाहावयाला तयार नव्हती. मूल व्हावयाचे असेल, तर ते माझ्याकडूनच झाले पाहिजे, नाहीतर मूल न झाले तरी चालेल, असे तिचे म्हणणे आहे. या वावतीतील तिची व्यथा अगदी खोलवर गेलेली आहे. वृक्षाला जर फळ आले नाही, तर तो नुसता शोभेचाच वृक्ष ठरतो. या विषयावर चर्चा करीत आम्ही कितीतरी रात्री जागून काढल्या

आहेत. पण वस्तुस्थिती आहे तशीच कायम आहे. जीवनात प्रत्येकाला सगळे काही मिळतेच असे नाही, हे मी पुरेपुरे जाणून आहे. त्यामुळे मूलबाळ न झाल्यामुळे माझी ही अशी बधिर, संवेदनशून्य अवस्था झाली असेल असे मला मुळीच वाटत नाही. निदान माझी स्वतःची तरी या बाबतीत पूर्ण खात्री आहे. "

मग पत्नीच्या दुःखीपणामुळे, तिच्या विफलतेच्या भावनेमुळे का तुमची अशी वृत्ती बनली असावी ?

यावर पत्नीनेच उत्तर दिले. " माझ्या पतीने व मी या बाबतीत खूप विचार केलेला आहे. पुष्कळ शोधून पाहिले आहे. मूल नसल्यामुळे मी अतिशय दुःखीकष्टी झाले आहे. आपणास कधीतरी मुल व्हावे अशी मी देवाची अहर्निश प्रार्थना करीत असते. मी सुखी असावे अशी माझ्या पतीची मनापासून इच्छा आहे. पण त्यांची ही संवेदनशून्य वृत्ती माझ्या दुःखीपणामुळे निर्माण झाली आहे, असे काही मला वाटत नाही. आम्हाला जर मूल झाले, तर मला विलक्षण आनंद होईल हे निःसंशय. पण यांच्या दृष्टीने मात्र मूल हे खेळणेच काय ते ठरेल. बहुतेक पुरुषांची याबाबत अशीच धारणा असते, असे मला वाटते. यांच्यावर ही जी संवेदनशून्यतेची झापड वर्ष दोन वर्षांपासून चढू लागली आहे, ती एखाद्या आंतरिक रोगासारखी त्यांच्या मनात हळूहळू घर करू लागली आहे. पूर्वी ते सगळ्या गोष्टींविषयी माझ्याशी बोलत. पक्ष्यांबद्दल माहिती सांगत. आपल्या कचेरीतील कामाबद्दल, आपल्या आकांक्षांबद्दल, माझ्याविषयी वाटणाऱ्या प्रीतीबद्दल, सगळ्या गोष्टीबद्दल मोकळेपणी बोलत. माझ्यासमोर ते आपले हृदय पूर्णपणे उघडे करीत असत. पण आता त्यांच्या हृदयाचा दरवाजा बंद होऊन गेला आहे. त्यांचे मन कुठेतरी दूरदूर भटकत असते. या बाबतीत मी त्यांच्याशी पुष्कळ बोलून पाहिले, पण सारे व्यर्थ. "

बरे, एकमेकांपासून दूर राहण्याने काही फरक घडून येतो का, हे तुम्ही प्रयोग करून पाहिले आहे का ?

" हो, तेही करून पाहिले. मी सहा महिने माहेरी जाऊन राहिले होते. परस्परांशी पत्रव्यवहार अर्थातच चालू होता. पण या वियोगामुळेही काही फरक घडून आला नाही. उलट परिस्थिती थोडीशी अधिकच बिघडली. या वियोगाच्या काळात हे स्वतः हाताने स्वयंपाक करीत असत. बाहेर कुठे जात नसत. मित्रांपासूनही दूरदूर राहत. आणि बहुतेक वेळ स्वतःभोवती कुंपण घालूनच बसत. तसे ते पूर्वीही लोकांत मिसळणारे असे नव्हतेच. आता या सहा महिन्यांच्या वियोगानंतरही त्यांच्यामध्ये उत्साह वा चैतन्य निर्माण झाल्याचे काही मला दिसून आले नाही. "

यांची एखादी आंतरिक आकांक्षा तर अतृप्त राहिली आणि या अतृप्त आकांक्षेपासून दूर पळण्यासाठी यांच्या मनाने हे संवेदनशून्यतेचे पांघरूण तर घेतले नसेल ?

" आपण काय म्हणता हे माझ्या नीटसे ध्यानात आले नाही. " त्याने म्हटले.

तुमच्या बाबतीत कदाचित असे झाले असेल की, तुमची एखादी अतृप्त आकांक्षा तृप्ततेसाठी तळमळत असेल आणि त्या आकांक्षेला अभिव्यक्ती मिळत नसल्यामुळे तिच्या अतृप्ततेमुळे निर्माण होणाऱ्या वेदनेपासून दूरदूर पळण्यासाठी तुमचे मन असे संवेदनशून्य बनून गेले असेल. असे काही आहे का ?

" या गोष्टीचा मी कधी विचारही केला नव्हता. मला आजवर असा विचार करण्याचे कधी सुचलेच नव्हते. पण आता मी हे शोधून कसे काढावयाचे ते कळत नाही. "

आजवर हे तुम्हाला का बरे सुचले नाही ? आपण असे संवेदनशून्य का बनून गलो आहोत, असा प्रश्न तुम्ही स्वतःला कधी विचारला होता का ? तुम्हाला हे कळून घेण्याची मुळीच उत्सुकता वाटत नाही का ?

" हे आहे खरे थोडेसे चमत्कारिक पण माझ्या या निर्बुद्ध संवेदनशून्यतेचे कारण काय असावे, याचा शोध घेण्याचे मला कधी सुचलेच नाही. हा प्रश्न मी स्वतःसमोर कधीच उभा केला नाही. "

पण आता तुम्हीच हा प्रश्न स्वतःला विचारीत आहात ना ? मग तुमचे या प्रश्नाचे उत्तर काय आहे सांगा बरे ?

" काही उत्तर आहेसे मला वाटत नाही. पण मी किती विलक्षण निर्बुद्ध बनून गलो आहे, हे आताच लक्षात आल्याने मला खरोखरच फार धक्का बसला आहे. पूर्वी मी असा कधीच नव्हतो. म्हणून सध्याच्या या माझ्या भयंकर अवस्थेने मला भयभीत करून टाकले आहे. "

पण हे सांगू का की, आपण प्रत्यक्ष कशा अवस्थेत आहोत याचे आकलन होणे हे खरोखरच फार चांगले असते. निदान यामुळे प्रारंभ तरी छान होतो. आपण असे संवेदनशून्य, असे निरुत्साही का बनून गेलो आहोत, हे यापूर्वी तुम्ही स्वतःला कधी विचारले देखील नव्हते. याबाबत विचार करण्यासारखे काहीही नाही असे गृहीत धरूनच तुम्ही जीवन जगत होता; होय की नाही ? पण आपल्याला ही विचित्र अवस्था का प्राप्त झाली आहे. हे तुम्हाला आताही शोधून काढावेसे नाही का वाटत ? की अगतिक होऊन, हीच अवस्था आपल्या नशिबी आहे, असे तुम्ही समजून चालणार आहात ?

"मला तर वाटते की, आपली अवस्था ही अशीच राहणार आहे हे ते धरूनच चालत आहेत. याविरुद्ध झगडण्याचा त्यांनी प्रयत्नही केला नाही. " पत्नी म्हणाली.

पण तुम्हाला या अवस्थेतून खरोखरच बाहेर पडावयाचे आहे. होय ना ? या बाबतीत पत्नीच्या गैरहजेरीत चर्चा करण्याची का तुमची इच्छा आहे ?

" छे, छे, तिच्यासमोर न बोलता येण्यासारखे असे काहीही नाही. लैंगिक

संबंधांच्या अल्पतेमुळे किंवा अतिरेकामुळे ही अवस्था मुळीच उत्पन्न झालेली नाही, हे मला निश्चित माहीत आहे. तसेच माझ्या जीवनात दुसऱ्या कुठल्या स्त्रीला स्थान कधीच मिळाले नाही. दुसऱ्या स्त्रीकडे जाणेही मला अशक्य आहे. मुले न झाल्यामुळे माझी अशी अवस्था झाली असावी असेही मुळीच नाही. "

तुम्ही कधी लेखन करता का ? किंवा तुम्ही कधी चित्रे काढली आहेत का ?

" मला तर नेहमीच लेखन करावेसे वाटत आले आहे. पण मी चित्रे मात्र कधीच काढून पाहिली नाहीत. फिरायला निघालो की वाटेने कितीतरी विचार व कल्पना मला सुचत पण आता मात्र तेही सर्व बंद होऊन गेले आहे. "

तुम्ही काहीतरी लेखन करण्याचा प्रयत्न का करे करून पाहत नाही ? लिहिलेले कसेही उतरले तरी हरकत नाही. कारण तुम्हाला ते कुणाला दाखवावयाचे आहे थोडेच ? तुम्ही खरोखरच लिहावयाचा प्रयत्न का करीत नाही ?

पण आपण पुन्हा आपल्या मूळ प्रश्नाकडे वळू या. अगोदर हे सांगा की, आपली अशी अवस्था कशामुळे झाली हे तुम्हाला शोधून काढावयाची इच्छा आहे का ? की, या अवस्थेत तुम्हाला असेच रेंगाळत रहावयाचे आहे ?

" मला तर वाटते की, एकटचानेच दूर कुठेतरी निघून जावे. सर्व गोष्टींचा त्याग करावा आणि या रीतीने सुखाचा शोध घेऊन पाहावा. "

तुम्हाला असे का करावेसे वाटते ? आणि वाटतच असेल, तर तुम्ही करून का टाकीत नाही ? आपल्या पत्नीसाठी का तुम्ही घुटमळत आहात ?

" बाकी सध्याच्या अवस्थेत माझ्या पत्नीला माझा काहीही उपयोग होण्यासारखा नाही. माझा नुसता चोथा बनून गेला आहे. "

पण स्वतःचा असा संकोच करून घेण्याने, जीवनापासून असे दूर जाण्याने, स्वतःला सौख्य लाभेल, असे खरेच का तुम्हाला वाटते ? तुम्ही आधीच तर स्वतःचा कितीतरी संकोच करून घेतला आहे. दुसरे असे पाहा की, काहीतरी मिळविण्यासाठी त्याग करणे हा खरा त्यागच नव्हे. हा एक प्रकारचा धूर्तपणाचा सौदाच आहे. 'ते' मिळविण्यासाठी 'हे' सोडणे, असेच या त्यागाचे स्वरूप असते. एक विशिष्ट हेतू मनात धरून त्याग करणे म्हणजे अधिक लाभापुढे शरणागत होणे होय. पण प्रथम हे सांगा की स्वतःला जीवनापासून असे दूरदूर ठेवण्याने, जीवनाशी असा संबंध तोडून टाकण्याने आपल्याला सौख्य मिळेल, असे तुम्हाला खरेच वाटते का ? वस्तुतः इतरांशी संबंध वा संपर्क घडत राहणे व सुसंवाद होत राहणे म्हणजे जीवन नाही का ? सौख्य मिळविण्यासाठी एका संबंधाचा त्याग करून तुम्ही दुसरा संबंध जोडू पाहाल खरे. पण सर्व प्रकारच्या संबंधापासून परावृत्त होऊन जीवन जगणे तुम्हाला शक्य होणार नाही. अगदी संपूर्ण एकांतातही माणसाचा आपल्या स्वतःशी व आपल्या विचारांशी संपर्क चालूच राहतो. आत्महत्या हीच काय ती जीवनापासून

संपूर्णपणे परावृत्त होण्याची अवस्था आहे.

" पण मला आत्महत्या मुळीच करावयाची नाही. मला तर जगावयाची इच्छा आहे. पण सध्याच्या अवस्थेत मात्र मला मुळीच राहावयाला नको आहे. "

सध्याची तुमची अवस्था तुम्हाला खरोखरच चालू राहावयाला नको आहे का ? हे पाहा, कोणती तरी विशिष्ट गोष्ट तुम्हाला संवेदनशून्य व वधिर वनवून टाकीत आहे, हे स्पष्ट आहे आणि तुम्ही तर या अवस्थेपासून दूर पळून जाऊन स्वतःला अधिकच संकुचित, अधिकच जीवनविन्मुख बनवू पाहत आहात. वस्तुस्थिती अशी आहे की, जे वास्तव आहे, त्याच्यापासून दूर पळणे म्हणजे स्वतःला संकुचित करून टाकणे होय, जीवनविन्मुख बनविणे होय. कदाचित तुम्ही हा जो काही काळापुरता का होईना, पण संकोच करून घेऊ पाहत आहात, तो सौख्याच्या आशेने करीत असाल. पण तुम्ही आताच तर स्वतःला पूर्णपणे जीवनविन्मुख व संकुचित वनवून टाकले आहे. आणि ज्याला तुम्ही संन्यास हे नाव दिले आहे, तशा प्रकारचा परित्याग करणे म्हणजे तर स्वतःला अधिकच जीवनविन्मुख बनवून टाकणे होय. स्वतःची ही जीवनविन्मुखता अधिकाधिक वाढवीत गेल्याने सौख्य मिळणे शक्य तरी आहे का ?

स्वतःला संकुचित करीत राहणे हीच वस्तुतः स्व-ची, अहंची प्रकृती असते. संकुचितता हाच त्याचा मुख्य गुणधर्म असतो. काहीतरी प्राप्त करून घेण्यासाठी त्याग करणे म्हणजेच स्वतःलाच संकुचित वनवून टाकणे होय. पण एक गोष्ट लक्षात ठेवा की, इतरांच्या संपर्कापासून तुम्ही स्वतःला जितके दूरदूर ठेवाल, तितका तुमचा प्रतिकार व संघर्ष वाढतच जाईल. कारण संकुचित वा वास्तवताविन्मुख अवस्थेत काहीही जिवंत राहणे शक्य नसते. आपले संबंध हे आपल्याला कितीही दुःखद झालेले असले, तरी त्यांचे आकलन अतिशय सोशिकपणाने व संपूर्णपणे करून घेतले पाहिजे. आंतरिक संघर्षामुळेच संवेदनशून्यता उत्पन्न होत असते. कुणीतरी विशिष्ट बनण्यासाठी मनुष्य जो प्रयत्न करीत असतो, त्यामुळे त्याच्या जीवनात सवोध किंवा अवोध स्वरूपाच्या समस्या उद्भवत राहतात. तुम्ही हे लक्षात घ्या की, काहीतरी विशेष कारण असल्याशिवाय तुम्ही असे संवेदनशून्य खास बनला नाहीत. कारण तुमच्या सांगण्याप्रमाणे पूर्वी तुम्ही तत्पर व जागरूक होता. आतासारखे संवेदनशून्य काही पूर्वी नव्हता. मग तुमच्यात हा बदल कशामुळे घडून आला ?

" आपल्याला हे कारण माहीत आहेसे दिसते. तेव्हा आपणच यांना ते सांगणार नाही का ? " पत्नी मध्येच बोलली.

मी सांगू शकेन. पण त्याचा काय उपयोग होईल ? कारण आपल्या लहरीनुसार व आवडीनुसार ते एकतर मी सांगितलेल्या कारणाचा स्वीकार तरी करतील, नाही-

तर ते अमान्य तरी करतील. पण हे कारण त्यांनी स्वतःच शोधून काढणे, हेच खरोखर महत्त्वाचे नाही का ? आपल्या अवस्थेची संपूर्ण प्रक्रिया स्वतःच उलगडून पाहणे व पाहतापाहता तिच्यामागील वास्तवतेचे दर्शन करून घेणे, हीच गोष्ट त्यांच्या दृष्टीने आवश्यक नाही का ? सत्य हे दुसरे कुणीही कुणाला सांगू शकत नाही व कुणाकडून ते घेतलेही जाऊ शकत नाही. यांनी स्वतःच ते ग्रहण करण्यास तयार झाले पाहिजे. त्यांची ही तयारी दुसरा कोणीही करून देऊ शकणार नाही. मी या बाबतीत उदासीन आहे, म्हणून काही असे मी बोलत नाही. पण स्वतःच्या समस्यामागील सत्याचे, वास्तवाचे दर्शन त्यांना स्वतःलाच विमुक्तपणे, स्वतंत्रपणे व अनपेक्षितपणे घडले पाहिजे.

कशामुळे तुम्ही असे संवेदनशून्य झाला आहात बरे? तुम्ही स्वतःच ते कळून घ्यायला नको का ? आंतरिक प्रतिकार व संघर्ष यांच्यामुळेच संवेदनशून्यता उत्पन्न होत असते. माणसास असे वाटत राहते की, आपण जर सतत धडपड करीत राहिलो, तर आपणास हव्या त्या गोष्टीचे आकलन होऊ शकेल. आणि आपण स्पर्धा चालू ठेवली तर तल्लख व कुशाग्र बनू. धडपड करीत राहिल्याने माणसाला एक प्रकारची तीक्ष्णता प्राप्त होत असते हे खरे आहे. पण जे असे तीक्ष्ण बनते ते लवकरच बोथटही होऊन जाते. जे सतत वापरात राहते, ते लवकरच झिजून जाते. जीवनात संघर्ष हा अपरिहार्यच आहे, असे आपण सर्वजण नेहमी मानून चालत असतो, आणि आपल्या विचारांची व कृतींची संपूर्ण इमारत संघर्षाच्या या अटळपणावरच उभारीत असतो. पण जीवनात संघर्ष असणे हे खरोखरच अटळ आहे का ? जीवन जगण्याची दुसरी काही रीत शक्यच नाही का ? पण संघर्षाची संपूर्ण प्रक्रिया व संघर्षाचा खराखुरा अर्थ जर आपण समजून घेऊ शकलो, तर मात्र जीवन जगण्याची दुसरी अगदी वेगळी अशी रीत आहे, हे आपणांस कळून येईल.

आता पुन्हा एकदा विचारतो की, तुम्ही स्वतःला असे संवेदनशून्य का बरे बनवून टाकले आहे ?

" म्हणजे मीच का स्वतःला संवेदनशून्य बनवून टाकले आहे ?"

असे पाहा की, संवेदनशून्य बनण्याला माणसाची स्वतःची जर संमती नसेल, तर दुसरे काहीही त्याला संवेदनशून्य बनवू तरी शकेल का ? तुमची समंती ही सबोध असेल किंवा अबोधही असेल. पण हे सांगा की असे संवेदनशून्य बनण्याला तुम्ही का बरे संमती दिली ? तुमच्या मनात खोल खोल घर करून राहिलेला एखादा संघर्ष आहे का ?

" असा संघर्ष असला, तरी मला मात्र त्याची मुळीच जाणीव नाही. "

पण अशी जाणीव करून घ्यावी, आपल्या संघर्षाचे आकलन करून घ्यावे, असे नाही का तुम्हाला वाटत ?

" आपण कोणत्या गोष्टीकडे लक्ष वेधीत आहात, हे आता माझ्या ध्यानात येऊ लागले आहे. "

त्याच्या पत्नीने एकदम म्हटले, " पण माझ्या पतीच्या संवेदनशून्यतेचे कारण काय आहे, हे मला मात्र त्यांना सांगता येणार नाही. कारण माझीच त्याबद्दल खात्री नाही. "

असे पाहा की, ही संवेदनशून्यता यांच्यात कशी उत्पन्न झाली, हे तुम्हाला कदाचित समजून येईल. पण तुम्ही जर नुसत्या शब्दांनी ते कारण यांना सांगितले, तर तुम्ही त्यांना खरी मदत कराल का ? ते कारण त्यांनी स्वत:च शोधून काढणे हेच आवश्यक नाही का ? या गोष्टीचे आत्यंतिक महत्त्व प्रथम पक्के जाणून घ्या. म्हणजे या बाबतीत तुमचे मन उतावीळ होणार नाही. व ते चिंताग्रस्तही असणार नाही. एकाला दुसऱ्याची मदत होऊ शकते हे खरे आहे. पण आपल्या बाबतच्या सत्याचा शोध करण्यासाठी जो प्रवास करावयाचा, तो ज्याचा त्याने स्वत:च केला पाहिजे. जीवन हे काही साधे, सोपे नसते. ते फार गुंतागुंतीचे व संकीर्ण असे असते. पण आपण मात्र अशा या गुंतागुंतीच्या जीवनाकडे साधेपणाने, सहजपणाने पाहिले पाहिजे. कारण जे आपण जीवन या नावाने ओळखतो, ते समस्यायुक्त मुळीच नसते; तर आपणच समस्याग्रस्त असतो. म्हणून आपल्या समस्येचे निरीक्षण कसे करावयाचे हे जर आपण समजून घेतले तरच आपल्याला आपल्या समस्येचे, म्हणजेच आपल्या स्वत:चे आकलन होऊ शकेल. समस्येकडे पाहण्याचा दृष्टीकोन हाच खरोखर महत्त्वाचा असतो, समस्या नव्हे.

" पण आम्ही आता काय करावयाला हवे ? "

आतापर्यंत जे जे सांगितले गेले ते तुम्ही लक्षपूर्वक श्रवण केलेच असेल. अशा प्रकारे श्रवण केले असेल तर तुमच्या हे सहज लक्षात येईल की, कोणत्याही गोष्टीच्या वास्तव दर्शनामुळेच विमुक्तता निर्माण होत असते. म्हणून तुम्ही आता मुळीच चिंता करू नका. आज जे बीज पेरले गेले आहे त्याला अंकुर फुटू द्या.

काही आठवड्यांनंतर ते दोघे पुन्हा भेटण्यास आले. त्यांच्या नेत्रात आशा चमकत होती व ओठांवर स्मित विलसत होते.

कर्म

निःस्तब्धता किंवा निःशब्दता ही काही संवर्धन करता येण्यासारखी वस्तू नव्हे. ती मुद्दाम निर्माण करता येण्याजोगीही नव्हे. तिच्या पाठीमागे लागण्याने जशी ती गवसण्यासारखी नाही, त्याचप्रमाणे ती विचाराने किंवा ध्यानधारणेने आकारास आणता येण्यासारखीही नव्हे. मुद्दाम प्रयत्नाने घडवून आणलेल्या निःशब्दतेचा अनुभव घेणे हे, चिरवांछित अशा एखाद्या सुखाचा काल्पनिक उपभोग घेण्यासारखेच आहे. तसेच, मन निःशब्द, निःस्तब्ध करण्याची अभिलाषा बाळगणे म्हणजेही केवळ इंद्रियसंवेदनांचा पाठलाग करणेच होय. प्रयत्नाने अशा प्रकारची घडवून आणलेली निःशब्दता हे प्रतिकाराचेच एक रूप असते; ते स्वतःला वास्तवापासून वेगळे करून टाकणेच असते. अशा वेगळेपणाची, वियुक्ततेची परिणती अखेर मनुष्याच्या ऱ्हासातच होत असते. जी निःशब्दता कसली तरी किंमत देऊन विकत घेतली जाते ती क्रयविक्रयाची बाजारू वस्तू असते. त्यामुळे तिचे स्वरूप निःशब्द नव्हे, तर बाजारातील गोंगाटासारखेच असते. अभिलाषेचा अभाव घडन आला म्हणजेच खरी निःशब्दता उदय पावते. पण अभिलाषा ही तर अतिशय गहनगूढ, अतीव वेगवान व धूर्त असते. कोणतीही गतस्मृती निःशब्दतेचा विस्तार क्षणार्धात नाहीसा करून टाकते. म्हणून स्मृतीत वा अनभूतीत अडकले गेलेले मन केव्हाही निःस्तब्ध होऊ शकत नाही.

निःस्तब्धता म्हणजे, भूतकालातून सुरू होऊन वर्तमानामधून भविष्याकडे जात राहणारा कालप्रवाह नव्हे. उलट हा प्रवाहही कालगती पूर्णपणे स्तब्ध झाली म्हणजेच निःस्तब्धता उदय पावते. आणि तेव्हाच ते अनिर्वचनीय, ते अज्ञात अस्तित्वात येते.

भेटीस आलेल्या गृहस्थाने बोलण्यास सुरुवात केली.

"आज मी कर्माबद्दल थोडेफार बोलण्यास आपल्याकडे आलो आहे. अर्थात या विषयासंबंधीची माझी काही विशिष्ट मते आहेत. पण आपले मत काय आहे हे कळून घेण्याची माझी इच्छा आहे."

हे लक्षात घ्या की, मत म्हणजे काही सत्य नव्हे. सत्याचे दर्शन होण्यासाठी आपण प्रथम आपली सर्व मते वाजूला सारली पाहिजेत. मते अगणित प्रकारची असतात. पण सत्य हे मात्र या किंवा त्या मताचे असे कधीही असत नाही. सत्याचे आकलन करून घेण्यासाठी, सर्व प्रकारच्या कल्पना, सगळे पूर्वनिर्णय व सारी मते ही झाडावरच्या पिकल्या पानांसारखी सहज गळून पडली पाहिजेत. सत्य हे ग्रंथात गवसत नसते किंवा अनुभवात वा ज्ञानात सापडत नसते. आपल्याला जर मतच हवे असेल, तर तसे येथे काहीही आढळणार नाही.

" पण कर्मासंबंधी आपल्याला निदान चर्चा तरी करता येईल. आणि कर्माचे महत्त्व काय हेही जाणून घेण्याचा प्रयत्न करता येईल. नाही का ?"

अर्थात, ही अगदीच वेगळी गोष्ट आहे. पण आपणांस कशाचेही आकलन करून घ्यावयाचे असेल तर प्रथम त्यासंबंधीची सर्व मते व सगळे निर्णय हे नाहीसे झाले पाहिजेत.

" आपण या गोष्टीवर एवढा जोर का देत आहात ?"

असे पाहा की, एखाद्या गोष्टीविषयी आपण जर आपले पक्के मत बनवून टाकले किंवा दुसऱ्यांच्या यासंबंधीच्या निर्णयांचा आपण नुसता पुनरुच्चार करीत राहिलो, तर आपल्याला त्या गोष्टीचे आकलन तरी होऊ शकेल का ? त्या गोष्टीमागील सत्य शोधून काढावयाचे असेल, तर आपण पूर्वग्रहरहित अशा विमुक्त मनानेच तिचे निरीक्षण करावयाला नको का ? ठाम निर्णय व पूर्वग्रह यांच्यापासून मुक्त असणे हे अधिक महत्त्वाचे आहे की, एखाद्या अपूर्ण तत्त्वावद्दल तर्कवितर्क करीत बसणे हे महत्त्वाचे आहे ? सत्य काय आहे यावद्दल वितंडवाद घालीत बसण्यापेक्षा सत्य शोधून काढणे हेच अधिक महत्त्वाचे नाही का ? सत्य काय आहे यासंबंधीचे मत म्हणजे काही सत्य नव्हे. तेव्हा कर्मामागील सत्य काय आहे हे शोधून काढणे हेच खरोखर महत्त्वाचे आहे; होय की नाही ?

असत्यातील असत्यत्वाचे दर्शन होणे म्हणजेच त्याच्या आकलनाला आरंभ होणे होय. आपले मन जर पूर्वपरंपरांनी, शब्दांनी किंवा नाना भाष्यांनी वद्ध होऊन गेले असेल, तर आपल्याला सत्याचे काय किंवा असत्याचे काय, दर्शन होऊ तरी शकेल का ? मन हे जर विशिष्ट निष्ठेच्या खुंटाला पक्के बांधून ठेवलेले असेल, तर त्याला दूरदूर कसे बरे जाता येईल ? सत्यासाठी दूरच्या प्रवासाला निघण्यासाठी मन हे प्रथम मुक्त, स्वतंत्र असेच असले पाहिजे. मुक्तता किंवा स्वातंत्र्य हे या प्रवासाच्या आरंभीच असले पाहिजे. प्रदीर्घ प्रयत्नांनी काही ते साध्य करून घ्यावयाचे नसते.

" आपण कर्माचा काय अर्थ करता हे मला जाणून घ्यावयाचे आहे."

पण कर्माचा शोध घेण्याचा हा प्रवास आपण दोघे मिळूनच सुरू करू या. इतरांनी बोललेल्या शब्दांची नुसती पोपटपंची करण्यात काही अर्थ नाही. ते ग्रामोफोनची तबकडी वाजवण्यासारखेच आहे. कशाचीही पुनरुक्ती करण्याने किंवा कशाचेही अनुकरण करण्याने विमुक्तता ही कधीच अस्तित्वात येत नसते. पण कर्म या शब्दाचा तुम्ही काय अर्थ करता हे प्रथम सांगाल का ?

" कर्म हा संस्कृत शब्द आहे. व करणे, असणे, क्रिया करणे हे त्याचे अर्थ आहेत. कर्म म्हणजे कृती व कृती म्हणजे गतकालाचा परिपाक. म्हणून पूर्वसंस्कारांची पार्श्वभूमी असल्याशिवाय कर्म आकारासच देऊ शकत नाही. परंपरेची ही

पार्श्वभूमी नाना अनुभव-शृंखलांनी, पूर्वसंस्कारांनी व ज्ञानविज्ञानाने घडविली जात असते. आणि ती व्यक्तीच्या वा समूहाच्या सध्याच्या जन्मातच नव्हे तर अनेक पूर्व-जन्मामधून घडविली जात असते. ही जी परंपरेची पार्श्वभूमी असते,—जी 'अहं' म्हणून ओळखली जाते— तिच्यामध्ये आणि जीवनामध्ये, तसेच तिच्यामध्ये व समाजामध्ये ज्या क्रिया-प्रतिक्रिया सतत चालू असतात, त्या म्हणजेच कर्म. हे 'कर्म' अहंला किंवा मनाला बद्ध करून टाकीत असते. मी जे जे काही माझ्या पूर्वजन्मी किंवा अगदी काल केलेले असते, ते मला सदैव बद्ध करीत असते, माझ्या जीवनाला आकार देत असते. आणि तेच मला वर्तमानात सुख किंवा दुःख देत असते. कर्म हे असे सामूहिक स्वरूपाचे असते, त्याचप्रमाणे ते व्यक्तिगत स्वरूपाचेही असते. कार्यकारणांच्या या कर्मशृंखलेत व्यक्ती व समूह हे दोन्हीही बद्ध केले जात असतात. गतजन्मी मी जे जे कर्म केले असेल त्याप्रमाणे मला या जन्मी दुःख किंवा सुख, दंड किंवा पारितोषिक प्राप्त होते."

कृती ही गतावर आधारली असते असे तुम्ही म्हणता. पण अशा कृतीला खरी कृती असे म्हणताच येणार नाही. अशी कृती ही तर निव्वळ प्रतिक्रियाच असते; नाही का ? आज उसळणाऱ्या आपल्या प्रत्येक प्रवृत्तीला, संवेदनेला वा प्रचोदनेला पूर्वसंस्कारांच्या पार्श्वभूमीमधून जे उत्तर दिले जात असते ते प्रतिक्रियात्मक असेच असते. ते केवळ गतस्मृतीने दिलेले उत्तर असते. म्हणून ती खरी कृती नसते, तर ते नुसते प्रतिक्रियात्मक असे कर्म असते. खरी कृती म्हणजे काय हा प्रश्न आपण थोडा वेळ बाजूला ठेवू या. व कर्माचाच विचार करू या. काही विशिष्ट कारणामुळे घडून येणारी विशिष्ट परिणामांची प्रतिक्रिया म्हणजे कर्म. अशी कारण-कार्यांची शृंखला म्हणजे कर्म. कालप्रक्रिया म्हणजेच वस्तुतः कर्म होय. म्हणून जोवर गत-काल हा कायम राहील तोवर वर्तमान व भविष्य हेही राहणारच. आज व उद्या हे कालचे म्हणजे गतकालाचे परिणाम आहेत. काल हा सदैव आजमध्ये मिसळून जाऊन उद्याची निर्मिती करीत असतो. जसे कर्म तसेच फल, असाच सामान्यपणे कर्माचा अर्थ करण्यात येत असतो.

"कर्म म्हणजे कालप्रक्रिया व मन म्हणजे कालाचा परिपाक असे जे आपण सांगता ते योग्यच आहे. कालाच्या या मगरमिठीतून काही थोडेसेच भाग्यवंत सुटू शकतात. बाकीचे आमच्यासारखे सर्वसामान्य लोक कालपाशात बद्ध आवळले जात असतात. गतकालात आम्ही जे काही बरेवाईट केले असते, तदनुसार आमची आजची अवस्था निश्चित केली जात असते."

पण गतकाल किंवा पूर्वसंस्कारांची पार्श्वभूमी ही एखादी स्थिर वा गतिशून्य अशी अवस्था थोडीच आहे ? तेथेही सदैव फरक घडून येतच असतात; नाही का ? तुम्ही काल जसे होता, तसे काही आज नाही. शारीरिक व मानसिक अशा दोन्ही

दृष्टींनी तुमच्यामध्ये सदैव बदल घडून येत राहतात; होय की नाही ?

"अर्थातच"

तेव्हा मन ही काही एखादी स्थाणुवत स्थिर व बद्ध अशी अवस्था नव्हे. आपले विचार हे अस्थिर असतात, सारखे बदलत राहतात. आपले विचार हे आपल्या पूर्वसंस्कारांचेच उत्तर असते. मनुष्य जर समाजाच्या एका विशिष्ट वर्गात व विशिष्ट संस्कृतीत वाढला असेल तर जीवनाच्या आव्हानाला किंवा प्रचोदनेला त्याच्याकडून मिळणारे उत्तर हे त्या पूर्वसंस्कारानुसारच राहील. हे पूर्वसंस्कार आपणा बहुतेकांमध्ये इतके खोल खोल रुजलेले असतात की, जीवनाच्या आव्हानांना आपल्याकडून दिली जाणारी उत्तरे ही विशिष्ट साच्याची किंवा प्रबंधाचीच असतात. आपले विचार म्हणजे या पूर्वसंस्कारात्मक पार्श्वभूमीकडून दिले जाणारे उत्तर. आणि ही पार्श्वभूमी म्हणजे वस्तुतः आपण स्वतःच. ही पार्श्वभूमी किंवा पूर्वसंस्कार आपणापासून मुळीच वेगळे नसतात. व आपणांशी विसदृशही नसतात. आपल्या पार्श्वभूमीत बदल झाला की आपले विचारही बदलतात.

"पण विचारक हा तर या पार्श्वभूमीपासून सर्वस्वी वेगळाच असतो, होय ना ?"

तो खरेच वेगळा असतो का ? विचारक हा वस्तुतः आपल्या विचारांचाच परिणाम नसतो का ? तो आपल्या विचारांनीच घडविला गेला नसतो का ? विचारांपासून वेगळी अशी विचारक नामक वस्तू अस्तित्वात असते तरी का ? अस्थिर व अशाश्वत अशा विचारानेच शाश्वत समजल्या जाणाऱ्या विचारकाची निर्मिती केलेली नसते का ? विचारक हा वस्तुतः विचारांचा घोटीव गाळच नसतो का ? हा विचारकच स्वतःला शाश्वततेच्या वेगवेगळ्या स्तरांवर नेऊन बसवीत असतो.

'अशीच वस्तुस्थिती आहे असे दिसते खरे. बाकी आपला विचार हा आपल्याशी हे जे फसवाफसवीचे खेळ खेळत राहतो, त्यांची एकाएकी तीव्र जाणीव झाल्याने मला काहीसा धक्का बसला आहे."

हे पाहा, विचार हे आपल्या पूर्वसंस्कारात्मक पार्श्वभूमीने, आपल्या गतस्मृतीने आपल्या जीवनाच्या आव्हानाला दिलेले उत्तर असते. आपली स्मृती हा आपल्या अनुभवांचाच परिपाक असतो. स्मृती म्हणजेच आपले ज्ञान असते. आणि आपला अनुभव जसजसा वाढत जातो, स्मृतिकडून जीवनाला दिली जाणारी उत्तरे जसजशी विस्तारत जातात, तसतशी ही स्मृती अधिक पक्की, अधिक टणक, अधिक विशाल व अधिक कुशाग्र व कार्यक्षम बनत जाते. आपल्या पूर्वसंस्कारांचे स्वरूप बदलून त्यांच्या जागी दुसऱ्याची प्रतिष्ठापना आपल्याला करता येते हे खरे आहे. पण हे दुसरे स्वरूपही पूर्वसंस्कारांचेच रूप असते. अशा या पूर्वसंस्कारांकडून जीवनात दिले जाणारे उत्तर म्हणजेच कर्म. होय की नाही ? स्मृतीकडून दिल्या जाणाऱ्या या उत्तरालाच कृती म्हणण्यात येते. पण वस्तुतः ती तर केवळ प्रतिक्रियाच असते. अशा या प्रतिक्रियारूपी 'कृती'मधून अधिकाधिक प्रतिक्रियाच

निर्माण होत राहातात. आणि याच रीतीने कारण-कार्यांची शृंखला उत्पन्न होत राहते. पण कोणतेही कारण हे अखेर पूर्वीच्या कारणाचे कार्य नसते का ? कारण किंवा कार्य ही कधीही स्थिर वा गतिशून्य नसतात. आज हे कालचे जसे कार्य आहे, तसेच आज हे उद्याचे कारणही आहे. जे कारण असते ते कार्य बनते आणि जें कार्य असते ते कारण बनते. एक दुसऱ्यात मिसळून जात असते. कोणतेही कारण हे कार्य नाही, असे कोणत्याही क्षणी असत नाही. परंतु जे जे विशिष्ट धर्मांनी युक्त असते, त्याचे कारण मात्र पक्के व निश्चित असते. आणि त्याचे कार्य ही तसेच पक्के व निश्चित असते. ओक वृक्षाच्या बीमधून ओक वृक्षाशिवाय दुसरे काहीही निर्माण होणे शक्य नसते. जेथे जेथे विशिष्ट धर्मिता असते, तेथे तेथे मरण असते. पण मनुष्य हा मात्र विशिष्ट धर्मयुक्त असा नाही. त्याला काय हवे ते होणे शक्य असते. आपल्या पूर्वसंस्कारांचा पूर्ण भंग करून टाकणे, हेही त्याला शक्य असते, आणि त्याला जर सत्याचा शोध घ्यावयाचा असेल तर त्याने हे केलेच पाहिजे. उदाहरणार्थ, तुम्ही जर आज ब्राह्मण असाल, तर ईश्वरसाक्षात्कार होण्यासाठी तुमच्या ब्राह्मणत्वाचा अंतच घडून आला पाहिजे.

कर्म ही कालप्रक्रिया असते. ते गतकालाचे वर्तमानामधून भविष्याकडे जात राहणे असते. अशी ही कालशृंखला वा कर्मशृंखला म्हणजेच विचारप्रक्रिया होय. विचार हा कालाचा परिणाम असतो. म्हणून विचारप्रक्रिया ही जेव्हा संपूर्णपणे थांबते तेव्हाच ते कालातीत, ते अमर्याद तेथे अवतरणे संभवते. पण विचारप्रक्रिया थांबणे किंवा मन पूर्णपणे निःशब्द होणे हे प्रयत्नाने घडवून आणणे शक्य नसते. कुठल्याही तपस्येने वा साधनेने हे साधणे शक्य नसते. मन जर प्रयत्नांने मुद्दाम निःस्तब्ध बनविले गेले, तर अशा मनात जे जे येत राहील, तो तो केवळ मनाचा प्रक्षेपच असेल. ते केवळ स्मृतीकडून दिले जाणारे उत्तरच राहील.

मनाला जेव्हा आपल्या या पूर्वसंस्कारबद्धतेचे यथार्थ आकलन होते, विचार व भावना यांच्या द्वारा आपल्याकडून जे उत्तर दिले जाते, त्याची आवड-निवडशून्य अशी साक्ष जेव्हा मनाला पटत जाते, तेव्हाच मन सहजपणे शांत, निःस्तब्ध होते. पण कर्मशृंखलेचा असा भंग दीर्घ कालाने होत नसतो. कारण कालाच्या साह्याने ते कालातीत अस्तित्वात येणे कधीही शक्य नसते.

कर्म हे केवळ गतकालीन आहे, याच दृष्टीने त्याचे आकलन करून घेता उपयोगी नाही, तर कर्माच्या संपूर्ण प्रक्रियेचे आकलन करून घेतले पाहिजे. गत हा जसा कालात्मक आहे तसेच वर्तमान व भविष्य हेही कालात्मकच आहेत. स्मृती शब्द व कल्पना हे सर्व कालरूपच आहेत. म्हणून शब्दाचा, नामाचा, त्यांच्या साहचर्याचा व अनुभूतीचा जेव्हा सहज अभाव घडून येतो, तेव्हाच मन हे निःस्तब्ध होते. मग ते केवळ वरवरच्या स्तरात निःस्तब्ध होत नाही, तर संपूर्णपणे, आमूलाग्र शांत, निःस्तब्ध होते.

व्यक्ती आणि ध्येय

भेटण्यास आलेली व्यक्ती सांगू लागली,

" आमचे आजचे बहुतेक भारतीय जीवन उध्वस्त होऊन गेले आहे. ते नीटनेटके व्यवस्थित करण्याची आमची फार इच्छा आहे. पण यासाठी सुरुवात कुठून करावी हे मात्र कळत नाही. कारण सामूहिक स्वरूपाचे कार्य करण्याचे महत्त्व जसे मला कळते, त्याप्रमाणेच अशा कार्यातील धोकेही मला समजतात. आजवर मी अहिंसेच्या ध्येयानुसारच चालत आलो आहे खरा, पण तरीही देशामध्ये रक्तपात होण्याचे काही थांबले नाही. आणि लोकांचे दुःखदैन्यही कमी झाले नाही. देशाची फाळणी झाल्यापासून तर सारेच जीवन रक्तलांछित होऊन गेले आहे. आणि आता तर आम्ही सैन्याचीही वाढ करू लागलो आहोत. आमची भाषा अहिंसेची पण कृती मात्र युद्धसज्जतेची आहे. देशातील इतर राजकीय पुढाऱ्यांइतकाच मीही गोंधळून गेलो आहे. तुरुंगात असताना मी या दृष्टीने बरेच वाचन करीत असे. पण तरी अजूनही आपला योग्य मार्ग कोणता आणि आपली योग्य दिशा कोणती याचे स्पष्ट दर्शन घडण्यास मला त्या वाचनाचा काहीही फायदा झाला नाही.

आपण एकेक प्रश्न घेऊन त्याचा खोलवर विचार करु या का ? आपला मुख्य भर नेहमी व्यक्तीवर असतो. पण सामूहिक कृती हीदेखील महत्त्वाची व आवश्यक नाही का ?"

हे पाहा, व्यक्ती हीदेखील मुख्यतः सामूहिक स्वरूपाचीच असते. आणि व्यक्तींनीच समाजाची निर्मिती केलेली असते. व्यक्ती व समाज हे परस्परसंबद्धच असतात; होय की नाही ? ते वेगवेगळे मुळीच नसतात. व्यक्ती हीच समाजाची रचना करीत असते आणि समाज किंवा परिस्थिती हीही व्यक्तिजीवनाला वळण देत असते. मात्र परिस्थिती ही जरी व्यक्तीला संस्कारबद्ध करीत असली, तरी परिस्थितीपासून स्वतःची मुक्तता करून घेणे व परिस्थितीच्या बंधनाचे पाश तोडून टाकणे हे व्यक्तीला केव्हाही शक्य असते. वस्तुस्थिती अशी असते की, व्यक्ती जो परिस्थिती निर्माण करीत असते, तिचीच ती दास बनून जाते. पण या बंधनकारक परिस्थितीपासून स्वतःची मुक्तता करून घेण्याचे सामर्थ्यही तिच्यात वसत असते. तसेच व्यक्तिमनाला निर्बुद्ध व संवेदनशून्य बनविणार नाही, अशी नवी परिस्थिती उत्पन्न करण्याचेही सामर्थ्य तिच्यात वसत असते. आपल्या संस्कारबद्धतेतून स्वतःला विमुक्त करण्याची व सत्य आकळून घेण्याची क्षमता व्यक्तीमध्ये असते, म्हणूनच व्यक्ती ही अधिक महत्त्वाची ठरते.

पण जेथे व्यक्तीचे व्यक्तित्व हे निष्ठुर अशा संस्कारबद्धतेमधून घडविले गेले

असते, त्या ठिकाणी अशी संस्कारबद्ध व्यक्ती जी समाजरचना निर्माण करते, ती हिंसात्मकता व विरोध यांच्यावरच आधारलेली असते. व्यक्ती ही नेहमीच इतरांशी विविध संबंधांनी व नात्यांनी बांधलेली असते. असे संबंध नसतील, तर तिला अस्तित्वच उरणार नाही. पण इतरांशी असणाऱ्या आपल्या विविध संबंधांचे यथार्थ आकलन व्यक्ती करून घेत नाही, म्हणूनच तिच्या मनात संघर्ष व संभ्रम यांचा उद्भव होत राहतो. व्यक्तीचे इतर लोकांशी, आपल्या मालमत्तेशी, आपल्या विविध कल्पनांशी व निष्ठांशी जे संबंध असतात, त्यांचे जर तिला नीट आकलन होत नसेल, तर तिच्यावर एखादा सामूहिक स्वरूपाचा आचारविचारांचा साचा नुसता लादल्याने, लादण्याचा हेतूच पूर्ण निष्फळ होऊन जाईल. असा हा नव्या व्यवस्थेचा साचा व्यक्तींवर लावावयाचा असला, तर तथाकथित सामूहिक कृतीचा आश्रय घ्यावा लागतो हे खरे आहे. पण हा वर्तनाचा नवा साचा हीदेखील काही व्यक्तींच्या मेंदूतून निघालेली निर्मितीच असते. मग नवा साचा व्यक्तींवर लादण्यासाठी अगदी अद्ययावत अशा घोषणांचा वापर करण्यात येत असतो. नव्या, आदर्श समाजरचनेची आकर्षक आश्वासने दिली जात असतात व अशा रीतीने जनतेला भुरळ पाडली जात असते. जनता विचारी पूर्ववत अवस्थेतच राहते.

पण नव्या जमान्यात तिचे राज्यकर्ते नवीन असतात. नव्या घोषणा, नवे सिद्धांत, नवे धर्मगुरू आता तिला लाभलेले असतात. ही जनता तुमच्या माझ्यासारख्या व्यक्तींची बनलेली असते. सारा जनसमूह हा व्यक्तींचाच बनलेला असतो. जनता हा शब्द किंवा ही वस्तू निव्वळ काल्पनिक असते. शोषणकर्त्यांना किंवा राजकारणी लोकांना आपला खेळ खेळता यावा यासाठीच 'जनता' ही सोइस्कर संज्ञा वापरण्यात येत असते. या जनतेला, अनेक व्यक्तींच्या या समूहाला, नाना तऱ्हेच्या सामूहिक कार्यांत किंवा युद्धासारख्या गोष्टीत जे ढकलले जात असते, तेही थोड्याशा व्यक्तींकडूनच ढकलले जात असते. या अल्पसंख्य नेतारूप व्यक्ती, हया अनेक व्यक्तींच्या अभिलाषांचे व प्रवृत्ति-प्रचोदनांचे प्रतिनिधित्व करीत असतात. म्हणून व्यक्ती हीच महत्त्वाची असते व व्यक्तीचे मूलभूत परिवर्तन घडून येणे हेच सर्वश्रेष्ठ महत्त्वाचे असते. पण हे परिवर्तन कुठल्याही विशिष्ट साच्याप्रमाणे मात्र घडून येता उपयोगी नाही. कारण आचारविचारांचे पक्के साचे हे व्यक्तीला नेहमीच संस्कारबद्ध करून टाकीत असतात. आणि मग या संस्कारबद्ध झालेल्या व्यक्तींच्या मनांमध्ये सतत संघर्ष चालू होतो व त्यामुळे तिचा समाजाशीही संघर्ष होत राहतो. संस्कारबद्ध करणाऱ्या एका साच्याऐवजी दुसऱ्या साच्याची प्रतिष्ठापना करणे हे सामान्यतः सोपे असते. पण कोणत्याही संस्कारबद्धतेपासून व्यक्तीने स्वतःला विमुक्त करून टाकणें, ही गोष्ट मात्र अगदी वेगळ्या कोटीची असते.

"आपण सांगता त्या सर्व गोष्टींचा तपशीलवार व काळजीपूर्वक असा विचार

करावयाला हवा हे अगदी स्पष्ट आहे. पण आपला नेमका रोख कोणत्या गोष्टीवर आहे याचे मला थोडेसे आकलन होऊ लागले आहेसे वाटते. आपला सगळा भर व्यक्तीवर आहे. पण समाजाला विरोध करणारी एक भिन्न शक्ती असा काही आपला व्यक्तित्वाचा अर्थ नाही असे वाटते.

" दुसरा एक प्रश्न मला विचारावयाचा आहे. आयुष्यभर मी ध्येयासाठीच कार्य करीत आलो आहे. म्हणून ध्येयाचा आपण जो निषेध करता त्याचे मला आकलन होत नाही. म्हणून ध्येयाच्या या प्रश्नाच्या गाभ्यात शिरून त्याचा अधिक उकल आपण कराल का ?"

प्रथम हे लक्षात घ्या की, आपली जी सध्याची नीतिमत्ता आहे, ती एकतर गतावर किंवा परंपरेवर तरी आधारलेली असते किंवा भविष्यावर अथवा जे असावयास हवे त्याच्यावर, म्हणजेच ध्येयावर तरी आधारलेली असते. हे जे असावेसे वा घडावेसे वाटते, हे जे ध्येय असते ते नेहमी भविष्यात्मकच असते. आणि हे ध्येय जे होऊन गेले आहे, त्याच्या विरोधात उभे असते. सारांश, हे ध्येय किंवा भविष्य गताच्या विरोधात खडे असते. अहिंसा हे ध्येय असते, किंवा जे असावेसे वाटते ते असते. आणि जे होऊन गेलेले असते, गत असते, ती हिंसात्मकता असते. हे जे गत असते, तेच जे असावेसे वाटते त्याची, ध्येयाची कल्पनेने निर्मिती करीत असते. ध्येय हे नेहमीच स्व-कल्पित असते; उदाहरणार्थ अहिंसा. वास्तवात, प्रत्यक्षात जी हिंसात्मकता असते, तीच कल्पनेने या अहिंसेच्या ध्येयाची निर्मिती करीत असते. हा जो स्थितिविरोध असतो वा भासतो, तो वस्तुतः त्या मूळ स्थितीचाच (हिंसात्मकतेचाच) विस्तार असतो. हे जे विरोधी (अहिंसा) असते, त्याच्यात त्याच्या विरोधाचीच (हिंसात्मकतेचीच) घटकद्रव्ये अनुस्यूत असतात. मन हे हिंसात्मक असते आणि हिंसात्मकतेतून बाहेर पडण्यासाठी, हिंसेच्या विरोधी असणाऱ्या अशा अहिंसेच्या आदर्शाची वा ध्येयाची ते काल्पनिक निर्मिती करीत असते. अशा या ध्येयामुळे विरोधी अवस्थेवर मात करण्यास मदत होते असे म्हटले जाते. पण अशी मदत खरोखरच होते का ? की, हे ध्येय म्हणजे, जी पूर्वी अवस्था होती किंवा आज आहे, तिच्याकडे दुर्लक्ष करण्याचाच प्रकार असतो ? कठोर व कटू वास्तवतेपासून दूर जाण्याची ती पळवाटच ठरत नाही का ? प्रत्यक्ष वस्तुस्थिती व ध्येय यांच्यामधील हा विरोध म्हणजे प्रत्यक्षाचे यथार्थ आकलन लांबणीवर टाकण्याचाच प्रकार असतो, हे उघडच नाही का ? या परस्परविरुद्धांच्या संघर्षातून एक नवीच समस्या उद्भवत असते. आणि ही नवी समस्या समोरची निकडीची, तातडीची समस्या झाकून टाकण्यास मदत करीत असते. ध्येय ही प्रत्यक्ष वस्तुस्थिती-पासून दूर पळण्याची मोठी प्रतिष्ठित व उत्कृष्ट पळवाट असते. सामाजिकतेवर आधारलेली आदर्श समाजरचना ही जशी संपूर्णपणे काल्पनिक वा वस्तुशून्य असते,

तसेच अहिंसेचे ध्येय हेही पूर्णपणे काल्पनिक व वस्तुशून्य असेच असते. जे असावेसे वाटते, जे ध्येय असते, ते प्रत्यक्ष वस्तुस्थिती झाकून टाकण्यास व कोणतीही कृती करण्याचे टाळण्यास मदत करीत असते. ध्येयाचा पाठलाग करणे म्हणजे पारितोषिकाचा शोध करीत राहणे होय. सगळी ऐहिक पारितोषिके ही उघडउघड रानटी स्वरूपाची व निर्बुद्ध अशी असतात, असे मानून तुम्ही ती टाळीत राहाल हे खरे. कारण तशी ती खरोखरच असतात. पण तुम्ही हा जो ध्येयाचा पाठलाग करीत असता तोही एका वेगळचा पातळीवरचा पारितोषिकाचाच पाठलाग असतो. म्हणून तोही निर्बुद्ध स्वरूपाचाच ठरतो. ध्येय ही मनाने उत्पन्न केलेली एक काल्पनिक वा वस्तुशून्य अवस्था असते. वस्तुस्थिती असमाधानकारक असते म्हणून तिच्यात न्यूनता जाणवत राहते. या न्यूनतेची भरपाई करू पाहणारा काल्पनिक प्रकार म्हणजे ध्येय. वस्तुतः मन हे हिंसात्मक, विभक्त व स्वार्थी असते. पण मनाला या साऱ्या गोष्टी अनिष्ट वाटत असतात. म्हणून या अनिष्ट गोष्टींची संतोषदायक भरपाई करून टाकण्यासाठी ते ध्येयनामक वस्तुशून्य विकल्पनाची निर्मिती करीत असते. यालाच मग ते आदर्श समाजरचना, भवितव्य, अशी नावे देत राहते आणि या गोष्टींचा वांझोटा पाठलाग करीत राहते. हा ध्येयाचा पाठलागही संघर्षग्रस्तच असतो. पण या पाठलाग करण्यामुळे एक गोष्ट साधते. प्रत्यक्ष वस्तुस्थितीचे यथार्थ आकलन हे या पाठलागामुळे सुखद रीतीने लांबणीवर टाकता येते. म्हणूनच जी प्रत्यक्ष वस्तुस्थिती असते, तिचे यथार्थ आकलन करून देण्यास ध्येय हे मुळीच उपयोगी पडत नाही. उलट त्यामुळे या आकलनास अडथळाच उत्पन्न होतो.

" मग आजवर आपले नेते व गुरुजन, ध्येय हे आवश्यक आहे व त्याची नित्य जोपासना करीत राहिले पाहिजे, असा जो उपदेश करीत आले आहेत, तो संपूर्ण चुकीचा होता, असे का आपले म्हणणे आहे ?"

तुम्हाला स्वतःला काय वाटते ?

" आपण काय म्हणता हे मला जर नीट समजले असेल ... "

हे पाहा, दुसरे कोण काय म्हणते, हे समजून घेण्याचा हा प्रश्न नाही, तर सत्य काय आहे हे स्वतःच शोधून पाहण्याचा हा प्रश्न आहे. सत्य म्हणजे मत नव्हे. सत्य हे कुणाही नेत्यावर वा गुरूवर अवलंबून नसते. वेगवेगळी मते तोलून मापून पाहण्याने सत्यदर्शनाला प्रतिबंधच उत्पन्न होत असतो. एकतर ध्येय (उदा० अहिंसा) हे स्वनिर्मित असे वस्तुशून्य विकल्पन आहे व त्याच्यामध्ये प्रत्यक्षात, वास्तवात असणारी हिंसात्मकता ही अनुस्यूतच आहे हे यथार्थ तरी माना नाही तर यथार्थ नाही असे तरी सिद्ध करा. याशिवाय तिसरा पर्यायच उपलब्ध नाही. असे सत्यदर्शन हे कुठल्याही गुरूवर अवलंबून नसते. सत्याचे दर्शन हे प्रत्येकाला स्वतःच करून घ्यावे लागत असते.

" ध्येय हे जर केवळ काल्पनिकच असेल, तर माझ्या सर्वच विचारात क्रांतिकारक बदल होईल. पण आजवर आम्ही जो ध्येयाचा पाठलाग करीत होतो, तो निरर्थकच आहे, असे का आपले म्हणणे आहे ?"

होय, ती सर्व केवळ निरर्थक अशीच धडपड आहे. ती एक सुखद अशी आत्मवंचना आहे; होय की नाही ?

" आपण सांगता ते सर्व अतिशय अस्वस्थ करून टाकणारे आहे. पण आपण सांगता ते सत्य आहे, हे कबूल करणे मला भागच आहे. आम्ही आजवर इतक्या गोष्टी गृहीत धरीत आलो आहोत की, प्रत्यक्ष आपल्या हातात काय आहे याचे जवळून निरीक्षण करावयाला आम्ही स्वत:ला कधी अवसरच दिला नाही. आजवर आम्ही आत्मवंचाच करीत आलो आहोत. त्यामुळे आपण आता ज्याच्याकडे माझे लक्ष वेधले आहे.त्याने माझ्या विचारांची कृतिप्रवणतेची समग्र इमारतच हादरून गेली आहे. आमचे शिक्षण, आमची एकूण जीवनरीत व कार्यपद्धती यांच्यामध्ये यामुळे संपूर्ण परिवर्तन घडून येईल. ध्येयापासून व इष्ट वाटणाऱ्या साध्यापासून पूर्ण विमुक्त झालेले मन म्हणजे काय, याची मला आता थोडीशी जाणीव होऊ लागली आहे. अशा विमुक्त मनाकडून होणाऱ्या कृतीला जी सार्थता प्राप्त होईल, ती आमच्या आजच्या कृतीपेक्षा अगदीच वेगळ्या प्रकारची राहील, यात शंकाच नाही. कसल्याही न्यूनतेची भरपाई करण्यासाठी केली जाणारी कृती ही खरी कृतीच नव्हे. ती निव्वळ प्रतिक्रिया आहे. -- आणि आम्ही आपल्या कृतिशीलतेची केवढी बढाई मिरवीत असतो ! - - - पण एक शंका मनात आहे. ध्येय किंवा इष्टसाध्य समोर असल्यावाचून, जे प्रत्यक्ष आहे त्याच्याबाबत, किंवा जे होऊन गेले त्याच्याबाबत कोणतीही कृती कशी बरे करता येईल ?"

वस्तुस्थिती अशी आहे की, जे इष्ट असे वाटते किंवा जे ध्येय होऊन बसले असते, ते मनातून संपूर्णपणे जेव्हा पुसले जाते, तेव्हाच जे वर्तमान वास्तव आहे त्याचे आकलन करून घेणे शक्य होते. याचाच अर्थ हा की, जेव्हा असत्यामधील असत्यत्वाचे दर्शन घडते तेव्हाच वास्तवाचे यथार्थ आकलन होणे शक्य होते. जे इष्ट असे वाटते, जे असावेसे वाटते, त्याच्यात जे अनिष्ट आहे त्याचाही, अंतर्भाव झाला असतो. म्हणून जोपर्यंत वर्तमान वास्तवामध्ये भासणाऱ्या न्यूनतेची भावात्मक वा अभावात्मक रीतीने पूर्तता करण्याकडेच मन ओढ घेत राहील तोवर वास्तवाचे आकलन होणार नाही. वास्तवाचे आकलन होण्यासाठी तुमचा त्याच्याशी साक्षात सुसंवाद घडून आला पाहिजे. वास्तवाशी तुमचा जो संबंध जुळून यावयास हवा, तो ध्येयाच्या पडद्याआड उभे राहून कधीच जुळणे शक्य नाही. त्याचप्रमाणे गताच्या, परंपरेच्या अथवा गतानुभवांच्या पडद्याआड राहूनही तो जुळून येणार नाही. चुकीच्या दृष्टिकोनापासून आपले मन प्रथम मुक्त कसे होईल, हाच खराखुरा प्रश्न आहे.

याचाच अर्थ हा की, आपल्याला प्रथम आपल्या पूर्वसंस्कारबद्ध अशा मनाचे यथार्थ आकलन झाले पाहिजे. कारण आपले मन हीच खरी समस्या असते; मन ज्या समस्या निर्माण करीत राहते त्या वस्तुतः खऱ्या समस्या मुळी नसतातच. मन ज्या समस्या उत्पन्न करीत राहते, त्या सोडवीत राहणे म्हणजे, मूळ कारण बाजूला सारून वरवरच्या परिणामांचा समन्वय करीत राहणे होय. पण अशा प्रकारच्या समन्वयामधून अधिक गोंधळ व अधिक संभ्रम हेच काय ते उत्पन्न होत राहतात.

"पण आपल्या मनाचे आकलन तरी कसे करून घ्यावयाचे ?"

मनाची रीत म्हणजे एकूण जीवनाची मात्र रीत नव्हे, तर प्रत्यक्ष वर्तमान जीवनाची -- दुःख व सुख, वंचना व निर्मलता, खोटी प्रौढी व नम्रतेचा आव -- इत्यादिकांनी गच्च भरलेल्या प्रत्यक्ष, वर्तमान जीवनाचीच ती रीत असते. मनाचे आकलन करून घेण्यासाठी आपल्या विविध अभिलाषांची व संपूर्ण भयग्रस्ततेची यथार्थ जाणीव करून घेतली पाहिजे.

"हे तर माझ्या आकलनाच्यां पलीकडे जात चालल्यासारखे मला वाटते. स्वतःच्या मनाचे आकलन मला कसे करून घेता येईल ?"

मनाचे आकलन करून घेण्यासाठी त्याचे विविध व्यापार कसे चालत राहतात, याची जाणीव नको का करून घ्यावयाला ? मन म्हणजे अनुभव – नुकताच आलेला अनुभव नव्हे, तर आजवर संचित झालेला समग्र अनुभव. मन म्हणजे संपूर्ण गतानुभवाचा आशय. मन म्हणजे या गतानुभवाकडून वर्तमानाला दिले जाणारे उत्तर. या उत्तरामधूनच भविष्य आकार घेत असते. म्हणून अशा या मनाच्या संपूर्ण प्रक्रियेचे आकलन करून घेतले पाहिजे.

"पण यासाठी सुरुवात कुठून करावयाची ?"

याची सुरुवात एकच. इतरांशी असणाऱ्या आपल्या संबंधांपासूनच ही सुरुवात करावयाची असते. कारण संबंध म्हणजेच जीवन जगणे म्हणजेच संबंधित असणे. आपल्या विविध संबंधांच्या आरशामध्येच आपल्याला आपल्या मनाचे आकलन करून घ्यावयाचे असते. या आरशातच आपले दर्शन करून घेण्याची सुरुवात तुम्हांला केली पाहिजे.

"म्हणजे माझ्या पत्नीशी, माझ्या शेजाऱ्याशी किंवा इतरांशी असणाऱ्या संबंधांच्या आरशात का मी स्वतःचे दर्शन करून घ्यावयाचे ? पण ही सर्व प्रक्रिया अतिशय मर्यादित व संकुचित अशी नाही का ?"

जे लहानसे वाटते, जे मर्यादित वाटते, यांचे योग्य दृष्टिकोनातून दर्शन घेतले, तर तेच अमर्यादाचे दर्शन करून देते. ते तेल भरावयाच्या चाडीसारखे असते. तिचे एकीकडचे टोक अतिशय निमूळते असेल तरी ते दुसरीकडे विस्तारत जाते. समर्या-. दाचे अक्रिय सावधानतेने निरीक्षण करीत राहिले की तेच अमर्यादाचे दर्शन घडविते

नदीसुद्धा उगमापाशी किती लहान असते. तेथे तिचा स्रोत लक्ष वेधण्याइतकाही नसतो.

" मग मला स्वतःपासून व माझ्या जवळच्या संबंधांपासूनच सुरुवात केली पाहिजे. "

अर्थातच. संबंध हे कधीच अल्प किंवा संकुचित नसतात. आपले जे एकाशी वा अनेकांशी संबंध असतात, ते अतिशय गुंतागुंतीचे असतात. त्यांचे निरीक्षण आपण एकतर क्षुद्र व संकुचित अशा वृत्तीने करू शकतो किंवा प्रांजल व विमुक्त वृत्तीने करू शकतो. शिवाय आपला दृष्टीकोन हाही आपल्या मनाच्या अवस्थेवर अवलंबून असतो. असे निरीक्षण करण्यास तुम्ही जर स्वतःपासूनच सुरुवात केली नाही, तर दुसरीकडून कुठून बरे कराल ? स्वतःच्या एखाद्या वरवरच्या कार्यापासून जरी तुम्ही सुरुवात केलीत, तरी तुमच्या त्या कार्याशी संबंध असतोच. तुमचे मन हेच या संबंधाचे केंद्र असते, तुम्ही निकटच्या संबंधांपासून सुरुवात करा की दूरच्या संबंधापासून करा. तुम्ही तेथे असताच, तुमचा अहं तेथे आहेच. म्हणून तुम्ही जर स्वतःचे यथार्थ आकलन करून घेतले नाहीत, तर तुम्ही जे जे करीत जाल, त्यातून गोंधळ व दुःख यांचीच निर्मिती अटळपणे होत राहील. असा आरंभ हाच शेवट असतो.

" आजवर मी जीवनात बराच दूरदूरचा प्रवास केलेला आहे. अनेक गोष्टी पाहिल्या आहेत, अनेक केल्या आहेत. इतरांप्रमाणेच मी दुःखही भोगले आहे व आनंदही चाखला आहे. आणि अखेर मला स्वतःकडेच परत यावे लागत आहे. सत्याच्या शोधार्थ निघालेल्या त्या संन्याशासारखेच माझ्याही बाबतीत घडत आहे. या गुरुकडून त्या गुरुकडे जात जात त्याने अनेक वर्षे घालवली. प्रत्येक गुरूने त्याला भिन्न-भिन्न मार्ग सुचवला, अखेर दमूनभागून तो घरी परतला. आणि त्याला स्वतःच्या घरातच ते अमोल रत्न सापडले. आम्ही असे मूर्ख आहोत की, ज्या परमानंदाच्या प्राप्तीसाठी आम्ही सारी दुनिया पालथी घालतो, तो आपल्या स्वतःच्या हृदयातच असतो, इकडे आमचे मुळीच लक्ष जात नाही. पण स्वतःच्या विविध व्यापारातून मन जेव्हा पूण मुक्त होते, त्याच वेळी ते रत्न हृदयात गवसते. आपले सांगणे हे संपूर्ण सत्य आहे. जीवनाला मी जेथून प्रारंभ केला, तेथूनच आज मला पुन्हा प्रारंभ केला पाहिजे. मी वस्तुतः कसां आहे हे समजून घेण्यापासूनच मला आरंभ केला पाहिजे."

आघाताभिमुखता म्हणजेच जीवन, परावृत्तता म्हणजेच मरण

सभोवतालची संपूर्ण पीके वादळाने नष्ट करून टाकली होती, समुद्राचे खारे पाणी जमिनीवर सगळीकडे पसरले होते. आमची आगगाडी अतिशय मंद गतीने पुढेपुढे सरकत होती. दोन्ही बाजूंची झाडे उन्मळून पडली होती. घरांची छपरे उडून गेलेली होती आणि शेते पूर्ण उजाड होऊन गेली होती. वादळाने अनेक मैलांचा प्रदेश उध्वस्त करून टाकला होता, सारी जीवसृष्टी नष्ट करून टाकली होती. उजाड, उध्वस्त भूमी उदासपणे आकाशाकडे पाहत होती.

आपण पूर्ण एकाकी असे कधीच नसतो. एकतर माणसांनी वेढलेले असतो किंवा स्वतःच्याच विचारांनी. आणि माणसे आपणापासून बरीच दूर असली तरी आपल्या विचारांच्या पडद्यातूनच आपण सर्व गोष्टींकडे पाहत असतो. मनात कसलाही विचार नाही, असा एखादाही क्षण आपल्या जीवनात असत नाही. किंवा असा क्षण क्वचितच येत असतो. पूर्ण एकाकी असणे म्हणजे काय हे आपल्याला मुळीही कळत नसते. सर्व तऱ्हेच्या स्मृतिसंपर्कापासून व सातत्यापासून तसेच सर्व प्रकारच्या शब्दांपासून व प्रतिमांपासून पूर्ण विमुक्त असणे म्हणजे काय, हे आपणांस कधीच आकळत नसते. आपण कधी कधी एकटे असतो खरे, पण एकाकी असणे म्हणजे काय हे आपल्याला मुळीच आकळत नसते. एकटेपणाची व्यथा आपले हृदय व्यापून टाकीत असते. आणि मग आपले मन या व्यथित हृदयाला भीतीच्या पांघरुणाखाली झाकून टाकीत असते. या एकटेपणाची, स्वतःच्या या परिवेष्टित, संकुचित अवस्थेची काळी काळी छाया आपल्या जीवनावर सदैव पडलेली असते; या एकटेपणापासून दूर पळण्यासाठी आपण शक्य ती सारी धडपड करीत असतो. यासाठी वाटेल त्या पळवाटेच्या खोल खोल गर्तेत खुशाल उडी घेत असतो. पण हा एकटेपणा काही केल्या आपली पाठ सोडीत नाही, आपण त्याच्यापासून कधीच मुक्त होत नाही. परिवेष्टितता व संकुचितता हीच आपली जीवनरीत बनून गेलेली असते. आपले दुसऱ्या कुणाशी तादात्म्य असे क्वचितच घडून येते. कारण आपण स्वतःच दुभंगलेले असतो; छिन्नभिन्न, भग्न बनून गेलो असतो. आपण स्वतःच पूर्ण व एकात्म असे कधीच नसतो. आणि इतरांशी हृदयाची जुळणी होण्यासाठी तर प्रथम स्वतः आपणच एकात्म असलो पाहिजे. पण आपल्याला तर एकांततेचे सदैव भय वाटत असते. कारण एकांतामध्ये आपल्याला आपल्या अपूर्णतेचे आपल्या जीवन-दारिद्र्याचे दर्शन होऊ लागते. वस्तुतः एकांतामध्येच आपल्या दुभंगलेल्या जीवनाच्या

खोल खोल जखमा भरून येत असतात. आपल्या विचारांनी वद्ध न होता आणि आपल्या विविध अभिलाषांच्या शृंखलांमध्ये आपले पाऊल अडकू न देता, आपण जर एकाकीपणाने चालत राहिलो, तरच मनोमर्यादांच्या पार पलीकडे आपण जाऊ शकू. कारण आपले मन हेच आपल्याला विभक्त करून टाकीत असते, परिवेष्ठित, संकुचित वनवीत राहते; इतरांशी जुळू शकणारा सुसंवादाचा धागा तोडून टाकीत असते. पण मनाला प्रयत्नाने एकात्म वनविणे हे मात्र केव्हाही शक्य नसते. मन स्वतःला कधीही पूर्ण किंवा एकात्म बनवू शकणार नाही. कारण एकात्मतेसाठी केले जाणारे प्रयत्न हीच तर स्वतःला परिवेष्टित करून घेण्याची प्रक्रिया असते. असा प्रयत्न हा एकटेपणाचाच प्रकार असतो. हा एकटेपणा कशानेही झाकता येणे शक्य नसते. आ ले मन हे एकाकी नसून अनेक घटकांचा तो एक समुच्चय असतो. पण अशा प्रकारे जे घडविले गेले असते, ते कधीही एकाकी व एकात्म असू शकत नाही. कारण एकाकिता हा विचारांचा परिणाम कधीच नसतो. विचार हा जेव्हा पूर्ण स्तब्ध होऊन जातो तेव्हाच एकाकितेचे एकाकितेकडे होणारे उड्डाण संभवते.

तो बंगला रस्त्यापासून वराच दूर होता, वागेत सारीकडे फुले फुलली होती. सकाळ सौम्यशीतल, आकाश सुंदर निळेभोर आणि वालरवीचे ऊन प्रसन्न, कोमल होते. वागेतील वृक्षांच्या सावलीत वसले असताना, रस्त्यावरच्या वर्दळीचा कोलाहल, फेरीवाल्यांचे आवाज, रस्त्यावर धावणाऱ्या घोड्यांच्या टापांचा आवाज, हे सर्व दुरून दुरून येत असल्यासारखे वाटत होते. वागेत शिरणाऱ्या एका शेळीने आपली आखूड शेपटी हालवीत हालवीत फुले कुरतडण्यास सुरुवात केली होती. इतक्यात बागवान तेथे आला व त्याने शेळीला पिटाळून लावले.

भेटीस आलेली स्त्री सांगत होती की, आपल्या मनात अतिशय अस्वस्थता माजली आहे. आणि आपल्याला तर अस्वस्थता होणे मुळीच नको आहे. आपल्या मनाची ही दुःख अनिश्चित अवस्था तिला दूर सारून टाकावयाला हवी होती. अस्वस्थ अवस्थेत राहण्याचे एवढे भय आपणांस का वाटत आहे, असा तिनेच शेवटी प्रश्न केला.

'आपण अस्वस्थ वनतो,' या शब्दांनी तुम्हाला काय ध्वनित करावयाचे आहे ? आणि अस्वस्थतेचे एवढे विलक्षण भय तुम्हाला का वरे वाटत आहे ?

" मला नेहमीच अगदी शांत व स्वस्थचित्त असावेसे वाटते. लोकांनी मला एकटेच राहू द्यावे असेही मला फार वाटते; आज आपल्यापाशी येण्यामुळे माझे मन अस्वस्थ वनून गेले आहे. तसे मी आपल्याला केवळ दोन-तीनदाच काय ते पाहिले आहे. तरीही आपल्यामुळे माझे मन अतिशय अस्वस्थ, अतिशय वेचैन होऊन जाईल की काय अशी भीती मला वाटू लागली आहे. अशा प्रकारची

आंतरिक असुरक्षिततेची, अनिश्चिततेची अशी भीती मला का वाटत राहते, हे मला शोधून काढावयाचे आहे. आपण सदैव शांत व स्वस्थचित्त असावे असे मला फार फार वाटत असते. पण कसल्या ना कसल्या कारणामुळे माझी ही अस्वस्थता भंग पावत राहते. आपले मन शांत, स्वस्थ ठेवण्यात आजपावेतो मी वरीच यशस्वी झाले होते. इतक्यात एका मित्राने मला आपली प्रवचने ऐकण्यास नेले आणि तेव्हापासून माझ्या अस्वस्थतेने एक चमत्कारिक रूप धारण केले आहे. आंतरिक शांतीकडे सदैव ओढ घेणाऱ्या माझ्या मनाला आपण अधिक वळ मिळवून द्याल, असे मला वाटत होते. पण उलट आपण ती शांती जवळजवळ पूर्णपणे छिन्नभिन्न करून टाकली आहे. आताही आपल्याकडे मुळीच येऊ नये असेच मला वाटत होते. कारण येथे येण्याने आपण आपले हसेच करून घेऊ या गोष्टीची मला जाणीव होती. तरीही मी इथे आले आहे खरी. "

आपले मन शांत, स्वस्थ असलेच पाहिजे, या गोष्टीबद्दल तुमचा एवढा आग्रह का वरे आहे ? या गोष्टीची तुम्ही एक समस्या का वरे वनवून टाकली आहे ? आपण स्वस्थचित असलेच पाहिजे अशी मागणी करीत राहणे, म्हणजेच आपल्या मनात अतिशय संघर्ष माजला आहे हे स्पष्ट करणेच नव्हे का ? तुम्हाला नेमके काय हवे आहे हे सांगाल का ? तुम्हाला जर स्वस्थचित्त असावेसे वाटत असेल, आपल्यास कुणी दखल देऊ नये असे जर वाटत असेल, तर आपल्या या स्वस्थतेचा भंग तुम्ही का वरे होऊ देता ? आपल्या जीवनाच्या सर्व खिडक्या व दरवाजे लावून टाकणे, स्वतःला लोकांपासून तोडून टाकून संकुचित व परिवेष्टित होऊन बसणे, ही गोष्ट अगदी शक्य कोटीतील अशीच आहे. बहुतेक लोकांना नेमके हेच हवे असते. काहीजण अशी जीवन-विन्मुखता जाणूनबुजून जोपाशीत असतात. आणि इतर काही लोक आपल्या विविध उघड व गुप्त अभिलाषांच्या व कार्यांच्या द्वारा अशीच जीवनविन्मुखता घडवून आणीत असतात. ज्या लोकांमध्ये कळकळ असते, ते लोक आपली ध्येये व आपले सद्गुण यांच्या साह्याने आपल्या निर्दोष न्यायपरतेचा अभिनिवेश वाळगीत राहतात. पण या सर्व लोकांच्या या सर्व गोष्टी म्हणजे जीवनाच्या आघातांपासून स्वतःला सुरक्षित ठेवण्याची केवळ साधनेच होऊन वसतात.

जे लोक अविचारी असतात ते आर्थिक दडपणामुळे व सामाजिक वर्चस्वामुळे दडपले जातजात अखेर जीवनविन्मुख वनून जातात. जीवनाच्या सर्व आघातांपासून आपण सुरक्षित राहावे, स्वतःला अभेद्य बनवून टाकावे यासाठीच बहुतेक लोक स्वतःभोवती अशा विविध स्वरूपाच्या उंच उंच भिती उभारीत राहतात. पण दुर्दैव असे की या भितीमध्ये कुठेतरी एखादी चीर राहूनच जाते. आणि तिच्यातून जीवन हळूच आत प्रवेश करते.

"जीवनाची स्वस्थता भंग करणाऱ्या साऱ्या गोष्टी दूर ठेवण्यात आजवर मी बरीचशी यशस्वी झाले होते. पण गेल्या एकदोन आठवड्यात मात्र आपल्यामुळे आजवर कधी झाले नव्हते, एवढी विलक्षण अस्वस्थ का झाले आहे हे कृपा करून मला सांगाल का? माझ्या या अस्वस्थतेचे काय बरे कारण असावे?"

पण आपल्या अस्वस्थतेचे कारण तुम्हाला कशासाठी समजावयाला हवे आहे? कारण समजल्याने कार्य नाहीसे होऊन जाईल, अशी तुमची अपेक्षा आहे, हे उघड आहे. पण तुम्हाला आपल्या अस्वस्थतेचे कारण खरोखर मुळीच कळून घ्यावयाला नको आहे. तुम्हाला फक्त आपली अस्वस्थता टाळावयाची आहे, दूरदूर ठेवावयाची आहे.

"हे पाहा, माझ्या स्वस्थतेचा कधीही भंग होऊ नये, मी सदैव शांत असावे, इतरांनी मला एकटेच राहू द्यावे, एवढेच काय ते मला हवे आहे. असे असतानाही माझी स्वस्थता वारंवार का भंग होत राहते हे काही मला कळत नाही."

हे पाहा, आयुष्यभर आत्मसंरक्षणापलिकडे तुम्ही काहीही केले नाही; हीच वस्तुस्थिती नाही का? आपल्या जीवनाची सारी दारे बंद कशी करून टाकता येतील, हे शोधून काढण्याचीच काय ती तुम्हाला इच्छा आहे. भीतीशिवाय किंवा परावलंबनाशिवाय आपल्याला कसे राहता येईल, हे शोधून काढण्याची काही तुमची इच्छा नाही. आतापर्यंत तुम्ही जे काही सांगितले आहे व जे सांगण्याचे राहून गेले आहे, त्याच्यावरून हे उघड दिसून येते की, कुठलीही आंतरिक अस्वस्थता उत्पन्न होऊ नये या दृष्टीने आपले जीवन पक्के सुरक्षित बनवून टाकण्याचा तुम्ही सतत प्रयत्न करीत आला आहात. ज्या नात्यांपासून दुःख होण्याचा संभव आहे, त्या नात्यांपासूनही तुम्ही स्वतःला मुद्दाम दूर ठेवीत आला आहात. सर्व प्रकारच्या आघातांपासून व धक्क्यापासून स्वतःला सुरक्षित राखण्यात, तसेच सर्व दारेखिडक्या बंद करून जीवन जगण्यात तुम्ही आजवर बऱ्याच यशस्वी झाला आहात खऱ्या. काही माणसे या प्रकारचे जीवन जगण्यात यशस्वी होताना दिसतात. आणि असे जीवन शेवटच्या टोकापर्यंत ताणले गेले की, त्याचा शेवट अखेर वेडाच्या इस्पितळात होत असतो. पण इतर काही माणसे असे जीवन जगण्यात जेव्हा अयशस्वी होतात, तेव्हा त्यांची वृत्ती कटू व अश्रद्धावादी बनते. इतर काहीजण नाना प्रकारच्या ज्ञानसंपादनाने किंवा विविध वस्तूंच्या संपादनाने स्वतःला समृद्ध बनवीत असतात. हेच त्यांचे आत्मरक्षणाचे साधन बनत असते. बहुतेक माणसांना – तथाकथित धार्मिक वृत्तीच्या माणसांनाही – शाश्वत शांतीची अभिलाषा असते. सर्व संघर्षांचा जेथे अंत घडून येतो, त्या प्रकारची ही अभिलाषित शांती असते. इतर काही अशीही माणसे असतात की, संघर्ष हाच त्यांना जीवनाचा खराखुरा असा एकमात्र आविष्कार

आहेसे वाटते. अशा माणसांची, जीवनाच्या आघातांपासून स्वतःला वचाविण्याची संघर्ष हीच ढाल वनत असते.

पण अशा रीतीने आपल्या आशांच्या व भीतीच्या तटबंदीमागे दडून राहाण्याने शांती कधीतरी प्राप्त करून घेता येईल का ? तुम्ही जन्मभर स्वतःला जीवनविन्मुख वनवून टाकले आहे. ज्यांच्यावर आपले प्रभुत्व कायम राहील, अशा मर्यादित नात्यांच्या भितीआड राहून तुम्हाला आपली स्वस्थता व सुरक्षितता पक्की करावीशी वाटत आहे. हीच तुमच्यापुढील समस्या नाही का ? तुम्ही स्वतः परावलंबी आहात. म्हणून ज्याच्यावर तुम्ही अवलंबून आहात त्याच्यावर तुम्हाला वर्चस्व प्रस्थापित करावयाला हवे असते. ज्या नात्यावर तुम्हाला प्रभुत्व प्रस्थापित करता येत नाही, त्याची तुम्हाला भिती वाटत राहते. म्हणून असा नातेसंवंध तुम्ही सतत टाळीत राहता. अशीच वस्तूस्थिती नाही का ?

" माझ्या मनोवस्थेचे वर्णन आपण काहीशा निष्ठुरपणाने केले आहे. पण माझी अवस्था वहुतेक अशीच आहेसे वाटते. "

तुमच्या अवस्थतेचे जे कारण आहे त्याच्यावर तुम्हाला पूर्ण हुकमत गाजविता आली असती, तर तुम्ही स्वस्थचित्त होऊन गेला असता. पण तुम्हाला हुकमत गाजविता येणे शक्य नाही. म्हणूनच तुम्हाला आपल्या अस्वस्थतेवद्दल विशेष चिंता वाटू लागली आहे. एखाद्या गोष्टीचे माणसाला आकलन होत नसले, की तिच्यावर हुकमत गाजवून ती आपल्या ताव्यात ठेवावीशी वाटत असते. आपल्या स्वतःची जेव्हा आपल्याला भिती वाटते, तेव्हा एकतर दुसऱ्यावर आपल्याला मालकी गाजवावीशी वाटते किंवा दुसऱ्याने तरी स्वतःवर मालकी गाजवावी असे वाटते. आपल्याला स्वतःवद्दल जी अनिश्चितता वाटत राहते, तीच आपल्या या श्रेष्ठत्वाच्या व पृथकत्वाच्या भावनेला कारणीभूत होत असते. तुमची हरकत नसल्यास तुम्हाला भिती तरी कशाची वाटत आहे हे विचारावेसे वाटते. तुम्हाला एकटेपणाची का भीती वाटते ? की आपल्याला सर्व टाकून देतील ही भीती वाटते ? की आपण सदैव अनिश्चिततेतच घुटमळत राहू अशी भीती वाटते ?

" आयुष्यभर मी दुसऱ्यांसाठीच जगत आले आहे. निदान माझी समजूत तरी तशी आहे. एका विशिष्ट आदर्शानुसार जीवन जगण्याचा मी आजवर प्रयत्न केला आहे. कल्याणकारी समजले जाणारे कार्य मी अतिशय कार्यक्षमतेने करीत होते. यावद्दल माझी वारंवार प्रशंसा होत आली आहे. आजवरचे जीवन मी स्वार्थत्यागी वृत्तीनेच जगत आले आहे. या जीवनात सुरक्षितता नव्हती, मुलावाळांचा किंवा स्वतःच्या वराचा आसराही नव्हता. माझ्या सर्व वहिणी सुस्थळी पडल्या आहेत व सामाजिक प्रतिष्ठेचे जीवन उपभोगीत आहेत. माझे वडील वंधूही उच्चपदस्थ सरकारी अधिकारी आहेत. मी जेव्हा जेव्हा त्यांच्या भेटीला जाते, तेव्हा तेव्हा आपण आपले

जीवन व्यर्थ घालवले असे मला वाटू लागते. माझी वृत्ती आता कटू बनली आहे. ज्या ज्या गोष्टी मला कधी उपभोगावयाला मिळाल्या नाहीत, त्यांच्याबद्दल मला अतिशय खंत वाटू लागली आहे. आजवर मी जे कार्य करीत होते, त्याचा मला आता तिटकारा वाटू लागला आहे. आता त्या कार्यापासून मला मुळीच समाधान मिळनासे झाले आहे. म्हणून मी ते आता दुसऱ्यांवर सोपवून टाकले आहे. या सगळ्या गोष्टीकडे मी आता पाठ फिरवली आहे. आपण आताच दाखवून दिल्याप्रमाणे स्वरक्षण करण्यासाठी मी आता आपले मन कठीण व निष्ठूर बनवून टाकले आहे.

" आता मी केवळ आपल्या धाकट्याभावामध्येच स्वतःला गुंतवून घेतले आहे. या भावाची परिस्थिती फारशी बरी नाही. आपण ईश्वरशोधाच्या मार्गावर चालत आहोत अशी त्याची समजूत आहे. आजवर मी आंतरिक सुरक्षितता प्राप्त करून घेण्याची धडपड करीत आले आहे खरी. पण माझी ही धडपड फार फार दिवस चाललेली आहे आणि ती अतिशय दुःखदायी ठरली आहे.

" माझ्या या धाकट्या भावानेच मला आपले प्रवचन ऐकण्यास आणले. आणि आजवर जी इमारत मी मोठ्या काळजीने रचीत आले होते ती ढासळू लागली. आपले प्रवचन ऐकण्यास मी आलेच नसते, तर किती बरे वरे झाले असते ! पण आता मात्र माझी ही ढासळलेली इमारत मी पुन्हा खडी करू शकणार नाही हे निश्चित. पुन्हा त्या सगळ्या यातनातून व चिंताकाळज्यातून जाणे मला अशक्य आहे. माझ्या सगळ्या भावावहिणींना उच्चपद, प्रतिष्ठा व संपत्ती प्राप्त झालेली पाहून मला काय वाटत असेल, याची आपल्याला कल्पनाही येणार नाही. पण आता त्याबद्दल काहीही बोलण्यात काय अर्थ उरला आहे ? कारण मी त्या सर्वांपासून स्वतःला तोडून टाकले आहे. मी त्यांना क्वचितच भेटावयाला जाते. आपण आताच दाखवून दिल्याप्रमाणे मी माझ्या सगळ्या नातेसंबधांची दारे हळूहळू बंद करून टाकली आहेत. एकदोनच काय ती आता उरली आहेत पण माझ्या दुर्दैवाने आपण शहरात आलात आणि आता माझ्या जीवनातील सगळे काही उघडेउघडे उजाड होउन पडले आहे. माझ्या सर्व जुन्या जखमा पुन्हा नव्याने वाहू लागल्या आहेत. मी अतिशय दुःखीकष्टी बनून गेले आहे. आता मी करू तरी काय ?"

प्रथम हे लक्षात घ्या की, स्वरक्षण करण्याचा आपण जितका जितका प्रयत्न करू तितके तितके आपल्यावर होणारे आघात वाढतच राहतील. स्वरक्षणाच्या मागे आपण जितके धावत सुटू, तितके ते कमी होत जाईल. शांती मिळविण्याचा आपण जितका अधिक प्रयत्न करू, तितका आपला संघर्ष वाढतच जाईल. आणि आपण जितके अधिक मागत राहू, तितके आपल्या जवळ असलेलेही कमीकमी होत जाईल. आजवर तुम्ही स्वतःला दुर्भेद्य बनवून टाकण्याचा, आघातांचा परिणाम मुळीच न

होऊ देण्याचा प्रयत्न करीत आला आहात. आंतरिक दृष्ट्या तुम्ही स्वतःला दुष्प्रवेश्य बनवून टाकले आहे; फक्त एकदोन अपवादच काय ते राहू दिले आहेत. जिवनाची सर्व दारे तुम्ही बंद करून टाकली आहेत. वस्तुतः ही हळूहळू केली जाणारी आत्महत्याच आहे. असे तुम्ही का करून टाकले आहे, सांगा बरे ? हा प्रश्न तुम्ही स्वतःला कधीतरी विचारला होता का ? तुम्हाला हे कळून घ्यावयाला नको आहे का ? तुम्ही इथे ज्या आला आहात, त्या एकतर जीवनाची सर्वच दारे बंद करून टाकण्याचा उपाय जाणून घ्यावयाला आला असाल; किंवा विमुक्त कसे व्हावयाचे, याचा शोध घ्यावयाला तरी आला असाल. तुम्हाला या दोन पर्यायांपैकी नेमका कोणता पर्याय हवा आहे सांगा बरे ? कुठलीतरी एक निवड करण्याच्या दृष्टीने नव्हे तर अंतःस्फूर्तीने, सहजतेने तुम्हाला दोहोपैकी कोणते एक हवेसे वाटते ?

" जीवनाची सारी दारे बंद करून टाकणे हे आता अशक्य आहे, हे माझ्या ध्यानात येऊन चुकले आहे. कारण आपल्या तटबंदीत कुठे ना कुठे फट ही राहणारच. आजवर मी काय करीत आले आहे, याची मला आता जाणीव होऊ लागली आहे. मला जी अनिश्चिततेची भीती वाटत होती, तिच्यामुळेच माझे हे परावलंबन, ही दुसऱ्यावर प्रभुत्व गाजविण्याची वृत्ती उत्पन्न झाली आहे, हे आता मला कळून चुकले आहे. माझी कितीही इच्छा असली, तरी प्रत्येक प्रसंगावर किंवा घटनेवर हुकमत चालवणे मला शक्यच नव्हते. म्हणूनच ज्या एकदोन नातेसंबंधावर मी हुकमत चालवू शकते, त्यांच्यापुरतेच मी आपले संबंध सीमित करून टाकले, ही गोष्ट उघड आहे. हे सारे काही आता मला स्पष्ट दिसत आहे. पण आता मला या आंतरिक अनिश्चिततेच्या भीतीपासून सर्वस्वी विमुक्त होऊन पुन्हा नव्याने जीवनाभिमुख कसे बरे होता येईल ?"

पण विमुक्त होण्याची, जीवनाभिमुख होण्याची गरज तुम्हाला खरोखरच जाणवत आहे का ? जीवनाभिमुखतेमागील जे सत्यदर्शन आहे, त्याचे महत्त्व जर तुम्हांला पूर्णपणे जाणवले नाही, तर तुम्ही पुन्हा आपल्याभोवती हळूहळू गुप्तपणे भिंती उभारणे सुरू कराल. — असत्यात वसणाऱ्या सत्यांशाचे दर्शन होणे, हाच तर खरोखर प्रज्ञेचा आरंभ असतो. असत्यातील असत्यत्वाचे दर्शन होणे हे सर्वोच्च प्रकारचे सत्यदर्शन आहे. आज इतकी वर्षे तुम्ही जे करीत आला आहात, त्यातून अधिकाधिक संघर्ष व दुःख हेच उत्पन्न होत राहणार, या सत्याचे जर तुम्हाला दर्शन झाले, — या सत्याचा नुसता शाब्दिक स्वीकार न करता, ते सत्य जर तुम्ही साक्षात अनुभवले — तर तुमच्या गतायुष्यातील सर्व व्यापारांचा त्यामुळे सहज अंत घडून येईल. इच्छाशक्तीच्या साह्याने काही तुम्हाला विमुक्त होता येणार नाही किंवा स्वतःला जीवनाभिमुखही बनविता येणार नाही. जीवनाभिमुख बनण्याची अभिलाषा हीच तर जीवनाभिमुखतेच्या विरुद्ध प्रतिकार खडा करीत असते.

असत्यापासून मुक्तता ही, असत्याच्या असत्यत्वाचे यथार्थ आकलन होण्यानेच घडून येत असते. जीवनाच्या आव्हानांना आपल्याकडून सवयीमुळे जी ठराविक ठशाची उत्तरे दिली जात असतात, त्यांचे तुम्ही आता अक्रिय सावधानतेने नुसते निरीक्षण करीत रहा. कसलाही प्रतिकार न करता निखळ निरीक्षण करीत चला. एखाद्या बालकाचे जसे आपण अवलोकन करतो, तसे अक्रियपणे नुसते अवलोकन करीत रहा. त्याच्याशी सारुप्य पावण्याने जो संतोष उत्पन्न होत राहील त्याच्यापासून तसेच त्याच्या नावडीपासूनही दूर अलिप्त रहा. असे अक्रिय निरीक्षण करीत राहणे म्हणजेच स्वरक्षणाच्या धडपडीपासून विमुक्त होणे होय; जीवनाची सारी दारे बंद करून टाकणाऱ्या वृत्तीपासून विमुक्त होणे होय. जीवनाभिमुख होणे, आघाताभिमुख होणे म्हणजेच जीवन. जीवनापासून परावृत्त होणे, पराङ्मुख होणे म्हणजेच मरण.

निराशा आणि आशा

एका लहानशा ढोलकाचा आवाज कानी पडत होता. त्याच्या लयबद्ध तालात आनंद भरून राहिला होता. थोड्याच वेळात त्याला बासरीची साथ मिळाली. आणि त्यांच्या संमीलित संगीताने वातावरण भरून गेले. ढोलकाचा आवाज अधिक उठून येत असला, तरी ढोलक बासरीची साथच करीत होता. बासरी मधूनमधून थांबे. पण ढोलकाचे स्पष्ट व तीक्ष्ण बोल चालूच राहत आणि पुन्हा बासरीचे सूर त्यात मिसळून जात. – उजाडण्याला अजून बराच अवकाश होता. पक्षी आपापल्या ठायी शांत निःस्तब्ध होते. पण ही नीरवता त्या संगीताने भरून टाकली होती. – या लहानशा खेड्यात एक लग्न-समारंभ चालू होता. आधल्या संध्याकाळी समारंभाची वरीच गडबड सुरू होती. पुष्कळ रात्र होईपर्यंत गाणे-वजावणे व हास्य-विनोद चालू होता. आणि आता त्या उशिरा झोपलेल्या मंडळींना बासरी-ढोलकाच्या संगीताने जागे केले जात होते. हळूहळू उजळणाऱ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर वृक्षांच्या पर्णहीन शाखांचे आकार रेखीवपणे उठून दिसू लागले. चांदण्या एकीमागून एक लोप पावू लागल्या. आता संगीत स्तब्ध झाले होते. मुलांना हाका मारण्याचे आवाज कानी पडू लागले होते. आणि खेड्यातील एकुलत्या एक नळापाशी होत राहणाऱ्या भांडणांचाही आवाज ऐकू येत होता. सूर्य अजून क्षितिजाखालीच होता. पण दिवस मात्र सुरू झाला होता.

प्रीती करणे म्हणजे सर्व काही अनुभविणे. पण प्रीतीवाचून काहीही अनुभविणे म्हणजे मात्र जीवन व्यर्थ घालविणे होय. प्रीती ही नेहमी आघाताभिमुख, जीवनाभिमुख असते. अशा जीवनाभिमुखतेवाचून काहीही अनुभविणे म्हणजे आपल्या केवळ व्यक्तिगत अभिलाषेला बळ मिळवून देणे होय. अभिलाषा म्हणजे प्रीती मुळीच नव्हे. ती प्रीतीला कधीही धरून ठेवू शकत नाही. कारण अभिलाषा लवकरच रिती होऊन जाते. तिचे हे रिते होत जाणे म्हणजेच दुःख. पण अभिलाषेला आवर घालणेही शक्य नसते. इच्छाशक्तीच्या साह्याने किंवा मनःकल्पित अशा कोणत्याही साधनांच्या साह्याने अभिलाषेचा अंत घडवून आणण्याचा प्रयत्न केल्यास ऱ्हास व दुःख हीच उत्पन्न होत राहतात. अभिलाषेला मर्यादेत ठेवणे हे केवळ प्रीतीलाच शक्य असते. पण प्रीती ही केव्हाही मनाच्या कक्षेत येणारी नसते. ती मनाच्या पारची असते. प्रीतीचा उदय होण्यासाठी, निरीक्षक या स्वरूपात होणारे मनाचे कार्य पूर्णपणे संपुष्टात आले पाहिजे. प्रीती ही योजना करून घडविता येण्यासारखी किंवा संवर्धन करता येण्यासारखी वस्तू मुळीच नव्हे. त्याचप्रमाणे स्वार्थत्यागाचे वा पूजाप्रार्थनेचे मोल देऊन विकत घेता येण्यासारखीही ती वस्तू

नव्हे. प्रीती ही साध्य करून घेता येण्याजोगी वस्तू नसल्यामुळे, ती कोणत्याही साधनाने प्राप्त केली जाऊ शकत नाही. प्रीती अस्तित्वात येण्यासाठी साधनांचा शोध संपुष्टात आला पाहिजे. सहजस्फूर्ततेलाच प्रीतीचे सौंदर्य आकळू शकते. प्रीतीचा कुणी मुद्दाम पाठलाग करू लागले की, स्वतंत्रता वा विमुक्तता नष्ट होऊन जाते. जो विमुक्त असेल त्यालाच प्रीतीचे दर्शन होऊ शकते. विमुक्तता ही प्रीतीला कधीच बरून ठेवीत नसते कुठल्याही दिशेकडे तिला वळवीत नसते. प्रीती हेच प्रीतीचे अनंतत्व.

भेटीस आलेली स्त्री सहजपणे बोलत होती. शब्द तिला सुलभपणे स्फुरत होते. ती वयाने तरुण असली, तरी तिच्यावर दुःखाची काळी छाया पडलेली दिसत होती. भेटताच तिने स्मित केले खरे. पण तिच्या स्मितात कसली तरी दूरदूरची स्मृती रेंगाळत आहेसे वाटले. म्हणूनच तिचे स्मित वळेच ओढून आणल्यासारखे वाटत होते. तिचा विवाह झालेला असला तरी तिला मूलबाळ नव्हते. तिचा पती नुकताच मरण पावला होता. त्यांचा विवाह हा ठरवून झालेला विवाह नव्हता. तसेच तो परस्परांच्या अभिलाषेवरही आधारलेला नव्हता. आपल्या विवाहाविषयी सांगताना प्रीती हा शब्द तिला वापरावासा वाटत नव्हता. कारण ज्याच्या त्याच्या तोंडी व ज्या त्या पुस्तकात हा शब्द सवंगपणे वापरला जात असतो. त्या पति-पत्नींचा संबंध मात्र विलक्षण कोटीतील होता. विवाहाच्या दिवसापासून तो त्याच्या मृत्यूक्षणापर्यंत त्या उभयतांमध्ये कधी एकदाही रागाचा शब्द उच्चारला गेला नव्हता की उतावीळपणाचा कसला आविर्भावही व्यक्त झाला नव्हता. तसेच या संपूर्ण काळात ते एकमेकांपासून एक दिवसही कधी दूर राहिले नव्हते. त्या उभय-तांचे हृदयमिलन घडून आले होते. त्यामुळे मुलेबाळे, पैसाअडका, कार्य वा समाज या सर्व गोष्टी अगदी दुय्यम महत्त्वाच्या बनून गेल्या होत्या. त्यांचे हृदयमीलन ही स्वप्नरंजित अशी भावविवशता मुळीच नव्हती. किंवा पतीच्या मृत्यूनंतर तिने निर्माण केलेली ती कल्पित प्रतिमाही नव्हती. तर त्यांच्या जीवनात प्रारंभापासूनच अंतर्निहित असलेली अशी ती वास्तव स्थिती होती. त्यांचा आनंद अभिलाषेतून उत्पन्न झालेला नव्हता. तर शारीरिकाच्या पलीकडे असलेल्या अज्ञाताच्या कुशी-तून तो निर्माण झालेला होता. आणि मग दोन महिन्यांपूर्वी एक दिवस त्याला अपघाताने अचानक मृत्यू आला होता. वसने एक जोराचे वळण घेतले आणि सर्व काही एकाएकी संपून गेले.

ती स्त्री सांगू लागली, " आता मी पूर्ण हताश व निराशाग्रस्त बनून गेले आहे. आत्महत्या करून पाहण्याचाही प्रयत्न मी करून पाहिला. पण का कोण जाणे ते काही मला शक्य झाले नाही. सारे काही विसरण्यासाठी, स्वतःला पूर्ण बधिर करून टाक-ण्यासाठी नदीत उडी घेण्याशिवाय सारे काही मी करून पाहिले आहे. या दोन

महिन्यात एक रात्रदेखील मला स्वस्थ झोप आली नाही. मी आता घोर अंधकारात बुडून गेले आहे. हा आणीवाणीचा, निर्वाणीचा प्रसंग माझ्या कावूच्या पलीकडचा आहे, माझ्या आकलनाच्या पारचा आहे. मी आता केवळ घनघोर अंधारात चाचपडत आहे."

बोलता बोलता तिने आपला चेहरा दोन्ही हातांनी झाकून टाकला. थोड्या वेळाने ती पुन्हा बोलू लागली,

"माझ्या या घोर हताशतेवर कसलाही इलाज नाही. कशानेही ती नाहीशी होण्यासारखी नाही. त्यांच्या मृत्यूबरोबर माझी सारी आशाच मरून गेली आहे. काही काळानंतर मी सारे विसरेन, पुन्हा विवाह करीन किंवा दुसरे काही करीन असे लोकांनी म्हणून टाकले आहे. पण मी जरी विसरू शकले तरी आता माझ्यातील ज्योत पार विझून गेली आहे. तिच्या जागी आता दुसऱ्या ज्योतीची प्रतिष्ठापना करणे हे अशक्य आहे. असे काही करण्याची माझी इच्छाही नाही. माणूस आशेवरच जगत असतो व आशेसहच मरत असतो. पण मला आता कसलीही आशा उरलेली नाही. माझी आशाच मुळात नष्ट झाल्यामुळे माझ्यात कटुताही उरली नाही. निराशेच्या दाट काळोखात मी पार बुडून गेले आहे. मला प्रकाश नकोसा झाला आहे. माझे जीवन आता जीवन्मृताचे जीवन बनून गेले आहे. आणि मला कुणाचीही सहानुभूती, प्रेम किंवा दया मुळीच नको आहे. कुठल्याही भावनेला थारा न देता, कुठल्याही आठवणीला वाव न देता या घोर अंधारातच मला राहावयाचे आहे."

याच्यासाठीच का तुम्ही इथे आला आहात? स्वतःस अधिक बधिर बनवून टाकण्यासाठी, स्वतःची हताशता वज्रलेप करून टाकण्यासाठी का आला आहात? हेच का तुम्हाला हवे आहे? असेच असेल, तर तुम्हाला जे हवे आहे, ज्याची तुम्हाला अभिलाषा आहे, तेच तुम्हाला नक्की मिळेल. अभिलाषा ही मनाइतकीच लवचिक सरल व वेगवान असते. ती कोणत्याही गोष्टीशी जुळवून घेत राहते; कोणत्याही परिस्थितीनुसार स्वतःला वळण देत असते. प्रकाशाचा किरणही आत शिरणार नाही अशी अभेद्य भिंत ती आपल्या भोवती बांधीत असते. आपल्या घोर हताशतेमध्येच तिला संतोष लाभत असतो. वस्तुतः स्वतः निर्माण केलेल्या प्रतिमेचीच अभिलाषा पूजा करीत असते, काळोखात राहण्याचीच जर तुमची अभिलाषा असेल, तर ती नक्की सफल होईल. पण तुम्ही ज्या इथे आला आहात त्या आपल्या या अभिलाषेला वळ मिळवून देण्यासाठी का आला आहात?

"त्याचे असे आहे की, एका मित्राने मला आपल्या विषयी सांगितले आणि मी चटकन निघाले. थोडा विचार करण्यास जर मी थांबले असते, तर बहुतेक आलेच नसते. सहजवृत्ती उसळली की चटकन तसे करून टाकावयाचे अशाच वृत्तीने मी

आजवर वागत आले आहे. आणि या माझ्या वृत्तीने आजवर कधीही मला संकटात लोटले नाही. मी इथे का आले असे जर आपण विचाराल तर, ' मला माहीत नाही ' एवढेच माझे उत्तर राहील. मला वाटते आपणा सर्वांनाच कसली तरी आशा नेहमी हवी असते. कायमचे काळोखात बुडून राहणे हे कोणालाही शक्य नसते. "

जे एकदा एकजीव होऊन गेले असते, ते कधीही दुभंगून टाकता येत नसते. जे एकात्म असते, त्याचा नाश कधीही होणे शक्य नसते; हा एकजीवपणा, ही एकात्मता जर घडून आलेली असेल, तर मृत्यूदेखील तिचा कधी भंग करू शकणार नाही. एकात्मता ही काही दुसऱ्याशी व्हावयाची नसते, तर ती स्वतःशीच व स्वतः मध्येच व्हावयाची असते. दोन वेगळ्या व्यक्तींची एकात्मता आपल्याच, स्वतःच्याच अंतर्यामात घडून येणे, म्हणजेच दुसऱ्या व्यक्तीशी पूर्ण एकजीव होणे होय. पण दुसऱ्याच्या अवलंबनाने स्वतःला पूर्णता येणे म्हणजेही स्वतः अपूर्णच राहणे होय. दुसऱ्याशी एकजीव होणे म्हणजेही स्वतः अपूर्णच राहणे होय. एकात्म असलेल्या व्यक्तीला दुसऱ्यामुळे पूर्णता प्राप्त होत नसते. तर ही व्यक्ती स्वतःच्या अंतर्यामातच एकात्म असते, म्हणून ती पूर्ण असते. म्हणूनच तिची इतरांशी असलेली सर्व प्रकारची नाती ही देखील पूर्णरूपच असतात. जे स्वतःमध्ये अपूर्ण असते, ते कुठल्याही नात्यामुळे पूर्णत्व पावू शकत नाही. आपण दुसऱ्यामुळे पूर्ण होत असतो, असे समजणे हा निव्वळ भ्रम आहे.

" पण मला तर त्यांच्यामुळेच पूर्णत्व प्राप्त झाले होते. या पूर्णतेचे सौंदर्य व तिचा आनंद मला पुरेपूर अवगत होता. "

पण त्याचा आता अंत घडून आला आहे. जे अपूर्ण असते त्याचाच नेहमी अंत घडून येत असतो. दुसऱ्याशी घडून आलेल्या एकात्मतेचा केव्हाही भंग होऊ शकतो. त्याचा तर क्षणाक्षणाला विलय घडून येत असतो. एकात्मतेचा आरंभ हा स्वतःच्याच अंतर्यामात घडून आला पाहिजे; असे झाले तरच दुसऱ्याशी घडून येणारी एकात्मता ही अविनाशी होत असते. अभावात्मक विचारप्रक्रिया हीच एकात्मतेची रीत आहे. ते प्रज्ञेचे सर्वोच्च स्वरूप आहे. तुम्ही एकात्मतेचा शोध करीत आहात का ?

" मला काय हवे आहे हे माझे मलाच कळत नाही. पण आशेचे स्वरूप समजून घेण्याची मात्र माझी इच्छा आहे. कारण मानवी जीवनात आशेला फार महत्त्वाचे स्थान आहे असे वाटते. ते जिवंत होते तोवर मी भविष्याचा कधीच विचार केला नाही. माझ्यापुरते म्हणावयाचे झाले, तर उद्याला किंवा भविष्याला त्या वेळी माझ्या दृष्टीने काहीही अर्थ नव्हता. मी जीवन निश्चिंतपणे जगत होते. मला कसलीही काळजी नव्हती. "

कारण तेव्हा तुम्ही सुखी होता. पण आता तुमचे दुःख, तुमचा असंतोष हाच भविष्याची व आशेची निर्मिती करीत आहे; आणि त्याच्या विरुद्धाची म्हणजे निरा-

शेची वा हताशतेचीही निर्मिती करीत आहे. हे सगळे जरासे चमत्कारिकच आहे, नाही का ? वस्तुस्थिती अशी आहे की आपण जेव्हा सुखी असतो तेव्हा काल-उद्या ही सगळी कालप्रक्रिया आपल्या दृष्टीने मुळी अस्तित्वातच नसते; गतकाल किंवा भविष्यकाल यांचा विचारदेखील त्या वेळी आपल्या मनात डोकावत नाही. पण दुःख आले की आशा-निराशा यांचे द्वंद्वही लागलीच सुरू होते.

" पण आपण आशेसहच जन्मतो व आशेबरोबरच मृत्युमुखी पडत असतो. "

होय, आपण असेच करीत असतो खरे किंवा असेही म्हणता येईल की, आपण दुःखकष्टात जन्म घेतो आणि आशेवर जगतजगत मृत्यूकडे जातो. पण आशेचा तुम्ही काय अर्थ करता, सांगा बरे ?

" आशा म्हणजे उद्या--भविष्यकाल; आशा म्हणजे सौख्याची आतुरता, प्रगतीची अपेक्षा, स्वतःच्या उन्नतीची उत्कंठा; आशा म्हणजे अधिक चांगले घर, अधिक चांगला पियानो व रेडिओ आपल्यापाशी असावा ही अभिलाषा; आशा म्हणजे समाजोन्नतीचे व सुखीजगताचे मधुर स्वप्न. "

पण आशा ही नेहमी भविष्यामध्येच वसत असते का ? गत-कालाचा आपल्या-वर जो प्रभाव असतो, त्याच्यामध्ये ही आशा वसत नसते का ? वस्तुतः पुढे पुढे झेप घेणाऱ्या व मागेमागे वळून पाहणाऱ्या, अशा दोन्ही प्रकारच्या विचार-व्यापा-रात आशा वसत असते. आशा ही काल प्रवाहात्मक प्रक्रिया असते, होय की नाही ? गतकालात जे सुखद भासत होते, त्याच्या सातत्याची अभिलाषा म्हणजे आशा. ज्याच्यात उन्नती व सुधारणा घडवून आणता येईल त्याच्या सातत्याची अभिलाषा म्हणजे आशा आणि या अभिलाषेच्या जे जे विरोधी ती ती निराशा, ती ती हता-शता. आशा व निराशा या दोन टोकामध्ये आपण नेहमी झोके घेत राहतो. आपली आशा कायम असते म्हणून आपण जगत असतो, असे आपण म्हणत असतो. पण कधी कधी आपली ही आशा गतकालात वसत असते आणि वर्त्याच वेळा ती भविष्यातही वसत असते. प्रत्येक राजकारणी नेत्याची, प्रत्येक सुधारकाची व क्रांति-कारकाची, प्रत्येक नीतिसंवर्धकाची आणि प्रत्येक ईश्वरदर्शनेच्छूची आशा भविष्या-तच वसत असते. आपण आशेवर जगत असतो, असे आपण म्हणत राहतो. पण हे खरे आहे का ? जे जीवन अतीताने किंवा अनागताने, भूताने वा भविष्याने भारावलेले असते, त्याला जीवन म्हणता तरी येईल का ? अतीताची अनागताकडे होत राहणारी वाटचाल म्हणजे का खरे जीवन असते ? ज्या वेळी तुमच्या मनात उद्याची चिंता वसत असते, त्या वेळी तुम्ही जीवन जगत आहात, असे म्हणता तरी येईल का ? वस्तुस्थिती अशी आहे की, उद्या वा भविष्य काल याच गोष्टीला मानवी जीवनात अपार महत्त्व प्राप्त झाले आहे; म्हणूनच निराशा वा हताशता हीही जन्मास आली आहे. तुमच्या दृष्टीने भविष्यकालालाच जर सर्वंकष महत्त्व प्राप्त

झाले आणि तुम्ही त्याच्यासाठीच व त्याच्या आधारावरच जर जगत राहिलात, तर तुमचा गतकाल हे निराशा उत्पन्न करण्याचे साधन होऊन बसेल. वस्तुतः उद्याच्या आशेसाठी तुम्ही आजचे बलिदान करीत आहात. पण सौख्य हे तर नेहमी आजमध्ये, वर्तमानामध्येच वसत असते. जी माणसे दुःखी असतात, तीच आपले जीवन उद्याच्या विचाराने भरून टाकीत असतात आणि यालाच ते आशा हे नाव देत असतात. पण वस्तुतः आशाविरहित जीवन म्हणजेच सुखी जीवन. आशेवर जगणारा मनुष्य हा सुखी मनुष्य नसतो, त्याने निराशा अनुभवलेली असते. वस्तुस्थिती अशी आहे की, मनुष्य निराशाग्रस्त झाला की, त्या अवस्थेमधूनच आशा किंवा संताप यांची विकल्पित निर्मिती केली जात असते. आणि निराशा व उज्ज्वल भविष्यकाल यांचेही स्वप्नरंजन केले जात असते.

" पण माणसाने आशेवाचूनच जगावे असे का आपले म्हणणे आहे ? "

जी आशामयता नव्हे व निराशामयताही नव्हे, अशी परमानंदमयतेची एक अवस्था असू शकत नाही का ? असे पाहा की, ज्या वेळी तुम्ही स्वतःला सुखी समजत होता, तेव्हा तुमच्यापुढे कसलीही आशा नव्हती. होती का कसली आशा ?

" आपण काय सांगता हे आता माझ्या ध्यानात येत आहे. त्या वेळी माझ्यासमोर आशा नव्हती, कारण ते माझ्याजवळ होते आणि जीवनातील प्रत्येक आला दिवस मला सुखमय वाटत होता. पण आज ते नाहीत आणि·····खरोखर आपण सुखी असलो, म्हणजेच आशामुक्त असतो. पण जेव्हा आपण दुःखी असतो, रोगग्रस्त असतो किंवा जुलमाखाली भरडले जात असतो, तेव्हाच उद्याला वा भविष्याला आपल्या दृष्टीने महत्त्व प्राप्त होत असते आणि आपली आशापूर्ती भविष्यकाळातही होणे अशक्यप्राय होऊन बसले की, आपण निराशेच्या घोर काळोखात बुडून जात असतो. पण माणसाने सुखमय अवस्थेत कायम कसे राहावयाचे ?"

आशा व निराशा यांच्या वास्तव स्वरूपाचे प्रथम नीट आकलन करून घ्या. असत्याने, फसव्या आशेने आणि नंतर निराशेने आपल्यावर कसकसा पगडा बसविला होता, याचे प्रथम दर्शन करून घ्या. या संपूर्ण प्रक्रियेचे—अक्रियतेचे निरीक्षण करीत राहा. अर्थात हे दिसते तेवढे सोपे खास नाही. तुम्ही विचारता की, सुखमय अवस्थेत नेहमी कसे राहावयाचे ? पण तुमचा हा प्रश्नही मुख्यतः आशेवरच आधारलेला नाही का ? जे आपण गमावून बसलो आहोत, ते परत मिळविण्याची तुमची इच्छा आहे. कशाच्या तरी साहाय्याने ते पुन्हा प्राप्त करून घ्यावेसे तुम्हांला वाटते. तेव्हा तुमच्या प्रश्नामागे काहीतरी मिळविण्याची, कुणीतरी विशेष होण्याची, कुठेतरी पोचण्याची तुमची अभिलाषा आहे, हे स्पष्ट दिसते. तुमच्यासमोर जेव्हा अशा प्रकारचा एखादा हेतू असतो, एखादे साध्य असते, तेव्हाच तेथे आशा वसत असते. पण असे होणे म्हणजे पुन्हा दुःखात अडकून पडणे होय. आशेचा मार्ग हा भविष्याचा

मार्ग असतो. पण सौख्य ही काही कालाच्या कक्षेत येणारी वस्तू नव्हे. तुम्ही जेव्हा सुखी होता, तेव्हा हे सौख्य कसे टिकवावे, असा प्रश्न तुम्ही स्वतःला कधी विचारला होता का ? असा प्रश्न तुम्ही विचारला असता तर त्याच क्षणी तुम्हांला दुःखाचा अनुभव आला असता.

" म्हणजे आपले एकूण म्हणणे असे दिसते की, मनुष्य संघर्षात वा दुःखात अडकला असला, म्हणजेच ही सारी समस्या उद्भवत असते. आणि मनुष्य जेव्हा असा दुःखी होतो, तेव्हा त्या अवस्थेतून त्याला साहजिकच बाहेर पडावेसे वाटत असते. "

प्राप्त परिस्थितीतून मार्ग काढण्याच्या अभिलाषेमधूनच नव्या समस्येचा उद्भव होत असतो. मूळ समस्येचे आकलन करून न घेतल्यामुळेच नवनव्या समस्या उत्पन्न होत राहतात. तुमची समस्या ही सौख्य नष्ट झाल्याची व दुःख उत्पन्न झाल्याची समस्या आहे. या समस्येचे आकलन करून घेण्यासाठी, इतर सगळ्या समस्यांतून विमुक्त झाले पाहिजे. सौख्यनाश व दुःखोद्भव ही एवढीच तुमची समस्या आहे. यातून बाहेर कसे पडावयाचे अशी दुसरी समस्या उभी करून तुम्ही स्वतःला गोंधळात लोटू नका. आपल्या समस्येचे उत्तर मिळावे, त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग सापडावा व आशा लाभावी यासाठी सध्या तुमच्या मनाची धडपड चालू आहे. पण अशा पळवाटेकडे मन झेपावू देणे म्हणजे असत्याकडेच मन झेपावू देणे होय, या सत्याचे प्रथम दर्शन करून घ्या. म्हणजे तुमची समस्या तुमच्यापुढे साक्षात उभी राहील. समस्येशी असा हा साक्षात संपर्क घडल्यानेच अटीतटीची, आणीबाणीची अवस्था उत्पन्न होत असते. आणि नेमकी हीच अवस्था टाळण्याचा आपण सदैव प्रयत्न करीत असतो. पण ही अटीतटीची अवस्था पराकोटीला पोचली, उत्कटतम झाली, म्हणजेच समस्येचा अंत घडून येत असतो.

" ह्यांच्या त्या भयंकर अपघाताच्या क्षणापासून, स्वतःला आपण घोर निराशेच्या काळोखात बुडवून टाकावे, स्वतःची ही हताशता जोपासीत रहावे असे मला सारखे वाटत आले आहे. पण का कोण जाणे, हे आता मला असह्य होऊन गेले आहे. आता मात्र मला हे स्पष्ट दिसू लागले आहे की, या वास्तव स्थितीशी मला साक्षात मुकाबला केलाच पाहिजे. सगळी भीती सोडून देऊन, त्यांच्याशी एकनिष्ठ नसण्याची भीती झुगारून देऊन मला हे केले पाहिजे. त्यांच्या मृत्यूनंतरही मी सुखी राहिले, तर त्यांच्याशी एकनिष्ठ राहिले असे होणार नाही, असे मला आत आत सारखे वाटत होते. पण आता माझ्या मनावरचे हे दडपण उतरू लागले आहे. आणि कालकक्षेत न सामावणाऱ्या सौख्याची चाहूल मला लागत आहे. "

चित्त आणि ज्ञान

खेड्यातील त्या एकुलत्या एक नळाभोवती दररोजच्याच घटनांची पुनरावृत्ती चालली होती. नळाची धार बारीक असल्यामुळे पाण्याला आलेल्या स्त्रिया आपली पाळी येण्याची वाट पाहत तिष्ठत उभ्या होत्या. त्यांच्यापैकी तिघीजणी एकमेकींशी भांडत अपशब्दांचे प्रहार करीत होत्या, त्यांच्या रागाचा पारा असा काही चढला होता की, दुसऱ्या कुणाकडे जरासेही लक्ष देण्यास त्यांना फुरसत नव्हती. आणि दुसरेही कुणी त्यांच्याकडे मुळीच लक्ष देत नव्हते. नळाभोवती घडणारा हा बहुधा दररोजचाच प्रकार असावा. कुठल्याही ठराविक विधिप्रकारात जी उत्तेजकता असते, ती याही विधीत भरपूर होती. आणि उत्तेजकतेचा हा आनंद त्या स्त्रिया मनमुराद लुटीत होत्या. इकडे हे भांडण चालू असता एका वृद्धेने एका तरुणीला आपली चकचकित घागर डोक्यावर ठेवण्यास मदत केली. घागरीचे ओझे पेलण्यासाठी तिने डोक्यावर चुंबळ ठेवली होती. आणि एकाच हाताच्या आधाराने ती भरलेली घागर ती लीलेने वाहून नेत होती. तिच्या पदविन्यासात अतिशय सौंदर्य व एक प्रकारचा गौरव आढळून येत होता. एका लहानशा मुलीने एवढ्यात आपली कळशी नळाखाली धरली व ती भरताच मुकाट्याने ती निघून गेली. इतर बायाही आपापल्या घागरी भरून घेऊन निघून जात होत्या. पण त्या तिघींचे भांडण मात्र कडाक्यात चालले होते. आणि ते केव्हाच संपणार नाही असे वाटू लागले होते. पण त्या तिघी एकाएकी थांबल्या. आपल्या घागरी त्यांनी भरून घेतल्या जणू काहीच घडले नाही, अशा आविर्भावात चालत्या झाल्या.

आता सूर्य बराच वर आला होता. झोपड्यांच्या गवती छपरांतून धूर बाहेर पडताना दिसू लागला होता. झोपडीझोपडीतून दिवसाचा पहिला स्वयंपाक सुरू झाला होता. एकाएकी त्या ठिकाणी केवढी विलक्षण शांतता नांदू लागली! कावळ्यांची कावकाव वगळली, तर सारे काही शांत, निःशब्द होते. ते कडाक्याचे भांडण संपून जाताच त्या घरांच्या, बागांच्या व तालवृक्षांच्या पलीकडे असणाऱ्या समुद्राचा गंभीर ध्वनी कानी पडू लागला.

आपले सगळे कंटाळवाणे दैनिक कार्यक्रम आपण अगदी यांत्रिकतेने पार पाडीत राहतो. जीवनाचा एखादा ठराविक साचा मन केवढ्या आतुरतेने स्वीकारीत असते आणि केवढ्या दृढतेने ते त्याला बिलगून बसत असते! एखाद्या खिळ्याने पक्के ठोकून टाकल्याप्रमाणे आपले मन एखाद्या कल्पनेला ठोकले जाऊन बद्ध होऊन बसते, आणि या कल्पनेच्या आवतीभोवती ते जीवन जगत असते. आपले मन कधीच विमुक्त किंवा लवचिक नसते कारण ते एखाद्या कल्पनेच्या खुंटाला पक्के बांधले

गेले असते. आपल्या कल्पनेच्या मध्यबिंदूभोवती तयार झालेल्या परिघातच ते वावरत राहते; मग तो परिघ अल्प असो की विशाल असो. आपल्या या केंद्रापासून दूर जाण्याचे साहस मनाला मुळीच होत नाही. जेव्हा ते असे साहस करते, तेव्हा ते भीतीच्या काळोखात पार बुडून जाते. भीती ही अज्ञाताची कधीच नसते; तर जे ज्ञात आहे त्याचा नाश होण्याची असते. अज्ञात हे कधीच भीती उत्पन्न करीत नसते, तर अज्ञातावर आपले जे अवलंबन असते, ते भीती उत्पन्न करीत असते. अभिलाषा भीतीची शाश्वत सहचरी असते, मग ही अभिलाषा काहीतरी अधिक मिळविण्याची असो की काहीतरी कमी करून टाकण्याची असो. मन जे कल्पनांचे प्रवंध अव्याहत विणीत राहते, त्यामुळेच ते कालप्रक्रिया निर्माण करीत असते. आणि जेथे काल असतो, तेथेच भीती, आशा व मृत्यू यांची वसती असते. आशा हीच आपणांस मरणाकडे ओढून नेत असते.

भेटीला आलेल्या गृहस्थाने, आपण क्रांतिकारक आहोत, असा स्वतःचा परिचय करून दिला. सध्याच्या सगळ्या समाजव्यवस्था उलथून पाडून नव्याने त्या वनविण्याची त्याची इच्छा होती. पूर्वी त्याने कामगार क्रांती घडवून आणण्यासाठी कट्टर साम्यवाद्यांवरोवर अतिशय तळमळीने कार्य केलेले होते. पण ती क्रांती अखेर अयशस्वीच ठरली.

तो सांगू लागला, " ज्या देशात ही कामगारक्रांती अत्यंत यशस्वीपणे घडविण्यात आली, त्या देशात आज काय अवस्था आहे ! पोलीस व लष्कर यांच्या साहाय्याने तेथील हुकूमशाहीने नवे वर्गभेद उत्पन्न केले आहेत. आणि हे सारे किती थोड्या वर्षांत आणि किती अटळपणे घडून आले आहे. वर्गरहित समाजरचनेचे जे आकर्षक आश्वासन या क्रांतीत उद्भासित झाल्यासारखे दिसले, ते पार धुळीला मिळाले आहे. असे असल्यामुळे आता यापुढे अधिक विशाल व अधिक सखोल अशी क्रांती घडवून आणणे आवश्यक झाले आहे. परंतु ही क्रांती घडवून आणताना पूर्वीच्या क्रांतिप्रकारात अंतर्भूत झालेले सारे धोके कटाक्षाने टाळले पाहिजेत " अशी आपली आकांक्षा त्याने व्यक्त केली.

क्रांती या शब्दाचा तुम्ही काय अर्थ करता ?

" क्रांती म्हणजे एका रेखीव योजनेनुसार सध्याच्या समाजव्यवस्थेत संपूर्ण परिवर्तन घडवून आणणे मग हे परिवर्तन रक्तपात करून घडविले जावो, वा रक्तपाताविचून. हा आहे माझ्या क्रांतीचा अर्थ. अशी क्रांती परिणामकारक व प्रभावी व्हावयाची असेल तर तिच्याबद्दल अगोदर संपूर्ण विचारविनिमय झाला पाहिजे. तिच्या संघटनेतील प्रत्येक बारीक सारीक तपशिलाचाही विचार झाला पाहिजे. आणि तो विनचूकपणे अमलात आणला गेला पाहिजे. अशा प्रकारची क्रांती हीच काय ती आशा आता मानवासमोर आहे. सध्याच्या अनवस्थेतून बाहेर पडण्याचा दुसरा

कोणताही मार्ग आता उरलेला नाही. "

पण या नव्या क्रांतीचाही शेवट तसाच होणार नाही का ? जबरदस्ती व जबरीने अंमलबजावणी करणारे अधिकारी यांचीच सर्वाधिकारशाही यातून उत्पन्न होणार नाही का ?

" प्रथम अशा प्रकारचा परिणाम होईल खरा. पण आम्ही त्यातून नक्की बाहेर पडू शकू. कारण क्रांतिकारी शासनाच्या बाहेर, पूर्वनिश्चित विचारसरणीचा असा एक वेगळा गट नेहमीच राहील व हा त्या शासनाच्या कार्यावर कडक नजर ठेवून त्याचे योग्य ते मार्गदर्शन करीत राहील. "

एकूण काय तर एका विशिष्ट पूर्वनिश्चित प्रबंधानुसार घडून येणारी क्रांतीच तुम्हांला हवी आहे आणि तुमची सारी आशा उद्यामध्ये म्हणजे भविष्यामध्ये केंद्रित झाली आहे. आणि अशा या भविष्यकालीन आशेसाठी तुम्ही स्वतःचे व इतरांचेही बलिदान करण्यास तयार झाला आहात. पण असे पाहा की, क्रांती ही जर एखाद्या कल्पनेवर आधारलेली असेल, तर ती मूलभूत स्वरूपाची क्रांती होऊ तरी शकेल का ? एका कल्पनेतून अपरिहार्यपणेच अन्य अनेक कल्पना निर्माण होत राहतात; अधिकाधिक विरोध व दडपशाही निर्माण होत राहते. कुठलीही विशिष्ट स्वरूपाची निष्ठा ही नेहमीच विरोध व शत्रुत्व निर्माण करीत असते. एक निष्ठा अनेक निष्ठांना जन्म देत राहते आणि परिणामतः वैर व संघर्ष हीच वाढत राहतात. बरे, सर्वांची एकच प्रकारची निष्ठा असली म्हणजे तेथे शांती नांदेलच असेही नाही. कुठलीही कल्पना व मत हे नेहमी विरोधच उत्पन्न करीत असते. आणि मग जे सत्ताधारी असतात, त्यांना आपल्या विरोधकांना दडपून टाकीत बसण्याचाच उद्योग करणे भाग पडते. कल्पनेवर आधारलेल्या अशा प्रकारच्या क्रांतीमधून प्रतिक्रांती उत्पन्न होते आणि मग है क्रांतिकारक त्यांच्या विरुद्ध उभ्या ठाकलेल्या क्रांतिकारकांशी लढण्यात उभे आयुष्य घालवितात. अखेर अधिक संघटित क्रांतिकारक हे दुर्बल क्रांतिकारकांना नेस्तनाबूत करून टाकतात. अशा या आजवर चालत आलेल्या क्रांति-प्रकाराचीच तुम्ही पुनरावृत्ती करणार, होय की नाही ? म्हणून हा सर्व प्रकार बाजूला सारून व खरी क्रांती म्हणजे काय या प्रश्नाच्या खोल गाभ्यात शिरून, क्रांतीचे स्वरूप जाणून घेण्याचा प्रयत्न आपण करू या का ?

" पण या प्रयत्नातून काही निश्चित साध्य जर गाठता आले नाही, तर या चर्चेला फारसा अर्थ उरणार नाही. नवी समाजरचना ही अस्तित्वात आणलीच पाहिजे. आणि जी अस्तित्वात आणण्यासाठी एका निश्चित योजनेबरहुकूम क्रांती घडवून आणण्याशिवाय दुसरा मार्गच उपलब्ध नाही. माझे या संबंधीचे हे मत बदलेल असे मला मुळीच वाटत नाही. पण आपले या बाबतीत काय सांगणे आहे, ते ऐकून घेण्याची माझी तयारी आहे. आपण जे सांगाल ते बहुधा बुद्ध, ख्रिस्त किंवा

इतर धर्मगुरू यांनी पूर्वी जे सांगितले, तसेच काहीसे असणार. पण या सर्व पूर्वसुरींनी जे सांगितले त्यातून आज काय निष्पन्न झालेले दिसत आहे ? माणसांनी सद्वर्तनी असावे, हा उपदेश आज दोन हजार वर्षांवर चालत आलेला आहे. आणि असे असूनही आज भांडवलवाल्यांनी जगाची काय विलक्षण दुरवस्था करून टाकली आहे !"

कल्पनेवर आधारलेल्या व विशिष्ट प्रबंधानुसार घडवून आणल्या गेलेल्या समाजव्यवस्थेतून केवळ हिंसाच काय ती वाढत जाते. आणि अशी समाजव्यवस्था ही सदैव विघटनाच्या मार्गावरच वाटचाल करीत असते. एखाद्या निश्चित प्रबंधानुसार अस्तित्वात आणली गेलेली समाजव्यवस्था ही स्वनिर्मित निष्ठेच्या चतुःसीमेतच नेहमी वावरत असते. कारण समाजाला काय किंवा एखाद्या गटाला काय, सामूहिक रीतीने सदैव क्रांतिकारी अवस्थेत राहणे हे कधीही शक्य नसते. व्यक्ती हीच काय ती सदैव क्रांतिकारी अवस्थेत राहू शकते. पण व्यक्ती देखील जर एखाद्या विशिष्ट योजनेनुसार, एखाद्या पूर्वनिश्चित अशा साध्यानुसार क्रांतीचे कार्य करू लागेल, तर मग तो देखील मनोविकल्पित अशा ध्येयाच्या किंवा आशेच्या चौकटीतच सदैव वावरत राहील. अशी व्यक्ती ही मग आपल्या पूर्वसंस्कार बद्धतेनुसारच जीवनाच्या आव्हानांना उत्तर देत राहील. कदाचित तिच्या या उत्तरांचे स्वरूप किंचित बदललेले व सुधारलेले असेही असू शकेल. पण काहीही झाले तरी ते मर्यादित असेच राहील. आणि मर्यादित स्वरूपाची क्रांती ही तर खरी क्रांती असूच शकत नाही. अशी ही क्रांती कोणत्याही सुधारणेप्रमाणें केवळ पुच्छप्रगतीच असते. एखाद्या कल्पनेवर, एखाद्या ठाम निर्णयावर किंवा निष्कर्षावर आधारलेली क्रांती म्हणजे जुन्याच प्रबंधाचे काहीसे सुधारलेले पण सातत्यात्मक स्वरूप असते. म्हणून मूलभूत स्वरूपाची क्रांती घडून यावयाची असेल, तर मन म्हणजे काय आणि कल्पना म्हणजे काय हे आपण प्रथम समजून घेतले पाहिजे.

"कल्पना या शब्दाचा आपण काय अर्थ करता ? कल्पना म्हणजे ज्ञान असे का आपले म्हणणे आहे ?"

कल्पना म्हणजे मनाचा प्रक्षेप, मनोनिर्मित असे विकल्पन. कल्पना ही पूर्व अनुभूतींमधून उत्पन्न होत असते. आणि अनुभूती म्हणजेच ज्ञान. आपल्या सर्व अनुभवांचा अर्थ मनाच्या पूर्वसंस्कारबद्धतेनुसारच लावला जात असतो; मग ही संस्कारबद्धता सबोध स्वरूपाची असो किंवा अबोध स्वरुपाची असो. आपला अनुभव म्हणजेच आपले मन; आपल्या कल्पना म्हणजेच आपले मन. आपले मन हे आपल्या विचारांपासून, विचारांच्या गुणवत्तेपासून वेगळे असे कधीच नसते. संचित केले गेलेले व संचित केले जाणारे ज्ञान, हीच आपल्या मनोव्यापारांची प्रक्रिया असते. कल्पना, स्मृती आणि अनुभव, तसेच जीवनाच्या आव्हानांना दिल्या जाणाऱ्या उत्तरांची संपूर्ण प्रक्रिया म्हणजेच मन. अशा या आपल्या मनाचे व जाणिवेचे सर्व व्यापार आपण

जोवर यथार्थपणे आकलून घेत नाही, तोवर मनुष्य आणि त्याचे इतरांशी असणारे परस्परसंबंध, यांच्यात मूलभूत स्वरूपाची क्रांती घडून येणे हे सर्वस्वी अशक्य आहे. मानवामानवातील असे सर्व प्रकारचे संबंध म्हणजेच समाज.

" म्हणजे ज्ञानाच्या रूपात असणारे मन, हाच क्रांतीचा खराखुरा वैरी आहे, असे का आपल्याला सुचवावयाचे आहे ? त्याचप्रमाणे, असे मन कोणतीही नवी योजना किंवा कोणतीही नवी शासनव्यवस्था कधीही निर्माण करू शकणार नाही, असे का आपले म्हणणे आहे ? मन हे गताशी बद्ध होऊन बसलेले असल्यामुळे, त्याला नव्याचे आकलन कधीही होऊ शकणार नाही आणि अशा मनाने कसलीही योजना केली, तरी ती केव्हाही जुन्याची वा गताची निष्पत्ती राहणार, असे जर आपले म्हणणे असेल तर मानवात कसलेही परिवर्तन घडून येणे हे कसे शक्य होईल ? "

तेच आपण आता पाहू या. मन हे नेहमी एका विशिष्ट साच्यात बद्ध होऊन गेलेले असते. ज्या चौकटीत ते आपले कार्य करते व वावरत राहते ती चौकट, हेच मनाचे स्वरूप. मनाची ही चौकट, हा साचा एकतर गताधारित असतो किंवा भविष्याधारित तरी असतो; निराशेवर तरी आधारलेला असतो किंवा आशेवर आधारलेला असतो; स्वप्नरंजनावर वा गोंधळावर आधारलेला असतो; जे होऊन गेले आहे त्याच्यावर तरी आधारित असतो किंवा भविष्यात जे व्हावेसे वाटते त्याच्यावर आधारित असतो. मनोव्यापारांचे हे स्वरूप आपल्या पूर्ण परिचयाचे आहे.

आता हा जुना साचा मोडून टाकून, त्याच्या जागी ' नव्या ' ची प्रतिष्ठापना तुम्हाला करावयाची आहे. पण तुमचे हे ' नवे ' म्हणजे त्या जुन्याचेच किंचित सुधारलेले असे स्वरूप राहणार. तुम्हाला काही विशिष्ट हेतू साध्य करावयाचा असतो व त्यासाठी काही डावपेच खेळावयाचे असतात. म्हणून त्याला तुम्ही ' नवे ' हे नाव देता. पण वस्तुतः ते जुनेच असते. या तथाकथित नव्याची पाळेमुळे त्या जुन्यातच पूर्णपणे रुतलेली असतात. लोभ, मत्सर, हिंसा, द्वेष, सत्ताभिलाषा व पृथकत्व ही ती पाळेमुळे होत. अशा या जुन्याच्या मगरमिठीत वावरत राहूनच तुम्ही नवे जग निर्माण करण्याची आकांक्षा बाळगता. पण हे सर्वस्वी अशक्य आहे. या आकांक्षेमुळे तुम्हाला स्वतःची व इतरांचीही फसवणूक करता येईल, पण वस्तुस्थिती अशी आहे की, जुना मानसिक साचा समग्रपणे छिन्नभिन्न करून टाकल्याशिवाय मूलभूत परिवर्तन घडून येणे हे सर्वथा असंभवनीय आहे. नवे जग निर्माण करण्याचा हा खेळ तुम्ही खुशाल खेळत राहा. पण या प्रकाराने तुम्ही जगाचे आशाकेंद्र कधीही बनू शकणार नाही. सध्याच्या अनवस्थेमधून खरी सुव्यवस्था उदयास यावयाची असेल तर नवे वा जुने साचे बनवित राहणारी मनाची घडण आमूलाग्र नष्ट होणे अत्यावश्यक आहे. यासाठीच मनाच्या व्यापारांचे यथार्थ आकलन करून

घेणे आवश्यक आहे. मन हे नेहमी ज्ञानाच्या किंवा अनुभूतींच्या कुंपणातच कार्य करीत असते; मग हे ज्ञान वा ही अनुभूती सबोध स्वरूपाची असो वा अबोध स्वरूपाची असो; किंवा ती सामूहिक वा उथळ प्रकारची असो.

आता आपण हे पाहु या की, कोणत्याही प्रकारच्या साच्यापासून पूर्ण विमुक्त अशी कृती करता येणे शक्य आहे कां ? एका विशिष्ट साच्यानुसार केली जाणारी कृती एवढीच काय ती आजवर आपल्याला माहीत आहे. ही कृती एकतर जे होऊन गेले त्याच्या साच्याशी किंवा जे भविष्यात व्हावयास हवे त्याच्या साच्याशी अधिकाधिक जुळते घेणारी अशीच असते. म्हणून अशी कृती ही एकतर आशेच्या अनुरोधाने किंवा भीतीच्या अनुरोधाने केली जात असते. ती गताचे तरी अनुसरण करीत असते किंवा भविष्याचे तरी.

" पण गताकडून भविष्याकडे जात राहणारा व्यापार किंवा गत व भविष्य यांच्यामध्ये घडून येत राहणारा व्यापार असे जर कृतीचे स्वरूप नसेल, तर दुसऱ्या कोणत्या प्रकारची कृती असणे शक्य आहे ? आम्ही नेहमी कृतिशून्य अवस्थेतच राहावे, असे तर आपले म्हणणे नाही ना ? "

खरी कृतिशून्यता म्हणजे काय, याची यथार्थ जाणीव जर आपणा सर्वांना असती, तर आज जग किती तरी चांगल्या अवस्थेत राहिले असते ! कारण खरी कृतिशून्यता ही कृतीच्या विरोधी असणारी स्थिती मुळीच नव्हे. -- पण हा अगदी वेगळाच प्रश्न आहे. तेव्हा तो आपण तूर्त बाजूला ठेवू या. अगोदर हे पाहू की कृतीचा एखादा साचा समोर ठेवल्याशिवाय राहणे हे मनाला शक्य आहे की नाही ? तसेच, अभिलाषेचे जे मागेपुढे आंदोलन घेत राहणारे स्वरूप असते, त्यापासून मनाला विमुक्त होणे शक्य आहे की नाही ? मनाला हे करता येणे शक्य आहे हे निश्चित. विमुक्त मनाची अशा प्रकारची कृती म्हणजे चालू क्षणात जीवन जगत राहणे, हीच होय. असे जीवन जगणे म्हणजे आशेवाचून जीवन जगणे आणि उद्याच्या चिंतेपासून मुक्त असे जीवन जगणे. अशी अवस्था ही आशाविरहितताही नव्हे व उदासीनताही नव्हे. पण वस्तुतः आपण जीवन जगतच नसतो, तर सदैव मरणाचाच पाठलाग करीत असतो. याचाच अर्थ हा की आपण नेहमी गताचा जरी नाहीतर भविष्याचा तरी पाठलाग करीत असतो. वर्तमानातच सदैव जगत राहणे हीच सर्वश्रेष्ठ क्रांती आहे. जीवन जगण्यासाठी कुठल्याच साच्याची गरज नसते; मरणाला मात्र साचा आवश्यकच असतो. मरणाला गताच्या वा भविष्याच्या साच्याची, गतेतिहासाच्या साच्याची किंवा भावी आदर्श समाजरचनेच्या साच्याची गरज असते. तुम्ही त्या भावी समाजरचनेसाठी जगत आहात, म्हणून तुमचे आवाहन हे जीवनाला केले जाणारे आवाहन नव्हे, तर मरणाला केले जाणारे आवाहन आहे.

" आपले सगळे सांगणे ठीक आहे खरे. पण त्यातून निष्पन्न असे काहीच होत

नाही. आपण सुचविता ती कृती, ती क्रांती आहे तरी कुठे ? आपण ध्वनित करता ती जीवनरीत कुठे वरे दिसून येते ?"

मी ध्वनित केलेली कृती किंवा जीवनरीत जीवनात वसत असते, मरणात नव्हे. तुम्ही ध्येयाच्या किंवा आशेच्या पाठीमागे लागला आहात आणि अशा पाठलागालाच तुम्ही कृती वा क्रांती हे नाव देत आहात. तुमचे हे ध्येय, ही आशा, हा, जे आहे त्याच्यापासून म्हणजे वास्तवापासून दूरदूर असणारा असा मनाने निर्माण केलेला प्रक्षेपच आहे. मन हा गताचाच परिपाक असल्यामुळे, या गतामधूनच ते नव्याचा साचा उत्पन्न करीत आहे आणि यालाच तुम्ही क्रांती असे म्हणत आहात. तुमचे हे तथाकथित नवे जीवन म्हणजे वस्तुतः नव्या पोषाखातील तेच जुने जीवन आहे. गत काय किंवा भविष्य काय, हे दोन्हीही जीवनाला आपल्यामध्ये सामावून घेऊ शकत नाहीत. गतामध्ये किंवा भविष्यामध्ये जीवनाचे केवळ स्मरण वसत असते किंवा जीवनाची आशा चमकत असते. पण गताधारित जीवन किंवा भविष्याधारित जीवन म्हणजे वर्तमान जीवन मुळीच नव्हेः मनाकडून केली जाणारी कृती म्हणजे जीवन नव्हे. मन हे नेहमी मृत्यूच्या चौकटीतच कृती करीत असते. म्हणून अशा मनोविकल्पित साच्यावर आधारलेल्या क्रांतीचे स्वरूप अधिक अंधकारमय, विनाशमय व दुःखदैन्यमय असेच असते.

" आपल्या या सांगण्यामुळे आपण मला पूर्णपणे शून्य बनवून टाकले आहे. जवळ जवळ पूर्ण नग्न करून टाकले आहे. आध्यात्मिक दृष्टीने ते मला कल्याणप्रद होऊ शकेल. कारण आताच माझ्या मनावरचा व हृदयावरचा भार हलका झाल्यासारखे मला वाटत आहे. पण सामूहिक स्वरूपाची क्रांतिकारक कृती करण्याच्या दृष्टीने मात्र त्याचा मला फारसा उपयोग होईलसे वाटत नाही. "

समाजानुवर्तिता आणि विमुक्तता

मेघांचा जोराचा गडगडाट व विजांचा भयानक कडकडाट होऊन पहाटेलाच वादळाला सुरुवात झाली होती आणि तेव्हापासूनच पाऊस सारखा कोसळतच होता. तांबडी धरती सारे पाणी शोषून घेत होती. गुरेढोरे निवाऱ्यासाठी एका विशाल वृक्षाच्या आश्रयाला उभी होती. या वृक्षाखाली एक लहानसे पांढरेशुभ्र मंदिरही होते. भोवतालच्या शेतांचा तजेल हिरवेपणा लसलसत होता. शेताच्या पलीकडून आगगाडीचा रस्ता गेला होता. तेथे थोडासा चढ असल्यामुळे तेथवर आगगाडया कष्टाने चढत सावकाश चालत आणि उंचावर पोचताच जणू अखेर गाठल्याच्या उल्हासाने जोराने शिटी वाजवीत. आगगाडीच्या वाटेने जात असता एक मोठा नाग आगगाडीखाली कापला गेलेला आढळला. त्याच्या अंगावरचे रंगीत चौकोन व पट्टे फार सुंदर दिसत होते. थोडयाच वेळात पक्षी त्या नागाच्या तुकडयांवर झडप घालून ते सारे फस्त करून टाकणार होते. मग नागाचे नावनिशाणही तेथे उरणार नव्हते.

एकाकीपणे जीवन जगण्यासाठी माणसाला फार मोठी बुद्धिमत्ता असावी लागते. एकाकी असणे व एकाकीपणातहि आपला लवचिकपणा कायम ठेवणे हे अतिशय अवघड असते. स्वतःला संकुचित करून टाकणाऱ्या अभिलाषापूर्तीच्या भिती स्वतः भोवती न उभारता, एकाकीपणाने जीवन जगावयाचे असले की, त्यासाठी फार मोठया तरल सावधानतेची गरज असते. कारण एकाकी जीवनामुळे माणसाचा आळशीपणा वाढण्यास आणि त्याच्या सुखसोयींच्या सवयी दृढ होण्यास उत्तेजन मिळत राहते. त्याचप्रमाणे एकाकी जीवनामुळे इतरांपासून तुटून वेगळे होऊन जाण्याची वृत्ती वाढीला लागण्याचा संभव असतो. म्हणून जी खरी सुजाण माणसे असतात तीच काय ती, स्वतःला इजा न करता व इतरांनाही इजा न पोचविता, असे निरामय एकाकी जीवन जगू शकतात.

वस्तुतः सुजाणपणा एकाकीच असतो. पण एकलकोंडेपणा हा मात्र माणसाला सुजाणपणाकडे नेणारा नसतो. स्वतःला इतरांपासून तोडून टाकणे म्हणजे वस्तुतः आपले मरण ओढवून घेणेच होय. म्हणून स्वतःला असे तोडून टाकणे हे सुजाणपणाचे असत नाही. सुजाणपणाप्रत पोचण्याचा कोणताही विशिष्ट असा मार्ग असू शकत नाही. कारण कुठलाही मार्ग म्हटला की तो इतरांपासून स्वतःला तोडून टाकणारा, वेगळे करणारा असाच असतो. कुठल्याही मार्गाची प्रकृती माणसाला तोडन टाकण्याचीच असते. पण अशा या तुटले जाण्याला, या पृथक होऊन बसण्यालाच एकता, संपूर्णता अशी नावे वहाल केली जात असतात. कुठल्याही विशिष्ट

मार्गाने जाणे ही विभक्तीकरणाचीच प्रक्रिया असते. विशिष्ट मार्गाचे साधन स्वतःला असे विभक्त करून टाकणारे असल्यामुळे या साधनासारखेच ते अखेरचे साध्यही विभक्त करणारेच असते; जे साध्य असते, जे असावेसे वाटत असते, त्याच्यापासून साधन हे मुळीच वेगळे नसते. म्हणून कुठल्याही विशिष्ट मार्गाने जाण्याने नव्हे, तर आपल्या विविध संबंधांचे आकलन झाल्यानेच सुजाणपण येत असते.

आपले हे विविध संबंध म्हणजे समोरच्या त्या शेताशी, रस्त्यावरच्या वाटसरूशी आपल्या उडत्या धावत्या विचारांशी—असे सर्व प्रकारचे संबंध. काहीतरी मिळविण्यासाठी किंवा साध्य करण्यासाठी स्वतःला इतरांपासून तोडून टाकणे, परिसीमित होऊन वसणे, म्हणजे ज्याचा शोध घ्यावयाचा त्याची दारे बंद करून टाकणेच होय. सर्वांशी संबंधित असताही जी एकाकिता अस्तित्वात येते, ती एकाकिता सीमितेची, पृथकत्वाची नसते. एकाकिता कधीही परिसीमित वा संकुचित असता उपयोगी नाही, तर ती संपूर्णपणे विमुक्त असली पाहिजे. जे पूर्ण असते तेच एकाकी असते जे अपूर्ण असते तेच पृथकत्वाचा मार्ग शोधीत असते.

भेटीस आलेली स्त्री एक लेखिका होती. तिच्या पुस्तकांचा खप बराच मोठा होता. ती सांगत होती की, आपले हिंदुस्थानात येणे हे बऱ्याच वर्षांनंतर जुळून आले. आपण प्रथम येण्यास निघालो, तेव्हा आपल्या या प्रवासाचा शेवट कशात होणार आहे याची आपणांस काहीही कल्पना नव्हती. पण आता बऱ्याच काळानंतर आपले इष्ट साध्य काय आहे, याची आपणांस स्पष्ट जाणीव झाली आहे. तिच्या पतीला व सर्व कुटुंबियांनाच धार्मिक गोष्टींची केवळ वरवरची नव्हे, तर सखोल आवड होती. तरीही त्या सर्वांना सोडून देण्याचा तिने पक्का निश्चय केला होता व शांतीच्या शोधार्थ ती येथे आली होती. या देशात जेव्हा ती आली तेव्हा तिची कुणाशीही ओळख नव्हती. त्यामुळे वर्ष तिला बरेच कष्टाचे गेले. ज्या एका आश्रमाविषयी तिला माहिती मिळालेली होती, तेथे ती प्रथम गेली. तेथील वयोवृद्ध गुरू सौम्य वृत्तीचे होते. त्यांना आध्यात्मिक स्वरूपाचे काही विशिष्ट अनुभव आलेले होते; या अनुभवांच्या आधारावरच ते जगत होते. ते सदैव एक संस्कृत वचन उच्चारीत असत आणि त्यांच्या सर्व शिष्यांना त्याचा पूर्ण अर्थ समजत असे. या आश्रमात तिचे स्वागत केले गेले. तेथील नियमांचे पालन करणे तिला जड गेले नाही. काही महिने ती त्या आश्रमात राहिली. पण तिच्या मनाला तेथे शांती लाभेना. म्हणून आश्रम सोडून जाण्याचा आपला निश्चय तिने जाहीर केला. एवढ्या प्रज्ञासंपन्न गुरूला सोडून जाण्याचा विचार तिच्या मनात यावा ही गोष्ट तेथील शिष्यांना भयंकर वाटली. पण तरीही ती आश्रम सोडून निघून गेली.

यानंतर ती एका पर्वतावर असणाऱ्या आश्रमात गेली. तेथील परिसरातील विशाल वृक्षांच्या, नादमधुर निर्झरांच्या व मनोहर अरण्यांच्या वातावरणात ती

अतिशय आनंदाने राहिली. या आश्रमातील नियम बरेच कडक होते पण तिला फारसे काही कठीण वाटले नाही. पण तेथील वातावरणात तिला जिवंतपणा, चैतन्य आढळेना. कारण तेथील शिष्यगण ज्या ज्ञानाची, ज्या परंपरेची व ज्या गुरूची पूजाअर्चना करीत ते सर्व मृतप्राय होते. जेव्हा तिने तोही आश्रम सोडला, तेव्हा तेथील शिष्यवृंदाला धक्काच बसला व ती घोर आध्यात्मिक तमात लोटली जाईल अशी तिला त्यांनी धमकीही दिली. नंतर ती दुसऱ्या एका विख्यात आश्रमात गेली. तेथे धार्मिक वचनांचा सतत पुनरुच्चार करण्यात येई व ठराविक प्रकारची ध्यानधारणा नियमितपणे करविली जाई. पण या वातावरणात आपणांस अधिकाधिक बंदिवान केले जात आहे, व आपला नाश होत आहे, असे तिला हळूहळू आढळून आले. कारण तेथील गुरू व शिष्य हे मुक्तीबद्दल कितीही बोलत असले, तरी त्यांना कुणालाच विमुक्तता नको होती. त्यांचे हे आध्यात्मिक केंद्र टिकविण्यापलीकडे कुणालाही कशाचे महत्त्व वाटत नव्हते. आणि गुरूलाही शिष्यवृंद टिकविण्यापलीकडे दुसऱ्या कशाचे महत्त्व नव्हते. तेथून ती अखेर निघाली व दुसरीकडे गेली आणि तेथेही जीवनाचा जवळपास तसाच साचा असल्याचे तिला आढळून आले.

" येथल्या बहुतेक सगळ्या महत्त्वाच्या आश्रमांत मी राहून चुकले आहे, यावद्दलची ग्वाही मी आपल्याला देऊ शकते. या सगळ्या आश्रमांत मला हेच आढळले की, शिष्यांना अडकवून ठेवणे व सत्य मानल्या जाणाऱ्या एखाद्या विशिष्ट विचारप्रबंधानुसार शिष्य तयार व्हावेत यासाठी साधनेच्या कठोर नित्यक्रमात त्यांना भरडून टाकणे, हेच काय ते सर्वांना हवे असते. पण प्रत्येक शिष्याने एका विशिष्ट साधनेनुसारच आचरण केले पाहिजे, गुरूने घालून दिलेल्या दिनक्रमाच्या साच्यानुसारच वर्तन केले पाहिजे, या गोष्टीवरच सर्वांचा एवढा भर का बरे असावा ? हे सारे गुरू मुक्तीचे आश्वासन देत असताही प्रत्यक्ष विमुक्त जीवनाला मात्र मुळीच वाव देत नाहीत, असे का बरे होत रहावे ? "

हे पहा कुठल्याही प्रबंधाप्रमाणे वा साच्याप्रमाणे अनुवर्तन करीत राहण्यात मनुष्याला एक प्रकारची इच्छापूर्ती लाभत असते. या प्रकारच्या अनुवर्तनामुळे शिष्याला एक तऱ्हेची सुरक्षितता वा निश्चितता प्राप्त होत असते आणि यामुळे गुरू व शिष्य या उभयतांनाही सामर्थ्य प्राप्त होत असते. अशा अनुवर्तनामुळे धार्मिक क्षेत्रांत काय किंवा लौकिक क्षेत्रात काय, गुरूचा वा नेत्याचा अधिकार हा अधिकाधिक बलशाली होत जातो. तसेच या अनुवर्तनामुळे शिष्यांमध्ये एक तऱ्हेची निर्बद्धता उत्पन्न होत असते आणि हिलाच शांती हे नाव दिले जात असते. माणसाला जर कुठल्या तरी प्रतिकाराचा आश्रय करून दुःख टाळावयास हवे असेल, तर त्याने या प्रकारचे अनुवर्तन का बरे स्वीकारू नये ? अर्थात या मार्गात थोडीबहुत

पीडा व कष्ट असतातच. पण या अनुवर्तनामुळे माणसाचे मन वधिर होत जाते व त्यामुळे त्याला आपल्या आंतरिक संघर्षाची बोच जाणवेनाशी होते. स्वतःचे मन वधिर व संवेदनशून्य बनवून टाकणे हेच सामान्यतः सर्वांना हवे असते. जे जे असुंदर किंवा कुरूप ते ते दृष्टीआड करून टाकण्याचा आपण सतत प्रयत्न करीत असतो. पण यामुळे जे जे सुंदर त्याच्याबाबतही आपण स्वतःला संवेदनशून्य बनवून टाकीत असतो. असे आपण का करतो हे मात्र कुणाच्याही ध्यानात येत नाही. मृत किंवा जिवंत गुरूच्या अधिकारी आदेशानुसार अनुवर्तन करीत राहिल्याने आपणांस एक प्रकारचे उत्कृष्ट समाधान प्राप्त होत असते. गुरू हा सर्वज्ञानी आहे व आपण अज्ञानी आहोत, अशी आपली धारणा असते. गुरूपाशी ज्ञानाचा सगळा साठा असल्यामुळे, आपण स्वप्रयत्नाने काही जाणून घेण्याचा प्रयास करणे मुर्खपणाचे होईल अशी आपली समजूत असते. म्हणून आपण गुरूचे दास बनून जातो. आपल्या मनातील गोंधळापेक्षा गुरूचे दास्य पत्करले, असे आपणांस वाटत राहते. अशा प्रकारे परस्परांचा उपयोग करून गुरू व शिष्य हे दोन्ही परिपुष्ट होत राहतात. माणसे जी आश्रमात जात असतात ती स्वातंत्र्यासाठी किंवा विमुक्ततेसाठी काही जात नसतात; होय की नाही ? तुम्ही जे आश्रमात जाता ते सांत्वनासाठी जाता; एखाद्या निष्ठेच्या वा साधनेच्या द्वारा स्वतःला परिसीमित करून घेण्यासाठी जाता. दुसऱ्याची पूजा करण्यासाठी व ओघाने स्वतःचीही पूजा करून घेण्यासाठी जाता. आणि या सगळ्या प्रकाराला सत्याचा शोध हे नाव देता. कोणत्याही आश्रमामध्ये शिष्यांना स्वातंत्र्य किंवा विमुक्ती देणे हे परवडणारेच नसते. कारण तसे केल्यास आश्रमच नष्ट होऊन जाण्याची भीती असते. स्वातंत्र्य किंवा विमुक्तता कुठल्याही आश्रमात प्राप्त होणे शक्य नसते. कुठल्याही विचारप्रणालीत किंवा निष्ठेत विमुक्तता वसत नसते. तसेच कुठल्याही प्रबंधानुसार वर्तन करण्याने किंवा भीतीने ती मिळविण्यासारखी नसते– मग त्या भीतीला साधना हे गोंडस नाव का दिले जाईना. साधना कधीही मुक्ती मिळवून देऊ शकत नाही. ती मुक्तीचे आश्वासन देईल खरी. पण मुक्तीचे आश्वासन म्हणजे मुक्ती नव्हे. मुक्ती मिळविण्यासाठी अनुवर्तनाचे साधन वापरणे म्हणजे मुक्तीचे अस्तित्व मुळातच नाकारण्यासारखे आहे. कारण साधन हेच तर साध्य असते. अनुकरणातून केवळ अनुकरणच उत्पन्न होत असते; मुक्ती नव्हे. पण आपण मात्र नेहमी स्वतःला फसवीत राहतो. म्हणूनच कुठलीतरी जबरदस्ती किंवा पारितोषिकाचे आश्वासन वेगवेगळ्या सूक्ष्म स्वरूपात आपल्यासमोर ठेवले जात असते. पण आशा बाळगीत राहणे म्हणजे वस्तुतः वर्तमान जीवनाकडे पाठ फिरविणेच आहे.

" आता तर मी सारे आश्रम एखाद्या भयंकर रोगाप्रमाणे टाळू लागले आहे. शांती लाभावी म्हणून मी त्यांचा आश्रय केला. पण तेथे विशिष्ट आचरणाची जबरदस्ती, काही अधिकारयुक्त सिद्धान्त व निरर्थक आश्वासने, हीच काय ती

माझ्यापुढे ठेवण्यात आली. गुरूने दिलेले आश्वासन आम्ही केवढ्या उत्सुकतेने स्वीकारीत असतो ! किती आंधळे असतो आम्ही ! इतकी वर्षे यात घालविल्यानंतर, आश्रमात ज्या पारितोषिकांचे आश्वासन देण्यात येते, त्यांच्यामागे धावण्याची अभिलाषा माझ्या मनातून मुळापासून उखडली गेली आहे. माझे शरीरही आता दमूनथकून गेले आहे हे आपण पाहताच. कारण आश्रमात सांगण्यात आलेले सगळे कठिण साधनाप्रकार गंभीरपणे आचरण्याचा वेडेपणा मी केला. त्या आश्रमांपैकी ज्याच्यात गुरूची प्रतिष्ठा वाढत्या प्रमाणावर होती, आणि ज्याची लोकप्रियता सारखी वाढत होती तेथे; जेव्हा मी आपल्याकडे जाण्याची इच्छा बोलून दाखवली, तेव्हा तेथील लोक हताश झाले. काहींच्या डोळ्यांत तर अश्रूही आले. त्यांचे अश्रू, हा माझ्या भ्रमनिरासाचा घडा भरणारा अखेरचा थेंब होता !

" आज मी जी आपल्याकडे आले आहे ती माझ्या हृदयाला ग्रासून टाकणाऱ्या एका गोष्टीविषयी आपल्याशी बोलण्यास आले आहे. या गोष्टीसंबंधी एका गुरूपाशी मी सूतोवाच केले होते. पण आपल्या विचारांचे दमन करण्याचाच आदेश त्यांनी मला दिला. माझी समस्या ही अशी आहे : माझी एकटेपणाची वेदना मला आता असह्य होऊन गेली आहे. शारीरिक एकटेपणाबद्दल काही मी बोलत नाही. कारण मला तो स्वागतार्हच वाटतो. पण आंतरिक एकटेपणाची सखोल वेदना ही माझी समस्या आहे. तिच्या बाबतीत काय करावे हे मला मुळीच कळत नाही. माझ्या मनात ही जी पोकळी उत्पन्न झाली आहे, जो रितेपणा निर्माण झाला आहे, त्याच्या बाबतीत मी काय बरे करू ? "

हे पाहा, एखाद्या गोष्टीसाठी मार्ग कोणता असे जेव्हा तुम्ही विचारू लागता, तेव्हा तुम्ही केवळ अनुयायी वा शिष्यच बनता. तुमच्या हृदयात एकटेपणाची तीव्र वेदना सलत आहे, म्हणून तुम्हांला कुणाचे तरी साहाय्य हवे आणि या बाबतीत दुसऱ्या कुणीतरी मार्गदर्शन करावे ही तुमची मागणी आहे. पण अशा प्रकारच्या मागणीमुळेच जबरदस्ती, अनुकरण व भीती यांची दारे आपोआप खुली होत असतात. कोणतीही समस्या ही ' कशी सुटेल ' ही गोष्ट वस्तुतः मुळीच महत्त्वाची नसते. म्हणून तुमची ही जी वेदना आहे ती टाळण्याचा, तिच्या पलीकडे जाण्याचा, किंवा तिच्यावर मात करण्याचा प्रयत्न न करता, त्या वेदनेचे स्वरूप आपण प्रथम समजून घेऊ या. एकटेपणाच्या या वेदनेचे तुम्हांला जोवर यथार्थ आकलन होणार नाही, तोवर तुम्हांला स्वस्थता व शांती लाभणे शक्य नाही. उलट, तोवर तुमच्या मनात अविरत संघर्षच माजत राहील. आपल्यापैकी बहुतेकजण आंतरिक संघर्षाच्या या भीतीपासून दूरदूर पळण्याचा प्रयत्न सूक्ष्म रीतीने किंवा उद्दंडपणाने सदैव करीत असतात. — तुमची ही जी वेदना आहे, तिचा संबंध वस्तुतः गतकालाशी आहे; जे वर्तमान आहे, त्याच्याशी मुळीच नाही. म्हणून जे वर्तमान वास्तव आहे, त्याचाच

तुम्ही शोध केला पाहिजे. तात्त्विक स्वरूपाचा मात्र असता उपयोगी नाही; तर हा शोध साक्षात अनुभविण्याच्या स्वरूपाचा असला पाहिजे. पण जे वर्तमान वास्तव आहे, त्याच्याकडे तुम्ही जर वेदनेच्या किंवा भीतीच्या दृष्टिकोनातून पाहू लागलात, तर त्याचा साक्षात शोध तुम्हांला कसा बरे लागेल ? त्याचे यथार्थ आकलन होण्यासाठी गतकालातील त्याच्याबद्दलचे सर्व ज्ञान पूर्णपणे नष्ट होऊन गेले पाहिजे. आणि नंतरच त्याच्याकडे विभक्त दृष्टीने पाहिले पाहिजे, होय की नाही ? सगळ्या गतस्मृतींचे, जीवनाच्या आव्हानाला दिल्या जाणाऱ्या सर्व ठराविक उत्तरांचे मेघपटल नाहीसे होऊन, विमुक्त व निरभ्र मनाने त्याच्याकडे परतावयाला नको का ? पण अशा रीतीने नव्याचे दर्शन घडण्यासाठी मन विमुक्त कसे होऊ शकेल, हे मात्र विचारू नका. तर विमुक्त मन हे ज्या सत्याचा निर्देश करीत असते, त्या सत्याकडेच अवधान द्या. कारण सत्यदर्शन हेच विमुक्ती मिळवून देत असते; विमुक्त होण्याची अभिलाषा ही कधीही विमुक्तता मिळवून देत नसते. मुक्त होण्याची अभिलाषा व मुक्तीसाठी केला जाणारा प्रयत्न हेच मुक्तीच्या मार्गातील मोठे अडथळे असतात.

नव्याचे आकलन होण्यासाठी, नाना निर्णयांनी व सुरक्षेच्या विविध साधनांनी भरून गेलेल्या मनाचे संपूर्ण व्यापार स्तब्ध व्हावयास नकोत का ? आपल्या एकटेपणापासून दूर पळण्याचा मार्ग शोधणे, त्याच्यापासून मुक्त होण्याचा एखादा उपाय धुंडाळीत बसणे — या दोन्हीही गोष्टींचा आश्रय मुळीच न घेता मन हे सहजपणेच शांत व स्तब्ध व्हावयाला नको का ? एकटेपणाच्या वेदनेचे जे व्यापार आशा व निराशा या टोकांत सदैव आंदोलत असतात, त्यांचे शांतपणे निरीक्षण करावयाला नको का ? मनाचा हा जो व्यापार चालू असतो त्याच्यामुळेच एकटेपणा व त्याची भीती हे उत्पन्न होत नसतात का ? मनाचा हा जो अव्याहत व्यापार चालू असतो, तोच माणसाला इतरांपासून तोडून टाकीत नसतो का ? तोच माणसाला प्रतिकार करण्यास उद्युक्त करीत नसतो का ? मन जे जे संबंध जोडीत राहते, तो सगळा पृथकत्वाचा, जीवनपरावृत्त होण्याचाच प्रकार नसतो का ? आपला प्रत्येक अनुभव हाच स्वतःला इतरांपासून तोडून टाकीत नसतो का ? एकटेपणाची वेदना ही तुमची खरी समस्या नसून, ही समस्या निर्माण करणारे मन, हीच खरीखुरी समस्या नाही का ? म्हणून आपल्या मनोव्यापारांचे आकलन करून घेणे, हाच वस्तुतः विमुक्ततेचा प्रारंभ असतो. विमुक्तता ही भविष्यात प्राप्त करून घ्यावयाची नसते; तर जे पहिले पाऊल टाकावयाचे असते, ते विमुक्ततेचेच पाऊल असावे लागते. प्रत्येक बाह्य वा आंतरिक उद्दीपनाला मनाकडून जे जे उत्तर दिले जात असते, त्याच्या प्रक्रियेचे निरीक्षण केल्यानेच मनोव्यापारांचे आकलन होत असते. बाह्य किंवा आंतरिक उद्दीपन व त्याला दिले जाणारे उत्तर — म्हणजेच माणसाचे सर्व प्रकारचे संबंध होत — सर्व प्रकारच्या स्तरांवरील संबंध होत. जे जे संपादन केले जाते व

साठविले जाते — मग ते ज्ञानाच्या रूपात असो किंवा अनुभवाच्या वा निष्ठांच्या रूपात असो — ते ते विमुक्ततेला अखंडपणे प्रतिबंध करीत राहते. आणि विमुक्तता असल्याशिवाय तर सत्य अवतरणेच शक्य नसते. जेथे विमुक्तता असते, तेथेच सत्य अवतरते.

" पण यासाठी प्रयत्नांची काहीच गरज नसते का ? आकलन करून घेण्यासाठी करावा लागणारा प्रयत्न आवश्यकच नसतो का ? "

असे पहा की, संघर्षाच्या द्वारा किंवा धडपड व प्रयत्न यांच्या द्वारा आपल्याला कशाचे तरी आकलन होऊ शकते का ? उलट, मन जेव्हा पूर्णपणे शांत, निःस्तब्ध असते, जेव्हा प्रयत्न पूर्णपणे थांबून गेलेले असतात, तेव्हाच आकलनाचा उदय होत नसतो का ? पण जे मन जबरदस्तीने शांत बनविले जाते, ते मन शांत नसते. असे मन केवळ संवेदनशून्य असते, ते मृत होऊन गेलेले असते. जोवर कुठलीही अभिलाषा मनात वावरत असते, तोवर प्रशांततेचे, नीरवतेचे सौंदर्य उदय पावत नसते.

काल आणि सातत्य

जलाशयात संध्यारागाचे मनोरम प्रतिबिंब पडले होते. मावळत्या सूर्यप्रकाशाच्या पार्श्वभूमीवर वृक्षांच्या काळसर आकृती शोभून दिसत होत्या. समोरच्या रस्त्याने एक भरगच्च भरलेली बस गेली आणि लागलीच तिच्या पाठोपाठ एक प्रशस्त मोटरही गेली. मोटरमधील लोक अद्ययावत थाटाचे दिसत होते. रिंग चालवीत चालवीत एक मूलही रस्त्याने जाऊ लागले. एका ओझेवालीने किंचित थांबून आपल्या डोक्यावरचे जड ओझे नीटनेटके केले व दमल्या पायांनी ती आपला मार्ग चालू लागली. सायकलवरून जाणाऱ्या एका मुलाने कुणालासा नमस्कार केला आणि तो घाईघाईने घराच्या वाटेला लागला. बऱ्याच स्त्रिया त्या रस्त्याने चालल्या होत्या. एका माणसाने वाटेत किंचित थांबून आपली सिगरेट पेटवली व काडी पाण्यात फेकून इकडेतिकडे नजर फेकीत तो चालू लागला.

पण यांच्यापैकी कुणीही जलप्रवाहात प्रतिबिंबित झालेल्या मोहक संध्यारंगाकडे किंवा आकाशाच्या पार्श्वभूमीवर खुलून दिसणाऱ्या वृक्षांच्या रेखीव, काळसर आकृतींकडे ढुंकूनही पाहिले नाही. इतक्यात एका बालकाला कडेवर घेऊन एक मुलगी आली. बाळाचे मन रिझविण्यासाठी, ती त्या काळवंडत जाणाऱ्या जल-प्रवाहाकडे बोट दाखवून काहीतरी सांगू लागली. घराघरांत आता दिवे दिसू लागले होते आणि आकाशसागराचा दीर्घ प्रवास करण्यासाठी संध्यातारक नुकताच क्षितिजावर उगवला होता.

आपल्या जाणिवेत क्वचित येणारे असेही एक आगळेच दुःख असते. आपल्या आंतरिक संघर्षाची व संभ्रांततेची पीडा व वेदना आपल्या पूर्ण परिचयाची असते. आपल्या विकलतेच्या व व्यर्थतेच्या दुःखाचाही आपल्याला पुरेपूर परिचय असतो. सौख्याची परिपूर्णता व क्षणभंगुरता हीही आपल्याला पूर्णपणे अवगत असतात. स्वतःच्या सर्व दुःखाशी आपण पूर्ण परिचित असतो. पण दुसऱ्याच्या दुःखाची मात्र आपल्याला जाणीव नसते. आपल्या स्वतःच्या सगळ्या अडचणी व आपल्या जीवना-तील दुर्दैवी घटना यांच्यामुळे आपण पूर्णपणे घेरले गेलो असतो. मग आपल्याला दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव होणार तरी कशी ? जेव्हा आपले स्वतःचे हृदय दमले थकलेले असते, निर्बुद्ध संवेदनशून्य होऊन गेलेले असते, तेव्हा दुसऱ्याचा थकवा आपल्याला कसा जाणवेल ? आपले दुःख आपल्याला इतके सीमित करून टाकीत असते; इतरांपासून ते आपल्याला इतके तोडून टाकीत असते; इतके काही खंडित करून टाकीत असते ! आपल्या मुखावर विलसणारे स्मित किती चटकन विलोपून जात असते ! सर्व गोष्टींचा शेवट दुःखात – त्या अखेरच्या विभक्तपणात, पृथ-कत्वातच--होत असतो.

भेटण्यास आलेल्या स्त्रीने विज्ञानाच्या विविध शाखांचा व विविध धर्मांचा अभ्यास केलेला होता. आधुनिक मानसशास्त्राचेही तिने काळजीपूर्वक वाचन केलेले होते. विविध विषयांचा तिचा एकूण व्यासंग बराच होता. तिच्या ठायी कार्यक्षमता जशी होती, त्याचप्रमाणे बोलण्यात एक प्रकारची स्पष्टता होती. ती अजून वयाने बरीच तरुण असली, तरी तिचा विवाह झालेला होता आणि वैवाहिक जीवनात जी सुखदुःखे सामान्यतः माणसांच्या वाट्याला येतात, तीही आपण अनुभवली आहेत अशी पुस्ती तिने लागलीच जोडली. सध्या तो काहीशी मोकळी झाली होती आणि ठराविक प्रकारच्या संस्कारबद्धतेच्या पलीकडे काही आहे काय, याचा शोध घेण्यास ती आतुर झाली होती. मनाच्या मर्यादांपलीकडे जाता येईल का याचाही शोध ती घेऊ पहात होती. सबोध मनाच्या पार, गतसंचिताच्या पार पलीकडे जाणे मनुष्याला शक्य आहे या गोष्टीचा जाणीव तिला आपल्या विविध विषयांच्या अभ्यासामधूनच झाली होती.

तिने येथे बरीच प्रवचने ऐकली होती व काही चर्चांनाही ती हजर राहिली होती. सर्व थोर गुरूंच्या शिकवणीमागे सत्याचा जो मूलस्रोत असतो, तो आजही जिवंत व क्रियाशील असल्यासारखे आपणांस वाटू लागले आहे, असा आपला विश्वास तिने बोलून दाखवला. आपण सर्व प्रवचने अवधानपूर्वक श्रवण केली व आपणांस त्यातील आशयाचे आकलन झाले आहे आणि आता आपण कालसमस्येबद्दल व त्या अक्षय, अनंतावद्दल चर्चा करण्यास आलो आहोत, असे तिने सांगितले.

लागलीच तिने प्रश्न केला, " मला हे विचारावयाचे आहे की, मनाच्या कक्षेत न येणाऱ्या त्या विशिष्ट अवस्थेचा, त्या कालातीताचा मूलस्रोत कोणता आहे ? ज्या सर्जनशक्तीबद्दल, ज्या कालातीतावद्दल आपण वारंवार सांगता ते आहे तरी काय ? "

पण कालातीताचे आकलन होणे शक्य आहे का ? कालातीताचे आकलन झाल्याचे, ते आपल्या जाणिवेत आले असल्याचे खात्रीलायक चिन्ह कोणते असू शकेल ? त्याची आपल्याला ओळख कशी पटेल ? कशाने आपण ते मोजणार किंवा मापणार ?

" मला वाटते की त्याच्या परिणामांवरूनच आपणांस ते ठरवता येईल, त्यासंबंधीचा निर्णय करता येईल. "

पण निर्णय करण्याची क्रिया तर कालाच्या कक्षेतीलच आहे. आणि कालाच्या मापाने का आपण त्या कालतीताच्या परिणामांचा निर्णय करणार ? कालाचा आपण काय अर्थ करतो, याचे जर आपल्याला यथार्थ आकलन होऊ शकले, तरच ते कालातीत अवतरणे कदाचित शक्य होईल. पण कालातीत म्हणजे काय याची

चर्चा करणे हे केव्हा तरी शक्य होईल का ? समजा, आपणा दोघांनाही त्याची जाणीव झालेली असली, तरी त्यासंबंधी आपल्याला काही बोलता येईल का ? आणि समजा आपण त्यासंबंधी काही बोललो, तरीही आपल्या बोलण्यात व्यक्त झालेला हा अनुभव, त्या कालातीताचा खासच असणार नाही, कारण त्याच्या-संबंधी काही बोलावयाचे झाले किंवा व्यक्त करावयाचे झाले, तरी ते कालाच्याच माध्यमातून, कालाच्याच मापाने व्यक्त करता येईल. दुसऱ्या कोणत्याही माध्य-मातून कधीही व्यक्त करता येणार नाही. कालातीत हा शब्द म्हणजे कालातीत ही वस्तू नव्हे. म्हणून कालाच्या माध्यमातून कालातीताचे आकलन होणे कधीही शक्य नाही, ही गोष्ट स्पष्टच नाही का ? वस्तुतः, कालाचा जेव्हा संपूर्ण अभाव घडून येतो, तेव्हाच ती कालातीताची अवस्था अस्तित्वात येते. म्हणून काल म्हणजे काय याचाच आपण आता विचार करू या.

" पण काल तर वेगवेगळ्या प्रकारचा असतो. वाढ या अर्थाने जाणवणारा काल, अंतर या दृष्टीने जाणवणारा काल आणि गती या स्वरूपात जाणवणारा काल. "

काल जसा श्रेणीयुक्त किंवा प्राकृतिक स्वरूपाचा असतो, त्याचप्रमाणे तो मान-सिक स्वरूपाचाही असतो, वाढ या स्वरूपात असणारा काल म्हणजे लहानाची मोठ्यात वाढ होणे. बैलगाडीच्या युगाचे जेट विमानाच्या युगात परिवर्तन होणे, बालकाचे प्रौढात रूपांतर होणे या स्वरूपाचा काल. वाढीच्या वा विकासाच्या विविध प्रकारांनी आकाश जसे भरून गेले आहे, त्याचप्रमाणे ही वसुंधराही परिपूर्ण आहे ही तर स्पष्ट वस्तुस्थिती आहे. तेव्हा ती नाकारणे मूर्खपणाचेच ठरेल. अंतर या दृष्टीने कालाचे स्वरूप मात्र अधिक गुंतागुंतीचे आहे.

" या बाबतीत मला एका विशिष्ट प्रकाराबद्दल विचारावेसे वाटते. मनुष्य एकाच वेळी दोन भिन्नभिन्न स्थळी असू शकतो ही गोष्ट आता सर्वांना परिचित झालेली आहे म्हणजे एका स्थळी तो अनेक तास असतो व याच काळात तो दुसऱ्या स्थळीही काही मिनिटे असतो. "

होय, असे असू शकते. विचारक एकाच स्थळी असला, तरी त्याचा विचार बराच दूरवर जाऊ शकतो, ही गोष्ट आता माहीत झालेली आहे.

" पण मी काही त्या प्रकारच्या अवस्थेबद्दल म्हटले नाही. मला दुसरीच अवस्था अभिप्रेत आहे. एक व्यक्ती एकाच वेळी, अगदी दूर अंतरावरील दोन ठिकाणी असू शकते, हा जो प्रकार आहे त्याबद्दल मी सांगत होते. बाकी सध्या आपल्या-पुढील प्रश्न हा काळासंबंधीचाच आहे. "

होय. भूतकालाचे वर्तमानाच्या मार्गाने भविष्याकडे जात राहणे किंवा कालचे आजच्या मार्गाने उद्याकडे जात राहणे, हा कालाचा एकसंघ असा व्यापार आहे,

ते तीन भिन्नभिन्न व्यापार नाहीत. आपल्याला काल जाणवतो तो श्रेणीयुक्त प्राकृतिक काल आणि मानसिक काल या द्विविध रूपात जाणवतो. वाढीच्या रूपातील काल हा प्राकृतिक काल आणि विशेष कुणीतरी होत राहण्याच्या रूपातील काल हा मानसिक काल. बीजाचे वृक्षात परिवर्तन होणे हा वाढीच्या रूपातील काल आहे. आणि मानसिक दृष्ट्या कुणीतरी विशेष होत राहणे हा मानसिक रूपातील काल आहे. वाढीची प्रक्रिया अगदी स्पष्ट दिसू शकते. तेव्हा ती आपण क्षणभर बाजूला सारू या आणि दुसऱ्या प्रकारचा विचार करू या. मानसिक दृष्ट्या कुणीतरी विशेष होत जाण्याची जी प्रक्रिया आहे, तिच्यात काल अंतर्भूत असतो. आज मी 'असा' आहे. पण कालाच्या माध्यमातून, कालाच्या मार्गाने जातजात उद्या मी 'तसा' होईन. जे 'होते' त्याचे 'जे होणार आहे' त्याच्यात परिवर्तन होईल. ही जी मानसिक प्रक्रिया आहे, ती आपल्या पूर्ण परिचयाची आहे. वस्तुतः विचार हाच काल आहे. जे होऊन गेले त्याचा विचार आणि जे होणार आहे त्याचा विचार; जे वास्तव आहे त्याचा विचार आणि जो भविष्यातील आदर्श आहे त्याचा विचार, विचार हा कालाचा परिपाक असतो. विचारप्रक्रियेवाचून मानसिक कालाचे अस्तित्वच संभवू शकत नाही. मन किंवा विचार हाच कालाचा कारक आहे. मन हाच काल आहे.

" हे तर उघड सत्य आहे. मन हाच कालाचा कारक आहे. व मन हेच कालाचा उपयोग करणारेही आहे. मनोव्यापारांवाचून कालाला अस्तित्वच नाही. पण या मनाच्या पलीकडे जाणे मनुष्याला शक्य आहे का ? जेथे विचार नाही अशी एखादी अवस्था आहे का ?"

अशी अवस्था आहे किंवा नाही याचा आपण दोघे मिळूनच शोध घेऊ या. प्रीती म्हणजे विचार आहे का ? ज्याच्यावर आपली प्रीती असते, त्याचा विचार आपल्या मनात डोकावतो, तो जर दूर असला, तर आपण त्याचा विचार करतो. किंवा त्याचे चित्र आपण जवळ बाळगतो. पण येथे हे लक्षात घ्या की, त्याचा वियोग झाल्यामुळेच विचार उद्भवतो.

" म्हणजे परस्परांवर प्रीती असणाऱ्या दोघांत एकात्मता असली की, विचाराचा अभाव घडून येतो आणि नुसती प्रीतीच शिल्लक राहते, असा का आपल्या म्हणण्याचा अर्थ आहे ?"

हे पहा एकात्मता म्हटली की तिच्यात द्वैताचा अंतर्भाव झालाच. तो काही सध्या आपल्यापुढील प्रश्न नाही. प्रीती ही विचारप्रक्रिया आहे का ? विचार हा तर कालकक्षेतीलच असतो. पण प्रीती देखील कालबद्ध असते का ? विचार हाच कालबद्ध आहे. आणि तुम्ही विचारता की, कालाच्या बंधनापासून मुक्त होणे शक्य आहे की नाही ?

"पण हे शक्य असलेच पाहिजे. नाहीतर नवसर्जन कसे होऊ शकेल? सातत्याची प्रक्रिया जेव्हा संपते, तेव्हाच तर सर्जन संभवते. सर्जन म्हणजेच ते नूतन ते नवदर्शन, तो नवा शोध, ती नवी रचना; जुन्याचे सातत्य नव्हे."

होय. सातत्य म्हणजे सर्जनाचा मृत्यू.

"पण या सातत्याचा अंत कसा घडवून आणता येईल?"

सातत्याचा आपण काय बरे अर्थ करीत असतो? कशामुळे सातत्य चालू राहत असते? माळेतील मण्यांना एकत्र गुंफणाऱ्या दोऱ्याप्रमाणे क्षणाक्षणांना जोडीत राहणारे सूत्र कोणते असते? वस्तुतः प्रत्येक क्षण नवाच असतो. पण ते जुने या नव्याला आपल्यामध्ये सामावून घेत राहते, आणि अशा रीतीने सातत्यशृंखला घडली जात असते.

नवे म्हणून जे जाणवत असते, ते कधी तरी निखळ नवे असते का बरे? की या नव्याची ओळख ते जुनेच करून देत राहते? आणि जुन्याला जर नव्याची ओळख पटत असेल, तर ते खरेखुरे नवे असेल का? वस्तुस्थिती अशी आहे की जे जुने असते, त्याला स्वतःच प्रक्षेपित केलेल्या विकल्पनांचीच काय ती ओळख पटू शकते. या विकल्पनाला ते नवे हे नाव खुशाल देवो, पण ते नवे मुळीच नसते. वस्तुतः जे निखळ नवे असते, त्याची ओळख पटणे शक्यच नसते. नवे ही ओळख न पटण्याची अवस्था असते. त्या अवस्थेत कसलीही स्मृतिसंलग्नता नसते. याच्या उलट जे जुने असते, ते स्वतःच्या विक्षेपित विकल्पनांच्या द्वारा स्वतःला सातत्य मिळवून देत राहते. नवे त्याला कधीच ओळखता येणे शक्य नसते. जे नवे असते, त्याचा कदाचित जुन्यामध्ये अनुवाद केलाही जाईल. परंतु निखळ नवे व जुने ही दोन्ही एकत्र राहणे हे मात्र कधीही शक्य नसते. नवे अनुभविणे म्हणजेच जुन्याचा संपूर्ण अभाव घडून येणे होय. पण नव्याचा अनुभव व या अनुभवाची अभिव्यक्ती म्हणजेच विचार वा कल्पना. विचार हाच नेहमी जुन्याच्या भाषेत नव्याचा अनुवाद करीत राहतो. जे जुने असते, तेच सातत्य चालू ठेवीत असते; जुने म्हणजेच स्मृती; जुने म्हणजेच शब्द; आणि स्मृती व शब्द म्हणजेच काल.

"पण मग स्मृतीचा अंत कसा घडवून आणता येईल?"

कसा घडवून आणता येईल? हे पहा, स्मृतीचा अंत घडवून आणण्याची अभिलाषा धरणारा जो अहं आहे, तोच तर स्मृतिशृंखला घडवीत असतो. तो स्मृतीहून भिन्न नसतोच. अशीच वस्तुस्थिती नाही का?

"होय. हा प्रयत्न करणारा अहं स्मृतीने व विचाराने घडविलेलाच असतो. आणि विचार हा नेहमी सबोध वा अबोध स्वरूपाच्या गतानुभवाचाच परिपाक असतो. पण वस्तुस्थिती जर अशीच आहे, तर माणसाने करावे तरी काय?"

हे पहा, तुम्ही नुसते शांतपणे श्रवण करीत रहा. म्हणजे जे करणे अवश्य आहे, ते

तुम्ही सहजपणे, प्रयत्नशून्यपणे करू लागाल. अभिलाषा म्हणजेच विचार. अभिलाषाच स्मृतींची साखळी घडवीत राहते. अभिलाषा म्हणजेच प्रयत्न; इच्छाशक्तीच्या साह्याने करण्यात येणारे कर्म. सतत संग्रह करीत राहणे हीच अभिलाषेची रीत असते. आणि संग्रह करीत राहणे म्हणजेच सातत्य चालू ठेवणे. संग्रह करीत राहणे—मग हा संग्रह अनुभवांचा असो, ज्ञानाचा असो, सत्तेचा असो की भौतिक वस्तूंचा असो—म्हणजेच सातत्य चालू ठेवणे होय. आणि या सर्व गोष्टींचा त्याग करणे म्हणजेही अकरणात्मक दृष्टीचे सातत्य चालू ठेवणेच होय. भावात्मक स्वरूपाचे सातत्य असो, की, अभावात्मक स्वरूपाचे असो दोन्हीही वस्तुतः एकसारखीच असतात. अभिलाषा म्हणजेच सर्व प्रकारचा संग्रह करणारे हे केन्द्र. मग ही अभिलाषा काही अधिक मिळविण्याची असो की काही उणे करण्याची असो. हे अभिलाषारूप केंद्र म्हणजेच अहं किंवा स्व. हा अहं आपल्या भिन्न भिन्न संस्कारबद्धतेनुसार वेगवेगळ्या स्तरांवर वास करीत असतो. या केंद्राचा जो जो व्यापार होत राहतो, तो तो स्वतःचे सातत्य वाढविण्यासच कारणीभूत होत असतो. कुठलाही मनोव्यापार हा नेहमी कालबद्धच असतो. तो नवसर्जनाला सदैव प्रतिबंध करीत राहतो. स्मृतींची ही कालबद्ध होऊन बसण्याची प्रकृती असल्यामुळे ते कालातीत तिच्या बरोबर राहणे कधीच शक्य नसते. ते कालातीत, ते अमित, ते अमर्याद, स्मृतीच्या किंवा अनुभवाच्या मापाने कधीच मोजता मापता येत नसते. जेव्हा सर्व ज्ञानाचा, सगळ्या अनुभवांचा संपूर्ण अभाव घडून येतो, तेव्हाच ते नामातीत तेथे प्रकटते. मनाची स्वतःच्याच बंधनातून मुक्तता करण्यास केवळ सत्यच समर्थ असते.

कुटुंब आणि सुरक्षणाची अभिलाषा

संतुष्टतेची अवस्था ही किती हिणकस अवस्था असते. समाधान ही वस्तू वेगळी आणि संतुष्टता, तृप्तता ही अगदीच वेगळी वस्तू असते. संतुष्टता किंवा तृप्तता ही मनाला निर्बुद्ध, संवेदनशून्य बनवून टाकते. आणि हृदयाला श्रांत क्लांत बनवून टाकते. ती माणसाला अंधश्रद्धेकडे, जडतेकडेच ओढून नेते. आणि मग त्याची संवेदनक्षमतेची धार अगदी बोथट होऊन जाते. समाजात गोंधळ, दुःख व पीडा ही कोण उत्पन्न करीत असतात? अभिलाषापूर्तीच्या मागे लागणारे लोकच हे निर्माण करीत असतात. हेच लोक घाणेरणे खेडे व गोंगाटाने भरलेले शहर यांची निर्मिती करीत असतात. हेच लोक मूर्तींच्या प्रतिष्ठापनेसाठी देवळे बांधीत असतात आणि मनाला संतोष देणारे पूजाचंनादी विधी करीत असतात. सर्व भेद व महायुद्धे याच लोकांकडून पोसली जात असतात. हेच लोक तृष्णापूर्तीची विविध साधने सतत वाढवीत राहतात. आणि हे सारे घडवून आणण्यासाठी ते पैशाचा, राजकारणाचा, सत्तेचा किंवा धार्मिक संघटनांचा उपयोग करून घेत राहतात. अशा लोकांची हीच साधने असतात. आपल्या पोकळ प्रतिष्ठितपणाच्या व त्यातून उद्‌भवणाऱ्या आकांक्षांच्या जड भारामुळे हेच लोक पृथ्वीला भारभूत होत असतात.

समाधान ही वस्तू मात्र सर्वस्वी आगळी असते. समाधानी असणे हे अतिशय कठीण असते. कारण समाधान कुठल्यातरी गुप्त स्थानी शोधून सापडण्यासारखे नसते. सुखाच्या जसे पाठीमागे लागता येते, तसे समाधानाच्या पाठीमागे लागणे कधीही शक्य नसते. समाधान हे प्रयत्नांनी संपादन करता येण्यासारखे नसते. स्वार्थत्यागाचे मोल देऊनही ते विकत घेता येत नसते. त्याला कोणतेच मूल्य नसते. कोणत्याही साधनाने त्याच्याप्रत पोचणे शक्य नसते. ध्यानानेही ते साध्य होत नसते. आणि त्याचा संचयही केला जाऊ शकत नसतो. म्हणून समाधानाचा पाठलाग करणे हे अभिलाषापूर्तीचा पाठलाग करणेच असते.

वस्तुतः समाधान म्हणजे जे वर्तमान वास्तव आहे, त्याचे क्षणाक्षणाला होत राहणारे यथार्थ आकलन. अभावात्मक आकलनाचे ते सर्वोच्च स्वरूप होय. अभिलाषापूर्तीमध्ये सफलता व विफलता ही दोन्हीही वसत असतात. पण अशा प्रकारचा परस्परविरुद्धांचा पोकळ संघर्ष समाधानाच्या ठायी कधीच नसतो. समाधान हे अशा परस्परविरुद्धांच्या पार असते. तो परस्पर विरुद्धांचा समन्वय कधीच नसतो. कारण त्याचा या परस्पर विरुद्धांशी किंवा संघर्षांशी मुळीच संबंध नसतो. संघर्षांमधून अधिकाधिक संघर्षच काय तो निर्माण होत राहतो. त्याच्यामधून भ्रम

व दुःख यांचीच काय ती उत्पत्ती होत राहते. पण समाधानी अवस्थेमध्ये जी कृती घडते, तिच्यात परस्परविरोध नसतो. आपल्या संभ्रमितेच्या व विचलितेच्या व्यापारांपासून मनाची मुक्तता करण्यास हृदयाचे समाधानच काय ते समर्थ असते. समावानाचा व्यापार कालातीत स्वरूपाचा असतो.

भेटीस आलेली स्त्री स्वतःचा परिचय करून देत होती : 'आपण एम. एस्सी.ची पदवी प्राप्त केलेली आहे. काही काळ अध्यापन कार्य व काही काळ समाजकार्य केले आहे. पदवी मिळाल्यानंतर काही काळ आपण वेगवेगळ्या कार्यांसाठी देश भर प्रवास केला होता. कुठे गणित शिकवण्याचे काम, कुठे थोडेसे समाजकार्य व थोडी घरकामात मदत तर एका संस्थेच्या संघटनाकार्यात मदत अशा प्रकारचे विविध कार्य आपण करीत आलो आहोत. राजकारणाच्या क्षेत्रात मात्र आपण कधीही पाऊल टाकले नाही. कारण त्या क्षेत्रातील काम म्हणजे व्यक्तिगत महत्त्वाकांक्षेचा पाठलाग व काळाचा अपव्ययच असतो असे आपले मत आहे. या क्षेत्रातील कामाच्या व्यर्थतेची आपणांस जाणीव होऊन चुकली आहे. आता आपण लवकरच विवाह करणार आहोत ?'

विवाह कुणाशी करावयाचा हे तुम्ही ठरवले आहे का ? की तुमचे आईवडील तो जुळविणार आहेत ?

" बहुधा माझे आईवडील ठरवतील. मला तर वाटते की हीच पद्धत अधिक चांगली आहे. "

तुम्हाला असे का वाटते हे विचारू का ?

" इतर देशात तरुण-तरुणी परस्परांच्या प्रेमपाशात सापडल्यावर विवाह करतात. प्रारंभी सारे काही सुरळीत चालतही असेल. पण लवकरच परस्परांत मतभेद सुरू होऊन दुःख उत्पन्न होऊ लागते. परपस्परांत कलह होत राहतो व मिटवलाही जातो. सुखोपभोगांचा कंटाळवाणेपणा व जीवनक्रमाचा तांत्रिक साचा, हीच लवकर त्यांच्या वाट्याला येतात. बाकी या देशात जुळविल्या जाणाऱ्या विवाहांचीही परिणती अशीच होत असते. त्यातील मौज लवकरच नाहीशी होते. तेव्हा इतर देशातील विवाह पद्धतींपैकी कोणतीही अधिक चांगली असे कुणाच्याही बाबतीत म्हणता येणार नाही. दोन्हीही पद्धती परिणामी भयानकच असतात. पण माणसाने करावे तरी काय ? लग्न करणे हे तर आवश्यकच असते. आयुष्यभर एकटीनेच कसे राहावयाचे ? हा सारा प्रकार दुःखदायक आहे खरा. पण विवाह केल्यास पतीकडून एक प्रकारची सुरक्षितता मिळत असते. आणि मुले हे तर आनंद निधानच असते. आणि पहिल्यावाचून दुसरे मिळणे शक्य नसते. "

पण उच्च शिक्षण प्राप्त करण्यासाठी तुम्ही जी इतकी वर्षे खर्च केली, त्यांचे काय होईल ?

" त्या सगळ्या ज्ञानाशी मला थोडा खेळ खेळता येईल, असे वाटते, पण विवाहानंतरचा बहुतेक वेळ घरकामात व मुलांच्या लालनपालनातच जाईल हे निश्चित."

पण मग तुमच्या तथाकथित शिक्षणाचा तुम्हांला काय बरे फायदा झाला ? अखेर स्वयंपाकघरातच जाऊन जर दडावयाचे होते, तर इतका वेळ, पैसा व श्रम शिक्षण संपादनात का खर्च केलेत ? विवाहानंतर थोडे अध्यापनकार्य किंवा समाजकार्य करावे, असे नाही का तुम्हांला वाटत ?

" वेळ मिळेल तेव्हा करावेसे वाटेल खरे. पण विवाहनंतर आर्थिक दृष्टचा जर विशेष सुस्थिती लाभली नाही, तर नोकर ठेवणे परवडणार नाही. मला तर वाटू लागले आहे की, लग्नानंतर माझे सध्याचे संपूर्ण जीवन नामशेष होऊन जाईल. पण मला तर लग्न करावयाचेच आहे. आपण लग्न करण्याच्या विरुद्ध आहात का ?"

कुटुंब निर्माण करण्यास आवश्यक अशी संस्था असे का तुमच्या दृष्टीने विवाहाचे स्वरूप आहे ? कुटुंब हा घटक नेहमी समाजविरोधीच नसतो का ? जीवनातील सर्व प्रकारच्या कृतींना चालना देणारे केंद्र, हेच कुटुंबाचे स्वरूप नसते का ? इतर सर्व प्रकारच्या संबंधावर आधिपत्य गाजविणारा असा विभक्त व संकुचित स्वरूपाचाच तो संबंध नसतो का ? कुटुंबसंस्था ही स्वतःभोवती विभक्तपणाच्या, पृथकत्वाच्या तटबंदी उभारीत नसते का ? आणि अशा या स्वतःला संकुचित बनवून टाकणाऱ्या कुटुंबामुळेच उच्चनीचत्वाचे भेद, सबलदुर्बलत्वाचे भेद इत्यादी सर्व भेद निर्माण होत नसतात का ? कुटुंबसंस्था ही स्वतःखेरीज इतर सर्व जगाचा सदैव प्रतिकारच करीत नसते का ? प्रत्येक कुटुंब हे इतर कुटुंबांचा व इतर संघटित समूहांचा नेहमी विरोधच करीत नसते का ? कुटुंब व कौटुंबिक मालमत्ता हे युद्धाच्या अनेक कारणांपैकी एक कारण नसते का ?

" आपण जर कुटुंबाच्या विरुद्ध असाल, तर स्त्रीपुरुषसंबंधाच्या सामुहिकीकरणाचे आपण पुरस्कर्ते असाल असे वाटते. अशा व्यवस्थेत समूहामध्ये जन्माला येणारी मुले शासनाच्या मालकीची असतात."

हे पहा, अशी उडी घेऊन एकदम कुठल्याही निष्कर्षावर येऊ नका. कुठल्याही विशिष्ट पद्धतीच्या, साच्याच्या किंवा सूत्राच्या आधाराने विचार करू लागल्यास विरोध, प्रतिकार व वाद हेच काय ते उत्पन्न होत असतात. कारण एकाची एक पद्धती असते, तर दुसऱ्याची दुसरी. या उभयतांमध्ये मग कलह व युद्ध सुरू होते आणि प्रत्येक दुसऱ्याचा संपूर्ण नायनाट करण्याचा प्रयत्न करू लागतो. पण या सर्व प्रकाराच्या मुळाशी जी समस्या असते ती मात्र तशीच कायम राहते.

" पण आपण जर कुटुंबसंस्थेच्या विरुद्ध असाल तर आपण पुरस्कर्ते तरी कशाचे आहात ?"

तुम्ही आपला प्रश्न या विशिष्ट स्वरूपात का बरे मांडता ? आपल्या समोर जर

एखादी समस्या उभी असेल तर आपापल्या पूर्वग्रहानुसार एखादी विशिष्ट बाजू घेऊन भांडत बसणे, हे मूर्खपणाचेच होणार नाही का ? अशा प्रकारे विरोध व वैर यांची बीजे पेरून समस्या सारख्या वाढवीत बसण्यापेक्षा, समस्येचे वास्तव स्वरूप काय आहे हे समजून घेणेच अधिक चांगले नाही का ?

कुटुंब हे सध्या ज्या स्वरूपात अस्तित्वात आहे त्या स्वरूपात तो एक अतिशय मर्यादित नातेसंबंधांचा स्वपरिवेष्टित व पृथक, विभक्त असाच घटक असत नाही का ? कुटुंबाभिमानाची ही जी संकुचित भावना असते, नाना प्रकारच्या समाज-विरोधी कृतींना पोसणारी ही जी भावना असते, ती नाहीशी करून टाकण्यासाठी सुधारकांनी व तथाकथित क्रांतिकारकांनी आजवर थोडे का प्रयत्न केले ? पण माणसांना असुरक्षिततेचे भय सदैव वाटत राहिल्यामुळे सुरक्षिततेच्या खुंटाला चिकटून वसणारी व असुरक्षितेला विरोध करणारी, असे स्वरूप कुटुंबसंस्थेला प्राप्त होऊन वसले आहे आणि ते तसेच कायम राहिले आहे. आज जगभर सगळीकडे जी समाजव्यवस्था आढळून येते तिला जर या स्थाणुवत सुरक्षिततेचा आधार मिळाला नाही, तर ती तत्काळ कोलमडून पडेल. कुटुंब हा काही समाजव्यवस्थेचा केवळ आर्थिक घटक नव्हे. म्हणून आर्थिक पातळीवरून या प्रश्नाची सोडवणूक करणारा प्रयत्न असफलच होणार ही गोष्ट उघड आहे. सुरक्षिततेची अभिलाषा ही केवळ आर्थिक स्वरूपाची अशी कधीच नसते तर त्याहून ती कितीतरी अधिक गहन व गुंतागुंतीच्या स्वरूपाची असते. कुटुंब जर नाहीसे केले गेले, तर मनुष्य सुरक्षिततेची वेगळी साधने शोधीत राहील. शासनसंस्थेमधून, समूहामधून किंवा विविध निष्ठांमधून तो सुरक्षितता मिळवू पाहील आणि मग सुरक्षिततेच्या या विविध साधनांमधून नव्या समस्या उत्पन्न होत राहतील.

म्हणून मनुष्यात ही जी आंतरिक, मानसिक सुरक्षिततेची अभिलाषा वसत असते तिचे आपण आकलन करून घेतले पाहिजे. सुरक्षिततेचा एक प्रबंध मोडून टाकून त्याच्या जागी दुसऱ्या प्रबंधाची प्रतिष्ठापना करण्याचा काहीही उपयोग होणार नाही. तेव्हा खरी समस्या कुटुंबाविषयीची नसून माणसाला जी सुरक्षिततेची आसक्ती वाटत असते, तिच्या विषयीची आहे. सुरक्षिततेची ही आसक्ती कोणत्याही पातळीवरची असली, तरी ती नेहमीच स्वपरिवेष्टित व स्वतःला इतरांपासून तोडून टाकणारी अशीच असते. ही जी विभक्ततेची भावना असते, तीच कुटुंबाच्या, मालमत्तेच्या, शासनसंस्थेच्या, धर्माच्या किंवा अशाच प्रकारच्या अनेक माध्यमांतून व्यक्त होत असते. आंतरिक सुरक्षिततेच्या या आसक्तीमुळेच मनुष्य आपल्याभोवती बाह्य सुरक्षिततेच्या तटबंदी उभारीत असतो, होय की नाही ? या तटबंदी नेहमीच विभक्तपणाच्या, पृथकत्वाच्या स्वरूपाच्या नसतात का ?

वस्तुतः सुरक्षिततेची अभिलाषा हीच सुरक्षिततेचा नाश करून टाकीत असते.

सुरक्षिततेसाठी उत्पन्न केला जाणारा हा विभक्तपणा, हा पृथकपणा मनुष्याच्या ऱ्हासाला व विघटनालाच अपरिहार्यपणे कारणीभूत होत असतो. मानवाच्या या विघटनाची लक्षणे म्हणजेच राष्ट्रीयत्वाची भावना, वर्गसंघर्ष व युद्धे ही होत. सारांश काय, तर मानसिक सुरक्षिततेचे साधन बनणारे हे कुटुंब, हाच सामाजिक विनाशाचा व दुरवस्थेचा मूल स्रोत होऊन बसला आहे.

" पण कुटुंबाचा एक घटक या नात्याने जर माणसाने जगावयाचे नसेल, तर त्याने जीवन जगावयाचे तरी कशा प्रकारे ? "

मानवी मन हे नेहमी वर्तताना एखादा साचा किंवा प्रबंधच कसे बरे सदैव शोधीत असते ! आमचे सगळे शिक्षण ठराविक सूत्रांच्या व निश्चित निष्कर्षांच्या स्वरूपातच दिले जात असते. आताच तुम्ही ' कसे जगावयाचे ' असा प्रश्न विचारलात. पण कसे हे विचारणे म्हणजे वर्तनाचा ठराविक साचा किंवा प्रबंध दुसऱ्या कुणीतरी आपल्याला दाखवावा, अशी मागणी करणेच होय. वस्तुस्थिती अशी आहे की, निश्चित स्वरूपाचे सिद्धान्त, सूत्रे वा प्रबंध केव्हाही, कोणतीही समस्या सोडवू शकत नसतात. कृपा करून या विधानातील सत्याचे यथार्थ आकलन करून घ्या. मनुष्य जेव्हा आंतरिक सुरक्षिततेच्या मागे लागणे सोडून देतो, तेव्हाच त्याला बाह्यतः सुरक्षित जीवन जगता येते. कुटुंब हे जोवर मानसिक सुरक्षिततेचे केंद्र बनून राहील, तोवर सामाजिक विघटन सतत होतच राहील. आत्मरक्षणाचे एक साधन या दृष्टीने जोपर्यंत कुटुंबाचा उपयोग केला जाईल, तोपर्यंत संघर्ष व दुःख ही माजतच राहतील — हे ऐकून एवढ्या विस्मयचकित होऊ नका. कारण हे सारे अगदी सरळ व स्पष्ट आहे. मनुष्य जोवर आपल्या मानसिक सुरक्षिततेसाठी दुसऱ्याचा साधन म्हणून उपयोग करीत राहील तोवर तो विभक्त व पृथक असाच राहील. कारण अशा प्रकारच्या सर्व संबंधांमध्ये अहंलाच सर्वंकष महत्त्व असते. अहंलाच काय ती अन्वर्थकता, सार्थता असते. ' माझे ' कुटुंब, ' माझी ' मालमत्ता अशीच येथे भावना असते. परस्परांचा उपयोग करून घेत राहण्याचा हा जो कौटुंबिक संबंध असतो तो हिंसात्मकतेवरच आधारलेला असतो. परस्परांच्या स्वरक्षणाचे साधन या दृष्टीने कुटुंबाचा उपयोग करीत राहणे म्हणजे संघर्ष व संभ्रम यांच्या भयानक गर्तेत स्वतःला लोटून देणे होय.

" आपण काय सांगता ते माझ्या बुद्धीला आकळते खरे. पण या आंतरिक सुरक्षिततेच्या अभिलाषेवाचून माणसाला जीवन कंठणे शक्य आहे का हे मात्र कळत नाही "

हे पहा, बुद्धीने आकलन होणे म्हणजे आकलन न होणेच होय. तुम्ही शब्द ऐकले व तुम्हाला त्यांचा अर्थ समजला, एवढाच तुमच्या म्हणण्याचा अर्थ दिसतो. पण यामुळे तुमच्या हातून योग्य कृती काही घडणार नाही. आत्मसंतोषासाठी व आत्म-

रक्षणासाठी दुसऱ्याचा उपयोग करणे म्हणजे प्रीती अर्थातच नव्हे, हे ध्यानात असू द्या. प्रीती म्हणजे सुरक्षितता मुळीच नव्हे, जेथे सुरक्षिततेची अभिलाषा नाही अशी अवस्था म्हणजे प्रीती. ती आघातसुलभ ,अशी अवस्था असते. जेथे विभक्तता, वैरभाव व द्वेष नाही अशी अवस्था म्हणजे प्रीती. या अवस्थेत कुटुंब आकारास येऊ शकेल. पण मग ते इतरांपासून विभक्त, पृथक असणार नाही.

" पण अशा प्रकारची प्रीती तर आम्हांला मुळीच परिचित नसते. मग ... "

आपले विचार कशा प्रकारे चालत आहेत याची जाणीव होणे, हे चांगले लक्षण आहे. आंतरिक सुरक्षिततेची अभिलाषा ही वाह्यत: विभक्ततेच्या, हिंसेच्या रूपाने प्रकट होत असते. म्हणून जोवर या अभिलाषेच्या समग्र प्रक्रियेचे पूर्ण आकलन होणार नाही, तोवर प्रीती उदयास येणे शक्य नाही. सुरक्षिततेसाठी चालणाऱ्या शोधाच्या मार्गातील एक आसऱ्याचे स्थान असे काही प्रीतीचे स्वरूप नसते. प्रीतीचा उदय होण्यासाठी सुरक्षिततेची अभिलाषा ही पूर्णपणे नाहीशी झाली पाहिजे.

प्रीती ही काही जबरदस्ती करून अस्तित्वात आणण्यासारखी वस्तू नव्हे. कोणत्याही पातळीवर कोणत्याही स्वरूपात जबरदस्ती करणे, म्हणजे प्रीती नाकारणेच होय. क्रांतीचेही असेच असते. विशिष्ट विचारप्रणालीच्या आधारावर जो क्रांती घडवून आणू पाहतो, तो क्रांतिकारक मुळीच नसतो. सुरक्षिततेच्या जुन्या प्रकारांच्या जागी, एका नव्या प्रकारच्या सुरक्षिततेची प्रतिष्ठापना करण्याचे तो केवळ आश्वासन देत असतो. एक नवी आशा दाखवीत असतो. पण आशा म्हणजे मृत्यू होय.

मानवी नात्यांमध्ये वा संबंधांमध्ये मूलभूत स्वरूपाची क्रांती किंवा परिवर्तन घडवून आणणे, हे केवळ एकट्या प्रीतीलाच शक्य असते. आणि प्रीती ही मनाच्या कक्षेतील कधीही नसते. विचाराने मनुष्य आशेच्या भव्य इमारती उभ्या करू शकेल पण विचाराचे पर्यवसान हे अखेर अधिक संघर्षात, दु:खात व संभ्रमातच होत असते. म्हणून आपले विचार, आपले हे आत्मसंकोचक लबाड मन जेव्हा अस्तित्वशून्य होते, तेव्हाच प्रीती अवतरते.

अहं

भेटण्यास आलेला गृहस्थ सांगत होता, " माझ्या दृष्टीने ध्यानालाच सर्वश्रेष्ठ महत्त्व आहे. गेली पंचवीस वर्षे मी नियमितपणे दिवसातून दोनदा ध्यान करीत आलो आहे. सुरुवातीला मला हे अतिशय अवघड वाटले. माझ्या विचारांवर मला ताबा मिळविता येत नसे. अनेक गोष्टी माझे मन विचलित करून टाकीत. पण हळूहळू मला बेचैन करणाऱ्या गोष्टी मी वऱ्याच प्रमाणांत मनातून काढून टाकल्या. अंतिम साध्यासाठी मी अधिकाधिक शक्ती व अधिकाधिक वेळ खर्च करू लागलो. या अंतिम साध्यासाठी मी वेगवेगळ्या गुरूंकडे जाऊन आलो व ध्यानधारणेच्या वेगवेगळ्या साधना पार पाडल्या. पण त्यांच्यापैकी एकाही साधनेने मला संतोष मिळवून दिला नाही. -- कदाचित ' संतोष ' हा शब्द येथे वापरणे योग्य होणार नाही असे वाटते. या सगळ्या साधनांनी मला एका विशिष्ट बिंदूपर्यंत पोचविले. पण त्या त्या ठराविक परिणतीपर्यंतच आपण पोचलो आहोत, अंतिम लक्ष्य काही आपल्याला साध्य झाले नाही, असे मला दर वेळी आढळून आले. बाकी या सर्व प्रयोगांमुळे स्वतःच्या विचारांवर संपूर्ण ताबा मिळविण्यास मात्र मी शिकलो. आता माझ्या भावनाही माझ्या पूर्ण ताब्यात आल्या आहेत. शरीर व मन शांत, निःस्तब्ध करण्यासाठी मी दीर्घश्वसन करीत आलो आहे. मंत्राचा जप जसा मी दीर्घकाळ केलेला आहे, त्याचप्रमाणे दीर्घकालीन उपवासही मी केले आहेत. नैतिकदृष्ट्या निर्दोष राहिलो आहे आणि ऐहिक व सांसारिक गोष्टींचे आकर्षणही मला उरले नाही. पण आज इतकी वर्षे एवढे कष्ट व इतके प्रयत्न केल्यानंतर, कठोर साधनांमध्ये एवढा काळ घालविल्यानंतर आणि सर्वसंगपरित्याग केल्यानंतरही मला शांती काही गवसली नाही; थोर महात्मे ज्या परमानंदाचा उल्लेख करतात, तो परमानंद काही माझ्या अनुभवास आला नाही. क्वचित प्रसंगी त्या निगूढ आनंदाचे तेजःकिरण क्षणकाल माझ्यापर्यंत येऊन पोचले होते आणि याहूनही श्रेष्ठतर असे काही प्रत्ययाला येईल एवढे आश्वासन त्या क्षणात प्राप्त झाले होते. पण स्वतःच्या मनाचे भ्रमपटल आरपार भेदून पलीकडे जाणे हे काही मला शक्य होत नाही असे दिसते. या भ्रमपटलात मी पूर्णपणे अडकून गेलो आहे. निराशा व संभ्रम यांच्या काळ्याकुट्ट मेघांनी माझे चिदाकाश पूर्ण व्याप्त होत चालले आहे आणि माझे दुःख व माझी मनोवेदना ही सतत वाढतच चालली आहे. "

आम्ही एका विशालपात्र नदीच्या तीरावर पाण्याच्या जवळच वसलो होतो. नदीच्या वरच्या भागाला काही अंतरावर शहर वसले होते. पलीकडच्या तीरावर एक मुलगा मजेत गात होता. आमच्या मागच्या बाजूला सूर्य अस्ताला चालला होता.

सायंकाळ रम्य प्रशांत होती. नदीप्रवाहावर हळूहळू दाट सावल्या पडू लागल्या होत्या. पूर्वेकडे मेघांची गर्दी झाली होती. त्या गहनगंभीर नदीचा प्रवाह शांत, निःस्तब्ध दिसत होता. प्रवाहाला गतीच नसल्यासारखे वाटत होते. पण या साऱ्या विशाल निसर्गसौंदर्याला तो गृहस्थ पारखा झाला आहे असे दिसत होते. त्याचे मन स्वतःच्या समस्येमध्येच संपूर्णपणे बुडून गेले होते.

आम्ही दोघेही निःशब्द होतो. आणि त्याने तर आपले नेत्रही मिटून घेतले होते. त्याचा उग्र चेहरा आता शांत दिसू लागला होता. पण त्याच्या अंतर्यामात मात्र तीव्र संग्राम चालू होता. इतक्यात पक्ष्यांचा एक थवा काठावर येऊन उतरला. त्यांचे किलबिल ध्वनी पलीकडच्या तीरावर पोचले असावेत. कारण लवकरच पक्ष्यांचा दुसरा थवा पलीकडील तीरावरून त्यांच्यांत येऊन मिसळला. धरतीवर आता कालातीत निःशब्दता नांदू लागली होती.

त्या गृहस्थाला प्रश्न केला, इतक्या वर्षांमध्ये अंतिम लक्ष्याप्रत पोचण्याची धडपड तुम्ही कधीतरी सोडून दिली होती का ? इच्छाशक्ती व प्रयत्न यांच्या व्यापारांमुळेच अहंची निर्मिती होत असते आणि मनोव्यापारांची ही अशी कालप्रक्रिया त्या शाश्वताकडे, त्या कालातीताकडे पोचविण्यास कधीही समर्थ होत नसते. ही वस्तुस्थिती तुमच्या लक्षात आली नाही का ?

" ज्या अंतिम लक्ष्याप्रत पोचण्याची माझ्या हृदयालाच नव्हे, तर समग्र जीवनाला उत्कट आस लागून राहिली होती, त्याच्याप्रत जाण्याची धडपड मी जाणतेपणी तरी कधीच सोडून दिली नाही. माझ्या प्रवासात मध्येच थांबण्याची मला हिंमतच होत नाही. कारण मी जर मध्येच थांबून गेलो, तर मागेमागेच जात राहीन, माझा ऱ्हासच होत जाईल. पुढेपुढे, वरवर सतत जात राहणे ही तर सर्व वस्तूंची प्रकृती आहे. इच्छाशक्ती व प्रयत्न यांच्या साह्याने जर असे पुढेपुढे जात राहिले नाही, तर अवरुद्ध, कुंठित व गतिशून्य अशाच अवस्थेत मनुष्य राहणार नाही का ? पुढेपुढे जात राहण्याचा हा सहेतुक प्रयत्न जर मी केला नसता, तर मला आपल्या पूर्वीच्या अवस्थेमधून उच्चतर अवस्थेकडे कधीच जाता आले नसते. "

पण हे लक्षात घ्या की, अहं हा स्वतःच्या बंधनातून व भ्रमातून स्वतःचीच मुक्तता कधीतरी करू शकेल का ? त्या नामातीताचा उदय होण्यासाठी अहं हा पूर्णपणे नष्टच होऊन जावयाला नको का ? त्या अंतिम लक्ष्याप्रत पोचण्याची तुमची जी अविश्रांत धडपड आहे, तिच्या मागील अभिलाषा कितीही उत्कट असली, तरी या धडपडीमुळे तुमचा अहं हाच बलवान होत राहतो, हे तुमच्या लक्षात येत नाही का ? तुम्ही जशी आपल्या अंतिम लक्ष्याप्रत पोचण्याची धडपड करीत आहात, त्याचप्रमाणे इतर लोक लौकिक वस्तू मिळविण्यासाठी धडपड करीत असतात. तुमचा प्रयत्न कदाचित अधिक उदात्त स्वरूपाचा असेल. पण

काहीतरी मिळविण्याची अभिलाषाच तुमच्याही प्रयत्नामागे नाही का ?

" पण या एका अभिलाषेखेरीज इतर सर्व अभिलाषा व सर्व विकार मी जिंकले आहेत. आणि माझी ही अभिलाषा इतर सामान्य अभिलाषांहून अगदीच आगळ्या स्वरूपाची आहे. केवळ या एका गोष्टीसाठीच मी आता जगत आहे. "

असे असेल, तर इतर सर्व अभिलाषा व आकांक्षा या जशा तुमच्या दृष्टीने मृत होऊन गेल्या आहेत, तशीच हीही अभिलाषा मृत झाली पाहिजे. आज जी इतकी वर्षे तुम्ही सतत धडपड करीत आला आहात, अविरत त्याग करीत आला आहात, त्या या प्रदीर्घ कालात तुम्ही एवढी एकच मनीषा अधिकाधिक पुष्ट करीत आला आहात. पण ही मनीषादेखील अखेर ' अहं ' च्या क्षेत्रामधीलच आहे. आणि अहंचे असे अव्याहत पोषण चालले असताही आपल्याला त्या नामातीताचे दर्शन व्हावे, अशी मात्र तुमची अपेक्षा आहे — हीच तुमची एकमात्र आकांक्षा आहे; होय ना ?

" अर्थातच. माझे हे अंतिम लक्ष्य गाठण्याची—ईश्वराचे दर्शन घेण्याची—माझी अत्युत्कट इच्छा आहे, यात तिळमात्रही शंका नाही. "

आता हे लक्षात घ्या की, अहं किंवा अनुभविता हा स्वतःच्याच अनुभवांनी सदैव संस्कारबद्ध होत असतो. म्हणून आपण अनुभवीत आहोत, या गोष्टीची अनुभवित्याला जोवर जाणीव राहील, तोवर त्याचा अनुभव हा केवळ स्वप्रक्षेपित अभिलाषांचा परिपाकच राहील. आपणास ईश्वर-दर्शनाचा अनुभव येत आहे, याची जोवर तुम्हांला जाणीव राहील, तोवर हा ईश्वर म्हणजे तुमच्या आशा-आकांक्षांनी व तुमच्या भ्रमांनी प्रक्षेपित केलेलाच ईश्वर राहील. अनुभविता हा कधीही विमुक्त किंवा स्वतंत्र नसतो. कारण तो स्वतःच्या अनुभवांच्या जाळ्यातच सदैव गुंतून पडत असतो. आणि हा अनुभवितच कालप्रक्रियेची निर्मिती करीत असतो. म्हणून या अनुभवित्याला त्या कालातीताचे दर्शन घडणे सर्वथैव अशक्य असते.

" म्हणजे, आजवर अतिशय सुज्ञतेने निवड करून मोठ्या दक्षतेने व अतीव परिश्रमांनी मी जे तयार करीत आलो आहे, जे रचीतबांधीत आलो आहे, त्याचा मी संपूर्ण विध्वंस करून टाकला पाहिजे, असे का आपले म्हणणे आहे ? "

असे पहा की, अहंला स्वतःचेच विसर्जन कधीतरी करता येईल का ? तो जर हे करू पाहील, तर त्याचे हे करणे म्हणजे जे कधीही, कोणत्याही प्रयत्नाने साध्य केले जाणे शक्य नाही, ते प्राप्त करून घेण्याचाच तो अट्टहास राहील. अहंची कृती कोणतीही असो, त्याचा हेतू केवढाई उदात्त असो, तो जो जो प्रयत्न करील, तो तो त्याच्या सबोध वा अबोध स्मृतींच्या, प्रक्षेपांच्या किंवा लहरींच्या कक्षेतच सदैव वावरत राहील. अहं हा स्वतःची ' अहं ' व ' अहं-भिन्न ' अशा दोन भागांत

विभागणी करो की 'आत्मा' व 'परमात्मा' या दोन भागांत विभागणी करो, त्याने कल्पिलेले हे द्वैत केवळ भ्रमात्मकच असते. आणि या भ्रमातच मन गुंतून पडते. मनाचा किंवा अहंचा व्यापार कोणत्याही प्रकारचा असो, स्वतःची मुक्तता करता येणे अहंला सर्वस्वी अशक्य असते. अहंला एका स्तरावरून वरच्या स्तरावर जाणे शक्य असते, निर्बुद्ध प्रकारची निवड टाकून सुबुद्ध स्वरूपाची निवड करणे शक्य असते हे खरे. पण स्वतःच निर्माण केलेल्या रिंगणाच्या पलीकडे जाणे, हे मात्र त्याला कधीही शक्य होणार नाही.

" आपण तर माझी सारीच आशा नष्ट करून टाकीत आहात. मग माणसाने करावे तरी काय ? "

तुम्हाला पूर्णपणे रितेरिते, पूर्ण विवस्त्र व संस्कारशून्य बनले पाहिजे. तुमच्यामध्ये गताचा भार जसा उरता कामा नये, तसेच आशादायक भविष्याचे प्रलोभनही उरता कामा नये. पण असे होणे म्हणजे हताश होणे मुळीच नव्हे. कारण तुम्ही जर हताश झालात, तर त्या हताश अवस्थेत शून्यता असणार नाही, पूर्ण रितेपणा राहणार नाही. पूर्ण रितेपणा वा शून्यता हा कर्माचा किंवा कृतीचा विषयच नव्हे. येथे केवळ शांत व निःशब्द राहणे एवढेच असते. असे निःशब्द राहणे शक्य आहे व तुम्ही असेच निःस्तब्ध राहिले पाहिजे. येथे कसलीही आशा, कशाचीही उत्कंठा किंवा कोणतीही अभिलाषा असता उपयोगी नाही. पण हे निश्चयात्मक प्रयत्नाने किंवा सारे आवाज दडपून टाकून साध्य होणे शक्य नसते. कारण अशा जबरीच्या प्रयत्नांमध्येच कोलाहल, गोंगाट, गडबड ही अंतर्भूत असतात. निःशब्दता किंवा निःस्तब्धता म्हणजे आवाजांचा अभाव असे मुळीच नव्हे.

" पण माझ्या सध्याच्या अवस्थेत मला काय करणे शक्य होईल ? "

मला एक गोष्ट आपल्या नजरेस आणावीशी वाटते. पुढेच पाऊल टाकण्यास तुम्ही इतके आतुर झाला आहात, काही विशिष्ट दिशा आपणांस दाखविली जावी यासाठी तुम्ही इतके विलक्षण उतावीळ झाला आहात की आतापर्यंत जे सांगितले गेले त्याच्याकडे तुमचे लक्षच नव्हते व त्यामुळे तुम्ही ते श्रवण करण्याच्या स्थितीतच नव्हता.

नदीच्या प्रशांत प्रवाहात संध्या तारकांचे स्वच्छ, सुंदर प्रतिबिंब पडले होते.

दुसऱ्या दिवशी सकाळीच तो गृहस्थ पुन्हा भेटीस आला. सूर्य वृक्षांच्या माथ्यांवर डोकावू लागला होता. नदीप्रवाहावर अजून धुकेच पसरले होते. सर्पणाने भरगच्च भरलेली एक शिडाची नाव प्रवाहाबरोबर संथपणे वाहत चालली होती. सुकाणूपाशी असलेला माणूस सोडला तर बाकीचे सगळेजण नावेच्या कुठल्यातरी भागावर स्वस्थ झोप घेत होते. वातावरण शांत निःशब्द होते. नदीवर चालणारे माणसांचे दैनंदिन व्यापार अजून सुरू झाले नव्हते.

त्या गृहस्थाने बोलण्यास सुरुवात केली, " मी वरून जरी उतावीळ दिसत असलो, चिंताक्रांत भासत असलो, तरी काल आपण जे सांगत होता, त्याच्याकडे आंतून माझे संपूर्ण अवधान असले पाहिजे असे दिसते. कारण आज सकाळी जेव्हा मी जागा झालो, तेव्हा मला एक प्रकारची विमुक्तता प्राप्त झाली होती. यथार्थ आकलन झाल्याने जी दृष्टीची स्पष्टता येते ती मला प्राप्त झाली आहे, असे माझ्या अनुभवास आले. नित्यक्रमाप्रमाणे सूर्योदयापूर्वी तासभर मी ध्यानधारणा केली. पण माझे मन विस्तारत जाणाऱ्या नानाविध भ्रमांमध्ये अजूनही अडकलेले नाही, अशी काही खात्री मला वाटेना. तेव्हा काल जेथे आपले बोलणे थांबले, तेथूनच आज आपण सुरुवात करू या का ? "

काल जेथे बोलणे थांबले, तेथून काही आता सुरुवात करता येणार नाही. आपण आपल्यापुढील समस्येबद्दल आता नव्यानेच विचार करू. आपल्या मनाचे अंतर्मुख व बहिर्मुख व्यापार हे सदैव चालू असतात आणि या व्यापारांमुळे मन नवनव्या संवेदना सतत ग्रहण करीत असते. मन अशा प्रकारे आपल्या नानाविध पूर्वस्मृतींमध्ये व प्रतिक्रियांमध्ये गुंतून पडत असल्यामुळे नाना प्रकारच्या संघर्षांचे व अभिलाषांचे ते एक गाठोडे बनून जाते. त्याचे सगळे व्यापार कालकक्षेतच चालू राहतात आणि या कालकक्षेत सर्वत्र विरोधच वसत असतो. अभिलाषांचा विरोध व इच्छाशक्तीचा विरोध; हा विरोध म्हणजे प्रयत्नच असतो. म्हणून 'अहं'चे म्हणजे 'मी व माझे' या स्वरूपाचे जे मानसिक व्यापार अविरत चालू असतात, ते सर्व पूर्णपणे निःस्तब्ध झाले पाहिजेत. कारण हे व्यापारच समस्या निर्माण करीत असतात. नाना तऱ्हेच्या क्षुब्ध मनोवृत्ती तेच उत्पन्न करीत असतात. पण एवढे लक्षात ठेवा की, हे व्यापार थांबविण्याचा मुद्दाम प्रयत्न केला, तर क्षुब्धता व विचलितता अधिकच वाढत राहते.

" हे अगदी खरे आहे. माझ्या हे स्पष्ट ध्यानात येऊन चुकले आहे. मन स्तब्ध करण्याचा जितका प्रयत्न करीत जावे, तितका मनाकडून अधिकाधिक प्रतिकारच होत जातो आणि मनाचा हा प्रतिकार जिंकण्यातच सारे प्रयत्न खर्ची पडत राहतात. म्हणजे अखेर हे सारे एक दुष्ट चक्र बनून जाते. "

या दुष्ट चक्राचा दुष्टपणा जर तुमच्या अवधानात आला असेल, आणि या चक्राचा नाश आपण करू शकणार नाही, याही गोष्टीची तुम्हांला जाणीव झाली असेल, तर ही जाणीव होताच तुमचा हा अहं, किंवा निरीक्षक वा नियंत्रक आपोआप नाहीसा होऊन जाईल.

" पण या अहंचा, या निरीक्षकाचा अंत करणे हे तर मला अतिशयच अवघड वाटते. मी हा प्रयत्न करून पाहिला आहे. पण अजून तरी मला त्यात यश मिळाले नाही. मग हे घडवून कसे आणावयाचे ? "

हे पाहा, अजूनही तुम्ही अहं आणि अहंभिन्न हीच भाषा बोलत नाही का? अजूनही मनामध्ये या द्वैताचेच तुम्ही संवर्धन करीत आहात, नाही का? शब्दांनी, सवयींनी व पूर्वानुभवांच्या पुनरावृत्तींनी तुम्ही या द्वैताचेच संवर्धन करीत नाही का? हे लक्षात घ्या की, विचारक व त्यांचे विचार या वेगवेगळ्या प्रक्रिया मुळीच नसतात. पण आपल्या इष्ट हेतुपूर्तीसाठी विचार व विचारक हे दोन वेगळे आहेत असे आपण मानीत असतो. वस्तुतः अभिलाषा उद्भवली की, तिच्यावरोबर तिचा नियंत्रकही अस्तित्वात येतो. म्हणून या नियंत्रकाचा विरोध कसा करावयाचा. ही आपल्यापुढील समस्या नाही, तर अभिलाषेचे स्पष्ट स्वरूप समजून घेणे ही आहे.

" पण हे समजून घेणारी अशी वेगळी वस्तू तर असलीच पाहिजे. अज्ञानाहून वेगळी अशी ती अवस्था असली पाहिजे. "

पण ' ' मला कळते ' असे म्हणणारी जी वस्तू आहे, तीदेखील कालाच्या कक्षेतच वावरत असते. ही वस्तू म्हणजेच अहं, वा निरीक्षक, वा नियंत्रक, होय की नाही?

" असेच आहे यात मुळीच शंका नाही. पण हा अहं, हा निरीक्षक नाहीसा कसा करता येईल, हे काही माझ्या अजूनही ध्यानात येत नाही. हा अहं नाहीसा करणे शक्य आहे का? "

तेच आता आपण पाहू या. अभिलाषेचे स्वरूप स्पष्टपणे समजून घेणे अत्यावश्यक आहे हे आपण मघाशी पाहिलेच आहे. अभिलाषेचेच, सुख व दुःख आणि सुज्ञता व अज्ञता असे दोन विभाग पडतात. एका अभिलाषेचा दुसरीला विरोध होत राहतो आणि अधिक लाभदायक जी असेल तिचा कमी लाभदायक अभिलाषेशी संघर्ष होत राहतो. पण अभिलाषा वेगवेगळ्या कारणांसाठी वेगवेगळ्या रूपांत व्यक्त होत असली तरी वस्तुतः अभिलाषेची समग्र प्रक्रिया ही एकरस, अभिन्न व अविभाज्य अशी असते. असेच आहे की नाही?

" ही गोष्ट ध्यानात येण्यास वरीच अवघड आहे. एक अभिलाषा दुसरीच्या विरुद्ध खडी करणे, एका अभिलाषेला विरोध करून तिचे परिवर्तन घडवून आणणे या गोष्टींची मला इतकी काही सवय होऊन गेली आहे की, अभिलाषा ही अविभाज्य अशी एकच प्रक्रिया आहे, ही गोष्ट अजून माझ्या नीटशी ध्यानात येत नाही. पण आपण आता ही गोष्ट ध्यानात आणून दिल्यामुळे, अशी वस्तुस्थिती खरोखरच आहे असे आता माझ्या लक्षात येऊ लागले आहे. "

अभिलाषा ही कितीही वेगवेगळ्या, परस्परविरोधी व संघर्षमय ऊर्मींची रूपे घेवो, अखेर ती केवळ अभिलाषाच असते. अभिलाषेच्या या विविध ऊर्मींमधूनच अहं घडविला जात जसतो. आणि या अहंच्या विविध स्मृती, चिंता, भीती आणि अहंचे एकूण सर्व व्यापार हे अभिलाषेच्या रिंगणातच फिरत असतात. वस्तुतः मनोव्यापारांना अभिलाषेवाचून दुसरे क्षेत्रच नसते. अशीच वस्तुस्थिती नाही का?

" कृपा करून आपण बोलणे चालूच ठेवावे. मी संपूर्ण जिवाचे कान करून श्रवण करीत आहे. शब्दांच्या पलीकडे जाण्याचा, खोलखोल शिरण्याचा मी यत्न करीत आहे. "

तेव्हा आपल्यापुढील समस्या ही अशी आहे. अभिलाषेचा हा व्यापार कुठलाही विरोध न करता, सहजपणे, स्वेच्छेने व विमुक्तपणे थांबणे शक्य आहे का ? हे सहजपणे घडून आले, तरच मन शांत होऊ शकेल. ही वस्तुस्थिती जर तुमच्या पूर्ण आकलनात आली, तर अभिलाषेचे व्यापार आपोआपच थांबून जाणार नाहीत का ?

" थोडा वेळ स्तब्ध होतील खरे. पण पुन्हा सवयीमुळे ते व्यापार सुरू होतील. हे कसे थांबविता येईल ? पण हा प्रश्न विचारता विचारताच, तो किती वेडगळपणाचा आहे, हे माझ्या ध्यानात येत आहे. "

आपण किती हावरे असतो, किती लोभी असतो, हे तुमच्या आता नीट ध्यानात आले ना ? आपल्याला नेहमी अधिकाधिकाची हाव लागलेली असते. आपल्या अहंचे व्यापार स्तब्ध व्हावे, ही आपली नवी हाव, नवी आकांक्षा होऊन बसते. पण वस्तुतः ती नवी नसते. तर ते आपल्या अभिलाषेचेच एक नवे स्वरूप असते. मन जेव्हा सहजपणे स्तब्ध होते, तेव्हाच मनाच्या पलीकडचे ते अज्ञात, अनंत अस्तित्वात येऊ शकते.

अभिलाषेचे स्वरूप

सायंकाळ प्रशांत, रमणीय होती. सरोवरावर बरीच पांढरी शिडे दिसत होती. दूरवर एक हिमाच्छदित शिखर दृष्टीस पडत होते. ते जणू काही आकाशालाच लटकले आहे की काय असे भासत होते. संध्याकाळी ईशान्येकडून वाहणारा वारा अजून सुरू झाला नव्हता. पण उत्तरेकडे जललहरींचे नृत्य सुरू झाले होते. सरोवरामध्ये आता अधिक नावा दिसू लागल्या होत्या. जलाशय निळाभोर व आकाश निरभ्र होते. सरोवराचा विस्तार बराच मोठा होता. पण निरभ्र दिवसाच्या स्वच्छ प्रकाशात पलीकडच्या तीरावरील गावे दृष्टीस पडत होती. आमच्या बाजूची सरोवराची लहानशी खाडी जनसंमर्दापासून काहीशी दूर होती. त्यामुळे तेथे अतीव शांतता नांदत होती. या बाजूला कोणीही प्रवासी येत नसत. आणि सरोवरात चालणाऱ्या आगबोटीही या बाजूला फिरकत नसत.

जवळच कोळ्यांचे खेडे होते. आकाश निरभ्र होऊ लागल्यामुळे लहानलहान नावांमध्ये कंदील लावून कोळी रात्रभर मच्छीमारी करणार असे दिसू लागले होते. सायंकाळच्या त्या मोहमय प्रकाशात ते आपली जाळी व आपल्या नावा मच्छीमारीसाठी सज्ज करून ठेवीत होते. भोवतालच्या दऱ्याखोऱ्यांतून सावल्या दाटल्या असल्या तरी पर्वतशिखरांवर मात्र सूर्यकिरण अजूनही रेंगाळत होते.

आम्ही दोघे काही वेळ हिंडत होतो. पण त्या गृहस्थाला काही गोष्टींबद्दल चर्चा करावयाची असल्यामुळे रस्त्याच्या कडेला बसून आम्ही बोलू लागलो.

तो गृहस्थ सांगू लागला, "मला आठवते तेव्हापासून माझ्या मनात संघर्ष सतत चालत आला आहे. बहुतेक वेळ तो आतल्याआतच घुमसत असतो. पण कधीकधी मात्र तो बाहेर फुटून येतो. बाह्य संघर्षाची तशी मला फारशी चिंता नाही. कारण परिस्थितीशी जुळते घेण्यास मी शिकलो आहे. अर्थात बाह्य परिस्थितीशी जुळते घेणेही आता दुःखदायक होऊन बसले आहे. कारण माझ्यावर सहसा कुणाचाही प्रभाव पडत नाही. आणि माझे मन वळविणेही सोपे नाही. एकूण माझे जीवन खडतर बनून गेले आहे खरे. पण माझ्यामध्ये कार्यक्षमता भरपूर असल्यामुळे माझ्या व्यवसायात मला पुरेसे यश लाभले आहे. बाकी ही काही माझ्यापुढील समस्या नव्हे. माझ्या अंतर्यामात जो संघर्ष अविरत चालू आहे, तो आता मला मुळीच ताब्यात ठेवता येईनासा झाला आहे. आणि तो मला समजेनासाही झाला आहे, ही माझी समस्या आहे. मी कितीदा तरी मध्यरात्री भयंकर स्वप्नातच दचकून जागा होतो. माझ्या या संघर्षापासून मला क्षणाचीही उसंत मिळत नाही. माझे दैनंदिन व्यापार वरवर सुरळीत चालू असले, तरी आंत खोलखोल तो घुमसतच

असतो. आणि माझ्या जिव्हाळ्याच्या नात्यांमध्ये तर त्याच्यामुळे पुष्कळदा भडका उडत राहतो."

संघर्ष या शब्दाचा तुम्ही काय अर्थ करता? तुमच्या संघर्षाचे स्वरूप कोणते आहे?

"वाहय दृष्टीने पाहिले, तर मी स्वतःच्या व्यवसायात नेहमी गुंतलेला असतो. माझ्या व्यवसायाला तर एकाग्रतेची व विशेष लक्ष देण्याची फारच गरज आहे. म्हणून मांझ्या व्यवसायात जेव्हा माझे लक्ष एकाग्र झालेले असते, तेव्हा मला आपल्या संघर्षाचा विसर पडतो. पण माझ्या कामातून जेव्हा मला थोडीशी उसंत मिळते तेव्हा पुन्हा मी या संघर्षात येऊन पडतो. माझे हे आंतरिक संघर्ष वेगवेगळ्या स्तरांवरील आहेत. आणि त्यांचे स्वरूपही भिन्न भिन्न प्रकारचे आहे. आपल्या व्यवसायात आपण यशस्वी व्हावे, व्यवसायाचे सर्वोच्च शिखर आपण गाठावे, भरपूर पैसा मिळवावा, असे मला वाटत राहते. आणि या सर्व गोष्टी आपल्याला सहज शक्य आहेत हेही मला समजते. पण दुसऱ्या स्तरावरून या गोष्टींकडे पाहू लागताच, या महत्त्वाकांक्षेतील मूर्खपणाही मला जाणवू लागतो. एकीकडे, जीवनातील सर्व प्रकारच्या सुखांची मला आवडही वाटते, आणि दुसरीकडे याविरुद्ध जाऊन आपण अगदी साधेपणाने, जवळजवळ संन्यस्त वृत्तीने रहावे असेही वाटते. एकीकडे, अनेक लोकांविषयी मला द्वेष व तिरस्कार वाटतो आणि दुसरीकडे इतरांविषयींच्या या भावना आपण विसरून जावे व त्यांना क्षमा करावी असेही वाटते. — माझ्या आंतरिक संघर्षांची अशी कितीतरी उदाहरणे मी आपल्यासमोर ठेवू शकेन. पण आपल्याला एवढ्यांवरूनही माझ्या संघर्षाचे स्वरूप कळून चुकले असेल, अशी माझी खात्री आहे. माझी प्रकृती तशी थंड व शांत आहे आणि तरी मला चटकन राग येतो. माझे शरीरस्वास्थ्य उत्कृष्ट प्रकारचे आहे. पण कदाचित हेच माझे दुर्दैव ठरले असावे. मी शांत व संथ वृत्तीचा आहे, अशी बाहयतः माझ्याविषयी कल्पना होते. पण माझ्या या विविध संघर्षांमुळे आत आत मात्र मी अतिशय क्षुब्ध, विचलित व संभ्रमित असाच असतो. माझी तिशी आता उलटून गेली आहे. तेव्हा माझ्या या विविध अभिलाषांच्या गोंधळामधून आता काहीतरी मार्ग काढलाच पाहिजे, असे मला फार फार वाटू लागले आहे. — माझी दुसरी अडचण ही आहे की, या प्रश्नाविषयी इतर कुणाशीही बोलणे मला फार अवघड वाटते. आज अनेक वर्षांनंतर प्रथमच मी आपणापाशी एवढे मोकळे मन करीत आहे. तसा मी आतल्या गाठीचा मुळीच नाही पण स्वतःविषयी असे काही बोलणे मला मुळीच आवडत नाही. आणि कुठल्याही मनोविश्लेषणज्ञाजवळ असे काही सांगणे हे तर मला सर्वस्वी अशक्य आहे. — माझ्या संबंधीचे हे सारे आता समजल्यानंतर, मला आंतरिक शांती लाभू शकेल की नाही, हे आपण सांगाल का ?"

हे पहा, संघर्ष कसा नाहीसा करता येईल, याचा प्रयत्न करण्यापेक्षा अभिलाषांची ही जी पुंजी जमत जाते, तिचे आकलन आपल्याला करून घेता येईल का ते प्रथम पाहू या. अभिलाषेच्या स्वरूपाचे नीट निरीक्षण करणे, हीच वस्तुतः आपल्यापुढील समस्या आहे; केवळ संघर्ष नाहीसा करून टाकणे ही नव्हे. कारण अभिलाषा हीच संघर्षांना जन्म देत असते. नाना स्मृतींमुळे व स्मृतींशी संलग्न झालेल्या विविध गोष्टींमुळे अभिलाषा सारखी उद्दीपित होत राहते. स्मृती हा अभिलाषेचाच एक अंश असतो. सुखद वा दुःखद गोष्टींच्या आठवणींमुळे अभिलाषा परिपुष्ट होत राहते आणि याचमुळे अभिलाषेचे परस्परविरोधी भासणाऱ्या अभिलाषांमध्ये विभाजनही होत राहते. मन दुःखद अभिलाषेचा विरोध करीत असते व सुखद अभिलाषेशी सारूप्य पावत असते. सुख व दुःख यांच्यामध्ये निवड करून हे मनच अभिलाषेचे भिन्नभिन्न भाग पाडीत असते. आणि त्यांचे वर्गीकरण करून वेगवेगळ्या मूल्यांच्या व हेतूंच्या कप्प्यात तिला ठेवून देत असते.

"म्हणजे, अभिलाषा या जरी वेगवेगळ्या व परस्परविरोधी भासत असल्या, तरी अभिलाषा ही एकसंध अशीच असते, हीच वस्तुस्थिती आहे ना?"

होय, वस्तुस्थिती अशीच असते, होय की नाही? हे सर्व समग्रपणे आकळून घेणे, हेच महत्त्वाचे असते, हे समजून घेतले नाही, तर परस्परविरोधी अभिलाषांचा संघर्ष अव्याहत चालूच राहतो. मन असे जे अभिलाषांचे द्वंद्व उत्पन्न करीत राहते, ते सर्वस्वी भ्रमात्मक असते. अभिलाषांचे प्रकार वेगवेगळे असतात एवढेच काय ते. त्यांच्यात द्वंद्व मुळीच नसते. द्वैत जर कुठे वसत असेल, तर ते काल व अनंतत्व, काल व कालातीत यांच्यामध्येच वसत असते. म्हणून अभिलाषांचे हे जे द्वैत असल्यासारखे वाटते, त्याचे असत्यत्व जाणून घेणे हे आपले काम आहे. अभिलाषा ही हवे व नको अशा दोन विभागांत स्वतःला विभागून टाकीत असते. पण जे हवे त्याच्या मागे धावणे व जे नको ते टाकीत राहणे, ही दोन्ही केवळ अभिलाषेचीच रूपे असतात. परस्परविरोधी अभिलाषांमुळे उत्पन्न होणाऱ्या संघर्षांपासून मनुष्याची सुटकाच नाही. कारण अभिलाषा हीच मुळी आपला विरोधी उत्पन्न करीत असते.

"आपण जे सांगत आहात, ती वस्तुस्थिती आहे ते मला अस्पष्टपणे जाणवत आहे खरे पण माझ्या वेगवेगळ्या अभिलाषांच्या संघर्षांत मी अजूनही चिरडला जात आहे. हीदेखील वस्तुस्थिती असल्याचा मला अनुभव येत आहे."

हे पहा, अभिलाषा ही एकसंध व एकरूपच आहे ही स्पष्ट वस्तुस्थिती आहे. आपल्या सोयीसाठी किंवा सुखासाठी ही वस्तुस्थिती आपल्याला नाकारता येणार नाही किंवा तिला मुरडही घालता येणार नाही. तसेच आपल्या नानाविध अभिलाषांच्या संघर्षातून स्वतःला विमुक्त करून टाकण्यासाठी, या वस्तुस्थितीचा साधन म्हणूनही आपण उपयोग करू शकत नाही. पण ही वस्तुस्थिती आहे, हे सत्य आहे,

या गोष्टीचे जर आपणांस यथार्थ दर्शन झाले, तर भ्रमनिर्मिती करीत राहण्याचा मनाचा जो व्यापार अव्याहत चालू असतो, त्याच्यापासून मनाची मुक्तता करण्यास हेच दर्शन समर्थ ठरते म्हणून अभिलाषा हीच स्वतःची विभागणी करून नाना परस्परविरोधी रूपांत प्रकट होत असते, या गोष्टीचे आपण यथार्थ आकलन करून घेतले पाहिजे. अभिलाषेची ही जी परस्परविरोधी संघर्षमय रूपे आहेत, ती रूपे म्हणजे वस्तुतः आपणच आहोत. या सर्व अभिलाषा जरी परस्परविरुद्ध असल्या व भिन्नभिन्न दिशांकडे आपणास ओढीत असल्या, तरी या सर्वांचे गाठोडे म्हणजेच आपण आहोत.

- "होय, हे खरे आहे पण मग अभिलाषांच्या बाबतीत आपल्याला काय करता येईल ?"

अभिलाषा ही अभिन्न व एकसंध अशी वस्तू आहे, या गोष्टीचे स्पष्ट दर्शन जोवर आपल्याला होणार नाही, तोवर आपण काहीही केले किंवा न केले तरी त्याला फारसा अर्थ उरणार नाही. कारण अभिलाषा ही सदैव अधिकाधिक अभिलाषांना जन्म देत राहते. आणि या अभिलाषा-संघर्षात मन अडकून पडते. पण आपल्या सर्व पूर्वस्मृती व पूर्वपरिचय यांच्या आश्रयाने जी अभिलाषा अहंची निर्मिती करीत असते, त्या अभिलाषेचा जेव्हा अंत घडून येतो, तेव्हाच या संघर्षातून आपली मुक्तता होते.

" अभिलाषा जेव्हा नष्ट होईल, तेव्हाच संघर्षही नष्ट होईल, असे जेव्हा आपण सांगता, तेव्हा यावरोबरच माणसाच्या प्रवृत्तिपर जीवनाचाही शेवट होईल, असे का आपल्याला ध्वनित करावयाचे आहे ? "

प्रवृत्तिपर जीवनाचा शेवट होईल किंवा होणारही नाही. पण अभिलाषारहित जीवन कशा प्रकारचे राहील, यावद्दलचे केवळ तर्क करीत बसणे हे मात्र वेडेपणाचेच होईल.

" पण अशा जीवनात आपल्या शारीरिक, प्राकृतिक गरजांचाही अंत होईल, असे मात्र आपल्याला सुचवावयाचे नाही ना ? "

हे पहा, आपल्या अभिलाषाच आपल्या प्राकृतिक गरजांनाही आकार देत असतात व त्यांचा विस्तारही करीत असतात. आपण सध्या या अभिलाषांविषयीच बोलत आहोत, प्राकृतिक गरजांबद्दल नव्हे.

" या आंतरिक प्रचोदनांच्या वा अभिलाषांच्या व्यापारांचा विचार आपल्याला अधिक खोलात शिरून नाही का करता येणार ?"

अभिलाषा या प्रकट वा गुप्त, सबोध वा अबोध अशा दोन्ही प्रकारच्या असतात. ज्या प्रकट असतात, त्यांच्यापेक्षा गुप्त असणाऱ्या अधिक अर्थगर्भ असतात. पण या वरवरच्या प्रकट अभिलाषा आपण जोवर आकळून घेणार नाही व त्या सौम्य होऊ

देणार नाही, तोवर त्या सखोल व गुप्त अभिलाषांची ओळखही पटणे शक्य होणार नाही. अर्थात याचा अर्थ असा नव्हे की, आपल्या सबोध अभिलाषांचा आपण निरोध करावा किंवा त्यांचे उन्नयन करावे किंवा एखाद्या विशिष्ट प्रबंधानुसार त्यांना वळण लावावे. आपण तर आपल्या अभिलाषांचे सदैव निरीक्षणच करीत राहिले पाहिजे. त्या सहज शांत व स्तब्ध होतील इकडे लक्ष दिले पाहिजे. अशा प्रकारे वरवरच्या अभिलाषांची क्षुब्धता एकदा शांत झाली की, सखोल अभिलाषा, हेतू व संकल्प हे जाणिवेच्या पृष्ठभागावर येणे संभवनीय होईल.

" पण ही वरवरची क्षुब्धता तरी कशी शांत करता येईल ? आपण जे सांगत आहात त्याचे महत्त्व मला जाणवत आहे. पण ते करण्यास सुरुवात कशी करावयाची किंवा या समस्येबाबत प्रयोग कसा करून पहावयाचा हे काही माझ्या नीटसे ध्यानात येत नाही. "

हा प्रयोग करून पाहणारा अहं हाच असतो. आणि जिच्याबाबत प्रयोग करावयाचा त्या वस्तूहून — अभिलाषेहून — तो मुळीच वेगळा नसतो, या गोष्टीचे सत्य प्रथम नीटपणे आकळून घेतले पाहिजे. आभिलाषांच्या बाबतीत प्रयोग करून पाहणारे तुम्ही हे काही त्या अभिलाषांहून वेगळे नाहीत. आहात का तुम्ही वेगळे ? ' या एका अभिलाषेचा निरोध करून त्या दुसऱ्या अभिलाषेच्या मागे मी लागेन ' असे म्हणणारा अहं हा स्वतःच आपल्या अभिलाषांचा परिपाक असतो. असाच तो असत नाही का ?

" असे आहे असे वाटते खरे. पण याचे साक्षात आकलन होणे ही गोष्ट अगदीच वेगळी आहे. "

हे पहा, जसजशी एकेक आशा उसळत राहील, तशी त्या उसळीबरोबरच या सत्याची जाणीव जर कायम राहील, तर हा प्रयोग करणारा व अभिलाषा हे परस्परांहून भिन्न असतात असा जो आपला भ्रम आहे, त्याच्यापासून आपली मुक्तता होईल. पण जोवर अहं हा अभिलाषेपासून मुक्त होण्याचा मुद्दाम प्रयत्न करीत राहील, तोवर तो आपल्या अभिलाषेला दुसऱ्या एखाद्या रीतीने पुष्ट करीत राहील आणि या तऱ्हेने आपला संघर्ष सदैव वाढवीतच राहील. पण या समग्र वस्तुस्थितीची जाणीव जर क्षणाक्षणाला कायम राहिली तर या अहंची, या नियंत्रकाची, इच्छाशक्ती निःस्तब्ध होऊन जाईल. आणि अशा प्रकारे प्रयोग करणारा हाच जेव्हा प्रयोगरुप होऊन जाईल, तेव्हा विविध संघर्षांनी युक्त अशी जी अभिलाषा, ती ही त्याचबरोबर नष्ट होऊन गेली आहे असे तुम्हांला आढळून येईल.

" पण यामुळे जीवन अधिक समृद्ध व अधिक शांत होण्यास मदत होईल का ?'

प्रारंभी मुळीच होणार नाही. उलट यामुळे प्रथमप्रथम अधिक खळबळच उत्पन्न

होईल आणि जाणिवेच्या सखोल स्तरावर अनेक गोष्टींशी जुळते घ्यावे लागेल. पण या गुंतागुंतीच्या समस्येमध्ये मनुष्य जसजसा अधिकाधिक खोलात शिरत जाईल, जसजसा अधिक विस्तारात शिरत जाईल, तसतशी ही अभिलाषेची व तिच्या संघर्षाची समस्या अधिकाधिक सोपी व सरळ होत जाईल.

जीवनाचा हेतू

घरासमोरून निघणारा रस्ता समुद्राकडे जात होता. त्याच्या कडेने अनेक लहान-लहान दुकान होती, मोठमोठाले बंगले होते आणि मोटरखाने व मंदिरेही होती. आणि एक धूळ खात पडलेली दुर्लक्षित बागही वाटेत लागत होती. तो रस्ता समुद्राजवळ पोचला, तेव्हा त्याचे एका प्रशस्त रस्त्यात रूपांतर झाले होते. मोठमोठ्या बसेस, भाड्याच्या मोटरी व अशाच प्रकारच्या आधुनिक शहरातील वाहनांच्या वर्दळीने तो रस्ता गजबजून गेला होता.

या प्रशस्त रस्त्यामधूनच एका बाजूला एक निवांत रस्ता निघत होता. त्याच्या दुतर्फा वृक्षांची रांग शोभत होती. हा रस्ता इतर वेळी शांत असला तरी सकाळ-संध्याकाळ मात्र तो मोटरींनी गजबजून जात असे. कारण तो एका मोठ्या क्लबकडे -- त्याच्या गॉल्फमैदानाकडे आणि क्लबाभोवतालच्या सुंदर उद्यानांकडे -- जाणारा रस्ता होता. या प्रच्छाय रस्त्यावरून जेव्हा मी हिंडत असे तेव्हा बाजूच्या पदपथांवर तऱ्हतऱ्हेचे भिकारी बसलेले आढळत. भिक्षेसाठी ते कधीही ओरडून याचना करीत नसत इतकेच काय, पण येणाऱ्याजाणाऱ्यापुढे ते भिक्षेसाठी हातसुद्धा पसरीत नव्हते; त्या पदपथावर सुमारे दहा वर्षांची एक मुलगी एका टिनाच्या डब्यावर डोके टेकून व डोळे सताड उघडे ठेवून पहुडली होती. तिच्या केसांच्या जटा वळल्या होत्या व कपडेही घाणेरडेच होते. मी तिच्याकडे पाहून स्मित करताच तीही हसली. थोडे पुढे गेल्यावर तीन वर्षांची एक मुलगी समोर येऊन हात पसरू लागली. तिच्या मुखावरचे स्मित अतिशय मोहक होते. तिची आई जवळच्या झाडाआडून तिच्याकडे पहात होती. तिचा पुढे पसरलेला हात हातात घेऊन काही पावले मी तिच्या बरोबर चाललो व तिला तिच्या आईपाशी पोचवले. त्या दिवशी माझ्याजवळ पैसे नसल्यामुळे दुसऱ्या दिवशी मी पैसे घेऊन आलो. पण ती चिमुकली पैसे काही घेईना. तिला माझ्याशी फक्त खेळावयालाच हवे होते म्हणून थोडा वेळ तिच्याशी खेळलो व पैसे आईला दिले. मी जेव्हा जेव्हा त्या रस्त्यावरून हिंडत असे तेव्हा तेव्हा ती मुलगी नेहमी दृष्टीस पडे. आणि तिच्या चमकदार डोळ्यांत व लाजाळू चेहऱ्यावर नेहमी गोड स्मित आढळून येई.

रस्त्यावरील त्या फॅशनेबल क्लबाच्या फाटकासमोर एक भिकारी बसलेला असे. त्याच्या केसांच्या जटा धुळीने भरलेल्या असत. एका घाणेरड्या पोत्याने तो आपले अंग झाकून टाकीत असे. त्या बाजूने जाताना तो धुळीत डोके टेकून कधी कधी निजलेला आढळे आणि कधी कधी कडेच्या झाडांखाली स्तब्धपणे, शून्यपणे पाहत उठून बसलेला दिसे. एक दिवस त्या क्लबात कसलासा समारंभ होता. जिकडेतिकडे

दिवे झगमगत होते. चमकणाऱ्या मोटरींतून बरेच लोक हसतखिदळत तेथे चालले होते. क्लबामधून हलक्याफुलक्या संगीताचे स्वर ऐकू येत होते. त्या उच्च स्वरांनी सारे वातावरण भरून टाकले होते. फाटकापाशी अनेक पोलीस उभे होते. सुंदर सुंदर पोशाख केलेले धष्टपुष्ट लोक मोटरीतून उतरताना पाहण्यासाठी बऱ्याच लोकांची तेथे गर्दी जमली होती. तो भिकारी मात्र या सर्व प्रकारांकडे पाठ फिरवून बसला होता. एका माणसाने त्याला काही खाण्यास देऊ केले, दुसऱ्याने सिगरेट पुढे केली. पण त्याने जागच्या जागी स्तब्ध राहून दोन्ही गोष्टींना नकार दिला. तो हळूहळू मृत्युपंथाला लागला होता आणि रस्त्याने लोकांची ये-जा चालूच होती.

आकाशाच्या काळवंडणाऱ्या पार्श्वभूमीवर तेथील वृक्षांचा भव्यपणा विशेष उठून दिसत होता. त्यांच्या पानांचे व शाखांचे आकारही मोठे मजेदार दिसत होते. त्यांची पाने चिमुकली पण शाखा मात्र प्रचंड होत्या. दुःख – दैन्य – कोलाहल यांनी भरलेल्या त्या गजबजलेल्या शहरापासून ते वृक्ष दूरदूर उभे राहिल्यासारखे दिसत होते. त्यांचा भव्यपणा काही विलक्षणच होता. पलीकडेच अखंड गतिमान तरंगपुलकित सागर अनंत अवकाशापर्यंत पसरलेला होता. त्याच्या नाचऱ्या लाटांवर चंद्रप्रकाशाचा एक चंदेरी पट्टा चमचमत होता. ही समृद्धिसुंदर वसुंधरा, त्या दूरदूरच्या तारका आणि मृत्यूने अस्पष्ट अशी ही मानवता — या साऱ्या वस्तुजाताला अमर्याद विराटपणाने झाकून टाकल्यासारखे वाटत होते.

भेटीला आलेला गृहस्थ काहीसा तरुण होता. देशाच्या दूरच्या टोकाहून बराच कंटाळवाणा प्रवास करून तो येथे आला होता. जीवनाचा हेतू काय आहे याचा शोध लागल्याशिवाय विवाह करावयाचा नाही, अशी त्याने शपथ घेतली होती. जीवनहेतू शोधून काढण्याचा त्याने दृढनिश्चयच केलेला होता. वृत्तीने तो आक्रमक होता. कुठल्याशा ऑफिसात तो काम करीत होता, पण जीवनहेतूचा शोध करण्यासाठी तो मुद्दाम रजा काढून येथे आला होता. नाना विचारांमध्ये व वादविवादांचे मुद्दे घोळविण्यात त्याचे मन सदैव गुंतलेले असे. आपल्या विशिष्ट प्रश्नाला इतरांकडून मिळालेली उत्तरे व स्वतः त्याने दिलेली उत्तरे, यांच्या गर्दीने त्याचे मन इतके गच्च भरून गेले होते की, दुसऱ्याचे काहीही ऐकून घेणे त्याला अवघड होऊन बसले होते. तो बोलू लागला की त्याचे जणू शब्दांवर शब्द चढत आणि जीवन हेतूसंबंधी इतर तत्त्वज्ञांनी व गुरूने जे जे म्हटलेले आहे, त्यांची उद्धरणे आपल्या भाषातून अविरतपणे उधळीत राही. त्याच्या मनात चिंतेने खोल घर केलेले होते आणि तो अतिशय व्यथित व विचलित झाल्यासारखा दिसत होता.

तो सांगू लागला, "जोवर मला जीवनाचा हेतू काय आहे हे कळत नाही, तोवर माझ्या जीवनाला काहीही अर्थ नाही. माझ्या सर्व कृतीही विनाशकारी होऊन बसत आहेत. उदरंभरणापुरते मी मिळवीत आहे हे खरे. पण जीवन कष्टी होऊन

गेले आहे आणि मृत्यू तर माझी वाट पाहात उभाच आहे. बाकी एकंदरीत सर्वच जीवनाची रीत ही अशीच आहे. पण मग या सर्वांमागील हेतू तरी काय आहे? मला तर या बाबतीत काहीच कळत नाही. मी अनेक गुरूंकडे व पंडितांकडे जाऊन आलो आहे. एकजण एक सांगतो, तर दुसरा दुसरे सांगतो. आपले या बाबतीत काय म्हणणे आहे?"

मी जे सांगेन त्याची इतरांनी सांगितलेल्या गोष्टींशी तुलना करून पाहण्यासाठीच का तुम्ही हे विचारीत आहात?

"होय, त्यासाठीच. कारण मग मला निवड करता येईल आणि मला जे खरे वाटेल त्याच्यावरच माझी निवड अवलंबून राहील."

सत्याचे आकलन होणे ही व्यक्तिगत मताची आणि आपल्या आवडीनिवडींवर अवलंबून राहणारी गोष्ट आहे, अशी का तुमची कल्पना आहे? निवड करून सत्याचा शोध आपल्याला लागेल, असे का तुम्हांला वाटते?

"पण निवड केल्याशिवाय आणि वेगवेगळ्या मतांमधील तरतमाचा भेद ओळखल्याशिवाय सत्याचा शोध कसा बरे लागू शकेल? मी आपले म्हणणे लक्षपूर्वक श्रवण करीन. व ते मला पटले तर इतरांनी जे जे सांगितले आहे त्या सर्वांचा मी त्याग करीन. आणि आपण सांगितलेल्या साध्यानुसार स्वतःच्या जीवनाला वळण देईन. पण जीवनाचा हेतू काय आहे, हे शोधून काढण्याची मला खरोखरच तीव्र तळमळ लागलेली आहे."

पण पुढे जाण्यापूर्वी, सत्याचा शोध घेण्याची पात्रता आपल्यामध्ये आहे की नाही, हेच स्वतःला प्रथम विचारणे हे महत्त्वाचे नाही का? अर्थात हे मी कसल्याही अनादराच्या भावनेने मुळीच म्हणत नाही, तर आदरानेच सुचवीत आहे. सत्य ही कुणाच्याही मताची, सुखाची किंवा संतोषाची वस्तू आहे, असे का तुम्हांला वाटते? मला जे पटेल तेच मी स्वीकारीन, असे तुम्ही म्हणत आहात. याचा सरळ अर्थ हा आहे की, तुम्हांला सत्याचे महत्त्व नाही तर आपल्याला जी गोष्ट सर्वांत संतोषदायक वाटेल, त्याच गोष्टीच्या मागे तुम्हाला जावयाला हवे आहे. तुम्हाला जे अखेर सौख्यमय वाटेल, ते प्राप्त करून घेण्यासाठी तुम्ही आजच्या घटकेला दुःखवेदनांचा मार्ग तुडविण्यास तयार आहात. स्वतःवर जबरीने काही लादून घेण्यास तयार आहात. म्हणजे तुम्ही सुखाच्या पाठीमागे लागला आहात, सत्याच्या मुळीच नव्हे. पण सत्य हे तर आपल्या आवडीनावडींच्या पलीकडचेच असले पाहिजे, होय की नाही? कोणत्याही शोधाचा आरंभ नम्रतेपासूनच व्हावयाला नको का?

"पण यासाठीच तर मी आपल्यापाशी आलो आहे. मी खरोखरच सत्याच्या शोधात आहे. सत्य काय आहे हे गुरूंनी मला सांगावे अशी माझी अपेक्षा आहे. ते समजताच मी अतिशय नम्रतेने व अनुतप्त वृत्तीने त्याचे अनुसरण करीन."

पण कुणाचेही अनुसरण करणे म्हणजे नम्रतेला नकार देण्यासारखेच नाही का ? तुम्हाला विशिष्ट ईप्सित साध्य करून घ्यावयाचे आहे, सफलता मिळवावयाची आहे, म्हणूनच तुम्हाला असे अनुसरण करावेसे वाटत आहे. महत्त्वाकांक्षी मनुष्याची महत्त्वाकांक्षा कितीही गुप्त व सूक्ष्म स्वरूपाची असो, असा मनुष्य हा केव्हाही विनम्र असत नाही. दुसऱ्याचा अधिकार प्रमाण मानून त्याला आपला मार्गदर्शक बनविणे म्हणजे स्वतःच्या बुद्धीचा व आकलनशक्तीचा नाश करून टाकणेच होय. साध्याचा किंवा आदर्शाचा पाठलाग करीत राहण्याने विनम्रतेला प्रतिबंधच निर्माण होत असतो. कारण हे साध्य वा हा आदर्श ही वस्तुतः आत्मपूजाच असते. आपल्या अहंचे वेगवेगळ्या रीतींनी पोषण करीत राहणारा मनुष्य हा कधीतरी विनम्र होऊ शकतो का ? आणि विनम्रतेवाचून तर सत्य संभवूच शकत नाही.

" पण जीवनाचा खरा हेतू कोणता, हे शोधून काढण्यासाठीच तर मी येथे आलो आहे. "

हे पाहा, तुम्ही एका कल्पनेमध्ये, एका विकल्पित विचारामध्ये अडकून पडला आहात, या गोष्टीकडे तुमचे लक्ष वेधावेसे वाटते. हे कल्पनारंजन ही आता तुमची मनोविकृती होऊ पाहत आहे. या बाबतीत माणसाने अखंड जागरूक राहिले पाहिजे. जीवनाचा खरा हेतू कोणता हे समजून घेण्यासाठी तुम्ही अनेक तत्त्वज्ञांचे ग्रंथ वाचले, अनेक गुरूंच्या सहवासात राहून आलात. यांच्यापैकी प्रत्येकजण काही वेगवेगळे सांगत असतो आणि तुम्हाला यातील सत्य आकळून घ्यावयाला हवे आहे. आता हे सांगा की, ते सर्व काय सांगतात. याच्यातील सत्य तुम्हाला आकळून घ्यावयाचे आहे की तुम्ही जो शोध करीत आहात त्याच्या मुळाशी खरोखर काय आहे हे तुम्हाला जाणून घ्यावयाचे आहे ?

" आपण जेव्हा असा सरळ सवाल करता तेव्हा उत्तर देताना मी काहीसा अडखळू लागतो. कारण माझ्यापेक्षा कितीतरी अधिक अध्ययन केलेले व अनुभव घेतलेले लोक या जगात आहेत. म्हणून जीवनहेतू काय हे आकळून घेण्यासाठी ते जे काय सांगत आहेत, ते सर्व दूर सारणे हे विलक्षण अहंकारीपणाचे व उद्धटपणाचे कृत्य होईल असे मला वाटते. वरे, ते काय सांगत आहेस हे पाहू जावे, तर प्रत्येकजण आपापल्या अनुभवानुसार व आकलनानुसार सत्य काय हे सांगत असतात आणि कधी कधी त्यांचे सांगणे तर हे परस्परविरुद्ध असते. मार्क्सवादी एक सांगतात, तर धार्मिक लोक हे वेगळेच काही सांगतात. म्हणून या सर्वांच्या सांगण्यामधून सत्य नेमके काय आहे, हे शोधून काढण्यास आपण कृपा करून मला मदत कराल ना ?"

हे पाहा, जे असत्य आहे, त्यातील असत्यत्व जाणून घेणे, असत्यातील सत्य समजून घेणे आणि जे सत्य आहे, त्याच्या सत्यत्वाचे दर्शन घेणे, हे काही सोपे नाही.

स्पष्ट दर्शन होण्यासाठी माणसाचे मन हे अभिलाषेपासून मुक्त झाले पाहिजे. कारण अभिलाषा, हीच मनाला विकृत करीत असते, संस्कारभाराने बद्ध करून टाकीत असते. जीवनाचा खरा हेतू शोधून काढण्यास तुम्ही इतके विलक्षण उत्सुक झाला आहात की तुमची ही उत्सुकताच या शोधाचे आकलन करून घेण्याच्या मार्गात अडथळा उत्पन्न करीत आहे. तुम्ही जे जे वाचले आहे व तुमच्या गुरूंनी तुम्हाला जे जे सांगितले आहे, त्यातील सत्य तुम्हांला जाणून घ्यावयाचे आहे, होय ना ?

" अर्थातच. "

तेव्हा या वेगवेगळ्या लोकांनी सांगितलेल्या वेगवेगळ्या वचनांतील सत्य काय आहे, हे तुम्ही स्वतःच शोधून काढण्यास समर्थ झाले पाहिजे. सत्याचे साक्षात दर्शन घेण्यास तुमचे स्वतःचेच मन समर्थ झाले पाहिजे. ते तसे नसले, तर तुम्ही नाना कल्पनांच्या, मतांच्या व निष्ठांच्या दाट अरण्यात वाट गमावून बसाल. सत्याचे साक्षात दर्शन घेण्याचे सामर्थ्य तुमच्या मनात नसले, तर जोराच्या वाऱ्यात इकडे-तिकडे भिरंगत राहणाऱ्या पानाप्रमाणे तुम्ही कुठेतरी फेकले जाल. म्हणून हे लक्षात ठेवा की, इतरांनी काढलेले निष्कर्ष किंवा केलेली विधाने यांना काहीही महत्त्व नसते — मग ते इतर कितीही मोठे असोत. तुम्हांला स्वतःलाच सत्याचे दर्शन घडणे हेच काय ते खरोखर महत्त्वाचे असते. हेच अत्यावश्यक आहे, असे का तुम्हांला वाटते ?

" हो, असे वाटते खरे. पण ही सत्य दर्शनाची देणगी मला कशी प्राप्त होऊ शकेल ?"

सत्याचे आकलन होणे ही काही थोड्याशा लोकांसाठी राखून ठेवलेली देणगी मुळीच नव्हे. निजज्ञानाची ज्यांना खरी तळमळ लागलेली असते, त्यांनाच हे आकलन होऊ शकते. वेगवेगळ्या गोष्टींच्या निष्कर्षांची किंवा मतांची तुलना केल्याने यथार्थ आकलन कधीच होत नसते. उलट तुलना करीत राहावेसे वाटणे हा विचलित लक्षतेचाच एक प्रकार असतो. तसेच कुठलाही निर्णय घेऊन टाकणे हाही यथार्थ आकलन टाळण्याचाच प्रकार असतो. सत्य अवतरण्यासाठी मन हे तुलनारहित व निर्णयरहित झाले पाहिजे. कारण मन जेव्हा तुलना करीत राहते, निर्णय घेत असते, तेव्हा ते गुंतलेले असते, व्यग्र होऊन गेलेले असते. ते शांत वा निःस्तब्ध मुळीच नसते. गुंतलेल्या व व्यग्र असलेल्या मनाला साधे स्पष्ट दर्शन घडणे अगदीच अशक्य असते.

" म्हणजे आजवर मी जी जी मूल्ये उराशी बाळगली, जे जे ज्ञान संपादन केले, ते ते सगळे मी टाकून दिले पाहिजे, असा का आपल्या सांगण्याचा अर्थ आहे ?"

पण तुम्ही हे पाहा की, कशाचाही शोध जर लागावयाचा असेल, तर मन पूर्ण विमुक्त असावयाला नको का ? तुमचे हे ज्ञान, ही माहिती, स्वतःचे वा इतरांचे

हे अनुभव किंवा निष्कर्ष–हा सगळा संचित–संग्राहित–संपादित केलेला प्रचंड स्मृति-भार, हा का कधी विमुक्तता मिळवून देत असतो ? जोवर आपला अहं, हा नियंत्रक अस्तित्वात असतो; निर्णय घेत असतो; कशाचा धिक्कार करीत असतो; कशाची तुलना करीत असतो; तोवर विमुक्तता अस्तित्वात येणे शक्य तरी आहे का ? मन हे जर सदैव काहीतरी मिळविण्यात व कशाचा तरी अंदाज घेण्यात सारखे गुंतलेले असले, तर ते कधीही शांत, निःस्तब्ध असू शकणार नाही. आणि सत्य अवतरण्यासाठी मन हे शांतच असावयाला नको का ?

" हे सारे काही मला स्पष्ट दिसत आहे. पण आपण हे सांगताना, माझ्या-सारख्या साध्यासुध्या, अज्ञानी माणसाकडून फारच जास्त अपेक्षा करीत नाही का ? "

पण तुम्ही साधेसुधे व अज्ञानी आहात तरी का ? तुम्ही खरोखरच तसे असता, तुमच्यावरोबर सत्याच्या शोधाला प्रारंभ करण्यात मला फार आनंद वाटला असता. पण दुर्दैव हे आहे की,, तुम्ही तसे नाही. जो मनुष्य खरोखरच म्हणतो की, ' मी अज्ञानी आहे, मला काहीही कळत नाही, ' त्यालाच सत्याचे दर्शन घडते. त्यालाच सुज्ञता प्राप्त होत असते. जे साधे व निरागस असतात, त्यांनाच प्रकाशाचे दर्शन घडते. ज्ञानभाराने वाकलेल्या लोकांना नव्हे. कारण तेच लोक सहजपणे विनम्र असतात.

" पण मला तर वस्तुतः एकच गोष्ट हवी आहे. खरा जीवनहेतू काय ते मला आकळून घ्यावयाचे आहे. आणि आपण तर माझ्या आकलनाच्या पलीकडे असलेल्या गोष्टींचा माझ्यावर वर्षाव करीत आहात. जीवनाचा खरा हेतू काय, हे सोप्या शब्दांत आपण मला नाही का सांगू शकणार ? "

हे पहा, दूर जाण्यासाठी जवळून सुरुवात करावी लागते. जवळ काय आहे हे पाहिल्याशिवायच, ते अमाप, ते अमर्याद तुम्हांला मिळवावेसे वाटते. तुम्हाला जीवनहेतू जाणून घ्यावयाला हवा आहे. पण वस्तुस्थिती अशी आहे की, जीवनाला आदीही नाही आणि अंतही नाही. जीवन हे मरणही असते व जीवनही असते. हिरवे, कोवळे, नाजूक पान हे जसे जीवन, तसेच वाऱ्यात भिरंगणारे सुकलेले पान म्हणजेही जीवन. प्रीती व प्रीतीचे अमर्याद सौंदर्य म्हणजे जीवन. एकटेपणाचे दुःख म्हणजेही जीवन आणि एकाकीपणाचा परमानंद म्हणजेही जीवन. जीवन हे मोजता-मापता येत नसते. आणि मनाला त्याचा शोधही घेता येणे शक्य नसते.

अनुभवाचे मूल्यमापन

सूर्याच्या प्रखर उन्हात तो खडक चांगलाच तापून निघाला होता. खेड्यांतील स्त्रिया आपल्या कोठ्यात साठवलेले धान वाळविण्यासाठी त्या खडकाचा उपयोग करीत. धानाच्या मोठमोठ्या पेंढ्या त्या सपाट खडकाच्या उतारावर पसरल्या जात होत्या. धान चांगले वाळल्यावर झाडाला बांधून ठेवलेल्या एका बैलजोडीच्या पायांखाली तुडविले जाऊन दाणा मोकळा केला जाणार होता. खडकाजवळचे हे खेडे कुठल्याही शहरापासून बरेच दूर होते. चिंचेच्या प्रचंड वृक्षांच्या सावल्यांनी ते पूर्णपणे झाकून टाकलेले होते. खोऱ्यातून एक पायवाट खेड्याकडे व त्याच्याही पलीकडे जात होती. जवळच्या डोंगराच्या उतरणीवर गुरेढोरे व असंख्य शेळ्या चरत होत्या. धानाची शेते पाण्याने तुडुंब भरलेली होती. आणि धानशेतांवरचे पांढरे पक्षी या शेताकडून त्या शेताकडे उडत होते. ते कुणाला भीत नव्हते, पण काहीसे बुजरे होते. त्यामुळे कुणालाही ते आपल्या फारसे जवळ येऊ देत नव्हते. आंब्याला मोहर येऊ लागला होता. नदीच्या खळखळत्या प्रवाहाचा मधुर ध्वनी कानी पडत होता. हा सर्व प्रदेश अतिशय प्रसन्न होता. आणि तरीही एखाद्या भयंकर रोगाप्रमाणे त्याच्यावर दारिद्र्याची काळी सावली पडली होती. स्वेच्छेने गरीब असणे वेगळे, आणि अनिच्छेने गरीब रहावे लागणे हे अगदीच वेगळे. या ठिकाणचे खेडूत गरीब होते आणि बरेचसे रोगपीडितही होते. आता या खेड्यात एक दवाखाना उघडला गेला होता आणि धान्याचेही वाटप करण्यात येऊ लागले होते. पण शतकानुशतकांच्या दारिद्र्यामुळे घडून आलेली हानी थोड्याशा वर्षांत कशी भरून निघणार ? उपासमार ही काही एखाद्या जमातीची किंवा देशाची समस्या नव्हे, तर ती सगळ्या जगाचीच समस्या आहे.

सूर्य अस्ताला जाऊ लागला, तशा पूर्वेकडून मंदमंद पवनलहरी येऊ लागल्या. आणि डोंगराच्या दिशेने जणू सामर्थ्याचा झोतच येत आहे असे वाटत होते. हे डोंगर फारसे उंच नव्हते. पण भोवतालच्या वातावरणात सौम्य शीतलता पसरून येण्याइतके उंच मात्र निश्चितच होते. सपाट मैदानी प्रदेशातील हवेपेक्षाही डोंगरातील शीतल हवा किती वेगळी असते !

आकाशातील अगणित तारका डोंगरांच्या अगदी जवळच लटकल्यासारख्या वाटत होत्या. मधूनच चित्त्याचे गुरगुरणे ऐकू येत होते. काळवंडत जाणाऱ्या डोंगरामागच्या सायंप्रकाशाने आसपासच्या साऱ्या परिसराला त्या मधुर सायंकाळी एक आगळे सौंदर्य व एक नवा गहन अर्थ प्राप्त करून दिला होता. नदीवरच्या पुलावर आम्ही बसलो असताना त्या वाटेने घराकडे जाणारे खेडूत जवळ येताच

एकदम बोलणे थांववीत आणि दूर काळोखात दिसेनासे झाले की, पुन्हा आपले संभाषण सुरू करीत.

मानवी मन जी जी दृश्ये कल्पनेने निर्माण करीत राहते, ती किती पोकळ, किती निर्बुद्ध असतात ! पण जेव्हा आपल्या साधनांच्या साह्याने–स्मृती व काल यांच्या साह्याने–विकल्पनांच्या प्रचंड इमारती उभारण्याचे आपले कार्य थांवविते, तेव्हा ते नामातीत, ते कालातीत तेथे अवतरते.

रस्त्याने एक कंदील लटकाविलेली बैलगाडी हळूहळू येत होती. गतीच्या मंथरतेमुळे तिच्या चाकांच्या लोखंडी धावा रस्त्याला हलकेच स्पर्श करीत होत्या. गाडीवान आत स्वस्थ निजला होता. पण बैलांना आपल्या घराची वाट माहीत होती. हळूहळू चालत ते अंधारात दिसेनासे झाले. आता तेथे अतीव निःशब्दता नांदू लागली. संध्यातारक डोंगरमाथ्यावरून नुकताच लुकलुकू लागला होता. पण तो लवकरच मावळणार होता. दुरून एका घुबडाचा शब्द ऐकू येत होता. आसपास सगळीकडे रातकिड्यांची दुनिया जागृत होऊन किर्र शब्द करू लागली होती. पण त्यामुळे वातावरणातील शांती भंग पावली नाही. त्या अगणित चांदण्या, ते एकाकी घुबड आणि ते असंख्य रातकिडे, या सर्वांना त्या शांतीने आपल्यात सामावून घेतले होते. या शांतीकडे कान देऊन ऐकू लागले की ती नाहीशी होऊन जाई. पण तिच्यात विलोपून गेले की, मग मात्र ती आपले स्वागत करी. शांतीचे निरीक्षण करणारा निरीक्षक शांतीत विलोपून जाऊ शकत नाही कारण तो बाहेरून पाहत असतो. तो शांतीमध्ये सामावून गेलेला नसतो. निरीक्षक केवळ अनुभव घेत असतो. तो अनुभव होऊन जात नाही, ती वस्तू बनून जात नाही.

भेटीला आलेला गृहस्थ सान्या जगभर प्रवास करून आला होता. त्याला अनेक भाषा अवगत होत्या. प्राध्यापकाचे व परराष्ट्रखात्यातील मुत्सद्याचेही काम त्याने केलेले होते. त्याने ऑक्सफर्ड विश्वविद्यालयात शिक्षण घेतले होते. आपल्या नोकरीत त्याची झपाटचाने प्रगती होत राहिल्यामुळे, ठराविक वयाच्या अगोदरच तो सेवानिवृत्त झाला होता. पाश्चात्य संगीताशी त्याचा बराच परिचय असला तरी स्वदेशातील संगीतच त्याला आवडत होते. त्याने वेगवेगळचा धर्मांचा अभ्यास केलेला असला, तरी बुद्ध धर्माचाच त्याच्यावर विशेष प्रभाव पडला होता. प्रत्येक धर्माच्या भोवती ज्या अंधश्रद्धा, जी आप्तवाक्ये व जे विधिनियम जमत असतात ते जर बाजूला सारले, तर सगळचा धर्मातील वचने सामान्यतः सारखीच असतात, असे त्याचे स्पष्ट मत होते. 'काही धार्मिक विधींमध्ये अतिशय सौंदर्य असते खरे, पण अखेर पैसा व स्वप्नरंजन यांचाच सर्व धर्मांवर जबरदस्त पगडा बसत असतो ही वस्तुस्थिती आहे; आपण मात्र या धर्मविधींपासून व आप्तवाक्यांच्या दडपणापासून मुक्त आहोत' असे त्याने सांगितले. संमोहनविद्या, विचारसंक्रमण

व अतींद्रियदर्शन इत्यादी गोष्टींशी काही काळ तो खेळ खेळून चुकला होता. पण या गोष्टी म्हणजे अंतिम साध्य होय, असे त्याने कधीच मानले नव्हते. निरीक्षणाची किंवा संवेदनग्रहणाची शक्ती माणसाला वाढविता येणे सहज शक्य आहे; तसेच भौतिक वस्तूंचे नियंत्रण अधिक प्रभावीपणे करणेही शक्य आहे; पण अशा प्रकारचे सामर्थ्य अगदी सामान्य व उघड स्वरूपाचे आहे, असे त्याचे स्पष्ट मत होते. त्याने प्रयोग करून पाहण्यासाठी अगदी अद्ययावत अशा विशिष्ट औषधी घेऊन पाहिल्या होत्या. इंद्रियांचे जे सामान्य संवेदन असते, त्यापेक्षा कितीतरी अधिक उत्कट व अधिक सूक्ष्म स्वरूपाचे संवेदन व अनुभव त्याला या औषधींमुळे प्राप्त झाले होते. पण अशा प्रकारच्या अनुभवांना त्याने कधीच विशेष महत्त्व दिले नव्हते. कारण साऱ्या अशाश्वत व क्षणभंगुर गोष्टींच्या पलीकडे जे आहे, त्याचे दर्शन घडविण्यास या औषधी सर्वस्वी असमर्थ आहेत याची त्याला स्पष्ट जाणीव होती.

तो सांगू लागला, "ध्यानधारणेच्या विविध प्रकारांचे मी आचरण केलेले आहे. एक वर्षभर तर सर्व प्रकारच्या कर्मांपासून निवृत्त होऊन एकांतवासात मी ध्यानधारणा करीत होतो. ध्यानाबद्दल आपण वेळोवेळी जे काही सांगत आला आहात, ते सर्व मी वाचले आहे. माझ्यावर त्याचा सखोल परिणामही झाला आहे. अगदी लहानपणापासून ध्यान या शब्दाचा माझ्या मनावर विलक्षण प्रभाव पडे. ध्यानधारणेत मला एक अलौकिक सौंदर्य व आनंद आजवर मिळत आलेला आहे. आयुष्यात ज्या काही थोड्या गोष्टींच्या आनंदाचा मी उपभोग घेतलेला आहे, त्यांच्यापैकी ध्यान ही एक गोष्ट आहे. अर्थात ध्यानासारख्या गहन गंभीर गोष्टीबाबत 'उपभोग' हा शब्द वापरावा की नाही कोण जाणे. पण ध्यानामधून प्राप्त होणारा आनंद मी आजही उपभोगीत आहे. इतकेच काय, पण आता तो अधिक गहन व अधिक विशाल झाला आहे, आणि आपण ध्यानाबद्दल काही सांगितले आहे त्याने तर मला जणू स्वर्गाची दारेच उघडून दिली आहेत. आपण ध्यानासंबंधी आजवर जे काही सांगितले आहे, ते सर्व मी वाचले आहे. म्हणून याबद्दल अधिक काही मला आपल्याला विचारावयाचे नाही. पण नुकतीच माझ्या जीवनाची एक घटना घडली, तिच्याबद्दल मात्र आपणाजवळ बोलण्याची माझी इच्छा आहे."

तो किंचित्काळ थोडासा थांबला व नंतर बोलू लागला,

"आतापर्यंत आपल्याला मी जे काही सांगितले त्यावरून प्रतीकात्मक प्रतिमा निर्माण करून त्याची पूजा करणारा काही मी मनुष्य नाही, हे आपल्या लक्षात आले असेलच. स्वप्रक्षेपित अशा धार्मिक तत्त्वांशी किंवा प्रतिमांशी सारुप्य पावण्याचे मी आजवर कटाक्षाने टाळीत आलो आहे. काही साधुपुरुषांना—निदान लोक ज्यांना साधुपुरुष म्हणतात त्यांच्यापैकी काही जणांना—कृष्ण, ख्रिस्त, कालीमाता किंवा

कुमारी मेरी यांचे दर्शन झाले होते असे आम्ही ऐकतो व वाचतो. एखाद्या विशिष्ट निष्ठेने स्वतःला संमोहित करून घेऊन विशिष्ट दर्शने माणसे किती सहजपणे निर्माण करू शकतात व या दर्शनांमुळे त्यांच्या संपूर्ण जीवनात केवढे विलक्षण परिवर्तन घडून येते, या सर्व गोष्टींची मला कल्पना आहे. पण अशा कुठल्याही भ्रमामध्ये वा आभासामध्ये राहण्याची माझी इच्छा नाही. एवढी सगळी प्रस्तावना केल्यानंतर, काही आठवड्यांपूर्वी माझ्या जीवनात जो एक प्रसंग घडून आला तो वर्णन करून सांगण्याची माझी इच्छा आहे.

"गंभीर प्रश्नांची चर्चा करण्यासाठी आम्ही काहीजण नेहमी एकत्र जमत असतो. अशाच एका सायंकाळी साम्यवाद व कॅथॉलिक धर्म यांच्यामध्ये आढळून येणाऱ्या विलक्षण साम्याबद्दल आम्ही काहीशा तीव्रतेने चर्चा करीत होतो. इतक्यात एकाएकी मुंडन केलेली व पीतवस्त्र परिधान केलेली एक व्यक्ती त्या खोलीत वसलेली मला आढळली. ती दृष्टीस पडताच मी चमकलो. पुन्हा पुन्हा डोळे चोळून मी माझ्या मित्रांच्या चेहऱ्यांकडे पाहिले. पण त्या व्यक्तीच्या अस्तित्वाचे भान कुणालाही असल्यासारखे दिसले नाही. आपल्या वादविवादात ते सर्वजण इतके काही मग्न झाले होते की, माझे मौनही त्यांच्यापैकी कुणाच्या ध्यानात आले नाही. मी डोके जोराने हालवून पाहिले, खोकून पाहिले व पुन्हा पुन्हा डोळे चोळून पाहिले. पण ती व्यक्ती तेथेच वसलेली आढळली. त्या व्यक्तीची मुद्रा किती भव्य सुंदर होती हे मी शब्दात वर्णन करून सांगू शकत नाही. त्या व्यक्तीचे सौंदर्य हे काही केवळ आकृतीचे सौंदर्य नव्हते. तर त्याहून अनंत पटींनी श्रेष्ठ असे ते सौंदर्य होते. त्या चेहऱ्यावरून दृष्टी काढून घेणे मला अशक्य होऊन वसले होते. पण हे सगळे मला अनावर होऊ लागले आणि माझ्या मित्रांच्या ध्यानात माझे मौन येऊ नये व चकित वृत्तीने कशावर तरी माझी दृष्टी खिळलेली आहे हेही ध्यानात येऊ नये असे मला उत्कटतेने वाटले. म्हणून मी चटकन उठलो व बाहेर व्हरांड्यात जाऊन उभा राहिलो.

"रात्रीच्या मंदशीतल वायुलहरींमध्ये एक प्रकारचा ताजेपणा भरून राहिला होता. काही वेळ मी व्हरांड्यात येरझारा घातल्या व नंतर पुन्हा खोलीत गेलो. आतील वादविवाद अजून चालूच होता. पण खोलीचे वातावरण आता बदलून गेले होते आणि पूर्वीच्याच ठिकाणी जमिनीवर ती गंभीर सुंदर आकृती वसलेली होती. संपूर्ण मुंडन केलेल्या त्या मस्तकाचे सौंदर्य अतिशय अलौकिक होते. खोलीत जी चर्चा चालली होती, तिच्यात भाग घेणे आता मला अशक्य होऊन गेले होते. लवकरच चर्चा संपली व आम्ही सर्व खोलीबाहेर पडलो. मी घराच्या वाटेला लागलो. ती आकृतीही माझ्या पुढेपुढेच चालली होती.

"ही घटना काही आठवड्यांपूर्वी घडली. पण माझ्या मनातून ती अजून नाहीशी झाली नाही. अर्थात त्या वेळच्या त्या आकृतीच्या सान्निध्याचा उत्कट प्रत्यय आता

मला येत नाही. पण जेव्हा जेव्हा मी डोळे मिटतो, तेव्हा तेव्हा ती आकृती मला दिसते. या घटनेचा माझ्यावर काही विलक्षणच परिणाम झाला आहे. पण त्या परिणामाबद्दल बोलण्यापूर्वी, हा अनुभव आहे तरी काय, हे मला विचारावेसे वाटते. माझ्या अबोध मनातील गतानुभवांनी माझ्या इच्छेच्या व जाणिवेच्या नकळत केलेला हा प्रक्षेप का आहे? की माझ्या जाणिवेशी मुळीच संबंध नसलेला आणि माझ्यापासून पूर्ण वेगळा व स्वतंत्र असणारा हा प्रकार आहे? मी याबद्दल खूप विचार करून पाहिला आहे. पण याचे वास्तव स्वरूप काय असावे हे काही अजून माझ्या ध्यानात येत नाही."

तुम्हांला हा जो अनुभव आलेला आहे, त्याचे तुम्हांला विशेष मोल वाटते का? तो तुमच्या दृष्टीने अतिशय महत्त्वपूर्ण होऊन बसला आहे का? तो पक्का धरून ठेवावा असे तुम्हांला वाटत आहे का?

"आपल्या प्रश्नाचे प्रामाणिक उत्तर द्यावयाचे झाले तर होय, असेच म्हणावे लागेल, असे वाटते. या अनुभवाने माझ्यामध्ये नवसर्जनाची एक नवी उसळी निर्माण केली आहे. अर्थात मी कविता लिहिण्यास सुरुवात केली आहे किंवा चित्रे रंगविण्यास प्रारंभ केला आहे, असा काही याचा अर्थ नाही. पण या अनुभवाने मला सखोल शांतीचा व विमुक्ततेचा प्रत्यय आणून दिला आहे, हे निश्चित. त्याने माझ्यात फार मोठे परिवर्तन घडवून आणले आहे. म्हणूनच मला या अनुभवाचे विशेष मोल वाटते. माझ्या जीवनाच्या दृष्टीने हा अनुभव फार महत्त्वाचा आहे. त्यामुळे काय वाटेल ते झाले तरी तो टाकून देण्यास मी केव्हाही तयार होणार नाही."

हा अनुभव आपल्या हातून निसटून जाईल, अशी भीती तुम्हांला वाटत आहे का? त्या आकृतीचा तुम्ही जाणून-सवरून पाठलाग करीत आहात का? की ती आकृती तुमच्या जीवनातील एक अखंड जागती जिवंत अशी वस्तू होऊन बसली आहे?

"माझा हा अनुभव निसटून जाईल की काय अशी मला भीती वाटते, हे खरे आहे. यामुळेच मी त्या आकृतीचे सदैव चिंतन करीत असतो आणि मनाची सुखद अवस्था निर्माण करण्यासाठीही मी त्या आकृतीचा उपयोग करीत असतो. बाकी आतापर्यंत या दृष्टीने मी त्या अनुभवाकडे कधीच पाहिले नव्हते. पण आपण आता जेव्हा मला स्पष्टपणे विचारले, तेव्हाच मी काय करीत आहे याची मला जाणीव झाली."

ही आकृती तुम्हांला जागती, जिवंत अशी वाटत आहे का? की एकदा येऊन गेलेल्या आकृतीचे ते नुसते स्मरण आहे?

"आपल्या या प्रश्नाचे उत्तर देण्याची मला भीतीच वाटू लागली आहे. कृपा करून मला भावनाविवश समजू नका. पण हा अनुभव माझ्या जीवनात अतिशय मोलाचा होऊन बसला आहे. या अनुभवाविषयी बोलण्यासाठी व त्यातील वास्तवता जाणून घेण्यासाठीच जरी मी आपल्याकडे आलो असलो, तरी आता त्याच्या खोलात

शिरू नये असेच मला वाटू लागले आहे. त्यावावत बोलण्याचा मला काहीसा संकोच वाटू लागला आहे. पण आता मला हे सारे समजून घेणे भागच आहे ती आकृती कधीकधी जागती, जिवंत असते. पण बहुतेक वेळ ते गत अनुभवांचे स्मरणच असते."

जे आपल्याला अतिशय आवडते, त्याच्यात मन अडकू न देता, वास्तव काय आहे याचे अवधान ठेवणे, हे किती महत्त्वाचे आहे हे आता तुमच्या लक्षात आलेच असेल. एखादा सुखद आभास निर्माण करून त्याच्या आधाराने जगत राहणे हे केव्हाही सोपे असते. म्हणून आता या गोष्टीचा आपण सावकाशपणे विचार करू या. गतानुभव हा कितीही सुखद असला, कितीही सुसंस्कारी असला, तरी जे वर्तमान वास्तव आहे, ते अनुभविण्याच्या तो आडच येत राहतो. जे वर्तमान आहे ते अखंड नवेच असते. म्हणून हजारो गतानुभवांमध्ये रंगत न राहाता, वर्तमानात जगत राहणे हे मनाला अतिशय अवघड व कष्टप्रद वाटत असते. तुम्ही त्या सुखद गतानुभवाच्या स्मृतीला बिलगून बसला आहात. म्हणून वर्तमानातील अनुभवांकडे तुम्ही पाठ फिरवीत आहात. गताला नेहमीच अंत असतो. पण वर्तमान हे मात्र सदैव नित्यनूतन असते. तुम्ही पाहिलेल्या त्या आकृतीची स्मृती आजही तुमच्या मनाला मोहवीत आहे, स्फूर्ती देत आहे, एका नव्या विमुक्ततेचा आस्वाद तुम्हांला मिळवून देत आहे. वस्तुतः तुमच्या जिवंतपणात ते गत, ते मृत प्राण ओतीत आहे. खरोखरीचे जगणे म्हणजे काय हे आपणापैकी बहुतेकांना माहीतच नसते. कारण आपण गताच्या, मृताच्या संगतीतच, मृत स्मृतींच्या सान्निध्यातच जीवन घालवीत असतो.

अतिशय मोलाचे असे काही आपण गमावून तर बसणार नाही ना, ही भीती तुमच्या मनात घर करू पाहत आहे, हे तुमच्या ध्यानात आणून द्यावेसे वाटते. भीतीने तुमच्या मनात पक्के ठाणे दिले आहे. त्या एका अनुभवामधून, लोभीपणा, भीती, गतानुभवाचे ओझे, आणि स्वतःच्या जीवनाचा रितेपणा अशा नानाविध समस्या तुम्ही उत्पन्न केल्या आहेत. पण हे पक्के लक्षात ठेवा की, लोभीपणाच्या सर्व प्रकारच्या उद्रेकांपासून मन जर विमुक्त होऊ शकले, तरच अनुभविण्याला एक आगळीच अर्थवत्ता प्राप्त होते. आणि भीती पूर्णपणे नष्ट होऊन जाते. भीती ही वस्तुतः नुसती छाया असते; कशाची तरी छाया असते. तिला स्वतंत्र अस्तित्व मुळीच नसते.

"मी खरोखर काय करीत होतो, याची मला आता जाणीव होऊ लागली आहे. या बाबतीत मी स्वतःला क्षमा करणार नाही. पण तो अनुभव अतिशय उत्कट असल्यामुळे, तो पक्का धरून ठेवण्याची माझी अभिलाषाही तशीच तीव्र बनली आहे. सखोल व भावनोत्कट अशा अनुभवात अडकू न देणे हे खरोखर केवढे अवघड

आहे ! एखाद्या उत्कट अनुभवाची स्मृती ही देखील त्या अनुभवाइतकीच सामर्थ्यशाली असते."

प्रत्यक्ष अनुभविणे आणि अनुभवाची स्मृती वाळगणे या दोहोतील भेद लक्षात घेणे अतिशय अवघड असते, नाही का ? प्रत्यक्ष अनुभविण्याचे गतानुभवामध्ये किंवा स्मृतीमध्ये केव्हा वरे रूपांतर होत असते ? दोहोंमधील सूक्ष्म भेद कोणता वरे असतो ? हा दोहोंतील भेद हा कालाचा भेद असतो का ? प्रत्यक्ष अनुभविण्यात काल अस्तित्वातच येत नसतो. पण गत अनुभूती ही मात्र गत कालाकडेच वाटचाल करीत राहते. वर्तमान क्षण किंवा अनुभविण्याची अवस्था नकळत गतकालाकडेच जात राहते. प्रत्येक जिवंत अनुभव एका क्षणानंतर गत-अनुभवच बनतो; स्मृतिरूपच होऊन जातो. ही सगळी प्रक्रिया आपल्या पूर्ण परिचयाची असते. आणि ती अपरिहार्यच आहे अशी आपली समजूत असते. पण हे खरे आहे का ?

"आपण जे उकलून दाखवीत आहात, ते मी अत्यंत लक्षपूर्वक श्रवण करीत आहे. आपण या समग्र प्रक्रियेचे स्वरूप लक्षात आणून देत आहात, याचा मला अतिशय आनंद होत आहे. कारण मी स्वतःच नाना स्मृतींचे गाठोडे आहे; माझ्या जीवनातील कोणत्याही स्तरावर पाहिले तरी मी केवळ स्मृतिसंचयच आहे, याची मला जाणीव होत आहे. स्वतः मी म्हणजेच स्मृतिसंचय ! प्रत्यक्ष अनुभविण्याच्या अवस्थेत राहणे हे माणसाला शक्य आहे का, हेच आपण आता विचारीत आहात ना ?"

हे ध्यानात घ्या की, आपणा सर्वांच्या दृष्टीने शब्दांचे वेगवेगळे सूक्ष्म अर्थ होत असतात. म्हणून शब्द ज्या ज्या गोष्टीशी संलग्न झालेले असतात, आणि या गोष्टींच्या ज्या ज्या प्रतिक्रिया मनात उठत राहतात, त्या सर्वांच्या पलीकडे जर आपण क्षणकाल जाऊ शकलो, तरच कदाचित आपल्याला सत्याचे दर्शन होऊ शकेल. आपणापैकी बहुतेकांच्याच जीवनात अनुभविण्याच्या अवस्थेचे स्मृतीमध्ये चटकन रूपांतर होऊन जात असते. बाहेरून जे जे येत राहते ते ते एकतर ग्रहण करीत राहणे, आत्मसात करीत राहणे, किंवा त्याला नकार देऊन ते बाहेर ढकलून देत राहणे असाच आपल्या मनाचा व्यापार अव्याहतपणे चालू राहत नसतो का ? जे जे सुखद, संस्कारी व सार्थ वाटते, त्यालाच मन बिलगून बसत नसते का ? आणि जे जे मनाला उपयुक्त वाटत नाही, ते ते टाकून देण्याचाच प्रयत्न मन करीत नसते का ? या प्रक्रियेवाचून मन क्षणकाल तरी राहू शकते का ? पण असा प्रश्न करण्यात काही अर्थ नाही. कारण प्रश्न विचारता विचारताच त्यातील व्यर्थता आपल्या ध्यानात येईल.

आता येथून आपण पुढे जाऊ या. भावात्मक वा अभावात्मक संचय करीत राहण्याची मनाची जी प्रवृत्ती आहे, मूल्यमापन करीत राहण्याची मनाची ही जो प्रक्रिया

आहे, ती प्रक्रियाच नियंत्रकाचे रूप धारण करीत असते. तीच निरीक्षक, अनुभविता, विचारक व अहं बनत असते. प्रत्यक्ष अनुभविण्याच्या क्षणी अनुभविता हा मुळी अस्तित्वातच नसतो. पण जेव्हा आलेल्या अनुभवांची निवड करण्यास सुरुवात होते; म्हणजेच, जेव्हा जिवंत, प्रत्यक्ष अनुभविणे संपून गत अनुभवांचा संचय करण्यास सुरुवात होते, तेव्हाच अनुभविता अस्तित्वात येतो. काही तरी प्राप्त करून घेण्याची ऊर्मी हीच, प्रत्यक्ष अनुभविण्याचा अंत घडवून आणीत असते आणि अनुभवाला गतानुभूतीचे स्मृतीचे रूप देत असते. म्हणून जोवर हा निरीक्षक, हा अनुभविता अस्तित्वात राहील, तोवर प्राप्त करण्याची, संचय करीत राहण्याची प्रक्रिया ही अटळच राहील. जोवर निरीक्षण करणारी, निवड करणारी ही अहंवाचक वेगळी वस्तू अस्तित्वात राहील, तोवर कुणीतरी विशेष होणे, किंवा काहीतरी मिळविणे, असेच अनुभविण्याचे स्वरूप राहील.

" पण मग ही वेगळी वस्तू, हा निरीक्षक, हा अहं नाहीसा कसा होईल ?"

असा प्रश्न तुम्ही का वरे विचारीत आहात ? ' कसे करता येईल ' हे विचारणे, ही काहीतरी प्राप्त करून घेण्याचीच नवी रीत असते. आपण सध्या काहीतरी प्राप्त करून घेण्याच्या आपल्या हव्यासाचा विचार करीत आहोत. या हव्यासापासून मुक्त कसे व्हावयाचे याचा विचार करीत नाही. मुक्ती ही जेव्हा ' कशापासून ' तरी मिळवावयाची असते, तेव्हा ती खरोखर मुक्ती नसतेच. तो एक प्रतिकाराचा वा प्रतिक्रियेचाच प्रकार असतो. आणि तो अधिकाधिक विरोधच काय तो वाढवीत राहतो.

आता तुमच्या मूळ प्रश्नाकडे वळू या. तुम्ही पाहिलेली आकृती ही तुमच्या मनाने प्रक्षेपित केलेली आकृती होती की, तुमच्या प्रक्षेपावाचूनच ती अस्तित्वात आली होती ? ती अगदी स्वतंत्रपणे उत्पन्न झाली होती का ? बाकी आपली जाणीव ही अतिशय गुंतागुंतीची वस्तू असल्यामुळे, या प्रश्नाचे काही निश्चित उत्तर देणे हे मूर्खपणाचेच होईल, नाही का ? पण कशाचीही ओळख पटणे हे मनाच्या पूर्वसंस्कारबद्धतेवरच अवलंबून असते, ही गोष्ट तुमच्या सहज ध्यानात येईल. तुम्ही बुद्धधर्माचा अभ्यास केला होता आणि तुमच्याच सांगण्याप्रमाणे इतर कोणत्याही धर्मापेक्षा त्याने तुमच्या मनावर अधिक प्रभाव पाडला होता. या प्रभावशाली संस्कारांनी तुमचे मन संस्कारप्रभावित झाले होते. म्हणून तुमचे सबोध मन हे अगदी वेगळ्या गोष्टीत गुंतलेले असले, तरी तुमच्या या संस्कारप्रभावितेतूनच ही आकृती प्रक्षेपित झाली असावी. दुसरे असे की तुम्ही ज्या रीतीचे जीवन जगत आहात, तिच्यामुळे त्याचप्रमाणे मित्रांबरोबर तुमची जी धर्मविषयक चर्चा चालली होती तिच्यामुळे त्या वेळी तुमच्या मनाची संवेदनक्षमता विशेष तीव्र व तरल झाली असावी. आणि त्यामुळे तुमच्याच विचाराने धारण केलेली बुद्धाकृती, इतरांना जशी

ख्रिस्ताकृती 'दिसते' त्याचप्रमाणे तुमच्या डोळ्यांना 'दिसली' असावी. पण ही आकृती स्वप्रक्षेपित होती किंवा नव्हती, हा काही महत्त्वाचा प्रश्न नाही. आहे का महत्त्वाचा ?

"महत्त्वाचा नसेलही कदाचित. पण त्या आकृतीने मला बराच मोठा प्रत्यय आणून दिला आहे."

बराच आणून दिला आहे का ? स्वतःच्या मनोव्यापारांचे दर्शन काही त्या अनुभवाने तुम्हांला करून दिलेले नाही. पण तुम्ही मात्र त्या अनुभवात वंदिवान होऊन गेला आहात. वस्तुतः अनुभवाबरोबर जेव्हा निजज्ञान होते, तेव्हाच त्या अनुभवाला सार्थता प्राप्त होते. हे निजज्ञानच केवळ मनुष्याला विमुक्तता मिळवून देत असते; एकात्मता प्राप्त करून देत असते. पण निजज्ञान झाले नाही, तर अनुभव हे केवळ ओझे होऊन बसते. व ते नानाविध आभास उत्पन्न करीत राहते.

प्रीतीची समस्या

त्या प्रशस्त कालव्यामधून एक लहानसे बदक पोहत पोहत येत होते. एखाद्या शिडाच्या नावेसारखे एकटेच पोहत क्वॅक् क्वॅक् असा आवाज करीत ते ऐटीत येत होते. आसपास कुठेही आणखी बदके दिसत नव्हती. पण हे एकच बदक जोराने आवाज करून अनेकांची जागा भरून काढीत होते. ज्या थोड्यांनी बदकाचा आवाज ऐकला, त्यांच्यापैकी कुणीही त्याच्याकडे लक्ष दिले नाही. पण त्या बदकाला त्याची मुळीच पर्वा नव्हती. उलट आपण या कालव्यातील एक महत्त्वाचा प्राणी आहोत आणि आपणच या कालव्याचे स्वामी आहोत, असेच जणू त्याला वाटत होते.

शहरापलीकडच्या प्रदेशात हिरवीचार कुरणे दूरवर पसरलेली होती. ही हिरवळ साहजिकच नेत्रांना अतिशय सुखद वाटत होती. या कुरणामध्ये काही काळ्याशार व पांढऱ्याशुभ्र पुष्ट गाई मजेत चरत होत्या. दूर क्षितिजावर मेघांची दाटी झालेली होती. आणि आकाश जणू धरणीवर ओळंबल्यासारखे वाटत होते. पृथ्वीवर या एवढ्याच प्रदेशात आढळून येणारा एक आगळाच प्रकाश आकाशात दाटून राहिला होता. भोवतालचा सर्व प्रदेश तळहातासारखा सपाट होता. शहरातून वळणे घेत घेत वाहणाऱ्या त्या कालव्यावर जेथे जेथे पूल होते, तेथील रस्ते काहीसे उंचावलेले होते. त्या रमणीय सायंकाळी उत्तर सागराच्या दिशेने सूर्य अस्तास चालला होता. मावळत्या सूर्याच्या लाल-केशरी रंगाने सगळे मेघ रंगलेले होते. निळ्या व गुलाबी रंगाचे मोठमोठे पट्टे आकाशभर पसरले होते.

भेटीस आलेली स्त्री एका अतिशय सुप्रसिद्ध नेत्याची पत्नी होती. त्याचे शासनामधील स्थान जवळजवळ सर्वोच्च श्रेणीचे होते. सुंदर वेषभूषा व वृत्तीची शांतता जशी तिच्या ठायी होती, त्याचप्रमाणे सत्तासंपत्तीवरोबर येणारे विशिष्ट वातावरण तिच्याभोवती पसरले होते. तात्काळ आज्ञापालन करून घेण्याच्या दीर्घकालीन सवयीमुळे जी आत्मनिश्चितता व्यक्तीच्या ठायी येते, ती तिच्यात आढळून येत होती. तिने सांगितलेल्या एक दोन गोष्टींवरून हे स्पष्ट दिसून येत होते की तिच्या पतीच्या ठायी जशी तीव्र बुद्धिमत्ता, तशी तिच्या स्वतःमध्ये तीव्र प्रेरकशक्ती वास करीत होती. उभयतांच्या या गुणसंमीलनामुळे तिच्या पतीला वरेच उच्च स्थान प्राप्त झाले होते. पण अधिक सत्ता व अधिक उच्च पद मिळण्याचा क्षण जेव्हा आला, नेमक्या त्याच वेळी तिच्या पतीवर एका गंभीर स्वरूपाच्या रोगाने जबरदस्त आघात केला. आपल्या जीवनकथेतील हा भाग सांगता सांगता ती एकदम थबकली. तिच्याने पुढे बोलवेना. नेत्रातून घळघळ अश्रू वाहू लागले. तो आली त्या वेळी तिच्या मुखावर आत्मविश्वासाचे स्मित खेळत होते. पण ते लवकरच

मावळले. किंचित मागे सरकून काही काळ ती अगदी निःशब्द बसून राहिली. नंतर तिने सावकाश बोलण्यास प्रारंभ केला.

"मी आपली काही प्रवचने वाचली आहेत व एक दोन प्रत्यक्ष ऐकली आहेत. आपल्या सांगण्याकडे जेव्हा मी कान देऊन ऐकत होते, त्या वेळी ते बोलणे मला अतिशय अर्थपूर्ण वाटत होते. पण नंतर या गोष्टी चटकन् नाहीशा होऊन जातात. आज मात्र मी अतिशय संकटात आहे, म्हणून आपली भेट घ्यावी असे मला तीव्रतेने वाटले. काय काय घडले आहे याची आपल्याला माहिती असावी अशी माझी खात्री आहे. माझ्या पतीचा रोग आता असाध्य झाला आहे. त्यामुळे ज्या ज्या साध्यांसाठी आम्ही दोघे आजवर उत्कटतेने जगत होतो व कार्य करीत होतो, ती सर्व आता छिन्नभिन्न होऊन जात आहेत. तसा आमचा राजकीय पक्ष व त्यांचे कार्यही चालूच राहील. पण माझ्या पतीच्या सेवेत डॉक्टर व परिचारिका असल्या, तरी मी स्वतःही त्यांची जातीने शुश्रूषा करीत आहे. त्यामुळे अनेक महिन्यांत मला पुरेशी झोप मिळाली नाही. या रोगातून ते बरे होण्याचा संभव अतिशयच कमी आहे, असे डॉक्टर सांगत आहेत. पण त्यांच्या नाहीशा होण्याचा विचारही मला असह्य होत आहे. मी या सर्व परिस्थितीचा अहर्निश विचार करीत असते. त्यामुळे चिंतेने मी व्याकुळ होऊन गेले आहे. आम्हांला मूलबाळ नाही हे आपल्याला माहीतच आहे. आम्हांला यामुळे परस्परांच्या जीवनात अनन्य स्वरूपाचे स्थान प्राप्त झाले आहे. आणि आता मात्र ——"

तुम्हाला या गोष्टीच्या खोलात शिरून गंभीरपणे विचार करण्याची खरोखरच इच्छा आहे का ?

"मी इतकी विलक्षण हताश होऊन गेले आहे, इतकी वावरून गेले आहे की, गंभीरपणे विचार करण्यास मी समर्थ आहे असे मला वाटत नाही. पण मला स्वतःच्या विचारांचे व भावनांचे स्पष्ट आकलन तर तात्काळ करुन घेतलेच पाहिजे."

तुमची आपल्या पतीवर प्रीती आहे की, त्याच्यामुळे तुम्हांला जे जे प्राप्त झाले आहे, त्या सर्वांवर तुमची प्रीती आहे ?

"माझी प्रीती ——" बोलता बोलताच तिला एवढा धक्का जाणवला की ती एकदम स्तब्ध झाली.

मी विचारलेला प्रश्न निर्दयपणाचा आहे, असे कृपा करून वाटू देऊ नका. पण या प्रश्नाचे यथार्थ उत्तर तुम्ही शोधून काढलेच पाहिजे. नाहीतर तुमचे दुःख कायमच राहील. माझ्या प्रश्नातील गर्भितार्थ शोधून काढण्याचा जर प्रयत्न कराल तर त्यातच तुम्हांला प्रीतीच्या सत्य स्वरूपाचेही दर्शन कदाचित घडेल.

"माझ्या सध्याच्या मनःस्थितीत यावद्दल काहीही विचार करणे हे मला अशक्य आहे."

पण प्रीतीसंबंधीचा हा प्रश्न तुमच्या मनात कधी डोकावलाच नाही का ?

" कदाचित एकदाच. पण मी तो तात्काळ बाजूला सारला. ते आजारी पडण्यापूर्वी माझ्यामागे कामांचा ढीग असे. आणि आता मात्र विचार करणे ही एक वेदनाच होऊन बसली आहे. त्यांना जे उच्च पद व जे श्रेष्ठ सत्तास्थान प्राप्त झाले होते त्यामुळेच मी त्यांच्यावर प्रीती करीत होते का ? की माझी त्यांच्यावर व्यक्ती या नात्यानेच प्रीती होती ? पण हे काय ? ते आता उरले नाहीत अशाच वृत्तीने जणु मी त्यांच्याविषयी बोलत आहे ! माझी त्यांच्यावरील प्रीती कशा प्रकारची आहे, हे माझे मलाच कळेनासे झाले आहे. या क्षणी तर मी अतिशय बावरून गोंधळून गेले आहे. आणि माझे डोके मुळीच काम करीनासे झाले आहे. पुन्हा केव्हातरी येण्याची माझी इच्छा आहे. कदाचित आता जे अटळ होऊन बसले आहे, त्याचा स्वीकार केल्यानंतरच मी येईन. "

स्वीकार करणे हाही मरणाजाच एक प्रकार आहे, ही गोष्ट आपल्या लक्षात आणून देऊ का ?

यानंतर बऱ्याच महिन्यांनी ती स्त्री पुन्हा भेटण्यास आली. वृत्तपत्रांतून तिच्या पतीच्या मृत्युबद्दल कितीतरी लिहिले गेले होते. आणि नंतर लोकांना त्याचा विसरही पडला होता. पतीच्या मृत्यूचा परिणाम तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसून येत होता. ती जेव्हा बोलू लागली तेव्हा क्रोध व कटुता यांचाही प्रत्यय तिच्या बोलण्यातून येऊ लागला.

ती सांगू लागली, " ज्या घटना घडून गेल्या त्यांच्याबद्दल आजवर मी कुणाशीही बोलले नाही. पूर्वीच्या सर्व कार्यांतून मी लागलीच आपले अंग काढून घेतले, आता एका लहानशा गावी राहण्यास जाऊन मी स्वतःला जणू तेथेच पुरून घेतले आहे. जे घडले त्याने मी इतकी विलक्षण हादरून गेले आहे, की मी जर यावद्दल काही बोलू लागले तर आपण ते मनावर घेणार नाही अशी माझी अपेक्षा आहे. प्रथमपासूनच मी विलक्षण महत्त्वाकांक्षी होते. लग्न होण्यापूर्वी मी नाना प्रकारच्या समाजकार्यात भाग घेत असे. पण लग्न झाल्यानंतर मात्र मुख्यतः माझ्या पतींच्यासाठी मी आपली सर्व समाजकार्ये सोडून दिली आणि राजकारणात स्वतःला पूर्णपणे झोकून दिले. राजकारणाच्या क्षेत्रात संघर्षाला व धडपडीला भरपूर वाव असतो. त्यात घालवलेला प्रत्येक क्षण, त्यातील सर्व तऱ्हेची कारस्थाने व सगळे चढउतार, त्यांतील असूया आणि त्यातील सर्व तऱ्हेची कारस्थाने व कारवाया यांचा मी मनमुराद उपभोग घेतलेला आहे. माझे पती स्वभावाने शांत पण बुद्धिमत्तेत अतिशय तीव्र होते आणि माझ्या महत्त्वाकांक्षेची उत्कट प्रेरणा होती. त्यामुळे आम्ही सतत वरवरच चढत राहिलो. मला मूलबाळ नसल्यामुळे माझा सगळा वेळ व माझी सारी बुद्धी व शक्ती पतीचे स्थान उच्चतर करण्यामध्येच मी

वेचली. आम्ही परस्परांना उत्कृष्ट प्रकारे पूरक असल्यामुळे आमची जोडी फार छान जमली होती. सारे काही आमच्या योजनेप्रमाणेच घडत गेले. पण सगळे काही फारच सुरळीत तर चालले नाहीना अशी भीती माझ्या मनाला मधून मधून घरे पाडीत असे. आणि दोन वर्षांपूर्वी एका किरकोळ आजारासाठी माझ्या पतीची डॉक्टर तपासणी करीत असता, त्यांना त्यांच्या शरीरात काही चमत्कारिक वाढ होत असलेली आढळून आली. या वाढीची लागलीच परीक्षा करवून घेतली पाहिजे असे डॉक्टर म्हणाले आणि परीक्षा करविताच ती अनिष्ट वाढ आहे, तो कॅन्सर आहे असे आढळून आले. काही काळ ही गोष्ट आम्ही पूर्ण गुप्त राखू शकलो पण सहा महिन्यांपूर्वी तो रोग पुन्हा उसळला आणि त्यानंतरची सर्व परिस्थिती हे एक भयंकर दिव्यच ठरले.—मागच्या वेळी जेव्हा मी आपल्या भेटीस आले होते तेव्हा मी इतकी दुःखी व चिंताग्रस्त होते की, विचार करणे मला त्या वेळी शक्यच नव्हते. पण कदाचित आता मात्र सगळ्या गोष्टींकडे अधिक स्पष्टपणाने, मोकळेपणाने पाहता येईल असे मला वाटते. त्या वेळच्या आपल्या प्रश्नाने मला विलक्षण बेचैन करून टाकले होते. 'माझी आपल्या पतीवर प्रीती आहे की, त्यांच्यामुळे मला प्राप्त होणाऱ्या गोष्टींवर माझी प्रीती आहे ?' असा प्रश्न आपण विचारला होता, हे कदाचित आपणांस आठवत असेल. या प्रश्नावर मी खूपखूप विचार केला. पण केवळ स्वतःच्या प्रयत्नाने न सोडविण्यासारखी, अतिशय अवघड व गुंतागुंतीची अशीच ही समस्या आहे, असे नाही का आपल्याला वाटत ?"

तसे असेलही कदाचित. पण जोवर तुम्ही प्रीती म्हणजे काय या गोष्टीचा शोध घेणार नाही, तोवर तीव्र वेदना व घोर निराशा तुमच्या जीवनाला ग्रासून टाकीत राहतील. खरी प्रीती कुठे संपते आणि संभ्रम-गोंधळ कुठून सुरू होतो, हे शोधून काढणे हे नेहमी अवघडच असते, होय की नाही ?

"पतीवरील माझी प्रीती ही सत्ता व पद यांच्यावरील प्रीतीने कलुषित झालेली नव्हती का असा प्रश्न आपण विचारीत आहात. माझी महत्त्वाकांक्षा पुरी करण्याची साधने माझ्या पतीने मला मिळवून दिली, म्हणून का पतीवर माझी प्रीती होती ? मला वाटते की, असे काहीसे होते खरे. पण व्यक्ती या नात्यानेही माझी त्यांच्यावर प्रीती होती. प्रीतीमध्ये किती तरी गोष्टी मिसळलेल्या असतात."

पण दोघांमध्ये जेव्हा संपूर्ण सारुप्य घडून येते, तेव्हा तेथे प्रीती खरीच वसत असते का ? एकमेकांशी असे सारुप्य पावणे म्हणजे आडवळणाने स्वतःलाच महत्त्व प्राप्त करून देणे नव्हे का ? जेथे एकटेपणाची व्यथा असते तेथे प्रीती असू शकते का ? जेथे, जीवनाला सार्थता प्राप्त करून देणाऱ्या गोष्टींपासून आपण वंचित केले जाऊ की काय ही भीती व वेदना सलत राहते, तेथे प्रीती असू शकते का ? आत्म-तृप्ती मिळवून देणाऱ्या गोष्टींपासून तुटले जाणे; तसेच ज्या गोष्टींच्या आधाराने

जीवन चालले होते, त्यांच्यापासून वंचित होणे, म्हणजे वस्तुतः स्वतःला मिळत असलेल्या मोठेपणापासून वंचित होणेच होय. अशा या वंचिततेच्या भावनेमुळेच आशाभंग होत असतो, कटुता निर्माण होत असते व जीवनापासून तुटले गेल्याची वेदना उत्पन्न होत असते. अशी ही वेदना, असे हे दुःख म्हणजे का प्रीती होय ?

" माझे आपल्या पतीवर मुळीच प्रेम नव्हते, हे माझ्या लक्षात आणून देण्याचा आपण प्रयत्न करीत आहात ना ? आपण जेव्हा अशा प्रकारे प्रश्नाची मांडणी करता तेव्हा माझ्या भावनेचे स्वरूप हे किती भयानक होते याचे दर्शन मला घडते व मी अगदी हतबुद्ध होऊन जाते. पण या प्रश्नाची वेगळी मांडणी करणे आपल्याला शक्यच नाही का ? मी या गोष्टीबद्दल पूर्वी कधी विचारच केला नव्हता. पतीच्या मृत्यूचा घाला जेव्हा माझ्यावर पडला, तेव्हाच माझ्या जीवनात खरेखुरे दुःख निर्माण झाले. अर्थात मूलबाळ नसल्याच्या निराशेचे दुःख माझ्या जीवनात होतेच. पण माझे पती व आम्हा उभयतांचे कार्य यांचा आधार असल्यामुळे ते बरेचसे सौम्य होऊन गेले होते. माझे पती व आमचे कार्य यांनीच माझ्या मुलांची जागा भरून काढली होती, अशी माझी कल्पना होती. खरोखर, मृत्यूची निश्चितता व अटळ-पणा हा किती भयानक असतो ! त्यांच्या मृत्यूनंतर मला एकाएकी आढळून आले की, मी अगदी एकटी आहे. मला कसलेही कार्य राहिले नाही. मी वाजूला टाकली गेले आहे, विस्मृतीच्या केरकचऱ्यात फेकली गेली आहे. आपण जे सांगता त्यातील यथार्थता आता माझ्या आकलनात येत आहे. पण आपण जर हेच तीनचार वर्षां-पूर्वी मला सांगितले असते तर ते मी ऐकूनही घतले नसते. आता तरी मी आपले सांगणे लक्ष देऊन ऐकत आहे की स्वतःचे समर्थन करण्यासाठी कारणे शोधून काढीत आहे, कोण जाणे ! पुन्हा एकदा येऊन मी आपल्याशी बोलू का ? "

शिक्षकाचा खरा धर्म कोणता ?

ह्या लहानशा खोऱ्यात वडाच्या व चिंचेच्या वृक्षांचेच प्रभुत्व दिसून येत होते. पावसाच्या वर्षावाने संपूर्ण खोरे रसरशीत हिरवेगार होऊन गेले होते. उघड्यावर सूर्याच्या उष्णतेचा चटका चांगलाच जाणवत होता. पण वृक्षांच्या छायेत मात्र सुखद शीतलतेचा अनुभव येत होता. वृक्षांच्या घनदाट सावल्या दूरवर पसरल्या होत्या आणि निळ्याभोर आकाशाच्या पार्श्वभूमीवर त्यांचे आकार डौलदार दिसत होते. या खोऱ्यात आश्चर्य वाटण्याइतकी पक्ष्यांची संख्या आढळून येत होती. आणि पक्षी तरी किती विविध प्रकारचे होते ! ते झाडांवर बसले की, त्यांच्या दाट फांद्यांत चटकन दिसेनासे होत. यानंतर अनेक महिने पाऊस पडण्याचा संभव नसला तरी या घटकेला मात्र सगळचा प्रदेशावर हिरवळ आंथरलेली होती. सारीकडे नीरव निःशब्दता नांदत होती. विहिरी तुडुंब भरलेल्या होत्या आणि धरणींच्या उरी आशा दाटली होती.

जीवन भ्रष्ट करून टाकणारी नगरे या डोंगरापासून बरीच दूर होती. पण जवळची खेडी घाणीने बुजबुजली होती आणि लोकांची उपासमार चालूच होती. सरकार मदतीची आश्वासने देत होते. पण गावकरी त्या बाबतीत उदासीन होते. त्यांच्या सभोवती निसर्गात सारीकडे सौंदर्य व आनंद विखुरलेला होता. पण त्याचे दर्शन घेऊ शकणारी दृष्टी त्यांच्यापाशी नव्हती. तसेच आपल्या आंतरिक वैभवाकडेही त्यांचे लक्ष नव्हते. या समृद्ध सौंदर्यामध्ये राहत असताही लोक संवेदनशून्य होते, रितेरिते होते.

भेटण्यास आलेला गृहस्थ एक शिक्षक होता. त्याचा पगार अल्प आणि कुटुंब मोठे होते. शिक्षणकार्याविषयी त्याला अतिशय आस्था वाटत होती. ' खर्चाची तोंडमिळवणी करणे आपणास बरेच अवघड होत असले, तरी आपण कसेतरी निभावून नेत आहोत आणि दारिद्र्यामुळे आपण विचलित होत नाही; खाण्यापिण्यास भरपूर नसले तरी पुरेसे आहे आणि आपण ज्या शाळेत शिकवितो, तेथे आपल्या मुलांचे शिक्षण फुकट होत असल्यामुळे, एकूण आपले कसेतरी निभत आहे ' अशी तो आपली कहाणी सांगत होता.

तो शिक्षक आपल्या विषयात निष्णात होता व इतरही विषय शिकवीत होता. प्रत्येक बुद्धिमान शिक्षकाला हे करणे सहज शक्य आहे असे त्याचे म्हणणे होते. शिक्षणाविषयी आपल्याला उत्कट आस्था आहे, या गोष्टीवर त्याने पुन्हा जोर दिला.

" शिक्षकाचे खरे कार्य, खरा धर्म कोणता आहे ? " त्याने विचारले.

शिक्षक हा केवळ माहिती देणारा व ज्ञान देणारा का आहे ?

" निदान एवढे तरी त्याने केले पाहिजे असे मला वाटते. कोणत्याही समाजातील मुलामुलींना आपापला उदरनिर्वाह नीट करता यावा म्हणून, त्यांच्या ग्रहणशक्ती-प्रमाणे त्यांना तयार करणे आवश्यकच असते. भावी जीवनात मुलाला धंदा किंवा नोकरी मिळणे सुलभ व्हावे यासाठी, तसेच अधिक चांगली समाजव्यवस्था घडविण्यास त्याला साह्य करता यावे यासाठी, त्याला काही ज्ञान देणे हा शिक्षकाच्या व्यवसायाचा एक भाग आहे. जीवनाला तोंड देण्यासाठी विद्यार्थ्याला तयार केलेच पाहिजे. "

हे आवश्यक आहे खरे. पण शिक्षकाचा खरा धर्म कोणता हे शोधून काढण्याचा आपण आता प्रयत्न करीत आहोत ना ? विद्यार्थ्याला आपल्या नोकरीधंद्यात यशस्वी होता यावे या दृष्टीने त्याला तयार करणे, एवढेच का शिक्षकाचे कार्य आहे ? शिक्षकाच्या व्यवसायाचे महत्त्व याहून अधिक मोठे व अधिक विशाल असे नाही का ?

" अर्थातच आहे. एकतर त्याला विद्यार्थ्यांपुढे आपल्या आचरणाचा आदर्श ठेवता येईल. आपल्या वर्तनाने, आपल्या प्रवृत्तींनी, आपल्या दृष्टिकोनाने आणि एकूण आपल्या संपूर्ण जीवन रीतीने त्याला विद्यार्थ्यांवर प्रभाव पाडता येईल व त्यांच्यांत स्फूर्ती निर्माण करता येईल. "

विद्यार्थ्यांपुढे आपला आचरणाचा आदर्श ठेवणे हा का शिक्षकाचा खरा धर्म आहे ? आजदेखील आपल्यासमोर अनेक नेत्यांचा व थोर पुरुषांचा आदर्श ठेवला जात नाही का ? मग या आदर्शांच्या लांब मालिकेत आणखी एकाची भर कशाला टाकावयाची ? आदर्श समोर ठेवणे ही का शिक्षकाची रीत आहे ? विद्यार्थ्याला सर्जनशील होण्यास, विमुक्त होण्यास साह्य करणे, हाच शिक्षकाचा खरा धर्म नाही का ? आणि बाह्यतः किंवा आंतरिकतः कुणाचे अनुकरण करणे किंवा कुणाचे अनुवर्तन करणे यांत विमुक्तता असणे शक्य तरी आहे का ? एखाद्या विशिष्ट आदर्शाचे अनुकरण करण्यास जेव्हा विद्यार्थ्यांना उत्तेजन देण्यात येते तेव्हा त्यांच्या मनांत खोलखोल व सूक्ष्म रीतीने भीतीच उत्पन्न केली जात नाही का ? शिक्षकाने जर आपला आदर्श विद्यार्थ्यांपुढे ठेवला, तर त्या आदर्शानुसार विद्यार्थ्याच्या जीवनाला वेगळेच वळण लागणार नाही का ? आणि यामुळे जे वास्तवात आहे व जे असावयास हवे त्याच्यामध्य विद्यार्थ्याच्या मनात अखंड संघर्षच तुम्ही निर्माण करणार नाही का ? आपण स्वतः वस्तुतः काय व कसे आहोत, याचे यथार्थ आकलन करून घेण्यास विद्यार्थ्यांना मदत करणे हेच खरोखर शिक्षकाचे कार्य नाही का ?

हे पाहा, कुणाचेही मार्गदर्शन करण्यासाठी प्रथम तुम्हांला स्वतःला ज्ञान असले पाहिजे; आहे का ते तुमच्यापाशी ? तुम्हांला खरोखर कशाचे ज्ञान आहे बरे ? आजवर तुम्हांला जे ज्ञान झाले आहे, ते तुमच्या पूर्वग्रहांच्या चष्म्यातूनच झालेले ज्ञान आहे. तुमचे हे पूर्वग्रह म्हणजे काय, तर आपण हिंदू आहोत, ख्रिश्चन आहोत

वा साम्यवादी आहोत अशी तुमच्या मनाची संस्कारबद्धता. दुसऱ्याने मार्गदर्शन करण्याच्या प्रकारातून अधिक दुःख व अधिक रक्तपात यांचाच उद्भव होत राहतो, हे साऱ्या जगभर आपणास दिसून येत आहे. म्हणून मानवी मनाला संस्कारबद्ध करीत राहणाऱ्या या सगळ्या प्रभावापासून विद्यार्थ्याला सुज्ञपणे स्वतःची मुक्तता करून घेता यावी, यासाठी त्याला मदत करणे, हेच शिक्षकाचे कार्य नाही का ? कारण विद्यार्थी जर या रीतीने मुक्त झाला, तरच त्याच्यामध्ये हिंसात्मक असंतोष किंवा भीती खळबळत राहणार नाही, आणि जीवनाला सखोलपणे व संपूर्णपणे सामोरे जाण्यास तो समर्थ होईल; होय की नाही ? असंतोष हा बुद्धिमत्तेचाच एक घटक आहे. पण अगदी सुलभतेने तृप्त होऊ शकणारा असंतोष हा काही बुद्धिमत्तेचा घटक नाही. काही विशिष्ट गोष्ट मिळावी यावद्दलचा माणसाचा जो असंतोष असतो, तो लवकरच शांत होऊन जातो. कारण ठराविक प्राप्तव्यासाठी केल्या जाणाऱ्या ठराविक कृतीचाच तो नमुना असतो. त्यात बुद्धिमत्ता नसते. तेव्हाच मार्गदर्शक, आदर्श पुरुष व नेते यांच्याबद्दलचा जो मोहमय भ्रम विद्यार्थ्यांच्या मनात वसत असतो, तो नाहीसा करून टाकणे हेच शिक्षकाचे कार्य ठरत नाही का ?

"पण मग विद्यार्थ्यांना अधिक थोर व अधिक महान कार्ये करण्यासाठी उत्स्फूर्त करणे, हे तरी निदान शिक्षकाचे कर्तव्य आहे की नाही ?"

हे पाहा, आता पुन्हाही या प्रश्नाकडे पाहण्याचा तुमचा दृष्टिकोन चुकीचाच नाही का ? शिक्षक या नात्याने तुम्ही जर विद्यार्थ्यांची मने विशिष्ट विचारांनी व भावनांनी भरून टाकू लागलात, तर त्यांचे तुमच्यावरील मानसिक अवलंबन वाढविण्यासच तुम्ही कारणीभूत होणार नाही का ? जेव्हा तुम्ही विद्यार्थ्यांचे स्फूर्तिस्थान बनू पाहाल, किंवा एखाद्या नेत्याकडे वा आदर्श पुरुषाकडे ज्या दृष्टीने विद्यार्थी पाहतो, त्या दृष्टीने जर तो तुमच्याकडे पाहू लागला, तर तो तुमच्यावर सदैव अवलंबून राहणार नाही का ? परावलंबनामुळे नेहमी भीतीचीच वाढ होत नसते का ? आणि भीतीमुळे बुद्धिमत्ता खुरटून जात नसते का ?

"पण शिक्षकाने जर विद्यार्थ्यांचे स्फूर्तिस्थान बनावयाचे नाही, त्यांचा आदर्श किंवा मार्गदर्शक बनावयचे नाही, तर मग त्याचा खरा धर्म तरी कोणता आहे ?"

जेव्हा तुमची भूमिका ही वरीलपैकी एकही असत नाही, तेव्हा तुम्ही कोण असता वरे ? विद्यार्थ्यांशी तेव्हा तुमचे कोणते नाते असते ? यापूर्वी विद्यार्थ्यांशी तुमचे कसले तरी नाते होते का ? आजवर तुमचे जे त्याच्याशी नाते होते ते, त्याच्या दृष्टीने चांगले काय आहे किंवा त्याने कशा प्रकारची व्यक्ती बनावे, यासंबंधीच्या तुमच्या कल्पनेवर आधारलेले होते. तुम्ही गुरू होता आणि तो तुमचा शिष्य होता. तुम्ही स्वतःच्या विशिष्ट संस्कारबद्धतेनुसार त्याच्यावर प्रभाव पाडीत

होता. त्यामुळे जाणता वा अजाणता तुम्ही स्वकल्पित प्रतिमेनुसार त्याच्या जीवनाला वळण लावीत होता. पण तुम्ही जर त्याला विशिष्ट वळण लावण्याचे सोडून दिले, तर त्याचे स्वतःचेच महत्त्व तुम्हांला वाटू लागणार नाही का ? याचाच अर्थ हा की, मग तुम्हांला त्याचे यथार्थ आकलन करून घ्यावे लागेल. तुमचे किंवा तुमच्या आदर्शाचे त्याने आकलन करून घ्यावे, असा आग्रह काही तुम्हांला धरता येणार नाही. नाही तरी तुमचे हे आदर्श पोकळच नसतात का ? तेव्हा त्यानंतर विद्यार्थी जशा स्वरूपात आहे, तसे त्याचे आकलन तुम्हांला करून घ्यावे लागेल, तो कसा असावा याचे नाही.

प्रत्येक विद्यार्थी ही अनन्य सामान्य अशी व्यक्ती असते. म्हणून तिची कुणाशीही तुलना करण्याजोगी नसते. या दृष्टीने जेव्हा शिक्षक विद्यार्थ्याकडे पाहू लागेल, तेव्हा कुठल्याही विशिष्ट पद्धतीची किंवा व्यवस्थेची त्याला गरजच उरणार नाही. यानंतर विद्यार्थ्याला संस्कारबद्ध करीत राहणारे जे बाह्य व आंतरिक प्रभाव असतात, त्यांच्या स्वरूपाचे आकलन करून घेण्यास त्याला मदत करणे एवढेच शिक्षकाचे कार्य राहील. विद्यार्थ्याला एकदा असे आकलन झाले की, आपल्यापुढील गुंतागुंतीच्या जीवनाचा सामना तो सुज्ञतेने व निर्भयपणाने करू शकेल आणि सगळ्या जीवनात आज जो गोंधळ माजलेला आहे, त्यात आणखी नव्या गोंधळाची भर तो घालणार नाही.

"आपण शिक्षकाकडून त्याच्या शक्तीच्या पलीकडचेच कार्य अपेक्षित नाही का ?"

हे पाहा, तुम्ही जर हे कार्य करण्यास असमर्थ असाल, तर मग शिक्षक म्हणून राहताच का ? शिक्षकाच्या व्यवसायाकडे, कुठल्याही पोटापाण्याच्या व्यवसायासारखाच एक व्यवसाय याच दृष्टीने जर तुम्ही पाहत असाल, तरच तुमचा हा प्रश्न सार्थ ठरेल. पण खऱ्याखुऱ्या तळमळीच्या शिक्षकाला अशक्य असे काहीच नाही, अशी माझी निश्चित धारणा आहे.

तुमची मुले व त्यांचे यश

ती सायंकाळ विलक्षण मोहमयी होती. मावळत्या सूर्याच्या सोनेरी प्रकाशाने सारी गिरीशिखरे झळाळत होती. खोऱ्यातून जाणाऱ्या त्या वालुकामय वाटेवर चार सुतार पक्षी वालुकास्थान करीत होते. आपल्या लांब चोचींनी आपल्या खालची वाळू वाजूला करून ते लहानसा खळगा करीत आणि जसजसे ते त्या खळग्यात शिरू लागत, तसतसे त्यांचे पंख फडफडू लागत. मग पुन्हा ते खोलवर खळगा करीत व पुन्हा त्यात शिरत. आणि त्यांच्या डोक्यावरचे सुंदर तुरे सारखे खालवर नाचत राहत. ते पक्षी एकमेकांना साद घालीत मजेत क्रीडा करीत होते. आमच्या चाहुलीने त्यांनी विचकू नये म्हणून ती वाट सोडून आम्ही बाजूच्या गवतावरून जाऊ लागलो. नुकताच पाऊस वरसून गेल्याने ते चांगलेच तरारले होते. जरा पुढे गेल्यावर, काही अंतरावर आम्हांला एक भला मोठा साप दिसला. त्याच्या पिवळसर शरीरावर रंगारंगाचे पट्टे दिसत होते. आणि त्याचे तोंड गुळगुळीत असले, तरी क्रूर भासत होते. त्या सुतार पक्ष्यांवर त्याची क्रूर दृष्टी इतकी काही खिळली होती की, आमच्या चाहुलीने तो मुळीच विचलित झाला नाही. त्याचे काळे काळे डोळे स्थिरपणे त्या पक्ष्यांवर खिळले होते. आणि त्याची जीभ सारखी आतबाहेर वळवळत होती. त्या गवतावरून जरासाही आवाज होऊ न देता तो त्या पक्ष्यांकडे हळूहळू सरकत चालला होता. तो नाग जणू मृत्यूचा दूत होता. आणि त्याचे शरीर भयदायक असले, तरी दिसण्यात सुंदर होते. त्याने नुकतीच कात टाकलेली असल्यामुळे त्या मावळत्या प्रकाशात त्याचे शरीर अतिशय चमकत होते. इतक्यात एकाएकी ते पक्षी भयसूचक आवाज करून उडून गेले आणि त्यावरोबर नाग एकदम पूर्ण स्तब्ध झाल्याचे विलक्षण दृश्य आमच्या दृष्टीस पडले. काही क्षणांपूर्वी पक्ष्यांवर झडप घालण्यासाठी तो इतका उत्सुक व उतावीळ झाला होता की, आता तो एकाएकी जीवन्मृत झाल्यासारखा भासू लागला. आता तो जणू जमिनीचाच एक भाग वनून गेला होता. पण दुसऱ्या क्षणातच त्याच्यामध्ये पुन्हा भयानकता संचरली. आता तो सावकाश सरकू लागला आणि आमच्या पावलांची चाहूल लागताच त्याने फणा काढला. पण त्याच्या एकूण हालचालीत आता एक प्रकारची स्तब्धता होती.— भीतिदायक, मृत्युदायक स्वरूपाची निःस्तब्धता होती.

भेटीला आलेली स्त्री लहानसर वांध्याची व पांढऱ्या केसांची वयस्कर स्त्री होती. वयस्कतेचे फारसे चिन्ह तिच्या एकूण हावाभावांमधून दिसून येत नव्हते. वोलण्यात सौम्यता होती, पण तिच्या एकूण आकृतीतून, चालण्याच्या ढवीतून, हावभावांतून व मानेच्या ताठरपणातून तिच्या स्वभावात खोलवर रुजून गेलेली आक्र

मकता स्पष्ट दिसून येत होती. तिच्या आवाजातूनही ती स्पष्टपणे प्रतीत होत होती. तिचे कुटुंब बरेच मोठे असून तिला बरेच मुलगे व मुली होत्या. पतीच्या मृत्यूला पुष्कळ वर्षे लोटून गेल्यामुळे मुलांच्या पालनपोषणाचा संपूर्ण भार तिलाच उचलावा लागला होता. आपला एक मुलगा यशस्वी डॉक्टर व कुशल शस्त्रवैद्य आहे, हे तिने मोठ्या अभिमानाने सांगितले. आपली एक मुलगी राजकारणाच्या क्षेत्रात यशस्वीपणे कार्य करीत आहे आणि फारसे प्रयत्न न करताही तिला मनासारखे स्थान तेथे प्राप्त झाले आहे, असे सांगताना ती गालातल्या गालात किंचित हसली. 'स्त्रिया कशा सहजपणे पुढेपुढे सरकत जातात हे आपल्याला माहीत आहेच,' असे तिला या स्मिताने सुचवावयाचे होते. या आपल्या राजकारणी मुलीला आध्यात्मिक आकांक्षाही आहेत, हे तिने पुढे सांगितले.

आध्यात्मिक आकांक्षा या शब्दांनी तुम्हांला काय सुचवावयाचे आहे ?

"एखाद्या धार्मिक किंवा तत्त्वजिज्ञासू गटाचे आपण प्रमुख असावे अशी तिची इच्छा आहे."

एखाद्या संघटनेच्या द्वारा इतरांवर सत्ता प्राप्त करून घेणे ही गोष्ट अनिष्टच असते, होय की नाही ? बाकी सर्वच राजकारणी व्यक्तींची हीच रीत असते, मग त्या व्यक्ती प्रत्यक्ष राजकारणात असोत वा नसोत. सत्ताभिलाषा ही कितीही फसव्या व मोहक शब्दांनी झाकली, तरी अखेर ती नेहमी अनिष्टच असते, नाही का ?

ती ऐकत होती. पण तिला अर्थबोध मात्र होत नव्हता. तिचे मन कुठल्यातरी वेगळ्याच गोष्टीत अडकलेले होते, हे तिच्या चेहऱ्यावरून स्पष्ट दिसत होते. पण तिच्या मनातील गोष्ट लवकरच तिच्या मुखातून बाहेर पडणार होती. आपल्या इतर मुलांच्या कार्याबद्दल व उद्योगांबद्दल ती स्त्री नंतर सांगू लागली व आपला जो आवडता मुलगा आहे, त्याच्याखेरीज बाकी सर्व मुले उत्साही आहेत व आपापले काम उत्तम प्रकारे करीत आहेत, अशी पुस्ती तिने जोडली.

"दुःख म्हणजे काय असते बरे ?" तिने अचानक प्रश्न विचारला. "मला वाटते माझ्या मनात कुठेतरी एक खोल दुःख नेहमीच दडून रहात आले आहे. एक मुलगा सोडून माझी सारी मुले चांगल्या स्थितीत असली व समाधानी असली, तरीही या दुःखाने माझी सोबत कधी सोडली नाही. बाकी मला दुःख नेमके कशाचे आहे हे काही कळत नाही. पण ते माझ्या पाठीस सारखे लागले आहे. ते काय असावे याबद्दलचा विचार करीत करीत मी कितीतरी रात्री जागून काढल्या आहेत. माझ्या धाकट्या मुलाचीही चिंता माझ्यामागे सारखी आहेच. तो आजवर सगळ्या गोष्टीत अपेशी ठरला आहे. ज्याला ज्याला तो स्पर्श करतो, ते ते सारे बिघडून जाते. त्याचा विवाह, त्याचे आपल्या भावाबहिणींशी किंवा मित्रांशी संबंध —

सगळे सगळे विघडून गेले आहेत. त्याला नोकरीधंदाही क्वचितच मिळतो आणि जेव्हा एखादा मिळतो, तेव्हा काहीतरी घडते व त्याचे काम सुटते. त्याला मदत करणे हे कुणालाही अशक्य होऊन बसले आहे. मी सारखी त्याची काळजी करीत राहते. बाकी तो माझे दुःख सतत वाढवीत असला, तरी तो माझ्या दुःखाचे मूळ आहे, असे काही मला वाटत नाही. माझे हे दुःख आहे तरी कशाचे कोण जाणे ! आयुष्यभर मी नाना प्रकारच्या काळज्या वाहिल्या आहेत, नानाविध निराशांमधून गेले आहे, आणि थोडेबहुत शारीरिक दुःखही भोगले आहे. पण हे जे मला सतत जाळणारे दुःख आहे, ते मात्र या सर्वांच्या पलीकडचे असे आहे. आणि आजवर मला त्याचे कारण ध्यानात आले नाही. आपण त्यावद्दलच बोलू या का ?"

तुम्हांला आपल्या मुलांवद्दल व विशेषतः त्यांच्या यशाबद्दल फार अभिमान वाटतो, नाही का ?

" होय, पण एक मुलगा सोडून बाकीची सारी जर इतकी यशस्वी झाली, तर कुठल्याही आईबापांना अभिमान नाही का वाटणार ? माझी बाकीची सर्व मुले सुखात आहेत व सर्वांचा उत्कर्षही सदैव होत आहे. पण आपण हा प्रश्न का बरे विचारीत आहात ?"

कदाचित त्याचा संबंध तुमच्या दुःखाशी असावा. आपल्या मुलांच्या यशस्वितेशी आपल्या दुःखाचा काहीही संबंध नाही, अशी तुमची खात्री आहे का ?

" अर्थात आहे. मला तर त्यांच्या यशामुळे विशेषच आनंद वाटतो. "

तुमच्या दुःखाचे मूळ कशात आहे असे तुम्हांला वाटते ? एक गोष्ट विचारू का ? तुमच्या पतीच्या मृत्यूचा तुमच्यावर फार सखोल परिणाम झाला होता का ? अजूनही तो परिणाम कायम आहे का ?

" हो, त्यांच्या मृत्यूचा धक्का बराच मोठा होता, त्यानंतर मला फार एकटे एकटे वाटे. पण लवकरच मला दुःखाचा व एकटेपणाचा विसर पडला. कारण मुलांकडे आता मला एकटीलाच पाहावयाचे होते. त्यामुळे स्वतःचा विचार करावयाला मग वेळच उरला नाही. "

दुःख व एकटेपणा ही कालांतराने नाहीशी होतात असे का तुम्हांला वाटते ? तुम्हांला स्वतःला जरी त्यांचा विसर पडला असला, तरी तुमच्या मनाच्या सखोल स्तरात दुःख व एकटेपणा ही अजूनही रुतून बसलेली नाहीत का ? तुम्हांला जे दुःख जाणवत आहे, त्याचे कारण हेच तर नसेल ?

" माझ्या पतीच्या मृत्यूचा धक्का मला फार जाणवला खरा. पण त्यांचा मृत्यू हा अपेक्षितच होता. त्यामुळे दुःखाश्रूंनी मी त्याचा स्वीकार केला. विवाह होण्यापूर्वी मी आपल्या वडिलांचा मृत्यू पाहिला होता आणि काही वर्षांनंतर आईचेही मरण पाहिले होते. प्रस्थापित धर्माचे मला फारसे सोयरसुतक नसल्यामुळे मृत्यू व

मृत्यूनंतर काय घडते यासंबंधी काही कळावे अशी जी इतरांची इच्छा असते, तिचा मला कधीच स्पर्श झाला नाही. मृत्यू हा अटळ आहे, तेव्हा फारशी रडारड न करता माणसाने त्याचा स्वीकार केला पाहिजे, अशी माझी धारणा आहे."

मृत्यूसंबंधीची तुमची धारणा अशी असेलही. पण एकटेपणाचीही वासलात अशाच रीतीने लावता येईल का? मृत्यू हा भविष्यात केव्हातरी येणारा आहे व तो येईल तेव्हा त्याला सामोरे गेले पाहिजे, असा विचार माणसाला करता येणे शक्य आहे. पण एकटेपणा हा तर नेहमीच अस्तित्वात असतो, नाही का? तुम्ही दरवाजा बंद करून त्याला बाहेर ठेवू पाहाल. पण त्या बंद दारामागे तो सदैव उभाच नसतो का? म्हणून या एकटेपणाला आत बोलावून त्याचे निरीक्षण नको का करावयाला?

"ते काही मला समजत नाही. एकटेपणा हा फार दुःखद असतो. म्हणून या भयंकर भावनेला मुद्दाम बोलावण्याइतपत मजल मारता येईल की नाही, याबद्दल मला शंका वाटते. मला तर हे सारे फारच भयंकर वाटते."

कदाचित तेच तुमच्या दुःखाचे मूळ कारण असेल. तेव्हा त्याचे संपूर्ण आकलन नको का करून घ्यावयाला?

"पण हीच गोष्ट तर मला दुःख देत असते. मग तिचे आकलन मला कसे बरे करून घेता येईल?"

हे पाहा, एकटेपणामुळे काही तुम्हांला दुःख होत नाही, तर एकटेपणाची कल्पना हीच तुमच्या मनात भीती उत्पन्न करीत आहे. तुम्ही आजवर या एकटेपणाकडे आशंकेच्या, भीतीच्या आणि त्याच्यापासून दूर पळून जाण्याच्या भावनेने पाहिले. तसेच त्याच्यावर मात करण्याच्या भावनेने पाहिले आहे. म्हणजे आजवर या एकटेपणाला तुम्ही एकसारख्या दूर ढकलीत आला आहात, होय की नाही? आजवर त्याच्याशी तुमचा प्रत्यक्ष संपर्क असा कधीच आला नाही. एकटेपणापासून दूरदूर जाण्यासाठी आपल्या मुलांचे उद्योग व त्यांचे यश यांच्यामध्येच स्वतःला गुंतवून तुम्ही पळ काढीत आला आहात. त्यांचे यश हे तुमचे यश बनून गेले आहे. पण यशाची ही जी पूजा तुम्ही चालविली आहे तिच्यामागे कसलीतरी सखोल चिंता दडून बसलेली नाही का?

"आपल्याला कसे हे माहीत आहे?"

या एकटेपणापासून दूर पळण्यासाठी मनुष्य ज्या ज्या पळवाटेचा आश्रय करतो — रेडिओ, समाजकार्य, एखादे सिद्धवाक्य, तथाकथित प्रीती इत्यादी — ती पळवाट मग त्याला अत्यंत आवश्यक होऊन बसते — एखाद्या दारूबाजाला दारूची जितकी आवश्यकता होऊन बसते तितकी. सामान्यतः मनुष्य हा यशाची पूजा करण्याने स्वतःला विसरू शकतो किंवा एखाद्या प्रतिमेच्या, मूर्तीच्या पूजनात

किंवा एखाद्या आदर्शाच्या अनुसरणात स्वतःला बुडवून टाकू शकतो. पण कोणत्याही प्रकारचा आदर्श अथवा प्रतिमापूजन हे अखेर भ्रमोत्पादकच असते. स्वतःला विसरून जाण्याची ही जी प्रक्रिया असते, तिच्यामागे माणसाच्या मनातील चिंता दडलेली असते. तुमच्या मुलांचे यश हे तुमच्या दुःखाचे कारण आहे ही गोष्ट मला तुमच्या लक्षात आणून द्यावीशी वाटते. स्वतःविषयी व आपल्या मुलांविषयी तुम्हांला सदैव सखोल चिंता वाटत आहे. तुमच्या मुलांना जे यश प्राप्त झाले आहे व लोकांकडून त्यांची जी प्रशंसा केली गेली आहे, त्यांच्याबद्दल तुम्हांला केवढेही कौतुक वाटत असले, तरी या सर्वांच्या पाठीमागे एक तिरस्काराची, लज्जेची व निराशेची भावना दडलेली आहे, होय की नाही ? कृपा करून असे विचारण्याबद्दल मला क्षमा करा. पण मुलांच्या या यशाने तुम्हांला वस्तुतः खेदच होत नाही का ?

" असा खेद आपणास वाटतो ही गोष्ट मी आजवर स्वतःपाशीही कधी कबूल केली नव्हती. पण असा खेद मला वाटतो हे सत्य आहे. "

या बाबतीत खोलात शिरून तुम्हांला चर्चा करावयाची आहे का ?

" इतके सारे उघड झाल्यानंतर ही चर्चा करणे हे आता मला आवश्यकच होऊन बसले आहे. मी कुठल्याही धर्माची अनुयायी नसले, तरी वृत्तीने मी धार्मिक आहे. धार्मिक ग्रंथांचे मी मधूनमधून वाचून करीत आले आहे. पण कुठल्याही तथाकथित धार्मिक संघटनेमध्ये मी स्वतःला कधी अडकू दिले नाही. कुठल्याही संघटित धर्माविषयी मला विशेष आपुलकी वाटत नाही. ते सर्व दूर दूर असल्यासारखे वाटतात. माझे संसारी जीवन चालू असले, तरी एक प्रकारची अस्पष्ट, अव्यक्त धार्मिक प्रेरणा माझ्यामध्ये नेहमीच वसत आली आहे. जेव्हा मला मुले झाली तेव्हा त्यांच्या वेळी एखाद्यामध्ये तरी धार्मिक प्रवृत्ती प्रस्फुटित व्हावी अशी उत्कट इच्छा मला वाटू लागली. माझ्या धार्मिक प्रेरणेचे या उत्कट इच्छेत रूपांतर झाले. पण माझ्या मुलांपैकी एकही तसे निपजले नाही. शेवटचे मूल वगळले तर भौतिक दृष्टीने ती सगळी समृद्ध आहेत व वृत्तीनेही लौकिक व संसारी अशीच आहेत. — माझ्या शेवटच्या मुलात सर्वच गोष्टींचे मिश्रण आहे. माझी सर्वच मुले तशी अगदी सामान्य आहेत आणि याच गोष्टीचे मला खरेखरे दुःख आहे. ती आपापल्या लौकिक व्यापामध्ये पूर्णपणे गुरफटलेली आहेत. त्यांचे जीवन हे अतिशय उथळ व निर्बुद्ध आहे. बाकी आजवर मी त्यांच्याशी याबाबत काहीच बोलले नाही आणि बोलले असते तरीही मी काय म्हणते हे त्यांना समजलेही नसते. त्यांच्यापैकी निदान एकतरी सामान्यांहून वेगळा निघेल अशी माझी कल्पना होती. त्यांचा हा सामान्यपणा आणि माझा स्वतःचाही सामान्यपणा मला अगदी भयंकर वाटतो. मला वाटते यामुळेच मला दुःख होत असावे. माझी ही मूर्खपणाची व विचित्र अवस्था नाहीशी करून टाकण्यासाठी मी काय बरे केले पाहिजे ? "

स्वतःची सामान्यपणाची अवस्था नाहीशी करून टाकण्याकरता की, दुसऱ्यांची ती अवस्था नाहीशी करण्याकरता ? वाकी वस्तुस्थिती अशी आहे की, आपल्याला केवळ स्वतःचाच सामान्यपणा नाहीसा करता येणे शक्य असते. मगच कदाचित इतरांशी असणाऱ्या आपल्या संबंधांमध्ये परिवर्तन घडून येऊ शकेल. आपण अगदीच सामान्य आहोत, या गोष्टीची जाणीव होणे, येथूनच कदाचित आपल्या परिवर्तनाला प्रारंभ होऊ शकेल. एखाद्या क्षुद्र मनाला जेव्हा आपल्या क्षुद्रपणाची जाणीव होते, तेव्हा ते तेथेच थांबत नाही, तर आपला क्षुद्रपणा नाहीसा करून टाकण्याचा, त्यात सुधारणा करण्याचा जोराचा अट्टाहास करू लागते. सुधारण्याची ही ऊर्मीच सामान्यपणाचे ठळक लक्षण आहे. स्वतःमध्ये सुधारणा घडवून आणण्याची अभिलाषा ही अगदी क्षुद्र अशीच असते. पण आपण अगदीच सामान्य आहोत, या गोष्टीची जेव्हा मनाला जाणीव होते आणि स्वतःला बदलण्यासाठी मन जेव्हा काहीही कृती करीत नाही तेव्हाच सामान्यत्व नाहीसे होण्यास आरंभ होतो.

" 'स्वतःला बदलण्यासाठी स्वतःच्या बाबतीत कृती करणे' या शब्दांनी आपणांस काय सुचवावयाचे आहे बरे ? "

हे पाहा, स्वतःच्या क्षुद्रत्वाची जाणीव होऊन क्षुद्र मन हे जेव्हा स्वतःला बदलण्याचा यत्न करू लागते तेव्हा ते क्षुद्रच नसते का ? बदलण्याचा प्रयत्न करणे ही क्षुद्र मनाचीच कृती असते. म्हणून हा प्रयत्नदेखील क्षुद्रच असतो.

" आपण काय सांगता ते ध्यानात येते खरे. पण माणसाने मग करावे तरी काय ? "

हे पाहा, मनाने केलेली कोणतीही कृती ही अल्प व मर्यादित अशीच असते. म्हणून मनाने आपला सर्व व्यापार पूर्णपणे थांबवलाच पाहिजे. असे केले तरच सामान्यपणा हाही आपोआप नाहीसा होऊन जाईल.

प्राप्तव्याचा शोध

त्या बागेत दररोज सकाळी दोन पक्षी एका विशिष्ट फांदीवर बसून परस्परांना साद घालीत क्रीडा करीत असत. सुंदर हिरवट सोनेरी अंग व लांबलचक शेपूट असे त्यांचे मोहक रूप होते. त्यांची अव्याहत चळवळ चालू असे. मधूनच जेव्हा ते अचानक उड्डाण करीत तेव्हा त्यांच्या शरीराचे कंपन विलोभनीय दिसे. पक्ष्यांची ही जोडी फारच मोहक होती. त्यांचे अचानक उड्डाण व क्रीडा ही सारखी चालू असली, तरी ते कधीही दमल्यासारखे दिसत नसत. ती बाग चोहोबाजूंनी बंदिस्त असल्यामुळे तिच्यात नाना प्रकारच्या पक्ष्यांची ये-जा सारखी चालू असे. बागेच्या ठेंगण्याशा भिंतीवरून दोन लहानगी, चपळ व तुळतुळीत मुंगसे एकमेकांचा पाठलाग करीत एका बिळातून बागेत शिरत. पण धावतानाही त्यांचे लक्ष त्या भिंतीकडे सारखे असे. सावधपणाने पळत असताना त्यांचे लालसर डोळे तरलतेने सारे निरखीत राहात. त्यांच्या अंगावरील पिवळसर लव सूर्यप्रकाशात चमके. मधून मधून एक लठ्ठ म्हातारे मुंगूस त्याच बिळातून बागेत येई. ती त्या लहानग्या मुंगसाची आई असावी. कारण पूर्वी ते तिघे एकत्र असत. त्या बिळातून एकामागून एक बागेत शिरून व सगळी हिरवळ ओलांडून तसेच ओळीने पलीकडच्या झुडपात नाहीसे होत.

"आपण सदैव कुठल्यातरी प्राप्तव्याचा शोध का बरे करीत असतो ?" पी. ने प्रश्न केला. "आपल्या या शोधामागे कोणता हेतू असतो ? या अविरत चालणाऱ्या शोधामुळे मनुष्य खरोखर किती दमूनथकून जातो ! या शोधाला काहीच अंत नाही का ?"

"हे पाहा, की, ज्याचा शोध आपल्याला लागावा असे वाटते, त्याचाच नेमका शोध आपण करीत असतो." एम्. ने उत्तर दिले. "आणि एकदा हवे ते आपल्याला प्राप्त झाले की, आपण मग पुढच्या प्राप्तव्याचा शोध करू लागतो. पण मला तर वाटते की, आपण जर नेहमी कुठल्या तरी प्राप्तव्याच्या मागे लागत राहिलो नाही, तर आपले सारे जीवन स्तब्ध होऊन जाईल, अवरुद्ध व कुंठित होऊन जाईल व त्याला काहीही अर्थ उरणार नाही."

"शोधा म्हणजे सापडेल." आर. ने एक सुप्रसिद्ध वचन उद्धृत केले. "आपल्याला ज हवे असते, जाणता वा अजाणता ज्याची आपल्याला तीव्र अभिलाषा उत्पन्न होते तेच आपणांस सापडते पण या अभिलाषेच्या मागे, या शोधाच्या मागे, कोणती उत्कट प्रेरणा असते, असा प्रश्न मात्र आपण कधीच करीत नाही. बाकी आपण नेहमी कुठल्या ना कुठल्या प्राप्तव्याच्या मागे लागतच राहतो आणि असे आपण नेहमीच लागत राहणार, असे निदान वरवर पाहता तरी दिसते."

"मला तर वाटते की, प्राप्तव्यामागे लागत राहण्याची माणसाची ही अभिलाषा अटळच आहे." एल. ने म्हटले. "आपण श्वासोच्छ्वास का करतो किंवा आपले केस का वाढतात, हे विचारण्यासारखेच हेही निरर्थक आहे. दिवस-रात्रीच्या अटळ चक्राप्रमाणे प्राप्तव्यामागे लागणारी माणसाची ही उत्कट प्रेरणाही अटळच आहे."

पण असे पाहा की, प्राप्तव्यामागे लागत राहणारी उत्कट प्रेरणा ही अगदी अटळ आहे, असे ठाम विधान जेव्हा तुम्ही करता, तेव्हा त्या बाबतीतील वस्तुस्थिती काय आहे, याचा शोध तुम्ही थांबवूनच टाकीत नाही का ? जेव्हा एखाद्या गोष्टीबाबत निश्चित स्वरूपाचे अंतिम विधान तुम्ही करता, तेव्हा त्या बाबतीतील सारे अन्वेषण, सारा शोध बंदच होऊन जात नाही का ?

"पण गुरुत्वाकर्षणासारखे काही निश्चित नियम असतातच की नाही ? तेव्हा या निश्चित, अटळ नियमांविरुद्ध जाऊन आपले डोके फोडून घेण्यापेक्षा, ते नियम मान्य करून चालणे हेच अधिक शहाणपणाचे नाही का ? " आर. ने चटकन म्हटले.

काही ठराविक निष्ठांना वा आप्तवाक्यांना आपण नेहमी जी बिनशर्त मान्यता देत असतो, तिच्यामागे कोणती तरी विशिष्ट मानसिक कारणेच असतात, हे प्रथम लक्षात घ्या. एकदा अशा गोष्टींना आपण ठाम मान्यता देऊन बसलो की, मग त्यांना कालान्तराने 'अपरिहार्य वा अटळ' असे स्वरूप प्राप्त होते आणि मग माणसाची ती गरजच होऊन बसते.

"मला असे म्हणावयाचे आहे की, प्राप्तव्यासाठी धडपड करण्याची उत्कट प्रेरणा ही अटळ आहे, असे जर एल. मान्य करीत असेल, तर ते सदैव प्राप्तव्यामागे लागतच राहतील आणि मग त्यांच्या दृष्टीने ती समस्या अशी राहणारच नाही." एन. म्हणाला.

प्रत्येकजण —— मग तो वैज्ञानिक असो की धूर्त राजकारणी असो; दुःखी-कष्टी असो की व्याधिपीडित असो —— प्रत्येकजण कुठल्यातरी प्राप्तव्यासाठी आपापल्या परीने सदैव धडपडत असतो आणि मधून मधून आपल्या प्राप्तव्याचे विषय बदलीत राहतो. आपण सगळेच कुठल्यातरी प्राप्तव्यामागे लागलेले असतो. पण आपण असे का मागे लागत असतो, हा प्रश्न मात्र आपण स्वतःला कधीच विचारला नाही असे दिसते. या ठिकाणी आपल्या प्राप्तव्याचा विषय काय आहे, तो उदात्त आहे की क्षुद्र आहे, याची आपल्याला चर्चा करावयाची नाही; तर आपण प्राप्तव्यामागे का लागत असतो, हे शोधून काढावयाचे आहे, होय की नाही ? ही उत्कट प्रेरणा, अविरत चालू राहणारी प्रचोदना आहे तरी काय ? ती अटळच आहे का ? ती अविरतपणे चालूच राहणार आहे का ?

"पण आपण जर प्राप्तव्यामागे लागण्याचे सोडून दिले, तर आपण आळशी बनून जाणार नाही का ? आपण सडत कुजत राहणार नाही का ? " वाय. ने विचारले.

कुठल्या ना कुठल्या स्वरूपातील संघर्ष चालू राहणे, हीच जीवनरीत आहे असे सामान्यतः सर्वांना वाटत असते. संघर्ष नसला तर जीवनाला अर्थच उरणार नाही, अशी आपली पक्की समजूत असते. धडपडीचा किंवा संघर्षाचा अंत होणे म्हणजेच मरण ओढवणे होय अशी आपणा बहुतेकांची कल्पना असते. शोध या शब्दाने धडपड व संघर्ष हीच सूचित होतात हे खरे. पण हीच जीवनरीत माणसाला आवश्यक आहे का ? की जिच्यात धडपड व संघर्ष ही मुळीच नाहीत, अशी एखादी वेगळी 'जीवनरीत' असू शकेल ? आपण कशाच्या मागे व कशासाठी लागत असतो बरे ?

" मी जर कशाच्या मागे लागत असलो, तर ते माझ्या वैयक्तिक शाश्वततेच्या मागे नव्हे, तर माझ्या देशाच्या शाश्वततेमागे लागत असतो. याच दृष्टीने मी निरनिराळचा साधनांचा व मार्गांचा शोध करीत असतो." एल. म्हणाला.

पण व्यक्तिगत जीवनाची शाश्वतता व राष्ट्रीय जीवनाची शाश्वतता यांच्यामध्ये खरोखरच फार मोठा फरक आहे का ? व्यक्ती ही प्रथम आपल्या देशाशी किंवा एखाद्या विशिष्ट समाजाशी सारूप्य पावत असते, आणि मग त्या देशाच्या किंवा समाजाच्या शाश्वततेची चिंता करीत राहते. या किंवा त्या देशाची शाश्वतता ही अखेर त्या व्यक्तीचीच शाश्वतता असते. स्वतःपेक्षा अधिक थोर अथवा अधिक उदात्त अशा कोणत्या तरी गोष्टीशी सारूप्य पावून स्वतःचे सातत्य, स्वतःची शाश्वतता अधिकाधिक निश्चित करण्यामागेच मनुष्य लागत असतो, होय की नाही ?

" मला हे विचारावयाचे आहे की, आपला सारा शोध, आपली सारी धडपड एकाएकी नाहीशी झाली आहे, असा एखादा तरी क्षण, अशी एखादी तरी क्षणमात्र अवस्था आपल्या कधीच प्रत्ययाला येणार नाही का ? " एम. ने विचारले.

" पण अतिशय थकण्याचा परिणाम होण्यानेही अशी अवस्था उत्पन्न होऊ शकेल की ! " आर. ने उत्तर दिले.

"तुम्ही सुचवता त्या स्वरूपाचा क्षण म्हणजे शोध व भीती यांच्या दुष्ट वर्तुळात पुन्हा सापडण्यापूर्वीचा अत्यल्प काळ असेही असणे शक्य आहे. "

" किंवा असा क्षण हा कालातीत स्वरूपाचाही असू शकेल. " एम. म्हणाला.

ज्या स्वरूपाच्या क्षणाबद्दल आपण बोलत आहोत, तो कालातीत असतो की, पुन्हा प्राप्तव्यामागे लागण्यापूर्वीचा विसाव्याचा क्षण असतो बरे ? आपण नेहमी प्राप्तव्यामागे का धडपडत राहतो ? प्राप्तव्याचा हा शोध संपणे शक्य आहे का ? आपण प्राप्तव्यामागे का जात राहतो, हे स्वतःच शोधून काढल्याशिवाय, शोध जेथे संपतो ती अवस्था ही आपल्या दृष्टीने निव्वळ काल्पनिक वस्तूच राहील, आपल्या दृष्टीने ती अर्थशून्यच ठरेल.

" पण मनुष्य ज्या विविध गोष्टींचा शोध करतो, त्यांच्यामध्ये तरतम स्वरूपाचा काहीच भेद नसतो का ?" बी. ने विचारले.

भेद अर्थातच असतात. पण कोणत्याही प्राप्तव्यामागे लागण्याच्या उत्कट प्रेरणेचे विषय भिन्न असले, तरी ही प्रेरणा मूलतः एकसारखीच असते, होय की नाही? आपण शाश्वततेच्या मागे व्यक्तिगतदृष्ट्या लागलो काय, किंवा राष्ट्राच्या दृष्टीने लागलो काय; आपण एखाद्या उपदेशकाकडे गेलो काय किंवा गुरूकडे वा एखाद्या उद्धारकर्त्याकडे गेलो काय; एखाद्या विशिष्ट साधनेचे आपण अनुसरण करीत असलो काय किंवा स्वतःची उन्नती करण्यासाठी दुसरे काही साधन स्वीकारीत असलो काय; यापैकी काहीही करीत असताना प्रत्येकजण आपापल्या संकुचित वा विस्तारशील मार्गाने कुठल्यातरी स्वरूपाचा संतोष, सातत्य किंवा शाश्वतता हीच मिळवू पाहत असतो, नाही का? म्हणून आपण कशाच्या मागे लागत असतो, हा आपल्यापुढील प्रश्न नसून, आपण असे सारखे कशामागे तरी का लागत राहतो, हा आपल्यापुढील प्रश्न आहे. तसेच आपल्या या प्राप्तव्याच्या शोधाचा संपूर्ण अंत होणे शक्य आहे का? जबरदस्तीने किंवा विफलतेमुळे नव्हे; प्राप्तव्य हाती लागले म्हणूनही नव्हे; तर प्राप्तव्यामागे लागण्याची आपली उत्कट प्रेरणा सहजपणे नष्ट झाल्यामुळे आपला शोधही संपला आहे, असे घडून येणे शक्य आहे का? हा प्रश्न सध्या आपल्यासमोर उभा ठाकला आहे.

"शोध करीत राहण्याची, आपली जी सवय आहे, तिच्यात आपण नेहमी अडकून पडत असतो आणि आपल्यात जो असंतोष धुमसत असतो, त्याच्यामुळेच आपणास ही सवय जडते, असे मला वाटते." वी. म्हणाला.

असमाधान किंवा असंतोष उत्पन्न झाल्यामुळे आपण समाधान व संतोष मिळवण्यामागे लागत असतो. म्हणून संतोष मिळवण्याची किंवा सफलता प्राप्त करून घेण्याची आपली उत्कट प्रेरणा जोवर कायम राहील, तोवर आपला शोध व धडपड ही चालूच राहतील. आपल्या या उत्कट प्रेरणेमागे भीतीच नेहमी दडून वसलेली असते, होय का नाही?

"पण या भीतीपासून आपली मुक्तता कशी होऊ शकेल?" वी. ने प्रश्न केला.

तुम्हांला सफलतेचा संतोष हवा असतो पण भीतीचा डंख मात्र नको असतो. पण शाश्वत स्वरूपाची सफलता या नावाची वस्तू अस्तित्वात असणे संभवनीय तरी आहे का? वस्तुतः सफलतेची अभिलाषा हीच भीतीची व विफलतेची जननी असते. सफलतेच्या अभिलाषेमध्ये दडून बसलेला हा आशय जेव्हा आपल्या स्पष्टपणे ध्यानात येईल, तेव्हाच अभिलाषेचा अंत घडून येईल. असणे व होणे या अगदी भिन्न भिन्न अशा अवस्था आहेत. त्यामुळे एकीचा आधार घेऊन दुसरीप्रत पोचणे हे सर्वथैव अशक्य असते. कुणीतरी विशेष होण्याकडे ओढ घेत राहणारी प्रवृत्ती ही जेव्हा संपुष्टात येते, तेव्हा ते असतच असणारे असे जे काही नित्य वर्तमान आहे, त्याचे दर्शन घडते.

श्रवण

पौर्णिमेचा चंद्रमा नुकताच क्षितिजावर उदय पावत होता. वातावरणातील धूसरतेमुळे चंद्रावर किंचितशी लाली चढलेली दिसत होती. थंडी अजून चालूच असल्यामुळे खेड्यात ठिकठिकाणी पेटलेल्या शेकोट्यांतील धूर आकाशात वरवर चढताना दिसत होता. नदीच्या प्रशांत प्रवाहात इवलासाही तरंग उठताना दिसत नव्हता. पण आत खोल खोल नदीप्रवाह वेगाने वाहत होता. पात्रावरून पक्षी इतक्या जवळून उडत होते की, मधूनमधून त्यांचे पंख पाण्याला निसटता स्पर्श करीत आणि मग त्या प्रशांत प्रवाहात नाजुक तरंग उठत.

नदीच्या वरच्या भागाला संध्या तारक नुकताच दिसू लागला होता. त्या दूरवरच्या गजबजलेल्या शहरातील एका मनोऱ्यावर तो लुकलुकताना दिसत होता. मनुष्यवस्तीजवळचे एखादे आश्रयस्थान गाठण्यासाठी पोपट परतू लागले होते. पण त्यांचे उड्डाण कधीच सरळ नसे. मधूनच कर्कश आवाज करीत ते खाली उतरून एखादा धान्यकण टिपीत व मग कडेकडेने उडू लागत. शेकडोंच्या घोळक्याने ते सगळे एका विशिष्ट दाट वृक्षावर जमत आणि तेथून उडून अधिक चांगल्या आश्रयस्थानाकडे जात आणि एकदा अंधार पडला, की ते सारे शांत, निःस्तब्ध होऊन जात. आता चंद्र वृक्षांच्या माथ्यावर बराच वर आलेला दिसत होता, आणि नदीच्या प्रशांत विशाल प्रवाहात चंदेरी पट्टा प्रतिबिंबित झाला होता.

भेटीला आलेला गृहस्थ निवेदन करीत होता.

"शांतपणे श्रवण करण्याचे महत्त्व मला कळते खरे पण आपले सांगणे मी शांतपणे श्रवण करीत राहतो की नाही याबद्दल मला फार शंका वाटते. शांतपणे श्रवण करण्यासाठी मला फार मोठा प्रयत्न करावा लागतो, ही गोष्ट मात्र निश्चित आहे."

पण श्रवण करण्यासाठी जेव्हा तुम्ही मुद्दाम प्रयत्न करीत राहता, तेव्हा तुम्ही खरोखरच श्रवण करीत तरी असता का? तुमचा हा जोराचा प्रयत्नच श्रवण करण्याच्या आड येत नसतो का? एखादी आनंददायक गोष्ट जेव्हा तुम्ही श्रवण करीत असता, तेव्हा तुम्हाला श्रवण करण्यासाठी मुद्दाम प्रयत्न करावा लागतो का? म्हणून तुम्ही हा जो शांतपणे श्रवण करण्याचा प्रयत्न करीत आहात, तो एक जबरदस्तीचाच प्रकार होत नाही का? आणि जबरदस्ती करणे म्हणजे प्रतिकार करणेच नाही का? अशा प्रतिकारामधूनच तर समस्या उत्पन्न होत असतात आणि श्रवण करण्याची तुमची समस्या ही या समस्यांपैकीच एक होऊन

वसते. नाही तर, नुसते शांतपणे कसे श्रवण करावे, या गोष्टीला समस्येचे स्वरूप कधीच प्राप्त झाले नसते.

"पण माझ्या बाबतीत मात्र ती समस्याच बनून गेली आहे हे निश्चित. आपण जे सांगता त्यात फार मोठा व सखोल अर्थ भरलेला असतो, याची मला पूर्ण जाणीव आहे. म्हणून आपले सांगणे लक्षपूर्वक व बिनचूकपणे श्रवण करावे असे मला फार फार वाटते. पण त्याच्या शब्दार्थापलीकडे माझी मजलच जाऊ शकत नाही."

एक गोष्ट तुमच्या ध्यानात आणून देऊ का ? मी आता जे काय सांगत आहे, तेसुद्धा तुम्ही लक्षपूर्वक श्रवण करीत नाही. कारण तुम्ही श्रवण करण्याची एक समस्याच बनवून टाकली आहे आणि ही समस्याच शांतपणे श्रवण करण्याच्या आड येत आहे. अशा प्रकारच्या वृत्तीमुळे ज्या ज्या गोष्टीला माणूस स्पर्श करतो, तिचे चटकन समस्येत रूपांतर होऊन जाते. एका समस्येपोटी निरनिराळ्या समस्या उत्पन्न होत राहतात. ही सगळी वस्तुस्थिती जर तुमच्या नीट ध्यानात आली, तर समस्याच उत्पन्न होणार नाहीत, होय की नाही ?

" असे होऊ शकले, तर ते फारच उत्कृष्ट होईल. पण अशा सुखद अवस्थेप्रत माणसाने पोचावयाचे कसे ? "

अशा अवस्थेप्रत 'कसे पोचावयाचे' हा जो प्रश्न तुम्ही विचारीत आहात, ती तुम्ही एक नवीच समस्या बनवून टाकली आहे. यापुढे नवी समस्या उत्पन्न करीत बसावयाचे नाही, असे आपण आताच म्हटले नाही का ? आपले मन हे कशा प्रकारे समस्या उत्पन्न करीत राहते या गोष्टीची तुम्ही सतत जाणीव ठेवली पाहिजे, हे पुन्हा तुमच्या लक्षात आणून द्यावेसे वाटते. शांतपणे श्रवण करण्याची पूर्ण अवस्था तुम्हांला प्राप्त करून घ्यावयाची आहे. याचाच सरळ अर्थ हा आहे की, सध्या तुम्ही शांतपणे श्रवण करीत नाही, तर ती श्रवणाची आदर्श अवस्था तुम्हांला पुढे साध्य करून घ्यावयाची आहे आणि त्यासाठी तुम्हांला काही काळ हवा आहे आणि त्यावद्दल आवड निर्माण व्हावयाला हवी आहे. कुठलीही अवस्था गाठण्यासाठी जो वेळ व आवड अवश्य आहे असे आपणांस वाटते, त्यामुळेच तर समस्या उत्पन्न होत राहतात. आपण सध्या श्रवण करीत नाही या गोष्टीची तुम्हांला नुसती साधी जाणीवदेखील नाही. अशी जाणीव ज्या वेळी तुम्हांला होईल, त्या वेळी आपण श्रवण करीत नाही ही वस्तुस्थिती योग्य ती कृती सहजपणेच घडवून आणील. त्या वस्तुस्थितीचे आकलनच योग्य ती कृती घडवून आणील. तुम्हांला या बाबतीत काहीही करावे लागणार नाही. पण तुम्हांला तर या बाबतीत कृती करण्याची घाई झाली आहे; वस्तुस्थिती तुम्हांला बदलावयाला हवी आहे. वस्तुस्थितीच्या विरोधी असणारी अवस्था तुम्हांला उत्पन्न करावयाची आहे. वस्तुस्थितीसंबंधीची काही

तरी कृती करण्याची तुमची ही जी धडपड आहे, तिच्यामुळेच समस्या उत्पन्न होत राहतात. याच्या उलट, वस्तुस्थितीची जर तुम्हांला जाणीव झाली, तर ती जाणीवच मनाला विमुक्तता प्राप्त करून देणारी कृती घडवून आणते. पण तुमचे मन जोवर कसली तरी धडपड करण्यात, कशाशी तरी तुलना करण्यात, किंवा तिचा धिक्कार करण्यात गुंतून पडलेले राहील, तोवर तुम्हांला वस्तुस्थितीचे यथार्थ आकलन होणारच नाही आणि असल्याचे असत्यत्वही तुमच्या ध्यानात येणार नाही.

" आपण सांगता तसे अलसेही कदाचित. पण माणसाच्या मनात जे विरोध व संघर्ष सदैव चालू असतात, त्यांच्यामुळे खऱ्या अर्थाने श्रवण करणे हे त्याला जवळजवळ अशक्यच होऊन वसते असे मला वाटते. "

हे पाहा, श्रवण करणे ही स्वभावतःच एक पूर्ण अशी कृती असते. श्रवण करण्याच्या कृतीबरोबरच तिची अंगभूत अशी विमुक्तताही आपोआपच येत असते. पण तुम्हांला नेमके काय हवे आहे ? शांतपणे श्रवण करावयाला हवे आहे की, मनातील संघर्षामध्ये बदल घडवून आणावयाला हवा आहे ? आपल्या मनातील संघर्ष व त्यातील कल्पनांचा परस्परविरोध यांना विचाराच्या विशिष्ट साच्यात जबरीने बद्ध करून ठेवू नका. त्यांचे केवळ अवधान असू द्या आणि अशा अवस्थेत आता जे सांगितले जात आहे, ते जर तुम्ही शांतपणे श्रवण कराल, तर तुमचे हे परस्पर-विरोध, हे संघर्ष कदाचित आपोआपच नाहीसे होऊन जातील. हे पाहा आपण सर्वजण नेहमी कुणी ना कुणी होण्याच्या मागे लागत असतो. एक विशिष्ट अवस्था गाठण्यामागे, एखादा विशिष्ट अनुभव जागविण्यामागे किंवा दुसरा एखादा अप्रिय अनुभव टाळण्यामागे लागलेलो असतो. त्यामुळे आपले मन हे सदैव कशात तरी गुंतलेले असते, अडकलेले असते. आपल्या या धडपडींचा व यातनांचा कोलाहल श्रवण करण्यासाठी आपले मन शांत, निःस्तब्ध असे कधीच होत नाही. तेव्हा मला एवढेच सुचवावयाचे आहे की, तुम्ही साधे, सहज असेच राहा. कुणीतरी विशेष होण्याचा किंवा कुठला तरी विशेष अनुभव हस्तगत करण्याचा प्रयत्न मुळीच करू नका.

असंतोषाग्नी

कित्येक दिवत पावसाची संतत धार वरसत होती. नद्यानाले जोराचा खळ-खळाट करीत, दुथडी भरून वाहत चालले होते. त्या खोऱ्याच्या कोनाकोपऱ्यातून, आतून, खाचाखळग्यातून गढूळ पाण्याने भरलेले लहानलहान नाले एका मोठ्या ओढचाला मिळत होते. हा ओढा एका नदीला जाऊन मिळत होता आणि ही नदी काही मैलांवर समुद्राला जाऊन मिळत होती. नदीच्या वाढत्या पुराचा विशाल प्रवाह वेगाने वाहत वाहत, नागमोडी वळणे घेत घेत फळवागांमधून व उघडचा माळरानांमधून झपाटचाने चालला होता. उन्हाळचातही ही नदी कधी आटत नसे. पण तिला येऊन मिळणारे ओढे मात्र सुकून जात आणि त्यांचे कोरडे वालुका-प्रवाह व खडकावरील प्रवाहाच्या खुणा तेवढचाच मागे उरत.

नदीप्रवाहाचा वेग आता माणसाच्या झपाटचाच्या चालीपेक्षाही अधिक जोराचा झाला होता. त्यामुळे दोन्ही तीरांवर उभे राहून वरेच लोक त्या वेगवान प्रवाहाकडे कुतूहलाने पाहत होते. त्या नदीला एवढा मोठा पूर क्वचितच येई. त्यामुळे हा पूर पाहताना लोकांचे डोळे विस्मयाने चमकत होते. त्यांची मने उत्तेजित झाली होती. त्या वेगवान प्रवाहाकडे पाहण्यात त्यांना विलक्षण आनंद वाटत होता. नदीच्या या जोराच्या पुरामुळे समुद्राजवळ वसलेल्या शहरावर आपत्ती कोसळणार होती. सखल भागातील घरे पाण्यात बुडून जाणार होती. आसपासच्या फळवागा व शेते पुराने वाहून जाणार होती. पण येथे उंचावर मात्र पुलाखालून खळखळणारा वेग-वान नदीप्रवाह महापुराचे संगीत गात चालला होता. काही लोक मासे पकड-ण्याच्या तयारीत होते. पण त्यांना फारसे काही मिळेलसे दिसत नव्हते. कारण प्रवाहाचा वेग फारच जोराचा होता. आणि आसपासच्या सगळचा ओढचानाल्यां-तील केरकचरा तो वाहून नेत होता. इतक्यात पुन्हा पाऊस वरसू लागला. पण लोक मात्र पुराची गंमत पाहत साध्यासुध्या दृश्यातील आनंद लुटीत नदीतीरावर स्वस्थपणे उभेच होते.

भेटण्यास आलेली स्त्री सांगू लागली, "मी आजवर नेहमीच कुठल्या ना कुठल्या प्राप्तव्यामागे लागत आले आहे. मी वाचनही वरेच केले आहे. नाना विषयांवरची नाना पुस्तके पालथी घातली आहेत. प्रथम मी कॅथॉलिक पंथ स्वीकारला होता. पण नंतर तो सोडून दुसरा पंथ स्वीकारला. मग तोही सोडला व एका धर्मसंस्थेची सभासद वनले. आजकाल तर मी पौरस्त्य तत्त्वज्ञानावरील पुस्तके वाचीत आहे. आणि बुद्धाच्या शिकवणीवरील ग्रंथाचेही पठण करीत आहे. -- आणि या सर्व गोष्टींच्या भरीला आता मी स्वतःचे मनोविश्लेषणही करवून घेतले आहे. पण

एवढे सारे केल्यानंतरदेखील प्राप्तव्यामागे जात राहण्याची माझी धडपड काही थांबली नाही आणि आता मी आपणाकडे येऊन पोचले आहे. गुरूच्या शोधार्थ मी हिंदुस्थानलाही जावयाला निघाले होते, पण विशिष्ट परिस्थितीमुळे मला तेथे जाता आले नाही. "

एवढे सांगून झाल्यावर ती स्वतःच्या कौटुंबिक जीवनासंबंधीची माहिती सांगू लागली. तिचा विवाह झाला असून तिला दोन मुले होती. दोन्ही तरतरीत व बुद्धिवान असून सध्या विश्वविद्यालयात शिकत होती. त्यांच्याबद्दल तिला कसलीही चिंता नव्हती. कारण स्वतःची काळजी घेण्यास ती पूर्णपणे समर्थ होती. सामाजिक स्वरूपाच्या कार्यामध्ये आता तिला गोडी वाटेनाशी झाली होती. ध्यानचिंतनात काळ घालविण्याचा तिने खूप प्रयत्न करून पाहिला होता. पण त्यात तिला मुळीच यश आले नव्हते. आणि आजही तिचे मन पूर्ववत निर्बुद्ध व चंचल असेच होते. शेवटी तिने सांगितले,

"ध्यानधारणा व प्रार्थना यांच्यासंबंधी आपण जे सांगता, ते मी आजवर वाचलेल्या व कल्पिलेल्या गोष्टींपेक्षा इतके काही विलक्षण वेगळे आहे की, त्यामुळे मी अगदी स्तंभित होऊन गेले आहे. एवढे मात्र खरे की, माझ्या या कंटाळवाण्या व गोंधळलेल्या विचारकल्पनांमधून सत्य काय आहे हे शोधून काढण्याची व त्याचे रहस्य जाणून घेण्याची माझी मनापासूनची इच्छा आहे. "

सत्याच्या मागे लागल्याने सत्य आपणांस गवसेल अशी का तुमची समजूत आहे? तथाकथित साधकाला सत्य हे केव्हाही गवसत नसते, हीच वस्तुस्थिती नाही का? प्राप्तव्यामागे लागण्याची तुमची ही जी तीव्र प्रेरणा आहे तिचा तळ गाठण्याचा प्रयत्न तुम्ही कधीच केला नाहीत. केलात का असा प्रयत्न? आणि तरीही तुम्ही एका प्राप्तव्यातून दुसऱ्याकडे अशा सारख्या हिंडत राहिला आहात आणि आपणास हवे ते नक्की गवसेल अशी आशा बाळगीत आहात. आपल्या या प्राप्तव्याला सत्य हे नाव देऊन तुम्ही त्याचे एक गूढ बनवून टाकीत आहात.

"पण मला जे हवे आहे, त्याच्यामागे धावण्यात वाईट ते काय आहे? मला जे जे हवेसे वाटले, त्याच्यामागे मी नेहमीच जात राहिले आहे आणि बऱ्याच वेळा मला आपले प्राप्तव्य गवसतही आले आहे. "

असे असेलही. पण पैसा मिळविणे किंवा सुंदर चित्रांचा संग्रह करणे, यांच्याप्रमाणे सत्य हेही गोळा करता येईल, अशी का तुमची कल्पना आहे? एखाद्या विशेष अलंकाराने देह सजवावा अशासारखा का तो प्रकार आहे? प्राप्तव्यामागे धावणारे आपले मन पूर्णपणे निःस्तब्ध झाले, तरच ते जे 'अन्य' ते अवतरणे संभवनीय आहे, हे कसे नाही तुमच्या ध्यानात येत?

"पण मला तर वाटते की ते मिळविण्याची माझी आतुरता आता पराकोटीला पोचली आहे."

मुळीच नाही. तुम्हांला जे गवसण्याची एवढी तीव्र उत्कंठा लागून राहिली आहे, ते तुम्हांला कदाचित गवसेलही. पण ते सत्य मात्र मुळीच असणार नाही.

"मग मी करावयाचे तरी काय ? नुसते स्वस्थ पडून जागच्या जागी कुजत का राहावयाचे ?"

हे पाहा, तुम्ही एकदम मोठी उडी घेऊन अंतिम निर्णयाप्रत पोचू पाहत आहात, होय की नाही ? पण तुम्ही प्राप्तव्याच्या पाठीमागे अशा सारख्या का लागल्या आहात, याचा प्रथम शोध घेणे, हेच अधिक महत्त्वाचे नाही का ?

"मी सारखी विशिष्ट प्राप्तव्यामागे का लागत आहे, हे मला माहीत आहे. सगळ्या गोष्टींविषयी मला असंतोष वाटू लागला आहे. फार काय, पण मला जे जे प्राप्त झाले आहे त्याच्या बाबतीतही मी असंतुष्टच आहे. असंतोषाचे हे दुःख, ही वेदना पुन्हा पुन्हा परतून येत राहते. आपणास काही तरी प्राप्त झाले आहे, असे मला दर वेळी वाटते. पण लवकरच ते नाहीसे होऊन जाते आणि असंतोषाचे दुःख पुन्हा मला ग्रासून टाकते. सुचेल तो तो उपाय करून हे दुःख जिंकण्याचा मी प्रयत्न करून पाहिला आहे. पण हे दुःख आपल्या आवाक्यापलीकडचे आहे असा अनुभव मला येत गेला आहे. म्हणूनच शांती व समाधान यांचा लाभ करून देणारे असे काहीतरी मला सापडून घेतलेच पाहिजे. मग ते सत्य असो की दुसरे काही असो."

तुमचा हा असंतोषाग्नी नाहीसा करून टाकण्यात तुम्ही आजवर सफल झाला नाहीत, याबद्दल तुम्हांला कृतज्ञताच वाटावयाला नको का ? असंतोषावर मात करणे हीच तुमची आजवर समस्या होऊन बसली आहे, होय ना ? तुम्ही संतोषाच्या शोधार्थ अव्याहत हिंडत राहिला आहात आणि तुमच्या सुदैवाने तो कधीच तुमच्या वाटचाला आला नाही. कारण असा संतोष प्राप्त होणे म्हणजेच कुंठित होऊन जाणे किंवा कुजत पडणे होय, नुसते पशूप्रमाणे जीवन जगणे होय.

"मला वाटते मी आजवर याच्याच मागे लागत आले आहे. मला सतत पोखरणाऱ्या या असंतोषापासून दूरदूर जाण्यासाठी कुठली ना कुठली पळवाटच मी आजवर शोधीत आले आहे."

बहुतेक सर्वचजण असे असंतुष्ट असतात, नाही का ? पण त्यांना सहज मिळणाऱ्या कुठल्यातरी गोष्टीत केव्हातरी संतोष गवसतो. मग ती गोष्ट म्हणजे पर्वतशिखर गाठण्याची महत्त्वाकांक्षा असो की, दुसऱ्या कुठल्या महत्त्वाकांक्षेची परिपूर्ती असो. बहुतेक लोक मनाला संतोष देणारी कुठली तरी गोष्ट साध्य करून घेऊन आपल्या असंतोषाची आग शमवीत राहतात. आपल्या संतोषाला तडे पडू लागले की, आपली असंतोषाची वेदना नाहीशी करण्यासाठी आपण नानाविध मार्ग शोधू लागतो. अशा

प्रकारे आपण नेहमी वरवरचे उथळ जीवन जगत राहतो. असंतोषाचा तळ गाठण्याचा आपण कधीच यत्न करीत नाही.

" पण असंतोषाचा तळ माणसाने गाठावयाचा तरी कसा ? "

तुमच्या या प्रश्नावरून हे स्पष्ट दिसते की, अजूनही तुम्हांला असंतोषापासून दूर पळ काढण्याचीच इच्छा आहे. पण असंतोषाच्या या वेदनेपासून दूर पळण्याचा किंवा त्या वेदनेचे स्वरूप बदलण्याचा प्रयत्न न करता तिच्यासह जीवन जगत राहणे म्हणजेच असंतोषाच्या तळापर्यंत पोचणे होय. जोवर आपण कुठल्यातरी विशिष्ट स्थानी पोचण्याचा किंवा कुणीतरी विशेष होण्याचा प्रयत्न करीत राहू, तोवर संघर्षाचे दुःख हे तेथे राहणारच. असे दुःख उत्पन्न झाले की, मग आपल्याला त्याच्यापासून दूरदूर पळावेसे वाटते आणि यासाठी आपण स्वतःला नानाविध कामांत गुंतवून टाकतो. पण वस्तुतः या असंतोषाशी एकात्मता साधणे, या असंतोषाचाच एक भाग बनून जाणे, संतोषप्राप्तीच्या कुठल्याही चाकोरीत स्वतःला अडकू न देणे आणि तरीही असंतोष हा अपरिहार्यच आहे असे मानून त्याचा स्वीकार करण्यास स्वतःला भाग न पडू देणे म्हणजेच त्या अद्वितीयाच्या उदयाला, त्या द्वैतातीताच्या प्रवेशाला वाट मोकळी करून देणे होय.

" आपण सांगता ते माझ्या ध्यानात आले आहे. पण माझ्या असंतोषाविरुद्ध आजवर इतकी वर्षे मी झगडत आले आहे की, आता त्या असंतोषाचाच एक भाग बनून जाणे हे मला अतिशय अवघड होऊन बसले आहे. "

हे पाहा, एखाद्या सवयीविरुद्ध तुम्ही जितक्या झगडत राहाल, तितक्या प्रमाणात ती सवय तुम्ही दृढ बनवून टाकाल. सवय ही मृतप्राय अशी वस्तू आहे. तेव्हा तिच्याविरुद्ध झगडूही नका व तिचा प्रतिकारही करू नका. आपल्या असंतोषाच्या वास्तव स्वरूपाचे दर्शन होताच, गतकाल हा पूर्णपणे गतार्थ होऊन जातो. वस्तुतः असंतुष्ट असणे हे कितीही दुःखदायक असले, तरी असंतोषाची ही ज्वाला जर आपण ज्ञानसंपादन, परंपरा, आशा किंवा सफलता, अशा कोणत्याही साधनाने गुदमरू दिली नाही, तर ही असंतोष-ज्वाला एक विलक्षण वस्तू आहे असे आपणास आढळून येते. आपण सर्व लोक मानवी कर्तृत्वाच्या प्रचंड गोष्टींनी स्तंभित होऊन जात असतो; किंवा धर्मसंस्थेतील गूढ रहस्याने अथवा जेटविमानामागील यंत्रकौशल्याने स्तिमित होऊन जात असतो. पण हे सगळे उथळ, पोकळ व मानवाला दुःखाकडे व विनाशाकडेच नेणारे आहे. पण मनाच्या साऱ्या शक्तींच्या व कर्तृत्वाच्या पार असणारे असेही एक रहस्य असते. मात्र या रहस्यामागे धावत जाण्याने काही ते गाठता येत नसते किंवा आवाहन केल्यानेही ते मिळत नसते. न मागताच ते आले पाहिजे. अशा तऱ्हेने सहजपणे अवतरण्यातच मानवी कल्याण वसत असते.

परमानंदाचा अनुभव

त्या दिवशी अतिशय उकडत होते. सार्वजनिक उद्यानात बरेच लोक हिरवळीवर पहुडले होते आणि काहीजण दाट वृक्षांच्या छायेतील बाकांवर बसले होते. काही लोक शीत पेये पीत होते आणि कुठून तरी स्वच्छ ताजी हवा मिळावी म्हणून जोराने श्वासोच्छ्वास करीत होते. आकाश धूसर झाले होते. वाऱ्याची इवलीशीही झुळूक येत नव्हती. प्रचंड कारखान्यांमधून निघणाऱ्या धुराने व वाफांनी त्या शहराचे संपूर्ण वातावरण कुंद होऊन दाटून गेले होते.

शहरापासून दूर असणाऱ्या खेड्यापाड्यात व माळरानात मात्र आता वसंतऋतू ओसरत असेल व ग्रीष्माचे आगमन होऊ लागले असेल. आसमंतात सगळीकडे रमणीयता भरून राहिली असेल. वृक्षलतांना नवी पालवी फुटत असेल. सूर्यप्रकाशात चमचमणाऱ्या त्या विशाल नदीच्या काठाकाठाने जाणारा रस्ता आता दोही बाजूंना विविधरंगी फुलांनी फुलून गेला असेल. घनदाट अरण्यांमध्ये आता निगूढ निःशब्दतेचा सखोल प्रत्यय येत असेल. याच निःशब्दतेमध्ये नवसर्जनाची चाहूल लागत असते. ते दूरदूरचे डोंगर व त्या खोल खोल दऱ्या आता निळ्याभोर दिसत असतील. आणि रानफुलांच्या परिमलाने त्या साऱ्या दरवळून गेल्या असतील. पण या शहरात मात्र --

कल्पनाशक्ती ही वास्तवाचे दर्शन नेहमी विकृत करून टाकीत असते आणि असे असताही आपल्याला आपल्या कल्पनाशक्तीचा व तार्किक सामर्थ्याचा केवढा विलक्षण अभिमान असतो ! बाकी आपले हे संकीर्ण विचारात गुरफटलेले विकल्पन-प्रचुर मन स्वतःचे मूलभूत परिवर्तन घडवून आणण्यास मात्र सर्वस्वी असमर्थ ठरते. असे हे मन क्रांतिकारी असूच शकत नाही. भविष्यात काय काय व्हावे व काय काय संभवनीय आहे, याविषयीच्या कल्पनांनी हे मन सदैव वेढलेले असते. स्वतःच निर्मिलेल्या प्रक्षेपानुसारच ते नेहमी वर्तन करीत असते. वस्तुतः भविष्यात काय व्हावे यासंबंधी मनुष्य जे जे विकल्पन करील अथवा जे जे तर्क बांधील त्यांच्यात कल्याणमयता असणे हे मूलतःच असंभवनीय असते. ते कल्याणमय वर्तमान वास्तवाच्या आकलनातच वसत असते. पण आपली कल्पनाशक्ती ही आपल्याला वास्तवाचे दर्शन घडू देण्याच्या आड नेहमी उभी राहत असते. तुलना करीत राहण्याची आपली प्रवृत्ती हीदेखील वास्तवदर्शनाला असाच प्रतिबंध करीत असते. म्हणून वास्तवाचे, सत्याचे दर्शन व्हावयाचे असेल तर मनाने आपली सर्व विकल्पने बाजूला सारली पाहिजेत.

भेटण्यास आलेला गृहस्थ अगदी तरुण होता. पण त्याचा विवाह झालेला असून

तो आता कुटुंबवत्सल बनलेला होता. व्यापारात त्याने नाव कमावले होते. आता मात्र तो अतिशय दुःखी व संत्रस्त दिसत होता व काहीतरी निवेदन करण्यास विशेष आतुर झालेला दिसत होता.

तो सांगू लागला, " काही महिन्यांपूर्वी मला एक विलक्षण अनुभव आला होता. पण त्यासंबंधी आजवर मी कुणाशीही बोललो नव्हतो. त्यामुळे आता तो आपल्याला नीटपणे सांगता येईल की नाही कोण जाणे. सांगता यावा अशी मात्र माझी उत्कट इच्छा आहे. कारण दुसऱ्या कुणापाशीही मी यासंबंधी बोलू शकणार नाही. त्या अनुभवाने माझे हृदय परमानंदाने काठोकाठ भरून टाकले होते. पण आता तो अनुभव नाहीसा होऊन गेला आहे. त्याचा रितेपणाच केवळ माझ्या स्मृतींमध्ये रेंगाळत आहे. तो अनुभव मला पुन्हा प्राप्त करून देण्यास कदाचित आपण मदत करू शकाल असे वाटते. त्या विलक्षण सुखद अनुग्रहाचे वर्णन मला जितक्या सविस्तरपणे करता येईल, तेवढे मी करणार आहे. अशा प्रकारच्या अनुभवांविषयी मी पूर्वी वाचले होते खरे. पण मला ते केवळ पोकळ शब्दच वाटत. आणि माझ्या इंद्रियनिष्ठ बुद्धीलाच त्यांची संभाव्यता पटत असे. पण हा जो अलौकिक अनुभव मला आला, तो साऱ्या विचारांच्या, सगळ्या कल्पनांच्या व सर्व आशा-इच्छांच्या पार असणारा असा अनुभव होता आणि आता मी तो गमावून बसलो आहे. तो परत आणून द्यावयाला आपण कृपा करून मला साह्य करा. " तो क्षणभर थांबला व मग पुन्हा बोलू लागला.

" एक दिवस मी अगदी पहाटेसच जागा झालो. सारे शहर अजून निद्रेतच गुंग होते. पहाट झाल्याचे परिचित मंद ध्वनी अजून कानी पडू लागले नव्हते. पण मला मात्र एकदम उठून बाहेर पडावेसे वाटले. मी चटकन कपडे घातले व खाली रस्त्यावर आलो. दूध नेणारी व्हॅनदेखील अजून बाहेर पडलेली दिसत नव्हती. वसंतऋतूला नुकताच प्रारंभ झाला होता. आकाशात मृदुमधुर नीलिमा तरळत होता. मलभर दूर असलेल्या सार्वजनिक उद्यानात जावे असे मला उत्कटतेने वाटू लागले. घराच्या दारातून बाहेर पडल्याच्या क्षणापासूनच मी जणू हवेवरच तरंगत चाललो आहे, अशा प्रकारची तरलतेची, चैतन्यमयतेची विलक्षण भावना माझ्यात संचरू लागली. घरासमोरची इमारत ही वस्तुतः सामान्य चाळीसारखीच होती. पण आज तिची असुंदरता नष्ट होऊन गेली होती. त्या इमारतीच्या विटांमध्येदेखील आज प्राण भरल्यासारखा वाटू लागला. सामान्यतः ज्या लहानसहान वस्तूंकडे मी कधी लक्षही दिले नसते, त्या सर्वांमध्ये एक अलौकिक गुणवत्ता भरून राहिल्यासारखे मला वाटू लागले आणि आश्चर्य म्हणजे प्रत्येक वस्तू हा माझाच एक अंगभूत अंश आहे, असे मला भासू लागले. माझ्याहून भिन्न असे तेथे काही उरलेच नव्हते. सगळ्या गोष्टींचे निरीक्षण करणारा तो 'अहं' हाच मुळी तेव्हा नाहीसा झाला होता. या शब्दांनी मला काय

ध्वनित करावयाचे आहे, हे आपल्याला समजलेच असेल. समोरच्या त्या झाडापासून, नालीत पडलेल्या त्या कागदापासून किंवा परस्परांना साद घालणाऱ्या त्या पक्ष्यांपासून वेगळा असणारा अहं हा आता उरलाच नव्हता. जाणिवेची ही विलक्षण अवस्था या पूर्वी माझ्या कधीही अनुभवास आली नव्हती. "

तो पुढे सांगू लागला, "उद्यानाच्या वाटेवर एक फुलांचे दुकान लागते. या दुकानावरून मी शेकडो वेळा गेलो आहे. आणि जाता-येता फुलांकडे पाहतही आलो आहे. पण या विशिष्ट पहाटे फुलाचे दुकान येताच मी थांबलो. दुकानाची काचेची खिडकी उष्णता व दमटपणा यांच्या संमिश्रणाने आतून काहीशी ओलसर व धूसर झालेली होती. पण या धूसरतेमधूनही मला तऱ्हतऱ्हेची फुले चांगली स्पष्ट दिसत होती. त्यांच्याकडे निरखून पाहता-पाहताच एका अननुभूत आनंदाचा प्रत्यय देऊन आपण आनंदाने हसत आहोत असे मला वाटू लागले. त्या फुलांचा व माझा परस्परांशी संवाद चालला होता. मी त्यांच्यांतलाच एक होतो व ते सगळे माझेच अंगभूत अंश होते.

" माझ्या या प्रकारच्या कथनामुळे त्या वेळी माझे डोके थोडे विघडले होते की काय किंवा, मला कसला उन्मादवायू झाला होता की काय, अशी शंका कुणालाही येण्यासारखी आहे खरी. पण वस्तुस्थिती मात्र अशी मुळीच नव्हती. घरून निघताना मी कपडे घातले तेही व्यवस्थितपणाने घातले होते व स्वच्छ आहेत ना हेही पाहिले होते. घडचाळात किती वाजले आहेत हेही मी लक्षपूर्वक पाहिले होते. रस्त्याने जाताना दुकानांवरच्या पाटयाही मी वाचीत होतो. माझ्या शिप्याच्या दुकानाची पाटीदेखील मी वाचली. एका पुस्तकाच्या दुकानापाशी उभे राहून काही पुस्तकांची नावेदेखील मी वाचली. भोवतालचे सगळे काही चैतन्यमय होऊन गेले होते आणि साऱ्या वस्तुमात्राच्या प्रेमाने माझे मन भरून गेले होते. त्या सगळचा फुलांचा सुगंध मीच होतो. पण सुगंध घेणारा ' मी ' मात्र कुठेच उरला नव्हता.—आपल्याला माझे हे म्हणणे समजले असेलच. साऱ्या वस्तू व मी यांच्यांत कसलेही भिन्नत्व उरले नव्हते. त्या फुलाच्या दुकानातील फुले विलक्षण सतेज रंगांनी झळकत होती. त्या अलौकिक सौंदर्याने मला मंत्रमुग्ध बनवून टाकले असावे. कारण काळाचे माप व काळाचे भान माझ्यामध्ये उरले नव्हते. त्या फुलांपासून दूर जाणे माझ्या अगदी जिवावर आले होते. त्या क्षणी संघर्षाची, वेदनांची, दुःखांची सारी दुनिया अस्तित्वात होती आणि अस्तित्वात नव्हतीही. खरोखर त्या विलक्षण अवस्थेत शब्दांना अर्थच उरला नव्हता. कारण शब्द हे वर्णनात्मक, तुलनात्मक व भेदात्मक असेच असतात. पण त्या अवस्थेत शब्द उरलेच नव्हते. अनुभवणारा अहं हाही त्या वेळी शिल्लक नव्हता. केवळ तो अनुभव, केवळ ती अवस्थाच काय ती अस्तित्वात होती. काल थांबून गेला होता. भूत, वर्तमान, भविष्य कशालाही तेथे अस्तित्व नव्हते. तेथे केवळ—पण ते शब्दांत

कसे सांगावयाचे हेच मला कळत नाही. सांगता नाही आले तरी हरकत नाही.--- तेथे एक अलौकिक अस्तित्व होते.---पण हाही शब्द वापरावयाला नको. सारीसारी पृथ्वी तिच्या पृष्ठभागातील व पृष्ठभागावरील साऱ्या वस्तुजातासह संपूर्ण पृथ्वी एका अलौकिक अनुग्रहाने, एका मंगल प्रसादाने ओसंडून गेली होती. आणि उद्यानाकडे जाणारा मी हाही त्या पूर्णाचाच एक अविभाज्य भाग बनून गेला होता.

" उद्यानाजवळ मी पोचलो, तेव्हा तेथील पूर्वपरिचित वृक्षांच्या अपार सौंदर्याने मी मंत्रमुग्ध होऊन गेलो. फिक्या पिवळ्यापासून गडद हिरव्या रंगांची सारी पाने चैतन्याने नाचत डोलत होती. प्रत्येक पान वेगळेवेगळे उठून दिसत होते. पृथ्वीची सारी सौंदर्यलक्ष्मी एकेका पानात दाटली होती. आपले हृदय जोराने धडधडत आहे याची मला एकदम जाणीव झाली. वस्तुतः माझे हृदय चांगले शाबूत आहे. पण उद्यानात शिरताक्षणीच मला श्वासोच्छवास करणेही अवघड होऊन गेले आणि आपण मूर्च्छित होऊ असे मला एकदम वाटले. लागलीच मी बाकावर बसलो. नेत्रांतून घळघळ अश्रू वाहू लागले. तेथे जी विलक्षण नीरव निःस्तब्धता नांदत होती, ती मला असह्य झाली. पण ती निःस्तब्धता साऱ्या वस्तुजातामधील दुःख व वेदना धुऊन काढीत होती.

" मी उद्यानात दूरवर गेलो तेव्हा वातावरणात संगीत ऐकू येऊ लागले. आसपास एकही घर नव्हते. आणि एवढ्या पहाटे उद्यानात कुणी रेडिओ घेऊन येणेही संभवनीय नव्हते. त्यामुळे त्या संगीतश्रवणाने मी चकित होऊन गेलो. हे संगीत हाही त्या संपूर्ण वस्तुजाताचाच एक अंश होता. अखिल विश्वातील संपूर्ण शिवत्व, समग्र करुणा त्या उद्यानात दाटली होती. प्रत्यक्ष ईश्वरच तेथे वसत होता. "

तो पुढे सांगू लागला, " वस्तुतः मी काही धार्मिक वृत्तीचा मनुष्य नाही आणि धर्मांचा अभ्यास केलेला पंडितही नाही. तसा मी दहावारा वेळा देवालयात जाऊन आलो आहे. पण मला त्यासंबंधीचे आकर्षण कधीच वाटले नाही. देवालयांमध्ये जे प्रार्थनादी प्रकार चालतात, त्यांचे मला काहीसे वावडेच आहे. पण त्या उद्यानात त्या वेळी एका अलौकिकाचे अस्तित्व मला जाणवत होते हे निश्चित. साऱ्या वस्तू त्याच्यातच वसत होत्या, त्याच्यामध्येच नांदत होत्या.

" माझे पाय लटपटू लागले म्हणून एका झाडाला टेकून खाली बसणे मला भागच पडले. पाठीशी असलेल्या झाडाचा बुंधा माझ्यासारखाच सचेतन होता. मी त्या झाडाचा, त्या अलौकिक सर्वव्यापी अस्तित्वाचाच एक भाग होतो. त्या वेळी मला मूर्च्छा आली असावी असे वाटते. कारण हे सारे माझ्या सहनशक्तीच्या पारचे होते. ते सर्व चैतन्यमय तेजस्वी रंग, ती पाने, ते खडक, ती फुले, ते अपार सौंदर्य, सारे सारे माझ्या सहनशक्तीच्या सीमापारचे होते आणि त्या सर्वांवर तो कल्याणमय व आनंदमय अलौकिक अनुग्रह झाला होता.....

" जेव्हा मी भानावर आलो, तेव्हा सूर्य बराच वर आलेला होता. सामान्यत: उद्यानापर्यंत पोचण्यास मला वीस मिनिटे लागतात. पण त्या वेळी घरातून बाहेर पडल्यास जवळजवळ दोन तास होऊन गेले होते, असे मला आढळले. घरी पायी चालत जाण्याइतके सामर्थ्य माझ्या शरीरात उरले नाही असे मला वाटले, म्हणून तेथेच बसून राहून परतण्याइतकी शक्ती येण्याची वाट पाहू लागलो. विचार करण्याचेही त्राण माझ्यामध्ये उरले नव्हते. नंतर जेव्हा मी सावकाश चालत घरी जाऊ लागलो, तेव्हा तो सारा अलौकिक अनुभव माझ्यात दाटला असल्याचे मला दिसून आले. दोन दिवस तो अलौकिक अनुभव टिकला आणि मग जसा अकस्मात आला होता, तसाच एकाएकी नाहीसा झाला. आणि येथपासूनच माझ्या व्यथेला प्रारंभ झाला. आठवडाभर मी आपल्या ऑफिसच्या जवळपासही फिरकलो नाही. तो विलक्षण चैतन्यमय अनुभव पुन्हा यावा असे मला उत्कटतेने वाटू लागले. त्या अलौकिक परमोच्च अनुभवविश्वात पुन्हा विहार करण्यास मी अतिशय उत्कंठित होऊन गेलो.

" हे सारे दोन वर्षांपूर्वी घडले. त्यानंतर सारे काही सोडून देऊन, जगाच्या कुठल्यातरी दूरदूरच्या कोपऱ्यात एकांतवासात जाऊन राहण्याचा मी विचार करू लागलो. पण या मार्गाने तो अनुभव काही आपणास पुन्हा प्राप्त होणार नाही, हे मला अंतर्यामी पुरेपूर ठाऊक होते. कुठल्याही मठात वा आश्रमात तो अनुभव मला मिळणे शक्य नाही किंवा कुठल्याही ख्रिश्चन देवालयात तो गवसणे शक्य नाही हे निश्चित. हे देवालय मंदमंद ज्योतींनी उजळलेले असले, तरी वस्तुत: तेथे मृत्यू व काळोख हेच वसत असतात. एकदा तर यासाठी हिंदुस्थानात जावे असेही माझ्या मनात आले पण तोही विचार मी सोडून दिला. यानंतर मी एक विशिष्ट औषधी घेऊन पाहण्याचाही प्रयोग केला. ती घेतल्याने सर्व संवेदनाविशेष सूक्ष्म, उत्कट व उत्तेजित होतात, असे मला आढळून आले. पण मला असले गुंगी आणणारे द्रव्य मुळीच नको आहे. विलक्षण अनुभव मिळविण्याचा तो एक स्वस्त उपाय आहे; अनुभव घेण्याची ती एक युक्ती आहे खरी. पण ती खरी, अस्सल वस्तू मुळीच नव्हे.

" आणि आता अखेर मी आपल्यापाशी आलो आहे. " आपले निवेदन संपविताना तो म्हणाला. " त्या परमोच्च अनुभवविश्वात पुन्हा राहावयाला मिळण्यासाठी मी वाटेल ते मोल देण्यास तयार आहे; माझा जीव, माझी सर्व मालमत्ता देण्यास मी तयार आहे. मग मी आता काय बरे करू ?"

हे पाहा, तो अनुभव तुम्ही न मागताच आला. त्यासाठी तुम्ही काहीही केले नव्हते. म्हणून जोवर तुम्ही त्याच्यासाठी धडपडत राहाल, तोवर तुम्हांला तो कधीच प्राप्त होणार नाही. त्या परमोच्च अवस्थेत राहण्याची तुमची ही उत्कट अभिलाषाच नवा अलौकिक अनुभव येण्याच्या आड येत आहे. काय घडले याचे नीट निरीक्षण करा. एकदा तुम्हाला तो अनुभव आला खरा पण आता मात्र तुम्ही त्या

जुन्या मृत अनुभवाच्या स्मृतीवर जगत आहात. जे घडले तेच आता नव्याच्या आगमनाला प्रतिबंध करीत आहे.

" म्हणजे जे घडून आले, ते सारे मी वाजूला सारून द्यावे, विसरून जावे, आणि आतल्याआत गुदमरत, घुसमटत मी आपले क्षुद्र जीवन जगत राहावे, असे का आपले म्हणणे आहे ? "

तुम्ही जर त्या गतानुभवाकडे आशाळभूतपणे पाहत राहिला नाहीत, तो पुन्हा प्राप्त व्हावा अशी अपेक्षाही जर तुम्हांला उरली नाही (आणि हे अतिशय अवघड आहे यात शंका नाही) तर तुमच्या नियंत्रणापलीकडील ती अज्ञात वस्तू कदाचित काही घडवून आणीलही. पण तुम्हांला त्या अनुभवाचा मुळीच लोभ धरून चालणार नाही. लोभ हा नेहमी दुःखच निर्माण करीत असतो. मग तो लोभ अति उदात्त गोष्टीचा का असेना. अधिकाधिक मिळवीत राहण्याची जी हाव माणसाला लागते, तिच्यामुळेच मग भविष्याचे, कालाचे द्वार उघडले जाते. पण हा परमानंद कुठल्याही त्यागाने, कसल्याही सद्गुण संपादनाने किंवा कोणत्याही मादक औषधीने प्राप्त होणे शक्य नाही. असा अलौकिक आनंद हे कुठल्याही गोष्टीचे पारितोषिक नसते. तो कुठल्याही प्रयत्नांचा परिणाम नसतो. तो त्याच्या लहरीनेच येईल. म्हणून त्याच्या पाठीमागे मुळीच लागू नका.

" पण माझा तो अनुभव खराच होता ना ? तो त्या सर्व श्रेष्ठाचाच अनुभव होता ना ? "

जे घडून आले, त्यावद्दलची खात्री दुसऱ्याने आपल्याला पटवून द्यावी अशी आपली नेहमीच इच्छा असते. कारण या रीतीने आपल्याला दुसऱ्याचा आधार मिळतो. पण जे घडले, ते सत्य असले, तरीही त्यावद्दल स्वतःची अशा प्रकारे खात्री करून घेणे किंवा दुसऱ्याच्या खात्रीचा असा आधार मिळविणे म्हणजे वस्तुतः असत्याला बळ मिळवून देणे होय, आभासांना उत्तेजन देणे होय. गतानुभव हा सुखद असो की दुःखद असो, पण तो वर्तमानात ओढून आणणे, म्हणजे सत्याच्या उदयाला प्रतिबंध करणेच होय. कारण सत्याला सातत्य नसते. सत्य हे क्षणाक्षणाला नित्य नवीनतेने अवतरत असते. ते कालातीत, मर्यादातीत असते.

जनहितैषी राजकारणी पुरुष

रात्री पाऊस बराच बरसला होता. गंधवती पृथ्वी अजूनही ओलसरच होती. नदीच्या बाजूने जाणारी वाट आमरायांमधून व जीर्ण वृक्षांच्या रांगांमधून जात होती. हजारो यात्रेकरू या वाटेने जात-येत असत. कारण निष्ठावंत भाविक यात्रेकरूंनी याच वाटेने जावे अशी पुरातन परंपरा दोन हजार वर्षांपासून चालत आलेली होती. सध्याचे दिवस मात्र यात्रेचे दिवस नव्हते. त्यामुळे त्या वाटेने जवळचे खेडूत लोकच जात-येत होते. बहुतेक सर्व रंगीबेरंगी कपडे घालून डोक्यावर भाज्यांचे, गवतांचे किंवा मोळ्यांचे भारे वाहून नेत होते. मागील अंगाने त्यांच्यावर सूर्यप्रकाश पडल्यामुळे ते सारे दृश्य अतिशय मोहक दिसत होते. त्या भारे वाहून नेणाऱ्या खेडुतांच्या चालीत एक प्रकारचे सौष्ठव, एक प्रकारचे सहज लास्य दिसून येत होते. खेडयातील दैनंदिन गोष्टींवर चर्चा करीत, हसत, मजेत ते चालले होते. त्या वाटेच्या दुतर्फा नजर पोहोचेपर्यंत गव्हाची हिरवीगार लसलशीत शेते पसरली होती. मधूनमधून वाटाण्याची व भाज्यांची लागवडही केलेली दिसत होती.

ती सकाळ रम्य, विलोभनीय होती. निरभ्र आकाशाचा नितळ नीलिमा अतीव सुंदर होता. वसुंधरा मंगलतेने पुनीत झाली होती. सारी सृष्टी चैतन्यमय दिसत होती; समृद्धीने, निसर्गश्रीने, पावित्र्याने प्रफुल्लित होती. पण धरणीची ही पवित्रता मानवनिर्मित वस्तूंमुळे नव्हती. ती देवालयांमुळे, धर्मगुरूंमुळे किंवा धर्मग्रंथांमुळे आलेली नव्हती. धरतीचे ते समृद्ध सौंदर्य अतीव शांतीचे, संपूर्ण निःशब्दतेचे अमाप, अमर्याद लावण्य होते. या लावण्य-सलिलात अखिल वस्तुजात न्हाऊन निघाले होते. ते सर्व लतावृक्ष, ते सारे तृणवैभव आणि तो मोठा थोरला वृषभराज—सारे सारे त्या सौंदर्याचेच अंश होते. रस्त्याच्या धुळीत खेळणाऱ्या बालकांना जाणतेपणी नसली, तरी अजाणता या सौंदर्याची मनोमन जाणीव होती. पण हे सौंदर्य नश्वर नव्हते. या सौंदर्याला आदीही नव्हता व अंतही नव्हता.

भेटण्यास आलेला गृहस्थ जनतेचे हित करू इच्छिणारा एक राजकारणी पुरुष होता. इतर राजकारणी पुरुषांहून आपण वेगळे आहोत; कारण आपल्याला लोकहिताची, लोकांच्या गरजांची, त्यांच्या स्वास्थ्याची व निरामय विकासाची खरीखुरी तळमळ आहे असे त्याचे म्हणणे होते. आपण महत्त्वाकांक्षी आहोत खरे पण महत्त्वाकांक्षा कुणाला नसते ? महत्त्वाकांक्षा असल्यामुळेच आपण कार्यतत्पर बनलो आहोत; ती नसती तर आपण आळशी बनून गेलो असतो व कुठलेही लोककल्याण साधण्यास असमर्थ झालो असतो, असे तो सांगत होता. मंत्रिमंडळात

एक स्थान मिळविण्याची त्याची इच्छा होती. ती सफल होण्यासारखीही दिसत होती. एकदा मंत्री झाल्यावर आपल्याला आपल्या कल्पना प्रत्यक्षात सहज उतरविता येतील, अशी त्याची समजूत होती. तो जगभर प्रवास करून आलेला होता. नाना देशांमध्ये लोककल्याणाच्या ज्या योजना, तेथील सरकारांकडून अमलात आणल्या जात आहेत, त्यांचा त्याने अभ्यास केलेला होता आणि आपल्या देशाच्या विकासाच्या दृष्टीने एक योजना त्याने मोठ्या विचारपूर्वक तयार केली होती.

"पण आता ती योजना मी अमलात आणू शकेन की नाही कोण जाणे." त्याच्या शब्दात त्याची वेदना स्पष्ट दिसून येत होती. "कारण आताशा माझी प्रकृती ठीक राहीनाशी झाली आहे. मी आता बेताबेतानेच काम करावे असा डॉक्टरांचा मला सल्ला आहे. मला एक मोठी शस्त्रक्रियाही करून घ्यावी लागेल असे दिसत आहे. पण ही नवी परिस्थिती, ही नवी आपत्ती स्वीकारण्यास माझे मन काही केल्या तयार होत नाही."

पण तुम्ही सारे काही जरा आरामानेच का घेत नाही ? त्याच्या आड काय येत आहे, हे विचारू का ?

"त्याचे असे आहे की, यापुढे बहुधा जन्मभरच मला काहीशा पंगू स्थितीतच जगावे लागेल. आणि मला जे करावयाचे होते ते करणे यामुळे अशक्य होऊन बसेल. पण या पंगू अवस्थेचा स्वीकार करण्यास माझे मन मुळीच तयार नाही. एवढे मात्र खरे की, पूर्वीच्या वेगाने आता यापुढे फार काळ मला काम करता येणार नाही, हे मला वरवर कळत आहे. पण मी जर पंगू बनलो तर माझी योजना मूर्त स्वरूपात कधी येऊ शकणार नाही. कारण माझ्याशिवाय दुसरे महत्त्वाकांक्षी लोक या क्षेत्रात आसपास आहेतच. एक कुत्रा दुसऱ्या दुबळ्या कुत्र्यावर जसा तूटून पडतो, तसेच राजकारणातही होत असते. मी आपल्या अनेक प्रवचनांना हजर राहिलो आहे. तेव्हा आपली भेट घेऊन या गोष्टीची चर्चा करावी असे मला साहजिकच वाटले."

तुमची समस्या ही विफलतेची समस्या आहे का ? तुम्हाला कदाचित दीर्घ काळ आजारी अवस्थेत राहावे लागेल. त्यामुळे तुमची उपयुक्तता व लोकप्रियता कमी होण्याची शक्यता आहे. आणि ही परिस्थिती स्वीकारण्यास तुमचे मन तयार नाही. कारण तुमच्या योजना सफल होऊ शकल्या नाहीत तर जीवन तुम्हाला वैराण वाळवंटासारखे भासू लागेल. हीच आहे का तुमच्या पुढील समस्या ?

"मी तर आपल्याला आरंभीच सांगितले की, इतर माणसांप्रमाणेच मीही महत्त्वाकांक्षी आहे. पण मला लोककल्याण साधण्याची इच्छा मात्र फार आहे. आणि वस्तुस्थिती तर अशी आहे की, माझी प्रकृती फार विघडली आहे. आणि ही कटू वस्तुस्थिती मला मुळीच स्वीकारता येत नाही. त्यामुळे माझ्या मनात तीव्र स्वरू-

पाचा संघर्ष माजला आहे. आणि या संघर्षामुळे माझी प्रकृती अधिकच बिघडत आहे, हेही मला जाणवत आहे. याशिवाय दुसरीही एक भीती माझ्या मनात घर करून वसलेली आहे. अर्थात माझ्या कुटुंबाबद्दल मला कसलीहि चिंता नाही. कारण त्यांची चांगली व्यवस्था मी करून ठेवलेली आहे. पण मला घेरून वसलेली ही भीती नेमकी कशाची आहे, हे शब्दात तरी मला स्वत:पाशी अजूनही व्यक्त करता आली नाही."

ही भीती म्हणजेच मरणाची भीती आहे असे का तुम्हाला म्हणावयाचे आहे ?

"हो, मला वाटते त्याचीच भीती असावी. किंवा वेगळ्या शब्दांत सांगावयाचे झाले तर जे करावयाचे मी मनाशी योजून ठेवले होते, त्याची पूर्तता झाल्याशिवायच मरण येईल की काय अशी भीती मला वाटत असावी. तिचे निराकरण कसे करावे हे काही मला कळत नाही."

तुमचा हा आजार तुमच्या राजकीय चळवळी पूर्णपणे बंद करून टाकील का ?

"परिस्थिती कशी बदलत राहते हे आपणास ठाऊकच आहे. मी राजकारणाच्या केंद्रात राहिलो नाही तर सर्वांना माझा विसर पडेल आणि माझ्या योजना सफल करून दाखविण्याची संधीच मला मिळणार नाही. राजकारणातून मला जवळजवळ निवृत्तच व्हावे लागेल. आणि हे करणे माझ्या अगदी जिवावर येईल."

म्हणजे तुमच्यापुढे दोन पर्याय आहेत. एकतर, राजकारणातून आपणास निवृत्त व्हावेच लागेल या वास्तव परिस्थितीला तुम्ही स्वेच्छेने व सहजतेने तयार झाले पाहिजे. नाहीतर, आपल्या आजाराचे गांभीर्य माहीत असताही आपले राजकीय कार्य तुम्ही आनंदाने चालच ठेवले पाहिजे. यांच्यापैकी कोणताहि पर्याय तुम्ही स्वीकारलात, तरी तुमचा आजार तुमच्या महत्त्वाकांक्षा-पूर्तीच्या आड येईलच. जीवन हे फार चमत्कारिक स्वरूपाचे असते, नाही का ? माझी तर तुम्हाला अशी सूचना आहे, की जे अटळ आहे ते, कटुता येऊ न देता तुम्ही स्वीकारावे. पण ते करताना तुम्ही कटुता किंवा अश्रद्धता मनात उत्पन्न होऊ दिलीत तर तुमचे कटू झालेले मनच तुमचा आजार वाढविण्यास कारणीभूत होईल.

"मला या सगळ्या गोष्टींची पुरेपूर जाणीव आहे. आणि तरीही माझी शारीरिक असमर्थता आता अटळ होऊन बसली आहे, हे जाणून तिचा स्वीकार करण्यास माझे मन मुळीच तयार होत नाही. माझे राजकीय कार्य मला काही काळ चालू ठेवता येईल खरे पण तेवढ्याने काय होईल ?"

हे पहा, लोककल्याण करण्याची तुमची जी महत्त्वाकांक्षा आहे तिची पूर्तता होणे, एवढी एकच जीवनरीत तुम्हाला ठाऊक आहे का ? तसेच, तुमच्या योजनांच्या द्वाराच देशाचे हित साधणार आहे अशीच का तुमची कल्पना आहे ? एकूण असे दिसते की, या तथाकथित लोककल्याण कार्याचा केंद्रबिंदू केवळ तुम्हीच काय ते

आहात, होय ना ? वस्तुस्थिती अशी आहे की, लोककल्याणाची काही तुम्हाला सखोल कळकळ नाही, तर तुमच्या द्वारा होणाऱ्या लोककल्याणाचेच काय ते महत्त्व तुम्हाला आहे. या सर्व प्रकारात 'तुम्ही'च काय ते महत्त्वाचे आहात, लोककल्याण मुळीच नव्हे. आपल्या योजनांशी व या तथाकथित लोककल्याण कार्याशी तुम्ही इतके काही सारूप्य पावला आहात, की आपल्या या महत्त्वाकांक्षेची पूर्तता होणे म्हणजेच लोककल्याण साधणे होय अशी तुम्ही आपली पक्की समजून करून घेतली आहेत. तुमच्या योजना उत्कृष्ट असतीलही. तसेच त्यांच्यामुळे दैवयोगाने लोकांचे हित होईलही. पण या लोकहितावरोवर आपले नाव निगडित व्हावे, हीच तुमची खरी-खुरी इच्छा आहे. पण जीवन कसे विलक्षण आहे पहा ! नेमक्या याच वेळी आजाराने तुम्हाला पछाडले आहे. आणि तुमचे नाव व तुमचे महत्त्व वाढविण्याची संधी खुंटली गेली आहे. हेच वस्तुतः तुमच्या संघर्षाचे कारण आहे. लोकांचे कल्याण आता होऊ शकणार नाही ही चिंता, हे काही तुमच्या संघर्षाचे कारण नाही. लोकांवर तुमचे खरोखर प्रेम असते, लोकहिताची तुमची इच्छा जर नुसती वर-वरची नसती तर त्या इच्छेचा आपोआप परिणाम झाला असता व लोकांना सहजपणेच साह्य मिळाले असते. पण तुमचे लोकांवर प्रेम नाही. लोकहित हे तुमच्या महत्त्वाकांक्षेचे व अहंगौरवाचे केवळ एक साधन आहे. लोकहितकार्य करणे हा तुमच्या कीर्तिपथाचाच एक भाग आहे. मी हे जे सांगत आहे, ते तुम्ही मनाला लावून घेणार नाही ना ?

" छे, छे, उलट ज्या भावना माझ्या मनात खोल खोल दडून बसल्या होत्या, त्या आपण इतक्या स्पष्टपणे उघड करून दाखविल्या याचा मला आनंदच वाटत आहे. यामुळे खरोखर माझे हितच झाले आहे. तसे हे सगळे मला अस्पष्टपणे जाणवत होते खरे. पण आजवर इतक्या उघडपणे त्याचा सामना करण्यास मी तयार झालो नव्हतो. आता मात्र आपण इतक्या स्पष्टपणे सारे समोर मांडल्याने माझ्या मनावरचे फार मोठे ओझे नाहीसे होऊन गेले आहे. आता मला स्वतःच्या समस्येचे योग्य आकलन होईल व माझ्या मनातील संघर्ष मला शांत करता येईल अशी आशा वाटू लागली आहे. आता प्रत्यक्ष काय होते, ते पाहावयाचे आहे. पण माझ्या चिंतांपासून व आकांक्षांपासून आताच मला काहीशी मुक्तता मिळवल्यासारखे वाटू लागले आहे. पण मरणाची जी भीती मला वाटते, तिच्याबद्दल काय करता येईल ?"

हा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा आहे. त्याचे आकलन करून घेण्यासाठी सखोल अंतर्दृष्टीची गरज असते, नाही का ? वस्तुतः सगळ्याच गोष्टी नश्वर असतात. वसंतातील कोवळे नाजुक पान शिशिर ऋतूत गळून पडावयाचेच असते, असे म्हणून मरणासंबंधी तुम्हांला युक्तिवाद करता येईल खरा. मृत्यूसंबंधीचे अनेक युक्तिवाद व स्पष्टीकरणे तुम्हांला देता येतील किंवा इच्छाशक्तीच्या साह्याने तुम्हांला मरणाची

भीती जिंकता येईल किंवा या भीतीची जागा दुसऱ्या एखाद्या निष्ठेने भरून काढता येईल. पण हे सर्व केवळ मनाचे व्यापार होत. पुनर्जन्म, मरणोत्तर जीवन इत्यादींवरचे जे तथाकथित अंतर्ज्ञान समजले जाते, ते दुसरेतिसरे काही नसून मृत्यूनंतरही जगत राहण्याची ती केवळ एक उत्कट इच्छा असते. हे सारे युक्तिवाद, ही सगळी स्पष्टीकरणे, ही सर्व अंतर्ज्ञाने अखेर मनाच्या कक्षेतीलच असतात, होय की नाही ? मृत्यूच्या भीतीवर मात करण्यासाठी विचाराने निर्माण केलेले ते विविध व्यापार असतात. पण मृत्यूची भीती अशा सोप्या उपायांनी जिंकता येत नसते. जीवन अविरत, अव्याहत चालत राहावे अशी जी माणसाची इच्छा असते—मग ते जीवन राष्ट्राच्या द्वारा असो, की कुटुंबाच्या, कीर्तीच्या, कल्पनांच्या अथवा विशिष्ट निष्ठांच्या द्वारा असो—जीवन सतत चालू राहावे ही इच्छा म्हणजे अखेर व्यक्तीचे स्वत:चेच जीवन चालू राहावे हीच इच्छा होय, होय की नाही ? ही जी व्यक्तीची तीव्र अभिलाषा असते ती व तिच्या अनुषंगाने येणारे सर्व प्रकारचे प्रतिकार व सगळ्या आशा-आकांक्षा या सर्वांचा स्वेच्छेने, सहजपणे व आनंदाने अंत घडून आला पाहिजे. आपल्या साऱ्या स्मृती, आपले सर्व अनुभव, आपले सर्व ज्ञान व सर्व आशा-आकांक्षा यांचा प्रत्येक दिवशी पूर्णपणे अंत घडून येत राहिला पाहिजे. विविध सुखांची व नाना पश्चात्तापांची सगळी साठवण, सगळे सद्‌गुणसंपादन क्षणाक्षणाला नाहीसे होऊन गेले पाहिजे. हे काही केवळ शब्द नाहीत, तर निखळ वास्तवता काय आहे, याचे ते केवळ निवेदन आहे. जे जे सतत, अविरत चालू राहते, त्याला त्या अज्ञाताच्या दिव्यानंदाचे आकलन कधीच होणे शक्य नसते. कशाचाही संग्रह न करणे आणि प्रतिक्षणी, प्रतिदिनी साऱ्या गताचा अंत घडवीत राहणे याचेच नाव कालातीत अस्तित्व. जोपर्यंत सफल होत राहण्याची ऊर्मी आपल्या सर्व संघर्षांसह आपल्या मनात उसळत राहील, तोपर्यंत मरणाची भीती कायमच राहील.

स्पर्धात्मक जीवनरीत

रस्त्यावर माकडे इतस्ततः हिंडत होती. एक माकडाचे पिलू तर रस्त्याच्या मधोमध आपल्या शेपटीशी खेळत बसले होते. पण त्याच्या आईची त्याच्यावर सारखी नजर होती. कुणीतरी थोड्या अंतरावरून आपल्या हालचालींवर नजर ठेवीत आ या गोष्टीची त्या पिलालाही पूर्ण जाणीव होती. त्या माकडांमधील नर भलेमोठे, जाडजूड व काहीसे पुष्ट होते. त्यामुळे बाकीची माकडे त्यांच्यापासून दूर राहून त्यांना टाळीत होती. ती सारी रस्त्याच्या कडेला असलेल्या एका प्रच्छाय वृक्षाची रस्त्यावर पडलेली बारीक फळे खात बसली होती. नुकत्याच बरसून गेलेल्या पावसामुळे नदीचे पाणी वाढले होते आणि त्या अरुंद पुलाखालून वाहणारा नदीप्रवाह जोराने खळाळत होता. रस्त्यावर जेथे जेथे लहान लहान डबकी साचली होती ती टाळून ती माकडे वसली होती. एखादी मोटर जेव्हा रस्त्यावरचे पाणी व चिखल उडवीत धडाक्याने जाई, तेव्हा ती माकडे क्षणार्धात रस्त्यावरून दूर होत. ती माकडीही आपले पिलू उचलून चटकन दूर जाई. काही माकडे भरंकन झाडांवर चढत आणि काही रस्त्याच्या उतरणीवरून उतरून दूर निघून जात आणि मोटर गेली रे गेली की, क्षणार्धात परत रस्त्यावर येत. माणसांच्या वर्दळीची त्यांना आता सवय होऊन गेली होती. मानवी मनासारखीच ती माकडे चंचल व अचपळ होती आणि त्या मनाप्रमाणेच नानाविध चेष्टा करीत होती.

रस्त्याच्या दुतर्फा हिरवीगार लसलशीत भातशेते सूर्यप्रकाशात चमकत होती. शेतांपलीकडील निळसर डोंगरांच्या पार्श्वभूमीवर भातशेतांवरचे पांढरे पक्षी सावकाश उडताना उठून दिसत होते. एक लांबसर पिंगट साप पाण्यातून बाहेर पडून सूर्यप्रकाशात आराम करीत होता. एक सुंदर निळाभोर सुतार पक्षी त्या पुलावर बसून पाण्यात सूर मारण्याच्या तयारीत असलेला दिसत होता.

सकाळ अतिशय रमणीय व प्रसन्न होती. हवेत फारसा उष्मा नव्हता. भातशेतांमध्ये मधूनमधून दिसणारा एखादा दुसरा तालवृक्ष अनेक अव्यक्त गोष्टी सूचित करीत होता. त्या हिरव्याचार शेतात व त्या निळ्याभोर डोंगरात एक सहजसुंदर सुसंवाद नांदत होता, एक मधुर गीत निनादत होते. काळ किती भराभर पुढेपुढे सरकत होता ! आता नीलाकाशात घारी घिरट्या घालताना दिसत होत्या. मधून त्या एखाद्या फांदीवर उतरून आपले पंख साफसूफ करीत आणि पुन्हा उंच उड्डाण करून, परस्परांना साद घालीत घालीत गोल गोल घिरट्या घालीत राहत. तेथे वरेचसे गरुड पक्षीही होते—शुभ्र कंठी व सोनेरी पंखी. नुकत्याच उगवलेल्या हिरवळीवर लाल मुंग्या हिंडत होत्या. त्या झटक्यात पुढे धावत, मध्येच

एकदम थबकून जात आणि मग उलटच्या दिशेने धावू लागत. साऱ्या चराचर सृष्टीत एवढे अमाप वैभव, एवढी विशाल संपन्नता भरून राहिली होती. पण सारे सारे अलक्षित होते. कदाचित सगळ्या लहानथोर सचेतन वस्तूंना हीच अलक्षितता हवी असावी.

तिकडे रस्त्यावर एक सुवक नाजुक बैलगाडी चालली होती. गाडीला एक लहानसर बैल जुंपलेला होता. त्याच्या गळ्यात घुंगरू बांधले होते. गाडीची दोन मोठी चाके एका बारीकशा लोखंडी गजाने जोडण्यात आली होती आणि त्या गजावर एक सुवकसा लाकडी तक्ता बसविलेला होता. त्या तक्त्यावर बसून गाडी हाकणाऱ्या माणसाला आपल्या जलद धावणाऱ्या बैलाचा व आपल्या नवीन प्रकारच्या सुवक गाडीचा विशेष अभिमान वाटत होता असे स्पष्ट दिसत होते. त्याचा बैल लहानसर असला, तरी चांगला उमदा व बलवान होता. त्याच्यामुळे त्या गाडीमालकालाही एक वेगळे महत्त्व प्राप्त होत होते. आता वाटेने सगळे लोक आपणाकडे कौतुकाने पाहत राहतील याची त्याला पुरी जाणीव होती. भोवतालचे खेडूत गाडीकडे कौतुकाने पाहतही होते. गाडी दिसताच ते थबकत, विस्मयचकित नेत्रांनी ती निरखीत, प्रशंसेचे उद्‌गार काढीत व आपापल्या वाटेने चालू लागत. गाडीवानदेखील चांगला ताठ बसून, थेट समोर पाहत मोठ्या अभिमानाने गाडी चालवीत होता. अभिमान हा क्षुल्लक गोष्टींबाबतचा असो की, मोठमोठ्या कर्तृत्वांसंबंधीचा असो किंवा पराक्रमासंबंधीचा असो, अखेर तो केवळ एकाच पातळीवरचा अभिमान असतो. वस्तुतः, मनुष्य ज्या ज्या गोष्टी करीत असतो किंवा त्याच्यापाशी ज्या ज्या गोष्टींचा संग्रह असतो, त्यांच्यामुळेच त्याला महत्त्व व प्रतिष्ठा प्राप्त होत असते. त्यांच्याविरहित मनुष्याच्या अस्तित्वाला फारसा अर्थ उरलेला दिसत नाही.

भेटीस आलेला गृहस्थ आपल्या दोन मित्रांना बरोबर घेऊन आला होता. ते तिघेही पदवीधर असून, आपापल्या व्यवसायात कार्यदक्ष होते. तिघांचीही लग्ने झाली असून त्यांना मुलेबाळे होती. त्या सर्वांना आपले जीवन संतोषदायक वाटत होते आणि तरीही त्यांच्यामध्ये एक प्रकारची अवस्थता आढळून येत होती.

त्या गृहस्थाने बोलण्यास सुरुवात केली, "चर्चेला चालना देण्यासाठी मी प्रथम एक प्रश्न विचारणार आहे. अर्थात तो निरर्थक मुळीच नाही. काही दिवसांपूर्वी मी आपली प्रवचने ऐकली, तेव्हापासूनच हा प्रश्न मला काहीसा अस्वस्थ करीत आहे. आपण आपल्या प्रवचनांतून इतर गोष्टींबरोबर असेही सांगितले की, स्पर्धा व महत्त्वाकांक्षा या विनाशकारी प्रवृत्ती आहेत आणि मनुष्याला जर शांतिमय समाजात नांदावयाला हवे असेल, तर त्याने स्पर्धेचे व महत्त्वाकांक्षांचे विनाशकारी स्वरूप आकळून घेऊन त्यांच्यापासून पूर्ण मुक्त झाले पाहिजे. पण मला

तर वाटते की, जीवनाचे नैसर्गिक, प्राकृतिक स्वरूप हे संघर्षमय व कलहमय असेच आहे, नाही का ? "

हे पाहा, सध्याची समाजव्यवस्था ही महत्त्वाकांक्षा व संघर्ष यांच्यावरच आधारलेली आहे, हे उघड आहे. आणि ही वस्तुस्थिती अगदी अटळ अशीच आहे, असे प्रत्येकजण मानून चालत आहे. ही व्यवस्था अटळच आहे, ही कल्पना व्यक्तीच्या मनात संस्कारांनी दृढ करून टाकली आहे. व्यक्तीवर शिक्षणाच्या द्वारा जे संस्कार केले जातात, तसेच व्यक्तीवर जी नाना प्रकारची आंतरिक वा बाह्य दडपणे लादली जातात, त्यांच्यामुळे स्पर्धात्मक स्वरूपाचे जीवन जगणे हे व्यक्तीला भागच पडते. सध्याच्या समाजव्यवस्थेशी जर जुळवून घ्यावयाचे तर व्यक्तीने समाजाच्या अटी मान्य केल्याच पाहिजेत. नाहीतर त्याची अवस्था बिकट होऊन जाईल. तुम्हांलाही असेच वाटते की, या समाजव्यवस्थेशी आपण जुळवून घेतलेच पाहिजे. पण असे जुळवून घेणे हे आवश्यकच आहे, असे तुम्हांला का बरे वाटावे ?

"आम्ही जर सध्याच्या समाजव्यवस्थेशी जुळवून घेतले नाही, तर आम्ही जीवनातून पार उखडलेच जाऊ. "

पण या प्रश्नाचे, या स्पर्धात्मक समाजव्यवस्थेचे संपूर्ण स्वरूप जर आपण आकळून घेतले, तर आपली तशी अवस्था खरोखरच होईल का ? आपण जर हे नीट आकलन करून घेतले, तर समाजातील ठराविक साच्यांप्रमाणे आपले जीवन राहणार नाही, हे खास. पण मग आपले जीवन सुखमय व निर्मितीशील अशा स्वरूपाचे होईल हेही निश्चित. जीवनाकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन हाही मग अगदी वेगळ्या प्रकारचा राहील. पण सध्याची समाजव्यवस्था ही अगदी अटळ आहे, असेच मानून जर आपण चाललो, तर मात्र हा नवा, संघर्षरहित जीवनप्रकार आपल्याला मुळीच अस्तित्वात आणता येणार नाही. आता आपण आपल्या मूळ प्रश्नाकडे वळू या. महत्त्वाकांक्षा, स्पर्धा व संघर्ष यांच्यावर आधारलेली जीवनरीत ही नियतिबद्ध व अटळ अशी जीवनरीत आहे का, हे आपण पाहू. तुम्ही ही जीवनरीत अटळ अशीच मानून चालत आहात हे स्पष्ट आहे. इथून आपण पुढे जाऊ या. स्पर्धात्मक जीवनरीत एवढी एकच रीत प्राकृतिक आहे, असे तुम्ही का बरे मानून चालला आहात ?

"त्याचे कारण असे की, भोवतालच्या सगळ्या माणसांप्रमाणेच मीही महत्त्वाकांक्षी आहे, स्पर्धालू आहे, ही वस्तुस्थिती कधीकधी मला सुखद होते, तर कधी कधी अतिशय दुःखदही होते. पण मी या वस्तुस्थितीचा विरोध करीत नाही, तर ती मुकाट्याने मान्य करतो. कारण मला दुसरी कोणतीही वेगळी जीवनरीत ठाऊक नाही. आणि समजा, अशी एखादी जीवनरीत मला माहितही झाली, तरी तिचा

स्वीकार करण्याची मला भीतीच वाटत राहील. कारण माझ्यावर नाना प्रकारच्या जबाबदाऱ्या आहेत. त्यामुळे सध्याच्या जीवनरीतीच्या ठराविक विचारांचा, कल्पनांचा व परंपरांचा मी जर त्याग केला, तर माझ्या मुलाबाळांचे काय होईल, ही चिंता मला सदैव बेचैन करीत राहील."

दुसऱ्यांसंबंधीच्या काही जबाबदाऱ्या तुमच्यावर असतील खऱ्या. पण शांतिमय जग निर्माण करण्याची जबाबदारीही तुमच्यावर नाही का? जोवर जीवनाची स्पर्धात्मक रीत अटळच आहे असे, व्यक्ती, समाज व देश हे सर्वच मानून चालत राहतील, तोवर मानवाला शांती व सुख लाभणे अशक्य आहे. स्पर्धा व महत्त्वाकांक्षा यांच्यावरोबरच आंतरिक व बाह्य संघर्ष हा ओघानेच येत असतो, होय की नाही? महत्त्वाकांक्षी मनुष्य कधीही शांतहृदय मनुष्य असत नाही; मग तो शांतीच्या व बंधुभावाच्या कितीही गप्पा मारो. राजकारणी पुरुष हा कधीही जगात शांती निर्माण करू शकणार नाही. तसेच संघटित स्वरूपाच्या निष्ठांवर जगणारी माणसेदेखील शांती कधीच उदयास आणू शकणार नाहीत. कारण अशा माणसांचे विचारविश्व हे थोर पुढारी, उद्धारकर्ते साधू, मार्गदर्शक गुरू आणि नाना प्रकारचे रेखीव आदर्श या सर्वांच्या आचारविचारांनी संस्कारबद्ध झालेले असते. कोणताही मनुष्य जेव्हा पुढाऱ्यांचे वा गुरूचे अनुसरण करू लागतो तेव्हा तो हे स्वतःच्या महत्त्वाकांक्षेच्या पूर्ततेसाठीच करीत असतो; मग ही महत्वाकांक्षा इहलौकिक असो की तथाकथित आध्यात्मिक स्वरूपाची असो. स्पर्धात्मकता व महत्त्वाकांक्षा यांच्यामध्ये संघर्ष हा गर्भित स्वरूपात नेहमीचाच वसत असतो, होय की नाही?

"हे सारे मला दिसते खरे. पण मग आम्ही करावे तरी काय? आम्हीतर या स्पर्धेच्या जाळ्यात पूर्ण अडकून गेलो आहोत. म्हणून यातून बाहेर कसे पडावे हे काही आम्हांला कळत नाही. पण समजा, या जाळ्यातून मनुष्य बाहेरही पडला तरी त्यानंतर माणसामाणसात शांती नांदू लागेल या गोष्टीची खात्री काय? जोपर्यंत सर्व माणसांना एकाच क्षणी सत्याची यथार्थता पटणार नाही, तोपर्यंत एखाद्या दुसऱ्याला ते सत्य पटले. तरी त्याला काय किंमत राहील"?

सफलता, विफलता व संघर्ष यांच्या जाळ्यातून बाहेर कसे पडता येईल, हे तुम्हाला कळावयाला हवे आहे ना? पण 'कसे' असा प्रश्न जेव्हा तुम्ही करता तेव्हा आपला प्रयत्न व्यर्थ तर ठरणार नाही ना या गोष्टीची तुम्हाला आगाऊ खात्री हवी असते, असाच या प्रश्नाचा अर्थ होतो. एकूण तुम्हाला येथेही निश्चितता व सफलताच हवी आहे, फक्त ही सफलता थोड्या वेगळ्या पातळीवरची आहे, एवढच काय ते. तुमच्या ध्यानात हे येत नाही की सर्व प्रकारची महत्त्वाकांक्षा व कोणत्याही स्वरूपाची सफलतेची अभिलाषा ही नेहमी आत व बाहेर संघर्ष उत्पन्न करीत असते. 'कसे करावे?' हा प्रश्न मनुष्याला महत्त्वाकांक्षेच्या व संघर्षाच्या

मार्गावर नेणारा प्रश्न असतो. तुमचा हा प्रश्नच स्वतःच्या समस्येचे वास्तव स्वरूप समजून घेण्याच्या आड येत आहे. अधिकाधिक सफलता मिळविण्यासाठी 'कसे करावे?' या प्रश्नाचा माणूस शिडीसारखा उपयोग करीत असतो. पण आता आपण यशापयशाच्या भाषेत या प्रश्नाचा विचार करीत नाही, तर संघर्ष नाहीसा करून टाकण्याच्या दृष्टीने विचार करीत आहोत. जीवनात संघर्ष नसला तर जीवन हे अपरिहार्यपणेच कुंठित, अवरुद्ध होऊन जाईल असा निष्कर्ष काही आपल्या या विचारातून निघत नाही. जीवनात शांती निर्माण होते ती अशांतीपासून सुरक्षित राहण्याच्या आपल्या मागणीमुळे काही निर्माण होत नसते. किंवा शांती राखण्याची अभिवचने देऊन अथवा संघर्ष उत्पन्न करणाऱ्यावर दडपणे आणून ती निर्माण होत नसते. तर तुमचा अहं जेव्हा नाहीसा होतो, महत्त्वाकांक्षा व विफलता यांच्यामुळे जीवनात संघर्ष उत्पन्न करणारा तुमचा अहं जेव्हा नष्ट होतो, तेव्हाच शांती उदयास येते.

आता तुमच्या दुसऱ्या मुद्याकडे वळू या. तुमच्या या समस्येचे वास्तव स्वरूप सर्वांना एकाच वेळी समजले पाहिजे, ही जी तुमची आपेक्षा आहे, ती उघडउघड अशक्य स्वरूपाची आहे. पण सर्वांना नसले तरी निदान 'तुम्हाला' तरी या समस्येचे वास्तव स्वरूप आकळणे शक्य आहे ना? जेव्हा तुम्हाला त्याचे आकलन होईल, तेव्हा हे आकलन तुम्हाला निश्चित विमुक्तता मिळवून देईल. आणि तुमच्या या आकलनाचा परिणाम इतरांवरही झाल्यावाचून राहणार नाही. पण वास्तवाच्या या स्पष्ट आकलनाला तुमच्या स्वतःपासूनच आरंभ झाला पाहिजे. कारण जग म्हणजे अखेर तुम्ही स्वतःच आहात; आणि जग म्हणजे इतर माणसेही आहेत.

महत्त्वाकांक्षेमुळे माणसाचे मन व हृदय ही दोन्हीही निःसत्त्व होऊन जातात, अतिशय सामान्य स्तराची होऊन जातात. महत्त्वाकांक्षा ही अतिशय उथळ व पोकळ असते. कारण कसले तरी साध्य गाठण्याचा ती सदैव प्रयत्न करीत असते. ज्या माणसाला साधुसंत बनावयाचे असते किंवा यशस्वी राजकारणी पुरुष व्हावयाचे असते, अगर एखाद्या उद्योगधंद्याचा प्रमुख व्हावयाचे असते, तो आपापले वैयक्तिक स्वरूपाचे साध्य गाठण्याच्या मागे सदैव लागलेला असतो. मनुष्य एखाद्या विचारप्रणालीशी किंवा राष्ट्राशी सारुप्य पावो की, एखाद्या धर्मव्यवस्थेशी वा अर्थव्यवस्थेशी सारुप्य पावो, आपापल्या सारुप्य विषयात सफलता मिळविण्याची त्याची ही अभिलाषा, त्याच्या अहंलाच पुष्ट करीत असते. आणि हा अहं तर अतिशय उथळ, पोकळ, ठिसूळ व अत्यंत संकुचित मर्यादित असतो. मनुष्य जर खरोखर या सर्व गोष्टींचे नीट निरीक्षण करू लागला, तर हे सारे अगदी उघड, अगदीच स्पष्ट आहे असेच त्याला आढळून येईल, नाही का?

"आपल्याला हे सारे अगदी उघड व स्पष्ट वाटत असेल पण आमच्यापैकी

बहुतेकांना संघर्ष असला, म्हणजेच आपण खरोखर जगत आहोत, असे वाटते. महत्त्वाकांक्षा व स्पर्धा जर जीवनातून नाहीशी झाली, तर आमचे जीवन अर्थशून्य व कंटाळवाणे होऊन जाईल."

पण तुमच्या हे ध्यानात आले का की, ज्या अर्थी या स्पर्धात्मक समाजव्यवस्थेला तुम्ही मान्यता देऊन चुकला आहात, त्या अर्थी तुमची मुलेबाळे व तुमचे नातूपणतू हे देखील याच व्यवस्थेला हातभार लावीत राहतील. आणि मानवामानवात अधिक वैरभाव, अधिक मत्सर निर्माण करण्यास व अखेर सारे जग महायुद्धाच्या वणव्यात लोटून देण्यास कारणीभूत होतील. तुमच्या जीवनात व त्यांच्याही जीवनात शांती कधीच नांदणार नाही. सध्याच्या पारंपारिक समाज व्यवस्थेच्या संस्कारात तुम्ही स्वतः तर बद्ध होऊन गेलाच आहात आणि तुमच्या मुलाबाळांनाही तुम्ही याच स्पर्धात्मक व्यवस्थेचे धडे देत आहात. अशा रीतीनेच हे जग अधिकाधिक दुःखात लोटले जात असते.

"यात बदल घडवून आणण्याची आमची इच्छा आहे खरी. पण —" आपल्या बोलण्यातील व्यर्थता त्याच्या चटकन नजरेस आली आणि तो तेवढ्यावरच थांबला.

ध्यान–प्रयत्न–जाणीव

दरीच्या पूर्वेला पर्वतराजी विस्तारली होती आणि पर्वताच्या पलीकडे समुद्र पसरला होता. दरीच्या मध्यातून संथपणे वाहत जाणारी नदी समुद्राला जाऊन मिळत होती. सगळ्या ऋतूंमध्ये ती नदी तुडुंब भरून वाहत असे. त्या मोठ्या शहराजवळून वाहतानाही तिचे सौंदर्य खुलून दिसे. वस्तुतः गावातील लोक त्या नदीचा नाना प्रकारे उपयोग करीत. कुणी मच्छीमारीसाठी, तर कुणी स्नानासाठी, कुणी पिण्याच्या पाण्यासाठी तर कुणी घाणपाणी सोडून देण्यासाठी — असा विविध प्रकारे नदीचा उपयोग केला जाई. एका कारखान्याचे घाण पाणी नदीत सोडले जाई. पण माणसाने टाकलेली सगळी घाण ती खळखळणारी नदी फेकन देई व गावाच्या पलीकडे गेल्यावर तिचा प्रवाह पुन्हा नितळ, निर्मळ व निळाभोर दिसू लागे.

नदीच्या काठाकाठाने पश्चिमेकडे जाणारा प्रशस्त रस्ता पर्वतावरील चहाच्या मळ्यांकडे जात होता. वळणे घेत घेत तो पर्वत चढू लागला की, मधूनमधून नदी दृष्टीच्या टप्प्याबाहेर जाई. पण बहुतेक वेळ ती दृष्टिपथातच राही. तो रस्ता जसा पर्वतावर वरवर चढू लागला, तसे भोवतालचे चहाचे मळे अधिकाधिक विस्तीर्ण होऊ लागले. आणि विशिष्ट तऱ्हेने चहाची पाने वाळविणारे कारखानेही मधूनमधून दिसू लागले. खूप उंच गेल्यावर चहामळ्यांचा विस्तार अफाट झालेला दिसू लागला होता. तिकडे दरीमध्ये लहानमोठ्या घबघब्यांच्या ध्वनीने नदी मुखरित झाली होती. त्या चहामळ्यांमध्ये सकाळच्या प्रहरी रंगीबेरंगी वस्त्रे नेसलेल्या स्त्रिया खाली वाकून चहाच्या झाडांची कोवळीकोवळी पाने गोळा करताना आढळत. सूर्याच्या प्रखर उन्हामुळे त्यांच्या उघड्या पाठी काळवंडलेल्या दिसत. सूर्य अधिक प्रखर होण्याच्या आतच चहाची कोवळी पाने खुडून जवळच्या कारखान्यात त्यांना न्यावयाची असत.

पर्वताच्या त्या उंचीवर सूर्य आता चांगलाच तळपू लागला होता. आणि उन्हाचा कडकपणा विशेषच जाणवत होता. चहापाने खुडणाऱ्या त्या स्त्रियांना या कडक उन्हाची सवय असली, तरी काही जणींनी डोक्यावर पदर लपेटून घेतला होता. त्या सर्वजणी हसतखळत चपळतेने व कुशलतेने आपले काम करीत होत्या. थोड्या वेळात आपले काम संपणार आहे याची त्यांना जाणीव होती. पण एवढ्या कामाने त्यांचे दिवसभराचे काम थोडेच संपणार होते ? त्यांच्यापैकी बहुतेकींची लग्ने झालेली होती व त्यांना मुलेबाळेही होती. त्यामुळे येथून घरी गेल्यावर त्यांना स्वयंपाक करावयाचा होता व मुलाबाळांचेही काम त्यांच्यामागे होते. या सगळ्या कामकरी स्त्रियांनी

आपला एक कामगार संघ बनविलेला होता. त्यामुळे मळ्याचे मालक त्यांच्याशी चांगल्या प्रकारे वागत. कारण या कामगारांनी संप केला तर चहाची कोवळी पाने तशीच झाडांवर राहतील व त्यामुळे फार नुकसान होईल, याची मालकांना पूर्ण जाणीव होती.

रस्ता आता अधिक उंचउंच चढत चालला होता. आठ हजार फुटांवर चहाचे मळे दिसेनासे झाले होते. पण शेतकरी जमीन नांगरून शेती करण्यात मग्न झालेले होते. कारण शेतीतून उत्पन्न होणारा माल त्यांना पायथ्याजवळच्या गावात व समुद्रकाठच्या शहरात विकून पोट भरणे भाग होते. या उंचीवरून पर्वताच्या उतरणीवरील अरण्यांचे व खालच्या विस्तीर्ण सपाट प्रदेशाचे दृश्य अतिशय भव्य व सुंदर दिसत होते. सूर्यप्रकाशात चमकणारा नदीचा तो चंदेरी प्रवाह त्या सर्व दृश्यावर जणू अधिराज्य गाजवीत होता.

रस्त्याचा दुसरा फाटा लसलसणाऱ्या हिरव्याचार भातशेतांमधून व घनदाट अरण्यांतून वळणे घेतघेत चालला होता. मधूनमधून ताडामाडांचे व आंब्यांचे वृक्ष दिसत होते आणि फुले तर सगळीकडेच फुललेली होती. आसपासच्या गावातील लोक रस्त्याच्या कडेने आपली दुकाने मांडून लहान मोठ्या शोभेच्या वस्तू व तऱ्हतऱ्हेची लसलशीत फळे विक्रीस ठेवीत होते. ते सगळे आळशी व आरामशीर लोक होते. त्यांना खाण्यापिण्यास भरपूर मिळत असावेसे दिसत होते. याच्या उलट, पायथ्याजवळच्या लोकांचे जीवन अतिशय दाटीवाटीचे व कष्टप्रद होते.

भेटीला आलेला गृहस्थ एक संन्यासी होता पण कुठल्याहि विशिष्ट पंथाचा मात्र नव्हता. आणि तो स्वतःबद्दल तृतीय पुरुषात बोलत होता. तरुण वयातच त्याने संसाराचा त्याग करून देशभर संचार केलेला होता. या संचारात तो अनेक सुप्रसिद्ध धार्मिक गुरूंच्या व संतांच्या सहवासात राहून चुकला होता. त्यांच्याशी चर्चा करून त्यांच्या वेगवेगळ्या साधनाप्रकारांचे व तपश्चरणांचे अनुसरणही त्याने केलेले होते. अनेक दिवस उपवास केले होते; गिरिकंदरांत एकांतात राहून ध्यानधारणा केली होती व संन्यासी ज्या ज्या तपस्या करतात त्या सर्व तो करून चुकला होता. अतिशय कठोर स्वरूपाच्या तपस्यांमुळे त्याने आपले शरीरस्वास्थ्यही बिघडवून घेतले होते. आणि या गोष्टीला बराच काळ लोटून गेला असला, तरी त्या व्यथांनी त्याचे शरीर आजही जर्जर झाले होते. एक दिवस या साऱ्या साधना, ही सगळी तपश्चरणे अर्थशून्य आहेत याची जाणीव होऊन त्या सर्वांचा त्याग करण्याचे त्याने ठरवले आणि पर्वतातील एका दूरच्या खेड्यात एकान्तात त्याने ध्यानचिंतनात अनेक वर्षे घालवली. 'आणि अखेर अपेक्षित तेच घडले,' तो हसतहसत सांगू लागला. आता तो स्वतःच एक विख्यात साधु पुरुष बनून गेला असून त्याचा बराच मोठा शिष्यसमुदायही गोळा झालेला होता. या शिष्यगणाला तो साध्यासाध्या गोष्टींचाच उपदेश

देत असे. वस्तुतः त्याने पूर्वी पुरातन संस्कृत धर्मशास्त्रांचा बराच अभ्यास केलेला होता. पण आता त्याने त्यांचाही त्याग केला होता. आपल्या आजवरच्या जीवनाचे थोडक्यात निवेदन करणे आपल्याला आवश्यक वाटत असले, तरी त्यासाठी काही आपण आलो नाही, असे त्याने शेवटी सांगितले.

" सद्गुण, त्याग व अनासक्त कर्म हेच ध्यान होय. " त्याने आपल्यापुढील प्रश्नाला चालना दिली. " ध्यानावाचून असणारे ज्ञान व कर्म ही केवळ भारवाही व निरर्थक अशीच होऊन वसतात. पण ध्यान म्हणजे काय हे मात्र फारच थोडयांना कळते. आपली परवानगी असेल, तर या विषयावर बोलण्याची माझी इच्छा आहे. ध्यानामध्ये जाणिवेचे वेगवेगळे स्तर गाठता येतात, असा या वक्त्याचा अनुभव आहे. या मार्गातील साधकांना कृष्ण, बुद्ध, ख्रिस्त इत्यादींची साक्षात दर्शने घडण्याचा जो अनुभव येतो, तो सर्व अनुभव या वक्त्याला येऊन चुकला आहे. पण ही सारी साक्षात् दर्शने केवळ स्वतःच्या विचारातून, संस्कारातून व विशिष्ट संस्कृती प्रकारातूनच निर्माण झालेली असतात. दुर्दैवाने बहुतेक साधक स्वतःच्या विचारांचा व अभिलाषांच्या अशा जाळातच गुरफटलेले राहतात. एवढेच काय पण सत्याचे निरूपण करणारे काही थोर पुरुषही असेही अडकलेले राहतात. रोग बरे करण्याची सिद्धी व वाकसिद्धी प्राप्त झाली की स्वतःच्या सिद्धिसामर्थ्यांचे ते गुलाम बनून जातात. या सर्व संकटातून, भ्रमणातून व अनुभवातून स्वतः हा वक्ताही जाऊन चुकला आहे. आणि अखेर या सर्वांची व्यर्थता जाणून आपल्या सामर्थ्यानुसार तो आता या सर्वांच्या पलीकडेही गेला आहे. निदान अशी आशा करावयाला तरी हरकत नाही. पण मग ध्यान म्हणजे काय बरे ? "

हे पहा, ध्यान म्हणजे काय हे समजून घेताना प्रयत्न व प्रयत्न करणारा यांचेही स्वरूप समजून घेतले पाहिजे. योग्य प्रकारचा प्रयत्न हा माणसाला एका विशिष्ट ठिकाणी पोचवतो व अयोग्य प्रकारचा प्रयत्न त्याला दुसऱ्या ठिकाणी पोचवतो. पण प्रयत्नाचे हे दोन्हीही प्रकार माणसाला बंधनकारकच होत असतात, नाही का ?

" आपण उपनिषदे किंवा इतर पुरातन धार्मिक ग्रंथ वाचलेले नाहीत, असे मी ऐकले आहे. पण आपण जे बोलता ते चांगले वाचलेल्या व जाणलेल्या माणसासारखेच वाटते. "

मी यापैकी काहीही वाचलेले नाही ही गोष्ट खरी आहे. पण ते काही महत्त्वाचे नाही. योग्य व अयोग्य दोन्हीही प्रकारचे प्रयत्न हे नेहमी बंधनकारकच होत असतात ही वस्तुस्थिती आहे. म्हणून प्रथम हे बंधन समजून घेतले पाहिजे व ते तोडून टाकले पाहिजे. ध्यान म्हणजे सर्व प्रकारच्या बंधनांचा छेद. ध्यानावस्था ही मुक्त अशी अवस्था होय. पण ती ' कशापासून ' तरी मिळणारी मुक्ती नव्हे. ' कशापासून ' तरी मुक्त होणे म्हणजे कशाचा तरी प्रतिकार जोपासीत राहणे होय.

तसेच मुक्त झाल्याची जाणीव होणे म्हणजेही मुक्तावस्था नव्हे. मुक्ततेचा अनुभव काय किंवा बद्धतेचा अनुभव काय, हे दोन्हीही अनुभव म्हणजे जाणीव होय आणि ही जाणीव म्हणजेच तो अनुभव घेणारा किंवा तो प्रयत्न करणारा होय. या अनुभवित्याचा, या प्रयत्नकर्त्याचा, अंत घडून येणे म्हणजेच ध्यान. पण अनुभवित्याचा अंत हा जाणीवपूर्वक घडवून आणता येत नसतो. आणि जाणिवेच्या साह्याने असा अंत जर घडवून आणला गेला, तर त्यामुळे इच्छाशक्तीलाच बळ प्राप्त करून दिले जाते. आणि इच्छाशक्ती हा तर जाणिवेचाच एक भाग असतो, म्हणून जाणिवेच्या संपूर्ण प्रक्रियेचा विचार हा आता आपल्या पुढील प्रश्न आहे. जाणिवेच्या एखाद्या लहान किंवा मोठ्या, प्रधान अथवा गौण अंशाचा विचार हा काही आपल्यापुढील प्रश्न नव्हे.

"आपण सांगता ते सत्य आहेसे वाटते खरे. जाणिवेचे विविध व्यापार हे अतिशय खोल स्तरावरचे, फसवे आणि परस्परविरोधी स्वरूपाचे असतात. अनासक्तरीतीचे निरीक्षण व काळजीपूर्वक अभ्यास यांच्या साह्यानेच या विविध व्यापारांची उकल होऊ शकेल व त्यांच्यात व्यवस्था नांदू शकेल."

पण हे ध्यानात घ्या की, असे करताना हा गुंतागुंत उकलणारा, हा अहं तर तेथे हजर असतोच. मग तुम्ही त्याला आत्मा हे नाव द्या की अधिक उच्च नाव वहाल करा. तो अखेर जाणिवेचाच एक भाग असतो. सतत प्रयत्न करीत राहणारा, कुठे तरी पोचण्याची अविरत धडपड करणारा, असाच तो असतो. प्रयत्न म्हणजेच अभिलाषा होय. एका अभिलाषेवर दुसऱ्या मोठ्या अभिलाषेच्या साह्याने माणसाला मात करता येईल. तसेच या दुसरीवर अधिक मोठ्या अभिलाषेने मात करता येईल. आणि अशा प्रकारे अभिलाषांची ही श्रेणी अव्याहत चालत राहील. या अभिलाषेच्या पोटीच फसवणूक, आभास, परस्परविरोध व आशेचे आभास या सर्वांची सदैव निर्मिती होत असते. इतर सर्व अभिलाषांवर मात करणारी त्या अंतिमाची अभिलाषा काय किंवा त्या नामातीताप्रत, अनंताप्रत पोचण्याची अभिलाषा काय, — या दोन्हीही अभिलाषा हे जाणिवेचेच व्यापार होत. चांगल्यावाईटाचा अनुभव घेणाऱ्याचे, त्या अहंचेच हे व्यापार होत. कुठल्यातरी आशेवर तिष्ठत राहणाऱ्या, आशेने निरीक्षण करीत राहणाऱ्या अनुभवित्याचेच हे व्यापार होत. जाणीव ही काही एका विशिष्ट पातळीवर नसते, तर ती आपल्या समग्र सबोध-अबोध जीवनालाच व्यापून राहिलेली असते.

"आतापर्यंत मी आपल्याकडून जे ऐकले ते सर्व खरोखर उत्कृष्ट आहे, सत्य आहे. पण मला एक विचारावेसे वाटते. आपल्या या जाणिवेला शांती व निःशब्दता ही कशामुळे प्राप्त होतील बरे?"

कशामुळेही नाही. मन हे नेहमी कुठला तरी परिणाम घडवून आणण्याच्या

मागे असते. काहीतरी प्राप्त करून घेण्याचा मार्ग शोधीत असते. वस्तुतः आपले मत हे बनविण्यात आलेले असे यंत्र आहे. काळाच्या धाग्यांनी ते विणण्यात आलेले असते. त्यामुळे काहीतरी घडवून आणणे, काहीतरी साध्य करणे, काहीतरी मिळविणे किंवा काहीतरी टाळणे अशा प्रकारच्या भाषेतच ते विचार करू शकते.

" हो, असे आहे खरे. आजवर असेच सांगितले गेले आहे की, मन हे जोवर निवड करीत राहील, काहीतरी प्राप्त करून घेण्यामागे लागेल, किंवा काही तरी अनुभवित राहील, तोवर तो प्रयत्न करणारा, तो अहं तेथे असणारच. हा अहं आपल्याच प्रतिमा निर्माण करीत राहतो व त्यांना वेगवेगळी नावे देत राहतो आणि याच जाळ्यात विचार अडकून पडत असतो. "

पण खुद्द विचार हाच तर हे जाळे विणणारा असतो. विचार म्हणजेच हे जाळे. विचार हाच बंधनकारक असतो. विचार हा काळाचा अफाट विस्तारच काय तो करू शकतो आणि या अफाट कालविस्ताराच्या क्षेत्रातच ज्ञान, कर्म, सद्‌गुण इत्यादिकांना महत्त्व प्राप्त होत असते. विचार कितीही सूक्ष्म झाला, कितीही साधा, सरळ, ऋजू बनला, तरी तो समग्र विचाराचा अंत कधीही घडवून आणू शकत नाही. त्यासाठी अनुभवणारा, निवड करणारा, अवलोकिणारा, निषेध करणारा व इच्छिणारा असा जो अहं म्हणजेच अहंच्या स्वरूपात असणारी जाणीव ही पूर्ण नाहीशी झाली पाहिजे. पारितोषिकाची कोणतीही आशा न बाळगता स्वेच्छेने सुखेनैव ती नाहीशी झाली पाहिजे. ती नाहीशी झाली की तिच्याबरोबरच साध्यामागे धावत राहणारा तो अहं नाहीसा होऊन जातो. हे आहे ध्यान. मनाची निःशब्दता ही इच्छाशक्तीच्या साहाय्याने कधीही घडवून आणता येत नसते. इच्छाशक्तीचा संपूर्ण अंत होतो, तेव्हाच ही निःशब्दता उदय पावते. हेच ध्यान-सत्य हे मागे लागण्याने कधीही गवसत नसते. हा मागे लागणारा जेव्हा नष्ट होतो, तेव्हाच ते अवतरते. मानवी यत्न म्हणजेच काल. म्हणून या मनाला, या विचाराला ते कालातीत, ते मर्यादातीत गवसणे कधीही शक्य नसते.

मनोविश्लेषण आणि मानवी समस्या

आसमंतातील सर्व पक्षी आणि सगळ्या मेंढ्या दूर कुठेतरी गेल्या असाव्यात. त्यामुळेच की काय त्या विशाल वृक्षराजाखाली विलक्षण शांती नांदत होती आणि तेथे असताना सर्वांपासून दूरदूर असल्यासारखे वाटत होते. लसलसणाऱ्या हिरव्यागार शेतांच्या अफाट विस्तारात तो विशाल वृक्षराज एकटाच डौलाने उभा होता. काही अंतरावर डोंगराची रांग पसरली होती. मध्यान्हीच्या प्रखर सूर्यप्रकाशामुळे विशेष बोचणारा डोंगरांचा तो उग्र उजाडपणा दृष्टीला नकोसा वाटत होता. पण या प्रच्छाय वृक्षराजाच्या घनदाट सावलीत मात्र सौम्य शीतलतेचा आणि मंद प्रकाशाचा सुखद अनुभव येत होता. आपल्या एकटेपणात स्थिर राहून या भव्य वृक्षराजाने थोर सामर्थ्य व रेखीव डौलदारपणा प्राप्त करून घेतला होता. चैतन्याने रसरसणारा तो वृक्षराज एकटाच असला, तरी सभोवतालच्या विस्तीर्ण परिसरावर आणि त्या दूरच्या डोंगरावरही अप्रतिहत प्रभुत्व गाजवीत उभा होता.

आसपासच्या खेडुतांचा तर तो पूजाविषय होता. त्याच्या विशाल वुंध्यापाशी एका कोरलेल्या पाषाणावर कुणीतरी भडक पिवळी फुले वाहिलेली दिसत होती. संध्याकाळी मात्र त्या वृक्षापाशी कुणीही येत नसे. त्याचा एकटेपणा त्या वेळी अतिशय भीतिदायक वाटे. त्यामुळे दिवसा पक्ष्यांचा कलरव चालू असता व माणसांचे आवाज भोवताली कानी पडत असताच त्याच्या त्या घनदाट छायेत येऊन त्याची पूजा करणे लोकांना सोईचे वाटे. संध्यासमयी मात्र सगळे खेडूत आपापल्या झोपड्यांच्या आसपासच वावरत त्यामुळे त्या वृक्षराजाखाली अतीव शांती व निःस्तब्धता नांदे. वृक्षाच्या पायथ्यापर्यंत सूर्यकिरण कधीच पोचत नसत. त्यामुळे आज वाहिलेली फुले दुसऱ्या दिवशीच्या पूजेपर्यंत सहज ताजी राहत.

खेड्याकडून त्या वृक्षाकडे जाणारी एक पायवाट त्या हिरव्या शेतातून पुढे जात असे. या पायवाटेने जेव्हा मेंढ्यांचा कळप जाई तेव्हा त्याला इकडे तिकडे कुठेही जाऊ न देता सरळ वाटेने हाकून नेले जाई. आणि एकदा तो कळप डोंगराच्या पायथ्याशी पोचला की, मग त्याला कुठेही भटकण्यास मोकळीक दिली जाई. मग त्या मेंढ्या जे जे सापडेल ते ते फस्त करीत इकडे तिकडे स्वच्छंद हिंडत राहत.

त्या वृक्षराजाचे सारे सौंदर्यवैभव संध्याकाळी बहरास येई. डोंगरामागे सूर्य अस्ताला गेला की, या शेतांचा हिरवा रंग अधिक तजेलदार होई आणि मावळत्या सूर्याचे सोनेरी किरण त्या वृक्षाच्या माथ्यावरच काय ते उजळत राहत. एकदा अंधार पसरला की मग मात्र भोवतालच्या साऱ्या वस्तुजातापासून वेगळा होऊन तो वृक्षराज रात्रीपुरता स्वतःमध्ये मिटून जाई. पण त्याची रहस्यमयता

मात्र अधिकाधिक वाढत जाई आणि अखिल वस्तुजाताच्या अमाप रहस्यमयतेत ती एकरूप होऊन जाई.

भेटण्यास आलेला गृहस्थ मानसशास्त्रज्ञ व मनोविश्लेषण शास्त्रज्ञ असून अनेक वर्षे हा व्यवसाय करीत होता. आणि अनेकांना त्याने रोगमुक्त केले होते. एका हॉस्पिटलमध्ये तो काम करीत असे. तसेच खासगी रीतीनेही तो व्यवसाय करीत असे. त्याच्याकडे येणाऱ्या धनिक रोग्यांनी त्याला धनवान बनवून टाकले होते. त्याच्यापाशी अनेक मौल्यवान मोटरी होत्या; शहराबाहेर एक उत्कृष्ट बंगला होता. साऱ्या सुखसोयी त्याच्यापुढे हात जोडून उभ्या होत्या. आपला व्यवसाय हा केवळ पैसे मिळविण्याचा धंदा आहे अशी त्याची मुळीच धारणा नव्हती. पूर्ण लक्ष घालूनच तो हा व्यवसाय करीत होता. रोग्याच्या गरजेप्रमाणे मनोविश्लेषणाच्या वेगवेगळ्या तंत्रांचा तो अवलंब करीत असे. संमोहनविद्येचाही त्याने अभ्यास केलेला होता आणि काही रोग्यांवर या विद्येचा प्रयोगही त्याने करून पाहिला होता. तो सांगू लागला,

" संमोहननिद्रेच्या प्रभावाखाली असताना माणसे किती सहजपणाने, किती मोकळेपणाने आपल्यावरील मानसिक दडपणांविषयी बोलतात, याचे खरोखर फार आश्चर्य वाटते. दर वेळी मी माझ्या रोग्याला संमोहननिद्रा आणली की, नव्याने या गोष्टीचे मला आश्चर्य वाटत राहते. या बाबतीत मी अतिशय प्रामाणिक राहिलो आहे. पण ही संमोहन निद्रेची विद्या बेजबाबदार लोकांच्या हाती पडली की केवढे भयंकर तोटे होतील, त्याची मला पुरेपूर जाणीव आहे. मग ही विद्या मनोविश्लेषणासाठी वापरली जावो की शारीरिक व्याधींसाठी वापरली जावो. संमोहन निद्रेमुळे रोग लवकर बरा होवो की न होवो, पण अतिशय दुःसाध्य रोगांवाचून इतर कोणत्याही बाबतीत ही विद्या वापरणे योग्य नाही, असे मला निश्चित वाटते. बाकी एकेका रोग्याचा मानसिक रोग बरा करण्यासाठी दीर्घकाळ घालवावा लागतो. कधी कधी तर अनेक महिने घालवावे लागतात. एकंदरीत हे काम अतिशय कंटाळवाणे व दमविणारे आहे, यात शंका नाही.

" काही दिवसांपूर्वी माझी एक जुनी रोगी स्त्री माझ्याकडे आली. तिच्यावर पूर्वी मी अनेक महिने उपचार करीत होतो. ती स्त्री बुद्धिमान होती, तिचे वाचन चांगले होते आणि तिला अनेक विषयांची गोडी होती. ती या वेळी जेव्हा मला भेटावयाला आली, तेव्हा तिच्या चेहऱ्यावर दीर्घकाळ दृष्टीस न पडलेले स्मि. मला दिसून आले. तिने काहीशा उत्तेजित स्वरांत सांगितले की, एका मित्राने तिल आपल्या प्रवचनांना हजर राहण्यास विनविले आणि ही प्रवचने एकत असतानाच आपली सखोल खिन्नता व विषण्णता नाहीशी होत चालली आहे, असा तिला अनुभव आला. वस्तुतः तिची ही विषण्णता अतिशय खोल रुजलेली व दुःसाध्य स्वरू-

पाची होती. ती यावद्दल असे सांगत होती की, आपल्या पहिल्या प्रवचनाने तिला अतिशय संत्रस्त करून टाकले. प्रवचनातील शब्द व विचार सारेच तिला नवीन होते आणि ते परस्परविरोधी आहेत, असेही तिला वाटत होते. त्यामुळे दुसऱ्या प्रवचनाला जाण्याची तिची इच्छा नव्हती. पण तिच्या मित्राने तिला सांगितले की, अनेकांना प्रथमप्रथम असेच वाटत असते. म्हणून अनेक प्रवचने ऐकल्यानंतर तिने या बाबतीत काय तो निर्णय घ्यावा, अगोदर घेऊ नये. त्याप्रमाणे ती सर्व प्रवचनांना हजर राहिली आणि आपल्या व्याधीपासून आपण मुक्त होऊन गेलो आहोत, असे तिला वाटले. आपण जे सांगत होता, त्याचा स्पर्श तिच्या अबोध मनाला नकळत होत गेला आणि त्यामुळे आपल्या विफलतेपासून व विषण्णतेपासून स्वतःला मुक्त करण्याचा कोणताही प्रयत्न न करताच तिची विफलता व विषण्णता नाहीशी होऊन गेली आहे, तिला अस्तित्वच उरले नाही, असा तिला प्रत्यय आला. ही गोष्ट काही महिन्यांपूर्वीची आहे. त्या स्त्रीला मी पुन्हा थोडचा दिवसांपूर्वी पाहिले. तिची ती खोल विषण्णता खरोखरच नाहीशी होऊन गेली आहे, असे मला आढळून आले. ती आता सर्वसामान्यांप्रमाणे सुखी आहे व तिचे आपल्या कुटुंबियांशी असणारे संबंधही चांगले झाले आहेत. एकूण ती आता अगदी चांगली झाली आहे."

तो पुढे सांगू लागला, "पण ही सगळी केवळ प्रस्तावनाच आहे. याच स्त्रीच्या सांगण्यावरून आपल्या शिकवणुकीवरची काही पुस्तके मी वाचली. आज जो मी येथे आलो आहे, तो एका विशिष्ट गोष्टीबद्दल विचारण्यास आलो आहे. मानवी दुःखाचे जे मूळ आहे, त्याच्याप्रत चटकन पोचण्याचा एखादा विशिष्ट मार्ग किंवा एखादी विवक्षित पद्धत आहे का ? आमच्या सध्याच्या ज्या पद्धती आहेत त्यांना फार काळ लागतो आणि दीर्घकाळपर्यंत न कंटाळता विश्लेषण करीत राहावे लागते."

आपल्या रोग्यांच्या बाबतीत काय घडवून आणण्याचा आपण प्रयत्न करता, हे तुम्हांला विचारू का ?

"मनोविश्लेषणशास्त्राची परिभाषा बाजूला ठेवून सरळ शब्दात सांगावयाचे तर या रोगग्रस्तांना सध्याच्या समाजव्यवस्थेत आपले स्थान ग्रहण करता यावे, यासाठी त्यांच्या मानसिक अडचणी, दडपणे व व्यथा यांचे निराकरण करण्यास आम्ही मदत करतो, असे म्हणता येईल."

सध्याच्या भ्रष्ट समाजव्यवस्थेशी जुळते घेऊन तिच्या चौकटीतच जीवन जगण्यासाठी लोकांना मदत करणे, हे खरोखरच महत्त्वाचे आहे, असे तुम्हांला वाटते का ?

"आजची समाजव्यवस्था भ्रष्ट असेलही पण समाजाची सुधारणा करणे हे काही आमचे काम नाही. आपल्या प्राप्त परिस्थितीशी जुळवून घेण्यास रोग्याला मदत करणे

व अशा प्रकारे त्याला सुखी व उपयुक्त असा नागरिक वनविणे हे आमचे काम आहे. मनोविकृती जडलेल्या रोग्यांशीच काय तो आमचा संबंध असतो. अतिमानवी असे लोक निर्माण करण्याचा काही आमचा प्रयत्न नसतो आणि तसे करणे हे आमचे कर्तव्य आहे, असे मला मुळीच वाटत नाही. "

पण कुणालाही आपल्या व्यवसायापासून, आपल्या कार्यापासून असे वेगळे करून टाकता येईल का ? संपूर्ण नवी निरामय समाजव्यवस्था निर्माण करणे, जिच्यात युद्धे नाहीत, वैरभाव नाही वा स्पर्धेची आकांक्षा नाही, अशी नवी समाजव्यवस्था निर्माण करणे, हेही तुमचेच कार्य नाही का ? सध्या अस्तित्वात असलेल्या दडपणांमुळे व प्रवृत्तीमुळेच मनोविकृतींना जन्म देणारी समाजव्यवस्था आकारास येत नसते का ? सध्याच्या समाजरचनेशी जुळवून घेण्यास व्यक्तीला मदत करणे, एवढेच जर तुम्ही आपले कार्य मानले, तर विफलता, दुःख व विनाश यांना जन्म देणाऱ्या कारणांचाच तुम्ही परिपोष करीत राहणार नाही का ?

" आपण सांगता त्यात बरेच तथ्य आहे यात शंका नाही. पण मनोविश्लेषणशास्त्रज्ञ या नात्याने मानवी दुःखाच्या सखोल कारणापर्यंत जाण्याची काही आमची तयारी नाही. "

यावरून असे दिसते की, माणसाच्या संपूर्ण विकासाची तुम्हांला फिकिर नाही, तर मानवी जाणिवेच्या एका विशिष्ट भागाशीच तुम्हांला कर्तव्य आहे. एखाद्या विशिष्ट भागाची व्याधी नाहीशी करणे हे कदाचित आवश्यक असेलही. पण मानवाच्या संपूर्ण मानसिक प्रक्रियेचे आकलन करून घेतल्याशिवाय, केवळ एखाद्या भागाची व्याधी नाहीशी करण्याने तुम्ही दुसऱ्या भागात नव्या व्याधी उत्पन्न करण्यासच कारणीभूत होणार नाही का ? पण हा सगळा चर्चेचा अथवा विकल्पनाचा विषय मुळीच नाही. ही अगदी उघड, स्पष्ट अशी वस्तुस्थिती आहे आणि तिचा विचार केवळ वेगवेगळ्या विशेषज्ञांनीच केला पाहिजे असे नाही, तर आपल्यापैकी प्रत्येकानेच तो केला पाहिजे.

" आपण तर या प्रश्नाच्या फार गहन स्तरापर्यंत चालला आहात. पण इतके मुळापर्यंत जाऊन विचार करण्याची मला सवय नाही. त्यामुळे आपण जे सांगत आहात ते माझ्या आकलनाच्या पारचे आहे, हे मला जाणवत आहे. मनोविश्लेषणाचे आमचे ठराविक तंत्र सोडले, तर आमच्या रोग्यांच्या मनोव्याधींबाबत आम्ही प्रत्यक्ष काय साध्य करू शकत आहोत, याच्यासारख्या प्रश्नांबाबत मी आजवर केवळ वरवरच विचार केला होता. या सर्व गोष्टींचा सखोल अभ्यास करण्यासाठी आमच्यापैकी बहुतेकांना पुरेसा वेळही नसतो आणि ते करण्याची आमची फारशी इच्छाही नसते. पण सध्याच्या पाश्चात्य संस्कृतीने निर्मिलेल्या गोंधळांपासून व नानाविध दुःखांपासून आमच्या रोग्यांना मुक्त करण्याची व स्वतःही मुक्त होण्याची

आमची जर खरोखर इच्छा असली, तर हा सखोल अभ्यास आम्हांला केलाच पाहिजे हे मला मान्य आहे."

हे पाहा की, हा गोंधळ व ही दुःखे पाश्चात्यसमाजातच आहेत असे नाही, तर साऱ्या जगभरच ती आहेत. वस्तुतः व्यक्तीची जी समस्या असते, तीच जगाचीही समस्या असते. त्या काही दोन वेगळ्या प्रक्रिया नाहीत. आपला संबंध हा एकूण मानवी समस्येशी आहे. मग तो मानव पौरस्त्य असो की पाश्चात्य असो. मानवांमधील ही भौगोलिक भिन्नता केवळ काल्पनिक असते. कुठेही गेले तरी मनाला कशाचे महत्त्व वाटते ? तर ईश्वराबद्दल व मृत्यूबद्दल जसे वाटते; तसेच योग्य व सुखद अशी उपजीविका आपल्याला मिळावी, आपली मुलेबाळे सुखी असावी, त्यांना उत्तम शिक्षण मिळावे. इत्यादी गोष्टींबद्दलही महत्त्व वाटत असते. युद्ध व शांती यांचेही असेच महत्त्व वाटत असते. म्हणून या संपूर्ण जीवन प्रकाराचे आकलन करून घेतल्याशिवाय माणसाच्या मनोव्याधी दूर करता येणे शक्य नाही.

"आपण सांगता ते यथायोग्यच आहे. पण या संपूर्ण प्रश्नाचा इतका गहन व इतका व्यापक विचार करण्याचे सामर्थ्य आमच्यापैकी फारच थोड्यांमध्ये असेल, आमच्यापैकी बहुतेकांचे शिक्षण हे चुकीच्या पद्धतीने झालेले असते. आम्ही केवळ तंत्रज्ञ वा विशेषज्ञ बनतो आणि या विशेष ज्ञानाचा आम्हाला थोडाबहुत उपयोगही होतो. पण दुर्दैवाने यापेक्षा जास्त असे काही आमच्यामध्ये नसते. विशेषज्ञ हा हृद्रोगांचा असो की मनोविकृतींचा असो, तो एखाद्या धर्मगुरुप्रमाणे आपापला वेगळा स्वर्ग निर्माण करून त्याच्यामध्येच मरेपर्यंत जगत राहतो, मग तो यापेक्षा वेगळे काही वाचो वा न वाचो. आपण सांगता ते अतिशयच यथार्थ आहे. पण आमच्याबाबतची वस्तुस्थिती ही अशी आहे.

"पण मला पुन्हा माझ्या पूर्वीच्या प्रश्नांकडे वळावेसे वाटते. आपल्या स्वतःच्या किंवा आपल्या रोग्यांच्या दुःखाच्या मुळापर्यंत नेऊन पोचविणारी व रोग निर्मूल करू शकणारी अशी एखादी पद्धती आहे का ? असे एखादे तंत्र आहे का ?"

पण तुम्ही सर्वजण पद्धती, रीती किंवा तंत्र यांच्याच भाषेत नेहमी का बरे विचार करीत असता ? कुठलीही पद्धती किंवा तंत्र हे माणसाला कधीतरी मुक्त करू शकेल का ? की ते त्या विशिष्ट साध्याप्रतच पोचवू शकेल ? आणि हे इष्ट साध्य म्हणजे काय, तर चिंता, भीती, विफलता व दडपणे यांच्या विरुद्ध टोकाला असणारी अवस्था गाठणे, हे होय. अशी वस्तुस्थिती असल्यामुळे हे इष्ट साध्य किंवा ही इष्ट अवस्था हीदेखील चिंता-भीती इत्यादिकांपासूनच उत्पन्न होणारी अवस्था असते. पहिल्या अवस्थेची ही दुसरी अवस्था निव्वळ प्रतिक्रियाच असते. पण आर्थिक क्षेत्रात काय किंवा मानसिक क्षेत्रात काय आपल्या विरोधी असणारी जी अवस्था असते, तिच्याविरुद्ध होणारी प्रतिक्रिया, ही कधीही खरी कृती असू

शकत नाही. माणसाला जीवनात ज्यामुळे खरेखुरे साहाय्य प्राप्त होऊ शकेल, असेही तंत्र किंवा पद्धती यांच्याव्यतिरिक्त, आगळे असे काही असू शकते.

"ते आगळे म्हणजे काय बरे असते ?'

कदाचित प्रीती हेच.

गतानुभवापासून मुक्ती

रस्ता डोंगराच्या पायथ्यापर्यंतच जात होता आणि तेथून पुढे पायवाट सुरू होत होती. डोंगरमाथ्यावर एका जुन्या किल्ल्याचे अवशेष होते. हजारो वर्षांपूर्वी हा दुर्ग अभेद्य गणला जात असावा. त्याची तटबंदी प्रचंड शिळांनी उभारलेली होती. त्यातील विशाल दालने मोठमोठ्या स्तंभांवर आधारलेली होती. जुन्या काळी त्यांची जमीन सुंदर प्रस्तरांनी सुशोभित केलेली होती. संगमर्मरी स्नानगृहे तेथे विराजत होती.

या विशाल दुर्गाच्या जवळ जाऊ लागताच त्याची तटबंदी अधिकाधिक उंच व अधिकच भरीव दिसू लागली. या अभेद्य तटबंदीचे रक्षण त्या काळी अतिशय जोरदारपणे केले गेले असावे. असे असताही अखेर हा दुर्ग जिंकला गेला. त्याच्यावर नांगर फिरविण्यात आला व तेथे नवा दुर्ग बांधला गेला. आता प्रचंड शिळा एकावर एक रचून चुना न घालताच त्या दुर्गाचे तट बांधण्यात आले होते. तटाच्या आत एक पुरातन विहीर होती. ती बरीच खोल असली, तरी खाली पाण्यापर्यंत जाण्यासाठी दगडी पायऱ्या बांधलेल्या होत्या. त्या गुळगुळीत व निसरड्या झालेल्या दिसत होत्या. ओलसरपणामुळे विहिरीच्या भिंती चमकत होत्या. आता हे सर्व अवशेष भग्न झाले होते. पण डोंगरमाथ्यावरून दिसणारा भव्य देखावा मात्र आजही कायम होता. डोंगराच्या डाव्या बाजूला सागराचा अफाट पृष्ठभाग सूर्यप्रकाशात चमकत होता. समुद्रकिनाऱ्यापासून सभोवताली प्रशस्त माळरानें पसरलेली दिसत होती आणि त्यांच्या पाठीशी डोंगराची रांग पार्श्वभूमीसारखी उभी होती. या डोंगरापासून थोड्या अंतरावर दोन टेकड्या होत्या. तेथेही पुरातन काळी दुर्ग बांधले होते. पण डोंगरावरील विशाल दुर्गाच्या तुलनेत ते अगदी क्षुद्र भासत होते. भोवतालच्या विस्तीर्ण परिसराचे, दूरच्या टेकड्यांचे व दूरवर पसरलेल्या विशाल माळरानांचे जे भव्य दृश्य या प्रचंड दुर्गावरून दिसे, त्याच्या मानाने ते लहानसे दुर्ग अतिशय किरकोळ दिसत.

सकाळ अतिशय रमणीय, प्रसन्न होती. समुद्रावरून वाहत येणाऱ्या पवनलहरींनी त्या भग्नावशेषांमध्ये उगवलेली सुंदर सुंदर फुले नाचत डोलत होती. साऱ्या फुलांचे रंग तरी किती तेजस्वी दिसत होते ! आणि किती विलक्षण जागी उमलली होती ही फुले ! शिळाशिळांवर, भग्नतटांच्या छिद्राछिद्रांमध्ये आणि मधल्या विशाल प्रांगणाच्या परिसरात सगळीकडे ती विमुक्तपणे, स्वच्छंदपणे फुलली होती. आज शतकानुशतके ती अशीच मुक्तपणे, मस्तपणे विकसत विलसत होती. साऱ्या पायवाटांवर ती पसरली पहुडली होती. पण त्यांच्यावर पाऊल ठेवण्यास मन धजत नव्हते.

कारण वस्तुतः ते सारे सर्वस्वी त्यांचेच विश्व होते. आम्हीच तेथे परके होतो, उपरे होतो. पण ही फुले मात्र आम्हांला परके समजत नव्हती.

त्या डोंगरावरून दिसणारा देखावा काही विलक्षण नव्हता, मन थक्क करून सोडणारा नव्हता. कधीकधी गिरिशिखरांवरून दिसणारा देखावा विशाल भव्यपणाने व नीरव निःस्तब्धतेने आपले देहभान हारवून टाकतो. पण हा देखावा मात्र तशा जातीचा नव्हता. पण या दृश्यात एक निःशब्द अशी मोहकता होती, एक प्रकारची सौम्यता होती, एक विस्तारशीलता होती. येथे गताला किंवा भविष्याला अस्तित्व नव्हते. येथे कालातीत अवस्थेत राहता येत होते. कारण या संपूर्ण आनंदमय विश्वाशी आता तुमचे तादात्म्य होऊन गेले होते. येथे एक मानव या नात्याने, परदेशीचा एक अनोळखी प्राणी या नात्याने तुम्हाला अस्तित्व उरले नव्हते; तर तुम्ही स्वतःच ते डोंगर बनला होता. त्या मेंढ्या, तो मेंढपाळ सारे काही तुम्हीच होता. ते विराट आकाश व ती फुल्लकुसुमित वसुंधराही तुम्हीच होता. या सर्वांहून भिन्न अस्तित्व तुम्हांला उरलेच नव्हते. तुम्हीच ते सारे काही होता. पण आपण म्हणजे तेच आहोत ही जाणीवही तुमच्या ठायी उरली नव्हती. त्या फुलांना जशी ही जाणीव कधी झाली नाही, तशीच तुम्हालाही आता उरली नव्हती. ती लहरणारी, सळसळणारी शेते, तो निळाभोर सागर, आणि ती दूरची आगगाडी व तिच्या तील प्रवासी—सारे काही तुम्हीच होता. निवड करणारा, तुलना करणारा, व प्राप्तव्यामागे धडपडणारा अहं आता तेथे उरला नव्हता. अखिल वस्तुजातामध्ये तुम्ही एकरूप होऊन गेला होता.

परत जाण्यास उशीर होत चालल्याची आठवण आमच्यापैकी एकाने करून दिली त्यावरोबर डोंगराच्या दुसऱ्या वाजूच्या पायवाटेने आम्ही निघालो आणि समुद्राकडे जाणाऱ्या रस्त्याला लागलो.

आम्ही एका झाडाखाली वसलो होतो आणि भेटीस आलेला गृहस्थ आपली कहाणी सांगत होता. आपल्या तारुण्यात व नंतर मध्यम वयात दोन्ही महायुद्धांत युरोपात वेगवेगळ्या ठिकाणी आपण काम करीत होतो असे तो सांगत होता. दुसऱ्या महायुद्धात तो घरादारालाही मुकला होता; अनेकदा त्याने उपासमार काढली होती आणि या किंवा त्या पक्षाच्या विजेत्या सेनेकडून गोळी लागता लागता तो जेमतेम वाचला होता. युद्धबंदी असता व्यथित मनःस्थितीत त्याने रात्रीच्या रात्री जागून काढल्या होत्या. कारण आपल्या भटकत्या जीवनात तो आपला पासपोर्ट हरवून वसला होता आणि आपला देश व आपले जन्मस्थान कोणते यावद्दलच्या त्याच्या तोंडी विधानावर विश्वास ठेवण्यास कुणीही तयार नव्हते. व्यवसायाने तो एंजीनिअर होता. अनेक भाषाही त्याला अवगत होत्या. युद्धसमाप्तीनंतर कुठल्याशा उद्योगधंद्यात त्याने काही काळ घालविला होता आणि आता तो चित्रकलेमध्ये रंगून गेला होता.

'आता माझ्यापाशी पासपोर्टही आहे व आता मला घरदारही आहे' असे सांगताना त्याने किंचित स्मित केले. नंतर तो सांगू लागला,

"एकदा घरदाराला मुकलेले व नंतर जीवनांत नव्याने प्रवेश करणारे असे माझ्यासारखे कितीतरी लोक या जगात आहेत. गतकाळावद्दल मला फारसा खेद वाटत नाही. पण जीवनाशी असणारा जिव्हाळचाचा संबंध मात्र आता तुटून गेला आहे, निदान ज्याला सामान्यतः जीवन म्हणतात त्याच्याशी असणारा संबंध तुटला आहे असे मला वाटते. राजेमहाराजे, सेना, ध्वज व राजकारण या सर्वांचा मला आता अगदी वीट आला आहे. आजवर आमच्या राजमान्य धर्माने जेवढी विकृती व जेवढे दुःख उत्पन्न केले तेवढेच या वरील गोष्टींनी उत्पन्न केले आहे. आमच्या राजमान्य धर्माने तर इतर कुठल्याही धर्मापेक्षा आजवर अधिक रक्तपात घडवून आणला आहे, फार काय पण हिंसा व रक्तपात करण्यात मुस्लिम धर्मसुद्धा आमची बरोबरी करू शकणार नाही -- आणि आता आम्ही पुन्हा तोच डाव खेळत आहोत.

"पूर्वी मी अतिशय अश्रद्ध बनून गेलो होतो. पण आता माझ्यामधील ती अश्रद्धताही ओसरून गेली आहे. आता मी एकटाच असतो. कारण महायुद्धाच्या काळात माझी पत्नी व मूल दोघेही मरण पावली. आता मला कुठलाही देश चालतो. तो फार थंड नसला, उबदार असला म्हणजे झाले. आता कसल्याही गोष्टीबद्दल माझा काहीही आग्रह उरलेला नाही. चित्रे विकून मी आपली उपजीविका करीत असतो. कधीकधी जमाखर्चांचा ताळमेळ बसणे कठीण होऊन जाते, पण अचानक कुठून तरी मदत मिळते. माझ्या गरजा अतिशय थोड्या असल्यामुळे पैशाची मला फारशी चिंता वाटत नाही. वस्तुतः मनाने मी संन्यासीच आहे. पण कुठल्याही मठाच्या तुरुंगात नसणारा संन्यासी आहे--पण स्वतःबद्दल काहीतरी सांगावे म्हणून काही मी हे सांगत नाही, तर माझ्या एकंदर जीवनाविषयी आपल्याला थोडीबहुत कल्पना यावी म्हणून सांगत आहे. आपल्यापाशी असे मोकळेपणाने निवेदन करीत असताना, जी गोष्ट मला आता अतिशय महत्त्वाची वाटत आहे, तिच्यावर काहीसा प्रकाश पडेल असे वाटते. आता त्या एका गोष्टीवाचून बाकी सर्व काही मला रसहीन वाटू लागले आहे. चित्रकलेतसुद्धा आता मला रस वाटेनासा झाला आहे."

किंचित थांबून तो पुढे सांगू लागला,

"एक दिवस आपले चित्रकलेचे साहित्य बरोबर घेऊन मी या डोंगराकडे जाण्यास निघालो. कारण तेथे पाहिलेल्या एका दृश्याचे चित्र मला काढावयाचे होते. मी तेथे पोचलो तेव्हा नुकतेच उजाडले होते. आकाशात थोडेसे ढग होते. मी ज्या ठिकाणी बसलो होतो तेथून जवळची दरी व पलीकडे चमकणारा सागर सहजपणे दिसत होता. या साऱ्या अवकाश-विस्तारात आपण एकटेच आहोत, या कल्पनेने मला मोहून टाकले व मी लागलीच चित्र काढण्यास सुरुवात केली. बराच वेळ मी चित्र

काढीत होतो आणि ते विनासायस, अगदी सहजपणे सुंदर उतरत होते. इतक्यात आपल्या मस्तकात काहीतरी घडत आहे असे मला तीव्रतेने जाणवू लागले. पण चित्र काढण्यात मी इतका रमून गलों होतो की, काय घडत आहे त्याचे काही वेळ मला भानच उरले नव्हते. एकाएकी मला त्याची जाणीव झाली आणि त्यानंतर चित्र काढणे अशक्य होऊन गेले. मी अगदी शांत निःस्तब्ध बसून राहिलो."

थोडे थांबून तो पुढे सांगू लागला,

"मला वेड लागले आहे असे कृपा करून समजू नका. कारण मला वेड मुळीच लागले नाही. पण त्या वेळी तेथे बसलो असता एक अलौकिक सर्जनशक्ती आत उसळत असल्याचे मला जाणवू लागले. ही सर्जनशक्ती माझी नव्हती, तर जवळच्या मुंग्यांमध्ये व शेजारच्या अचपळ खारीमध्ये जी सर्जनशक्ती होती, तीच माझ्या अंतर्यामात सळसळत होती. काय घडत होते हे मला नीटपणे सांगता येतेसे वाटत नाही. पण आपल्याला सारे काही कळून येईल अशी माझी खात्री आहे. ती काव्यलेखनामागील सर्जनशक्ती मुळीच नव्हती किंवा माझ्या चित्रनिर्मितीच्या मागे असणारी निर्मितिशक्तीही नव्हती. ती सहज, विशुद्ध, निर्मल अशी सर्जनशक्ती होती. हाताने वा मनाने निर्मिलेल्या साऱ्या कलाकृती या सर्जनशक्तीच्या परिघाबाहेर दूरदूर कुठेतरी रेंगाळत होत्या, — या अलौकिक सर्जनशक्तिसलिलात मी न्हाऊन निघत आहे असे मला वाटत होते. त्यात एक प्रकारचे अलौकिक मांगल्य, एक प्रकारचा परमपावन पुण्य प्रसाद नांदत होता. धर्माच्या भाषेत वर्णन करावयाचे झाले तर — पण मी त्या भाषेत सांगणार नाही. धार्मिक परिभाषेतील शब्द माझ्या मुखातून निघणारही नाहीत. माझ्या दृष्टीने त्यांना काहीही अर्थ उरलेला नाही. — ते अखिल विश्वसर्जनाचे केंद्रस्थान होते. प्रत्यक्ष परमेश्वरच तेथे वसत होता. — पुन्हा तेच धार्मिक शब्द बाहेर पडत आहेत की! — खरे सांगू? ते अतीव पवित्रतम, निरतिशय मंगलमय असे होते. पण ते पावित्र्य, ते मांगल्य मानवनिर्मित देवालयांचे, धूपदीपादिकांचे वा मंत्रोच्चारांचे पावित्र्य मुळी नव्हते. या साऱ्या गोष्टी अगदी बालिश, निरर्थक अशा आहेत. तेथे जे होते ते अलौकिक, निष्कलंक, विचारातीत असे काही होते!

"माझ्या नेत्रातून झरझर अश्रू वाहू लागले. त्या अश्रुजलाने आपल्या गतकालाच्या कलंकापासून मी जणू पूर्णपणे निर्मल होऊन जात होतो, मुक्त होत होतो. ती जवळची खारही आता अन्न गोळा करण्याचे थांबवून निःस्तब्ध बसली होती. एक विलक्षण शांती, एक नीरव निःशब्दता नांदू लागली होती. पण रात्रीच्या वेळी अखिल वस्तुजात जेव्हा निद्रामग्न होऊन जाते, तशा रात्रीची काही ती शांती नव्हती. तर अखिल वस्तुजाताच्या तरल जागृततेची ती शांती होती.

"त्या निःस्तब्ध अवस्थेत मी बराच काळ असेन असे वाटते. कारण भानावर

आलो तेव्हा सूर्य पश्चिमेकडे झुकलेला होता. एकाच अवस्थेत बसून राहिल्यामुळे माझे शरीर काहीसे आखडून गेले होते; एका पायाला मुंग्या आल्याने तो जड होऊन गेला होता. त्यामुळे उठून उभे राहण्यास मला थोडे प्रयास पडले. मी अतिशयोक्ती करीत नाही पण तेव्हा खरोखरच काळ थांबून गेला होता, असे वाटते. किंवा तेव्हा काळाला अस्तित्व उरले नव्हते, असे म्हणणे अधिक यथार्थ होईल. माझ्याजवळ घडचाळ नव्हते खरे. पण मी चित्राचा कुंचला खाली ठेवल्याच्या क्षणापासून तो उठून उभे राहण्याच्या क्षणापर्यंत अनेक तास लोटून गेले असले पाहिजेत. मला काही उन्माद झाला नव्हता किंवा मी संज्ञाहीन वा मूर्छितही झालो नव्हतो. तसे कुणाला कदाचित वाटेलही. पण तसे काहीही नव्हते. उलट मी त्या वेळी पूर्ण जागृत होतो: सभोवताली जे घडत होते त्याचे मला पूर्ण अवधान होते.

"मी आपले सर्व चित्रसाहित्य गोळा केले. पिशवीत काळजीपूर्वक भरले. आणि त्या विलक्षण मनःस्थितीत मी पायी घरी गेलो. लहानशा गावात नेहमी ऐकू येत राहणारे लहानमोठे आवाज कानी पडत होते. तरीही त्यांच्यामुळे माझी ती विलक्षण मनोवस्था किंचितही विचलित झाली नाही. घरी पोचल्यावरही बरेच तास ती कायम होती. पण दुसऱ्या दिवशी मी जेव्हा निजून उठलो, तेव्हा मात्र ती पूर्णपणे नाहीशी होऊन गेली होती. मी आपल्या चित्रावर दृष्टी फिरवली. ते चांगले निघाले असले तरी अलौकिक असे काहीच त्यात नव्हते.

"मी इतका वेळ एकसारखा बोलत राहिलो, याबद्दल मला खेद वाटतो. पण हा अनुभव मी आजवर आतआत दडवून ठेवला होता. आणि इतर कोणापाशीही त्याच्याबद्दल काही बोलणे शक्य नव्हते. मी असे काही दुसऱ्यापाशी सांगू लागलो असतो, तर एकतर माझ्या मनात काहीतरी विकृती उत्पन्न झाली आहे असे वाटून मनोविश्लेषणशास्त्रज्ञाकडे जाण्याची सूचना मला कुणी केली असती किंवा ही माझी अखेरची वडबड आहे असे समजून कुणी धर्मोपदेशकाला बोलवावयाला गेले असते. माझ्या या अनुभवाचे आपण स्पष्टीकरण करावे अशी काही माझी अपेक्षा नाही. पण अशी अवस्था कशी निर्माण होते हे मात्र मला विचारावेसे वाटते. अशी अवस्था निर्माण होण्यासाठी कोणकोणत्या गोष्टी आवश्यक असतात बरे?"

तुम्हाला तो अनुभव पुन्हा घ्यावासा वाटत आहे. म्हणूनच तुम्ही हा प्रश्न विचारीत आहात, होय ना?

"मला वाटते माझ्या प्रश्नामागील हेतू हाच असावा. पण ——"

हे पहा, आपण येथूनच पुढे जाऊ या. हा अनुभव तुम्हाला आला, ही गोष्ट महत्त्वाची नसून, तुम्ही त्या अनुभवामागे लागता उपयोगी नाही ही गोष्टच महत्त्वाची आहे. कशाचाही लोभ धरल्याने माणसामध्ये गर्व किंवा उद्धटपणा येत असतो. आणि वस्तुतः गरज तर असते नम्रतेची. पण ही काही प्रयत्नाने संवर्धित करता येत नसते.

मुद्दाम संवर्धन करून जे मिळविले जाते, त्याच्यामुळे आपल्या संग्रहात आणखी एका वस्तूची भर पडते एवढेच काय ते. तुम्हाला असा अनुभव पुन्हा मिळावा, या गोष्टीला महत्त्व नसून, तुमच्यामध्ये निर्व्याजता, सरलता असावी व गतानुभवाच्या स्मृतीपासून तुम्हाला मुक्तता प्राप्त व्हावी हीच गोष्ट महत्त्वाची आहे ; मग तो अनुभव चांगला असो की वाईट असो ; सुखद असो की दुःखद असो.

" अरे देवा ! म्हणजे जो अनुभव मला आत्यंतिक मोलाचा होऊन बसला आहे, तो मी पूर्ण विसरून जावे असेच आपण सांगत आहात. आपण तर माझ्याकडून अशक्य गोष्टीचीच अपेक्षा करीत आहात. तो अनुभव विसरणे मला अशक्य आहे आणि तो विसरून जाण्याची मला मुळीच इच्छा नाही."

हीच तर मुख्य अडचण असते. पण आता जरा शांतपणे व अवधान देऊन ऐकाल का ? सध्या तुमच्या संग्रहात काय आहे बरे ? केवळ एक मृत स्मृती. ते जोवर अनुभवले जात होते, तोवर ते जिवंत अनुभविणे होते. आणि तो जिवंत अनुभव घेण्यासाठी तेथे कोणी अनुभविता शिल्लक उरला नव्हता. जे घडत होते त्याची त्या वेळी कोणतीही स्मृती त्या अनुभवाशी संलग्न होत नव्हती. त्या वेळी तुमचे मन एका निर्व्याज अवस्थेत होते. ते काहीही मागत नव्हते. कशाच्याही मागे धावत नव्हते. कशालाही पकडून ठेवीत नव्हते. ते सर्वस्वी विमुक्त होते. पण आता मात्र तो अनुभव पुन्हा प्राप्त होण्यामागे तुम्ही लागला आहात. आणि त्या मृत स्मृतीला चिकटून राहू पाहत आहात. तो अनुभव आता खरोखरच मृत होऊन गेलेला आहे. तुमच्या स्मृतीने तो अनुभव नष्ट करून टाकला आहे आणि आता तीच स्मृती तुमच्या मनामध्ये द्वैत निर्माण करीत आहे, द्वैताचा संघर्ष उत्पन्न करीत आहे. जे मागे घडून गेले व ज्याची पुढे अपेक्षा आहे त्या उभयतांमध्ये ही स्मृतीच तीव्र संघर्ष माजवीत आहे. पण संघर्ष म्हणजे तर मरणच होय. म्हणूनच तुम्ही आता अंधकारात बुडून गेला आहात. जेव्हा अहं शिल्लक राहत नाही, तेव्हा तुम्हांला आला तसा अनुभव कधीकधी आपोआप येत असतो. पण अशा अनुभवाच्या स्मृतीमुळे, तो अनुभव पुन्हा मिळावा या लालसेमुळे अहं अधिकाधिक पुष्ट होत राहतो आणि मग हा अहं त्या जिवंत सत्याला सदैव प्रतिबंध करीत राहतो.

" पण ही उन्मादक स्मृती मी नाहीशी कशी करून टाकू हे तरी मला सांगा. "

आता पुन्हा तुम्ही तोच प्रश्न करीत आहात. ती अवस्था पुन्हा प्राप्त करून घेण्याची तीव्र अभिलाषाच तुमच्या या प्रश्नातून स्पष्टपणे व्यक्त होत आहे. तो अनुभव पुन्हा प्राप्त व्हावा एवढ्यासाठीच, त्या अनुभवाची स्मृती नष्ट करून टाकण्यास तुम्ही तयार झाला आहात. म्हणजे जे घडले ते विसरून जाण्यास जरी तुम्ही तयार असलात, तरी त्याबद्दलची तुमची अभिलाषा कायमच आहे. त्या अलौकिक अनभुवाबद्दलची तुमची अभिलाषा एखाद्या मदिरासक्त माणसाच्या लालसे-

सारखीच आहे. म्हणून तो अनुभव पुन्हा येण्याला महत्त्व नाही, तर या लालसेचे पूर्ण आकलन करून घेणे आणि कुठलाही प्रतिकार न करता, इच्छाशक्तीने कसलीही कृती घडवून न आणता, ती लालसा स्वेच्छेने, सहजतेने गळून पडणे, ही गोष्टच खरोखर सर्वश्रेष्ठ महत्त्वाची आहे.

" म्हणजे आपले असे का म्हणणे आहे की, त्या अवस्थेची स्मृती व ती अवस्था अनुभविण्याची माझी उत्कृष्ट लालसा याच गोष्टी तसा अनुभव पुन्हा येण्याच्या आड येत आहेत ? तो अनुभव पुन्हा प्राप्त होण्यासाठी, जाणता वा अजाणता, मी काहीही करता उपमोगी नाही, असेच का आपले सांगणे आहे ? "

तुम्हाला या गोष्टीचे खरोखर पूर्ण आकलन झाले असेल, तर माझे म्हणणे हेच आहे, हे तुम्हाला कळून येईल.

" आपण तर माझ्याकडून अशक्य गोष्टीचीच अपेक्षा करीत आहात. – पण काय घडेल हे कोण सांगू शकेल ? "

सत्ता आणि सहकार

भेटीस आलेली स्त्री स्वतःबद्दलची माहिती सांगत होती. एका उद्योगपतीची सेक्रेटरी या नात्याने तिने वरीच वर्षे काम केले होते. तिची कार्यक्षमता विशेष उच्च प्रकारची असावी असे वाटत होते. कारण तिच्या आविर्भावांमधून व शब्दांमधून स्वतःच्या उच्च कार्यक्षमतेची जाणीव स्पष्टपणे दिसून येत होती. पुरेसे पैसे जमविल्यानंतर सुमारे दोन वर्षांपूर्वी तिने हे काम सोडून दिले होते. कारण काहीतरी लोककल्याणाचे कार्य करावे अशी तिची इच्छा होती. वयाने ती अजून तरुणच होती व कार्य करण्याची शक्ती व उत्साह हीही तिच्यामध्ये भरपूर होती. उरलेले सर्व आयुष्य काहीतरी मोलाचे कार्य करण्यात घालवावे अशी तिची मनीषा होती. म्हणूनच वेगवेगळ्या आध्यात्मिक संस्थांचा विचार ती या दृष्टीने करू लागली होती. कॉलेजमध्ये जाण्यापूर्वी एका ख्रिश्चन मठामध्ये तिचे शिक्षण झाले होते. पण तेथे तिला ज्या ज्या गोष्टी शिकविण्यात आल्या होत्या, त्या त्या सर्व तिला संकुचित वाटत होत्या; आप्तवाक्य प्रमाण मानणाऱ्या व अधिकारी आदेशानुसारच चालणाऱ्या त्या आहेत असे तिला वाटू लागले होते. त्यामुळे तशा स्वरूपाच्या कुठल्याही धार्मिक संस्थेमध्ये काम करण्याची तिची मुळीच इच्छा नव्हती. इतर अनेक संस्थांचा अभ्यास केल्यानंतर आता ती एका विशिष्ट संस्थेप्रत येऊन पोचली होती. ही संस्था तिला अधिक उदार धोरणी व अधिक सार्थ अशी वाटत होती. या संस्थेच्या केंद्रस्थानी ती पोचली असून तेथील प्रमुख कार्यकर्त्याच्या सहायकाचे काम ती करीत होती.

ती निवेदन करू लागली, "आता अखेर मला असे स्थान गवसले आहे की, जेथे संपूर्ण जीवनाला सार्थकता प्राप्त होत आहे असे मला वाटू लागले आहे. बाकी याही संस्थेतील लोकांचे अधिकारी आदेश मिळण्याचे अखेरचे स्थान म्हणजे अदृश्य महात्म्यांचे संदेश हेच आहे. पण या महात्म्यांवर श्रद्धा असलीच पाहिजे असे मात्र नाही. माझी व्यक्तिशः त्यांच्यावर श्रद्धा आहे. पण या गोष्टीला विशेष महत्त्व मुळीच नाही. माझा समावेश या संस्थेच्या आतील वर्तुळात झालेला आहे. आम्ही विशिष्ट स्वरूपाची ध्यानधारणा करीत असतो हे आपल्याला माहीतच आहे. आता या संस्थेच्या सदस्यांना अदृश्य महात्म्यांकडून दीक्षा मिळाल्याबद्दलचे संदेश क्वचितच येतात. आजकाल साधकांना दीक्षा देण्याबाबत विशेष सावधगिरी बाळगण्यात येते असे दिसते."

पण तुम्ही हे सारे कशासाठी सांगत आहात ?

"आपली जी नुकतीच चर्चा-सभा झाली तिच्यामध्ये मी हजर राहिले होते.

कुणाचेही अनुसरण करणे हे अनिष्ट आहे, असे आपण त्या वेळी सांगितले. त्यानंतर मी आपल्या अनेक चर्चा सभांना हजर राहिले. तेथे जे जे आपण सांगितले त्यामुळे मी साहजिकच अतिशय अस्वस्थ होऊन गेले आहे. मला तर वाटते की अदृश्य महात्म्यांनी सांगितलेले कार्य करणे म्हणजे त्यांचे अनुसरण करणे काही नव्हे. आमच्या येथे त्यांच्या आदेशांचे पालन केले जाते खरे. पण वस्तुतः आम्हालाच त्यांच्या आदेशांची गरज वाटत असते. ते महात्मे काही आमच्याकडून आज्ञा पालनाची अपेक्षा करीत नाहीत. आम्ही स्वतःच त्यांच्या किंवा त्यांच्या प्रतिनिधींच्या आज्ञांचे पालन करीत असतो. "

तुम्ही जर त्या चर्चा सभांना हजर राहिला असाल तर आताचे तुमचे हे बोलणे जरासे बालिशच ठरत नाही का ? या महात्म्यांचा किंवा त्यांच्या प्रतिनिधींचा अधिकार हा त्यांनी स्वतः जे कर्तव्य मानले, त्याच्यावरच आधारलेला असणार. तेव्हा अशा अधिकाराचा आसरा घेणे हे ख्रिश्चन चर्चच्या अधिकाराचा आसरा घेण्यासारखेच नाही का ? कदाचित एक प्रकारचा सत्ताधिकार हा संकुचित स्वरूपाचा वाटेल व दुसऱ्या प्रकारचा अधिक उदार व विशाल असा वाटेल. पण हे दोन्हीही प्रकारचे सत्ताधिकार सारखेच बंधनकारक असतात, हे उघडच नाही का ? मनुष्य जेव्हा स्वतः गोंधळलेल्या मनःस्थितीत असतो, तेव्हा त्याला इतरांकडून मार्गदर्शन हवे असते. पण त्याला जे मार्गदर्शन लाभते ते त्याच्या स्वतःच्या गोंधळामधूनच उत्पन्न झालेले असते. स्वतःच्याच संघर्षामुळे व दुःखामुळे अनुयायी हा नेत्याची निवड करीत असतो. पण वस्तुतः हा नेतादेखील अनुयायाइतकाच गोंधळलेला असतो. कुणाचेही अनुसरण केल्याने स्वतःच्या मनात स्पष्टता वा निःसंदिग्धता कधीही उत्पन्न होत नसते, किंवा स्वतःला सौख्यही प्राप्त होत नसते; मग हे अनुसरण एखाद्या नेत्याचे असो, की उद्धारकर्त्याचे वा अदृश्य महात्म्याचे असो. स्वतःच्या गोंधळाचे व हा गोंधळ निर्माण करणाऱ्या आपल्या अहंचे जेव्हा यथार्थ आकलन होते, तेव्हाच संघर्षातून व दुःखातून माणसाची मुक्तता होते. हे सर्व अगदी स्पष्ट व उघड असेच नाही का ?

" आपल्याला हे सर्व स्पष्ट वाटत असेल. पण मला तर अजूनही त्याचे आकलन होत नाही. कोणतेही कार्य करावयाचे झाले तर ते योग्य रीतीनेच नको का करावयाला ? ही योग्य रीत, हा योग्य मार्ग जे दाखवू शकतात, तेच आमच्या मार्गदर्शनासाठी विशिष्ट योजना आखून देतात. तेव्हा येथे आंधळघा अनुसरणाचा प्रश्नच उद्भवत नाही. "

हे पहा, अनुसरण हे केव्हाही सुबुद्ध नसते. सनुसरण हे नेहमीच निर्बुद्ध व अनिष्ट असे असते. सत्ताधिकार हा माणसाला नेहमी भ्रष्टच करीत असतो; मग हा अधिकार उच्च श्रेणीतील लोकांचा असो की, अविचारी लोकांचा असो. जे अविचारी

असतात ते दुसऱ्याचे अनुसरण करून कधीही विचारी बनत नसतात. मग तो आदेश देणारा अधिकारी केवढाही थोर वा उदात्त असो.

" पण या जागतिक महत्त्वाच्या कार्यात माझ्या मित्रांच्या सहकार्याने काम करणे मला मनापासून आवडते आणि सहकार्याने काम करावयाचे तर कसल्यातरी अधिकार केंद्राची गरज ही राहणारच. "

हे लक्षात घ्या की, जेव्हा कुठल्यातरी अधिकार केंद्राच्या सुखद वा असुखद प्रभावामुळे कामे केली जातात, तेव्हा त्या कामामध्ये खरा सहकार नांदतो, असे म्हणता येईल का ? दुसऱ्याने तयार केलेल्या योजनेनुसार जे कार्य केले जाते त्याच्यात खऱ्या सहकाराला काहीही स्थान नसते, होय की नाही ? अशा प्रकारचे कार्य हे जाणता वा अजाणता, भीतीमुळे किंवा पारितोषिकाच्या आशेमुळेच तुम्ही योजनेवरहुकूम करीत असता हीच वस्तुस्थिती नाही का ? विशिष्ट योजनेशी असे जुळवून घेणे म्हणजे खऱ्या सहकाराने काम करणे असते का ? जेव्हा तुम्ही कुठल्या तरी अधिकारी आदेशाने काम करीत असता, तेव्हा तेथे सहकार असणे शक्य तरी आहे का ? मग हा अधिकारी आदेश कल्याणकारी असो की जुलुमी असो. जे कार्य करण्यात दंडाचे वा अपयशाचे भय नसते आणि यशाची वा मान्यतेची जेथे लालसा नसते, ते कार्य जेव्हा कार्याच्या केवळ प्रेमानेच केले जाते, तेव्हाच तेथे खरा सहकार नांदतो. मत्सर वा लोभ यांच्यापासून मन जेव्हा विमुक्त होते, तसेच वैयक्तिक वा सामूहिक सत्तेच्या वा प्रभुत्वाच्या लालसेपासून मन जेव्हा मुक्त असते तेव्हाच तेथे सहकार नांदणे शक्य असते.

" या बाबतीत आपण आत्यंतिक आग्रहीच नाही का ? आपण सांगता त्या प्रकारच्या सर्व दुष्ट व अनिष्ट आंतरिक प्रवृत्तीपासून मुक्त होण्याची वाट पाहावयाची म्हटले तर कोणतेही कार्य कधीही सिद्धीस जाणार नाही. "

पण सध्या तरी तुम्ही काय साध्य करीत आहात सांगा बरे ? हे ध्यानात घ्या की, सर्वस्वी नवे व वेगळे जग जर निर्माण व्हावयाचे असेल तर मानवी मनात मूलभूत स्वरूपाचे परिवर्तन घडून आले पाहिजे आणि हृदयात सखोल तळमळ असली पाहिजे. या जगात निदान थोडी तरी माणसे अशी असावयाला हवीत की, जी सध्या माजत असलेल्या भयानक संघर्षाचे सातत्य टिकविण्याला जाणता वा अजाणता किंचितही हातभार लावणार नाहीत. मानवाची वैयक्तिक व सामूहिक स्वरूपाची महत्त्वाकांक्षा ही संपूर्णपणे गळून पडली पाहिजे. कारण महत्त्वाकांक्षा ही कोणत्याही प्रकारची असली, तरी ती प्रीतिमयतेला सदैव प्रतिबंधच करीत राहते.

" आपण जे सांगितले त्याने मी अत्यंत अस्वस्थ होऊन गेले आहे. म्हणून माझे मन थोडे शांत झाल्यानंतरच मी आपल्याला पुन्हा भेटावयाला येईन, असे वाटते. "

बऱ्याच दिवसांनंतर ती पुन्हा भेटण्यास आली.

" आपल्या मागच्या भेटीनंतर सर्व गोष्टींचा मला स्पष्टपणाने व वस्तुनिष्ठतेने विचार करता यावा म्हणून मी सर्वापासून दूर जाऊन एकांतात काही काळ घालवला. कितीतरी रात्री जागून काढल्या. आपल्या सांगण्याने स्वत:चे चित्त फार विचलित होऊ देता कामा नये, असे माझ्या मित्रांनी मला वारंवार बजावले होते. पण माझे चित्त तर आधीच अतिशय अस्वस्थ होऊन गेले होते. काही गोष्टींबद्दल स्पष्ट निर्णय घेऊन टाकणे मला अपरिहार्य होऊन बसले होते. म्हणून मी आपली काही प्रवचने अतिशय लक्षपूर्वक वाचली. कोणत्याही गोष्टींचा प्रतिकार न करता वाचीत गेले. त्यामुळे आता मला अनेक गोष्टींचा उलगडा होऊ लागला आहे. आता पूर्वीच्या गोष्टींकडे परत फिरणे मला अशक्य आहे. अर्थात हे मी नाटकी आविर्भावाने काही सांगत नाही. मी त्या संस्थेचा राजीनामा दिला आहे व त्यातून उद्‌भवणाऱ्या सर्व गोष्टींचा स्वीकार केला आहे. माझे मित्र माझ्या निर्णयामुळे साहजिकच विचलित झाले आहेत. मी पुन्हा त्या संस्थेत परत जाईन असेच त्यांना वाटत आहे. पण मी परत जाईनसे मला मुळीच वाटत नाही. आपण जे सांगितले ते किती सत्यपूर्ण आहे याचे मला दर्शन घडले आहे. म्हणूनच मी पूर्वीचे सारे काही सोडून दिले आहे. आता काय होते ते पाहावयाचे. "

सामान्यपणा

वादळाचा जोर बरेच दिवस चालू होता. सोसाट्याचे वारे सारखे वाहत होते व मुसळधार पाऊस बरसतच होता. तृषार्त धरणी सारे पाणी शोषून घेत होती. अनेक उन्हाळे झाडावर साचत गेलेली धूळ या वेगवान जलवर्षावाने धुवून निघत होती. या विभागात वरीच वर्षे पुरेसा पाऊस पडला नव्हता. आता मात्र अनेक वर्षांची उणीव भरून काढली जात होती, असे वाटत होते. निदान सर्वांना तशी आशा तरी वाटत होती. त्यामुळे पावसाचा व खळखळणाऱ्या ओढ्यानाल्यांचा आवाज अतिशय सुखद वाटत होता.

आम्ही सर्वजण झोपण्यास गेलो तेव्हाही पाऊस बरसतच होता. छपरावर आदळणाऱ्या जलधारांचा आवाज जोराने कानी पडत होता. त्या जलधारांमधून नाना निर्झरांचा मर्मरध्वनी ऐकू येत होता. जलधारांच्या नृत्यात एक वेगळीच लय, एक आगळाच ताल जाणवत होता.

आणि मग दुसऱ्या दिवशीची ती नवप्रभात किती विलक्षण रमणीय, किती निर्मलसुंदर होती ती ! सारे मेघ पार नाहीसे होऊन आकाश नितळ निरभ्र झाले होते. कोवळ्या सूर्यप्रकाशात भोवतालचे डोंगर चमकत होते. विपुल वर्षास्नानाने ते स्वच्छ, निर्मळ दिसू लागले होते. समग्र वातावरणात त्या अनंताचा मंगल प्रसाद नांदत होता. अजूनपर्यंत कुणीही जागे झालेले दिसत नव्हते. गिरिशिखरेच काय ती बालरविकिरणात झळाळत होती. थोड्याच वेळाने दिवसाचे परिचित आवाज सुरू होणार होते. पण या क्षणी मात्र, जवळच निर्झर खळाळत असले, आणि दुरून कावळ्यांची कावकाव ऐकू येत असली, तरी त्या दरीत अथांग शांती नांदत होती. निसर्गातील सारे रंग आज नवतेने नटले होते. सर्व काही इतके विलक्षण चैतन्यमय झाले होते. ती नवांकुरित सुकुमार हिरवळ आणि त्या दरीवर अधिराज्य गाजविणारा तो प्रचंड वृक्ष सारे सारे चैतन्याने रसरसलेले होते. साऱ्या वनस्पति सृष्टीत नवजीवन ओसंडत होते. आता देवदेवतांना हर्षभराने व मुक्तहस्ताने अर्घ्यदान केले जाणार होते. आता भातशेते समृद्धीने भरभरून जाणार होती. गाईगुरांना चाऱ्याची मुळीच वाण पडणार नव्हती. तळीविहिरी पाण्याने तुडुंब भरून जाणार होत्या. आणि लग्नसमारंभ मोठ्या हौशीने वाजतगाजत केले जाणार होते. वसुंधरेवर अनुरागाचा लालिमा पसरला होता. आणि सगळीकडे महोत्सवाचे वारे वाहू लागणार होते.

भेटण्यास आलेला गृहस्थ सांगत होता, " मला स्वतःच्या मनःस्थितीची पुरेपुर जाणीव आहे. मी विद्यालयातील तथाकथित उच्च शिक्षण घेतलेले आहे. बरेचसे

अवांतर वाचनही केलेले आहे. राजकारणात मी वामपंथाच्या अगदी कडेला गेलो होतो. त्यांचे सारे राजकीय साहित्य माझ्या पूर्ण परिचयाचे आहे. पण राजकीय वामपंथ हा आता संघटित धर्मसंस्थेसारखाच बनून गेला आहे. कॅथॉलिक धर्मसंस्था जशी पूर्वी होती व आजही आहे, तिच्यासारखाच हा राजकीय वामपंथही बनून गेला आहे. आपल्याविरुद्ध असणाऱ्यांना धर्मबहिष्कृत करणे, नाना धमक्या देणे, सगळ्या सवलती काढून टाकणे वगैरे प्रकार दोहोंना अगदी समान आहेत. अधिक चांगले जग निर्माण करण्याच्या आशेने काही वर्षे मी राजकारणात अतिशय तळमळीने काम केले. त्याच मार्गाने सतत पुढेपुढे जात राहणे मला सहज शक्य होते. पण मला आता या कार्याची, या मार्गाची व्यर्थता पूर्ण कळून चुकली आहे. राजकारणाच्या द्वारा खरीखुरी सुधारणा घडून येणे अशक्य आहे, राजकारण व धर्म यांचा समन्वय कधीही करता येणे शक्य नाही, हे माझ्या ध्यानात येऊन चुकले आहे. राजकारणात धार्मिकता, नैतिकता आणली पाहिजे असे नेहमी म्हणण्यात येते, हे मला ठाऊक आहे. पण राजकारण व धर्म यांची सांगड घालण्याचा असा प्रयत्न करताक्षणीच धर्म हा धर्म म्हणून उरत नाही, उलट तो एक निरर्थक शब्द बनून जातो. ईश्वर हा राजकारणाच्या परिभाषेत काही आपल्याशी बोलत नाही. पण आपण मात्र आपल्या राजकीय किंवा आर्थिक पूर्व संस्कारानुसार आपापला विशिष्ट ईश्वर निर्माण करीत असतो.

" पण मी काही राजकारणाविषयी बोलण्यासाठी आपल्याकडे आलेलो नाही. राजकारणासंबंधीच्या चर्चेला आपण नकार देता, हे यथायोग्यच आहे. आज मी जो आपल्याकडे आलो आहे, तो माझ्या मनाला पोखरणाऱ्या एका गोष्टीबद्दल बोलण्यास आलो आहे. आत्मसंतुष्ट सामान्यपणाबद्दल आपल्या प्रवचनात आपण त्या दिवशी सांगितले. मी ते कानांनी ऐकले पण आत काही शिरले नाही. कारण त्या वेळी मी अतिशय अस्वस्थ होऊन गेलो होतो. आपल्या बोलण्यात जेव्हा आत्मसंतुष्ट सामान्यपणा हा शब्द आला, तेव्हा त्याने माझ्या मनावर जोराचा आघात केला. आपण स्वतःदेखील आत्मसंतुष्ट सामान्यच आहोत, हे पूर्वी कधी माझ्या ध्यानात आले नव्हते. मी सामाजिक अर्थाने काही हा शब्द वापरीत नाही. आपण दाखवून दिल्याप्रमाणे त्या शब्दाचा वस्तुतः कुठल्याही सामाजिक वर्गाशी, आर्थिक भेदांशी किंवा जन्माशी काहीही संबंध नाही. "

अर्थातच नाही. आत्मसंतुष्ट सामान्यपणा ही प्रचलित सामाजिक भेदांच्या क्षेत्राबाहेरची वस्तू आहे.

" होय, ते माझ्या ध्यानात येऊन चुकले आहे. खरा धार्मिक मनुष्य हाच वस्तुतः खरा क्रांतिकारी असतो आणि असा मनुष्य कधीही आत्मसंतुष्ट सामान्य नसतो, असे आपण सांगितल्याचे मला स्पष्ट आठवते. मी मनाच्या आत्मसंतुष्ट सामान्य-

रूपाबद्दल बोलत आहे; पदाच्या किंवा व्यवसायाच्या सामान्यतेबद्दल बोलत नाही. अतिशय उच्च पदांवर किंवा सत्तास्थानांवर असणारी किंवा अतिशय उत्कृष्ट व आकर्षक व्यवसायांमध्ये असणारी माणसे ही अतिशय सामान्य असू शकतात. माझ्या बाबतीत सांगावयाचे तर मी उच्च पदावरही नाही व माझा व्यवसायही आकर्षक नाही. पण आपणही आत्मसंतुष्ट सामान्यांपैकीच आहोत, या गोष्टीची मला जाणीव होऊन चुकली आहे. पाश्चात्य व पौरस्त्य अशा दोन्ही तत्त्वज्ञानांचा मी अभ्यास केलेला आहे. इतरही अनेक विषयांची मला गोडी आहे. आणि इतके सारे असूनही माझे मन अगदीच सामान्य दर्जाचे आहे. समन्वयात्मक विचार करण्याची थोडीबहुत क्षमता माझ्यामध्ये आहे खरी. पण तरीही माझे मन अगदी सामान्य व निर्मितिशून्य असेच आहे. "

पण मग तुमची समस्या कोणती आहे ?

" पहिली गोष्ट ही की, माझ्या या मनःस्थितीची, माझ्या कमालीच्या निर्बुद्धपणाची मला अतिशय शरम वाटत आहे. हे मी स्वतःविषयीच्या अनुकंपेने काही सांगत नाही. माझी एवढी सारी विद्वत्ता असताही, सखोल अर्थाने पाहता माझ्यामध्ये सर्जनशीलता नाही हे मला आतआत जाणवत आहे. परवा आपण ज्या सर्जनशीलतेबद्दल बोलत होतो, ती निर्माण होणे शक्य असलेच पाहिजे. पण ती निर्माण होण्यासाठी काय केले पाहिजे, हे मात्र मला कळत नाही. माझा हा प्रश्न फारच उघडउघड असा आहे का ? "

या प्रश्नाचा विचार आपण अगदी सरळपणाने, अगदी सहजपणाने करू या का ? मन किंवा हृदय हे अगदी सामान्य असे कशामुळे होत असते बरे ? माणसाजवळ ज्ञानकोशाइतके ज्ञान असू शकेल. त्याचे विविध क्षेत्रांतील सामर्थ्यही थोर असू शकेल, पण या सगळ्या गोष्टींचा भरपूर संग्रह जवळ असताही आणि नानाविध नैसर्गिक देणग्या उपलब्ध असताही, मन हे कशामुळे बरे अतिशय निर्बुद्ध बनत असते ? मनाचे हे जे सातत्यात्मक उथळ स्वरूप असते, त्याच्यापेक्षा निखळ वेगळे असे स्वरूप त्याला प्राप्त होणे शक्य आहे का ?

" मन हे कितीही हुशार असले, कितीही प्रकारची क्षमता त्याच्यामध्ये वसत असली, तरीही ते निर्बुद्ध असू शकते, हे आता हळूहळू माझ्या ध्यानात येऊ लागले आहे. अशा मनात कसलेही परिवर्तन करता येणे शक्यच नाही. जसे होते तसेच ते नेहमी राहील. आपली तर्कशक्ती, आपली विकल्पनशक्ती, गणनशक्ती, आलेखनशक्ती त्याला त्याला अनंतपटींनी वाढविता येईल. खरी; पण या सगळ्या शक्तींचा कितीही विस्तार झाला, तरी अखेर मन हे नेहमी आपल्या कक्षेतच सीमित राहील. आपल्या प्रश्नातील गर्भित अर्थ आताच माझ्या ध्यानात येत आहे. आपल्या बुद्धिविभ्रमांनी इतरांना थक्क करू शकणाऱ्या मनाला स्वतःच्या प्रयत्नाने

व इच्छाशक्तीने स्वतःच्याच पार जाता येईल का, असे आपण विचारीत आहात ?"

होय, यातून उद्‌भवणाऱ्या अनेक प्रश्नांपैकीच हा प्रश्न आहे. अतिशय हुशार व सामर्थ्यशाली असणारे मन जर अगदी सामान्य असले, तर ते स्वेच्छेने आपल्या पार जाऊ तरी शकेल का ? सामान्य मनाचे आविष्कार हे कितीही विविध स्वरूपाचे असले तरी त्यांचा धिक्कार करण्याने सामान्यता या वस्तूमध्ये काहीही फरक होणार नाही. धिक्कार व धिक्काराबरोबर येणारे सर्व आविष्कार हे एकदा संपुष्टात आले की, मग सामान्यतेची ही मनःस्थिती कशामुळे उत्पन्न होते हे शोधून काढणे कदाचित शक्य होईल. हे शक्य आहे का हेच आपण आता पाहू या. सामान्यता या शब्दाचा खरा अर्थ आता तुमच्या ध्यानात येऊन चुकला आहे, तेव्हा तोच शब्द वापरू या. काहीतरी साध्य करण्याची, विशिष्ट परिणाम घडवून आणण्याची व यशस्वी होण्याची लालसा—हा सामान्यता उत्पन्न करणारा एक घटक आहे, नाही का ? म्हणून सर्जनशीलता प्राप्त करून घेण्याची अभिलाषा जेव्हा तुम्ही व्यक्त करता, तेव्हा तुम्ही या प्रश्नाचा विचार अगदी उथळपणानेच करीत असता, ही गोष्ट तुमच्या ध्यानात आली का ? आज मी असा आहे पण मला याचे तशात परिवर्तन करावयाचे आहे; तेव्हा हे कसे घडवून आणता येईल, असा प्रश्न मनुष्य साहजिकच उत्पन्न करीत असतो. जेव्हा सर्जनशीलता हीदेखील एक प्रयत्नसाध्य अशी वस्तू बनून जाते, ते जेव्हा प्राप्त करून घेण्याजोगे असे साध्य बनते, जेव्हा मन हे या सर्जनशीलतेलाही आपल्या पूर्वघटित अवस्थेत आणून टाकते. ही जी मनाची प्रक्रिया आहे, तिचे प्रथम आपण समग्र आकलन करून घेतले पाहिजे. सामान्यतेचे दुसऱ्या अवस्थेत परिवर्तन करण्याचा प्रयत्न करता कामा नये.

" आपल्या म्हणण्याचा अर्थ असा आहे का की, स्वतःची अवस्था बदलून टाकण्यासाठी मनाकडून कुठल्याही स्वरूपाचा प्रयत्न केला जाणे म्हणजे वेगळ्या स्वरूपात मनाने स्वतःचे सातत्य चालू ठेवण्याची धडपड करणेच होय—आणि म्हणून ते परिवर्तन मुळीच नव्हे ? हाच आहे ना आपला अर्थ ? "

अशीच वस्तुस्थिती नाही का सांगा बरे ? मनाची जी अवस्था असते, ती कशी बरे निर्माण होत असते ? मन हे आपल्याच प्रयत्नांमुळे, आपल्याच अभिलाषांमुळे, भीतीमुळे व सुखदुःखांमुळे आणि आशाआकाक्षांमुळे ही अवस्था आकारास आणीत नसते का ? म्हणून या अवस्थेत परिवर्तन घडवून आणण्याचे त्याचे प्रयत्न हेही पूर्वीच्याच दिशेने होणारे प्रयत्न असणार, नाही का ? क्षुद्र मन हे क्षुद्र न राहण्याचा कितीही प्रयत्न करीत असले, तरी असा प्रयत्न करीत असतानाही ते क्षुद्रच असत नाही का ? म्हणून आपल्यापुढे जो प्रश्न आहे तो हा की, कुणीतरी विशिष्ट होण्यासाठी मनाचा जो प्रयत्न चालू असतो, तो प्रयत्न प्रथम संपूर्णपणे थांबला पाहिजे.

" अर्थातच. पण याचा अर्थ म्हणजे मनाची अवस्था ही अकरणात्मक किंवा शून्यवत होऊन जाणे असा नाही ना ? "

हे पाहा, शब्दांचा पूर्ण आशय ध्यानात न घेता, त्या शब्दांनी सूचित केलेल्या गोष्टींचा प्रयोग करून न पाहता किंवा त्यांचा अनुभव घेऊन न पाहता, शब्द नुसते ऐकत राहिले, तर अशा उथळ श्रवणातून जे निष्कर्ष काढले जातात, ते कधीही यथार्थ नसतात.

" तेव्हा सर्जनशीलता प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करता उपयोगी नाही, असे आपले म्हणणे दिसते. तसेच, सर्जनशीलता ही शिकून येत नसते, विशिष्ट आचरण केल्याने मिळत नसते, किंवा विशिष्ट कृतीमुळे अथवा जबरदस्ती केल्याने ती प्राप्त होत नसते, असेही आपले म्हणणे दिसते. आता मला या सत्याचे दर्शन होत आहे. आता आपल्या परवानगीने यासंबंधी उघड चिंतन करण्याची माझी इच्छा आहे. स्वतःच्या सामान्यतेची आजवर माझ्या मनाला लाज वाटत होती. पण आता मात्र सामान्यतेचा धिक्कार करण्याचा अर्थ काय आहे, याचे मला आकलन होऊ लागले आहे. आपल्या सामान्यतेत परिवर्तन घडून यावे या अभिलाषेमुळेच धिक्कार करण्याची प्रवृत्ती माझ्यामध्ये उसळली आहे. परिवर्तन घडून येण्याची अभिलाषा ही माझ्या क्षुद्रत्वातूनच उद्भवली आहे. तेव्हा या सर्वांचा सरळ अर्थ हा आहे की, माझ्या मनाची अवस्था ही पूर्ववतच आहे, तिच्यात कसलेही परिवर्तन घडून आलेले नाही.—येथपर्यंत सगळे माझ्या आकलनात आले आहे. "

कुणीतरी विशिष्ट होण्यासाठी स्वतःमध्ये बदल घडवून आणण्याचा प्रयत्न मन जेव्हा करीत नसते, तेव्हा त्या मनाची अवस्था कशी असते, सांगा बरे ?

" जे जसे आहे, त्याचा ती स्वीकार करीत असते. "

पण स्वीकार करीत असते, असे म्हटल्याने, स्वीकार करणारा कुणीतरी अजून शिल्लक उरलेलाच असतो, होय की नाही ? आणि या स्वीकाराचे स्वरूप काय असते ? तर अधिक मिळविण्यासाठी किंवा अधिक काही अनुभविण्यासाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नाचाच एक प्रकार, असेच या स्वीकाराचे स्वरूप नसते का बरे ? त्यामुळे स्वीकाराच्या या अवस्थेत, दोन टोकांमधील संघर्षच चालू राहत नसतो का ? आणि या रीतीने पुन्हा पूर्वीचीच समस्या चालू राहत नसते का ? मनाची व हृदयाची आत्मसंतुष्ट सामान्यता ही आतील संघर्षामुळेच पोसली जात नसते का ? म्हणून साऱ्या संघर्षांचा अंत झाल्यामुळे जी अवस्था निर्माण होते, तीच केवळ सामान्यतेपासून पूर्ण विमुक्त अशी अवस्था असते. आपल्या सामान्यतेचा आपण जर मुकाटयाने स्वीकार करू लागलो, तर तो केवळ अगतिक स्वीकार होतो. स्वीकार या शब्दाचा अर्थ तुम्ही काही वेगळा करता का ?

" स्वीकार या शब्दाचा खरा अर्थ काय याचे आपण मला दर्शन करून दिले

आहे. त्यामुळे स्वीकार करण्याने काय ध्वनित होते, याची मला आता जाणीव झाली आहे. पण स्वीकार वा धिक्कार न करणारी अशी अवस्था असते तरी कशी ?"

पण तुम्ही हे का वरे विचारीत आहांत ? अशी अवस्था ही साक्षात अनुभविण्याची अवस्था असते, नुसती समजावून सांगण्याची वस्तू नसते.

" आपण हे समजावून सांगावे अशी काही माझी अपेक्षा नाही. तसेच यासंबंधी काही विकल्पन करीत बसण्याचीही मला इच्छा नाही. पण व्यापारशून्य अशा निःस्तब्ध अवस्थेत राहणे आणि या निःस्तब्धतेची जाणीवही नसणे हे मनाला शक्य आहे का, एवढे मात्र अजूनही विचारावेसे वाटते."

अशी जाणीव राहणे म्हणजे पुन्हा द्वद्वांच्या संघर्षात सापडणेच होय, नाही का वरे ?

प्रवृत्तिशील आणि निवृत्तिशील शिकवण

डोंगरावरून पायथ्याच्या गावाकडे जाणारा रस्ता बराच खडबडीत होता आणि धुळीनेही भरला होता. डोंगराच्या पायथ्याजवळच्या भागात आता फारच थोडी झाडे शिल्लक उरली होती. बहुतेक सगळी सर्पणासाठी तोडून नेली गेली होती. त्या मुळे दाट छायेसाठी डोंगरावर वरेच उंच चढून जावे लागत होते. तेवढचा उंची-वरची झाडे मात्र अजून माणसांनी तोडलेली नव्हती. ती खुरटलेली देखील दिसत नव्हती. त्या सगळ्या वृक्षांची वाढ पूर्ण झालेली होती आणि घनदाट पर्णशाखांनी ते सारे संपन्न होते. डोंगराच्या इतर भागामध्ये मात्र आपल्या शेळचामेंढर्यांना खाऊ घालण्यासाठी मेंढपाळ झाडांच्या खालच्या फाद्यांची पाने तोडीत आणि या रीतीने फांद्या उजाड होऊन गेल्या की मग ते त्या सर्पणासाठी तोडून नेत. त्यामुळे डोंगराच्या खालच्या भागात आता तोडण्यासाठी फारशी झाडे उरलीच नव्हती. पण यामुळे माणसे आता हळूहळू वरची झाडे तोडू लागली होती आणि डोंगर उजाड करून टाकीत होती. आताशा पूर्वीसारखा पाऊसही पडत नव्हता. आणि लोकसंख्या मात्र सारखी वाढत चालली होती. त्यामुळे केवळ जिवंत राहण्यासाठी लोकांना डोंगर उजाड करून टाकावे लागत होते. उपासमार तर सगळीकडे थोडयाबहुत प्रमाणात चालूच होती. आणि जीवनाविषयी वा मृत्यूविषयी माणसे सारखीच उदासीन बनून गेली होती.

डोंगराच्या या भागात जंगली श्वापदे आढळत नव्हती. कदाचित ती आणखी उंच जागी निघून गेली असावी. झाडाझुडपांमध्ये पक्ष्यांची काहीशी हालचाल ऐकू येत होती. पण तेही गळून गेलेले दिसत होते. काहींचे पंखही तुटून गेले होते. एका झाडाच्या निष्पर्ण फांदीवरून उडता उडता एक चास पक्षी कर्कश आवाज करीत होता.

आता हवेतील उष्णता वाढू लागली होती. दुपारपर्यंत तर ती शिगेला पोहचणार होती. या भागात अनेक वर्षे पुरेसा पाऊस न पडल्याने जमीन कोरडी होऊन तिला ठिकठिकाणी रुंद भेगा पडल्या होत्या. पायथ्याजवळच्या उरल्या सुरल्या झाडां-वर धुळीचा पिंगटसर थर साचला होता. पहाटे पडणारे दव कुठेही दिसेनासे झाले होते. दिवसांमागून दिवस व महिन्यांमागून महिने सूर्यनारायण आपल्या चंड किरणांनी जमीन भाजून काढीत होता. पावसाळ्याला तर अजून खूप अवकाश होता. आणि हा पावसाळा ही फार दिवस टिकणारा नव्हता.

एक मुलगा डोंगरावर मेंढचा चरायला घेऊन जात होता. या भागात आपल्या शिवाय दुसरे कुणी असल्याचे पाहून तो चकित झालेला दिसत होता. पण त्याच्या

चेहऱ्यावर स्मित मात्र आढळले नाही. गंभीर चेहरा करून तो मेंढ्या हांकीत निघून गेला. ते स्थान आता पूर्णपणे निर्जन होऊन गेले होते. आगामी उष्णतेची सूचक निःस्तब्धता आता तेथे नांदत होती.

डोंगराच्या पायवाटेने दोन स्त्रिया डोक्यावर मोळ्या घेऊन येत होत्या. एक वयस्कर, तर एक अतिशय तरुण होती. दोघींचीही ओझी बरीच जड असलेली दिसत होती. वाळल्या फांद्यांची व काटक्यांची एक लांबसर मोळी एका वेलीने बांधून डोक्यावरच्या चुंबळीवर पेलीत त्या चालल्या होत्या. एका हाताच्या आधारानेच प्रत्येकीने आपली मोळी सावरून धरली होती. उतरणीवरून हे ओझे वाहून नेत असता त्यांच्या शरीराच्या हालचाली सहज व मुक्त अशा होताना दिसत होत्या. त्यांच्या त्या दुडक्या चालीत एक प्रकारची सहज चपलता होती. पायवाट ओबड-धोबड होती. तरी त्या अनवाणीच जात होत्या. डोकी अगदी सरळ व ताठ ठेवून खाली न पाहता त्या चालल्या होत्या. त्यांच्या पावलांना आपला रस्ता जणू काही स्पष्ट दिसत होता. उन्हाने त्यांचे डोळे तळावलेले दिसत होते. दृष्टी कुठेतरी दूरदूर होती. दोघीही कृश असून त्यांच्या बरगड्या दिसत होत्या. त्या वृद्ध स्त्रीच्या केसांच्या जटा वळल्या होत्या; त्या तरुण मुलीने मात्र केव्हा तरी तेल लावून वेणी-फणी केलेली असावी कारण तिच्या केसाच्या काही वटा चमकत होत्या. ती अति-शय दमलेली होती हे स्पष्ट दिसून येत होते. बरोबरीच्या मुलांबरोबर खेळल्या-बागडल्याला तिला फार वर्षे झाली नसावी. पण आता मात्र खेळण्याबागडण्याचा काळ संपून गेला होता. आता दररोज डोंगरावर जाऊन दिवसभर सर्पण गोळा करणे हेच काय ते तिचे जीवन बनून गेले होते. आणि देह पडेतोयर्यंत हाच कष्टप्रद दिनक्रम चालू राहणार होता. मूलबाळ होण्याच्या वेळी जी काय थोडीशी विश्रांती मिळेल तेवढीच काय ती तिच्या वाटचाला येणार होती.

आम्ही तिघेही त्या पायवाटेने खाली उतरलो. पायथ्यापासून गाव काही मैल दूर होते. वायका आपला भारा चार दोन पैशांना विकणार होत्या. आणि उद्या पुन्हा त्यांचा हाच कष्टदायक दिनक्रम चालू होणार होता. मधून मधून त्या दोघी आपसात गप्पा करीत व मधूनच बराच वेळ गप्प राहून मुकाट्याने चालू लागत. एकाएकी आपल्याला अतिशय भूक लागल्याचे त्या तरुणीने आपल्या आईला सांगितले. त्यावरोबर, 'आपण भुकेतच जन्मतो, भुकेतच जगतो व भुकेतच मरतो; हेच आपल्या नशिबी आहे,' असे उत्तर आईने तिला दिले. तिचे उत्तर हे केवळ वस्तुस्थितिनिदर्शक असे विधान होते. तिच्या आवाजात कसलाही आरोप नव्हता, कुणावरही राग नव्हता व कशाचीही आशा नव्हती.

त्या खडकाळ, खडबडीत पायवाटेवरून आम्ही तिघेही उतरत होतो. आता त्या दोघींचे बोलणे ऐकणारा व त्यांची दया करणारा असा द्रष्टा त्यांच्यामागे उरलेला

नव्हता. दयेमुळे व स्नेहामुळे तो त्यांचा एक अंशही बनून गेलेला नव्हता. तर आता त्या स्त्रिया म्हणजेच तो द्रष्टा होता. तो नष्ट होऊन गेला होता व त्या दोन स्त्रियाच तेथे उरल्या होत्या. आता त्या डोंगरावर भेटलेल्या अपरिचित स्त्रिया राहिलेल्या नव्हत्या. त्या स्त्रिया म्हणजे तोच होता. आता त्या जड मोळचा पेलणारे हात त्यांचेच हात होते आणि त्यांचा थकवा, त्यांचा वास, त्यांची उपासमार ही त्यांच्या बरोबर सोसण्याची गोष्ट राहिलेली नव्हती; ती दुःख करण्याचीही गोष्ट नव्हती. आता तोच त्या साऱ्या गोष्टी बनला होता. आता दिक व काल दोन्हीही थांबून गेले होते. आता डोक्यात कसलाही विचार उरला नव्हता. कारण थकव्यामुळे विचार बंद होऊन गेला होता. आता डोक्यात कसला विचार असेल, तर आपली मोळी विकण्याचा, ओलासुका तुकडा खाण्याचा, रकटावर अंग टाकण्याचा व उद्या पुन्हा हाच जीवनक्रम सुरू करण्याचा विचार तेवढा उरला होता. आता त्या खडकाळ वाटेवरही पायांना काही वोचत-खुपत नव्हते. आता माथ्यावरचा प्रखर सूर्यही जाळीत नव्हता. आता त्या परिचित उतारावरून उतरणाऱ्या, पलीकडच्या विहिरीपाशी थांबून पाणी पिणाऱ्या आणि मग एका आटून गेलेल्या ओढचाच्या वाळवंटातून जाणाऱ्या आम्ही दोघीच उरलो होतो !

भेटण्यास आलेला गृहस्थ सांगत होता, "मी आपली काही प्रवचने वाचली आहेत.व काही ऐकलीही आहेत. पण मला तर आपले सारे सांगणे हे निवृत्तिशील व अकरणात्मक असेच असलेले दिसते. त्यात कसलेही मार्गदर्शन नाही, कुठल्याही विधायक जीवनरीतीचा निर्देश नाही. आपला हा पौर्वात्य दृष्टिकोन अतिशय विध्वंसक असाच आहे. त्याने आपल्या सगळ्या पौर्वात्य देशांची काय दुरावस्था करून टाकली आहे पाहा ! आपला हा निवृत्तिशील दृष्टिकोन, विशेषतः सर्व विचारांपासून मुक्त होण्यासंबंधीचा आपला हा आग्रह आम्हा पाश्चात्यांना अतिशय चुकीचा वाटतो. कारण आम्ही प्रवृत्तिशील व उद्योगशील आहोत आणि तसे असणे आम्हांला आवश्यकही आहे. आणि आपली सर्व शिकवण ही तर आमच्या एकूण जीवनरीतीला पूर्ण विरोधी अशीच आहे."

हे पाहा की, लोकांचे पौर्वात्य व पाश्चात्य असे वर्गीकरण हे त्यांच्या केवळ भौगोलिक वसतीवरच आधारलेले आहे; त्याला वास्तवाचा आधार नाही. अशा वर्गीकरणामागे कुठलेही मूलभूत तत्त्व नाही. वस्तुस्थिती अशी आहे की, एका काल्पनिक भौगोलिक रेषेच्या पूर्वेला वा पश्चिमेला आपण असलो काय किंवा वर्णाने आपण काळे, गोरे, पिवळे वा पिंगट असलो काय, अखेर आपण सर्व मानवच आहोत. आणि आपण सर्वच सुखदुःख भोगणारे, आशा वा भीती बाळगणारे आणि कशावर तरी निष्ठा ठेवणारे असेच आहोत; होय की नाही ! सुखदुःखे ही जशी पूर्वेकडे आहेत तशीच ती पश्चिमेकडेही आहेत. विचार हा पौर्वात्यही नाही व पाश्चात्यही

नाही. पण मनुष्य मात्र आपल्या विशिष्ट संस्कारांनुसार विचारांचे पौरात्य व पाश्चात्य असे भाग पाडीत असतो. प्रीती ही काही भौगोलिक क्षेत्रावर अवलंबून नसते. एका विभागात ती पवित्र मानली जाते व दुसरीकडे मानली जात नाही, असे मुळीच नसते. माणसांमध्ये हे जे भेद कल्पिले जातात, ते एक तर आर्थिक कारणांसाठी पाडले जातात किंवा माणसांची पिळवणूक करण्यासाठी तरी कल्पिले जातात. मात्र याचा अर्थ हा नव्हे की, माणसामाणसांत प्रवृत्तींचे व इतर प्रकारचे भेद नसतात. मानवामध्ये एक प्रकारचा सारखेपणाही आहे आणि तरीही त्यांच्यामध्ये भेददेखील आहे. हे सारे अगदी उघड व स्पष्ट आणि मानसिक दृष्टचा वस्तुनिष्ट असेच आहे, होय की नाही ?

" आपल्याला हे सर्व उघड व स्पष्ट वाटत असेल. पण पौर्वात्यांपेक्षा आमची जीवनरीत, आमची संस्कृती ही निश्चितपणे भिन्न अशी आहे. पुरातन ग्रीक काळापासून आमच्याकडे विज्ञानाचा जो विकास हळूहळू होत गेला, त्याने आता फारच मोठी मजल मारली आहे. पौर्वात्यांचा व पाश्चात्यांचा विकास आजवर अगदी भिन्न रीतींनी होत आलेला आहे. "

पण भेदाची ही जाणीव कायम ठेवूनही, उभयतांमध्ये जो मानवनिष्ठ असा सारखेपणा आहे, त्याचे अवधान सुटता उपयोगी नाही. पाश्चात्यांचे व पौर्वात्यांचे जीवनाविष्कार हे वेगवेगळे असतीलही. पण या बाह्य आविष्कारांमागील प्रेरणा, प्रवृत्ती, दडपणे व अभिलाषा आणि भीती ही तर उभयतांना समान अशीच असतात. म्हणून शाब्दिक भेदांनी आपण आपली फसवणूक करून घेता कामा नये. पूर्वेकडे काय किंवा पश्चिमेकडे काय, माणसांना सुखसमृद्धी हवी असते आणि शांतीही हवी असते. तसेच भौतिक सुखांपलीकडे असणारे असेही काही त्यांना शोधून काढावयाला हवे असते. दोन्हीकडील बाह्य संस्कृती वा सुधारणा ही हवामान, अन्न व एकूण बाह्य परिस्थिती इत्यादिकांनुसार वेगवेगळी असेल. पण आंतरिक संस्कृती ही मुळात सर्व जगामध्ये समान अशीच असते. दयाशील असणे, जे वाईट ते टाळणे, उदार असणे, मत्सर न बाळगणे, क्षमाशील असणे — अशा प्रकारचे या मूलभूत आंतरिक संस्कृतीचे स्वरूप सगळीकडेच असते. आंतरिक संस्कृतीचा हा मूलभूत गाभा नसेल तर पूर्वेकडील वा पश्चिमेकडील कुठल्याही संस्कृतीला क्षय तरी लागेल किंवा ती नष्ट तरी होऊन जाईल. तथाकथित मागासलेल्या देशातील लोक आज ना उद्या भौतिक शास्त्रांचे ज्ञान आत्मसात करू शकतील. पश्चिमेचे यंत्रतंत्रविज्ञानही ते लवकरच हस्तगत करू शकतील; तेही पाश्चात्यांप्रमाणे युद्धपिसासू बनतील, त्यांच्यातही युद्धविशारद सेनानी, वकील, पोलीस, हुकूमशहा, इत्यादी सर्व प्रकारचे लोक तयार होतील. माणसांची अमानुष क्रूरतेने हत्या करणारे कत्तलखानेही त्यांच्यांत उत्पन्न होतील. पौर्वात्य व पाश्चात्य या उभयतांमध्ये या सर्व गोष्टी समान होऊ शक-

तील. पण आंतरीक मूलभूत संस्कृती ही अगदी भिन्न अशी वस्तू आहे व तशीच ती राहीलही. ईश्वराविषयीचे व सत्याविषयीचे प्रेम आणि मानवी मनाची विमुक्तता या गोष्टी काही सहजपणे येत नसतात. पण त्यांच्यावाचून भौतिक सुखसमृद्धीला सार्थकता कधीही लाभत नसते.

" आपण हे जे सांगितले ते यथार्थच आहे. पण आपली शिकवण ही निवृत्तिशील स्वरूपाची आहे, असे जे मी मघाशी म्हटले, त्याच्याविषयी आपण अधिक विस्ताराने सांगावे अशी माझी इच्छा आहे. कारण आपल्या शिकवणीचे आकलन करून घेण्याची माझी मनापासून इच्छा आहे. म्हणून माझे ते विधान उद्धटपणाचे आहे असे आपण कृपा करून समजू नये. "

हे पाहा, निवृत्तिशील म्हणजे काय व प्रवृत्तिशील म्हणजे काय, हें आपण प्रथम पाहू या. आपणांपैकी बहुतेकांना दुसऱ्याच्या हुकुमानुसार चालण्याचीच सवय असते. कुणी तरी मार्गदर्शन करीत राहावयाचे आणि इतरांनी त्याप्रमाणे कार्य करीत राहावयाचे ही शिकवण प्रवृत्तिशील अशी मानली जाते. दुसऱ्यांच्या सांगण्यानुसार कार्य करणे हेच प्रवृत्तिशील वा विधायक कार्य होय असे समजले जात असते आणि दुसऱ्यांची आज्ञा पाळण्याचेच संस्कार ज्यांच्यावर झालेले असतात त्यांना 'अनुसरण करणे ही अनिष्ट गोष्ट आहे' हे सत्य निवृत्तिशील व विध्वंसक आहे असेच वाटत राहते. वस्तुतः असत्यापासून पराङ्मुख होणे म्हणजे सत्य होय; असत्याचा विरोध म्हणजे काही सत्य नव्हे. सत्य हे प्रवृत्तिशीलता व निवृत्तिशीलता यांच्यापासून सर्वस्वी भिन्न असे असते. म्हणून जे मन नेहमी परस्परविरुद्धांच्या भाषेतच विचार करीत असते त्याला सत्याचे दर्शन होणे कधीही शक्य नसते.

" आपण काय सांगता हे माझ्या नीटसे ध्यानात येत नाही. तेव्हा आपण कृपा करून या गोष्टीची अधिक फोड करून सांगाल का ? "

प्रथम हे लक्षात घ्या की, आपणा सर्वांना दुसऱ्याच्या अधिकाराची व मार्गदर्शनाची सवय होऊन गेलेली असते. दुसऱ्याकडून मार्गदर्शन मिळावे ही अभिलाषा तरी आपल्या मनात का बरे उसळत असते ? तर आपल्याला सुरक्षितता हवी असते, स्थिरता हवी असते म्हणून. तसेच आपल्याला यश व सफलता मिळविण्याची लालसा असते, म्हणून ही अभिलाषा उसळत असते. आणि ती अतिशय उत्कृष्ट असते, होय की नाही ?

" असे आहे खरे. पण संरक्षणावाचून व स्थिरतेवाचून माणसाला—"

आता या विषयात आपण खोलवर शिरून सत्य काय आहे ते समजून घेऊ या. एकदम निर्णयाप्रत पोचता कामा नये. सुरक्षितता प्राप्त करून घेण्याच्या या उत्कृष्ट प्रवृत्तीमुळे, या लालसेमुळे — मग ही लालसा व्यक्तीची असो, गटाची असो, राष्ट्राची असो की वर्णांची, जातींची असो — आपण आज केवढे भयानक ज

निर्माण केले आहे ! आजच्या जगात कुठल्याही विशिष्ट समाजासमोर, अंतर्गत संघर्षाला तोंड देणे व बाहेरच्या युद्धाला तोंड देणे हाच मुख्य सवाल आ वासून उभा नाही का ?

"मला याची पूर्ण जाणीव आहे. खुद्द माझाच मुलगा समुद्रापार चाललेल्या युद्धात मारला गेला."

शांती ही मनाची अवस्था असते. सुरक्षित राहण्याच्या सर्व प्रकारच्या अभिलाषांपासून विमुक्त अशी ही अवस्था असते. जे मन व जे हृदय सुरक्षितता मिळविण्यासाठी सदैव धडपडत राहते, ते नेहमी भीतिग्रस्त असते. बरे, आपण जी सुरक्षितता मिळवू पाहतो, ती केवळ भौतिक सुरक्षितता मुळीच नसते; तर तिच्यापेक्षा अधिक प्रमाणात ती आंतरिक वा मानसिक सुरक्षितता असते आणि अशी मानसिक सुरक्षितता सद्गुणांच्या द्वारा, निष्ठांच्या द्वारा किंवा राष्ट्राच्या द्वारा प्राप्त करून घेण्याच्या प्रयत्नांत आपण स्वतःभोवती सदैव तटबंदी उभारीत असतो, परस्परांशी झगडणारे गट व विचारप्रणाल्या निर्माण करीत असतो. सुरक्षितता मिळविण्याची किंवा विशिष्ट साध्य गाठण्याची ही जी अभिलाषा माणसात सदैव उसळत असते तिच्याच परिपूर्तीसाठी त्याला दुसऱ्याकडून मार्गदर्शन हवे असते आणि अशा मार्गदर्शनाला मान्यता द्यावीशी वाटते, दुसऱ्यांच्या आदर्शानुसार वर्तन करावेसे वाटत असते. याच अभिलाषेतून यशाची पूजा करण्याची वृत्ती बळावते; नेते, उद्धारकर्ते किंवा गुरू या सर्वांच्या अधिकाराला मान्यता दिली जाते. आणि याच सर्व प्रकारांना प्रवृत्तिशील वा विधायक शिकवण असे नाव दिले जाते.

"हे सारे मला कळते. पण स्वतःचेच मार्गदर्शन करावयाचे असले, किंवा इतरांकडून मार्गदर्शन मिळवावयाचे असले, तरी एकतर स्वतःला सत्ताधिकार दिला पाहिजे किंवा दुसऱ्याला सत्ताधिकार देऊन त्याला उद्धारकर्ता मानले पाहिजे. यावाचून दुसरे काही कसे शक्य होईल ?"

आता आपण काय समजून घेण्याचा प्रयत्न करीत आहोत बरे ? दुसऱ्याने मार्गदर्शन करावे ही जी माणसाची अभिलाषा असते, तिचे स्वरूप समजून घेण्याचाच आपण प्रयत्न करीत आहोत. ही अभिलाषा कशातून निर्माण होते ? भीतीमधूनच ती उत्पन्न होत नसते का ? माणसाला आपल्या सभोवतालची जी असुरक्षितता आढळून येते, जी क्षणभंगुरता जाणवत राहते, तिच्यामुळेच माणसाला काहीतरी सुरक्षित व शाश्वत असे प्राप्त करून घेण्याची अभिलाषा होत असते; वस्तुतः ही अभिलाषा भीतीमुळेच उसळत असते. पण ही भीती कशाची आहे हे समजून घेण्याचा प्रयत्न करण्याऐवजी आपण तिच्यापासून दूरदूर पळत राहतो. हे दूरदूर पळणे हे देखील भीतीच असते. या भीतीपासून दूर पळण्यासाठी मग मनुष्य कुठल्यातरी परिचित गोष्टीचा आसरा घेत राहतो. या परिचित गोष्टी म्हणजेच विविध प्रकारच्या

निष्ठा, भिन्नभिन्न पूजाअर्चादी विधिसंस्कार, धर्मगुरूंची सुखद प्रकारची आप्तवाक्ये, पुरोहितांची मोहक आश्वासने, राष्ट्राभिमान इत्यादि. यांच्यामुळेच माणसामाणसांत संघर्षाच्या ठिणग्या उडतात आणि अशा रीतीने ही संघर्षशृंखला पिढीमागून पिढीमध्ये अव्याहत चालू राहते. ही संघर्षसमस्या जर खरोखर सोडवावयाची असेल तर तिच्या अंतरंगात शिरून तिचे आकलन करून घेतले पाहिजे. जी शिकवण तथाकथित प्रवृत्तिशील वा विधायक अशी समजली जाते, वेगवेगळ्या धर्मांकडून जी श्रद्धाप्रणाली मनावर बिंबविण्यात येते व साम्यवादी नेत्यांकडून जी विचारप्रणाली ठसविण्यात येते, त्यांच्यामुळेच माणसाची भीतीची भावना सतत पोसली जात असते व कायम राखली जात असते. म्हणून ही तथाकथित प्रवृत्तिशील शिकवण अखेर विध्वंसक व विनाशकारीच ठरते.

" आपण या प्रश्नाचे दर्शन कशा रीतीने करवून देत आहात, हे आता माझ्या ध्यानात येऊ लागले आहे. मला घडत असलेले हे दर्शन यथार्थ आहे अशी माझी भावना आहे. "

हे लक्षात घ्या की, या प्रश्नाकडे पाहण्याचा हा दृष्टिकोन हा व्यक्तीचा नव्हे किंवा विशिष्ट मताला जखडलेला असाही मुळीच नव्हे. कारण सत्यदर्शन करण्याचा दृष्टिकोन हा कधीही व्यक्तिगत असत नाही. विज्ञानाचे शोध हे ज्याप्रमाणे कुणाचेही व्यक्तिगत दृष्टिकोन असू शकत नाहीत, त्याचप्रमाणे सत्यदर्शनाचेही आहे. सत्याप्रत पोचण्याचे मार्ग हे भिन्नभिन्न असतात, किंवा सत्याचे भिन्नभिन्न पैलू असतात, ही समजूत पूर्णतः अवास्तव व कल्पनानिष्ठ अशीच असते आणि अशी समजूत का करून घेतली जात असते ? तर इतरांच्या विचारप्रणालीविषयी मनातून असहिष्णू असणारी माणसे जेव्हा सहिष्णू बनण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा सत्यासंबंधीची ते अशी विकल्पनात्मक समजूत करून घेत असतात.

" कोणताही शब्द वापरताना माणसाने केवढे सावध असले पाहिजे, हे आता माझ्या ध्यानात आले आहे आणि तरीही याच्या अगोदर जो मुद्दा मी उपस्थित केला होता त्याच्याबद्दल अधिक निवेदन करण्याची माझी अजूनही इच्छा आहे. आजवर आम्हांपैकी बहुतेकांना विचारशील होण्याचीच शिकवण देण्यात आली आहे. आपल्या शब्दात सांगावयाचे तर 'कशाचा' विचार करावा हे आम्हांला शिकविण्यात आले आहे. अशी वस्तुस्थिती असल्यामुळे सगळा विचार हा पूर्वसंस्कारबद्ध असाच आहे, आणि माणसाने विचाराच्या पलीकडे गेले पाहिजे, असे जेव्हा आपण वेगवेगळ्या तऱ्हांनी सांगत राहता, तेव्हा आपल्या या सांगण्यामुळे आमच्यासारख्यांच्या मनात अविकच गोंधळ उत्पन्न होणार नाही का ? "

आपणापैकी बहुतेकांना विचार हा विलक्षण महत्त्वाचा वाटत असतो, होय की नाही ? पण तो खरोखरच महत्त्वाचा असतो का ? विचाराला विशिष्ट प्रकारचे

मर्यादित महत्त्व आहे, ही गोष्ट खरी आहे. पण जे विचारनिर्मित नाही, त्याचा शोध मात्र विचाराला कधीच लावता येणे शक्य नाही. जे जे ज्ञात आहे, त्याचाच परिपाक म्हणजे विचार. म्हणून जे अज्ञात आहे, जे अज्ञेय आहे, त्याचा तळ गाठता येणे हे विचाराला अशक्य आहे.

आता विचार म्हणजे काय हे पाहू या. विचार म्हणजे वस्तुतः भौतिक गरजांविषयीची अभिलाषा; तसेच अत्युच्च आध्यात्मिक साध्य प्राप्त करून घेण्याची अभिलाषा. हेच विचाराचे स्वरूप नाही का बरे ? बाकी आता आपण विचाराविषयी जे बोलत आहोत, ते प्रयोगशाळेत काम करणाऱ्या वैज्ञानिकाच्या विचाराविषयी काही बोलत नाही किंवा गणितात मग्न असलेल्या गणितज्ञाच्या विचाराविषयी बोलत नाही; तर आपल्या दैनंदिन जीवनात मानवामानवांमधील परस्परसंबंधात आणि जीवनाच्या आव्हानांना प्रतिक्षणी दिल्या जाणाऱ्या उत्तरांत विचार ज्या रीतीने कार्य करीत असतो, त्याबद्दल बोलत आहोत. नुसते साधे जगण्यासाठीही विचार करणे आवश्यक असते. व्यक्तीच्या काय किंवा राष्ट्राच्या काय, जिवंत राहण्याच्या धडपडीची प्रक्रिया म्हणजे विचार. विचार म्हणजे अभिलाषा. मग हा विचार इच्छापूर्तीकडे झेप घेणारा असो, निकृष्ट स्वरूपाचा असो की अत्युच्च स्वरूपाचा असो. विचार हा स्वतःवर सदैव संस्कारांची पुटे चढवीत असतो आणि आपणच विणलेल्या कोषात स्वतःला बद्ध करून घेत असतो. आपण अखिल विश्वाचा विचार करीत असलो काय किंवा आपल्या स्वतःचा, आपल्या शेजारचा किंवा ईश्वराचा विचार करीत असलो काय, आपला समग्र विचार हा सीमित व संस्कारबद्ध असाच असतो, होय की नाही ?

"आपण विचार हा शब्द ज्या अर्थाने वापरीत आहात, त्या अर्थाने पाहता विचाराचे स्वरूप आपण सांगता तसेच आहेसे दिसते. पण विचाराची ही पूर्वसंस्कारबद्धता नाहीशी करून टाकण्यास ज्ञानाचा काहीही उपयोग नाही का होऊ शकणार ? "

होईल का बरे उपयोग ? आजवर आपण जीवनाच्या विविध अंगांविषयीच्या ज्ञानाचा खूप मोठा संग्रह केलेला आहे. आपण वैद्यकाविषयी, युद्धाविषयी, कायद्याविषयी व विज्ञानाविषयी पुष्कळसे शास्त्रीय ज्ञान गोळा केलेले आहे. तसेच आपल्या स्वतःच्या मनासंबंधीचेही खूप ज्ञान एकत्रित केलेले आहे. पण ज्ञानाचा एवढा प्रचंड संग्रह केल्यानंतरही आज मनुष्य दुःखापासून, द्वेषापासून व युद्धापासून मुक्त झाला आहे का ? मग आणखी जास्त ज्ञान मिळविण्याने आपण अधिक मुक्त का होणार आहोत ? व्यक्ती, समूह किंवा राष्ट्र हे जोवर सत्ता हस्तगत करण्यामागे लागत राहतील, महत्त्वाकांक्षा पुरी करण्यासाठी धडपडत राहतील, तोवर त्याचे युद्धात पर्यवसान होणे हे अटळच आहे. सर्व प्रकारचे ज्ञानभांडार उपलब्ध अस-

तरीही, युद्धामध्ये अटळपणे परिणत होणाऱ्या या साऱ्या गोष्टी तो करीतच राहत नाही का ? द्वेष व वैरभाव सतत वाढवीत राहणारे हे जे केंद्र आहे, हा जो अहं आहे, त्याच्यामध्ये ज्ञानामुळे मूलभूत परिवर्तन कधी तरी होऊ शकेल का ? हे लक्षात घ्या की प्रीती ही काही द्वेषाच्या विरुद्ध असणारी वस्तू नव्हे. ज्ञानामुळे द्वेषाचे जर प्रीतीत रूपांतर घडून आले, तर ती खरी प्रीती असणारच नाही. विचाराने किंवा इच्छाशक्तीच्या जोराने हा जो बदल घडवून आणला जात असतो ती प्रीती नसते, तर ती केवळ स्वरक्षणाच्या सोयीची एक वस्तू असते.

"आपण काय सांगता ते माझ्या डोक्यात शिरते असे मुळीच वाटत नाही."

विचाराचे स्वरूप पुन्हा नीटपणे ध्यानात घ्या. जे होऊन गेलेले किंवा गत आहे, त्याच्या आधाराने जीवनाच्या समस्यांना दिले गेलेले उत्तर किंवा स्मृतीच्या आधाराने दिले गेलेले उत्तर म्हणजेच विचार; असेच खरोखर विचाराचे स्वरूप नाही का ? बरे, स्मृती म्हणजे काय, तर परंपरा व गतानुभव. प्रत्येक नव्या अनुभवाबद्दलची स्मृतीची जी प्रतिक्रिया असते, ती गतानुभवातूनच नेहमी उद्भवलेली असते. अशा रीतीने प्रत्येक नवा अनुभव हा गतानुभवालाच पुष्ट करीत राहतो. आपले मन हा गतानुभवाचा वा कालाचा परिपाक असतो. विचार हा गतकालात जमा झालेल्या अनेक युगांचा परिपाक असतो. म्हणून विचार हा जेव्हा अमुक एक व्हावयाचे किंवा अमुक एक व्हावयाचे नाही असा प्रयत्न करून स्वतःमध्ये बदल घडवून आणण्याचा उद्योग करीत असतो, तेव्हा तो आपले सातत्य एका वेगळ्या नामरूपाखाली चालू ठेवण्याचेच कार्य करीत असतो. विचार हा नेहमी ज्ञानाचाच परिपाक असल्यामुळे अज्ञानाचा अनुभव येणे हे त्याच्या बाबतीत सर्वस्वी अशक्य आहे. तो कालाचा परिपाक असल्यामुळे त्याला त्या कालातीताचे, त्या अनाद्यनंताचे आकलन होणे कधीही शक्य नाही. सत्य प्रकट होण्यासाठी विचार हा पूर्णपणे नष्ट होऊन गेलाच पाहिजे.

"आम्हाला जे प्राप्त झाले आहेसे वाटते, ते नाहीसे होऊन जाण्याची एवढी काही भीती आम्हाला वाटत असते की, त्यामुळे या गोष्टीच्या खोलात आम्ही कधीच जात नसतो. आम्ही आमच्या जीवनाचा पृष्ठभाग तेवढा पाहतो आणि निरर्थक शब्दांचा व वाक्यांचा सतत उच्चार तेवढा करीत राहतो. म्हणून आमची मनेही क्षुद्रच राहतात आणि आम्ही जसे अविचाराने मुलांना जन्माला घालतो त्याचप्रमाणे द्वेषभावनांचा विस्तार करीत राहतो.

"आमची ही वरवरची विचारशीलता, हा वस्तुतः अविचारीपणाचाच आविष्कार आहे, असे जे आपण म्हणता ते अगदी खरे आहे. मी पुन्हा आपल्या भेटीला येऊ ना ?"

साध्य

रस्त्यावर माणसांची वरीच गर्दी दिसत होती. दोहो बाजूंची दुकाने नाना वस्तूंनी भरगच्च भरलेली होती. या विभागात वस्ती जरी श्रीमंतांची होती, तरी रस्त्यांवर मात्र सर्व प्रकारचे लोक आढळून येत होते. तेथे जसे श्रीमंत दिसत होते तसे गरीबही होते. मजूर जसे होते, तसेच ऑफिसातून काम करणारे पांढरपेशेही होते. एवढेच काय पण जगातील नाना देशांचे लोक तेथे वावरत होते. काहीजण आपापल्या देशाच्या विशिष्ट पोषाखात होते. पण बहुतेक जणांचा पोषाख पाश्चात्यच होता. रस्त्यावरून अनेक मोटारींची ये-जा चालली होती. काही नव्या कोऱ्या होत्या तर काही जुन्याही होत्या. वसंतऋतूतील त्या प्रसन्न प्रभातकाली मौल्यवान मोटारींचे रंग विशेषच चमकत होते. लोकांच्या चेहऱ्यावर प्रसन्नतेचे तेज व प्रफुल्लतेचे हास्य दिसून येत होते. दुकाना-दुकानांतून गिऱ्हाइकांची रीघ लागलेली होती. पण त्या निळ्याभोर मोहक आकाशाकडे दृष्टिक्षेप करण्याचे भान मात्र कुणालाही असलेले दिसत नव्हते. कारण दुकानांच्या खिडक्यांतून दिसणाऱ्या नानाविध वस्तूंनी त्यांचे लक्ष आकर्षित केले गेले होते. दुकानांच्या खिडक्यांतून नाना प्रकारची वस्त्रे व पोषाख, नवनव्या लखाखणाऱ्या मोटारी आणि तऱ्हतऱ्हेच्या खाद्य वस्तू लक्ष वेधून घेत होत्या. तिकडे रस्त्यावर कबूतरे चोहीकडे वावरत होती. लोकांच्या पावलांमधून व असंख्य मोटरींमधील चिचोळचा जागेतून ती सारखी हिंडत होती. एका पुस्तकाच्या दुकानात हजारो लेखकांची अद्ययावत पुस्तके मांडून ठेवलेली होती. लोकांना कसलीही चिंता उरल्यासारखे दिसत नव्हते. कारण युद्ध चालू असले, तरी ते दूरदूर कुठेतरी, पृथ्वीवरील अगदी लांबच्या विभागात लढले जात होते. धनधान्याची व उद्योगव्यवसायांची येथील लोकांना मुळीच वाण नव्हती. धन फार मोठ्या प्रमाणावर मिळविले जात होते व तसेच खर्च केले जात होते. उंचउंच इमारतींमधील ते रस्ते दोन उंच डोंगरांमध्ये असणाऱ्या खोल दरीसारखे दिसत होते. या रस्त्यांवर झाडे मात्र कुठेही आढळून येत नव्हती. सारा वेळ सगळीकडे गर्दीचा कोलाहल कानी पडत होता. या लोकांजवळ सारे काही होते पण खरेखुरे असे काहीच नव्हते आणि म्हणूनच त्यांच्यामध्ये एक प्रकारची चमत्कारिक अस्वस्थता आढळून येत होती.

त्या शानदार दुकानांच्या मध्यभागी एक भव्य ख्रिश्चन देवालय उभे होते. या प्रचंड देवालयात आपला विशिष्ट पायघोळ झगा घातलेला धर्मगुरू मानवजातीसाठी दुःख भोगणाऱ्या येशू ख्रिस्तावर प्रवचन देत होता. आतील सारे लोक गुडघे टेकून प्रार्थना करीत होते. ख्रिस्ताच्या मूर्तीपुढे मेणबत्त्या तेवत होत्या व धूपपात्रात

धूप जळत होता. धर्मगुरू धर्मवाक्यांचे उच्चारण करीत होता आणि देवालयातील सर्व लोक त्या मंत्रांचा पुनरुच्चार करीत होते. अखेर प्रार्थना संपली. लोक उठून बाहेर पडले आणि सूर्यप्रकाशात उजळलेल्या रस्त्यांवरून नानाविध वस्तूंनी नटलेल्या दुकानात शिरले. आता देवालयात निःस्तब्धता नांदत होती. आपापल्या विचारांत मग्न झालेले थोडेसेच लोक तेथे उरले होते. मानवी मनाला शांत, निःशब्द बनविणारे सारे काही तेथे होते. मनोहर चित्रांनी नटलेली ती भव्य गवाक्षे, सुशोभनाचे ते विविध आविष्कार, ते व्यासपीठ, देवमूर्तीचा तो गाभारा, त्या मंदपणे तेवणाऱ्या मेणवत्त्या, सारे सारे काही तेथे होते. पण ईश्वर हा देवळात का सापडत असतो ? की स्वतःच्या हृदयातच तो गवसत असतो ? आपल्या मनाला सुखसांत्वन लाभावे वा सुरक्षिततेचे आश्वासन मिळावे ही जी माणसाची तीव्र लालसा असते, तिच्यामुळेच त्याच्या मनात नाना प्रकारचे भ्रम पोसले जात असतात. याच लालसेतून चर्च, मशिदी व मंदिरेही निर्माण होत असतात. आपण या सर्व प्रकारांमध्ये किंवा सर्व सत्ताधारी राज्याच्या स्वप्नरंजनात इतके काही मग्न होऊन जातो की, सत्य वस्तूचे भान आपल्याला उरतच नाही. जे अगदी विनमहत्त्वाचे तेच आपल्या जीवनाला सर्वंकषपणे व्यापून वसत असते.

सत्य हे मनाला कधीच गवसणे शक्य नसते. विचाराला त्याचा पाठलाग करता येणे मुळीच शक्य नसते. त्याच्याप्रत पोचणारा असा कोणताही विशिष्ट मार्ग नसतो. उत्कट प्रार्थनेने, साग्रसंगीत पूजेने किंवा थोर त्यागाने सत्य कधीही विकत घेता येत नसते. माणसाला जर सुखसांत्वन व आश्वासन हेच हवे असेल, तर ते या ना त्या रीतीने त्याला प्राप्त करून घेता येईल. पण या सुख-प्राप्तीबरोबरच अधिक दुःख व अधिक यातना याही उत्पन्न होत राहतील. कारण सांत्वनाच्या व सुरक्षिततेच्या या अभिलाषेत भ्रमाभासांचे नानाविध विलोभनीय आविष्कार निर्माण करण्याचे सामर्थ्य वसत असते. म्हणून मन जेव्हा पूर्णपणे शांत, निःशब्द होते, तेव्हाच सत्य अवतरणे शक्य होते.

आम्ही बरेचजण एकत्र जमलो होतो. बी. विचारू लागला की, जीवनाची ही जटिल समस्या आकळून घ्यावयाची झाली तर कुणाचे तरी साह्य मिळविणे हे आवश्यक नाही का ? योग्य मार्ग दाखवू शकणाऱ्या साक्षात्कारी मार्गदर्शकाची गरज वाटणे हे रास्तच नाही का ?

" आज इतकी वर्षे या गोष्टीबाबत आपण पुरेसा खल केलेला नाही का ? " असा एस. ने यावर प्रश्न केला. " माझ्या पुरते बोलावयाचे झाले, तर मी काही गुरूच्या किंवा उपदेशकाच्या शोधात मुळीच नाही."

" पण तुम्हांला जर खरोखरच कुणाचेही साह्य नको असेल, तर तुम्ही इथे

आलात तरी का ? " बी. ने कटाक्षाने विचारले. " मार्गदर्शनाची सगळी अभिलाषा तुम्ही आता गुंडाळून का ठेवली आहे ? "

" छे छे. तसे काहीही मी केलेले नाही. उलट, मार्गदर्शन किंवा साह्य मिळविण्याची अभिलाषा का व कशी उत्पन्न होते, याचा शोध घेण्याची माझी आजही इच्छा आहे. पूर्वी जसा मी दुकानादुकानात वस्तू पाहत हिंडणाऱ्या माणसाप्रमाणे नाना प्रकारच्या पुरातन किंवा आधुनिक उपदेशकांमागे फिरत होतो, तसा आता मुळीच फिरत नाही. पण अजूनही मला साह्याची वा मार्गदर्शनाची गरज जाणवते. म्हणून अशी गरज का वाटत राहते, हे मला समजून घ्यावयाचे आहे. आणि कुणाच्याही साह्याची गरज उरणार नाही अशी वेळ कधीतरी येईल का हेही मला विचारावयाचे आहे. "

यावर एकाने म्हटले, " माझ्यापुरते बोलावयाचे झाले, तर दुसऱ्याकडून साह्य मिळणे अशक्य आहे, असे जर मला वाटले असते, तर मी इथे आलोच नसतो. पूर्वी जेव्हा जेव्हा मी इथे आलो, तेव्हा मला नेहमीच असे साह्य मिळत गेले. म्हणून तर आता मी इथे आलो. कुणाचेही अनुसरण करण्याची अनिष्टता जरी आपण आमच्या लक्षात आणून दिली असली, तरी आपल्याकडून मला नेहमीच मार्गदर्शन व साह्य मिळत आले आहे. म्हणून शक्य होईल तेव्हा मी आपल्या प्रवचनांना व चर्चा-सभांना हजर राहणार आहे. "

प्रथम हे ध्यानात घ्या की, तुम्हांला साह्य मिळत गेले किंवा नाही, याचा पुरावा का आपण गोळा करीत आहात ? माणसाला कितीतरी रीतींनी इतरांकडून साह्य मिळत असते. डॉक्टरांकडून जसे साह्य मिळत असते, त्याचप्रमाणे एखाद्या बालकाच्या किंवा वाटसराच्या निष्पाप स्मितामुळेही साह्य प्राप्त होत असते. एखाद्या विशिष्ट नात्यामधून जसे ते मिळत राहते, त्याचप्रमाणे वाऱ्याने गळून पडणाऱ्या सुकल्या पानामधून, हवेत होत राहणाऱ्या सुखद परिवर्तनामधून किंवा एखाद्या गुरूकडूनही माणसाला साह्य मिळू शकते. तरल अवधान असणाऱ्या माणसाला तर कशामधूनही साह्य मिळत राहते. पण आपल्यापैकी बहुतेकांची मने, एखादा गुरू किंवा एखादा ग्रंथ वगळला, तर बाकी सर्व भोवतालच्या गोष्टींमधून ग्रहण करण्याबाबत अगदी बधिर बनून गेलेली असतात, झोपलेली असतात. आपणा सर्वांची समस्या नेमकी हीच असते. मी काही सांगत असलो की, तुम्ही ते लक्ष देऊन ऐकत राहता. पण कुणी जर तेच थोड्या वेगळ्या शब्दात सांगू लागले की तुमचे कान तेथे बधिर होऊन जातात, अशीच वस्तुस्थिती आहे की नाही, सांगा बरे ? जी व्यक्ती अधिकारी आहे असे तुम्हांला वाटते, तिचे तुम्ही लक्षपूर्वक ऐकता. पण इतर जेव्हा बोलतात, तेव्हा मात्र तुम्ही मुळीच अवधान देऊन ऐकत नाही.

" पण आपण जे सांगता, त्यात नेहमीच मोठा सखोल आशय भरलेला असतो

असे माझ्या अनुभवास आले आहे." एम. ने चटकन उत्तर दिले. "म्हणूनच तर मी आपले बोलणे लक्ष देऊन ऐकत असतो. याच्या उलट, इतर लोक जेव्हा बोलत असतात, तेव्हा ती निव्वळ यांत्रिक पुनरुक्ती असते किंवा जीवनाच्या प्रश्नाला दिले गेलेले ते निर्बुद्ध उत्तर असते. कदाचित मी स्वतःच निर्बुद्ध असेन. तेव्हा माझ्या सांगण्याचा मुद्दा हा आहे की, आपल्या बोलण्यामुळे मला स्वतःचे प्रश्न सोडविण्यास साह्य मिळते. मग मी ते ऐकणे का बरे सोडून द्यावे? हे करण्यात मी आपले केवळ अनुसरणच करीत आहे, असे जरी सर्वांचे निश्चित मत असले, तरीही मला जमेल तितक्या वेळा मी आपली प्रवचने ऐकण्यास नक्की येणार आहे."

पण अगोदर हे सांगा की, एखाद्या विशिष्ट दिशेने मिळणारे साह्यच घेण्यास आपण एवढे तत्पर का बरे असतो? आणि इतर कुठल्याही दिशेने मिळणाऱ्याकडे आपण पाठ का बरे फिरवीत असतो? समजा की एखाद्याने जाणता वा अजाणता तुमच्यावर प्रेम केले, तुमच्याविषयी करुणा बाळगली, तुमच्या समस्या आकळून घेण्यास त्याने तुम्हांला मदत केली, तरीही केवळ त्याच व्यक्तीकडून सदैव साह्य मिळेल आणि केवळ तीच व्यक्ती तुमचा उद्धार करू शकेल अशी तुम्ही आपली निश्चित धारणा का करू घेता? त्या व्यक्तीला विशेष अधिकारी व्यक्ती असे माहात्म्य तुम्ही का प्रदान करता? त्या व्यक्तीचा प्रत्येक शब्द तुम्ही अवधानपूर्वक ऐकत राहता. पण दुसऱ्याच्या शब्दांकडे मात्र तुम्ही पूर्ण दुर्लक्ष का करता? असे तुम्ही का करीत असता, हाच मुद्दा खरोखर महत्त्वाचा नाही का?

"म्हणजे इतरांचे साहय आम्ही घेऊ नये असे काही आपण सुचवीत नाही, तर ज्याच्याकडून आम्हाला साहय व मार्गदर्शन लाभते, त्याला एकट्यालाच तेवढा आम्ही मोठेपणा का देतो व केवळ त्याचाच अधिकार तेवढा का मानतो, असे आपण विचारीत आहात. असेच आहे ना आपले म्हणणे?" एल. ने प्रश्न केला.

एवढेच नाही, तर तुम्हांला मला हेही विचारावयाचे आहे की, कुणाचे तरी साहय तुम्हांला का हवेसे वाटते? माणूस जेव्हा साहयाची अपेक्षा करतो, तेव्हा या अपेक्षेमागे कोणती बरे प्रेरणा असते? माणूस जेव्हा पूर्ण जाणिवेने व विचाराने साहय मिळविण्यास धडपडतो, तेव्हा त्याला खरोखरच साहय हवे असते का? की तो सांत्वन मिळविण्याचाच एक प्रकार असतो? की ती त्याची केवळ एक पळवाटच असते?

"पण माणसाला तर नेहमी किती तरी प्रकारचे साहय लागत असते." वी. म्हणाला. "घरकामासाठी त्याला नोकर लागतो. आजाराच्या वेळी उत्तम डॉक्टर लागतो. मुलांसाठी शिक्षक हवा असतो आणि थोर वैज्ञानिकही हवा असतो. या सर्वांकडून कुठले ना कुठले साहय मिळतच राहते. कुठल्याही समाजात लोकांना

मदतीची गरज ही राहणारच आणि अशी सामान्य स्वरूपाचीच मदत नव्हे तर साक्षात्कारी गुरूकडून मिळणारे मार्गदर्शन व मदत हीही लागणारच. कारण अशा मार्गदर्शनामुळेच माणसाच्या जीवनात सुव्यवस्था व शांती नांदण्यास मदत मिळेल."

हे पाहा, आता आपण सर्वसामान्य स्वरूपाची चर्चा बाजूला ठेवू या. आणि मार्गदर्शन किंवा साह्य या शब्दांचा प्रत्येकाच्या दृष्टीने काय अर्थ आहे हे पाहू या. दुसऱ्याकडून असे साहय मिळणे म्हणजे आपल्या वैयक्तिक समस्या सोडविल्या जाणे व आपली दुःखे व यातना दूर होणे, असाच साहय या शब्दाचा तुमच्या दृष्टीने अर्थ नाही का? तुम्ही जर डॉक्टर असलात तर लोक तुमच्याकडे आपला रोग बरा करून घेण्यासाठी येतील. तुम्ही जर आध्यात्मिक गुरू असलात, तर जीवन सुखी होण्याचा मार्ग कोणता हे समजून घेण्यास लोक तुमच्याकडे येतील. उत्कृष्ट जीवनरीत कोणती हे आपण साक्षात्कारी पुरुषाकडून समजून घेऊ पाहतो आणि विद्वानांकडून आपण ज्ञान व माहिती मिळवू पाहतो. आपल्याला कसले तरी साध्य गाठावयाचे असते, कशात तरी यश मिळवावयाचे असते, सुख प्राप्त करून घ्यावयाचे असते. म्हणून आपली ही अभिलाषा पूर्ण करून घेण्यासाठी एखादी विशिष्ट जीवनरीत आपण शोधीत राहतो; मग आपली अभिलाषा ही लौकिक स्वरूपाची असो की, अलौकिक मानली जाणारी असो. अनेक साध्यांच्या मागे लागून दमल्यायकल्यानंतर, सत्य हेच सर्वश्रेष्ठ साध्य होय, अंतिम सुखशांतीचे तेच अधिष्ठान होय, असे माणसाला वाटू लागते. आणि मग तो ते प्राप्त करून घेण्याच्या मागे लागतो; आपली अभिलषित वस्तू शोधू लागतो. पण अभिलाषा ही माणसाला सत्याप्रत कधीतरी पोचवू शकेल का? कसल्याही अभिलाषेतून केवळ भ्रमच उत्पन्न होत नसतात का? मग ही अभिलाषा केवढ्याही उदात्त गोष्टीची का असेना. अभिलाषेचे हे कार्य एकदा सुरू झाले की भीती, अनुकरण, अधिकार यांच्यावर आधारलेली विशिष्ट जीवनरीतच ती उत्पन्न करीत नसते का? अभिलाषेच्या व्यापारांची ही अशीच मानसिक प्रक्रिया असत नाही का? मग याला साहय किंवा मार्गदर्शन म्हणता येईल का? की ती निव्वळ आत्मवंचनाच असते बरे?

"आपल्या या सांगण्याचा स्वतःच्या मनावर प्रभाव पडू न देण्यासाठी मला फार प्रयास करावे लागत आहेत. आपल्या सांगण्यातील कार्यकारणभाव मला समजतो; त्याची यथार्थताही पटते. पण आपण मला प्रत्यक्ष साहय केलेले आहे हेही मला स्पष्ट दिसते. मग ही प्रत्यक्ष वस्तुस्थितीदेखील मी नाकारावयाची की काय?" वी. एकदम उद्गारला.

तुम्हांला एखाद्याचे साहय जरी झाले असले, तरी तुम्ही जर त्या व्यक्तीचाच अधिकार मान्य करू लागलात, तर त्या व्यक्तीकडून नंतर मिळणाऱ्या साहयाला आणि भोवतालच्या सर्व गोष्टींकडून मिळत राहणाऱ्या साहयाला तुम्ही प्रतिबंधच

करीत राहाल, होय की नाही ? आपल्या सभोवतालच्या वस्तूवस्तूतून आपल्याला साहय मिळत नसते का वरे ? मग साहयासाठी एकाच व्यक्तीकडे तुम्ही आपली दृष्टी का वळवता ? तुम्ही या रीतीने स्वत:ला एकदा सीमित व बद्ध करून टाकलेत, की दुसऱ्या कुणाकडून किंवा कशाकडूनही तुम्हांला कधीतरी साहय होऊ शकेल का ? पण तुम्ही जर आपले मन विमुक्त व ग्रहणक्षम असे राहू दिलेत तर वस्तूवस्तूकडून तुम्हाला अखंडपणे अमाप साहय मिळत राहील. एखाद्या पक्ष्याच्या मधुर गीतापासून तो एखाद्या मनुष्याच्या दुरून येणाऱ्या हाकेपर्यंत; गवताच्या चिमुकल्या पात्यापासून तो आकाशाच्या अनंत विराटतेपर्यंत कशाचेही साहय तुम्हांला मिळत राहील. मनुष्य जेव्हा एकाच व्यक्तीला अधिकारी कल्पून किंवा मार्गदर्शक, उद्धारकर्ता मानून त्याचेच साहय अपेक्षीत राहतो, तेव्हाच त्याचे मन विकृत व भ्रष्ट होण्यास प्रारंभ होतो. अशीच वस्तुस्थिती आहे की नाही, सांगा वरे ?

" आपण काय सांगत आहात ते आता माझ्या आकलनात येत आहेसे वाटते. पण माझी एक अडचण आहे. आजवर अनेक वर्षे कुठल्या ना कुठल्या मार्गदर्शकाचा वा गुरुचा अनुयायी म्हणूनच मी जीवन जगत आलो आहे. त्यामुळे आपण जेव्हा अनुसरण करण्यामागचे सखोल हेतू आमच्या ध्यानात आणून देता, तेव्हा बौद्धिक स्तरावर आपले म्हणणे मला पटते. पण माझ्या मनाचा एक भाग मात्र याच्याविरुद्ध बंड करून उठतो. माझ्या मनाच्या या दोन विभागांमधील संघर्षाचा समन्वय मला कसा घडवून आणता येईल, की ज्याच्या योगाने यापुढे मी कुणाचेही अनुसरण करणे बंद होऊन जाईल ?"

हे ध्यानात घ्या की दोन परस्पर विरुद्ध अभिलाषांचा किंवा ऊर्मींचा कधीही समन्वय होत नसतो. आणि या दोघा परस्पर विरुद्धांच्या जोडीला तुम्ही जेव्हा समन्वयाच्या अभिलाषेचा तिसरा घटक आणून टाकता, तेव्हा तर तुम्ही आपली समस्या सोडवीत नसता, तर ती अधिकच जटिल, अधिक गुंतागुंतीची बनवून टाकीत असता. दुसऱ्याकडून साहय किंवा मार्गदर्शन अपेक्षिण्यामागील जी संपूर्ण प्रक्रिया असते, तिचे जेव्हा तुम्हांला दर्शन घडते, अधिकारी पुरुषाचा अनुयायी बनण्यामागील कारणपरंपरा जेव्हा तुमच्या ध्यानात येते, मग हा अधिकार दुसऱ्या व्यक्तीचा असो की, एखाद्या स्वयंस्वीकृत प्रबंधाचा असो, तेव्हा ते स्पष्ट दर्शनच सर्व प्रकारच्या अनुसरणाचा अंत घडवून आणते.

मनाची निःशब्दता

अंतराळ दूरपर्यंत घूसरित झाले होते. दूर अंतरावर किनाऱ्यावर शुभ्र वाळू पसरली होती व तिच्या पलीकडे प्रशांत शीतल सागर पसरला होता. पण येथे मात्र घरात काय किंवा वृक्षांच्या छायेत काय, असहच्य उकाडा जाणवत होता. आकाशाचा नीलीमा नाहीसा होऊन गेला होता. वातावरणातील वाष्पाचा बिंदूनबिंदू सूर्यनारायणाने शोपून घेतल्यासारखे वाटत होते. सागरावरून वाहत येणारा वारा आता थांबून गेला होता. जवळचे डोंगर सूर्याचि जळजळते चंडकिरण वेगाने परावर्तित करीत होते. एक कुत्रा उष्णतेने होरपळल्यासारखा धापा टाकीत होता. त्या असहच्य उष्णतेने त्याचे हृदय फुटून जाईल की काय असे वाटत होते. आठवडयांमागून आठवडे व महिन्यामागून महिने निरभ्र आकाशात सूर्य एकसारखा तळपत होता. वासंतिक मेघवर्षावाने डोंगर हिरवळीने नटल्याला पुष्कळ दिवस उलटून गेले होते. त्यामुळे ते आता शुष्क होऊन पिंगटसर दिसू लागले होते. जमीन कोरडी व टणक बनून गेली होती. पण याही अवस्थेत हे डोंगर सुंदर दिसत होते. समोरच्या सोनेरी गवताच्या व हिरव्यागार ओक वृक्षाच्या पलीकडे ते चमकत होते. पण त्यांच्या पलीकडे मात्र पर्वताचे उजाड उघडे खडक पसरले होते.

डोंगरावरून हचा उंच पर्वताकडे जाणारी वाट खडकाळ व खडबडीत होती. तिच्यावर धूळही खूप साचली होती. आसपास कुठेही निर्झर दृष्टीस पडत नव्हता किंवा वाहत्या पाण्याचा आवाजही कानी पडत नव्हता. उष्णतेची प्रखरता आता अतिशय वाढत चालली होती. पण त्या आटलेल्या नदीच्या काठाकाठाने लावलेल्या वृक्षांच्या छायेत मात्र उष्णता काहीशी सुसहच्य वाटत होती. कारण जवळच्या दरीतून वाहत येणाऱ्या वाऱ्याची झुळूक अंगाला लागत होती. या उंच स्थानाहून अनेक मैल दूर असलेला निळाभोर सागर दृष्टीस पडत होता. सारे आसमंत अतीव शांत निःशब्द होते, सारे पक्षीही निःस्तब्ध होते आणि आतापर्यंत कर्कश आवाज करणारा एक निळा पक्षी स्वस्थपणे विश्रांती घेत होता. पायवाटेवरून एक हरिण मोठ्या सावधपणाने खाली उतरत होते. त्या आटलेल्या नदीपात्रातील एका लहानशा ओढ्याचे पाणी पिण्यासाठी ते येत होते. खडकावरून शांतपणे जात असता त्याच्या विशाल कानांची सारखी हालचाल होत होती आणि त्याचे विशाल नेत्र आसपासच्या झाडांझुडपातील प्रत्येक हालचाल निरखीत होते. पोटभर पाणी प्यायल्यानंतर तेथील वृक्षांच्या छायेत ते कदाचित आराम करीत राहिले असते. पण त्याला प्रत्यक्ष कुणी दिसत नसले तरी माणसाचा वास आला असावा. कारण किंचित घुटमळून ते उतरणीच्या वाटेने चालू लागले व क्षणार्धात दृष्टीआड झाले.

डोंगरात एक जंगली कुत्रा वावरताना दिसत होता. पण त्याची हालचाल वारकाईने निरखणे कठिण होते. कारण त्याचा रंग त्या खडकांसारखा होता आणि कुणाला आपण दिसू नये अशा सावधगिरीने तो हिंडत होता. दृष्टी खिळवून त्याच्याकडे पाहत राहिले तरी तो मधून मधून नाहीसा होऊन जाई आणि मग त्याला शोधणे कठिण होऊन वसे. तो त्या ओढ्यापाशी पाणी प्यावयाला येईल असे वाटत होते. पण तो कुठेही दिसला नाही. काही दिवसांपूर्वी त्या डोंगरावर भयंकर वणवा पेटला होता. वरीचशी जंगली श्वापदे त्या वेळी तेथून निघून गली होती पण आता त्यांच्यापैकी काही काही परतली होती.

समोरच्या वाटेवरून एक तित्तिरी आपली दहावारा नवजात पिले वरोवर घेऊन चालली होती. पिलांना हळूहळू चालावयाला लावून एका दाट झुडपाकडे ती घेऊन जात होती. ती पिले म्हणजे पिवळसर भुरक्या नाजुक पंखाचे जणू चेंडूच होते. हे भयंकर जग या पिलांना अजून पूर्ण अपरिचित होते. पण त्यांच्यांत नवजीवन सळसळत होते व हे सळसळते जीवन त्यांना मोहवून टाकीत होते. ती पिले त्या झुडपापाशी पोचताच वरीचशी आपल्या आईच्या अंगावर चढून वसली. पण वाकीची सारी आपल्या आईच्या पंखाच्या उवेत विसावली. ती तित्तिरी प्रसूतिवेदनांनंतरची विश्रांती घेत वसली होती.

काय वरे आपल्याला एकत्र वांधून टाकीत असते ? आपल्या गरजा काही आपल्याला वांधून टाकीत नसतात. तसेच आपला व्यापार, आपले उद्योगधंदे-व्यवसाय किंवा आपल्या पेढ्या वा वँका अथवा आपली देवालयेही काही आपल्याला एकत्र आणीत नसतात. कारण या सर्व एक तर कल्पना असतात किंवा ते कल्पनांचे मूर्त परिणाम तरी असतात. पण कल्पना या काही आपल्याला एकत्र वांधीत नसतात. आपण परस्परांच्या सोयीसाठी वा गरजेसाठी एकत्र येत राहू किंवा समान संकटांमुळे, समान द्वेषामुळे किंवा समान पूजा-प्रार्थनाविधींमुळे एकत्र येत राहू खरे. पण वस्तुतः यांच्यापैकी कोणतीही गोष्ट आपणास एकत्र वांधण्यास कारणीभूत होत नसते. या साऱ्यासाऱ्या गोष्टी अगदी सहजपणे गळून पडल्या पाहिजेत. म्हणजे मग आपण पूर्ण एकाकी होऊन जाऊ. या एकाकीपणातच प्रीती वसत असते आणि प्रीती हीच आपणास एकत्र वांधून ठेवीत असते.

व्यग्र किंवा व्यापृत मन हे केव्हाही विमुक्त मन असू शकत नाही; मग ते उदात्त गोष्टींनी व्यापृत झालेले असो की क्षुद्र गोष्टींनी भरलेले असो.

भेटीला आलेला गृहस्थ खूप दूरच्या देशाहून आला होता. वातविकाराच्या जोराच्या झटक्यामुळे त्याचा पाय काहीसा दुर्बल वनून गेला होता. तरी आता तो चालू शकत होता व मोटरही हाकू शकत होता.

तो सांगू लागला, " इतर लोकांप्रमाणे--विशेषतः माझ्या अवस्थेत असणाऱ्या

लोकांप्रमाणे--मी वेगवेगळ्या ख्रिच्चन चर्चचा व धार्मिक संघटनेचा सदस्य राहून चुकलो आहे. पण यांच्यापैकी एकाकडूनही मला समाधान प्राप्त झाले नाही. पण मनुष्य कशाच्या तरी मागे सतत लागतच असतो; मीही तेच केले. स्वतःविषयी सांगावयाचे तर मी वृत्तीने गंभीर आहे अशी माझी समजूत आहे, पण माझी एक मोठी अडचण आहे. मी अतिशय मत्सरी स्वभावाचा मनुष्य आहे. पण मला वाटते की, बहुतेक लोक महत्त्वाकांक्षेने, लोभाने किंवा मत्सराने सदा ग्रस्त झालेलेच असतात. वस्तुतः हे सारे माणसाचे घोर शत्रूच आहेत. तरीही त्यांच्याविरहित असलेला मनुष्य सहसा आढळत नाही. स्वतःच्या मत्सरी वृत्तीचा प्रतिकार करण्यासाठी, ती दाबून दडपून टाकण्यासाठी मी किती तरी प्रकारचे तोडगे करीत आलो आहे. पण इतके प्रयत्न करूनही मी मत्सराच्या जाळ्यात वारंवार अडकलाच जातो. छपराच्या फटीतून पाणी झिरपत राहावे, त्याप्रमाणे प्रतिकाराच्या छपरातून माझा मत्सर सारखा झिरपत राहतो आणि काय घडत आहे याची जाणीव होण्यापूर्वीच माझी मत्सरी वृत्ती शतगुणित झालेली आहे असे मला आढळून येते. माझ्या या प्रश्नाचे उत्तर आपण पूर्वी अनेकांना अनेकदा दिलेले असेल, पण आपल्याला जर याचा कंटाळा आला नसेल, तर माझ्या मनात सदैव उसळत राहणाऱ्या या मत्सरापासून मला स्वतःची मुक्तता कशी करून घेता येईल, हा प्रश्न मला पुन्हा विचारावासा वाटतो. "

तुमच्या हे ध्यानात येऊन चुकलेच असेल की, मत्सर नसावा ही अभिलाषा उत्पन्न झाली की, दोघा परस्परविरुद्धांमधील संघर्ष सुरू होत असतो. 'असे' नसावे, तर 'तसे' असावे ही द्वंद्वात्मक अभिलाषा संघर्ष उत्पन्न करते. अशा प्रकारचा संघर्ष नेहमी चालू राहणे, हीच जीवनाची नैसर्गिक प्रक्रिया होय, अशी सामान्यतः लोकांची समजूत असते. पण ही समजूत खरी आहे का ? जे 'आहे' व जे 'असावे' असे वाटते, यांच्यामध्ये सदैव चालू राहणारा संघर्ष हा उदात्त स्वरूपाचा व आदर्श असा सामान्यतः मानला जातो. पण निर्मत्सर होण्याची अभिलाषा व त्यासाठी होणारा प्रयत्न या दोन्हीही गोष्टी मत्सरग्रस्ततेच्याच द्योतक असतात, अशीच वस्तुस्थिती नाही का ? या वस्तुस्थितीचे एकदा यथार्थ आकलन झाले की परस्परविरुद्धांमध्ये चालत राहणारे युद्ध हे शिल्लकच उरणार नाही, हा द्वंद्वांमधील संघर्ष संपुष्टात येईल. प्रथम हे ध्यानात घ्या की, घरी गेल्यावर सावकाशीने विचार करण्याची काही ही गोष्ट नाही, तर ती तात्काळ अवधानात घेण्याची वस्तू आहे. वस्तुस्थितीचे असे तात्काळ दर्शन होणे हेच महत्त्वाचे असते, मत्सरापासून मुक्त कसे व्हावे हे महत्त्वाचे नसते. मत्सर व मत्सरविरोधी अवस्था यांच्या संघर्षांतून मत्सरमुक्ती कधीही प्राप्त होत नसते, तर जो प्रत्यक्ष 'वस्तुस्थिती' आहे, तिचे यथार्थ आकलन करून घेण्यानेच मुक्ती प्राप्त होत असते. पण

जोपर्यंत जे ' प्रत्यक्ष आहे ' ते बदलण्याच्या खटाटोपात मनुष्य राहील, तोवर हे यथार्थ आकलन होणे शक्य नाही.

" पण प्रत्यक्षात अशा प्रकारचा बदल करणे हे आवश्यकच नसते का ? "

पण हे पाहा की, इच्छाशक्तीच्या साह्याने असा बदल कधी तरी घडवून आणता येईल का ? इच्छाशक्ती हे अभिलाषेचेच केंद्रीभूत स्वरूप नसते का ? या बाबतीत वस्तुस्थिती अशी असते की, प्रथम मत्सर यथास्थित जोपासल्यानंतर मगच अभिलाषा निर्मत्सर अवस्था उत्पन्न करण्यामागे लागते. पण वस्तुतः या दोन्हीही अवस्था अभिलाषेतूनच उत्पन्न झालेल्या असतात. आणि अभिलाषेला तर मूलभूत परिवर्तन कधीच घडवून आणता येत नसते.

" मग कशाने असे परिवर्तन घडवून आणता येईल ?"

जे ' वास्तव आहे ' त्याचे यथार्थ दर्शन झाल्यानेच हे परिवर्तन घडविले जाईल. जोवर ' या ' अवस्थेतून ' त्या ' अवस्थेत परिवर्तन घडवून आणण्यासाठी मन किंवा अभिलाषा यांची धडपड चालू राहील, तोवर होणारा बदल हा अगदी उथळ व क्षुल्लक असाच राहील. या सगळ्या स्पष्ट वस्तुस्थितीचा आशय संपूर्णपणे आकलनात आला पाहिजे व हृदयालाही तो पूर्णपणे जाणवला पाहिजे. तरच मूलभूत परिवर्तन घडून येणे शक्य होईल. जोपर्यंत मन कशाशी तरी तुलना करीत राहील, तोलतमापत राहील किंवा विशिष्ट परिणाम घडवून आणण्याची धडपड करीत राहील, तोपर्यंत जीवन या नावाने ओळखली जाणारी नाना घडपडींची ही अखंड श्रेणी चालूच राहील व मूलभूत परिवर्तन घडून येणे हे कधीही शक्य होणार नाही.

" आपण जे सांगता ते सत्य आहेसे वाटते खरे. पण आपले बोलणे ऐकत असताही, बदल घडविण्याच्या, विशिष्ट साध्य गाठण्याच्या आणि विवक्षित परिणाम घडवून आणण्याच्या घडपडीत माझे मन अडकून पडतच आहे, हेही मला जाणवते. "

हे ध्यानात ध्या की, एखाद्या सवयीला मनुष्य जितक्या जोराने विरोध करतो, तितक्या प्रमाणात तो त्या सवयीला बळ मिळवून देत असतो; मग या सवयीची पाळेमुळे मनात कितीही खोलवर गेलेली असोत. आपल्या सवयीचे केवळ अवधान कायम ठेवणे व बऱ्यावाईटाची कसलीही निवड न करता आणि त्या सवयीच्या जागी दुसऱ्या सवयीची प्रतिष्ठापना न करता हे अवधान कायम ठेवणे, म्हणजेच त्या सवयीचा अंत घडून येणे होय.

" मग कशाचाही स्वीकार न करता व कशाचाही धिःकार न करता, जे ' वास्तव आहे ' त्याच्यासह मी निःशब्दपणे जीवन जगत राहिले पाहिजे असे दिसते. हे काम अतिशय प्रचंड आहे खरे पण मुक्तता हवी असेल तर मला हाच मार्ग स्वीकारला पाहिजे, हे स्पष्ट आहे."

" बरे, आता मी दुसऱ्या प्रश्नाकडे वळू का ? शरीराचा मनावर व मनाचा शरीरावर परिणाम होत राहतो, हे म्हणणे यथार्थ आहे ना ? ही वस्तुस्थिती मी स्वतःच्या बाबतीत पूरेपूर अनुभवली आहे. मी पूर्वी कसा होतो, कसा चपळ, बळकट व घष्टपुष्ट होतो याच्या आठवणींनी माझे मन नेहमी व्यापलेले असते. त्याचप्रमाणे माझ्या सध्याच्या अवस्थेशी तुलना करून भविष्यात मी कसा होणार आहे या आशादायक विचारांनी माझे मन व्याप्त झालेले असते. म्हणूनच माझ्या सध्याच्या अवस्थेचा स्वीकार करणे मला अशक्य होत आहे. अशा परिस्थितीत मी काय करावे ? "

आजच्या अवस्थेची गतकालातील व भविष्यातील अवस्थेशी सतत तुलना करीत राहण्याने केवळ दुःखच उत्पन्न होत राहते. एवढेच नव्हे तर मनाचा ऱ्हासही होत जातो, होय की नाही ? अशा तुलनेमुळे तुमची जी वास्तव सद्यःस्थिती आहे ती अवधानात घेण्यास अडथळाच निर्माण होत राहतो. गतकाल हा कधीही परतून येत नसतो आणि भविष्याविषयी कोणताही अंदाज करता येत नसतो. तेव्हा केवळ वर्तमान हाच काय तो तुमच्यासमोर उभा आहे. पण त्याच्याकडे तुमचे अवधान केव्हा वरे जाईल ? तर तुमचे मन जेव्हा गतस्मृतींच्या ओझ्यापासून व भावी आशेच्या दडपणापासून विमुक्त होईल, तेव्हाच तुम्ही वर्तमानाकडे पुरेसे लक्ष देऊ शकाल. मन हे जेव्हा कशाचीही तुलना न करता वर्तमानाकडेच संपूर्ण अवधान देते, तेव्हाच काही गोष्टी घडून येणे शक्य होते.

" 'काही गोष्टी' या शब्दांनी आपल्याला काय सूचित करावयाचे आहे ? "

मन जेव्हा स्वतःच्याच दुःखांनी, भीतींनी व आशाअपेक्षांनी व्यापलेले असते, तेव्हा मुक्ततेला तेथे जागाच उरलेली नसते. स्वतःला अधिकाधिक मर्यादित व अवगुंठित करून टाकण्याची जी विचाराची नेहमीची प्रक्रिया असते, ती मनाला अधिकाधिक पंगू बनवून टाकीत असते. अशा प्रकारे हे दुष्ट वर्तुळ सदैव चालूच राहते. सतत व्यापृत राहिल्यामुळे मन हे उथळ व क्षुद्र बनून जाते. व्यापृत मन हे केव्हाही विमुक्त मन नसते. आणि विमुक्ततेच्या विचाराने व्यापलेले मन हेही सदैव क्षुद्रपणाच जोपाशीत राहते. मन हे ईश्वराच्या विचाराने व्यापलेले असो की, सद्गुणाच्या, स्वतःच्या शरीराच्या किंवा राज्यशासनाच्या विचारांनी व्यापलेले असो, ते या व्यापृत अवस्थेत नेहमी क्षुद्रच असते. मन हे जेव्हा स्वतःच्या शरीराच्या विचारांनी व्यापलेले असते, तेव्हा त्याची ही व्यापृततेच वर्तमानाशी जुळवून घेण्याआड येत असते. त्याचप्रमाणे शरीराची तरलता व सामर्थ्य यांच्या वाढीच्या आडही हीच व्यापृतता येत असते. स्वतःच्या अशा व्यापृततेमुळे मन हे स्वतःच्या वेदना व समस्या सदैव वाढवीत राहते. आणि शरीरावरही विपरीत परिणाम होत राहतो. शारीरीक व्याधींचा विचारही शरीराला अधिक दुर्बल व पंगू बनवितो. पण

प्रकृतीची हेळसांड करावी असा मात्र याचा अर्थ मुळीच नाही. सत्य व वेगवेगळ्या कल्पना यांच्या विचारांनी ज्याप्रमाणे मनाची क्षुद्रता अधिकाधिक वाढत जाते, त्याचप्रमाणे शरीरस्वास्थ्याच्या विचारांनीही ती वाढत जाते. पण एक गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे. विचारव्यापृत मन व कृतिशील मन यांच्यात महदंतर असते. कृतिशील मन हे शांत, निःशब्द मन असते ते आवडनिवडरहित व अवधानयुक्त असे मन असते.

"आपण जे सांगत आहात ते ग्रहण करणे हे माझ्या सवोध मनाला काहीसे अवघड वाटत आहे. पण कदाचित माझे अबोध मन हे सारे आत्मसात करीत असेल. निदान तशी आशा तरी मला वाटते.

"आता मला आपल्याला आणखी एक प्रश्न विचारावयाचा आहे. माझे मन कधीकधी काही क्षण अगदी निःशब्द बनते. पण असे क्षण अगदी विरळा असतात. ध्यानासंबंधी मी बराच विचार केलेला आहे. तसेच या प्रश्नासंबंधी आपण आपल्या प्रवचनात जे जे सांगितले आहे, ते बहुतेक सारे मी वाचले आहे. पण माझा शारीरिक पंगूपणा बरीच वर्षे ध्यान करण्याआड येत होता. आता मला या शारीरिक अवस्थेची सवय होऊन गेली आहे. त्यामुळे मन शांत, निःशब्द करण्याची सवय आता आपण वाढविली पाहिजे असे मला वाटू लागले आहे. पण यासाठी सुरुवात कुठून व कशी करावयाची ?"

हे पाहा, मनाची निःशब्दता ही मोठ्या प्रयत्नांनी वाढविता येईल अशी का वस्तू आहे ? तसेच, ती जतन करता येण्यासारखी किंवा संवर्धन करता येण्यासारखी अशी का वस्तू आहे ? आणि हा जतन करणारा, संवर्धन करणारा तरी कोण आहे ? तुमच्या समग्र जीवनापासून वेगळा असा का तो आहे ? जेव्हा मनातील एक अभिलाषा इतर सर्व अभिलाषांवर प्रभुत्व गाजवीत असते किंवा जेव्हा ती इतर सर्व अभिलाषांविरुद्ध प्रतिकार खडा करीत असते, तेव्हा मन शांत व निःशब्द राहू तरी शकते का ? मन जेव्हा अनुशासनात बद्ध करून टाकले जाते, किंवा त्याचे नियंत्रण केले जाते किंवा त्याला विशिष्ट वळण लावले जाते, तेव्हा ते शांत व निःशब्द असे कधी तरी असते का ? या सर्व गोष्टी करीत राहणे म्हणजे काय असते बरे ? येथे तथाकथित उच्च स्तरावरचा अहं अथवा गुणदोष निर्णायक असणारा अहं हाच अस्तित्वात नसतो का ? आणि हाच मनाचे नियंत्रण करीत आहे, निवड करीत आहे, गुणदोष निर्णय करीत आहे, असाच याचा अर्थ होत नाही का ? पण त्या अहंनामक वस्तूला खरोखरीचे अस्तित्व असते तरी का ? अशी वस्तू असल्यासारखे वाटले तरीही ती केवळ विकल्पनांची, विचारांची निर्मिती असत नाही का ? विचार हा अशा रीतीने स्वतःचेच विभाग करून उच्च व नीच, शाश्वत व अशाश्वत असे स्वरूप त्यांना प्रदान करीत असला, तरी वस्तुतः

विचार हा गतकालाचा, परंपरेचा व कालकल्पनेचाच परिपाक असतो. स्वतःचे असे विभाग पाडण्यातच त्याची सुरक्षितता साठली असते. सध्या तुमचा विचार किंवा तुमची अभिलाषा ही शांतीमध्येच आपली सुरक्षितता शोधू पाहत आहे. आणि तिचे हे जे शांतीचे वा निःशब्दतेचे नवे साध्य आहे, ते गाठण्यासाठी कोणती रीत किंवा कोणती व्यवस्था उपयोगी पडेल, असा प्रश्न उभा करीत आहे. आता लौकिक गोष्टींऐवजी तिला निःशब्दतेचे सुख हवेसे वाटू लागले आहे. त्यामुळे जे वर्तमान 'वास्तव आहे' व जे भविष्यात 'असावेसे वाटते' त्याच्यामध्ये ती संघर्ष उत्पन्न करीत आहे. पण जेथे जेथे संघर्ष, निरोध वा प्रतिकार असतो, तेथे तेथे शांती वा निःशब्दता कधीही नांदू शकत नसते.

"मग निःशब्दतेमागे लागणे मी सोडून द्यावे का ?"

हे ध्यानात घ्या की, मागे लागणारा जोवर कुणी शिल्लक असतो, तोवर निःशब्दता अवतरणेच शक्य नसते. जेव्हा हा मागे लागणारा अहं उरत नाही, जेव्हा अभिलाषा राहत नाही, तेव्हाच शांत मनाची निःशब्दता उदयास येते, म्हणून कोणतेही उत्तर देण्याच्या भानगडीत न पडता एक प्रश्न तुम्ही स्वतःला विचारा 'आपले समग्र जीवन हे शांत, निःशब्द होईल का ? आपल्या अबोध वा सबोध मनाचे संपूर्ण साकल्य हे शांत, निःशब्द, निःस्तब्ध होऊ शकेल का ?' एवढाच प्रश्न तुम्ही स्वतःला विचारा.

समाधान

आमचे विमान जवळजवळ वीस हजार फूट उंचीवर अटलांटिक महासागरावरून चालले होते. खाली पांढऱ्या शुभ्र मेघांचा दाट गालिचा पसरल्यासारखा दिसत होता. वर सुंदर, निळेभोर आकाश विलसत होते. आमचे विमान पश्चिमेकडे चालले होते आणि आमच्या मागच्या बाजूला पूर्वेकडे सूर्य प्रकाशत होता. विमानात बरीच गर्दी होती. काही वेळापूर्वी खुर्च्यांमधील मोकळ्या जागेत काही मुले धावत, पळत खेळत होती. पण आता मात्र दमून गेल्याने ती सर्व झोपी गेली होती. आणि रात्रभराच्या दीर्घ प्रवासानंतर आता सगळी मोठी माणसे जागी होऊन धूम्रपान करू लागली होती आणि काही मद्यपान करीत होती. समोर बसलेला एक मनुष्य शेजाऱ्याला आपल्या उद्योगधंद्याबाबत बरीच माहिती सांगत होता आणि मागच्या बाजूला बसलेली स्त्री, आपण काय काय वस्तू खरेदी केल्या हे आणि त्या वस्तूंवर आपल्याला किती कर द्यावा लागेल याबद्दलचा आपला अंदाज मोठ्या खुषीत येऊन सांगत होती. विमान खूप उंचीवरून चाललेले असल्यामुळे खालच्या भागात जोराचा वारा वाहत असताही विमानात एवढासाही धक्का जाणवत नव्हता. लख्ख सूर्यप्रकाशात विमानाचे पंख चमचमत होते. विमान विलक्षण वेगाने अंतराळ कापीत चालले होते तरीही आत यंत्राचा जरासाही आवाज ऐकू येत नव्हता.

पलीकडच्या बाजूला दोन गृहस्थ बऱ्याच मोठ्याने परस्परांशी बोलत होते. त्यामुळे त्यांचे बोलणे ऐकू न येणे हे अशक्य होऊन बसले होते. शरीराने ते दोघेही चांगले ऐसपैस होते. सतत उघड्यावर कामे करण्याने एकाचा चेहरा लालबुंद झालेला दिसत होता. व्हेल मासे मारण्याचा धंदा कशा तऱ्हेने केला जातो ते एकजण दुसऱ्याला व्यवस्थितपणे समजावून सांगत होता. या धंद्यात धोके केवढे असतात, त्यात नफा केवढा होतो, समुद्रावरील वादळे केवढी भयंकर असतात हे तो वर्णन करून सांगत होता. आणखीही बरीचशी माहिती तो देत होता. काही व्हेल माशांचे वजन शेकडो टन असते; लहान पिले असणाऱ्या व्हेल माशांना मारावयाचे नसते; तसेच विवक्षित काळात ठराविक संख्येपेक्षा अधिक व्हेल मारण्याची परवानगी नसते; व्हेल-माशांचा मारण्याचा उद्योग शास्त्रशुद्ध पायावर आधारलेला आहे. एकेका गटाकडे एक ठराविक कामच सोपविले असते व या कामाचे तंत्रशुद्ध शिक्षण त्यांना दिले जात असते ; ज्या जहाजावर हा उद्योग चालतो तेथील घाण असह्य असते ; पण सवयीने माणूस याही घाणीला रुळतो; सारे काही सुरळित चालले, तर या धंद्यात पैसा पुष्कळ मिळतो. एवढी माहिती सांगितल्यानंतर, हत्या करण्याचे आकर्षण हे किती विलक्षण असते, हे तो समजावून सांगू लागला. पण त्याच क्षणी

पेये समोर आणली गेली त्यामुळे नंतर त्याच्या संभाषणाचा विषय बदलला.

कुणालाही ठार मारणे, कुणाचीही हत्या करणे हे माणसांना आवडते. मग ते एकमेकांचा जीव घेवोत की, घनदाट अरण्यात हिंडणाऱ्या निष्पाप, विशालाक्ष हरिणाला ठार मारोत, की त्यांची गुरे पळवणाऱ्या वाघाची हत्या करोत. मोटरने जाताना रस्त्यावर जर साप आढळला तर त्याच्यावरून खुशाल गाडी नेऊन माणसे त्याला मारून टाकतात. लांडग्यासाठी तर मुद्दाम सापळे लावले जातात आणि त्यात लांडगे सापडले की त्यांना ठार करण्यात येते. चांगले चांगले पोशाख केलेले, हसत खेळत मजेत जाणारे लोक आपापल्या बंदुकी घेऊन परस्परांना साद घालणाऱ्या निष्पाप पाखरांचा सहज जीव घेताना दिसतात. एखादा लहान मुलगा आपल्या लहानशा बंदुकीने एखाद्या गाणाऱ्या सुंदर पक्ष्याला सहजपणे मारून टाकतो आणि त्याच्याजवळ असणारी वडीलधारी माणसे त्या मृत पक्ष्याबद्दल हळहळीचा शब्दही काढीत नाहीत किंवा त्या मुलाला रागेही भरत नाहीत. उलट, पोराचा नेम किती अचूक आहे असेच ते कौतुकाने उद्‌गारतात. कुणाचाही जीव घेणे, मग ते तथाकथित शिकारीच्या खेळासाठी असो, खाण्यासाठी असो, आपल्या राष्ट्राच्या रक्षणासाठी असो की शांतता प्रस्थापनेसाठी असो, हत्या करण्याच्या या सगळ्या प्रकारांत फारसा भेद नसतो. बाकी हत्येचे समर्थन करणे हे काही हत्येमुळे निर्माण होणाऱ्या प्रश्नाचे उत्तर खासच नव्हे. उत्तर एकच : कुणाचीही हत्या करू नका. वस्तुस्थिती मात्र अशी आहे की, पक्षी अथवा प्राणी यांना केवळ आपले भक्ष्य म्हणूनच अस्तित्व आहे ; किंवा ठार मारण्याचे सुख आपणास मिळवून देण्यासाठीच त्यांना अस्तित्व आहे, किंवा त्यांची उबदार फर आम्ही हस्तगत करावी एवढ्यासाठीच त्यांचा जन्म आहे, असे पाश्चात्य लोकांत मानले जाते. याच्या उलट. पौर्वात्य देशांत शतकानुशतके प्रत्येक मातापित्याकडून मुलांच्या मनावर हे बिंबवले जाते की, 'कुणाचीही हत्या करू नका. सर्व प्राण्यांवर दया करा. त्यांना प्रेमाने वागवा.' इकडे पाश्चात्यांमध्ये, प्राण्यांना आत्मा नाही या समजुतीमुळे त्यांची हत्या करण्यास कसलीही हरकत नाही असे मानले जाते; तर इकडे पौर्वात्यांमध्ये, प्राण्यांनाही आत्मा आहे असे मानले जाते. त्य मुळे त्यांच्याशी ममतेने वागले पाहिजे, अशीच शिकवण दिली जाते. इकडे पक्षी किंवा प्राणी खाणे हे अगदी नैसर्गिक असे मानले जाते. इकडील धर्माने व जाहिरातींनी या गोष्टीला पुरी मान्यता देऊन टाकली आहे. पण तिकडे अशी मान्यता कधीच मिळालेली नाही. त्यामुळे विचारी व धार्मिक वृत्तीचे लोक आपल्या परंपरेला व संस्कृतीला जागून कधीच कशाचीही हत्या करीत नाहीत. पण आता तिकडे पौर्वात्यांमध्येही हे संस्कृतीचे बांध झपाट्याने ढासळू लागले आहेत. इकडे पाश्चात्यांमध्ये, ईश्वराच्या व देशाच्या नावावर आजवर लोक हत्या करीत आले आहेत आणि आता हीच वृत्ती इकडे व तिकडे दोन्हीकडे पसरत चाललेली आहे, हत्या करण्याची

प्रवृत्ती वळावत चालली आहे. सगळ्या पुरातन संस्कृती या पाहतापाहता कोलमडून जाऊ लागल्या आहेत आणि सगळीकडे प्रखर कार्यक्षमता, निर्दयता आणि संहारास्त्रे यांचा परिपोष फार मोठ्या प्रमाणावर होऊ लागला आहे.

शांत अवस्था ही राजकारणी नेत्यांच्या द्वारा किंवा धर्मगुरूंच्या द्वारा अस्तित्वात येणारी अवस्था नव्हे. तसेच वकिलांच्या किंवा पोलिसांच्या माध्यमातूनही ती अस्तित्वात येत नसते. शांती म्हणजे मनाची प्रीतीमय, स्नेहमय अवस्था !

भेटण्यास आलेल्या गृहस्थाचा एक लहानसा उद्योगधंदा होता. तो चालवण्यासाठी त्याला सतत धडपड करावी लागत होती. पण खर्चाची तोंडमिळवणी करण्याइतके त्याला मिळत होते. तो सांगू लागला,

" मी आपल्या धंद्याबद्दल बोलण्यासाठी काही आपल्यापाशी आलो नाही. माझी गरज भागविण्याइतके या धंद्यातून मला मिळते. आणि माझ्या गरजा थोड्या असल्यामुळे माझे ठीक चालले आहे. माझी वृत्ती महत्त्वाकांक्षी नसल्यामुळे एकमेकांची लांडगेतोड करणाऱ्या स्पर्धेच्या क्षेत्रात मी कधीच शिरलो नाही. एक दिवस रस्त्याने जात असता एका झाडाखाली लोकांची गर्दी जमलेली मी पाहिली. लागलीच थांबून मी आपले प्रवचन ऐकू लागलो. ही घटना दोन वर्षांपूर्वीचीच आहे पण त्या दिवशी आपण जे सांगितले, त्याने माझ्या मनात नव्याने काहीतरी जाणवले. तसा मी काही फारसा शिकलासवरलेला नाही. पण तेव्हापासून मी आपली प्रवचने वाचू लागलो. आणि आज आपल्यापाशी येऊन पोचलो आहे. आपले प्रवचन ऐकण्यापूर्वीपर्यंत मी आपल्या जीवनात, विचारात, माझ्या काहीशा उथळ स्वरूपाच्या श्रद्धानिष्ठांत पूर्णपणे संतुष्ट होतो. पण मोटरीतून जाता जाता त्या रविवारी सकाळी योगायोगाने मी आपले प्रवचन ऐकले आणि तेव्हापासून माझ्या मनात असंतोष घुमसू लागला आहे. माझ्या कामाविषयी काही मला असंतोष नाही. पण एकूण असंतोषाने माझे समग्र जीवन व्यापून टाकले आहे हे खास. यापूर्वी असंतुष्ट असणाऱ्या लोकांबद्दल मला दया वाटत असे. कारण हे लोक अतिशय दुःखीकष्टी असतात. त्यांना कशातही संतोष वाटत नसतो. पण आता तर मीही या असंतुष्टांच्या मालिकेतला एक होऊन गेलो आहे. पूर्वी मला आपल्या जीवनाविषयी, आपल्या मित्रमंडळीविषयी व कामाविषयी पूर्ण संतोष असे. पण आता मात्र मी पूर्ण असंतुष्ट बनून गेलो आहे, दुःखी होऊन गेलो आहे. "

' असंतोष ' या शब्दाने तुम्हांला काय सूचित करावयाचे आहे ?

" त्या रविवारी मी आपले प्रवचन ऐकले, तोपर्यंत मी संतुष्ट वृत्तीचा मनुष्य होतो. पण इतरांना माझी संगती तेव्हा कंटाळवाणी वाटत असावी अशी माझी कल्पना आहे. पूर्वी मी किती निर्बुद्ध होतो, हे आता मला स्पष्ट दिसत आहे. यामुळे आता भोवतालच्या सर्व गोष्टींकडे लक्ष देण्याचा व सुबुद्ध बनण्याचा प्रयत्न

करीत आहे. आपण कुणीतरी विशेष व्हावे, कुठलेतरी साध्य गाठावे असे मला वाटू लागले आहे. आणि या प्रेरणेमुळे माझ्या मनात असंतोष निर्माण झाला आहे. आजवर मी झोपी गेलो होतो आणि आताच मी जागा होत आहे, असे मला वाटू लागले आहे."

पण वस्तुतः तुम्ही जागे होत आहात की, कुणीतरी विशेष बनण्याच्या या हव्यासामुळे पुन्हा स्वतःला झोपवून टाकीत आहात ? पूर्वी आपण झोपलो होतो व आता जागे झालो आहोत, असे तुम्ही सांगत आहात खरे. पण वस्तुस्थिती काय आहे बरे ? सध्याची जागृत अवस्था तुम्हांला असंतुष्ट बनवीत आहे; हा असंतोष तुम्हांला आवडत नाही; त्यामुळे तुम्हांला दुःख होत आहे; आणि या दुःखापासून दूरदूर पळण्यासाठी तुम्ही कुणीतरी विशेष बनण्याचा, किंवा एखादा आदर्श गाठण्याचा प्रयत्न करीत आहात. पण हे जे आदर्शाचे अनुकरण तुम्ही करू पाहत आहात, त्यामुळे तुम्ही पुन्हा स्वतःला झोपवून टाकणार आहात. हीच वस्तुस्थिती नाही का ?

"पण मला आता त्या पूर्वीच्या अवस्थेप्रत जाण्याची मुळीच इच्छा नाही. मला खरोखरच जागृत अवस्थेत राहावयाचे आहे."

माणसाला स्वतःचेच मन कसे फसवीत राहते, हे विलक्षण नाही का ? आपल्या मनाला अस्वस्थ किंवा विचलित व्हावेसे वाटत नाही. त्याच्या ज्या पूर्वीच्या विचार करण्याच्या वा कृती करण्याच्या सवयी असतात, त्याचा जीवनाचा जो जुना साचा असतो, त्याच्यातून बाहेर पडण्याची त्याची मुळीच इच्छा नसते. पण मन तर अस्वस्थ होऊन गेलेले असते. त्यामुळे या अस्वस्थतेपासून जीवन सुरक्षित ठेवण्यासाठी ते नवनवी क्षेत्रे शोधू लागते. जीवनाला जेथे सुरक्षितता प्राप्त होईल असेच क्षेत्र आपणापैकी बहुतेकजण शोधीत राहतात. ही जी सुरक्षिततेची अभिलाषा असते, तीच नेमकी आपल्याला झोपवून टाकीत असते. कधीकधी एखाद्या विशिष्ट प्रसंगाने, एखाद्या शब्दाने, केवळ एखाद्या हावभावानेही आपण अचानक जागे होतो, विचलित होऊन जातो पण लागलीच स्वतःला झोपवून टाकावे असे आपणास वाटू लागते. आपणापैकी बहुतेकांच्या बाबतीत हे असेच घडत राहते. अशी अवस्था ही केव्हाही जागृत अवस्था नसते. म्हणून आपले हे फसवे मन आपल्याला किती वेगवेगळ्या प्रकारांनी झोपवून टाकीत असते, याचेच आपण प्रथम आकलन करून घतले पाहिजे, होय की नाही ?

"पण आपल्याला झोपवून टाकण्याचे मनाचे मार्ग तर नानाविध असतील. तेव्हा या सर्वांचे आकलन करून घेणे व ते सर्व मार्ग टाळणे हे माणसाला शक्य आहे का ?"

हे पाहा, असे अनेकविध मार्ग दाखवून देता येतील. पण त्यामुळे आपली समस्या

काही सुटणार नाही. सुटेल का ?

" का बरे सुटू नये समस्या ?"

कारण मन हे स्वतःला किती प्रकारांनी झोपवून टाकीत असते याची नुसती माहिती करून घेत राहणे, म्हणजे दुसरेतिसरे काही नसून, स्वतःला विचलित न होऊ देण्यासाठी व सुरक्षित राखण्यासाठी वेगवेगळे साधन शोधीत राहणेच होय. वस्तुतः सतत जागृत राहणे हेच महत्त्वाचे असते. पण ' कसे ' जागृत राहता येईल हे विचारणे मात्र मुळीच महत्त्वाचे नसते. ' कसे 'च्या गे लागणे म्हणजे वस्तुतः सुरक्षिततेच्याच मागे लागणे होय.

" मग माणसाने करावे तरी काय ?"

आपला असंतोष शमविण्याची अभिलाषा न धरता असंतोषासह जीवन जगत राहा. विचलित न होण्याची मनाची जी अभिलाषा असते, तिचेच प्रथम आकलन करून घ्या. नानारूपे धारण करणारी ही जी अभिलाषा असते, ती वस्तुतः जे वर्तमान ' वास्तव आहे ' त्याच्यापासून दूर पळण्याची प्रवृत्तीच असते. जेव्हा ही प्रवृत्ती कोणत्याही प्रकारच्या सबोध वा अबोध दडपणाने नव्हे, तर सहजपणे आपोआप गळून पडते, तेव्हाच असंतोषाचे दुःख नाहीसे होते. जे ' वास्तव आहे ' व जे ' असावेसे वाटते ' त्यांची तुलना करीत राहिल्यानेच दुःख उत्पन्न होते. पण तुलना करण्याचे थांबणे म्हणजे काही संतोषाची अवस्था होणे नव्हे. संतोषाची अवस्था म्हणजे अहंचे व्यापार थांबल्याची, जागृततेची अवस्था होय.

" हे सारे काही मला अगदी नवीन असे आहे. आपण शब्दांना काही वेगळाच अर्थ देता असे मला वाटते. पण दोन माणसे जेव्हा एकाच वेळी, त्याच शब्दाचा तोच अर्थ करतात, तेव्हाच त्या उभयतांमध्ये संवाद होणे शक्य होते; तेव्हाच परस्परांना परस्परांचे समजू शकते. "

परस्परांशी संवाद होणे म्हणजे परस्परांमध्ये नाते निर्माण होणे होय; असेच आहे की नाही ?

" आपण शब्दांना एवढा विशाल अर्थ देता की, सध्यातरी आपले सांगणे माझ्या आकलनात येणे शक्य नाही. या सर्व गोष्टींमध्ये मला खोलखोल शिरले पाहिजे. मगच कदाचित मला त्यांचे आकलन होऊ शकेल असे वाटते. "

नट

डोंगरांमधून नागमोडी वळणे घेत घेत तो रस्ता मैलांमागून मैल कापीत चालला होता. डोंगराचा सोनेरी रंग तिसऱ्या प्रहरच्या प्रखर सूर्यकिरणांनी विशेषच झळकून उठत होता. मधूनमधून आढळणाऱ्या एकटयादुकटया वृक्षाखाली गडद छाया पडलेली दिसत होती. जणू ती त्यांच्या एकाकीपणाची साक्ष होती. आसपास अनेक कोस मनुष्यवस्तीचे नावनिशाणही नव्हते. क्वचित कुठे थोडीशी गुरे आढळत आणि एखादी दुसरी मोटर त्या गुळगुळीत रस्त्यावरून जाताना दिसे. उत्तरेकडचे आकाश सुंदर निळेभोर होते. पण पश्चिमेकडच्या आकाशाकडे पाहताच डोळे दिपत होते. तो सर्व प्रदेश उजाड, एकाकी आणि साऱ्या मानवी सुखदुःखांपासून दूरदूर होता. आसपास कुठेही पक्षी दिसत नव्हते व रस्त्यावरून चपलपणे धावणाऱ्या जंगली खारी सोडल्या, तर कोणतीही जंगली श्वापदे दृष्टीस पडत नव्हती. एकदोन डबकी वगळली, तर पाण्याचेही कुठे चिन्ह दिसून येत नव्हते. पण त्या एकदोन डबक्यांजवळ मात्र गुरे असलेली दिसत होती. वर्षाऋतूला प्रारंभ झाला की, हेच डोंगर नाजुक हिरवळीने नटतील आणि नेत्रांना आल्हाद देत राहतील. पण आज मात्र ते उजाड, उघडेवाघडे व तपःपूत असल्यासारखे दिसत होते आणि एका महान निःशब्दतेच्या सौंदर्याने नटले होते.

ती रमणीय सायंकाल विलक्षण उत्कटतेने जणू ओसंडत होती. डोंगरांमधून वळणे घेत घेत रस्ता जसजसा पुढेपुढे जाऊ लागला, तसतसा काळ स्तब्ध, शांत होऊन गेला. उत्तरेकडे जाणारा मुख्य रस्ता येथून अठरा मैलांवर असल्याचे रस्त्यावरील पाटी दाखवीत होती. तेथे पोचण्यास आणखी अर्धा तास लागणार होता. अर्ध्या तासाचा काल व अठरा मैलांचे अंतर तोडावयाचे होते. पण रस्त्यावरच्या त्या पाटीकडे पाहतापाहता एका क्षणात हे अंतर व हा काल ही दोन्हीही स्तब्ध होऊन गेली. तो क्षण मोजण्यामापण्याच्या पलीकडचा क्षण होता. त्याला आदीही नव्हता व अंतही नव्हता. वर निळेनिळे आकाश विस्तारले होते व झपाट्याने मागे जाणारे ते सोनेरी डोंगर विस्तारत चालले होते. अफाट अनंत, अवकाशात पसरत चालले होते. पण ते निळेनिळे अफाट आकाश व ते विस्तारत जाणारे सोनेरी डोंगर त्या कालातीताच्याच उदरात समाविष्ट झाले होते. डोळे व मन रस्त्याकडे जागरूकतेने पाहत होते. ते एकाकी, काळसर वृक्ष चैतन्याने रसरसलेले दिसत होते. डोंगराच्या वळणावळणावरील वाळल्या गवताचे पातेन् पाते स्पष्ट, स्वच्छ दिसत होते. त्या डोंगरांवर व त्या वृक्षांभोवती पसरलेला पश्चिमेकडे कललेल्या सूर्याचा प्रकाश शांतशांत व निःस्तब्ध होता. त्या प्रशांत निःस्तब्धतेमध्ये झपाट्याने जाणारी

आमची मोटर एवढी एकच वस्तू गतिमान होती. दोन शब्दांमधील स्तब्ध निःशब्दता ही त्या अमेय अनंताचीच निःशब्दता होती. हा रस्ता लवकरच संपून दुसऱ्या रस्त्याला मिळणार होता. तो दुसरा रस्ताही कुठेतरी जाऊन संपणार होता. हे शांत, काळसर वृक्ष पुढे केव्हा तरी मोडून जाणार होते आणि मातीत मिसळून जाऊन नष्ट होऊन जाणार होते. पहिल्या जलवर्षावावरोबर डोंगरावर नवी हिरवळ विलसणार होती आणि तीही नंतर वाळून नाहीशी होऊन जाणार होती.

जीवन व मरण हे वस्तुतः अभिन्न आहेत. त्यांच्यात भेद कल्पिल्यानेच कधीही न संपणारी भीती उत्पन्न होत असते. त्यांच्यांत भेद कल्पिल्यांनेच कालाचा आरंभ होत असतो. अंताची भीती हीच दुःखाचा आरंभ करीत असते. अशा जीवनमरणाच्या चक्रात मन अडकून पडत असते आणि म्हणूनच ते कालाचे जाळे विणीत राहते. विचार ही या कालाची प्रक्रिया असते आणि विचार हाच या कालाचा परिणामही असतो. विचाराने प्रीती कधीच निर्माण होत नसते.

भेटण्यास आलेला गृहस्थ एक नामांकित नट होता. आजही त्याचा नावलौकिक गाजत होता. पण जीवनाचा शोध घेण्याइतका व नवे दुःख सोसण्याइतका तारुण्याचा जोम त्याच्यामध्ये कायम होता.

तो विचारू लागला, " मनुष्य अभिनय का वरे करीत असतो ? मला वाटते की, उपजीविकेचे एक साधन म्हणूनच काहीजण रंगभूमीचा स्वीकार करतात. काही जणांना रंगभूमीमुळे आत्मप्रौढीच्या आविष्काराचे एक साधन प्राप्त होत असते आणि काही जणांना वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिका करण्यात एक प्रकारचे उत्तेजकतेचे सुख लाभत असते आणि काहींना प्रत्यक्ष जीवनाच्या वास्तवतेपासून दूर पळण्यासाठी एक आकर्षक पळवाटही रंगभूमीमुळे प्राप्त होत असते. माझ्या नाट्य-अभिनयामागेही ही सर्व कारणे आहेतच. पण याशिवाय आणखीही एक कारण आहे, असे मला वाटते. रंगभूमीच्या द्वारा थोडेवहुत लोककल्याण करण्याची माझी इच्छा आहे. अर्थात हे कारण मी काहीशा साशंकतेनेच मांडत आहे. "

हे लक्षात घ्या की, नट म्हणून अभिनय करीत राहण्याने आपण आपला अहं अधिकाधिक परिपुष्टच करीत नसतो का ? एकेक भूमिका वठवताना नट एकेक मुखवटा चढवीत असतो, तदनुसार आविर्भाव करीत असतो आणि हा मुखवटा, हा आविर्भाव हीच त्याची दैनंदिन जीवनरीत बनून जाते. आणि मग त्याच्यामध्ये लोभाच्या, द्वेषाच्या, विरोधाच्या ज्या वेगवेगळ्या प्रवृत्ती असतात त्या सर्वांना हा मुखवटा, हा आविर्भाव झाकून टाकीत राहतो. वस्तुतः कुठलाही आदर्श हा वस्तुस्थिती झाकून टाकणारा एक मुखवटा किंवा आविर्भाव असतो. मग असे असता रंगभूमीच्या द्वारा माणसाला लोककल्याण साधणे शक्य तरी होईल का ?

" म्हणजे हे शक्यच नाही, असे का आपले म्हणणे आहे ? "

छे, छे, तो केवळ प्रश्न होता, तो निर्णय नव्हता. आता हे पाहा की, नाटककार जेव्हा नाटक लिहिण्यास घेतो, तेव्हा त्याच्यापुढे काही विशिष्ट हेतू असतात. आणि नाटकाच्या माध्यमातून त्याला त्या कल्पना व ते हेतू व्यक्त करावयाचे असतात. नट हा या अभिव्यक्तीचे माध्यम असतो. आणि नाटक पाहणारे प्रेक्षक हे आपले मनोरंजन करून घेत असतात. किंवा थोडेबहुत शिकत असतात. पण या शिक्षणाने कुणाचे काही कल्याण होते का ? की नाटककार जीवनरीतीचा जो विशिष्ट साचा निर्माण करतो, त्याच्या प्रभावामुळे लोकांचे मन केवळ संस्कारबद्धच होत राहते ? मग नाटककाराचा साचा हा चांगला असो की वाईट असो; सुबुद्ध असो की निर्बुद्ध असो.

" अरे देवा ! आजवर मी यावद्दल असा काहीच विचार केला नव्हता. हे पाहा, मी अतिशय यशस्वी असा नट होऊ शकेन खरा. पण या व्यवसायात पूर्ण बुडून जाण्यःपूर्वी, रंगभूमी व अभिनय हीच का आपली जीवनरीत होऊन जाणार आहे, असा प्रश्न मला स्वतःलाच विचारावासा वाटत आहे. वस्तुतः रंगभूमीचे आकर्षण हे विलक्षण असते. कधीकधी ते अतिशय विनाशकारीही ठरते, तर कधीकधी अतिशय सुखद असेही वाटते. अभिनयाच्या व्यवसायाकडे काहीजण अत्यंत गंभीरपणे पाहत असतीलही. पण वस्तुतः या व्यवसायात खरे गांभीर्य असे मुळीच नाही. मी स्वतः काहीसा गंभीर वृत्तीचा मनुष्य आहे. त्यामुळे रंगभूमी ही व्यवसाय म्हणून स्वीकारावी की नाही, यावद्दल मी अद्याप साशंक आहे. रंगभूमीमध्ये जो कृत्रिमपणा असतो, जो विलक्षण उथळपणा असतो, त्याच्याविरुद्ध माझे मन कधीकधी जोराने बंड करून उठते. आणि तरीही रंगभूमीवद्दल मला विलक्षण आकर्षण वाटते. यामुळेच मी विचलित होऊन गेलो आहे. अर्थात माझ्या वृत्तीचे हे वर्णन मी काहीशा सौम्यपणानेच करीत आहे. एवढे मात्र निश्चित आहे, की मनात हे सर्व चालत असताही माझी गंभीर वृत्ती ही मात्र आजही कायम आहे. "

एखाद्याची जीवनरीत काय असावी यावद्दलचा निर्णय दुसरा कुणी घेऊ शकेल का बरे ?

" नाही घेऊ शकणार. पण मनुष्य स्वतःपुढील प्रश्नांविषयी दुसऱ्याशी विचारविनिमय करू लागला की, पुष्कळदा अनेक गोष्टी स्पष्ट होत जातात. "

तुमचे लक्ष प्रथम एका गोष्टीकडे वेधावेसे वाटते. जी जी क्रिया अहंवर जोर देत राहील, ती ती नेहमी विनाशकारीच होत राहील; ती दुःखच निर्माण करीत राहील, हीच गोष्ट महत्त्वाची नाही का ? आपल्याला लोककल्याण करावयाची इच्छा आहे असे तुम्ही प्रथम म्हटले होते. पण जोवर जाणता वा अजाणता एखाद्या क्रियेच्या किंवा व्यवसायाच्या द्वारा मनुष्याचा अहं हाच बलवान होत राहतो, तोवर त्याच्याकडून लोककल्याण साधले जाणे शक्यच नाही, ही गोष्ट अगदी स्पष्ट नाही का ?

" पण अहंला किंवा स्वला जागविण्यावर किंवा पुष्ट करीत राहण्यावरच प्रत्येक मानवी कृती आधारली जात नसते का बरे ? "

ती नेहमीच अशी आधारली जात असते असे मुळीच नाही. स्वरक्षणासाठीच एखादी कृती केली जात आहे असे बाह्यतः दिसेल, पण आंतरिक दृष्टीने ती तशी नसेलही. या बाबतीत दुसरे काय म्हणतात किंवा दुसऱ्याचे काय विचार आहेत, या गोष्टीला फारसे महत्त्व नाही. मनुष्याने स्वतःची फसवणूक मात्र करता कामा नये. पण मानसिक स्तरावर ज्या गोष्टी होत राहतात त्यांच्यामध्ये आत्मवंचनाही अगदी सुलभतेने होत राहते, हे ध्यानात ठेवले पाहिजे.

" मला तर असे दिसू लागले आहे की, मला जर खरोखरच आत्मविसर्जन करावयाचे असेल, तर मला एखाद्या मठात तरी जावे लागेल किंवा एखाद्या यतीमुनीसारखे जीवन जगावे लागेल. "

पण अहंविसर्जनासाठी, अहं नष्ट होण्यासाठी एखाद्या यतीमुनीसारखे जीवन जगण्याची खरोखर गरज असते का ? हे पाहा, अहंनिरपेक्ष जीवनाविषयीची आपली एक विशिष्ट कल्पना असते. आणि अहंशून्य जीवन हे वस्तुतः कसे असते, याचे आकलन होण्यास हीच कल्पना प्रतिबंध करीत असते. अशी कल्पना हे अहंचेच एक वेगळे स्वरूप असते, म्हणून जीवनापासून दूर पळून एखाद्या मठात किंवा आश्रमात न जाता, अहंचे व्यापार कसे चालत असतात याचे अक्रिय सावधानतेने सतत निरीक्षण करीत राहणे, हेच योग्य होणार नाही का ? या अक्रिय सावधानतेमधूनच सर्वस्वी भिन्न अशी कृती आकारास येऊ शकेल. आणि दुःख व वेदना यांचा परिपोष न करणारी कृती असेच तिचे स्वरूप राहील.

" यावरून असे दिसते की, काही काही व्यवसाय हे निरामय मानवी जीवनाचा उघड विनाश करणारेच असतात. अर्थात माझा व्यवसायही त्यांच्यापैकीच आहे हे स्पष्ट आहे. अजून मी तरुणच असल्यामुळे आताही रंगभूमीचा त्याग करणे मला सहज शक्य आहे. आपल्यापाशी आता जे बोलणे झाले आहे त्यानंतर तर नाट्यव्यवसाय मी नक्कीच सोडून देईन याची मला पूर्ण खात्री आहे. पण मग मी करावयाचे काय हा प्रश्न समोर उभा राहतो. बाकी माझ्यामध्ये आणखीही काही कलागुण आहेत. त्यांचा विकास होऊ शकेल व ते माझ्या उपयोगी पडतील असे वाटते.'

हे पाहा, कलागुण असणे हा अभिशापही ठरू शकेल. कारण या कलागुणांचा उपयोग करून अहं हा स्वतःला अधिकाधिक पुष्ट करीत राहील. मग कलागुणांचा आविष्कार करीत राहणे हीच अहंची जीवनरीत बनून जाईल, तीच त्याची कीर्तिपताका ठरेल. किंवा कलागुणांचा उपयोग करीत राहण्याचा धोका जाणून एखादा कलावंत आपले कलागुण ईश्वराला अर्पण करूनही टाकील. पण त्याला आपल्या कलागुणांची जाणीव मात्र पूर्णपणे कायम राहील. कारण त्याला तशी जाणीव नसती

तर त्याने ईश्वराला ते गुण अर्पण केलेच नसते. म्हणून आपल्या अंगी विशेष कला-गुण आहेत किंवा आपल्यामध्ये दुसरे काही ठळक वैशिष्ट्य आहे, ही जी माणसाची जाणीव तिचे स्वरूप त्याने प्रथम आकळून घेतले पाहिजे. नम्रता अंगी येण्यासाठी स्वतःपाशीं जे काय विशेष आहे, ते ईश्वराला अर्पण करणे हा निव्वळ आत्मप्रौढी-चाच आविष्कार असतो.

" मला आता या साऱ्या गोष्टींचे थोडेयोडे दर्शन घडू लागले आहे. तरीही मला हे सारे अतिशय गुंतागुंतीचे व अवघड आहेसे वाटत आहे. "

तसे ते कदाचित असेलही पण खरी महत्त्वाची कोणती गोष्ट असेल, तर अहंचे जे उघड व गुप्त स्वरूपाचे व्यापार चालत राहतात, त्यांचे आवडनिवडशून्य वृत्तीने अखंड अवधान ठेवणे हीच होय.

ज्ञानाची रीत

पश्चिमेकडील पर्वतांमागे सूर्य अस्ताला गेला होता, पण पूर्वगिरीच्या कातळांवर मावळतीचा अरुण प्रकाश अजूनही पसरलेला होता. पर्वतावरून खाली जाणारी वाट वळणे घेत घेत हिरव्यागार दरीमधून जात होती. सायंकाळ प्रशांत, मोहक होती. मंद पवन झाडांची पाने नाजुकपणे हालवीत डोलवीत होता. क्षितिजावर संध्या तारक नुकताच उगवला होता. लवकरच अंधार पडू लागणार होता आणि आकाशात चंद्र नसल्यामुळे तो अधिकच गडद होणार होता. आतापर्यंत विमुक्तपणे दिवसाचे स्वागत करणारे वृक्ष रात्रीच्या अंधारापासून दूर दूर राहण्यासाठी स्वतःच्या ठायी संकोचून उभे होते. पर्वतावर आता शांतशीतल निःशब्दता पसरली होती. आकाश अगणित तारकांनी नटले होते. आकाशाच्या पार्श्वभूमीवर पर्वतांची आकृती रेखीवपणे उठून दिसत होती. रात्रीच्या विशिष्ट परिमलाने संपूर्ण वातावरण भरून गेले होते. दुरून एका कुत्र्याचे भुंकणे ऐकू येत होते. रात्र अतिशय शांत, निःशब्द होती आणि ही निःशब्दता आसपासच्या खडकांत, वृक्षलतांत व अखिल वस्तुजातात खोल खोल झिरपत आहे असे वाटत होते. पायवाटेने जाणाऱ्यांच्या पायरवानेही ही निःशब्दता विचलित होत नव्हती.

मनदेखील पूर्ण निःशब्द झाले होते. ध्यान हे विशिष्ट परिणाम घडवून आणण्याचे साधन मुळीच नसते. तसेच विशिष्ट स्वरूपाची पूर्वावस्था उत्पन्न करण्याचे किंवा विवक्षित रूपाची भावी अवस्था निर्माण करण्याचेही ते साधन नव्हे. एखादा विवक्षित हेतू मनात धरून जर ध्यान केले गेले तर अभिलषित हेतूप्रमाणे घडूनही येईल. पण मग ते ध्यान मात्र असणार नाही; ती केवळ अभिलाषेची परिपूर्ती असेल. वस्तुतः अभिलाषेची तृप्ती कधीच होत नसते. कारण अभिलाषेला अंतच नसतो. म्हणून अभिलाषेला आळा न घालता किंवा ती पुष्टही न करता, तिचे यथार्थ आकलन करून घेणे, हाच ध्यानाचा आरंभ व हाच ध्यानाचा अंत. पण याच्याही पलीकडचे असे काही तरी असते. बाकी यानंतरही ध्यान करणाऱ्याचे किंवा ध्यात्याचे अस्तित्व कायम राहावे ही गोष्ट चमत्कारिकच आहे. वस्तुस्थिती अशी आहे की आपले अस्तित्व चालूच राहावे असे ध्यात्याला वाटत असते. म्हणूनच तो मग निरीक्षक किंवा अनुभविता बनतो. तो स्मृतियंत्र बनतो, स्मृतीचे मूल्यमापन करणारा होतो, त्यांचा संग्रह करणारा वा त्यांचा धिक्कार करणारा बनतो. म्हणून ध्यान हे जेव्हा ध्यात्याचे ध्यान असते, तेव्हा ते ध्यात्याला, अनुभवित्याला अधिकाधिक परिपुष्टच करीत राहते. पण मन जेव्हा निःशब्द होते, तेव्हा तेथे अनुभवित्याचा अभाव घडून येतो. आपण निःशब्द आहोत ही जाणीव ठेवणाऱ्या निरीक्षकाचाही

तेथे अभाव घडून येतो. मन याप्रमाणे पूर्ण निःशब्द होऊन जाणे म्हणजेच जागृतावस्था उदयास येणे होय. आपणामध्ये मधून मधून अनेक गोष्टींबावतची जागृतता उत्पन्न होणे शक्य असते. काही गोष्टींचा आपण शोध घेऊ शकतो. काहींच्या पाठीमागे लागू शकतो. काहींचे अन्वेषण करू शकतो. पण हे सर्व व्यापार इच्छाशक्तीचे वा अभिलाषेचेच व्यापार असतात. मान्यता मिळविण्याचे किंवा लाभ करून घेण्याचेच ते प्रकार असतात. पण जे अखंड, निरंतर जागृत असते, ती अभिलाषा कधीच नसते किंवा ती अभिलाषेची निर्मितीही नसते. अभिलाषा ही नेहमी परस्परविरुद्ध अवस्थांमध्ये संघर्ष उत्पन्न करीत राहते, आणि संघर्ष हा तर घोर अंधकारच असतो.

भेटीस आलेली स्त्री धनवान होती. योरामोठ्यांशी तिचे नाते व लागेबांधे होते. आणि आता अध्यात्माचा जोराचा शोध करण्यास ती निघाली होती. कॅथॉलिक धर्मगुरुंकडे जशी ती जाऊन आली होती, तशीच हिंदू गुरूंकडेही राहून आली होती. सूफी धर्मग्रथांचा तिने अभ्यास केला होता आणि बुद्धधर्माचाही थोडाबहुत परिचय करून घेतला होता.

"अतींद्रिय गूढविद्येचाही मी थोडाबहुत शोध केला आहे. आणि आता मी आपणाकडून काही शिकण्यासाठी आले आहे" तिने आपल्या कथनाला पुस्ती जोडली.

पुष्कळसे ज्ञान गोळा करीत राहण्यात सुबुद्धपणा साठलेला असतो, असे का तुम्हांला वाटते ? तुम्ही कोणत्या गोष्टींच्या शोधात आहात हे विचारू का ?

"आयुष्याच्या वेगवेगळ्या काळात मी वेगवेगळ्या गोष्टींमागे लागत आले आहे. आणि ज्या ज्या गोष्टींच्या मागे मी लागत आले आहे, ती ती वहुधा मला मिळत गेली आहे. अनुभवांचेही बरेचसे भांडार मी जमा केले आहे. आणि माझे एकूण जीवन विविध गोष्टींनी संपन्न वनले आहे. नाना विषयांवरचे नाना ग्रंथ मी पालथे घातले आहेत. एका विख्यात मनोविश्लेषणज्ञाकडेही जाऊन आले आहे. आणि तरीही माझा शोध अजून चालूच आहे."

पण तुम्ही हे सर्व कशासाठी करीत आहात ? हा शोध कशासाठी चालू आहे ? मग शोध सखोल असो की उथळ असो ?

"किती चमत्कारिक आहे आपला प्रश्न ? माणूस जर अविरत शोध करीत राहिला नाही, तर त्याचे जीवन किडामुंगीसारखेच कुंठित, अवरुद्ध वनून जाणार नाही का ? माणूस जर नेहमी नित्य नवे शिकत राहिला नाही, तर जीवनाला काही अर्थच उरणार नाही. यापेक्षा मरण काय वाईट ?"

बरे, तुम्ही शिकत तरी काय आहात ते सांगा. मानवी वर्तन व मानवी जीवनाची रचना यांच्याबद्दल इतरांनी जे जे काही लिहून ठेवले आहे, ते ते वाचीत असताना तुम्ही काय बरे साध्य करीत असता ? किंवा मानवांमधील सामाजिक व सांस्कृतिक भेदांचे पृथक्करण करीत असताना किंवा विज्ञानाच्या अथवा तत्त्वज्ञानाच्या

एखाद्या शास्त्रेचा अभ्यास करताना तुम्ही वस्तुतः काय वरे मिळवीत असता ?

" माझी अशी समजूत आहे की मनुष्यापाशी जर भरपूर ज्ञान असेल, तर ते त्याचे दुःखांपासून व संघर्षांपासून रक्षण करीत राहील. म्हणून जेथून जेथून ज्ञान मिळेल, तेथून तेथन मी ते गोळा करीत राहते. जीवनाचे यथार्थ आकलन होण्यासाठी ज्ञान हे तर आवश्यकच असते. "

पण ज्ञानाच्या द्वारा जीवनाचे यथार्थ आकलन होऊ तरी शकते का ? की जीवनाचे सर्जनशील असे आकलन होण्यास ज्ञान हे प्रतिबंधच करीत असते ? सामान्यतः आपली अशी कल्पना असते की, वरीचशी माहिती गोळा करण्याने, एखाद्या ज्ञानकोशाइतके ज्ञान संग्रही बाळगल्याने आपण आपल्या सर्व बंधनांपासून किंवा पाशांपासून मुक्त होऊ शकू. पण असे मुळीच होत नसते, ही स्पष्ट वस्तुस्थिती आहे. हेच पाहा की, आपणा सर्वांना हे पूर्ण माहीत आहे की, वैरभाव, द्वेषभाव व युद्धे ही मानवी शक्तीचा भयंकर अपव्यय करीत असतात. आणि असे असताही आपणाकडून या गोष्टींना आजवर मुळीच आळा घातला गेला नाही. तेव्हा ज्ञान हे वैर, द्वेष, युद्धे इत्यादिकांना आळा घालते, असे मुळीच दिसून येत नाही. उलट ज्ञान हे या गोष्टींना उत्तेजनच देत राहते. अशी वस्तुस्थिती असल्याने, आपण ज्ञान का गोळा करीत राहतो हे शोधून काढणे खरोखरच महत्त्वाचे नाही का ?

" पण मी तर या बाबतीत अनेक शिक्षणतज्ज्ञांशी बोलले आहे. त्यांचे मत असे आहे की, जगात जर ज्ञानाचा प्रसार पुरेशा व्यापक प्रमाणात होऊ शकला तर ते ज्ञानच माणसांचा परस्परांमधील वैरभाव नाहीसा करून टाकील. आणि जगाला विनाशापासून वाचवील. गंभीर प्रकृतीच्या बहुतेक शिक्षणतज्ज्ञांची हीच अपेक्षा आहे. "

पण हे पाहा की, आजही माणसापाशी विविध क्षेत्रांबद्दलचे प्रचंड ज्ञान गोळा झालेले आहे आणि तरीही माणसांचे परस्परांशी होत राहणारे पाशवी वर्तन काही थांबले नाही. एकाच समूहातील, एकाच देशातील किंवा एकाच धर्मातील माणसांचे तरी परस्परांशी होणारे दुष्ट पाशवी वर्तन बदलले आहे का ? कदाचित असे असेल की, जीवनातील या दुःखाची, या अनवस्थेची समस्या सोडवू शकणारा असा जो वेगळा घटक आहे, त्याच्याकडे आमच्या या प्रचंड ज्ञानामुळे आमचे पूर्ण दुर्लक्ष होत असेल ?

" कोणता आहे तो घटक ? "

तुम्ही हा प्रश्न कोणत्या हेतूने विचारीत आहात ? या प्रश्नाचे शाब्दिक उत्तर सहज देता येईल. पण त्यामुळे शब्दज्ञानाने अगोदरच भारावून गेलेल्या मनावर अधिक शब्दांचे ओझे लादण्यासारखेच नाही का होणार ? बहुतेक लोकांच्या बाबतीत ज्ञान हा केवळ विविध शब्दांचा संग्रह तरी असतो किंवा त्यांच्या पूर्वग्रहांना वा

निष्ठांना परिपुष्ट करणारे ते साधन तरी असते. माणसाची अहंभावना ही शब्द व विचार यांच्याच चौकटीत सदैव वावरत असते. ही अहंभावना ज्ञानामुळे व अनुभवामुळे संकोच तरी पावते किंवा विस्तारत जाते. पण ती संकोचली किंवा विस्तारली, तरी अहंभावनेचे हे वज्र कठीण केंद्र मात्र सदैव कायमच राहते. निव्वळ ज्ञानाच्या किंवा शिक्षणाच्या साह्याने ते कधीही विसर्जन पावू शकत नाही. या अहंकेंद्राचे, या अहंभावनेचे स्वेच्छेने विसर्जन घडून येणे हीच मूलभूत स्वरूपाची क्रांती होय. अहंपोषणच करीत राहणाऱ्या या ज्ञानामुळे जी कृती घडून येते, ती क्रांतिकारक असूच शकत नाही. कारण अशा कृतीमुळे मनुष्य अधिकाधिक दुःखाकडे व विनाशाकडेच खेचला जात असतो.

" सर्व मानवी दुःखांवरचा खरा उपाय हा एका वेगळ्या स्वरूपाच्या घटकात साठला असावा, असे आपण मघाशी सूचित केले होते. तेव्हा तो उपाय कोणता हे मी आपल्याला अतिशय गंभीरपणे विचारते. कारण असा एखादा घटक असला, त्याचे ज्ञान झाले व त्याच्या आधारावर संपूर्ण जीवनाची रचना करता आली, तर कदाचित एक सर्वस्वी नवी संस्कृती अस्तित्वात येऊ शकेल. "

असा घटक किंवा उपाय हा विचाराला कधीच शोधून काढता येणार नाही किंवा मनाला त्याच्यामागे लागताही येणार नाही. तुम्हांला तो उपाय जाणून घ्यावयाला हवा आहे व त्याच्या आधाराने तुम्हांला आपल्या जीवनाची नव्याने उभारणी करावयाला हवी आहे. पण तुमच्यामध्ये जो ' अहं ' आहे, – विविध प्रकारचे ज्ञान, नानाविध भीती, अनेक आशाअपेक्षा, बहुत भ्रम व विफलता यांनी युक्त असा जो तुमचा ' अहं ' आहे, – त्याला या उपायाचा कधीही शोध लावता येणार नाही आणि असा शोध न लागता नुसते अधिकाधिक ज्ञान व माहिती मिळवीत राहिले, तर त्यामुळे त्या उपायाचा उदय होण्यास प्रतिबंधच होत राहील.

" आपण जर या बाबतीत मार्ग दाखविणार नसाल, तर मला स्वतःच तो उपाय शोधून काढावा लागेल. पण यासाठी सर्व प्रकारच्या शोधांचा अंत घडून आला पाहिजे असेही आपण ध्वनित केलेले आहे. "

दुसऱ्याने या बाबतीत तुमचे मार्गदर्शन केले तर तुम्हांला स्वतःला हा शोध कधीच लागणार नाही. असा शोध लागण्यासाठी माणसाला कुणाचेही मार्गदर्शन आवश्यक नसते; तर स्वतः शोध करण्याचे स्वातंत्र्यच तेवढे आवश्यक असते. शोध लागणे म्हणजे एखादे पारितोषिक मिळणे नव्हे.

" आपण काय सांगता त्याचे मला आकलन होत आहेसे वाटत नाही. "

तो उपाय सापडावा यासाठी तुम्हांला मार्गदर्शन हवे आहे. पण दुसऱ्याने जर मार्गदर्शन केले, तर तुम्ही स्वतंत्र राहणार नाही. त्या मार्गदर्शकाच्या तुम्ही गुलाम बनून जाल. मला तो उपाय माहीत आहे, असे जो खात्रीपूर्वक सांगतो, तोही

स्वतःच्या ज्ञानाचा गुलाम बनलेला असतो. म्हणून त्यानेही या शोधासाठी प्रथम स्वतंत्र व विमुक्त झाले पाहिजे. शोध हा क्षणाक्षणाला नित्यनव्यानेच लागत असतो आणि म्हणूनच सगळे संचित ज्ञान हे या शोधाला प्रतिबंधक ठरत असते.

" आपण या गोष्टीची कृपा करून अधिक फोड करून सांगाल का ? "

ज्ञान हे नेहमीच गताचे, गतानुभवाचे असते. तुम्हांला ज्याचे ज्याचे ज्ञान आहे, ते सर्व गतकालात समाविष्ट होऊन गेलेले आहे, असेच आहे की नाही ? तुम्हांला वर्तमानाचे किंवा भविष्याचे ज्ञान नसते. गत किंवा गतानुभव यांना सदैव परिपुष्ट करीत राहणे हीच ज्ञानाची रीत असते. जे झाकले गेले असेल, ज्याच्यावरील आवरण दूर व्हावयाचे असेल, ते कदाचित सर्वस्वी नवे असेल. पण तुमचे ज्ञान हा तर गताचा संग्रह आहे. त्यामुळे या गतज्ञानाला त्या नित्यवर्तमानाचा व नित्यनूतनाचा, त्या अगाध अज्ञाताचा थांग लागणे अशक्य आहे.

" म्हणजे माणसाला जर ईश्वराचा, प्रीतीचा किंवा त्यासारख्या वस्तूचा शोध लागावयाचा असेल, तर त्याने आपले ज्ञानाचे ओझे पूर्णपणे फेकून दिले पाहिजे, असे का आपले म्हणणे आहे ? "

हे लक्षात घ्या की, अहं म्हणजे काय असते ? तर अहं म्हणजे गतकाल, अहं म्हणजेच नाना सद्गुण, विचार, कल्पना इत्यादिकांचा संग्रह करण्याची शक्ती. बरे, विचार म्हणजे काय ? तर विचार हा गतकालाच्या संस्कारबद्धतेचा परिपाक होय. अशा या विचाराच्या साह्याने, या पूर्वसंस्कारबद्ध साधनाच्या साह्याने तुम्ही त्या अज्ञेयाचे दर्शन घेण्याचा प्रयत्न करीत आहात. पण ही गोष्ट तर सर्वस्वी अशक्य आहे. त्या अन्याचा 'उदय' होण्यासाठी प्रथम ज्ञानाचा अंत घडून आला पाहिजे.

" पण माणसाने सर्व ज्ञान टाकून देऊन मन रिकामे कसे करावयाचे ? "

'कसे' ? या प्रश्नाला येथे स्थान नाही. कारण एखाद्या विशिष्ट पद्धतीचा अवलंब केल्याने मन हे नेहमी अधिकाधिक संस्कारबद्धच होत राहते. विशिष्ट पद्धतीने विशिष्ट परिणाम घडवून आणता येतो खरा. पण त्यामुळे विमुक्त मन, सर्व ज्ञानापासून व अहंकल्पनेपासून विमुक्त असे मन काही अस्तित्वात येत नसते. म्हणून येथे कसलीही पद्धती, कोणताही मार्ग नाही. तर ज्ञानाच्या स्वरूपासंबंधीचे हे जे वास्तव दर्शन आहे, त्याचे अक्रिय अवधान निरंतर राखणे हेच काय ते येथे आवश्यक आहे.

ठाम मते–स्वप्ने

वसुंधरा ही किती विलक्षण सुंदर आहे ! तिची विशाल वाळवंटे व सस्य-श्यामल शेते, तिची घनदाट अरण्ये व विशाल सरिता, तिचे उत्तुंग पर्वत व तिच्यावर वसणारे अगणित पक्षी, प्राणी व माणसे या सर्वांनी ती सदैव नटलेली-बहरलेली असते. पण याच धरणीवरील खेडी ही घाणेरडी व रोगपीडित आहेत; तिथे अनेक पावसाळे कोरडे गेले आहेत; विहिरी जवळपास आटून गेलेल्या आहेत; गुरा-ढोरांची तर निव्वळ हाडे उरलेली आहेत; शेतजमिनींना तडा पडल्या आहेत; भुईमुगाची पिके वाळून चालली आहेत; उसाची तर लागवडही केलेली नाही आणि नदी कित्येक वर्षे वाहताना दिसत नाही. या खेड्यातील माणसे जिवंत राहण्या-साठी भीक तरी मागतात, चोऱ्या तरी करतात किंवा उपाशीपोटी तरी राहतात आणि वाट पाहत पाहत अखेर मृत्युमुखी पडतात. याच धरणीवर दुसरीकडे समृद्धसंपन्न नगरे असतात. तेथे स्वच्छ प्रशस्त रस्ते असतात. चमकणाऱ्या नवनव्या मोटरी या रस्त्यांवरून जात-येत असतात. तेथील लोक स्वच्छ व सुंदर पोषाखात वावरतात आणि तेथील अगणित दुकाने अमाप वस्तूंनी भरगच्च भरलेली असतात. तेथे ग्रंथालये व विश्वविद्यालयेही विपुल असतात. आणि तेथे गरिबांची घाणेरडी वस्तीही असते—आणि तरीही ही समग्र पृथ्वी रमणीय सुंदर आहे आणि मंदिरां-सभोवतीची जमीन काय किंवा शुष्क वाळवंटातील जमीन काय–दोन्हीही पवित्र, मंगल आहेत.

कल्पना करीत राहणे हे वेगळे असते आणि वास्तव काय 'आहे' याचे दर्शन होणे हे अगदीच भिन्न प्रकारचे असते. पण या दोन्ही गोष्टी बंधनकारकच असतात. वास्तवाचे दर्शन होणे हे सामान्यतः सोपे असते. पण वस्तुस्थितीपासून मनाची मुक्तता होणे हे मात्र तसे मुळीच नसते. कारण वास्तवाचे हे दर्शन व्यक्तीच्या पूर्व-निर्णयांनी, तुलनांनी व अभिलाषांनी झाकोळलेले असते, आच्छादित झालेले असते. गुणदोषनिर्णायक असा जो माणसाचा अहं तो आड न येता वास्तवाचे स्पष्ट, स्वच्छ दर्शन घडणे हे अतिशय अवघड असते. कारण आपली कल्पनाशक्ती ही आपल्या अहंची एक विशिष्ट प्रतिमा तयार करीत असते आणि या प्रतिमेच्या आधारानेच विचाराचे सर्व व्यापार चालू असतात. अहंची अशी प्रतिमा बनविली जात असल्यामुळेच, जे वास्तव 'आहे' व जे 'असावेसे' वाटते, त्या उभयतांमध्ये संघर्ष सुरू होतो. हा द्वैतामधील संघर्ष असतो. हे द्वैत म्हणजे वास्तवाचे प्रत्यक्ष दर्शन व वास्तवाविषयीची कल्पना—या दोन सर्वस्वी भिन्न अशा अवस्था असतात. म्हणून जे मन वास्तवाविषयीच्या कल्पनेने धूसर झालेले नसते, तुलनात्मक मूल्यांनी

किंवा ठाम मतांनी वद्ध होऊन गेलेले नसते, तेच मन सत्याचे स्पष्ट, स्वच्छ दर्शन घेण्यास समर्थ असते.

भेटीला आलेली स्त्री आगगाडीचा व बसचा खूप दूरचा प्रवास करून आली होती आणि अखेरची वाट तर तिला पायीच चालून यावी लागली होती. पण हवा थंड असल्यामुळे ही अखेरची चढण तिला विशेष जाणवली नसावी.

"माझ्यापुढे एक निकडीची समस्या उभी ठाकली आहे." तिने बोलण्यास सुरुवात केली. "परस्परांवर प्रीती असणाऱ्या दोन व्यक्तींचे प्रत्यय व मते ही जेव्हा परस्परांच्या अगदी विरुद्ध असतात आणि जेव्हा या व्यक्ती आपापल्या ठाम मतांच्या ठायी पक्केपणी रुतून बसलेल्या असतात, तेव्हा काय करणे शक्य असते? त्यांच्यापैकी एकाने दुसऱ्यापुढे नमते घ्यावे का? परस्परांपासून दूरदूर नेणारी व परस्परांचा विनाश करणारी ही जी खोल दरी ठाम मतांच्या रूपात त्यांच्यामध्ये उत्पन्न झालेली असते, तिच्यावर पूल बांधून परस्परांना निकट आणणे हे प्रीतीला शक्य होईल का?"

त्या उभयतांमध्ये जर खरोखर प्रीती वसत असेल, तर परस्परांना तोडून टाकणारी व स्वतःला बद्ध करून टाकणारी ही ठाम मते त्यांच्यामध्ये रुजू तरी शकतील का?

"खरी प्रीती असेल तर ही ठाम मते कदाचित उरणारही नाहीत. पण आता इथली परिस्थिती प्रीतीच्या पलीकडे गेलेली आहे. आता या व्यक्तींची मते ही इतकी दृढ बनून गेली आहेत. की त्यांनी आता दुराग्रहांचे दुष्ट व पाशवी रूप धारण केले आहे. त्यांच्यापैकी एकजण लवचिकपणा कायम ठेवून नमते घेईलही. पण दुसऱ्या व्यक्तीने हीच वृत्ती जर स्वीकारली नाही, तर उभयतांमध्ये स्फोट झाल्यावाचून राहणार नाही. असा स्फोट टाळण्यासाठी काही करता येईल का? एकजण आपला आग्रह सोडून नमते घेईल. पण दुसरी व्यक्ती जर पूर्ववत दुराग्रही राहिली तर त्या व्यक्तीवरोवर जीवन कंठणे हे पहिलीला अशक्य होऊन जाईल. त्या व्यक्तीशी मग कसलेही नाते राहू शकणार नाही. आज परिस्थिती अशी झाली आहे की, या दुसऱ्या व्यक्तीच्या दुराग्रहामुळे भयंकर परिणाम होणारसे दिसू लागले आहे. पण आपल्या ठाम मतांसाठीच आपण हे हौतात्म्य स्वीकारीत आहोत, अशी त्या व्यक्तीची खात्री होऊन गेल्यामुळे त्याला त्याचे काहीच वाटत नाही. वस्तुतः मते किंवा कल्पना या सर्व पूर्णपणे भ्रमात्मक असतात, ही गोष्ट एकदा ध्यानात घेतली की, केवळ दुराग्रही मतांमुळे दोन व्यक्तींमध्ये असा भयानक संघर्ष व्हावा, हे अगदी मूर्खपणाचे आहे असे वाटू लागते. पण माणसापाशी दुसरे काही नसले की, कल्पना व मते ही त्याच्या मनात आपली पाळेमुळे खोलखोल रुजवीत राहतात आणि या कल्पनांच्या तीव्रतेमुळे दोन व्यक्तींमधील परस्पर स्नेह व सहिष्णुता ही

पार नाहीही होऊन जातात. मी ज्या व्यक्तीबद्दल सांगत आहे, त्या व्यक्तीने विशिष्ट ग्रंथांची पारायणे करून ज्या कल्पना व ज्या विचारप्रणाली आत्मसात केल्या आहेत, त्या प्रणालींमुळे जगात शांती नांदेल व सगळीकडे समृद्धी होईल, अशी त्याची पूर्ण खात्री झालेली आहे व हे आदर्श साध्य गाठण्यासाठी हत्या किंवा विध्वंस यांचाही आश्रय करावा लागला, तरी तोही समर्थनीयच होईल, असे त्याचे पक्के मत झाले आहे. कारण साध्य हेच सर्वंकष महत्त्वाचे असते, साधने तशी नसतात; आणि ते साध्य जोवर गाठले जाईल, तोवर कोणत्याही व्यक्तीला कसलेही महत्त्व नाही, अशी त्याची दृढ धारणा झालेली आहे."

अशा मताच्या व्यक्तीला, आपल्या विरोधी मताचे जे लोक आहेत, त्यांचा नाश घडवून आणण्यातच मुक्ती साठली आहे असे वाटते. ईश्वराप्रत पोचण्याचा हाच मार्ग आहे, असे पूर्वीच्या काळी काही धर्मांच्या लोकांना वाटत असे. आतादेखील आपल्या धर्ममतांविरुद्ध असणाऱ्या लोकांना धर्मबहिष्कृत करणे, घोर नरक प्राप्त होईल अशी धमकी देणे इत्यादी गोष्टी चालूच आहेत. तुम्ही ज्या विशिष्ट विचारप्रणालीबद्दल सांगत आहात, तो आजचा आधुनिकतम धर्म बनून गेला आहे. सर्वच माणसे धर्मामध्ये आपापले आशास्थान शोधीत असतात; किंवा वेगवेगळ्या विचारप्रणाल्यांत, गुरूंच्या ठायी किंवा अदृश्य महात्म्यांमध्ये शोधीत राहतात. पण हे सर्व प्रकार अखेरीस माणसांना अधिकाधिक दुःखात लोटण्यास व घोरतम संहारात ढकलून देण्यास कारणीभूत होतात. म्हणूनच अशा या हठाग्रही, दुराग्रही वृत्तीपासून माणसाने आपले मन मुक्त केले पाहिजे. कारण कल्पना किंवा विचारप्रणाली या कितीही सूक्ष्म, कितीही महान किंवा केवढ्याही विलोभनीय वाटत असल्या, तरी त्या सर्व वस्तुतः भ्रमात्मक व आभासात्मकच असतात. त्या माणसामाणसांमध्ये भेद उत्पन्न करीत राहतात व अखेर त्यांचा विनाश घडवून आणतात. कल्पना, मते व प्रत्यय यांच्या जाळ्यातून मन जेव्हा विमुक्त होते, तेव्हाच या सर्व स्वनिर्मित प्रक्षेपांपेक्षा सर्वस्वी भिन्न असे काही तेथे अवतरते. आपले मन हा काही आपल्या समस्या सोडविणारा अखेरचा आसरा नव्हे, उलट मन हेच सदैव समस्या उत्पन्न करीत राहते.

"आपण दुसऱ्यांचे मार्गदर्शन करीत नसता हे मला पूर्णपणे ठाऊक आहे. पण तरीही, मी काय करावे हे मला आपल्याला विचारावेसे वाटतेच. हाच प्रश्न आज कित्येक महिने मी स्वतःला विचारीत आलो आहे. पण मला काही त्याचे उत्तर अजून मिळाले नाही. बाकी आपल्याला हा प्रश्न विचारता विचारताच मला हे दिसू लागले आहे की, या प्रश्नाचे निश्चित असे उत्तर असणारच नाही. जसजशा गोष्टी घडत राहतील, तसतसा, स्वतःला विसरून त्यांचा स्वीकार करीत करीत क्षणाक्षणाला मला जीवन जगत राहिले पाहिजे. असे मला जगता आले, तरच कदाचित

मी सौम्य, मृदू व क्षमाशील होऊ शकेन, पण असे जीवन जगणे हे किती विलक्षण अवघड होणार आहे ! "

' हे किती विलक्षण अवघड होणार आहे ! ' असे जेव्हा तुम्ही म्हणता, त्याच-क्षणी मार्दवयुक्त व प्रीतियुक्त हृदयाने क्षणाक्षणाला जीवन जगणे तुम्ही थांबवून टाकता. अशा रीतीने तुमचे मन स्वतःच्या कल्पनांचा भविष्यावर प्रक्षेप करीत राहते व त्यामुळे ते एक नवीनच समस्या उभी करते. मनाची वा अहंची हीच तर नेहमीची प्रकृती असते. भूतकाल व भविष्यकाल यांच्याच तर आधारावर मनाचे सर्व व्यापार सदैव चालत राहतात.

" मी दुसरे काही आपल्याला विचारू का ? माझ्या स्वप्नांचा अर्थ मला लावता येईल का ? आताशा मला खूप स्वप्ने पडतात. ही स्वप्ने मला काहीतरी विशेष सांगू पाहत आहेत एवढे मला कळते. पण या स्वप्नांत ज्या वेगवेगळ्या प्रतिमा व जी भिन्नभिन्न प्रतीके वारंवार दिसत राहतात, त्यांचा अर्थ मला मुळीच लावता येत नाही. वरे, या प्रतिमा व ही प्रतिके नेहमी तशीच राहत नाहीत, वारंवार पालटत राहतात. पण त्या सर्वांचा मूलभूत आशय व अर्थ एकच असावा असे निदान मला तरी वाटते. कदाचित मी चुकतही असेन. "

' स्वप्नांचा अर्थ लावणे ' या शब्दांनी तुम्हांला काय सुचवावयाचे आहे ?

" मी अगोदरच स्पष्ट सांगितले आहे की, माझ्यापुढची जी गंभीर समस्या आहे, ती मला कित्येक महिने वेचैन करीत आहे. माझी स्वप्ने हीदेखील या समस्ये-संबंधीचीच आहेत. ती मला काही तरी सांगू पाहत आहेत; मी काय करावे याबद्दलची सूचना देऊ पाहत आहेत. म्हणून मला जर त्यांचा बरोबर अर्थ लावता आला तर ती काय सांगत आहेत हे मला नीट कळेल असे वाटते. "

प्रथम हे लक्षात घ्या की, स्वप्न पाहणारा हा आपल्या स्वप्नांहून वेगळा असा कधीच नसतो. स्वप्न पाहणारा हाच वस्तुतः स्वप्न असतो, ही गोष्ट नीटपणे समजून घेणे हेच महत्त्वाचे आहे, असे नाही का तुम्हांला वाटत ?

" आपण काय सांगता हे माझ्या नीटसे ध्यानात आले नाही. आपण कृपा करून अधिक फोड करून सांगाल का ? "

आपली जाणीव ही पूर्णपणे एकात्मक अशी प्रक्रिया असते. मग तिच्यात अंतर्गत विरोध किती का असेनात. आपली ही जाणीव स्वतःचे सबोध जाणीव व अबोध जाणीव असे वेगळे भाग करो; किंवा गुप्त प्रकट असे स्वतःचे वर्गीकरण करो; अथवा तिच्यामध्ये परस्परविरोधी अभिलाषा, मूल्ये व प्रवृत्ती यांचा पसारा असो. हे सर्व काही असले तरी जाणीव ही मात्र संपूर्ण व एकात्मक अशीच प्रक्रिया असते. एखादे स्वप्न सबोध मनाच्या कक्षेत आले, तरी वस्तुतः हे स्वप्न संपूर्ण जाणिवेच्या व्यापारांतूनच निर्माण झालेले असते. संपूर्ण जाणिवेने निर्माण केलेल्या स्वप्नाचा

अर्थ जेव्हा वरच्या स्तरातील सवोध मन हे लावू पाहते, तेव्हा स्वप्नाचा हा अर्थ, हे विवरण अपूर्ण, अंशात्मक व विकृत असेच राहणार हे उघड आहे. हे विवरण करणारे सवोध मन स्वप्नाचा किंवा स्वप्नातील प्रतिमा-प्रतिकांचा जो अर्थ करील तो चुकीचाच असणार ही गोष्ट अपरिहार्य आहे.

" मला सांगावयाला थोडा संकोच वाटतो, पण आपण काय सांगता हे मला स्पष्टपणे समजत नाही हे खरे. "

हे पाहा की, वरचे सवोध मन हे आपल्या समस्येचे उत्तर शोधण्यात व चिंता करण्यात इतके काही व्यापृत झालेले असते की, जागृत असताना ते केव्हाही शांत, निःशब्द असत नाही. पण तथाकथित निद्रावस्थेत मात्र ते अधिक शांत व कमी विचलित असे असते. त्यामुळे संपूर्ण जाणिवेच्या व्यापारांकडून मिळणारी सूचना त्या वेळी ते एकत्रित करीत असते. ही मिळणारी सूचना म्हणजेच पडणारे स्वप्न होय. जागे झाल्यावर ते चिंताग्रस्त सवोध मन या स्वप्नाचा अर्थ लावू पाहते. पण त्याचा हा अर्थ चुकीचाच असतो. कारण त्याला कृती करावयाला हवी असते आणि म्हणून या कृतीचे परिणाम काय होतील हे त्याला अजमावयाचे असते. अशी वस्तुस्थिती असल्यामुळे, माणसाला जर आपल्या संपूर्ण जाणिवेच्या व्यापारांचे आकलन करून घ्यावयाचे असेल, तर स्वप्नाचा अर्थ लावण्याची प्रवृत्ती स्तब्ध झाली पाहिजे. आणि तुम्हांला तर आपली समस्या सोडविण्यासाठी योग्य कृती कोणती हे शोधून काढण्याचीच चिंता लागली आहे, होय की नाही ? तुमची ही चिंताच समस्येचे आकलन करून घेण्याच्या आड येत आहे. म्हणून तुमच्या स्वप्नातील प्रतीके ही एकसारखी बदलत आहेत. पण या बदलत्या प्रतीकांमागील आशय मात्र तोच आहे. आता तुमची समस्या नेमकी काय आहे ते सांगा बरे ?

" जीवनात यापुढे काहीही घडले तरी भीती वाटू न देणे ही आता माझ्यापुढची समस्या आहे. "

भीती नाहीशी करून टाकणे हे इतके का सोपे आहे ? यासंबंधी केवळ एखादे शाब्दिक विधान केल्याने चिंता कधीही नाहीशी होत नसते. पण तुमची समस्या नक्की हीच आहे का ? भीती नाहीशी करून टाकण्याची तुमची इच्छा असेल हे खरे. पण मग हे ' कसे ' करता येईल, यासाठी कोणता मार्ग स्वीकारावा लागेल, या गोष्टींना तुमच्या दृष्टीने महत्त्व प्राप्त होईल आणि जुन्या समस्येच्या जोडीला ही नवी समस्या येऊन बसेल. अशाच रीतीने मनष्य एका समस्येकडून दुसऱ्या समस्येकडे सदैव जात राहतो आणि समस्येपासून मुक्तता अशी त्याला कधीच मिळत नाही. पण आता आपण सर्वस्वी वेगळ्या गोष्टीबद्दल बोलत आहोत, होय की नाही ? एका समस्येच्या जागी दुसरी समस्या आपल्याला मुळीच आणून बसवावयाची नाही, होय ना ?

" तर मग शांत, निःशब्द मन होणे होच माझी खरीखुरी समस्या असावी ? "

अर्थातच मन शांत, निःशब्द होणे हाच मुख्य मुद्दा आहे.

" पण मग माझे मन शांत, निःशब्द कसे बरे होऊ शकेल ? "

तुम्ही काय म्हणत आहात इकडे नीट लक्ष द्या. तुम्हांला शांत, निःशब्द मन हवेसे वाटत आहे. एखादा सुंदर पोषाख किंवा एखादे चांगले घर जसे तुम्हांला हवेसे वाटेल, तसेच शांत व निःशब्द मन हवेसे वाटत आहे. म्हणजे शांत, निःशब्द मन हे आता तुमचे साध्य झाले आहे. आणि हे साध्य गाठण्याचा मार्ग कोणता, साधन कोणते, या गोष्टींची आता तुम्ही चौकशी करीत आहात. म्हणजे आता एक नवी समस्या तुमच्यापुढे उभी ठाकली आहे. पण तुम्ही एकच जाणीव असू द्या. शांत, निःशब्द मन असणे हे किती विलक्षण महत्त्वाचे आहे, एवढ्या एकाच गोष्टीची तुम्ही नुसती जागृत जाणीव असू द्या. निःशब्दता प्राप्त करून घेण्याची मुळीच घडपड करू नका. ती प्राप्त करण्यासाठी विशिष्ट साधना करून स्वतःचा मुळीच छळ करून घेऊ नका. या निःशब्दतेची जोपासना करण्याचा किंवा ती मुद्दाम आचरणात आणण्याचा प्रयत्न करू नका. अशा प्रकारच्या प्रयत्नातून काही विशिष्ट परिणाम घडून येतील यात शंका नाही. पण हा घडून आलेला परिणाम म्हणजे मनाची निःशब्दता मात्र मुळीच असणार नाही. जे प्रयत्नाने घटविले जाते ते नाहीसेही होऊ शकते म्हणून मनाची निःशब्दता सदैव चालू राहावी असा प्रयत्न मुळीच करू नका. निःशब्दता ही क्षणाक्षणाला नित्य नव्याने अनुभवावयाची असते. तिचा संग्रह करून ठेवणे हे कधीही शक्य नसते.

मृत्यू

त्या महान नदीचे पात्र या ठिकाणी खूप प्रशस्त जवळजवळ मैलभर रुंद होते. प्रवाहाची गहनताही बरीच होती. नदीप्रवाहाच्या मध्यातील धारा स्वच्छ व नितळ निळी दिसत होती. पण किनाऱ्याजवळचे पाणी मात्र गढूळ, घाणेरडे व साचल्यासारखे दिसत होते. नदीच्या वरच्या भागाला दूरवर शहर पसरले होते. पश्चिमेकडील उंच-उंच इमारतीमागे सूर्य अस्ताला चालला होता. कारखान्यातून निघणारा धूर व रस्त्यांवरची धूळ यामुळे वातावरण किंचित धूसरित झाले होते. पश्चिमेकडील आकाशात चित्रविचित्र रंगांची उधळण झाली होती आणि नदीच्या नाचऱ्या जल-तरंगावर त्या रंगांचे मनोहर प्रतिबिंब चित्रित झाले होते. सायंकाळ मधुर लावण्याने नटली होती. गवताचे पातेन् पाते, वृक्षन् वृक्ष आणि कलरव करणारे पक्षीन् पक्षी एका कालातीत सौंदर्यामध्ये गुंफले गेले होते. कुठेही पृथकपणा नव्हता, विभक्तपणा नव्हता. दूरवरच्या पुलावरून जाणाऱ्या आगगाडीचा आवाज हादेखील या संपूर्ण निःशब्दतेचाच भाग होता. जवळच एका कोळ्याचे गाणे ऐकू येत होते. नदी किनाऱ्याजवळील दोन्हीकडच्या प्रशस्त तरींवर लागवड केलेली दिसत होती. दिवसा ही हिरवीगार समृद्ध शेते आपल्या लसलसत्या हास्याने पाहणाऱ्याला जणू मधुर आवाहन करीत. पण आता अंधार पडल्याने ती काळवंडत चालली होती. आपल्या-मध्ये मिळून जाऊन निःशब्द होऊन गेली होती. नदीच्या अलीकडच्या तीरावर जे प्रशस्त मोकळे मैदान होते, तेथे खेड्यातील मुले पतंग उडवीत होती, आनंदाने उडत-वागडत होती. जवळपास मासेमारीची जाळी वाळविण्यासाठी पसरून ठेवलेली होती. कोळ्यांनी आपल्या जुन्यापुराण्या मच्छीमारीच्या नावा तेथेच बांधून ठेवल्या होत्या.

नदीतीराच्या वरच्या भागाला खेडे वसले होते. संध्याकाळी तेथे गाण्याचा, नाचाचा किंवा दुसरा काही मनोरंजनाचा कार्यक्रम नेहमी चालू असे. पण या सायं-काळी मात्र खेड्यातील लोक आपापल्या झोपड्यांच्या बाहेर शांतपणे बसून राहिले होते व कसल्यातरी विचारात गढल्यासारखे वाटत होते. नदीच्या अवघड उतारा-वरून काहीजण पांढऱ्या फडक्यात गुंडाळलेले एक प्रेत तिरडीवरून वाहून आणीत होते. ते जवळून निघून जाताच मी त्यांच्या पाठोपाठ जाऊ लागलो. नदीकिनाऱ्या-पाशी पोचताच त्यांनी ती तिरडी पाण्याच्याजवळ ठेवली. तिरडीवरोवरच्या माण-सांनी काही जड ओंडके व काही चटकन पेटणारे लाकूड आणले होते. त्याची चिता रचन त्यांनी प्रेत चितेवर ठेवले. नंतर नदीचे पवित्र जल त्यावर शिपडून व आणखी थोडी लाकडे व वाळलेले गवत त्यावर घालून, एका पोरसवदा तरुणाने चितेला अग्नी दिला. आम्ही जवळजवळ वीसजण चितेच्या भोवती जमलो होतो. एकही स्त्री

तेंथे नव्हती. सगळे पुरुष धोतराने आपले अंग झाकून शांतपणे उकिडवे वसून राहिले होते. चितागनी जसजसा भडकू लागला, तसतसे आम्हाला मागे सरकून वसणे भागच पडले. प्रेताचा अर्धवट जळलेला एक पाय चितेतून वर उठला. त्याबरोवर एका लांव काठीने तो खाली दडपला गेला. पण तो खाली राहीना म्हणून त्याच्यावर एक जड ओंडका फेकला गेला. काळवंडलेल्या नदीप्रवाहात त्या पिवळ्या भडक ज्वालांचे प्रतिविंव उठून दिसत होते. आकाशातील चांदण्यांचेही प्रतिविंव प्रवाहात पडले होते. सूर्यास्तावरोवरच वारा पडला होता. भडकत्या चितागनीच्या आवाजाशिवाय सर्व काही अतिशय शांत, निःशब्द होते. चितेमध्ये मृत्यू जळून भस्म होत होता. त्या भडकत्या चैतन्यमय ज्वाला आणि ते स्तब्ध वसून राहिलेले लोक यांच्यासभोवती अनंत अवकाश पसरले होते. अगणित अंतर व विराट एकाकिता पसरली होती. समग्र जीवनापासून तुटलेले वा विभक्त होऊन गलेले असे काहीही तेथे नव्हते. येथेच प्रारंभ होता आणि नित्यनवा प्रारंभही येथूनच उगम पावत होता.

लवकरच प्रेताची कवटी फुटली व ते खेडूत लोक हळूहळू तेथून जाऊ लागले. सर्वांत शेवटी जाणारा वहुधा मृताचा जवळचा नातेवाईक असावा. त्याने हात जोडून चितेला प्रणाम केला व सावकाश पावले टाकीत तो किनाऱ्याची दरड चढून गेला. आता चितेमध्ये फारसे काही उरले नव्हते. भडकत्या ज्वाला आता शांत होऊन गेल्या होत्या. जळते निखारे तेवढेच शिल्लक होते. चितेमध्ये उरणाऱ्या अस्थी दुसऱ्या दिवशी सकाळी नदीत विसर्जित केल्या जाणार होत्या. मृत्यूचा विराटपणा व त्याची तात्कालिकता ही दोन्हीही तेथे किती निकट होती! ते प्रेत पूर्ण भस्म होऊन जाताच स्वतःचाही मृत्यू घडून आल्यासारखे वाटले. पूर्ण एकाकीपणा उदयास आला पण तो विभक्तपणा नव्हता. विभक्तपणा हा मनाचा गुण असतो, मृत्यूचा नव्हे.

भेटण्यास आलेल्या गृहस्थाचे वरेच उतारवय झाले होते. त्याचे वोलणेचालणे सौम्यशांत व गौरवपूर्ण होते. नेत्र स्वच्छ प्रांजल होते व मुद्रेवर सहज स्मित विलसत होते. आम्ही वसलो होतो ती खोली वरीच थंड असल्याने त्याने उवदार शाल पांघरली होती. परदेशात शिक्षण झाले असल्याने त्याने इंग्लिशमध्ये वोलण्यास जो प्रारंभ केला, तो अतिशय सफाईने. आपण सरकारी नोकरीतून निवृत्त झालो असून आता आपणास भरपूर वेळ आहे; आपण अनेक धर्मांचा व तत्त्वज्ञानांचा अभ्यास केलेला आहे; पण असल्या गोष्टींची चर्चा करण्यासाठी काही आपण इतक्या दुरून आलो नाही, असे तो सांगू लागला.

कोवळे सूर्यकिरण नदी प्रवाहावर पडले होते. जलतरंगांवर जणू सहस्रावधी हिरे चमचमत होते. व्हरांड्याच्या कठड्यावर वसून एक हरित-सोनेरी रंगाचा पक्षी स्वस्थपणे उन्हाचे सुख अनुभवीत होता.

त्या गृहस्थाने बोलण्यास प्रारंभ केला, " मी आज जो जेथे आलो आहे, तो काहीतरी विशेष विचारावयाला आलो आहे. मला अतिशय अस्वस्थ करून टाकणाऱ्या एका गोष्टीबद्दल मला आपल्याशी चर्चा करावयाची आहे. ती गोष्ट म्हणजे मृत्यू. मृतांसंबंधीचे एक तिबेटी पुस्तक मी वाचले आहे. तसेच या बाबतीत आपल्या भारतीय ग्रंथांमध्ये जे जे लिहिले आहे, तेही मी वाचून काढले आहे. मृतांसंबंधीच्या ख्रिश्चन व इस्लाम धर्माच्या ज्या कल्पना आहेत, त्या मला अतिशय उथळ वाटतात. या प्रश्नाबाबत या देशातील व परदेशातील धर्मगुरूंशी मी बरीच चर्चा केलेली आहे. पण या प्रश्नासंबंधीच्या त्या सर्वांच्या विचारप्रणाली व उपपत्ती निदान मला तरी अतिशय असमाधानकारक वाटतात. मी एकूण या विषयावर बराच विचार केला आहे व बरेचसे ध्यानचिंतनही केले आहे. पण आकलन होण्याच्या दृष्टीने माझी प्रगती होत आहे असे मला मुळीच वाटत नाही. माझ्या मित्राने नुकतीच आपली प्रवचने ऐकली व मलाही त्यातील आशय सांगितला म्हणून मी आज आपल्याकडे आलो आहे. मरणाची भीती किंवा आपले अस्तित्व नाहीसे होऊन जाण्याची भीती एवढीच काही माझ्यापुढची समस्या नाही; तर मृत्यूनंतर काय घडते या संबंधीचीही माझी समस्या आहे. आज युगानुयुगे माणसापुढे हीच समस्या उभी ठाकत आलेली आहे. आणि ती सोडविण्यास अजून कुणी समर्थ झाला आहे असे दिसत नाही. आपले या बाबतीत काय म्हणणे आहे ? "

मृत्यूची जी कठोर वास्तवता आहे, तिच्यापासून दूर पळण्याची जी तीव्र अभिलाषा माणसात वसत असते, तिचाच आपण प्रथम विचार करू या. मृत्यूपासून दूर पळण्यासाठी मनुष्य अनेक पळवाटांचा आश्रय करीत असतो. पुनर्जन्मावर विश्वास ठेवणे अथवा ख्रिस्ताच्या मरणोत्तर पुनरागमनावर निष्ठा ठेवणे ही एक पळवाट असते. मृत्यूबद्दलच्या कुठल्यातरी सोप्या युक्तिवादावर विश्वास ठेवणे ही दुसरी पळवाट असते. वस्तुस्थिती अशी असते की, मृत्यूबद्दलचे एखादे तर्कयुक्त विवरण प्राप्त व्हावे यासाठी किंवा मृत्यूच्या समस्येचे एखादे संतोषकारक उत्तर गवसावे यासाठी आपले मन इतके काही आतुर झालेले असते, की ते अगदो सहजपणेच कुठल्याही भ्रमाभासात गुंतून जाते. म्हणून या बाबतीत माणसाने अतिशय सावध राहिले पाहिजे.

" पण आमची सर्वांत मोठी अडचण हीच नसते का ? "

या बाबतीत आपल्याला काहीतरी आश्वासनपर लाभावे अशी माणसाची सहजच उत्कट अभिलाषा असते. विशेषतः ज्यांना यासंबंधीचे ज्ञान किंवा अनुभव आहे, त्यांच्याकडून आपणास काहीतरी सांत्वनपर वा आश्वासनपर मिळावे अशी माणसाची तीव्र अभिलाषा असते आणि असे आश्वासनपर काहीही मिळेनासे झाले की, मग यावद्‌बलच्या स्वतःच्याच सुखद निष्ठा व विचारप्रणाली मनुष्य निर्माण

तेंथे नव्हती. सगळे पुरुष धोतराने आपले अंग झाकून शांतपणे उकिडवे वसून राहिले होते. चितागनी जसजसा भडकू लागला, तसतसे आम्हाला मागे सरकून बसणे भागच पडले. प्रेताचा अर्धवट जळलेला एक पाय चितेतून वर उठला. त्याबरोबर एका लांब काठीने तो खाली दडपला गेला. पण तो खाली राहीना म्हणून त्याच्यावर एक जड ओंडका फेकला गेला. काळवंडलेल्या नदीप्रवाहात त्या पिवळ्या भडक ज्वालांचे प्रतिबिंब उठून दिसत होते. आकाशातील चांदण्यांचेही प्रतिबिंब प्रवाहात पडले होते. सूर्यास्तावरोबरच वारा पडला होता. भडकत्या चितागनीच्या आवाजाशिवाय सर्व काही अतिशय शांत, निःशब्द होते. चितेमध्ये मृत्यू जळून भस्म होत होता. त्या भडकत्या चैतन्यमय ज्वाला आणि ते स्तब्ध वसून राहिलेले लोक यांच्यासभोवती अनंत अवकाश पसरले होते. अगणित अंतर व विराट एकाकिता पसरली होती. समग्र जीवनापासून तुटलेले वा विभक्त होऊन गलेले असे काहीही तेथे नव्हते. येथेच प्रारंभ होता आणि नित्यनवा प्रारंभही येथूनच उगम पावत होता.

लवकरच प्रेताची कवटी फुटली व ते खेडूत लोक हळूहळू तेथून जाऊ लागले. सर्वांत शेवटी जाणारा वहुधा मृताचा जवळचा नातेवाईक असावा. त्याने हात जोडून चितेला प्रणाम केला व सावकाश पावले टाकीत तो किनाऱ्याची दरड चढून गेला. आता चितेमध्ये फारसे काही उरले नव्हते. भडकत्या ज्वाला आता शांत होऊन गेल्या होत्या. जळते निखारे तेवढेच शिल्लक होते. चितेमध्ये उरणाऱ्या अस्थी दुसऱ्या दिवशी सकाळी नदीत विसर्जित केल्या जाणार होत्या. मृत्यूचा विराटपणा व त्याची तात्कालिकता ही दोन्हीही तेथे किती निकट होती! ते प्रेत पूर्ण भस्म होऊन जाताच स्वतःचाही मृत्यू घडून आल्यासारखे वाटले. पूर्ण एकाकीपणा उदयास आला पण तो विभक्तपणा नव्हता. विभक्तपणा हा मनाचा गुण असतो, मृत्यूचा नव्हे.

भेटण्यास आलेल्या गृहस्थाचे वरेच उतारवय झाले होते. त्याचे बोलणेचालणे सौम्यशांत व गौरवपूर्ण होते. नेत्र स्वच्छ प्रांजल होते व मुद्रेवर सहज स्मित विलसत होते. आम्ही वसलो होतो ती खोली वरीच थंड असल्याने त्याने उवदार शाल पांघरली होती. परदेशात शिक्षण झाले असल्याने त्याने इंग्लिशमध्ये बोलण्यास जो प्रारंभ केला, तो अतिशय सफाईने. आपण सरकारी नोकरीतून निवृत्त झालो असून आता आपणास भरपूर वेळ आहे; आपण अनेक धर्मांचा व तत्त्वज्ञानांचा अभ्यास केलेला आहे; पण असल्या गोष्टींची चर्चा करण्यासाठी काही आपण इतक्या दुरून आलो नाही, असे तो सांगू लागला.

कोवळे सूर्यकिरण नदी प्रवाहावर पडले होते. जलतरंगांवर जणू सहस्रावधी हिरे चमचमत होते. व्हरांड्याच्या कठड्यावर वसून एक हरित-सोनेरी रंगाचा पक्षी स्वस्थपणे उन्हाचे सुख अनुभवीत होता.

त्या गृहस्थाने बोलण्यास प्रारंभ केला, " मी आज जो जेथे आलो आहे, तो काहीतरी विशेष विचारावयाला आलो आहे. मला अतिशय अस्वस्थ करून टाकणाऱ्या एका गोष्टीबद्दल मला आपल्याशी चर्चा करावयाची आहे. ती गोष्ट म्हणजे मृत्यू. मृतांसंबंधीचे एक तिबेटी पुस्तक मी वाचले आहे. तसेच या बाबतीत आपल्या भारतीय ग्रंथांमध्ये जे जे लिहिले आहे, तेही मी वाचून काढले आहे. मृतांसंबंधीच्या ख्रिश्चन व इस्लाम धर्माच्या ज्या कल्पना आहेत, त्या मला अतिशय उथळ वाटतात. या प्रश्नाबाबत या देशातील व परदेशातील धर्मगुरूंशी मी बरीच चर्चा केलेली आहे. पण या प्रश्नासंबंधीच्या त्या सर्वांच्या विचारप्रणाली व उपपत्ती निदान मला तरी अतिशय असमाधानकारक वाटतात. मी एकूण या विषयावर बराच विचार केला आहे व बरेचसे ध्यानचिंतनही केले आहे. पण आकलन होण्याच्या दृष्टीने माझी प्रगती होत आहे असे मला मुळीच वाटत नाही. माझ्या मित्राने नुकतीच आपली प्रवचने ऐकली व मलाही त्यातील आशय सांगितला म्हणून मी आज आपल्याकडे आलो आहे. मरणाची भीती किंवा आपले अस्तित्व नाहीसे होऊन जाण्याची भीती एवढीच काही माझ्यापुढची समस्या नाही; तर मृत्यूनंतर काय घडते या संबंधीचीही माझी समस्या आहे. आज युगानुयुगे माणसापुढे हीच समस्या उभी ठाकत आलेली आहे. आणि ती सोडविण्यास अजून कुणी समर्थ झाला आहे असे दिसत नाही. आपले या बाबतीत काय म्हणणे आहे ? "

मृत्यूची जी कठोर वास्तवता आहे, तिच्यापासून दूर पळण्याची जी तीव्र अभिलाषा माणसात वसत असते, तिचाच आपण प्रथम विचार करू या. मृत्यूपासून दूर पळण्यासाठी मनुष्य अनेक पळवाटांचा आश्रय करीत असतो. पुनर्जन्मावर विश्वास ठेवणे अथवा ख्रिस्ताच्या मरणोत्तर पुनरागमनावर निष्ठा ठेवणे ही एक पळवाट असते. मृत्यूबद्दलच्या कुठल्यातरी सोप्या युक्तिवादावर विश्वास ठेवणे ही दुसरी पळवाट असते. वस्तुस्थिती अशी असते की, मृत्यूबद्दलचे एखादे तर्कयुक्त विवरण प्राप्त व्हावे यासाठी किंवा मृत्यूच्या समस्येचे एखादे संतोषकारक उत्तर गवसावे यासाठी आपले मन इतके काही आतुर झालेले असते, की ते अगदी सहजपणेच कुठल्याही भ्रमाभासात गुंतून जाते. म्हणून या बाबतीत माणसाने अतिशय सावध राहिले पाहिजे.

" पण आमची सर्वांत मोठी अडचण हीच नसते का ? "

या बाबतीत आपल्याला काहीतरी आश्वासनपर लाभावे अशी माणसाची सहजच उत्कट अभिलाषा असते. विशेषत: ज्यांना यासंबंधीचे ज्ञान किंवा अनुभव आहे, त्यांच्याकडून आपणास काहीतरी सांत्वनपर वा आश्वासनपर मिळावे अशी माणसाची तीव्र अभिलाषा असते आणि असे आश्वासनपर काहीही मिळेनासे झाले की, मग याबद्दलच्या स्वत:च्याच सुखद निष्ठा व विचारप्रणाली मनुष्य निर्माण

करीत असतो. एकूण काय, तर कुठलीतरी निष्ठा ही आम्हाला आवश्यकच होऊन बसत असते. मग ती निष्ठा तर्कसंगत असो की तर्कदुष्ट असो.

पण ही निष्ठेची पळवाट कितीही संतोषदायक वाटली, तरी ती मूळ समस्येचे यथार्थ आकलन कधीच करून देऊ शकत नाही. मृत्यूच्या समस्येपासून असे दूर पळण्यानेच भीती उत्पन्न होत असते. जे 'वास्तव आहे' त्याच्यापासून दूर जाण्यानेच भीतीचा उद्भव होत असतो. म्हणून यावावतची निष्ठा ही कितीही संतोषदायक वाटली, तरी तिच्यातच भीतीचे मूळ दडलेले असते. मृत्यूच्या वास्तवतेकडे मनुष्य पाठ फिरवून वसतो, कारण त्याला मृत्यूकडे पाहावेसेच वाटत नाही. यावावतच्या त्याच्या ज्या निष्ठा किंवा विचारप्रणाल्या असतात, त्यांच्यामुळेच त्याला मृत्यूकडे सहजपणे पाठ फिरवता येते. म्हणून मृत्यूच्या अलौकिक स्वरूपाचे महत्त्व जर मनाला खरोखर जाणवून घ्यावयाचे असेल, तर त्याने कुठल्याही सुखद आश्वासनाची अभिलाषा सोडून दिली पाहिजे आणि कुठलाही प्रतिकार न करता, अगदी सहजपणेच ती सोडून दिली पाहिजे. हे अगदी स्पष्ट आहे, असे नाही का तुम्हांला वाटत ?

" आपण आमच्याकडून फारच मोठी अपेक्षा करीत नाही का बरे ? मृत्यूचे यथार्थ आकलन होण्यासाठी आम्ही प्रथम पूर्ण निराश व हतबुद्ध बनून गेले पाहिजे, असेच नाही का आपले म्हणणे ? "

छे, छे असे मुळीच नाही. हे लक्षात घ्या की, जेथे आशानामक अवस्था नसते, तेथे निराशा तरी असते का ? आपण नेहमी द्वंद्वाच्याच भाषत का बरे विचार करीत असतो ? आशा ही निराशेची विरोधी का असते ? तशी जर ती असेल, तर तिच्यात निराशेचे बीज नक्कीच असणार आणि अशी आशा ही भीतियुक्तच असणार. मनाला कशाचेही यथार्थ आकलन व्हावयाचे असेल, तर ते द्वंद्वाच्या दोन्ही टोकांपासून पूर्ण विमुक्त व्हावयाला नको का ? मनाची अवस्था हीच सर्वश्रेष्ठ महत्त्वाची असते. वस्तुतः मनामध्ये आशानिराशेचे जे व्यापार सदैव चालू असतात, तेच मृत्यूचे यथार्थ आकलन होण्याच्या आड येत असतात. मृत्यूचा यथार्थ अनुभव येण्यास तेच प्रतिबंध करीत असतात म्हणून हे मनातील द्वंद्वांचे व्यापार पूर्ण स्तब्ध होऊन गेले पाहिजेत. मृत्यूच्या समस्येकडे संपूर्ण नव्या जाणिवेच्या डोळ्यांनी पाहिले पाहिजे. या नव्या जाणिवेत पूर्वपरिचित असे काहीही असणार नाही. नव्याचे दर्शन घेणारे असे जुने ओळखीचे काहीही तेथे राहणार नाही.

" आपल्या या विधानाचा अर्थ माझ्या नीटसा ध्यानात आलेला नाही. मन द्वंद्वांपासून पूर्णपणे मुक्त होऊन जाण्याचे महत्त्व माझ्या किंचितसे ध्यानात येत आहे असे वाटते. हे अतिशय अवघड असले, तरीही ते अतिशय आवश्यक आहे हे मला समजते असे वाटते. पण जुन्याने नव्याला ओळखीत राहण्याची जी प्रक्रिया

असते, तिच्यापासून मन पूर्ण मुक्त होणे म्हणजे काय हे मात्र मला मुळीच आकळत नाही."

ओळख पटण्याची जी प्रक्रिया असते, ती पूर्ण ज्ञानामधून उद्‌भवणारी, गतानुभवातून उत्पन्न होणारी अशी प्रक्रिया असते. मनाला जे जे अज्ञात किंवा अपरिचित असते, त्याची त्याला सदैव भीती वाटत असते. तुम्हांला जर मृत्यूचे ज्ञान असते, तर तुम्हांला त्याची भीती वाटली नसती आणि मृत्यूबद्दलचे लांबलचक विवरण किंवा स्पष्टीकरण देण्याचीही मग गरज राहिली नसती. पण तुम्हांला मृत्यूचे ज्ञान होणे शक्यच नसते. ते अगदी सर्वस्वी नवे, पूर्वी कधीही न अनुभवलेले असे काही असते. ज्याचा ज्याचा माणसाला अनुभव येऊन चुकलेला असतो, ते ते ज्ञाताच्या किंवा गताच्या सदरात जाऊन पडते. आणि अशी या पूर्वज्ञाताच्या, या गतानुभूतींच्या साह्याने मनुष्याला सामान्यतः नव्याची ओळख होत असते. म्हणून गताच्या किंवा पूर्वज्ञाताच्या साह्याने ओळख होत राहण्याचा हा व्यापार जोवर चालू राहील, तोवर ते सर्वस्वी नवे कधीही उदयास येणार नाही.

"आता मात्र आपण काय सांगत आहात, त्याचे काहीसे आकलन मला होऊ लागले आहे."

एक गोष्ट कटाक्षाने ध्यानात घ्या, आपण सध्या जे बोलत सांगत आहोत, ते पुढे केव्हा तरी विचार करण्याचे मुळीच नव्हे; तर बोलत असतानाच जे ऐकले जात आहें, ते आताच प्रत्यक्ष अनुभविण्याचे आहे. हा अनुभव संग्रह करून ठेवण्यासारखा नसतो. आणि तो साठवला गेला, तर त्याचे गत स्मृतीत चटकन रूपांतर होऊन जाते. आणि मग हीच स्मृती, हीच ओळखण्याची प्रक्रिया त्या सर्वस्वी नव्याच्या, त्या अज्ञाताच्या आड येत राहते. ते अज्ञात म्हणजे मृत्यू होय. वस्तुतः माणसापुढील समस्या ही, मृत्यू म्हणजे काय, किंवा मृत्यूनंतर काय घडते, याची समस्या नसते. तर सर्व गतानुभवांपासून, संपूर्ण ज्ञातापासून मन पूर्ण धुतले जाणे, पूर्ण विमुक्त होऊन जाणें, हीच समस्या असते. मगच ज्ञातापासून पूर्ण विमुक्त झालेल्या या जिवंत मनाला मृत्यूच्या घरात प्रवेश करता येईल; मृत्यूला त्या अज्ञाताला भेटता येईल.

"म्हणजे जिवंतपणीच आपल्याला मृत्यूचे ज्ञान होऊ शकेल, असे का आपल्याला सुचवावयाचे आहे ?"

हे पहा की, माणसाला जेव्हा अपघातामुळे, रोगामुळे किंवा म्हातारपणामुळे मृत्यू येत असतो, तेव्हा तो पूर्ण सुजाण अवस्थेत नसतो. कारण या स्थितीत शारीरिक वा मानसिक वेदना होत असतात; आशा किंवा निराशा मनात सारखी आंदोलत असते; सर्वांपासून तुटून दूर जाण्याची भीती मनाला घाबरवीत असते. आणि याचमुळे जाणता वा अजाणता अशा अवस्थेत मन हे मृत्यूशी, त्या अटळ वास्तवतेशी झगडत राहते. मृत्यूशी अशा वृत्तीत झगडता झगडताच मनुष्य मृत्युमुखी पडत असतो. आता

आपण हे पाहू या की, सर्वस्वी वेगळ्या प्रकारे मृत्यूच्या घरात प्रवेश करणे शक्य आहे का ? मृत्यूचा मुळीच प्रतिकार न करता, आत्महत्येने स्वतःचा नाश करण्याची वृत्ती न उसळता किंवा मृत्यूकडे विकृत दृष्टीने न पाहता आणि शरीरात जीवन पूर्णपणे सळसळत असता व मनाच्या शक्ती पूर्णपणे कायम असता माणसाला मृत्यूच्या घरात प्रवेश करणे शक्य आहे का ? हे तेव्हाच शक्य होईल की, जेव्हा संपूर्ण पूर्वज्ञाताचा मृत्यू घडून येईल, अहंचा मृत्यू घडून येईल. म्हणून मृत्यू ही काही आपल्यापुढील समस्या नव्हे; तर युगानुयुगे संचित केलेल्या मानसिक स्वरूपाच्या अनुभवातून, अखंड वाढत जाणाऱ्या स्मृतिसंचयातून आणि सदैव पुष्ट व संस्कारवद्ध होत राहणाऱ्या अहंपासून, मन पूर्ण विमुक्त होऊन जाणे, ही आपल्यापुढील समस्या आहे.

" पण हे घडवून कसे आणावयाचे ? स्वतःच निर्मिलेल्या पाशांपासून मनाला स्वतःची मुक्तता कशी करून घेता येईल ? मला तर असे वाटते की, हे घडून येण्यासाठी एखाद्या वाह्य शक्तीने तरी साहय केले पाहिजे, नाहीतर मनाचा जो उच्च व उदात्त अंश आहे, त्याने तरी सर्व पूर्वानुभूतीपासून मन पूर्ण धुवून स्वच्छ करण्याचे काम केले पाहिजे. "

हा एकूण सर्वच प्रश्न अतिशय गुंतागुंतीचा आहे, नाही का ? तुम्ही त्या वाह्य शक्तीचा वा प्रभावाचा उल्लेख केलात, तो एकतर वातावरणाचा किंवा एकूण परिस्थितीचा प्रभाव असू शकेल, किंवा मनःसीमांच्या पार असणारा असा एखादा प्रभाव असू शकेल. हा वाह्य प्रभाव जर एकूण वातावरणाचाच प्रभाव असेल, तर आजवर ज्या प्रभावामुळे आपल्या निष्ठांनी, परंपरांनी व आपल्या संस्कृतीने मनाला पक्के जखडून टाकलेले असते, तशा सारखाच हाही प्रभाव असणार. पण हा वाह्य प्रभाव जर मनःसीमांच्या पार असणारा प्रभाव असेल, तर कोणत्याही स्वरूपातील विचार हा त्याला स्पर्शच करू शकणार नाही. कारण विचार हे कालाचे अपत्य असते. विचार हा गतकालात पक्का रुतून बसलेला असतो. गतकालापासून तो कधीही मुक्त होऊ शकत नाही. विचार गतकालापासून जर मुक्त झाला, तर तो विचार म्हणून शिल्लकच उरत नाही. म्हणून मनाच्या पार काय असते यावद्दलचा अंदाज विचाराने करीत बसणे हे पूर्ण निरर्थक असते. जे विचाराच्या पलीकडे आहे, त्याचे जर साहय व्हावयाचे असेल, तर विचार किंवा अहं हा पूर्णपणे नष्टच झाला पाहिजे. मन हे पूर्णतः निर्व्यापार बनले पाहिजे. मनाची ही निःस्तब्धता पूर्ण निर्हेतुक अशी असली पाहिजे. अशी निःस्तब्धता मनाला स्वतः कधीच घडवून आणता येणार नाही. मनाला स्वतःच्या व्यापारांचे उदात्त व अनुदात्त अशा विभागात वर्गीकरण करता येते. तसेच आवडीचे व नावडीचे व्यापार किंवा उच्च व नीच व्यापार असेही वर्गीकरण करता येते. पण हे सर्व विभाग व उपविभाग हे अखेर मनाच्या चतुःसी-

मातच वावरत असतात. म्हणून मनाचा व्यापार कोणत्याही दिशेने होत राहिला, तरी अखेर ती कालाची, गताची वा अहंचीच प्रतिक्रिया असणार. या संपूर्ण वस्तु-स्थितीचे यथार्थ आकलन हेच मुक्तिदायक ठरत असते. ज्याला या सत्याचे दर्शन होत नाही, त्याने काहीही केले, तरी तो सदैव बंधनातच अडकलेला राहणार. त्याने कितीही उग्र तपस्या केल्या, कोणतीही कठोर व्रते आचरली, केवढ्याही घोर साधना केल्या, किंवा केवढाही मोठा सर्वसंगपरित्याग केला, तरी या सर्वांना केवळ सामाजिक स्वरूपाचेच महत्त्व राहील. या सर्व गोष्टी केवळ सुखदायक व आश्वासनपर अशाच राहतील. सत्याच्या दृष्टीने त्यांना कसलेही महत्त्व वा कोणतेही मूल्य असणार नाही.

मूल्यमापन

ध्यान ही जीवनातील अत्यंत महान कृती आहे. सर्वांत श्रेष्ठ व अथांग आशयाने परिपूर्ण अशी जर जीवनातील कोणती कृती असेल, तर ती ध्यान हीच होय. पण ध्यानाचा मधुर परिमल हा सहज हस्तगत होण्यासारखा नसतो. प्रयत्नाने किंवा सवयीने ध्यान साध्य करता येत नसते. मनुष्याने जर एखादी विवक्षित साधना केली तर तिचे ईप्सित फल त्याला प्राप्त होईलही. पण कोणत्याही साधनेची पद्धती व रीत ही अखेर मत्सर व लोभ यांच्यावरच आधारलेली असते.

ध्यान न करता येणे म्हणजे काय असते बरे ? सूर्याच्या सोनेरी किरणांकडे, घनदाट शीतल छायांकडे, चमचमत्या जललहरींकडे किंवा कोवळ्या नाजुक किसलयाकडे जागत्या नेत्रांनी पाहता न येणे म्हणजे ध्यान न करता येणे होय. या सर्व दृश्यांकडे किती थोड्या लोकांचे लक्ष जात असते ! हे जागते लक्ष म्हणजे ध्यान. ते कुणाला काहीही मिळवून देत नसते. काहीतरी मिळण्याच्या अपेक्षेने ध्यानापुढे हात जोडून कुणीही उभे राहू नये. ध्यान तुमच्या दुःखाचे निराकरण करू शकत नाही. ते केवळ एकच कार्य करते. ते तुम्हांला वास्तवाचे समृद्ध दर्शन सहजतेने घडवून देते. पण ध्यानाच्या या सहजतेचे दर्शन होण्यासाठी मन हे स्वच्छेने, संपूर्णपणे विमुक्त होऊन गेले पाहिजे. विशिष्ट हेतूने व कारणाने मन ज्या विपुल गोष्टींचा संग्रह करीत राहते, त्या सर्वांपासून मनाला अकारण व निर्हेतुक विमुक्तता प्राप्त झाली पाहिजे. हाच ध्यानाचा मुख्य गाभा आहे. जे जे ज्ञान, जे जे अनुभव त्याच्यापासून मन पूर्ण विमुक्त होऊन जाणे म्हणजे ध्यान. ज्ञाताच्या नानाविध स्वरूपांमागे धावत सुटणे ही केवळ आत्मवंचना होय. ध्याता हा जेव्हा ध्यानाचा स्वामी होऊन बसतो, तेव्हा ध्यानाची सहजता तेथे राहतच नाही. ध्यात्याला ज्ञाताच्या परिमित क्षेत्रामध्येच कृती करता येत असते. म्हणून अज्ञाताचा जर उदय व्हावयाचा असेल तर ध्यात्याच्या कृतीचा संपूर्ण अंत घडून आला पाहिजे. ते अज्ञेय जसे तुम्हांला आवाहन करीत नसते, तसेच तुम्हांलाही त्या अज्ञेयाला आवाहन करणे शक्य नसते. पवनलहरीप्रमाणे ते अज्ञेय केव्हाही येते व केव्हाही निघून जाते. ते कधीही धरून ठेवता येत नसते. आपल्या लाभासाठी वा उपयोगासाठी कुणालाही त्याचा संग्रह करणे शक्य नसते. उपयुक्ततेच्या दृष्टीने त्याला कसलेही मूल्य नसते. पण त्याच्यावाचून जीवन विलक्षण रितेरिते होऊन जाते. जीवनाच्या रितेपणाला मग मापच उरत नाही.

ध्यान कसे करावे किंवा ध्यानासाठी कोणती पद्धत स्वीकारावी हे मुळीच महत्त्वाचे नसते; ध्यान म्हणजे काय या प्रश्नालाच सर्वोच्च महत्त्व असते. ध्यान 'कसे करावे' अशा प्रश्न जर कुणी उभा केला, तर ध्यानपद्धतीमुळे जे जे प्राप्त व्हावयाचे

तेवढेच त्याला प्राप्त होईल. पण ध्यान म्हणजे काय याचा शोध घेऊ लागले की, ध्यानाचे द्वार उघडेल. वस्तुतः हा शोध मनापलीकडच्या क्षेत्रातील नसतो, तर मनोव्यापारांच्या कक्षेतच तो वावरत असतो. या शोधाच्या दिशेने जाऊ लागले की, ध्यात्याने वा साधकाने स्वतःचे यथार्थ आकलन करून घेणे सर्वश्रेष्ठ महत्त्वाचे होऊन बसते. हा साधक कोणत्या साध्याच्या पाठीमागे लागला आहे, हे जाणून घेणे मग महत्त्वाचे राहत नाही. कारण तो जे जे साध्य करू पाहत असतो, ते ते त्याचाच विविध अभिलाषांचा, लालसांचा व दडपणांचा प्रक्षेप असतो; या वास्तवतेचे जेव्हा त्याला स्पष्ट दर्शन घडते, तेव्हा त्याचा सर्व प्रकारचा शोध विराम पावतो. ही अवस्था अत्यंत अर्थपूर्ण असते. यानंतर आपल्या कक्षेच्या पलीकडचे काहीही धरण्यामागे मन धावू लागत नाही. वाह्याकडे धाव घेणारा मनोव्यापार बंद होतो आणि याच-बरोबर, या वाह्य व्यापाराच्या प्रतिक्रियेच्या रूपाने जो आंतरिक व्यापार चालतो, तोही स्तब्ध होऊन जातो, साध्यापाठीमागे लागणे जेव्हा पूर्णतः थांबून जाते तेव्हा मनाचा व्यापार हा वाहेरही जाणारा नसतो व आतही येणारा नसतो. पण साध्याच्या पाठीमागे लागणे हे इच्छाशक्तीने बंद करता येत नसते. अनेक निष्कर्ष काढण्याने किंवा निर्णय घेण्यानेही ते घडून येत नसते. साध्यामागे लागणे थांबून जावयाचे असेल, तर वास्तवाचे सखोल आकलन होणे आवश्यक असते. शोध कर-ण्याचा अंत होणे म्हणजेच मन शांत, निस्तब्ध होण्याचा प्रारंभ होय.

एकाग्र होऊ शकणाऱ्या मनाला ध्यान करता येईलच असे खात्रीने सांगता येणार नाही. मनुष्य जसा स्वहितासाठी एकाग्रचित्त होतो, तसाच तो आवड असणाऱ्या गोष्टीसाठी एकाग्र होतो. पण अशा एकाग्र चित्तामागे कुठलातरी सबोध वा अबोध हेतू नेहमीच दडलेला असतो. येथे माणसाला काहीतरी प्राप्त करून घ्यावयाचे असते किंवा काहीतरी त्यागावयाचे असते. कशाचा बोध करून घेण्याचा तरी त्याचा प्रयत्न असतो किंवा पैलतीराला पोचण्याची धडपड तरी असते. जेव्हा कुठल्याही हेतूने चित्त एकाग्र केले जाते, तेव्हा तेथे लाभाची अपेक्षा ही नेहमीच असते. कशाजवळ जाऊ पाहणाऱ्या किंवा कशापासून दूर जाऊ पाहणाऱ्या मनोव्यापारात जी एकाग्रता घडून येत असते, ती एक तर सुखाच्या आकर्षणामुळे असते, किंवा दुःखापासून परावृत्त होण्यासाठी तरी असते. पण ध्यान ही मात्र अशी काही विलक्षण आणि अलौकिक स्वरूपाची एकाग्रता असते की, तिच्यात प्रयत्न करणारा शिल्लक उरतच नसतो. तेथे कोणतेही प्राप्तव्य किंवा कुठलेही लक्ष्य असत नाही. याच्या उलट प्रयत्न हा काही-तरी प्राप्त करून घेण्याच्या प्रक्रियेचाच घटक असतो. हा प्रयत्न, अनुभवित्याकडून गोळा केल्या जाणाऱ्या अधिक अनुभवाच्या स्वरूपाचा असतो. अनुभविता हा कितीही एकाग्रचित्त होवो, केवढेही लक्ष देवो, कितीही अवधान राखो, त्याचे हे सर्व करणे निरर्थक असते. म्हणूनच नवनव्या अनुभवांविषयी अनुभवित्याची जी लालसा असते,

ती समग्रपणे नष्ट होऊन गेली पाहिजे. कारण केवळ ज्ञानाचा संग्रह हेच अनुभवित्याचे स्वरूप असते. खऱ्या ध्यानामधील आनंद हा अद्‌भुत, अलौकिक असतो.

भेटण्यास आलेल्या गृहस्थाने तत्त्वज्ञानाचे व मानसशास्त्राचे बरेचसे अध्ययन केलेले होते. पतंजलीच्या ग्रंथांचेही त्याने पारायण केले होते. ख्रिश्चन तत्त्वविचार हा उथळ स्वरूपाचा व केवळ सुधारणावादी आहे, असे त्याचे मत होते. म्हणन त्याने पौर्वात्य देशांकडे आपली दृष्टी वळविली होती. काही योगसाधनाही त्याने केली होती. हिंदू तत्त्वज्ञानाशी देखील त्याचा पुरेसा परिचय होता.

तो सांगू लागला, " आपली काही प्रवचने मी वाचली आहेत. एका विशिष्ट मर्यादेपर्यंत आपल्या विचारांचे मला आकलन झाले आहे, अशी माझी समजूत आहे. कशाचाही धिक्कार न करण्याचे आणि कशालाही निंद्य न ठरविण्याचे महत्त्व मला पटते. तरीही धिक्कार न करणे हे मला अतिशय कठिण वाटते. पण कशाचाही निर्णय करू नका, कशाचेही मूल्यमापन करू नका, असे जेव्हा आपण सांगता, तेव्हा मला ते मुळीच समजत नाही. कारण सर्व प्रकारचा विचार ही मूल्य-मापनाचीच प्रक्रिया असते, अशी माझी समजूत आहे. आमचा एकूण सगळा दृष्टिकोन, आमचे समग्र जीवन हे भल्याबुऱ्याची निवड करण्यावर, मूल्यांच्या स्वीकारावर आणि चांगल्यावाईटाच्या कल्पनांवरच तर आधारलेले आहे. माणसासमोर जर मूल्ये नसती, मानदंड नसते, तर समग्र मानवी जीवनाचे विघटन होऊन गेले असते, जीवन छिन्नभिन्न होऊन गेले असते. मानवी जीवन असे होऊन जावे, असा खासच आपल्या म्हणण्याचा आशय नसणार. मी स्वतः आपल्या मनातून सर्व प्रकारची मूल्ये व मानदंड काढून टाकण्याचा प्रयत्न करून पाहिला आहे. पण माझ्यापुरते बोलावयाचे झाले तर मला हे सर्वस्वी अशक्य कोटीतलेच वाटते."

प्रथम हे लक्षात घ्या, की शब्द, प्रतिमा किंवा प्रतीके यांच्यावाचून विचार संभवू शकतो का? विचार करण्यासाठी शब्द आवश्यकच असतात ना? प्रतीके किंवा प्रतिमा नसल्या, मूल्यमापनासाठी कसलेही आधार नसले, तर ज्याला आपण विचार म्हणतो, तो अस्तित्वात तरी येऊ शकेल का? विचार शब्दाधारितच असतो ना? की शब्दावाचूनही असणारा असा विचार असू शकतो?

" कोण जाणे मी याबद्दल पूर्वी कधी विचारच केलेला नव्हता. माझ्या समजुतीप्रमाणे, प्रतिमा व शब्द नसले, तर विचारच अस्तित्वात येऊ शकणार नाही. "

आता आपण या विषयावद्दल बोलावयाला सुरुवात केलीच आहे, तर या बाबतीत वस्तुस्थिती काय आहे, याचा शोध आपल्याला घ्यावयाला नको का? शब्द व प्रतीके यांच्यावाचूनही विचार करणे संभवते का हे निदान स्वतःपुरते तरी आपल्याला शोधून काढता येईल, होय की नाही?

" पण या गोष्टीचा मूल्यमापनाशी काय संबंध आहे?"

हे पहा, आपले मन हे शब्द, प्रतिमा, सहचारी स्मृती व आधारभूत उल्लेख या सर्वांचे मिळून बनलेले असते. मनाच्या या पार्श्वभूमीतूनच मूल्यमापन जन्माला येत असते. ईश्वर, प्रीती, साम्यवाद, समाजवाद, इत्यादी शब्दांना आपल्या जीवनात विलक्षण महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले असते. ज्या संस्कृतीमध्ये आपण वाढलो असतो त्या संस्कृतीनुसार आपल्या जीवनात विशिष्ट शब्दांना विशिष्ट प्रकारचे महत्त्व प्राप्त होत असते, असा मानसशास्त्राचा निष्कर्ष आहे. ख्रिश्चन माणसाला विशिष्ट शब्दांचे व प्रतीकांचे महत्त्व वाटते तर मुस्लिम माणसाला दुसऱ्या काही शब्दसमुच्चयाचे व प्रतीकांचे तेवढेच श्रेष्ठ महत्त्व वाटते. माणसांच्या या संस्कार-क्षेत्राच्या चतुःसीमेतच विचार किंवा कल्पना यांचे मूल्यमापन होत राहते.

"पण या क्षेत्राच्या पलीकडे आपल्याला जाता येईल का? आणि समजा आपल्याला जाताही आले तरी आपण पलीकडे का बरे जावे?"

आपली समग्र विचारप्रक्रिया संपूर्णपणे पूर्वसंस्कारबद्ध अशीच असते. विचार-स्वातंत्र्य या नावाची वस्तूच अस्तित्वात नसते. तुम्ही काय वाटेल तो विचार करा. पण तुमचा विचार नेहमीच विशिष्ट मर्यादांच्या बंधनातच वावरत राहील. मूल्यमापन करणे किंवा निवड करणे ही विचाराचीच प्रक्रिया असते. आपले मन जेव्हा कमीअधिक विस्ताराच्या सीमांमध्ये बद्ध होऊन राहण्यातच संतोष मानीत असते, तेव्हा आपल्यापुढे मूलभूत स्वरूपाचा कोणताही प्रश्न उभा ठाकत नसतो. स्वतःला प्राप्त होणाऱ्या संतोषातच मन खूप असते. पण विचाराच्या पलीकडे काही आहे का, या गोष्टीचा शोध जर मनाला घ्यावासा वाटू लागला, तर मात्र मूल्यमापन करीत राहण्याचा त्याचा व्यापार पूर्ण थांबून गेला पाहिजे. विचार-प्रक्रियेचाच अंत घडून आला पाहिजे.

"पण आपले मन हा तर विचारप्रक्रियेचाच भाग आहे. मग विचारप्रक्रियेचा अंत कोणत्या साधनाने किंवा प्रयत्नाने घडवून आणता येईल?"

हे पहा, मूल्यमापन करणे, धिक्कार करणे व तुलना करणे हीच विचाराची रीत असते. म्हणून विचारप्रक्रिया ही कोणत्या प्रयत्नांनी वा उपायांनी स्तब्ध करून टाकता येईल, असा प्रश्न जेव्हा तुम्ही विचारता, तेव्हा तुम्हाला काही तरी प्राप्त करून घ्यावयाचे नसते का? एखादी विशिष्ट पद्धत आचरण्याची किंवा विशिष्ट रीतीने प्रयत्न करून पाहण्याची मनाची ही जी ऊर्मी असते, ती मूल्यमापनाच्या मनोव्यापारातूनच निर्माण होत असते. आणि म्हणून तीदेखील मनोव्यापारांची प्रक्रिया असते. कुठलीही पद्धती आचरल्याने किंवा कोणताही प्रयत्न करण्याने विचाराचा अंत कधीही घडवून आणता येत नसतो. आणि आपण प्रयत्न तरी का बरे करीत असतो?

"याचे कारण अगदी सरळ आहे. आपण जर सदैव प्रयत्नशील राहिलो नाही,

तर आपलें जीवन कुंठित व अवरुद्ध होऊन जाईल, कुजू-सडू लागेल आणि आपण लवकरच मृत्युमुखी लोटले जाऊ. या जगात प्रत्येकजणच प्रयत्न करीत नसतो का वरे ? प्रत्येक वनस्पती व प्रत्येक प्राणी केवळ जगण्यासाठीच अहर्निश धडपडत नसतो का ?"

पण आपण केवळ जगण्यासाठीच धडपडत असतो का सांगा वरे ? की विशिष्ट मानसिक वा वैचारिक जीवनपद्धतीमध्ये टिकून राहण्यासाठी आपण धडपड करीत असतो ? आपल्याला कुणीतरी विशेष व्हावे असे वाटत असते आणि म्हणूनच या विशिष्ट समाजव्यवस्थेत टिकून राहण्याची आपण जी धडपड करीत असतो, तिला जे वळण लावीत असतो, ते आपल्या महत्त्वाकांक्षेच्या ऊर्मीमुळेच लावले जात असते. सफल होण्याच्या लालसेमुळे व आपल्याला सदैव वाटणाऱ्या भीतीमुळे हे वळण लागले जात असते. वरे, ही समाजरचना तरी कशी अस्तित्वात येते ? तर सर्व व्यक्तींच्या महत्त्वाकांक्षांमुळे, सफलतेच्या लालसांमुळे व भीतीमुळे ती निर्माण होत असते. आपण सर्व जो प्रयत्न करतो तो काहीतरी मिळविण्यासाठी किंवा काही तरी टाळण्यासाठी करीत असतो. नुसते जगत राहणेच जर आपल्याला बरे वाटले असते, तर आपल्या समग्र दृष्टिकोनात भूलभूत परिवर्तन घडून आले असते. तर आपल्या प्रयत्नांमागे आवडनिवड ही गृहीत धरलेलीच असते आणि निवड करणे, म्हणजेच तर तुलना करणे, मूल्यमापन करणे, निंद्य ठरविणे हे सर्व असते. अशा सर्व धडपडी, सगळे विरोध व साऱ्या विसंगती मिळूनच विचार बनलेला असतो. मग हा विचार आपल्याला पोसणाऱ्या या सर्व प्रतिबंधांपासून स्वतःची मुक्तता करू तरी शकेल का ?

" मग स्वतःला मर्यादित करणारे मनाचे हे जे व्यापार आहेत, त्यांचा अंत घडविण्यासाठी एखाद्या वाह्य शक्तीचे तरी माणसाला साह्य मिळाले पाहिजे. मग अशा वाह्य शक्तीला आपण दैवी अनुग्रह हे नाव द्या की दुसरे काही नाव द्या. हेच का आपल्याला सुचवावयाचे आहे ? "

मनाचे चटकन समाधान करण्याची केवढी विलक्षण आतुरता माणसाला लागलेली असते ! एक गोष्ट तुमच्या लक्षात आणून द्यावीशी वाटते. मनाच्या एका विशिष्ट अवस्थेतून मुक्तता करून घेण्याचीच चिंता आता तुम्हांला लागली आहे, होय ना ? म्हणजे विशिष्ट साध्य गाठण्याची, विशिष्ट साफल्य मिळविण्याचीच तळमळ तुम्हाला लागली आहे, नाही का ? वस्तुतः स्वतःच निर्माण केलेल्या पिंजऱ्यात आपले मन अडकून पडत असते. आपल्याच अभिलाषांच्या व प्रयत्नांच्या जाळ्यात ते बद्ध होऊन जात असते. त्यामुळे अशा मनाचा कोणत्याही दिशेने होणारा व्यापार हा आपल्या तुरुंगाच्या चतुःसीमांतच वावरत राहतो. पण मनाला या वस्तुस्थितीची मुळीच जाणीव नसते. त्यामुळे आपल्या संघर्षांनी व वेदनांनी व्याकुळ होऊन ते कुठल्यातरी

शक्तीची प्रार्थना करू लागते. एखाद्या बाह्य शक्तीने या बंधनातून त्यांची मुक्तता करावी, यासाठी धडपड करते. ज्याच्यासाठी ते धडपडते ते त्याला प्राप्तही होते. पण ही प्राप्त वस्तू त्याच्याच मनोव्यापारातून निर्माण झालेली असते. म्हणून अजूनही हे मन तुरुंगातील बंदिवानच असते. फक्त आता त्याला एक नवा सुखद तुरुंग मिळालेला असतो, एवढेच काय ते.

" पण मग माणसाने करावयाचे तरी काय ? प्रत्येक मनोव्यापार हा जर त्या तुरुंगाचाच विस्तार असेल, तर मुक्ततेची आशा माणसाने सोडूनच दिली पाहिजे असे दिसते. "

पण आशा हा देखील विचाराचा किंवा मनाचाच व्यापार असतो. आणि तो निराशेत अडकलेला व्यापार असतो. आशा व निराशा या दोन शब्दांमध्ये जो भावनात्मक आशय असतो, त्याच्याचमुळे ते शब्द मनाला पंगू बनवितात, दुबळे करून टाकतात. या दोन शब्दांच्या ज्या परस्परविरोधी व परस्परविसंगत अशा ऊर्मी भासतात, त्यांच्यामुळेच ते शब्द मनाला दुर्बल बनवितात. म्हणून निराशेच्या विरोधी वाटणाऱ्या कल्पनेकडे धाव न घेता किंवा आशामय व सुखमय समजल्या जाणाऱ्या अवस्थेला बिलगून न बसता, केवळ निराशेच्याच अवस्थेत राहणे हे माणसाला शक्य आहे का हे पाहू या. मन हे जेव्हा दुःखमय वाटणाऱ्या अवस्थेकडून आशामय व सुखमय वाटणाऱ्या अवस्थेकडे धाव घेते, तेव्हाच संघर्षाचा जन्म होतो. मनुष्य ज्या अवस्थेत असतो, तिचे आकलन करून घेणे म्हणजे तिचा स्वीकार करणे काही नव्हे. स्वीकार करणे किंवा निषेध वा धिक्कार करणे या दोन्ही गोष्टी मूल्यमापनाच्या क्षेत्रातीलच असतात.

" विचार थांबविण्यासाठी काहीही कृती न करता विचार कसा स्तब्ध होऊन जाईल, हे काही अजून माझ्या ध्यानात येत नाही. "

हे पाहा की, अभिलाषेने, इच्छाशक्तीने किंवा जोराच्या उसळीने घडून येणारी कृती ही मनाने घडविलेली कृती असते. ही कृती, तुलना करणाऱ्या, धिक्कार करणाऱ्या व मूल्यमापन करणाऱ्या मनानेच घडविलेली असते. या वस्तुस्थितीचे स्पष्ट दर्शन जर मनाला झाले, कुठल्याही वादाने, चर्चेने किंवा ठाम मतामुळे अथवा निष्ठेमुळे नव्हे, तर केवळ सहजतेने, केवळ अवधान देत राहण्यामुळेच ते झाले, तर विचार थांबून जातो, त्याचा अंत घडून येतो. पण विचाराचा असा अंत म्हणजे निद्रा नव्हे, दुर्बलजीवन होऊन जाणे नव्हे किंवा ती अभावात्मक अशीही अवस्था नव्हे. ही सर्वस्वी वेगळ्या स्वरूपाची अवस्था असते.

" आपण आतापर्यंत जे बोललो, त्याच्यावरून या विषयाबद्दल मी आजवर सखोल विचार केलेला नव्हता, हे मला स्पष्ट दिसून आले आहे. मी वाचन बरेच केलेले असले, तरी दुसऱ्यांचे विचारच मी आत्मसात करीत आलो आहे. स्वतःच्या

विचारांची अवस्था मी आज प्रथमच अनुभवीत आहे, असे मला जाणवत आहे. आणि शब्दांपेक्षा अधिक कशाचे तरी मी श्रवण करीत आहे, अशी मला स्पष्ट प्रतीती येत आहे."

असूया आणि एकाकीपणा

सायंकाळ झाली होती. त्या वृक्षाखाली व भोवतालीही सारे आसमंत शांत, निःस्तब्ध होते. एक पाल एका खडकावर सारखी वरखाली चढत उतरत होती. रात्री बराच गारठा पडेलसे वाटत होते. आणि सकाळी सूर्य उगवेपर्यंत तो बराच वाढेलसे दिसत होते. दिवसभर शेतातील कामाने थकलेले बैल सावकाश घरी परतत् होते. जवळच्या टेकडीवरून घुवडाचा गंभीर घूत्कार कानी पडत होता. दर सायंकाळी याच सुमारास ते घूत्कार करू लागे. पण अंधार जसजसा गडद होत जाई, तसतसा त्याचा शब्द मंदावत जाई. पण कधीकधी अपरात्रीही त्याचा घूत्कार कानी पडे. दरीच्या एका टोकावरील एक घुवड दुसऱ्या टोकावरील घुवडाला आवाहन करीत राही व त्या उभयतांच्या गंभीर घूत्कारामुळे रात्रीला अधिकच सौंदर्य प्राप्त होई. आणि रात्र अधिकच निःशब्द, अधिकच नीरव होऊन जाई. सायंकाळ अतीव मधुरम्य होती. वीजेची सुकुमार चंद्रकोर काळवंडणाऱ्या टेकडीगे अस्ताला चालली होती.

मनात चालणाऱ्या नानाविध धूर्त व्यापारांनी अंतःकरण जेव्हा व्याप्त झालेले नसते, तेव्हा त्याच्यात करुणेचा उदय होणे मुळीच कठिण नसते. व्याप्त मन हेच करुणेचा व प्रीतीचा नाश करीत असते. कारण ते नानाविध भीतींनी व आग्रही इच्छा आकांक्षांनी भरगच्च भरलेले असते, विविध आसक्तींनी व अनासक्तींनी परिपूर्ण असते; भिन्नभिन्न निश्चयांनी व उत्कट प्रेरणांनी ते व्याप्त होऊन गेले असते. आपल्या या विविध व्यापारांचे सहजतेने अवलोकन करणे हे मनाला किती अवघड होऊन बसते. वस्तुतः मृत्यू व कनवाळू अंतःकरण असण्यासाठी मोठमोठ्या सिद्धांतांची किंवा तत्त्वज्ञानांची मुळीच गरज नसते. सामान्यतः असे आढळून येते की, देशात ज्या कार्यक्षम व सामर्थ्यशाली व्यक्ती असतात त्या विविध संघटनांच्या द्वारा लोकांना अन्न, वस्त्र, निवारा व वैद्यकीय साहय पोचवीतच असतात. आजच्या जगात उत्पन्नाची वाढ झपाटचाने होत असल्यामुळे लोकांना अशी मदत मिळत राहणे हे ओघानेच येते. सुसंघटित शासनसंस्थांचे व संनुलित समाजाचे हे दैनंदिन स्वरूपाचेच कार्य आहे. पण संघटनांच्या द्वारा पोचविल्या जाणाऱ्या अशा मदतीमध्ये अंतःकरणाची उदारता मुळीच नसते. हृदयाच्या उदारतेचा मूलस्रोत हा अगदीच वेगळा असतो. तो कुठल्याही गणनेच्या वा कुठल्याही मापाच्या पलीकडचा असतो. पण अंतःकरणाची अशी उदारता, असूया व महत्त्वाकांक्षा या दोन वृत्ती अग्नीप्रमाणे भस्म करून टाकीत असतात. म्हणून माणसाने उदारतेच्या मूलस्रोताकडेच गेले पाहिजे. पण पूर्ण रिक्तहस्त होऊनच त्याने तेथे गेले पाहिजे. कुणाची

प्रार्थना करणे किंवा कशाचा त्याग करणे हेदेखील त्याने सोडून दिले पाहिजे. या मूलस्रोताकडे पोचण्याची शिकवण कुठलाही ग्रंथ वा गुरू देऊ शकत नसतो. सद्-गुणशालीनता ही आवश्यक असली, तरी सद्गुणसंवर्धन करण्यानेही या मूलस्रोताकडे पोचणे शक्य नसते. स्वतःची कार्यक्षमता वाढविण्याने किंवा आज्ञापालन करीत राहण्यानेही तेथे पोचता येत नसते. पण मन हे जेव्हा शांत, निर्व्यापार अवस्थेत असते, तेव्हा त्या शांत अवस्थेतच तो मूलस्रोत वसत असतो. शांती ही निर्हेतुक असते, अधिकाचा तिला मुळीच हव्यास नसतो.

भेटण्यास आलेली स्त्री तरुण असली, तरी दुःखामुळे काहीशी उतरल्यासारखी वाटत होती. शारीरिक दुःखाचा तिला विशेष त्रास नव्हता. पण वेगळेच दुःख तिला जाळीत होते. आपल्या शारीरिक वेदना औषधांच्या साह्याने तिने आटोक्यांत ठेवल्या होत्या. पण मत्सराची तीव्र वेदना मात्र तिला कधीच शमविता आली नव्हती. अगदी बालपणापासून असूयेची वेदना आपल्याला जाळीत आली आहे असे ती सांगत होती. त्या वेळी ती बालिश कृती समजून हसण्यावारी उडवून लावली जाई. पण आता मात्र तो तिचा रोगच होऊन बसला होता. तिचा विवाह झाला असून तिला दोन मुलेही होती. पण तिचा हा तीव्र स्वरूपाचा मत्सर तिच्या सर्व नात्यांमध्ये विष कालवीत होता.

ती सांगू लागली, " मला आपल्या पतीविषयी व मुलाविषयीच मत्सर वाटतो असे नाही, तर माझ्यापेक्षा ज्याच्याजवळ अधिक चांगले वा सुंदर असे काही असते, त्या प्रत्येकाचाच मला मत्सर वाटतो. मग ती वस्तू म्हणजे सुंदर बाग असो की सुंदर पोषाख असो. हे सारे आपणांस वेडयासारखे वाटेल खरे. पण या मत्सराच्या भावनेमुळे माझे मन दुःखाने पिळवटले जात असते ही वस्तुस्थिती आहे. मागे एकदा मी एका मनोविश्लेषणज्ञाकडून उपचार करून घेतला होता. काही काळ माझे मन शांतही झाले होते. पण मग पुन्हा पूर्वीचे सगळे काही लवकरच सुरु झाले. "

आपण ज्या संस्कृतीत जगत आहोत, ती संस्कृती मत्सराला सतत उत्तेजन देणारीच आहे, नाही का ? सगळ्या जाहिराती, सारीकडे चालणारी तुलना व स्पर्धा, यशोदेवतेची होत राहणारी पूजा व तिच्या अनुषंगाने होणाऱ्या सर्व गोष्टी या सगळ्या मत्सराचे अव्याहत पोषणच करीत नसतात का ? अधिकाचीं लालसा व त्यासाठी आग्रह हेच मत्साराचे स्वरूप असत नाही का ?

" पण — "

हे पाहा, प्रथम मत्सर व असूया म्हणजे असते तरी काय, याचा आपण विचार करू या. तुमची यासंबंधीची जी वडपड आहे, तिचा विचार नंतर करू. ठीक आहे ना हे ?

" अर्थातच "

समाजात मत्सराला नेहमी उत्तेजन दिले जात असते. मत्सर हा प्रतिष्ठित समजला जात असतो, होय की नाही ? स्पर्धावृत्ती ही तर बालपणापासूनच जोपासली जात असते. दुसऱ्यापेक्षा आपण अधिक चांगले असले पाहिजे, अधिक चांगले काम केले पाहिजे ही शिकवण वेगवेगळ्या रीतींनी सर्वांच्याच मनावर बिंबविली जात असते. यशस्वी माणसांची उदाहरणे, वीर पुरुषांचा व त्यांच्या साहसी कृत्यांचा आदर्श आपल्यापुढे सतत ठेवला जात असतो. मत्सर व लोभ यांच्यावरच आपली सध्याची संस्कृती आधारलेली आहे. एखाद्याला लौकिक गोष्टींचा लोभ नसला आणि तो एखाद्या धर्मगुरूचा शिष्य बनला असला तरी तेथेही परलोकात उच्च स्थान मिळण्याचे आश्वासन त्याला दिले जात असते. लोभ व मत्सर यांच्यावर आधारलेल्या कल्पनांवरच आपण सर्व पोसले जात असतो. आणि यशाची किंवा सफलतेची अभिलाषा ही तर जवळजवळ प्रत्येकाच्याच मनात खोल रुतून बसलेली असते हे यश किंवा साफल्य वेगवेगळी माणसे वेगवेगळ्या मार्गांनी प्राप्त करून घेत असतात. कलावंत म्हणून, उत्तम व्यापारउदीम करणारा म्हणून किंवा धर्म क्षेत्रातील साधक म्हणून वेगवेगळी माणसे यश मिळवू पाहत असतात. यापैकी प्रत्येक कृती हे असूयेचेच एक रूप असते. पण ही असूया जेव्हा दुःखदायक व क्लेशदायक स्वरूप धारण करते, तेव्हाच तिच्यापासून मुक्त होण्यासाठी मनुष्य धडपड करू लागतो. जोवर असूयेमुळे होणारी कृती माणसाला सुख देत राहते किंवा त्याची कोणतीतरी उणीव भरून काढीत असते, तोवर असूया ही माणसाची सहज-प्रकृती आहे, असेच मानले जात असते. पण या सुखामध्येच दुःख दडलेले असते हे कुणाच्या लक्षात येत नाही. एखाद्या गोष्टीविषयी किंवा व्यक्तीविषयी माणसाला आसक्ती असली की, तिच्यामुळे त्याला सुख प्राप्त होत असते खरे पण या आसक्तीमधूनच मत्सराचा व दुःखाचा जन्म होत असतो. अशी आसक्ती ही प्रीती कधीही नसते. पण याच आसक्तीच्या क्षेत्रात माणूस जगत असतो, दुःख भोगीत असतो व अखेर मृत्युमुखी पडत असतो. पण स्वतःला संकुचित करून टाकणाऱ्या अशा कृतीमुळे होणारे दुःख जेव्हा माणसाला असह्य होते, तेव्हाच त्यातून मुक्त होण्यासाठी तो धडपड करू लागतो.

" आपण सांगता ते किंचितसे ध्यानात येत आहे असे वाटते पण मग या बाबतीत मी करावे तरी काय ? "

पण काय करायचे याचा विचार करण्यापूर्वी तुमची समस्या नेमकी काय आहे हे प्रथम पाहू या. काय आहे बरे तुमची समस्या ?

" मत्सराच्या भावनेमुळे माझ्या हृदयाला अत्यंत वेदना होत आहेत आणि त्यातून मला मुक्त व्हावयाला हवे आहे. "

तुम्हांला या वेदनांपासून, या दुःखापासून मुक्त व्हावयाला हवे आहे खरे. पण स्वकीयांवरील आसक्तीमुळे व ते केवळ आपल्याच हक्काचे असावे या उत्कट भावनेमुळे

तुम्हांला जे विशिष्ट सुख लाभत आहे, त्याला मात्र तुम्हांला बिलगून रहावयाला हवे आहे, होय की नाही ?

" अर्थातच हवे आहे. माझ्या सर्व आसक्तींचा मी त्याग करावा अशी तर आपली अपेक्षा नाही ना ? "

हे पाहा, आपल्यासमोरचा प्रश्न हा त्यागाचा नाही, तर एखादी वस्तू वा व्यक्ती केवळ आपल्याच हक्काची असावी, अशी अभिलाषा आपल्याला का होते, हा प्रश्न आहे. निरनिराळ्या निष्ठांना किंवा आशा-अपेक्षांना अशाच हक्काच्या भावनेने माणसे चिकटून राहत असतात. त्यांच्याविषयी त्यांना अतिशय आसक्ती वाटत असते, व्यक्ती वा वस्तू पूर्णपणे आपल्याशा करून टाकण्याची अभिलाषा किंवा त्यांच्या विषयीची आसक्ती ही माणसात का बरे उत्पन्न होत राहते ?

" कोण जाणे का ते. मी यावद्दल कधी विचारच केलेला नाही. असूया वाटणे हे अतिशय नैसर्गिक आहे असे मला वाटते. पण आता माझ्या जीवनात ही असूया विषासारखी होऊन बसली आहे, माझ्या समग्र जीवनात तिने भयंकर खळबळ माजवून टाकली आहे. "

एक गोष्ट ध्यानात घ्या की, सामान्यतः माणसाच्या काही आवश्यक अशा गरजा असतात. अन्न, वस्त्र, निवारा या अशा गरजा आहेत. पण यांचा उपयोग मानसिक संतोष मिळविण्यासाठीही माणसे करीत असतात. आणि अशा उपयोगामुळेच त्यांच्या जीवनात नवनव्या समस्या उत्पन्न होत राहतात. तसेच, माणसे जेव्हा इतरांवर मानसिक दृष्ट्या अवलंबून राहतात, तेव्हा या अवलंबनामधूनच चिंता, मत्सर व भीती ही उत्पन्न होत राहतात.

" मला वाटते मीही काही व्यक्तींवर मानसिकदृष्ट्या अवलंबून आहे. या व्यक्ती ही माझी अत्यावश्यक गरज होऊन बसली आहे, त्यांच्यावाचून मला जीवनच उरले नाही. माझे पती व माझी मुले ही जर माझ्या जीवनात राहिली नाहीत, तर मला हळूहळू वेड तरी लागेल नाहीतर दुसऱ्या कुणाविषयी मला आसक्ती तरी वाटू लागेल. बाकी आसक्तीमध्ये वाईट काय आहे हे काही मला कळत नाही. "

पण आसक्ती चांगली की वाईट हा विचार काही आपण आता करीत नाही तर आसक्तीचे कारण काय असते व तिचा परिणाम काय होतो, यांचाच आपण विचार करीत आहोत, होय की नाही ? मानसिक परावलंबनाचा आपण धिक्कारही करीत नाही किंवा समर्थनही करीत नाही. तर मनुष्य हा मानसिक दृष्ट्या दुसऱ्यावर का अवलंबून राहत असतो, हा प्रश्न आपण स्वतःला विचारीत आहोत. मत्सराच्या यातनांतून मुक्त कसे व्हावे हा वस्तुतः आपल्यापुढील प्रश्न नाही, तर हे मानसिक परावलंबन का हा प्रश्न आहे, होय की नाही ? मत्सर हे नुसते लक्षण आहे, हा नुसता परिणाम आहे. म्हणून लक्षणाचा किंवा परिणामाचा विचार

करण्यात काही अर्थ नाही. मनुष्य हा मानसिक दृष्ट्या दुसऱ्यांवर का अवलंबून राहतो, सांगा बरे ?

" मी या प्रकारे दुसऱ्यांवर अवलंबून आहे एवढे मला माहीत आहे. पण याबद्दल मी पूर्वी कधी विचारच केलेला नाही. प्रत्येकजणच दुसऱ्यावर मानसिक दृष्ट्या अवलंबून राहतो ही गोष्ट मी गृहीत धरूनच चालले होते. "

शारीरिक दृष्टीने किंवा भौतिक दृष्टीने आपण सर्वजण परस्परांवर अवलंबून राहत असतो आणि असेच नेहमी राहणार ही गोष्ट स्पष्ट आहे. हे शारीरिक व भौतिक अवलंबन नैसर्गिक व अपरिहार्य असे आहे. पण मानसिक दृष्ट्या आपण दुसऱ्यावर का अवलंबून राहतो, या गोष्टीचे जोवर आपल्याला आकलन होणार नाही, तोवर मत्सराच्या यातना कायमच राहतील, असे नाही का तुम्हांला वाटत ? मग हे मानसिक परावलंबन का असते सांगा बरे ?

" माझ्या कुटुंबियांवर माझे प्रेम आहे, म्हणूनच मला त्यांची गरज वाटते, त्यांच्यावर मी अवलंबून राहते. माझे त्यांच्यावर प्रेम नसते, तर मला त्यांची गरज वाटली नसती. "

म्हणजे प्रेम व मत्सर ही एकत्र असतात असे का तुमचे म्हणणे आहे ?

" हो, असे वाटते खरे. माझे जर त्यांच्यावर प्रेम नसते तर मला त्यांच्यासंबंधी कधीच मत्सर वाटला नसता. "

असे जर असेल, तर तुम्ही मत्सरापासून मुक्त झालात की तुमचे प्रेमही नाहीसे होऊन जाईल, होय की नाही ? मग मत्सरापासून मुक्त होण्याची धडपड तुम्ही का बरे करता ? खरी गोष्ट अशी आहे की, तुम्हांला आसक्तीचे सुख तर हवे आहे, पण त्यामुळे उत्पन्न होणारे दुःख मात्र नको आहे. हे कधी तरी शक्य होईल का ?

" का बरे होऊ नये ? "

आसक्ती म्हटली की, तेथे भीती ही गृहीत धरावीच लागते, होय की नाही ? कशाची असते ही भीती ? एकतर तुम्ही वस्तुतः जशा आहात, त्या स्वरूपाची तरी तुम्हांला भीती वाटत आहे किंवा त्या दुसऱ्या व्यक्ती तुम्हांला सोडून गेल्या, मरण पावल्या, तर तुमचे काय होईल याची तुम्हाला भीती वाटत आहे. या भीतीमुळेच तुम्हांला त्यांच्याविषयी आसक्ती वाटत राहते. या आसक्तीच्या सुखाने जोवर तुमचे मन परिपूर्ण असते, तोवर तुमची ही भीती आत खोल दडलेली असते, कडीकुलपात बंद केलेली असते. पण दुर्दैवाने ती तेथे सतत हजर असते. म्हणून जोवर या भीतीपासून तुमचे मन मुक्त होणार नाही, तोवर मत्सराच्या यातना तुम्हांला छळतच राहतील.

" पण मला भीती तरी कशाची वाटत आहे ? "

तुम्हांला भीती कशाची वाटते, हा प्रश्न महत्त्वाचा नाही तर आपल्याला भीती वाटत आहे, याची जाणीव तुम्हांला आहे का, हा प्रश्न खरा महत्त्वाचा आहे.

" आता या प्रश्नाकडे आपण माझे लक्ष वेधले आहे, तेव्हा मला ही जाणीव आहेसे वाटते. मला खरोखरच भीती वाटत आहे. "

कशाची बरे भीती वाटत आहे ?

" आपणावर मग कुणी प्रेमच करणार नाही, आपली कुणी काळजी घेणार नाही, आपली सगळी सुरक्षितता नाहीशी होऊन जाईल, आपण जशा काही नाहीशा होऊन जाऊ, पूर्ण एकाकी अवस्थेत फेकल्या जाऊ, या गोष्टींची भीती वाटत आहे. हीच माझी भीती आहे असे वाटते. आपल्याला स्वतःच्या बळावर जीवनाचा सामना करता येणार नाही, आपण अगदी एकटया पडून जाऊ, या गोष्टीची मला भीती वाटते. म्हणून मी आपल्या पतीवर व मुलांवर अवलंबून राहते. त्यांना घट्ट पकडून ठेवीत राहते. त्यांचे काही बरेवाईट तर होणार नाही ना ही भीती माझ्या मनात सतत ठाण मांडून बसलेली असते. माझी ही पराकाष्ठेची भीतीच कधी मत्सराच्या रूपाने प्रकट होते, तर कधी कधी भयंकर द्वेषाच्या रूपाने व्यक्त होते. माझे पती हे दुसऱ्या स्त्रीकडे तर जाणार नाहीत ना, याची चिंता मला जाळू लागते. ही घोर चिंता मला जशी काही गिळून टाकते. मी कितीदा तरी या चिंतेमुळे तासन्तास अश्रू ढाळले आहेत. भावनांचा हा सगळा परस्परविरोध, ही प्रचंड खळबळ यांनाच आम्ही प्रेम हे नाव देत असतो. आणि आपण तर विचारता की हे प्रेम असू तरी शकेल का ? जेथे आसक्ती असते तेथे प्रेम खरोखर असते का, असा प्रश्न मी स्वतःला विचारला की, तेथे प्रेम नसते, हे मला स्पष्ट दिसते. खरोखर आसक्ती ही अतिशय स्वार्थी, अनिष्ट व विकृत अशी गोष्ट आहे. या अवस्थेत मनुष्य केवळ स्वतःचाच विचार निरंतर करीत असतो. पण आता मी करावे तरी काय ? "

प्रथम हे लक्षात घ्या की, स्वतःचा धिक्कार केल्याने, स्वतःला स्वार्थी, विकृत, निंद्य अशी विशेषणे लावल्याने आपल्यापुढील समस्या थोडीसुद्धा सुटत नसते. उलट त्यामुळे ती अधिकच अवघड बनून जाते. या वस्तुस्थितीचे आकलन प्रथम करून घेणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. धिक्कार करणे किंवा समर्थन करणे या दोन्हीही गोष्टी, आपल्या भीतीमागे जे दडले असते, ते समजण्याच्या आड येत असतात. प्रत्यक्षात काय घडत आहे, याचा सरळ सामना करण्यापासून त्या मनाला परावृत्त करीत असतात. ' मी स्वार्थी आहे, विकृत मनोवृत्तीची आहे ' हे शब्द जेव्हा तुम्ही उच्चारता, तेव्हा धिक्काराच्या भावनेने ते शब्द ओथंबून जातात. आणि या रीतीने तुमचा अहंचा जो धिक्कार करणारा भाग असतो, तोच तुम्ही पुष्ट करीत राहता.

" आपण काय सांगता हे माझ्या नीटसे लक्षात येत नाही. "

असे पाहा की, आपल्या मुलाच्या एखाद्या कृतीचा जेव्हा तुम्ही धिक्कार करता किंवा तिचे समर्थन करता, तेव्हा तुम्हांला मुलाच्या त्या कृतीचे आकलन होत असते का ? काय व कसे करावयाचे हे मुलाला नीटपणे समजावून सांगण्याइतका वेळ तरी तुम्हांला नसतो, किंवा ते करण्याची तुमची इच्छा नसते. त्यामुळे तात्कालिक काम साधण्यासाठी तुम्ही मुलाला 'कर किंवा करू नको' असा हुकूम फर्मावता, पण असे करण्याने मुलाच्या मनातील गुंतागुंतीच्या मनोव्यापारांचे तुम्हांला आकलन मुळीच होत नसते. याचप्रमाणे, स्वतःचा धिक्कार किंवा समर्थन करण्याने किंवा दुसऱ्याशी स्वतःची तुलना करण्याने स्वतःचे आकलन होण्यास अडथळाच उत्पन्न होत असतो. म्हणून तुमचा अहं ही जी गुंतागुंतीची वस्तू आहे, तिचे तुम्हांला प्रथम आकलन करून घेतले पाहिजे.

" होय, हे आता माझ्या ध्यानात येत चालले आहे."

तेव्हा आता स्वतःचा धिक्कार किंवा समर्थन न करता सावकाश स्वतःचे आकलन करून घेत चला. धिक्कार किंवा समर्थन न करणे हे तुम्हांला फार अवघड वाटेल खरे. कारण आज शतकानुशतके कशाचा तरी निषेध करणे किंवा कशाबद्दल आग्रही विधान करणे हीच सवय माणसाला जडलेली आहे. आपले हे बोलणे चालू असताना तुमच्या मनात कोणकोणत्या प्रतिक्रिया उठतात याचे निरीक्षण करा.

मत्सर व मत्सरापासून मुक्त होणे हा काही आपल्यापुढील प्रश्न नाही, तर भीती हा प्रश्न आहे. भीती म्हणजे असते तरी काय ? ती कशी उत्पन्न होते सांगा बरे ?

" भीती आहे ही गोष्ट निश्चित पण ती कशाची आहे हे मला माहीत नाही. "

कुठल्या तरी आधारावाचून भीती कधी उत्पन्न होत नसते. भीती ही अमूर्त स्वरूपात कधीच नसते. ती नेहमी कशाच्या तरी संबंधीची असते, होय की नाही ? मनाच्या एका अवस्थेला एकटेपणा असे नाव तुम्ही देता. आणि या अवस्थेची जेव्हा जाणीव होते, तेव्हा तुमच्या मनात भीती उत्पन्न होते. तेव्हा भीती ही कसल्यातरी आधारावाचून असत नाही हे स्पष्ट आहे. आता तुम्हांला प्रत्यक्ष भीती कशाची वाटत आहे, हे सांगा बरे ?

" आपण सुचविल्याप्रमाणे मला एकटेपणाची भीती वाटत आहे, अशी माझी समजूत आहे."

नुसती समजूत आहे, असे का बरे म्हणता ? तुम्हाला त्याबद्दल खात्री नाही का ?

" कशाबद्दलही खात्रीपूर्वक सांगणे मला कठिण वाटते. पण एकटेपणाची भीती ही माझी अतिशय गंभीर अशी समस्या आहे एवढे मात्र निश्चित. माझ्या मनाच्या पार्श्वभागी ती नेहमीच राहिलेली आहे. पण आता आपल्याशी बोलतानाच मला तिचे प्रत्यक्ष दर्शन घेणे भाग पडत आहे. ही एकटेपणाची समस्या म्हणजे एक

भयंकर विराट अशी पोकळी आहे. तिच्यापासून सुटका होणे हे मला तर अशक्यच वाटत आहे."

या पोकळीला कोणतेही विशेषण न लावता किंवा तिच्या स्वरूपाचे कसलेही वर्णन न करता तिच्याकडे थेट सरळ पाहणे आपल्याला शक्य होईल का पाहा बरे? एखाद्या अवस्थेला विशिष्ट नाव दिल्याने तिचे आकलन मुळीच होत नसते. उलट अशी नावे देण्याने आकलनाला अडथळाच उत्पन्न होत असतो.

"आपण सांगता ते माझ्या ध्यानात येते. पण माझ्या अवस्थेला विशिष्ट नाव दिल्यावाचून मला राहवतच नाही. नाव देण्याची कृती तात्काळच घडून येत असते."

एखादी भावना उत्पन्न होणे व तिला नाव दिले जाणे हे एकाच वेळी घडत असते, नाही का? पण या दोन्ही गोष्टी वेगळ्या करून टाकता येतील की नाही? एखादी भावना उत्पन्न होणे व तिला नाव दिले जाणे यांच्यामध्ये अंतर राहू शकणार नाही का? असे अंतर जर अनुभवास आले, तर विचारापासून भिन्न अशी जी विचारक नामक वस्तू मानली जाते, तिचा अंत झाला आहे, असे आढळून येईल. नाव देण्याची किंवा शब्दांकित करण्याची आपल्या मनाची जी प्रक्रिया असते, तो आपल्या अहंचाच अंत असतो. स्वतः मत्सरी असणारी व मत्सरापासून मुक्त होण्याचा प्रयत्न करणारी ही जी अहंनामक वस्तू असते, तिचाच हा घटक असतो. या वस्तुस्थितीचे तुम्हांला जर यथार्थ दर्शन घडले, तर तुमची भीती नष्ट होऊन जाईल. कुठल्याही अवस्थेला वा वस्तूला नाव देण्यामुळे जसा शारीरिक परिणाम घडून येतो, तसाच मानसिक परिणामही घडून येत असतो. म्हणून जेव्हा आपल्या भावनेला कोणतेही नाव दिले जात नाही, तेव्हाच ही जी एकटेपणाची पोकळी म्हटली जाते, तिचे यथार्थ दर्शन घडणे शक्य होते. मग जे वर्तमान वास्तव आहे, त्याच्यापासून मन हे स्वतःला वेगळे मानीत नाही.

"आपण जे सांगता त्याचे आकलन होणे मला फार अवघड वाटत आहे. पण थोड्याशा भागाचे मला आकलन झालेसे वाटते. या आकलनाचा विकास होत असलेला मी पाहत राहीन."

मनातील तुफान

दिवसभर धुक्याने सारे वातावरण भरून गेले होते. संध्याकाळच्या सुमारास ते जसजसे ओसरू लागले, तसतसा पूर्वेकडून जोराचा वारा वाहू लागला. त्या सोसाट्याच्या वाऱ्याने झाडांची पिकलीवाळली पाने गळून पडू लागली. जमीन कोरडी होऊन जाऊ लागली. रात्र झाली तसे वादळ वाढू लागले. झंझावाताचा वेग वाढू लागला. घरांची खिडक्यादारे करकर वाजू लागली. झाडांच्या फांद्या तुटून पडू लागल्या. दुसऱ्या दिवशी सकाळी मात्र हवा इतकी विलक्षण निवळली की, त्या स्वच्छ, निरभ्र वातावरणात दूरचे पर्वत अगदी स्पर्श करण्याइतके जवळ आल्यासारखे वाटू लागले. वारा वाहू लागला व त्याच्यावरोबर उष्णताही परतून आली. पण तिसऱ्या प्रहरी वारा जेव्हा पार पडला तेव्हा समुद्रावरचे धुके पुन्हा सभोवताली पसरू लागले.

वसुंधरा ही किती विलक्षण लावण्यसंपन्न व वैभवसंपन्न असते ! तिच्या या सौंदर्यलक्ष्मीचे अवलोकन करताना कधीच कंटाळा येत नाही. नद्यांची वाळलेली पात्रेदेखील वनस्पतींनी व प्राण्यांनी परिपूर्ण असतात. पिवळी पिवळी सूर्यफुले, रंगीबेरंगी पॉपीची फुले आणि आणखी कित्येक फुले तेथे नाचत डोलत असतात. पात्रातल्या दगडगोटयांवरून पालींची सारखी ये-जा चाललेली असते. पांढऱ्या पिंगट खवल्यांचा साप आपली काळीकाळी जीभ आतबाहेर वळवळत ऊन खात पहुडलेला असतो. पलीकडच्या खोऱ्यातून सशाच्या मागे धावणाऱ्या कुत्र्याचे भुंकणे कानी पडत असते.

समाधान हे साफल्यामधून, तृप्ततेमधून किंवा वस्तुसंपन्नतेमधून कधीच निर्माण होत नसते. विशिष्ट कृतीमधून किंवा कृतिशून्यतेमधूनही त्याचा उद्भव होत नसतो. जे वर्तमान वास्तव असते त्याच्या परिपूर्णतेमधूनच समाधानाचा उदय होत असतो, वर्तमान वास्तवात बदल घडवून आणण्याने नव्हे. जे अपूर्ण पूर्णत्वाप्रत पोचण्याचा प्रयत्न करीत असते त्यालाच असंतोषाची व्यथा जाणवत राहते. जे वर्तमान वास्तव असते, ते अपूर्णच असते, पूर्ण मुळीच नसते. जे पूर्ण असते ते अ-वास्तव असते. या अ-वास्तवाच्या मागे लागण्यानेच असंतोषाची व्यथा उद्भवत असते आणि ती कधी नाहीशीही होत नसते. असंतोषाची व्यथा शमविण्याचा प्रयत्न करणे म्हणजेच अ-वास्तवाचा शोध करीत राहणे होय. अशा शोधातून असंतोष सदैव उत्पन्न होत राहतो. असंतोषातून बाहेर पडण्याचा कोणताही मार्ग असत नाही. असंतोषाचे केवळ अवधान असू देणे म्हणजेच वर्तमान वास्तवाचे अवधान ठेवणे होय. वर्तमान वास्तवाच्या समृद्धिमयतेमध्ये जी अवस्था असते, तिला समाधान म्हणता येईल. या समाधानाच्या विरोधी अशी कोणतीच अवस्था असत नाही.

दरीच्या वरच्या अंगाला बंगला होता आणि तेथून दूरच्या पर्वतराजीचे अत्युच्च शिखर मावळत्या सूर्यकिरणांनी उजळून निघालेले दिसत होते. ते जणू काही स्वयं-तेजाने नटल्यासारखे व आकाशात अधांतरी लटकल्यासारखे वाटत होते. अंधारत जाणाऱ्या खोलीमधून त्या उत्तुंग शिखराचे ते विलक्षण तेजोलावण्य कल्पनातीत सुंदर भासत होते.

भेटीला आलेल्या तरुणामध्ये उत्सुकता व शोधाची आतुरता स्पष्ट दिसून येत होती. तो सांगू लागला,

" मी बरेच धर्मग्रंथ वाचले आहेत. तसेच त्या परमश्रेष्ठाप्रत पोचण्यासाठी ज्या विविध धार्मिक साधना किंवा योगसाधना सांगितल्या गेल्या आहेत, त्या सर्वांचे मी वाचन केले आहे. एकदा मी साम्यवादाकडेही आकर्षिलो गेलो होतो. परंतु लवकरच मला हे आढळून आले की, या चळवळीत अनेक बुद्धिमान लोक असले, तरी ही चळवळ वस्तुतः प्रतिगामी स्वरूपाचीच आहे. कॅथॉलिक धर्माचेही मला एके काळी आकर्षण वाटत होते व तो धर्म स्वीकारण्याचीही त्या वेळी माझी इच्छा होती. पण एक दिवस एका कॅथॉलिक धर्मगुरूशी बोलत असता, कॅथॉलिक धर्म व साम्यवादाचा तुरुंग यांच्यामध्ये विलक्षण साम्य असल्याचे एकाएकी माझ्या ध्यानात आले.

" एका सामान्य जहाजातून नाविक म्हणून मी बराच भटकून आलो. या भटकंतीत मी हिंदुस्थानात जाऊन जवळजवळ वर्ष घालवले. त्या वेळी संन्यासी होण्याचा मी विचार करीत होतो. पण तसे जीवन जगापासून तुटल्यासारखे झाले असते व तो कल्पनाविश्वातला विहारच ठरला असता. यानंतर एकांतवासात राहून ध्यान करण्याचा प्रयत्न मी काही काळ केला. पण हाही संपुष्टात आला. आज इतक्या वर्षांनंतर अजूनही मला आपल्या विचारांचे मुळीच नियंत्रण करता येत नाही. याच गोष्टीविषयी मला आपल्याशी बोलावयाचे आहे. अर्थात लैंगिक अभिलाषेविषयीही माझ्या काही समस्या आहेत. पण मला जर आपल्या विचारांचे नियंत्रण करता आले, तर मला ग्रासणाऱ्या अभिलाषांचे व उत्कट प्रवृत्तींचे नियंत्रण मला करता येईल, असे वाटते. "

विचारांचे नियंत्रण केल्याने अभिलाषांचे शमन घडून येईल का ? की त्यामुळे अभिलाषांचा केवळ जबरीचा निरोधच केला जाईल ? आणि अशा निरोधामुळे दुसऱ्या अधिक तीव्र समस्या निर्माण होत राहणार नाहीत का ?

" पण अभिलाषेला स्वैर सोडावे असे तर आपण खासच सांगणार नाही. अभिलाषा हे विचाराचेच स्वरूप आहे. म्हणून विचाराचे नियंत्रण केल्याने अभिलाषांचे दमनही आपल्याला करता येईल, अशी आशा मला वाटत होती. अभिलाषांचे एकतर दमन तरी केले पाहिजे किंवा उन्नयन तरी केले पाहिजे. पण त्यांचे उन्नयन

करण्यासाठीही प्रथम त्यांच्यावर नियंत्रण प्रस्थापित करावयास हवेच. साधकाने अभिलाषांच्या पलीकडे गेले पाहिजे असाच बहुतेक गुरूंचा आग्रह असतो आणि हे साध्य करण्यासाठी ते वेगवेगळ्या साधनापद्धती सांगत असतात."

दुसरे काय सांगतात हे क्षणभर बाजूला ठेवा. तुम्हांला या बाबतीत काय वाटते ते प्रथम सांगा. अभिलाषेचे केवळ नियंत्रण केल्याने तिच्यासंबंधीच्या नाना समस्या सुटू शकतील का? अभिलाषांचे दमन किंवा उन्नयन केल्याने आपणाला त्यांचे यथार्थ आकलन होऊ शकेल का? किंवा त्यांच्यापासून आपली मुक्तता होऊ शकेल का? कुठल्याही धार्मिक साधनेमुळे किंवा इतर गोष्टींमुळे माणसाला आपले मन चोवीस तास विशिष्ट अनुशासनात बद्ध करून ठेवता येईल खरे. पण असे व्याप्त मन हे मुक्त मन कधीही असू शकत नाही. केवळ मुक्त मनालाच त्या कालातीत निर्मितीचे दर्शन घडते.

"पण अभिलाषांच्या पलीकडे जाण्यात मुक्तता असते नाही का?"

'अभिलाषांच्या पलीकडे जाणे'—या शब्दांचा तुम्ही काय अर्थ करता?

"स्वतःच्या परम सौख्यासाठी व त्या सर्वोच्चाच्या साक्षात्कारासाठीही माणसाने अभिलाषेचे दडपण नाहीसे केले पाहिजे. तसेच अभिलाषेच्या गोंधळात व खळबळीत अडकून जाता कामा नये आणि अभिलाषेच्या नियंत्रणासाठी अभिलाषादमनाची कुठलीतरी पद्धत ही तर आवश्यकच असते. जीवनातील क्षुद्र गोष्टींमागे धावणारी अभिलाषा त्या परमश्रेष्ठाकडे वळवली तरच त्याचा शोध लागणे संभवनीय होईल, असे मला वाटते."

हे लक्षात घ्या की, अभिलाषेचा विषय तुम्हांला बदलता येईल. धराच्या अभिलाषेपासून ज्ञानाच्या अभिलाषेमध्ये किंवा क्षुद्रवस्तूच्या अभिलाषेपासून सर्वोच्च वस्तूच्या अभिलाषेमध्ये त्याचे परिवर्तन करता येईल. तरी अखेर ही सर्व अभिलाषेचीच प्रक्रिया राहील, होय की नाही? एखाद्याला लौकिक मान्यतेचा लोभ असणार नाही खरा, पण स्वर्गप्राप्तीची ओढ वाटणे हाही लोभाचाच प्रकार नाही का? अभिलाषा ही नेहमी कुठल्यातरी तृप्तीच्या मागे वा साध्याच्या मागे लागत असते. हा जो अभिलाषेचा व्यापार सदैव चालत राहतो त्याचेच आकलन करून घेणे आवश्यक असते. अभिलाषेचे दमन किंवा नियंत्रण करता उपयोगी नाही. अभिलाषेच्या व्यापारांचे यथार्थ आकलन करून घेतल्याशिवाय विचारांचे नुसते नियंत्रण करीत राहण्याला काहीही अर्थ नसतो.

"पण ज्या मुद्यापासून मी बोलावयाला सुरुवात केली होती, त्याच मुद्याकडे पुन्हा वळावेसे मला वाटते. अभिलाषेचे यथार्थ आकलन होण्यासाठीदेखील चित्ताची एकाग्रता होणे हे आवश्यक असत नाही का? आणि माझी अडचण तर नेमकी हीच आहे. मला आपल्या विचारांचे मुळीच नियंत्रण करता येत नाही. ते सारखे भटकत

राहतात, एकावर एक चढत राहतात. माझ्या मनात जे नानाविध विसंगत, असंबद्ध विचार येत राहतात, त्यांच्यामधील एकही विचार प्रभावीपणाने टिकून राहत नाही. "

हे पाहा, आपले मन हे अहर्निश चालत राहणारे असे यंत्र असते. मन जागे असो की निजले असो, त्याचे व्यापार हे अव्याहत चालूच राहतात. त्यांचा कोलाहल सदैव चालू असतो. ते सागराप्रमाणे वेगवान व प्रक्षुब्ध असते. आणि मनाच्या याच गुंता-गुंतीच्या यंत्राचा एक भाग आपल्या समग्र व्यापारांचे नियंत्रण करू पाहत असतो. आणि अशा रीतीने परस्परविरोधी अभिलाषांचा व प्रवृत्तींचा मनामध्ये संघर्ष माजत राहतो. मनाच्या एका भागाला उच्च श्रेणीचा व दुसऱ्या भागाला नीच श्रेणीचा अशी नावे दिली जातात. पण हे दोन्हीही विभाग मनाच्या कक्षेतच वावरत असतात. एखादी कृती वा घटना आणि मनाची वा विचाराची त्या बाबतीतील प्रतिक्रिया या आपोआप व एकाच वेळी घडत राहतात. कशाचाही स्वीकार करणे वा धिक्कार करणे, कशाशी जुळवून घेणे वा त्यापासून मुक्त होऊ पाहणे ही जी मनाची सबोध वा अबोध प्रक्रिया सदैव चालू राहते ती विलक्षण वेगवान असते. म्हणून या गुंतागुंतीच्या व अत्यंत वेगवान यंत्रावर नियंत्रण कसे प्रस्थापित करावयाचे हा आपल्यापुढील प्रश्न नसतो. कारण नियंत्रण करण्याने घर्षण उत्पन्न होत राहते. आणि या घर्षणात शक्तीचा अपव्यय होत राहतो. म्हणून हे विलक्षण गतिमान मन संथ व सावकाश होऊ शकते का हे आपण पाहू या.

" पण ते संथ कसे होऊ शकेल ?"

आपल्या हे ध्यानात आणून द्यावेसे वाटते की, ' कसे होऊ शकेल ?' हा आपल्या-पुढील प्रश्न नाही. ' कसे करावे ' हे समजल्याने विवक्षित परिणाम घडवून आणता येतो, विशिष्ट हेतू साध्य करता येतो हे खरे आहे. पण या परिणामाला वा हेतूला फारसा अर्थ नसतो. दुसरे असे की, एक हेतू साध्य झाला की दुसऱ्या इष्ट हेतूचा शोध सुरू होत असतो. आणि त्याचबरोबर संघर्ष व यातना याही ओघाने येत असतात.

" मग माणसाने करावे तरी काय ?"

तुम्ही विचारता तो खरोखर योग्य प्रश्न नाही, होय की नाही ? मन संथ, शांत होणे हे वास्तव आहे की अवास्तव आहे, या गोष्टीचा तुम्ही स्वत: शोध घेत नाही आहात, तर विशिष्ट परिणाम घडवून आणण्याची चिंता तुम्हांला लागून राहिली आहे. एखादा परिणाम घडवून आणणे हे सामान्यत: सोपे असते, नाही का ? म्हणून मनाचे नियंत्रण केल्याशिवाय सहजपणेच ते स्वस्थ, शांत होऊ शकते का हे आपण आता पाहू या.

" ' मन संथ होणे ' या शब्दांनी आपण काय सुचवीत आहात ?"

जेव्हा तुम्ही मोटरीतून खूप वेगाने जात असाल, तेव्हा भोवतालचा सारा देखावा तुम्हांला अस्पष्ट असाच दिसेल. पण तुम्ही जर त्याच रस्त्याने सावकाश पायी जाल, तर तुम्हांला भोवतालच्या झाडाचे, पक्ष्यांचे वा फुलांचे निरीक्षण बारकाईने करता येईल. मनोव्यापारांच्या बाबतीतही असेच होत असते. मनोव्यापार जसजसे संथ, शांत होत जातात तसतसे आपल्या मनोव्यापारांचे आपणास ज्ञान होऊ लागते. पण यासाठी मन जबरीने मात्र मुळीच संथ करावयाचे नसते. जबरदस्ती केली की प्रतिकार झालाच. या प्रतिकारामुळे मानसिक शक्तीचा व्यर्थ अपव्यय होत राहतो. म्हणून मन जर संथ, शांत व्हावयाचे असेल, तर शक्तीचा असा अपव्यय होता कामा नये. बरोबर आहे ना हे ?

" आता कुठे माझ्या हे ध्यानात येऊ लागले आहे की, विचारांचे नियंत्रण करण्यासाठी मनुष्य जो प्रयत्न करीत असतो, तो अगदी व्यर्थ असतो. तो निव्वळ अपव्ययच असतो. पण अशा प्रयत्नाखेरीज मनुष्य दुसरे काय करू शकेल हे मात्र अजून माझ्या ध्यानात येत नाही. "

पण कृती करण्याच्या प्रश्नापर्यंत तर आपण अजून पोचलोच नाही, होय की नाही ? मनोव्यापार संथ, शांत होत जाणे हेच महत्त्वाचे आहे, हे जाणून घेण्याचा प्रयत्न आपण आतापर्यंत करीत आहोत. ते ' कसे ' संथ करायचे याचा काही आपण विचार करीत नाही. मन संथ होऊ शकेल का आणि असे संथ ते केव्हा होईल, एवढाच आपल्यासमोरचा प्रश्न आहे.

" कोण जाणे काय ते. यावद्दल मी पूर्वी कधी विचारच केलेला नव्हता. "

एखाद्या गोष्टीचे जेव्हा तुम्ही निरीक्षण करीत असता, तेव्हा तुमचे मन संथ होत जाते, ही गोष्ट आजवर तुमच्या लक्षात आली नाही का ? जेव्हा त्या समोरच्या रस्त्याने जाणाऱ्या मोटरीचे तुम्ही निरीक्षण करीत असता, किंवा कुठल्याही वस्तूकडे लक्षपूर्वक पाहत असता, तेव्हा तुमचे मनोव्यापार अधिक संथपणे चालत असतात, होय ना ? निरीक्षण करण्याने, लक्षपूर्वक अवलोकन करण्याने मनोव्यापार सहजपणेच संथ होत जातात. एखाद्या चित्राकडे, मूर्तीकडे वा वस्तूकडे पाहत राहिल्याने मन शांत होण्यास मदत मिळते. विशिष्ट मंत्रजप केल्यानेही हेच घडून येते. पण मग पुढे असे होते की, ती वस्तू वा तो मंत्र यांनाच महत्त्व येऊन बसते आणि मनोव्यापार शांत होण्याचे महत्त्व आणि ते शांत झाल्याने जो काही शोध लागतो त्याचे महत्त्व, या दोहोंचाही माणसाला विसर पडतो.

" आपण आता जे समजावून सांगत आहात, ते मी लक्षपूर्वक ग्रहण करीत आहे. आणि मन शांत होत चालल्याची मला जाणीवही होऊ लागली आहे. "

आपण कशाचे तरी नीट निरीक्षण करीत असतो का सांगा बरे ? की द्रष्टा व दृश्य यांच्यामध्ये आपले नाना पूर्वग्रह, आपली मूल्ये, आपले निर्णय, आपल्या तुलना

आणि आपली दोषैकवृत्ती यांचा पडदा उभा करीत असतो ?

" पण अशा पडद्यावाचून वा चष्म्यावाचून निरीक्षण करता येणे हे जवळजवळ अशक्यच आहे असे मला वाटते. अशा प्रकारच्या स्वप्नाला, दोषरहित दृष्टीने निरीक्षण करता येणे हे निदान मला तरी शक्य आहेसे वाटत नाही. "

मला तुमच्या हे ध्यानात आणून द्यावेसे वाटते की, अशा प्रकारे कुठल्याही प्रवृत्तिपर किंवा निवृत्तिपर निर्णयांनी किंवा शब्दांनी तुम्ही आपले मन बंद करून टाकू नका. या पडद्यावाचून निरीक्षण करता येणे शक्य आहे का, हे आता आपण पाहू या. किंवा हीच गोष्ट वेगळ्या तऱ्हेने मांडता येईल. मन हे जेव्हा कशानेही व्याप्त झालेले नसते, तेव्हा त्याच्यामध्ये एकाग्रता किंवा लक्षपूर्वकता असते का हे आपण पाहू या. व्याप्त न झालेल्या स्वच्छ, मोकळ्या मनालाच काय ते अवधान देणे, लक्षपूर्वक निरीक्षण करणे शक्य असते. मन जेव्हा लक्षपूर्वक निरीक्षण करते, तेव्हाच ते तरल, पण संथ होते. हीच अव्याप्त, स्वच्छ मनाची सावधानता होय.

" आपण जे सांगत आहात, ते मी आता प्रत्यक्षपणे अनभवू लागलो आहे. "

आपण या गोष्टीचे थोडे अधिक पृथक्करण करू या. हे पाहा की द्रष्टा व दृश्य यांच्यामध्ये मूल्यमापन करणाऱ्या वृत्तीचा पडदा जर उभा राहिला नाही, तर त्या उभयतांमध्ये अंतर राहील का ? भेद उरेल का ? द्रष्टा हाच वस्तुतः दृश्य असत नसतो का ?

" आपले हे सांगणे माझ्या मुळीच ध्यानात येत नाही. "

हिरा हा आपल्या गुणांपासून वेगळा करता येतो का, सांगा बरे ? असूया ही भावना त्या भावनेचा अनुभव घेणाऱ्यापासून वस्तुतः वेगळी करता येत नसते. पण ती वेगळी आहे हा माणसाचा भ्रम मात्र कायम असतो. याच भ्रमात्मक वेगळेपणामुळे, याच भेदामुळे मनात संघर्ष माजत असतो आणि याच संघर्षात मानवी मन अडकून राहत असते. हा खोटा, भ्रमात्मक भेद जेव्हा नाहीसा होतो, तेव्हाच विमुक्तता शक्य होते. आणि मगच मन शांत, संथ होते. द्रष्ट्याचा वा अनुभवित्याचा जेव्हा अंत घडून येतो, तेव्हा तेथेच सर्जनशील सत्याचा उदय होतो.

विचारांचे नियंत्रण

रस्ता फार धुळीचा असल्यामुळे मोटरीचा वेग कमी होवो की जास्त होवो, धूळ सारखी उडतच होती. आणि धुळीचे सूक्ष्म कण झपाट्याने मोटरीत शिरत होते. सूर्योदय होण्यास अजून दीडदोन तास अवकाश असला, तरी एवढ्या पहाटे-देखील हवेत एक प्रकारची कोरडी उष्णता जाणवू लागली होती. पण अजून ती तापदायक मात्र वाटू लागली नव्हती. इतक्या पहाटेच्या प्रहरीही रस्त्यावर बैल-गाड्या जाताना दिसत होत्या. गाडीवान सगळे झोपी गेलेले असले, तरी बैल मात्र आपल्या घराकडच्या रस्त्याने सावकाश परतत चालले होते. कधीकधी वाटेत दोन-तीन बैलगाड्या भेटत, तर कधी दहा. आणि एकदा तर पंचवीस बैलगाड्यांची लाबचलांब रांग दिसली. येथेही सर्व गाडीवान स्वस्थ झोपलेले होते. समोरच्या बैल-गाडीला एक कंदील तेवढा ठेवलेला होता. बैलगाड्यांची अशी रांग पार करण्या-साठी रस्त्यावरून मोटर थोडीशी खाली न्यावी लागे. मग धुळीचे लोट उठत राहत. पण बैल मात्र आपल्या वाटेवरून किंचितही बाजूला होत नसत. त्यांच्या गळ्यांतील घुंगरांचा एका तालावर होत असलेला मंजुळ ध्वनी सारखा ऐकू येत राही.

मोटरीने तासाभराचे अंतर कापल्यानंतरही अंधार कायमच होता. वृक्षांच्या काळसर आकृतीत एक प्रकारची स्व-संकुचितता व गूढता दाटून राहिल्यासारखे वाटत होते. आता पक्का रस्ता सुरू झाला होता, पण तो अरुंद असल्यामुळे प्रत्येक बैलगाडी पार करताना मोटर रस्त्याच्या कडेला न्यावी लागे. मग पुन्हा धुळीचे लोळ उठत, बैलांच्या घुंगरांचा मंजुळ ध्वनी कानी पडे आणि पुन्हा काही अंतरावर अधिक बैलगाड्या पार कराव्या लागत. आम्ही पूर्वेकडेच जात असल्यामुळे थोड्या वेळातच पहाट झाली. आकाश किंचितसे उजळले. पण ही स्वच्छ, निरभ्र अशी पहाट नव्हती, दवबिंदूंनी चमकणारी तेजस्वी प्रभात नव्हती, तर उष्णतेच्या जडभाराने आळसावलेली धूसर प्रभात होती. आणि तरीही तिचे सौंदर्य किती विस्मयकारक होते! पर्वतराजी अजून खूप दूर होती. येथून दिसतदेखील नव्हती. पण एवढ्या दूर अंतरावरूनही तिचे सान्निध्य जाणवत होते. ती हिमशीत, विराट व कालमुक्त अशी उत्तुंग पर्वतराजी होती.

रस्ता तऱ्हेतऱ्हेच्या खेड्यांमधून जात होता. काही खेडी स्वच्छ, नीटनेटकी व व्यवस्थित राखलेली दिसत होती, तर काही घाणीने, दैन्याने व दारिद्र्याने पीडलेली दिसत होती. पुरुष आपापल्या शेतांकडे चालले होते, स्त्रिया विहिरीवर पाणी भर-ण्यास निघाल्या होत्या आणि मुले रस्त्यावर कोलाहल माजवीत हसतखेळत होती. रस्त्याच्या कडेला मैलोगणती सरकारी शेते पसरली होती. तेथे मधूनमधून

ट्रॅक्टर, माशांची तळी व शेतकीशाळा दिसून येत होत्या. इतक्यात एक भव्य मोटर वाजूने गेली. तिच्यात श्रीमंत व सुखवस्तू लोकांची गर्दी दिसून येत होती. रस्त्याच्या दोन्ही वाजूंची जमीन सकस व समृद्ध असलेली दिसत होती. मधूनमधून नद्यांच्या कोरड्या वालुकामय पात्रांतून रस्ता जात होता. येथे तो रस्ता राहिलेला नव्हता. पण बैलगाड्या, वसेस व मोटरी यांच्या वर्दळीमुळे तेथे चाकोऱ्या पडलेल्या होत्या. हिरव्या अंगांचे व लालचुटुक चोचींचे पोपट उडता उडता परस्परांना साद घालीत होते. काही हरितसोनेरी रंगाचे लहानसर पक्षी व भातशेतांवर उडणारे पांढरेशुभ्र पक्षीही तेथे दिसत होते.

आता सपाट रस्ता सोडून मोटरीने घाट चढण्यास आरंभ केला होता. पायथ्याच्या टेकड्यांवरील दाट झुडपे बुलडोझरच्या साहाय्याने उपटून टाकली गेली होती व या मोकळ्या जागेवर मैलोगणती फळझाडे लावली जात होती. मोटर जसजशी वरवर चढू लागली, तसतशा टेकड्या मागे पडत गेल्या. आणि आता पर्वताच्या चढणीला प्रारंभ झाला. रस्त्याच्या दुतर्फा सरळ सुकुमार पाईन वृक्षांची व पुष्पगुच्छांनी बहरलेल्या चेस्टनट वृक्षांची दाटी दिसून येत होती. मोटर जसजशी उंच चढू लागली, तसतसा अधिकाधिक विशाल प्रदेश दृष्टिपथात येऊ लागला. मैलोगणती विस्तीर्ण दऱ्याखोरी पसरलेली दिसत होती आणि त्यांच्याही पलीकडे ती उत्तुंग हिमशिखरे दृष्टीस पडणार होती.

डोंगराचे अखेरचे वळण घेऊन वर चढल्यावरोवर समोरच ती उत्तुंग, विराट पर्वतराजी झळकताना दिसली. तिच्यात व आमच्यात साठ मैलांचे अंतर होते व एक अफाट निळसर दरी पसरली होती. दोनशे मैल लांबीच्या त्या विराट पर्वतश्रेणींने संपूर्ण क्षितिज व्यापून टाकले होते. उजवीकडे व डावीकडे मस्तक पूर्ण वळवले, तरच ती प्रदीर्घ पर्वतश्रेणी एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत दृष्टिपथात येऊ शकत होती. ते विलक्षण, विस्मयकारक व अदभुत असे दृश्य होते. पाहता पाहता आम्हा उभयतांमधील ते साठ मैलांचे अंतर अंतर्धान पावल्यासारखे वाटत होते. आणि त्या नगाधिराजाचे ते विराट सौंदर्यशाली सामर्थ्य आणि तो नीरव, निःशब्द एकांत एवढाच काय तो जाणवत होता. या हिमशिखरांपैकी काही काही पंचवीस हजार फुटांपेक्षाही अधिक उंच होती. त्यांना देवदेवतांची नावे दिलेली होती. देवता तेथे वास करतात अशी लोकांची श्रद्धा होती. म्हणून दूरदूरच्या अंतरावरून लोक तेथे यात्रेसाठी, पूजेसाठी किंवा अखेरचा देह ठेवण्यासाठी येत असत.

भेटण्यास आलेला गृहस्थ सांगत होता की, आपले शिक्षण परदेशांत झाले असून शासनात आपण वऱ्याच उच्च पदावर होतो. पण वीस वर्षांपूर्वीच हे उच्चपद व लौकिक जीवनरीत सोडून देण्याचा आपण निर्णय घेतला आणि उरलेले सर्व आयुष्य ध्यानसाधनेत वेचावयाचे ठरवले.

तो पुढे सांगू लागला, " ध्यानधारणेच्या वेगवेगळ्या साधना मी आजवर आचरल्या व अखेर मला विचारावर पूर्ण नियंत्रण प्राप्त करून घेता आले. या बरोबरच स्वतःवर संपूर्ण स्वामित्व व काही सिद्धी याही गोष्टी मला प्राप्त झाल्या. पण एवढ्यात एका मित्राने मला आपले प्रवचन ऐकण्यास नेले. या प्रवचनात ध्यानासंबंधीच्या एका प्रश्नाला उत्तर देताना आपण सांगितले की, जे ध्यान सामान्यतः केले जाते, तो स्वयं-संमोहनाचाच एक प्रकार असतो; स्व-प्रक्षेपित अभिलाषांचेच ते संवर्धन असते. मग त्या अभिलाषा कितीही सुसंस्कारित वा उदात्त गणल्या जात असोत. आपले हे म्हणणे मला इतके पटले की, मी लागलीच आपली भेट घेण्याचे ठरवले. आजवर मी आपले स्वतःचे आयुष्य ध्यानधारणेलाच वाहिलेले असल्यामुळे, या प्रश्नाच्या अंतर्यामात मला खोलवर शिरता येईल, अशी माझी समजूत आहे.

" या मार्गातील माझा विकास कोणकोणत्या अवस्थांतून होत गेला, याची प्रथम आपल्याला काहीशी कल्पना द्यावी असे मला वाटते. यासंबंधी मी जे काही वाचले होते, त्यावरून माझीही खात्री झाली होती की, या मार्गात काही साधण्यासाठी साधकाला आपल्या विचारांचे संपूर्ण नियंत्रण करता आले पाहिजे. आरंभी ही गोष्ट मला अतिशय अवघड वाटली. कारण आपल्याला व्यावसायिक कामात एकाग्रचित्त होणे हे वेगळे असते. पण मन स्थिर करून विचारांच्या संपूर्ण प्रक्रियेला विशिष्ट वळण लावणे हे सर्वस्वी भिन्न स्वरूपाचे असते. आपल्याला विचारांच्या नियंत्रणाचा लगाम हा सर्वस्वी आपल्या हातात असला पाहिजे, असे यासंबंधीच्या ग्रंथात सांगितलेले असते. विचारांचे पूर्ण नियंत्रण करून त्याला विशिष्ट वळण लावल्याशिवाय, नानाविध भ्रमांचा भेद करू शकणारी तीक्ष्ण धार विचाराला प्राप्त होणार नाही, असेही या ग्रंथात प्रतिपादन केलेले असते. त्यामुळे हेच माझे प्रथम कर्तव्य होऊन बसले."

तुमच्या कथनाचा ओघ मध्येच न थांबविता, तुम्हांला एवढेच विचारावेसे वाटते की, विचारांचे नियंत्रण करणे हेच साधकाचे प्रथम कर्तव्य असते का ?

" आपण आपल्या प्रवचनात एकाग्रचित्ततेबद्दल जे सांगितले ते मी ऐकले आहे. पण माझ्या आजवरच्या अनुभवांचे संपूर्ण कथन प्रथम आपल्यापाशी करावे आणि मगच त्यातून उद्भवणाऱ्या महत्त्वाच्या मुद्यांचा विचार करावा, अशी माझी इच्छा आहे. असेच करू ना ? "

ठीक आहे. तुम्हांला हवे तसेच करा.

" माझ्या पूर्वीच्या व्यवसायाबाबत मी प्रथमपासूनच असंतुष्ट होतो. त्यामुळे हा उत्तम मानला गेलेला व्यवसाय सोडून देण्याची मला मुळीच खंत वाटली नाही. ध्यानावरील बरेच ग्रंथ मी वाचलेले होते आणि पौर्वात्य व पाश्चात्य अशा दोन्ही प्रकारच्या साक्षात्कारी पुरुषांचे विचार व अनुभव हेही मी अवधानात घेतले होते.

त्यामुळे विचारांचे नियंत्रण करता येणे हीच आद्य महत्त्वाची गोष्ट आहे हे मला स्पष्ट दिसत होते. त्यामुळे यासाठी दीर्घकाल सहेतुक स्वरूपाचा प्रयत्न करीत राहणे हे आवश्यकच होऊन बसले. ध्यानधारणेमध्ये माझी जसजशी प्रगती होत गेली, तसतशी मला श्रीकृष्ण, ख्रिस्त व काही हिंदू साधुपुरुष यांचा साक्षात्कार होऊ लागला. दृष्टीपलीकडच्या घटना दिसू लागल्या. इतरांचे मनोगत मला सहजगत्या कळू लागले. इतरही काही सिद्धी मला प्राप्त झाल्या. एका अनुभवानंतर दुसरा अनुभव, एका दर्शन साक्षात्कारानंतर दुसरा साक्षात्कार व त्यांचे प्रतीकदृष्टीने माहात्म्य–या क्रमाने मला या गोष्टी प्राप्त होत गेल्या. निराशेमधून परमानंदाच्या अत्युच्च स्वरूपापर्यंत मी पोचलो. स्वतःवर संपूर्ण स्वामित्व प्राप्त केल्याचा, एखाद्या विजेत्याचा अभिमान मला वाटू लागला. तपस्येमुळे व स्वतःवरील संपूर्ण स्वामित्वामुळे साधकामध्ये सामर्थ्याची एक आगळीच जाणीव उत्पन्न होत असते. आणि याच जाणिवेतून आत्मविश्वास, गर्व व बलशालिता यांचाही उद्भव होत असतो. या समृद्धिशाली अवस्थेचे अत्युच्च शिखर मी गाठले होते. आपल्याविषयी मी बऱ्याच वर्षांपासून ऐकत होतो. पण स्वतःच्या सिद्धीसामर्थ्याचा अपार अभिमान आपले प्रवचन ऐकण्याआड येत होता. पण माझ्या एका संन्यासी मित्राने आपले प्रवचन ऐकण्यास जाण्याचा मला अतिशय आग्रह केला आणि आपल्या प्रवचनांत मी जे ऐकले त्याने मी अत्यंत विचलित होऊन गेलो. यापुढे आपणांला कोणतीही गोष्ट विचलित करू शकणार नाही, अशी यापूर्वी माझी कल्पना होती. माझ्या ध्यानधारणेचा इतिहास थोडक्यात असा आहे.

" आपण आपल्या प्रवचनात सांगितले होते की, मन हे आपल्या अनुभवाच्या पलीकडे गेले पाहिजे; नाहीतर ते स्वतःच्याच विक्षेपाच्या, अभिलाषांच्या व साध्यांच्या तुरुंगात अडकून राहील. आपले हे म्हणणे ऐकताच, माझे स्वतःचेही मन नेमक्या याच प्रकाराच्या गोष्टींत अडकून गेले आहे हे ध्यानात येऊन मी अत्यंत विस्मयचकित होऊन गेलो. पण ही गोष्ट ध्यानात आल्यानंतरही, मला हे समजेना की, मनाने स्वतःभोवती बांधलेले पक्के परकोट स्वतःच कसे काय जमीनदोस्त करून टाकावयाचे ? माझी गेली वीस वर्षे ही अगदी व्यर्थच गेली का ? माझा हा वीस वर्षांचा ध्यानसाधनेतील प्रवास भ्रमविण्यातलाच प्रवास झाला का ? "

हे पाहा, कृती कोणती घडून यावी यावद्दल आपण नंतर विचार करू या. पण तुमची हरकत नसेल तर विचारांच्या नियंत्रणाचाच प्रश्न आपण प्रथम हाती घेऊ. विचारांचे निमंत्रण करणे हे आवश्यकच आहे का ? असे करणे हे कल्याणकारी आहे की, विनाशकारी आहे ? विचारांचे नियंत्रण करणे ही साधनामार्गातील पहिली पायरी आहे असे धर्मगुरूंनी म्हटलेले असेलही. पण हे म्हणणे बरोबर आहे का ? हा नियंत्रण करणारा वस्तुतः असतो तरी कोण ? ज्या विचारांचे नियंत्रण

करण्याचा तो प्रयत्न करीत असतो, त्या विचारांचाच तो एक अंश नसतो का ? आपण विचारांपासून भिन्न आहोत, असे तो खुशाल समजो. पण वस्तुतः तो विचारांपासूनच निर्माण झालेला नसतो का वरे ? दुसरी लक्षात घेण्याची गोष्ट ही आहे की, विचारांचे नियंत्रण करण्याची कृती ही इच्छाशक्तीने, जबरीने घडवून आणलेली कृती असते आणि ही कशासाठी केली जात असते ? तर जे जे आपणास नको आहे, अनिष्ट आहे ते दडपून टाकण्यासाठी, त्याचा प्रतिकार करण्यासाठी आणि त्याच्यावर पूर्ण स्वामित्व प्रस्थापित करण्यासाठीच ही कृती केली जात असते. आणि ही विचारनियंत्रणाची समग्र प्रक्रिया चालू असता साधकाला फार मोठ्या यातनांतून व अतिशय तीव्र संघर्षातून जावे लागत असते, होय की नाही ? पण संघर्षाने कुणाचेही कल्याण होऊ शकते का वरे ?

ध्यानामध्ये एकाग्रचित्त होणे म्हणजे केवळ अहंकेंद्रित असा एखादा वर्तुळ घडवून आणणे होय. या एकाग्रचित्ततेचा सगळा भर कशावर असतो ? तर अहंच्या परिमित कक्षेमध्येच कृती घडविण्यावर असतो. एकाग्रचित्तता म्हणजे दुसरे काही नसून विचाराला अधिकाधिक संकुचित करून टाकण्याची प्रक्रियाच होय. लहान मूल हे एखाद्या खेळण्यामध्ये पूर्णपणे गुंतून, गुंगून राहत असते. मुलाचे खेळणे जसे त्याला गुंगवून शांत, स्तब्ध करून टाकते, त्याचप्रमाणे प्रतिमा, प्रतीक व शब्द हे देखील मनाला गुंतवून त्याचे अविश्रांत चालणारे व्यापार थांबवून टाकीत असतात. आणि अशा रीतीने चित्त एका ठिकाणी गुंतून जाण्यालाच एकाग्रचित्त होणे असे नाव दिले जात असते. या प्रकारात प्रतिमा-प्रतिकारासारखी एखादी आंतरिक वा बाह्य वस्तू मनाचा पूर्ण ताबा घेत असते आणि मग त्या प्रतिमेला किंवा त्या विशिष्ट वस्तूलाच सर्वंकष माहात्म्य प्राप्त होत असते आणि मनोव्यापारांचे आकलन करून घेण्याची मुख्य गोष्ट ही वाजूलाच पडते. वस्तुतः कोणत्याही गोष्टीवर एकाग्रचित्त करणे हे सामान्यतः सोपे असते. कारण कुठलेही खेळणे हे मनाला सहज गुंगवून टाकते, मनाची एकाग्रता घडवून आणते. पण अशा एकाग्रतेने एक गोष्ट मात्र कधीही शक्य होत नसते. मनःसीमांपलीकडे जर काही वसत असेल व आपल्याला जर मनःसीमांच्या पार जावयाचे असेल, तर त्या चित्तातीताचा शोध घेण्यासाठी मन विमुक्त करून टाकणे, हे मात्र एकाग्रतेने कधीही शक्य होत नसते.

" आपण जे सांगत आहात ते, आम्ही आजवर जे वाचले वा जे शिकलो त्याच्यापेक्षा विलक्षण भिन्न आहे आणि तरीही ते सत्य आहे हे मला जाणवत आहे. नियंत्रण या शब्दाने काय काय सूचित होते, याचे मला आता आकलन होऊ लागले आहे. पण कोणते तरी अनुशासन स्वीकारल्याशिवाय मन हे मुक्त कसे वरे होऊ शकेल ? "

पण हे ध्यानात घ्या की, अवरोध करण्याने किंवा कशाशी जुळवून घेत राहण्याने

मन कधीही मुक्त होत नसते. आपल्या बंधनाचे यथार्थ आकलन होणे, हेच मुक्तीकडे नेणारे पहिले पाऊल असते. एखादे अनुशासन स्वीकारल्याने वर्तनाला विशिष्ट वळण लावता येते आणि यामुळे विशिष्ट साच्यात मनाला ढाळता येते हे खरे. पण प्रथम आपल्या अभिलाषेचे यथार्थ आकलन करून न घेता, विचारांचे नुसते नियंत्रण करीत राहिले तर विचार विकृत बनून जातो. याच्या उलट, अभिलाषेच्या विविध रीतींचे जेव्हा दर्शन होते, तेव्हा हे दर्शनच मनाला स्पष्टता व सुव्यवस्था प्राप्त करून देते. एकाग्रचित्त होणे ही वस्तुतः अभिलाषेचीच रीत असते. व्यवसाय धंदा करणारा मनुष्य हादेखील एकाग्रचित्त होऊनच काम करीत असतो. कारण त्याला धन किंवा सत्ता मिळवावयाची असते. याचप्रमाणे मनुष्य जेव्हा एकाग्रचित्त होऊन ध्यान करू लागतो, तेव्हा त्यालाही काही साध्य करावयाचे असते, कसलेतरी पारितोषिक मिळवावयाचे असते. व्यवसाय करणारा व ध्यान करणारा हे दोघेही यशाच्या किंवा साफल्याच्या मागे लागलेले असतात. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास साहजिकच वाढत राहतो आणि सुरक्षिततेची भावनाही बळावत जाते. वस्तुस्थिती ही अशीच आहे, असे नाही का तुम्हांला वाटत ?

" आपण जे स्पष्ट उकलून सांगत आहात, ते मी लक्षपूर्वक ग्रहण करीत आहे. "

पण कुठल्याही गोष्टीचे शाब्दिक ग्रहण करणे हे केवळ बौद्धिक ग्रहणच असते. त्यामुळे त्याला कसलीही किंमत नसते, हे खरे नाही का ? निव्वळ शाब्दिक आकलन हे मनाच्या मुक्ततेला उपकारक होत नसते. तर जे सांगितले जात आहे त्यातील सत्यतेचे वा असत्यतेचे प्रत्यक्ष दर्शन हेच मनाला मुक्त करीत असते. एकाग्रचित्त होण्याने कोणकोणत्या गोष्टी सूचित होतात, याचे जर आपल्याला यथार्थ आकलन झाले आणि असत्यातील असत्यात्वाचे आपणास साक्षात दर्शन घडले, तर साध्य गाठण्याच्या, अनुभव घेण्याच्या किंवा कुणीतरी विशेष होण्याच्या अभिलाषेपासून आपले मन मक्त होऊन जाईल. या अभिलाषा-मुक्तीमधून सावधानचित्तता उदयास येत असते आणि एकाग्रचित्ततेपासून सर्वस्वी भिन्न अशी ही अवस्था असते. एकाग्रचित्ततेमध्ये दुहेरी प्रकारची प्रक्रिया गर्भीत असते. एकतर तेथे हेतूची निवड केली जात असते आणि हेतुसिद्धीसाठी प्रयत्न केला जात असतो, असेच नाही का ? तेथे प्रयत्न करणाराही असतो व प्रयत्नाने गाठावयाचे साध्यही असते. त्यामुळे एकाग्रचित्तता ही अहंलाच बळ मिळवून देत राहते. ती त्या अहंचे, त्या प्रयत्न करणाराचे, त्या विजेत्याचे, त्या सद्‌गुणवंताचेच सतत पोषण करीत असते. सावधानचित्ततेमध्ये मात्र ही दुहेरी प्रक्रिया मुळीच अस्तित्वात नसते. तेथे त्या अनुभवित्याचा, त्या अहंचा अभाव असतो, तेथे स्मृती वा अनुभव संचित करणाराचा, त्यांचा संग्रह करणाराचा व त्या संग्रहाची पुनरावृत्ती करणाराचा पूर्ण अभाव घडून आलेला असतो. सावधानचित्ततेच्या या अवस्थेत साफल्यासाठी होणारा संघर्ष

आणि अपयशाची भीती या दोहोंचाही अंत घडून आलेला असतो.

"पण हे सावधानचित्ततेचे भाग्यशाली वरदान दुर्दैवाने फारच थोड्यांच्या वाटघाला येत असते."

छे, छे, ती भाग्यवंतांना मिळणारी देणगी किंवा वरदान मुळीच नव्हे किंवा ते पारितोषिकही नव्हे. अनुशासन किंवा साधना यांच्या साहाय्याने विकत घेण्यासारखीही ती वस्तू नव्हे. आपल्या अभिलाषेचे जेव्हा मनुष्याला यथार्थ आकलन होते, म्हणजेच जेव्हा त्याला स्वतःच्या मनोव्यापारांचे साक्षात दर्शन घडते, तेव्हाच ते जे चित्तातीत ते तेथे अवतरते. ही सावधानचित्तावस्था म्हणजेच कल्याणमयता. तिच्यात अहंचा पूर्ण अभाव घडून आलेला असतो.

"मग माझा इतक्या वर्षांचा प्रदीर्घ प्रयत्न व अनुशासन ही सगळी व्यर्थच गेली म्हणावयाची का? त्यांना काहीच का किंमत नाही? पण हा प्रश्न विचारता विचारताच मला यातील सत्याचे दर्शन घडू लागले आहे. आता मला हे स्पष्ट दिसून येत आहे की, वीस वर्षांहून अधिक काळ जी जीवनरीत मी आचरिली, तिने मला अहंनिर्मित तुरुंगात अपरिहार्यपणे बद्ध करून टाकले. आणि याच तुरुंगात मी जीवन जगलो, अनुभव घेतले व दुःखे भोगली. बाकी जे होऊन गेले त्याच्याबद्दल अश्रू ढाळणे हाही आत्मनिरततेचा किंवा आत्मानुकंपेचाच प्रकार ठरेल. म्हणून एका वेगळ्या दृष्टीने मला पुन्हा जीवनाला प्रारंभ केला पाहिजे. पण आजवर मला जी जी दिव्य दर्शने घडली, जे जे गूढ अनुभव आले, त्यांचे काय? तेही सर्व खोटे, भ्रमात्मक व कवडीमोलाचेच होते का?"

अशा दर्शनांमागील प्रक्रियेचा आपण विचार करू या. मानवाचे मन हा त्याच्या सर्व अनुभवांचा, विचारांचा व त्याला घडलेल्या सर्व दर्शनांचा एक प्रचंड संग्रह असतो. हजारो-लाखो वर्षांच्या मानवी परंपरांचा व अनुभवांचा तो परिपाक असतो. अत्यंत साध्या कल्पनांपासून तो अतिशय संकीर्ण स्वरूपाच्या कल्पनानिर्मितीचे अफाट सामर्थ्य या मनामध्ये वसत असते. अत्यंत असाधारण व विलक्षण स्वरूपाचे भ्रमाभास उत्पन्न करणे आणि विराट स्वरूपाची दिव्य दर्शने निर्माण करणे हे या मनाला लीलेने करता येते. मानवी जाणिवेच्या सखोल स्तरांमध्ये सामूहिक व व्यक्तिगत जाणिवेतील सर्व अनुभव संग्रहित केलेले असतात. मानवाच्या सर्व आशा-आकांक्षा, साऱ्या चिंता-काळज्या, सगळी सौख्ये व सर्व एकत्रित ज्ञान व अनुभव ही सगळी तेथे संचित स्वरूपात अस्तित्वात असतात. त्यामुळे सामूहिक वारशाने प्राप्त झालेल्या किंवा स्वतः मिळविलेल्या अनुभवांचा किंवा दिव्य दर्शनांचा पुन्हापुन्हा आस्वाद घेणे हे व्यक्तीला सहजशक्य असते. काही विशिष्ट औषधींमुळेही दृष्टीला व सर्व इंद्रिय-संवेदनांना विशेष स्पष्टता व सूक्ष्मता प्राप्त होत असते. आणि दृश्यांच्या अथांगतेचा व उत्तुंगतेचाही सहज प्रत्यय येत असतो. आणि यामुळे

दुःखसंघर्षांपासून व्यक्तिमन मुक्त होते आणि त्याला अतीव सामर्थ्य व सूक्ष्म दृष्टी यांचा लाभ होतो, असेही आपणांस सांगण्यात येत असते. पण प्रकाशाप्रत पोचण्यासाठी एवढ्या गुप्त व अंधाऱ्या मार्गांचा प्रवास करणे हे मानवी मनाला आवश्यकच आहे का बरे? समजा, की अशा कुठल्यातरी उपायांनी मन हे एकदाचे प्रकाशाप्रत पोचले, तरी तो त्या अनंताचा, त्या शाश्वताचा प्रकाश असतो का? की तो त्या ज्ञाताचा, त्या परिचिताचाच प्रकाश असतो? की तो आशा, प्रयत्न व शोध यांच्यांतूनच उत्पन्न झालेला प्रकाश असतो? त्या अमर्यादाचे दर्शन होण्यासाठी एवढ्या कंटाळवाण्या प्रक्रियेतूनच मनुष्याला गेले पाहिजे का? हे सर्व बाजूला सारून त्या प्रीतिनामक वस्तूकडे आपल्याला सरळच नाही का जाता येणार? तुम्हांला सर्व प्रकारच्या दर्शनांचा, अनुभवांचा व सिद्धींचा अनुभव येऊन चुकला आहे. तेव्हा तुमचे यावावत काय म्हणणे आहे सांगा बरे?

"जोपर्यंत हे गूढ अनुभव मला येत होते, ही दिव्य दर्शने मला घडत होती, तोपर्यंत त्यांचे माहात्म्य मला साहजिकपणेच वाटत होते. एका सुखकर सामर्थ्याचा प्रत्ययही मला येत होता. इष्ट साध्याची पूर्तता घडून आल्याचा संतोष मला सुखवीत होता. साधकाला जेव्हा या विविध सिद्धी प्राप्त होत असतात, तेव्हा त्याला थोर आत्मविश्वासाचा प्रत्यय येत असतो. आत्मस्वामित्वाच्या जाणिवेने त्याचा अभिमान पराकोटीला पोचतो. आता आपल्याशी बोलणे झाल्यानंतर मात्र, त्या दिव्य दर्शनांचे व सिद्धींचे जे विशेष माहात्म्य मला पूर्वी वाटत होते, ते वाटेनासे झाले आहे. मला हे जे नवे आकलन होत आहे, त्याच्या स्वच्छ प्रकाशात या सर्व गोष्टी ओसरून दूरदूर निघून गेल्यासारख्या वाटत आहेत."

आता हे सांगा की, अशा प्रकारच्या अनुभवातून जाणे हे मनुष्याला खरोखरच आवश्यक आहे का? त्या अज्ञाताचे, त्या अनंताचे दार उघडण्यासाठी या सर्व गोष्टींची काहीतरी गरज आहे का बरे? या सर्व गोष्टी माणसाने पार दूर सारावयाला नकोत का? खरोखर काही आवश्यक असेल, तर ते आत्मदर्शन हेच होय. आत्मदर्शनानेच मन शांत, निःस्तब्ध होत असते. ही शांती, ही निःस्तब्धता, इच्छाशक्तीने, अनुशासनाने किंवा अभिलाषादमनाच्या विविध उपायांनी मनाला कधीही प्राप्त होत नसते. या सर्व उपायांमुळे अहंलाच अधिकाधिक बळ प्राप्त होत असते. आणि मग हा परिपुष्ट झालेला अहं सद्‌गुणांच्या पक्क्या दगडी पायावर प्रतिष्ठा व माहात्म्य यांची एक नवी इमारत उभी करीत असतो. वस्तुस्थिती अशी असल्यामुळे अज्ञेयाचा अवतार होण्यासाठी सर्व प्रकारच्या ज्ञात गोष्टींपासून मन संपूर्णपणे मुक्त झाले पाहिजे. यासाठी अहंच्या विविध व्यापारांचे मनुष्याला यथार्थ आकलन झाले पाहिजे. ते जोवर होणार नाही तोवर सद्‌गुणशालिता ही थोरपणाची वस्त्रे लेवून स्वतःला सजवीत नटवीत राहील. म्हणूनच अहंचे सर्व व्यापार — त्याच्या इच्छा-

शक्तीचे, अभिलाषेचे, त्याच्या सर्व शोधांचे व संग्रहांचे सर्व व्यापार --पूर्ण थांबून गेले पाहिजेत. असे झाले, तरच ते कालातीत तेथे अवतरेल. आवाहन केल्याने ते कधीच येत नसते. आपल्या विविध तपस्यांच्या, साधनांच्या, प्रार्थनांच्या व वृत्तिप्रवृत्तींच्या द्वारा जे मन सत्याला आवाहन करू पाहते, त्याच्या हाती स्वनिर्मित प्रक्षेपच काय ते पडतील. पण ते मर्यादातीत, कालातीत सत्य मात्र तेथे कधीही असणार नाही.

" आता मला ही स्पष्ट जाणीव होत आहे की, इतक्या वर्षांच्या प्रदीर्घ तपस्येनंतर व आत्मक्लेशांनंतरही माझे मन स्वनिर्मित तुरुंगामध्येच अडकलेले आहे. या तुरुंगाचे परकोट मला जमीनदोस्त करून टाकलेच पाहिजेत, हीही तीव्र जाणीव मला होऊ लागली आहे. पण यासाठी आरंभ कुठून करावयाचा हे मात्र मला कळत नाही. "

हे परकोट जमीनदोस्त झालेच पाहिजेत एवढी स्पष्ट जाणीव यासाठी पुरेशी आहे. पण हे परकोट फोडण्यासाठी तुमच्याकडून जर कोणतीही कृती केली जाईल, तर पुन्हा ती साध्य करण्याची, प्राप्त करून घेण्याची अभिलाषा वर उसळून येईल. मग परस्परविरुद्ध अभिलाषांचा संघर्ष माजू लागेल. अनुभविता व अनुभव हे पुन्हा उठून येतील. म्हणून आता असत्याच्या असत्यत्वाचे स्पष्ट दर्शन होणे एवढेच पुरेसे आहे. कारण हे स्पष्ट, स्वच्छ दर्शनच मनाची असत्यापासून संपूर्ण मुक्तता घडवून आणीत असते.

अगाध विचार संभवनीय आहे का ?

तालवृक्षांपासून बऱ्याच दूर दूर अंतरावर तो अस्वस्थ, प्रक्षुब्ध, निष्ठुर सागर पसरला होता. शांती कशी ती त्याला माहीतच नसे. त्याच्या विशाल लाटा अविरतपणे अधिकाधिक उंच उंच उसळत राहत. रात्रीच्या नीरव निःस्तब्धतेत त्याची गर्जना दुरूनही ऐकू येत असे. त्याच्या गहनगंभीर गर्जनेत एक प्रकारची धमकी, एक तऱ्हेची संकटाची सूचना गर्भित असे. पण समुद्रापासून दूर दूर असणाऱ्या या तालवृक्षांच्या राईत मात्र घनदाट छायांचे व निःशब्द नीरवतेचेच प्रशांत साम्राज्य पसरले होते. ती पौर्णिमेची रात्र होती. चांदणे जवळ जवळ दिनप्रकाशाइतकेच स्वच्छ पडले होते. पण त्यात सूर्यप्रकाशाची उष्णताही नव्हती व डोळे दिपविणारी भारवताही नव्हती. तालवृक्षांवर पडलेले चांदणे अतीव सौम्य व मोहक भासत होते. ते सौंदर्य तालवृक्षांवर चमकणाऱ्या चांदण्याचेच केवळ नव्हते, तर त्या वृक्षांच्या घनदाट छायांचे, त्यांच्या सरळसुंदर बुंध्यांचे, त्या चमचमणाऱ्या सागर लहरींचे आणि या समृद्धिसंपन्न वसुंधरेचे संमीलित सौंदर्य होते. ही पृथ्वी, हे आकाश, रस्त्याने जाणारा तो मनुष्य, ते ओरडणारे बेडूक आणि दूरच्या आगगाडीची ती शीळ हे सारे सारे एकच चैतन्यमय अस्तित्व होते. मनाने मोजता-मापता येण्याच्या पार पलीकडचे होते.

आपले मन हे एक विलक्षण विस्मयकारक असे साधन वा उपकरण आहे. मनुष्याने निर्माण केलेले कोणतेही यंत्र इतके, सूक्ष्म, इतके संकुल, संकीर्ण आणि अनंत संभवांनी इतके परिपूर्ण असे नाही. पण आपल्याला या मनाची जेव्हा कधी कवी जाणीव होते, तेव्हा ती मनाच्या वरच्या उथळ स्तरांचीच काय ती जाणीव होते. आणि या उथळ स्तरांवरील जीवन जगण्यामध्येच आपण सर्वजण संतुष्ट असतो. विचार हा मनाचा व्यापार आहे हे आपण मान्य करीत असतो; मग तो विचार हा विराट प्रमाणावर हत्येची योजना आखणाऱ्या सेनापतीचा विचार असो, की एखाद्या धूर्त राजकारण्याचा विचार असो; एखाद्या विद्वान प्राध्यापकाचा विचार असो, की एखाद्या सामान्य सुताराचा विचार असो. पण विचार कुणाचाही असला, तरी वस्तुतः तो गहन वा अगाव स्वरूपाचा असा कधीतरी असतो का ? सर्व प्रकारचा विचार हा मनाच्या उथळ स्तरांवरचाच व्यापार नसतो का ? विचार करताना मन हे कधीतरी गहन स्तरांवर असते का ? विचाराने घडविलेल्या या मनाला, कालस्मृती वा अनुभव यांचा परिपाक असलेल्या या मनाला, जे त्याच्या अंगचे नाही, त्याची जाणीव कवीतरी होऊ शकेल का ? पण हे मन आपल्या स्वसंकुचित व्यापारांपलीकडे असणारे असे काहीतरी सदैव शोधीत मात्र असते,

त्याच्या पाठीमागे सारखे धावत असते. पण ज्या केंद्रापासून त्याचा हा शोध चाललेला असतो, ते केंद्र मात्र सदैव पूर्ववतच राहत असते.

वाकी मानवी मन हे काही अशा केवळ उथळ व्यापारांचेच बनलेले नसते. युगान्-युगे जे मनोव्यापार असंख्य मानवी मनात सुप्त-गुप्तपणे चालत आलेले आहेत, त्या सर्व व्यापारांचे मिळून हे मन वनलेले असते. मनातील सुप्त, सखोल व्यापार हे वरच्या उथळ व्यापारांचे नियंत्रण करीत असतात, त्यांच्यांत वदल घडवून आणीत असतात. त्यामुळे हे सुप्त, सखोल मनोव्यापार व उथळ मनोव्यापार यांच्यामध्ये द्वंद्वात्मक प्रकारचा संघर्ष माजत राहतो. मन हे पूर्ण किंवा एकात्म असे नसते, तर परपस्परविरुद्ध अशा भिन्न विभागात त्याचे तुकडे तुकडे होऊन गेलेले असतात. आपल्या या तुटून वेगळचा झालेल्या तुकडयांना मग मन एकत्रित करू पाहते, त्यांची एकात्मता साधू पाहते. पण या भिन्न भिन्न, परस्परविरोधी अंशांमध्ये सुसंवाद किंवा शांती निर्माण करणे त्याला शक्य होत नाही. ज्ञान, अनुभव व विचार यांचे साह्य घेऊन जे मन मुद्दाम एकात्म वनविले जाते, तो कालाचाच परिपाक असतो, तो दुःखवेदनांचाच परिणाम असतो. हे मन मुद्दाम एकात्म वनविले गेले असल्यामुळे, ती परिस्थितिजन्य अशीच वस्तू होऊन वसते; परिस्थितीच्या आघातांपलीकडे गेलेली वस्तू नसते.

एकूणच, एकात्मतेच्या समस्येकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन हा अगदी चुकीचा वा अयथार्थ असतो. अंशाला पूर्ण होणे कधीही शक्य नसते. अंशांच्या जुळणीच्या द्वारा पूर्णता कधीही घडून येत नसते. पण ही गोष्ट आपण मुळीच ध्यानात घेत नसतो. एका विशिष्ट अंशाचा विस्तार होत होत, वेगवेगळे अंश त्याच्यामध्ये सामावले जात असतात, हे आपण पाहतो. पण अनेक अंशांना एकत्रित करणे म्हणजे एकात्मता घडून येणे मुळीच नव्हे. त्याचप्रमाणे विविध अंशांमध्ये सुसंवाद नांदत असणे म्हणजेही एकात्मता नव्हे. या सुसंवादाला फारसा अर्थ नसतो. मनाच्या विविध भागांमध्ये सुसंवाद नांदणे, किंवा त्यांची एकात्मता प्रयत्नपूर्वक घडविली जाणे या गोष्टी विशेष महत्त्वाच्या नाहीत. कारण मनाकडे योग्य ते लक्ष दिले गेले, त्याची नीट काळजी घेतली किंवा त्याला योग्य प्रकारचे शिक्षण दिले, तर अशी ही एकात्मता किंवा हा सुसंवाद घडवून आणता येतो. पण खरे श्रेष्ठ महत्त्व कशाला असेल, तर ते अज्ञात, ते कालातीत अस्तित्वात येऊ देणे, त्याचा उदय होऊ देणे याच गोष्टीला आहे. ज्ञानाला त्या अज्ञाताची भेट कधीही होणे शक्य नसते आणि आपले हे मन तर स्वनिर्मित एकत्मतेच्या डबक्यातच सुखाने जगत राहण्याचा ध्यास घरीत असते. पण अशाने अज्ञाताची ती नवनवोन्मेषशाली सर्जनता कधीही अस्तित्वात येणे शक्य नसते.

माणसे नेहमी आत्मोन्नती साधण्यामागे लागत असतात. पण आत्मोन्नती साधत

राहणे हे क्षुद्र सामान्यतेचेच लक्षण असते. सद्‌गुणसंवर्धन करून आत्मोन्नती साधणे किंवा आपली कार्यक्षमता वाढवून ती साधणे अथवा कोणतीतरी भावात्मक वा अभावात्मक सुरक्षितता प्राप्त करून घेऊन आत्मोन्नती साधणे ही सर्व प्रक्रिया कितीही विशाल स्वरूपाची भासली तरी ती वस्तुतः स्व-संकोचक अशीच असते. कोणतीही महत्त्वाकांक्षा ही क्षुद्र सामान्यततेलाच जन्म देत असते. कारण महत्त्वाकांक्षा ही केवळ अहंची साफल्यपूर्तीच असते; मग हे साफल्य कार्याच्या द्वारा प्राप्त होवो की विशिष्ट समूहाच्या वा पक्षाच्या माध्यमातून प्राप्त होवो; की एखाद्या कल्पनेच्या वा विचारप्रणालीच्या मार्गाने प्राप्त होवो. जे जे ज्ञात त्याचे केंद्र म्हणजे अहं आणि जे जे ज्ञात, ते ते गत. वर्तमानातून भविष्याकडे जात राहणारे जे गत ते म्हणजेच अहं होय. म्हणून ज्ञाताच्या किंवा गताच्या क्षेत्रात जे जे व्यापार होत राहतात. त्यामुळे मन उथळ बनून जाते. म्हणूनच असे मन कधीही महान होऊ शकत नाही. जे महान असते ते अपरिमेय असते; अगणित, अमर्याद, अनंत असते. पण जे ज्ञात असते, ते मात्र सदैव तुलनांच्या क्षेत्रातच वावरत असते आणि या ज्ञाताचे सर्व व्यापार हे दुःखवेदना वाढविण्यासच कारणीभूत होत असतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर. स्थान
क्रमांक ...१८८६१... दि: जिल्हा
दाता ...२००९... दि: २/१२

अमितता

दरी खूप खोलवर पसरलेली होती. आणि बहुतेक दऱ्याखोऱ्यांतून जे दैनंदिन व्यापार चालू असतात ते याही दरीत आढळून येत होते. दूर पर्वतामागे सूर्य अस्ताला चालला होता आणि इकडच्या बाजूला लांब लांब दाट सावल्या पडल्या होत्या. सायंकाळ प्रशांत, रमणीय होती. सागरावरून वाहात येणाऱ्या शीतल पवनलहरी सुखकर भासत होत्या. संत्र्यामुसंब्यांच्या झाडांच्या रांगांमागून रांगा काळवंडू लागल्या होत्या. दरीतून जाणाऱ्या सरळ रस्त्यावरून एखादी मोटर गेली की, मावळत्या सूर्यप्रकाशात चमकून उठे. सायंकाळची ती मधुर रमणीयता मोहवून टाकीत होती.

ते विराट अवकाश व ते अनंत अंतर मनाने आपल्यात सामावून घेतल्यासारखे वाटत होते. किंवा असेही म्हणता येईल की, मन अखंडपणे त्या अनंतात विस्तारत चालले होते. आणि अखिल वस्तुजात आपल्यात सामावून घेणारे असे आगळे काही तरी त्या मनाच्या मागे व पलीकडे वसत होते. आपल्या पार असणाऱ्या त्या आगळ्याची ओळख पटवून घेण्यासाठी आणि त्याची स्मृती संचित करून ठेवण्यासाठी मन अस्पष्टपणे धडपडत होते. म्हणून त्याने आपले नित्याचे व्यापार थांबवून टाकले. पण ते जे अमित, ते मनाच्या जातीचे नसल्यामुळे मनाला त्याचे आकलन करून घेणे अशक्य झाले. आणि तत्क्षणीच मनासकट ते अखिल वस्तुजात त्या अमितात, त्या अनंतात सामावले गेले. सायंछाया काळवंडू लागल्या. दूरवर कुत्रे भुंकू लागले. पण मानवी जाणिवेच्या पार पल्याड असणारे ते अमित, अनंत मात्र कशानेही विचलित झाले नाही. मनाला त्या अमिताचा विचार करता येणे वा त्याचा अनुभव घेता येणे सर्वस्वी अशक्य असते.

मनोविक्षेपांहून सर्वस्वी भिन्न असणारे ते जे अमित, ते मग कुणाच्या अवधानात आले ? कुणाला त्याचे दर्शन घडले ? ते अनुभविणारा हा होता तरी कोण ? ते मन हे काही त्या नित्याच्या स्मती, प्रतिक्रिया वा प्रवृत्ती यांनी व्याप्त असणारे मन नव्हे, हे स्पष्ट आहे. मग हे दुसरे कोणते तरी मन आहे का ? की जे मनाच्या सर्वस्वी पार आहे, त्यानेच केवळ जागृत होणारा असा हा मनाचा एखादा सुप्त अंश आहे ? असे जर असेल, तर विचारातीत, कालातीत असणारे असे जे काही ते याच मनामध्ये वसत असते असे म्हणावे लागेल. पण हे तर पूर्णपणे अशक्य आहे; हा तर केवळ एक विकल्पनात्मक विचार आहे; अनेक मनोनिर्मित कल्पनांपैकीच ती एक कल्पना आहे.

मनाच्या प्रक्रियेने जर हे अमित, हे अनंत निर्माण होत नसेल, तर त्याचे अव-

राहणे हे क्षुद्र सामान्यतेचेच लक्षण असते. सद्‌गुणसंवर्धन करून आत्मोन्नती साधणे किंवा आपली कार्यक्षमता वाढवून ती साधणे अथवा कोणतीतरी भावात्मक वा अभावात्मक सुरक्षितता प्राप्त करून घेऊन आत्मोन्नती साधणे ही सर्व प्रक्रिया कितीही विशाल स्वरूपाची भासली तरी ती वस्तुतः स्व-संकोचक अशीच असते. कोणतीही महत्त्वाकांक्षा ही क्षुद्र सामान्यततेलाच जन्म देत असते. कारण महत्त्वाकांक्षा ही केवळ अहंची साफल्यपूर्तीच असते; मग हे साफल्य कार्याच्या द्वारा प्राप्त होवो की विशिष्ट समूहाच्या वा पक्षाच्या माध्यमातून प्राप्त होवो; की एखाद्या कल्पनेच्या वा विचारप्रणालीच्या मार्गाने प्राप्त होवो. जे जे ज्ञात त्याचे केंद्र म्हणजे अहं आणि जे जे ज्ञात, ते ते गत. वर्तमानातून भविष्याकडे जात राहणारे जे गत ते म्हणजेच अहं होय. म्हणून ज्ञाताच्या किंवा गताच्या क्षेत्रात जे जे व्यापार होत राहतात. त्यामुळे मन उथळ बनून जाते. म्हणूनच असे मन कधीही महान होऊ शकत नाही. जे महान असते ते अपरिमेय असते; अगणित, अमर्याद, अनंत असते. पण जे ज्ञात असते, ते मात्र सदैव तुलनांच्या क्षेत्रातच वावरत असते आणि या ज्ञाताचे सर्व व्यापार हे दुःखवेदना वाढविण्यासच कारणीभूत होत असतात.

...ादी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थानक
क्रमांक ...१८८९१... दि: निर्लेख
...२२०९... दि: २/१२/

अमितता

दरी खूप खोलवर पसरलेली होती. आणि बहुतेक दऱ्याखोऱ्यांतून जे दैनंदिन व्यापार चालू असतात ते याही दरीत आढळून येत होते. दूर पर्वतामागे सूर्य अस्ताला चालला होता आणि इकडच्या बाजूला लांब लांब दाट सावल्या पडल्या होत्या. सायंकाळ प्रशांत, रमणीय होती. सागरावरून वाहात येणाऱ्या शीतल पवनलहरी सुखकर भासत होत्या. संध्यामुसंध्यांच्या झाडांच्या रांगांमागून रांगा काळवंडू लागल्या होत्या. दरीतून जाणाऱ्या सरळ रस्त्यावरून एखादी मोटर गेली की, मावळत्या सूर्यप्रकाशात चमकून उठे. सायंकाळची ती मधुर रमणीयता मोहवून टाकीत होती.

ते विराट अवकाश व ते अनंत अंतर मनाने आपल्यात सामावून घेतल्यासारखे वाटत होते. किंवा असेही म्हणता येईल की, मन अखंडपणे त्या अनंतात विस्तारत चालले होते. आणि अखिल वस्तुजात आपल्यात सामावून घेणारे असे आगळे काही तरी त्या मनाच्या मागे व पलीकडे वसत होते. आपल्या पार असणाऱ्या त्या आगळ्याची ओळख पटवून घेण्यासाठी आणि त्याची स्मृती संचित करून ठेवण्यासाठी मन अस्पष्टपणे धडपडत होते. म्हणून त्याने आपले नित्याचे व्यापार थांबवून टाकले. पण ते जे अमित, ते मनाच्या जातीचे नसल्यामुळे मनाला त्याचे आकलन करून घेणे अशक्य झाले. आणि तत्क्षणीच मनासकट ते अखिल वस्तुजात त्या अमितात, त्या अनंतात सामावले गेले. सायंछाया काळवंडू लागल्या. दूरवर कुत्रे भुंकू लागले. पण मानवी जाणिवेच्या पार पल्याड असणारे ते अमित, अनंत मात्र कशानेही विचलित झाले नाही. मनाला त्या अमिताचा विचार करता येणें वा त्याचा अनुभव घेता येणे सर्वस्वी अशक्य असते.

मनोविक्षेपांहून सर्वस्वी भिन्न असणारे ते जे अमित, ते मग कुणाच्या अवधानात आले ? कुणाला त्याचे दर्शन घडले ? ते अनुभविणारा हा होता तरी कोण ? ते मन हे काही त्या नित्याच्या स्मती, प्रतिक्रिया वा प्रवृत्ती यांनी व्याप्त असणारे मन नव्हे, हे स्पष्ट आहे. मग हे दुसरे कोणते तरी मन आहे का ? की जे मनाच्या सर्वस्वी पार आहे, त्यानेच केवळ जागृत होणारा असा हा मनाचा एखादा सुप्त अंश आहे ? असे जर असेल, तर विचारातीत, कालातीत असणारे असे जे काही ते याच मनामध्ये वसत असते असे म्हणावे लागेल. पण हे तर पूर्णपणे अशक्य आहे; हा तर केवळ एक विकल्पनात्मक विचार आहे; अनेक मनोनिर्मित कल्पनांपैकीच ती एक कल्पना आहे.

मनाच्या प्रक्रियेने जर हे अमित, हे अनंत निर्माण होत नसेल, तर त्याचे अव-

घान मग होते तरी कुणाला ? अनुभविता या नात्याने मनाला त्याचे अवधान येत असते का ? की ते अमित, ते अनंतच अशा वेळी स्व-संवेद्य होत असते ? कारण तेथे अनुभविता तर उरलेलाच नसतो. पर्वतावरून खाली उतरत असता जेंव्हा हे घडले, तेंव्हा तेथे अनुभविता उरला नव्हता. पण मनाचे त्या वेळी जे अवधान होते, ते त्या अपरिमेयाहून गुणवत्तेने व उत्कटतेने सर्वस्वी वेगळ्या प्रकारचे होते. मन हे त्यावेळी निर्व्यापार अवस्थेत होत. ते तरल होते, अक्रिय पण सावधान होते. तरुपर्णांशी खेळणाऱ्या वायुलहरींचे जरी त्याला भान होते तरी त्याच्या अंतर्यामात मात्र सारे काही व्यापारशून्य होतें. दृश्याचे मोजमाप करणारा द्रष्टा तेथे नव्हता. केवळ 'ते' तेथे वसत होते. आणि 'त्या'लाच स्वतःचे संवेदन होत होते, आपल्या अमिततेचे संवेदन होत होते. ते अनादी होते, अशब्द होते.

ते जे कालातीत, अमित, अक्षय, अनंत असते, ते कुठल्याही अनुभवांच्या वा शब्दांच्या साहाय्याने आपणांस कधीही गवसणार नाही, याची मनाला पूर्ण जाणीव असते.

• • •


REFBK-0018436
